# तिसरी लाट

॥ अल्विन टॉफलेर यांच्या Third Wave या पुस्तकाचा अनुवाद ॥

अनुवादिका
शरदिनी मोहिते



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

# तिसरी लाट

**लेखक**

अल्विन टॉफलर

**अनुवादिका**

शरदिनी मोहिते

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : ४०० ०३२**

अनुक्रमणिका

अल्विन टॉफलर यांच्या ‘द थर्ड वेव्ह’ चा अनुवाद

प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर, १९९१

प्रकाशक

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : ४०० ०३२

© १९९१, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रक

जय प्रिंटर्स
शाहू मिलजवळ, राजारामपुरी,
कोल्हापूर : ४१६ ००८

**मूल्य : रुपये ४५ फक्त**

अनुक्रमणिका

# निवेदन

मानवजातीचे भवितव्य काय असेल हे जाणण्याच्या जिज्ञासेतून फ्युचरॉलॉजी किंवा फ्युचर स्टडीज् म्हणजेच भवितव्यशास्त्र या नव्या ज्ञानशाखेची तीसचाळीस वर्षांपूर्वी वाढ होऊ लागली. भारतात मात्र १९७० नंतर या नव्या ज्ञानशाखेचा विकास करण्याचे प्रयत्न सुरु झाले. एकविसाव्या शतकातील भारत कसा असेल याबद्दलची चित्रे तर अगदी अलीकडे रेखाटण्यात येऊ लागली. भवितव्यशास्त्राच्या वाटचालीकडे सामान्य माणसांचेही लक्ष वेधण्यास कारणीभूत ठरलेल्या लेखकांमध्ये अल्विन टॉफलर या अमेरिकन लेखकास अग्रस्थान द्यावयास हवे.

जुलै, १९७० मध्ये त्यांचे "फ्युचर शॉक" हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि ते इतके लोकप्रिय झाले की त्या पुस्तकाच्या लाखो प्रती खपल्या. १९२८ साली न्यूयॉर्कमध्ये जन्मलेल्या टॉफलरनी अनेक वर्षे वार्ताहर म्हणून काम केले आहे. १९८० साली त्यांचे "द थर्ड वेव्ह" हे पुस्तक प्रकाशित झाले आणि त्याच्याही लाखो प्रती खपल्या. अनेक भाषांमध्ये त्याचे अनुवाद करण्यात आले. जपानमध्ये या पुस्तकाने विक्रीचे उच्चांक मोडून विक्रम केला. भांडवलशाही तसेच समाजवादी देशांतील उद्योगप्रधान समाज ज्या पेचप्रसंगांना तोंड देत आहे त्याची कारणमीमांसा करण्याचा टॉफलरनी या पुस्तकात प्रयत्न केला असल्यामुळे आणि तो करताना जडजंबाल भाषेचा अवलंब न करता सोप्या भाषेत विश्लेषण केल्यामुळे त्यांचे पुस्तक जगभरच्या वाचकांना आवडल्याशिवाय राहिले नाही. तंत्रविद्या, अर्थव्यवस्था, राजकारण, कौटुंबिक जीवन, ऊर्जेचा वापर यासारख्या क्षेत्रातील बदलामुळे "तिसरी लाट" आली असून तिची परिणती नव्या संस्कृतींच्या उदयात होण्याची चिन्हे दिसत आहेत असे टॉफलरना वाटते. शेतीचा उदय ही मानवी संस्कृतीच्या इतिहासातील पहिली लाट होती. सतराव्या शतकाच्या अखेरीस ती ओसरली आणि त्यानंतरच्या काळात औद्योगिक क्रांतीच्या रूपाने दुसरी लाट आली. तिचाही भर १९५० नंतर ओसरु लागला असून औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशांनी आता तिसऱ्या लाटेला सामोरे जाण्याची तयारी केली पाहिजे असे टॉफलरचे म्हणणे आहे. तिसऱ्या लाटेमुळे उदयाला येणाऱ्या युगात इलेक्ट्रॉनिक उद्योग, अवकाश उद्योग, समुद्राच्या पोटात दडलेल्या खनिजांच्या आधारे विकसित झालेले उद्योग तसेच जीवोद्योग वगैरे नवनवीन उद्योगांना महत्व येणार आहे असे टॉफलरना वाटते. प्रसार माध्यमांचे विघटन व विकेंद्रीकरण होईल असे त्यांनी भाकित केले आहे. तिसऱ्या लाटेमुळे निर्माण होणाऱ्या नव्या युगात कुटुंबसंस्थेत कोणते बदल होतील, माहिती व ज्ञान यांना फार मोठे महत्व प्राप्त होणार असल्याने शिक्षण व्यवस्थेत कोणते फेरफार करावे लागतील वगैरे विषयांचाही टॉफलरने वेध घेतलेला आहे. जगभर वाचल्या गेलेल्या या पुस्तकाचे भाषांतर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने श्रीमती शरदिनी मोहिते यांच्यावर सोपवली होती. त्यांनी केलेले भाषांतर वाचून टॉफलरच्या विचारांची मराठी वाचकांना तोंडओळख होईल असे वाटते.

**य. दि. फडके**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई :

८ जानेवारी, १९९१

अनुक्रमणिका

# प्रास्ताविक

आजच्या काळात आपल्या नजरेसमोर नाचणाऱ्या मथळ्यांकडे आपण भयचकित होऊन पहात रहातो, कारण हाच तो काळ ज्यात दहशतवादी ओलिसांबरोबर जीवघेणा खेळ खेळत आहेत, तिसऱ्या महायुद्धाच्या वावड्या उठत असतानाच ठिकठिकाणची चलने कोसळू लागलेली आहेत, वकिलाती जळत आहे, कित्येक देशांतून बंडखोर टोळ्यांतील सैनिक आपल्या बुटांच्या नाड्या बांधत उठावाला सज्ज होत आहेत. सोन्याची किंमत सर्व भीतींचे संवेदनशील भारमापक–सर्व विक्रम मोडत आहे. बँका हादरताहेत. महागाई आवाक्याबाहेर भडकते आहे. आणि जगातील सरकारे हतबल होऊन गेलेली आहेत. आणि या पार्श्वभूमीवर धोक्याचा, दुर्दैवांचा इशारा देणाऱ्यांचे समूहगान स्मशान–गीतांनी वातावरण भरून टाकत आहे. तथाकथित रस्त्यावरचा माणूस म्हणू लागला आहे, की जग वेडे झाले आहे. आणि तज्ज्ञांच्या मते हे सर्व प्रवाह सर्वविनाशाकडेच जगाला घेऊन चाललेले आहेत.

परंतु या पुस्तकात एकदम वेगळा दृष्टिकोण सादर करण्यात आलेला आहे.

पुस्तकात म्हटले आहे, की जग वेडे होत चाललेले नाही. आणि तसे पाहू जाता वरवर निरर्थक दिसणाऱ्या या घटनांच्या, गोंगाटाच्या आणि खणखणाटाच्या खालच्या थरात आश्चर्यकारक आणि अव्यक्त अशी आशादायक धाटणी काम करते आहे! हे पुस्तक त्या धाटणीबद्दल आणि त्या आशेबद्दलच आहे.

'तिसरी लाट' हे पुस्तक ज्या लोकांना मानवीकहाणी संपुष्टात येणे तर राहू द्याच नुकतीच सुरू झाली आहे असे वाटते, अशांकरिता लिहिलेले आहे.

'तिसरी लाट' ह्या पुस्तकात दृष्टिकोण आहे, की काही घटनांचा, प्रक्रियांचा आणि तत्त्वांचा वापर एखादी संस्कृती करून घेत असते. आणि स्वतःचे एक पायाभूत उत्पत्तिशास्त्र तयार करत असते; आणि त्याच्या आधाराने ती वास्तवाचे स्पष्टीकरण करत असते. शिवाय स्वतःच्या अस्तित्वालाही न्याय देत असते.

ह्या पुस्तकात एकमेकोंशी टक्कर घेणाऱ्या लाटांचे रूपक योजण्यात आलेले आहे. अतिशय विसंवादी अशा माहितीचे सुसूत्रीकरण हा एकच या रूपकामागचा हेतु नाही; तर त्यायोगे विचारांचा गोंधळ नाहीसा होऊन स्वच्छ, प्रखर प्रकाशामध्ये आपल्याला माहीत असलेल्या गोष्टींचेच परंतु नितळ स्पष्ट चित्र आपल्याला दिसून येते.

**शरदिनी मोहिते**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ............ ४

प्रास्ताविक ............ ५

लाटांची टक्कर ............ ८

एक । महान संघर्ष ............ ९

दुसरी लाट ............ १९

दोन । संस्कृतीची बांधणी ............ २०

तीन । अदृश्य पाचर ............ ३४

चार । कायदे भंग............ ४२

पाच । सत्तेचे कारागीर ............ ५३

सहा । उद्यम—वास्तव धर्म ............ ५६

सात । भैरवी : वेगवान लोंढा ............ ६५

तिसरी लाट ............ ६९

आठ । नवीन संयोग ............ ७०

नऊ । प्रभुत्वाचे शिखर ............ ७३

दहा । माध्यमांचे विकेंद्रीकरण ............ ८६

अकरा । बुद्धीमान वातावरण ............ ९४

बारा । अवाढव्य प्रमाणातील उत्पादनाच्या पलिकडे............१००

तेरा । इलेक्ट्रॉनिक बंगली............१०७

चौदा । उद्याची कुटुंबे............११३

पंधरा । संयुक्त पेचप्रसंग............१२२

सोळा । नवे नियम; नवी संहिता ............१३१

सतरा । स्वयंसिद्धता ............१३९

अठरा । मनाचा भोवरा ............१५१

एकोणीस । राष्ट्रभंग............१६३

वीस । गांधी, उपग्रहांसह! ............१७०

एकवीस । भरतवाक्य : महान संगम ........................................................................ १८१

उपसंहार ................................................................................................. १८८

बावीस । नवे मानसक्षेत्र ................................................................................ १८९

तेवीस । भविष्यकालीन व्यक्तिमत्व ....................................................................१९७

चोवीस । राजकीय कबर!...................................................................................२०५

पंचवीस । एकविसाव्या शतकातील लोकशाही .........................................................२१५

# लाटांची टक्कर

अनुक्रमणिका

# एक । महान संघर्ष

एक नवीच संस्कृती आपल्या जीवनात उदयाला येते आहे, आणि सर्वत्रच आढळणारे अविचारी लोक तिला दडपून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. या नव्या संस्कृतीने आपल्या बरोबर नवीन प्रकारच्या कुटुंबरचना आणल्या आहेत; कामे करण्याच्या, प्रेमाच्या, जगण्याच्या नव्या रीती आणल्या आहेत; नवेच अर्थशास्त्र आणले आहे, नवे राजकीय संघर्ष आणले आहेत; आणि या सर्वांहूनही विशेष म्हणजे नव्या स्वरुपाची जाण आणली आहे! या नव्या संस्कृतीचे काही अंश सध्या, आजमितीला अस्तित्वात आलेले आहेत. आणि लाखो लोकांनी आपले जीवन उद्याच्या तालाशी जुळवून घेण्यास सुरुवातही केलेली आहे. इतर मात्र भविष्यकाळाला भ्यालेले आहेत, आणि निराशेच्या भरात जिवावर उदार होत, भूतकाळात निष्फळ झेपा घेत आपल्याला जन्म देणाऱ्या आणि आता मरु घातलेल्या जुन्याच जगाचे जतन करण्यात गढलेले आहेत.

आपल्या जीवनकाळी या नव्या संस्कृतीचा उदय हीच एक सर्वात स्फोटक ठरेल अशी घटना होऊन राहिली आहे.

नजीकच्या भविष्यकाळाची समज आपल्याला देऊ शकणारी गुरुकिल्ली ठरेल अशी ही फार महत्त्वाची घटना आहे. अतिशय गहन अर्थ असलेली ही घटना दहा हजार वर्षांपूर्वी शेतीचा शोध लागल्यानंतर मानवी जीवनात उफाळलेल्या बदलाच्या पहिल्या लाटेच्या, किंवा औद्योगिक क्रांतीमुळे सर्व जग हादरवून टाकणाऱ्या, जीवनच जणू पालटून टाकणाऱ्या बदलाच्या दुसऱ्या लाटेच्या तोडीची आहे! आपण या तिसऱ्या लाटेची म्हणजेच पुढच्या मोठ्या बदलाची बाळे आहोत.

या अभूतपूर्व बदलाची पूण ताकद किंवा त्याचा आवाका वणन करायला शद्ब अपुरे पडतात. काही जण प्रचंड अशा अंतराळ युगाबद्दल बोलतात, माहिती युग, इलेक्ट्रॉनिक युग, किंवा व्योमस्थ ग्रामाबद्दल बोलतात. ब्झिन्यू ब्रेझिन्स्कीने म्हटले आहे, की आपण तंत्राधिष्ठित आणि इलेक्ट्रॉनाधिष्ठित युगाच्या उंबरठ्यावर आहोत. डॅनियल बेल या समाजशास्त्र्याने 'उद्योगोत्तर समाजाच्या' अस्तित्वात येण्याबाबतचे वर्णन केले आहे. रशियाच्या भविष्यवाद्यांनी 'तंत्रशास्त्रीय क्रांती'ची भाषा केली आहे. मी स्वतः 'अतिउद्योगशील समाज' या विषयावर आजवर खूप लिहिले आहे. परंतु माझ्या स्वतःच्या व्याख्येसह यातील कोणतीही व्याख्या अभिव्यक्तीला पुरेशी वाटत नाही.

एकाच तत्थ्यावर भर दिला जात असल्याने यापैकी काही शद्बसमूह आपली जाण विकसित करण्याऐवजी मर्यादितच करतात, काही जण ठामपणे प्रतिपादन करतात, की आपल्या जीवनात एक नवाच समाज कुठल्याही तणावाशिवाय किंवा झगड्याशिवायच अगदी सहजपणे अस्तित्तावत येऊ शकेल. यातली कोणतीही व्याख्या आपल्यात वेगाने घडू पहाणाऱ्या बदलाच्या ताकदीबाबत, आवाक्याबाबत, चैतन्याबाबत किंवा ते निर्माण करीत असलेल्या दबावाबाबत अगर संघर्षाबाबत काही सांगण्याच्या दृष्टीने केवळ सुरूवात करते आहे असे देखील वाटत नाही.

लवकरच मानवता प्रगतीच्या दिशेने प्रचंड झेप घेणार आहे. आजपर्यंत कधीही घडली नसेल एवढी प्रचंड सामाजिक उलथापालथ आणि सर्जनशील पुनर्रचना आता घडणार आहे. तिची पूर्णपणे ओळख

अनुक्रमणिका

पटण्यापूर्वीच आपण लक्षणीय अशी नवीन संस्कृती उभारण्याच्या उद्योगाला लागलो आहोत. तिसऱ्या लाटेचा अर्थ हा आहे.

आतापर्यंत मानववंशाने बदलांच्या दोन लाटांचा अनुभव घेतलेला आहेच. या दोन्ही लाटांनी आपल्यापूर्वी अस्तित्वात असलेली संस्कृती मोठ्या प्रमाणात नाहीशी केली, पुसून टाकली आणि तिच्या जागी जीवनाचे असे नवे क्रम आणून बसवले की जे त्या पूर्वीच्या लोकांच्या कधी ध्यानीमनीही आले नसतील! शेतीचा क्रांतिकारक शोध ही बदलाची पहिली लाट हजारो वर्षे उधाणत होती; तर औद्योगिक क्रांतीची दुसरी लाट केवळ तीनशे वर्षात काम करुन गेली. आता इतिहासाने म्हणजेच काळाने खूपच मोठ्या प्रमाणात वेग धारण केलेला आहे. आता येऊ पहाणारी बदलाची तिसरी लाट पूर्वील इतिहास पुसून टाकीत येत्या काही दशकातच पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच अशा या स्फोटक काळात भूतलावर वास्तव्य असलेल्या आपणा सर्वांनाच या तिसऱ्या लाटेच्या आघाताचा जोर जाणवत आहे.

या तिसऱ्या लाटेचा परिणाम प्रत्येकावर होतो आहे. कारण ती आपली कुटुंबे उध्वस्त करते आहे; तिने आपल्या अर्थव्यवस्थेला भेलकांडून सोडले आहे, ती आपल्या राज्यसंस्था दुर्बल करुन सोडत आहे, तिच्यामुळे आपल्या मूल्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होत आहेत. मनुष्यांच्या एकमेकांशी असलेल्या निरनिराळ्या संबंधातील ताकदीला तिने जणू आव्हान देऊन ठेवले आहे. आज धोक्यात असलेल्या उच्च वर्गातील लोकांच्या अधिकारांना आणि खास हक्कांना ती हटकते आहे. उद्या उठणाऱ्या निरनिराळ्या ठळक संघर्षांना तिने जणू पार्श्वभूमी तयार करुन ठेवली आहे.

जुन्या पारंपरिक औद्योगिक संस्कृतीशी या नव्याने येऊ घातलेल्या संस्कृतीचा अनेक बाबतीत विसंवाद आहे. एकाचवेळी ती अतिशय प्रगत औद्योगिक कलाशास्त्राभिमुख आहे आणि तशीच औद्योगिकीकरणाला विरोध करणारीही आहे.

ही तिसरी लाट आपल्याबरोबर खराखुरा जीवनमार्ग आणत आहे. नवीन असे विविध ऊर्जा उगम, ज्यांच्या भागांची जुळणी आगळी ठरेल अशा यंत्रांनी युक्त अशा कारखान्यांतून वापरल्या जाणाऱ्या उत्पादन—पद्धती, विकेंद्रित कुटुंबे, जिला 'इलेक्ट्रॉनिक कुटीर' म्हणावे अशी नवीच एखादी प्रथा, स्वरुपात आमूलाग्र बदललेल्या भविष्यकालीन शाळा आणि संस्था अशा गोष्टी तिच्या पायाभूत गोष्टी ठरतील. उगम पावत असलेली ही नवीच संस्कृती आपल्यासाठी वर्तणुकीची, जीवनक्रमाची नवीच संथा उलगडेल आणि आपल्याला आदर्शवादाच्या, केंद्रीकरणाच्या पार नेईल. शक्ती, पैसा आणि ताकद यांच्या केंद्रीभवनाच्या देखील पार नेईल.

जुन्याला आव्हान देत ही नवीन सस्कृती नोकरशाह्या उलथून टाकेल; राज्याचे कामच कमी करुन टाकेल आणि साम्राज्यवादाच्या पलिकडे गेलेल्या या जगात अर्थस्वायत्त अर्थव्यवस्थेचा उदय घडवून आणेल. यासाठी आज आपल्याला माहीत आहेत त्यापेक्षा अधिक लोकशाहीयुक्त, अधिक परिणामकारक, अधिक साधीसुधी सरकारे आवश्यक आहेत. ह्या संस्कृतीचा जगाकडे पहाण्याचा स्वतःचा असा खास दृष्टिकोन आहे. काळाबाबत तसेच अवकाश, तर्क आणि कार्यकारणभाव यांच्या संबंधातही तिची स्वतःची अशी रीत आहे.

अनुक्रमणिका

आपल्या असेही ध्यानात येईल, की संस्कृतीच्या ह्या तिसऱ्या लाटेने उत्पादक आणि ग्राहक यांच्यामधील ऐतिहासिक दरी बुजवण्याच्या कामाला सुरूवात केलेली आहे. आणि ती उद्याच्या नव्या अर्थकारणाचा उदय घडवून आणत आहे. इतर कारणांप्रमाणेच याही एका कारणामुळे आपल्याकडून मिळणाऱ्या अक्कलहुषारीच्या मदतीने ती आपल्याला ज्ञात असलेल्या इतिहासातील पहिली खरीखुरी 'मानवी' संस्कृती ठरेल.

## क्रांतिकारी पूर्वपक्ष

वरवर विरोधाभास दर्शविणाऱ्या भविष्याच्या दोन प्रतिमांनी लोकांच्या मनावर पकड बसविलेली आहे. बऱ्याच लोकांची अशी समजूत आहे, की जे जग त्यांना परिचित आहे, ते आहे तसेच कायम राहणार आहे. त्यामुळे आता आपल्या पुढ्यात ठाकलेल्या अगदी नव्याच जीवनमार्गाची त्यांना कल्पनाच येत नाही; संपूण नव्या संस्कृतीची तर गोष्टच सोडा. एक मात्र खरे की काहीतरी बदल घडतोय हे त्यांना समजते आहे, पण त्याना वाटते, की हे बदल नाहीसे होऊन जातील, आपल्याला परिचित आलेल्या आर्थिक चौकटीत किंवा राजकीय प्रणालीत काही बदल होणार नाही. त्यांना असा विश्वास वाटतो, की भविष्यातही आपल्याला वर्तमानच आढळत राहील.

साधी सरळ अशी ही विचारसरणी वेगवेगळ्या प्रकारांनी प्रकट होते. एका पातळीवर ती गोष्ट उद्योजक, शिक्षक, पालक, राजकारणी यांनी घेतलेल्या निर्णयामागच्या, विशेष परीक्षण न केलेल्या कल्पनेच्या स्वरूपात दिसते. त्यापेक्षा वरच्या दिखाऊ किंवा कृत्रिम सफाई प्राप्त झालेल्या पातळीवर ती संख्याशास्त्र कॉम्प्युटरने पुरवलेला पूर्वपक्ष आणि भविष्यवेत्त्याच्या निरर्थक बोलण्याचा वेष घालून येते. यातल्या कुठल्याही प्रकाराने पाहिले तरी भविष्यकालीन जग प्रामुख्याने, 'आहे तसेच' दिसते. औद्योगिकीकरणाची दुसरी लाट जगाला अक्षरशः पुरून उरली आहे.

अलीकडे घडलेल्या काही घटनांनी मात्र भविष्यकालीन जगाची ही ठाम प्रतिमा मोठ्या प्रमाणात हादरवून टाकलेली आहे. एकामागून एक संकटे येत राहिली, मथळे ठळकपणे कडाडत राहिले, इराण भडकला, माओला उघड विरोध करण्यात आला, तेल किमती आकाशाला भिडल्या, महागाई वेड्यासारखी भडकली, दहशतवाद पसरला, सरकारे अशा गोष्टींवर काबू ठेवण्यात अयशस्वी झाली आणि अशी निराशाजनक उदासवाणी दृश्ये उत्तरोत्तर लोकप्रिय होत गेली. आणि अशा प्रकारे सतत मिळत रहाणाऱ्या अशा वाईट बातम्यांवर विनाश चित्रित करणारे चित्रपट, बायबल कथांवर आणि प्रतिष्ठित विचारवंतांनी प्रकाशित केलेल्या दुःस्वप्नवत् पटकथा, अशा सर्व मसाल्यावर पोसले गेलेले बहुसंख्य लोक अशा निर्णयाप्रत येतात की भविष्यच संभवत नसल्यामुळे आजचा समाज पुढे भविष्यात कसा असेल याची कल्पना करणेच शक्य नाही. त्यांच्या दृष्टीने महाप्रलयंकारी युद्ध काही मिनिटांच्या अवकाशावर येऊन ठेपले आहे. पृथ्वी तिच्या घोर विनाशाप्रत येऊन ठेपली आहे.

भविष्यकाळाच्या ह्या दोन कल्पना वरवर पाहताना एकदम वेगळ्या वाटतात परंतु त्यांचे दोघींचे समान असे मानसिक आणि राजकीय परिणाम संभवतात. दोन्ही कल्पनांच्या प्रभावामुळे कल्पनाशक्ती व इच्छाशक्ती पांगळी होऊन जाते.

अनुक्रमणिका

उद्याचा समाज म्हणजे आज जे काही आहे त्याचीच खूप वाढवलेली अशी आवृत्ती असेल तर मग त्याच्यासाठी फार थोडे असे काही आपल्याला करावे लागेल. उलट, आपल्या डोळ्यादेखतच समाज विनाश पावणार असेल तर आपण काहीच करू शकत नाही. थोडक्यात, भविष्याकडे पहाण्याच्या या दोन्ही विचारसरणी आपल्याला अलिप्त आणि अकर्तृत्ववान करतात. दोन्हीही आपल्याला अकर्मात थिजवून टाकतात.

तरी देखील आपले काय घडते आहे, याचा विचार करीत असताना साधे सरळ 'पानिपत' किंवा तसलाच दुसरा एखादा पर्याय एवढीच मर्यादा आपल्याला असणार नाही. 'उद्या'चा विचार करण्याचे आणखी कितीतरी स्वच्छ आणि विधायक मार्ग आहेत. हे मार्ग आपल्याला भविष्यासाठी तयार करतील आणि मुख्य म्हणजे वर्तमान बदलण्याच्या दृष्टीने मदत करतील.

मी ज्याला 'क्रांतिकारी पूर्वपक्ष' म्हणतो, त्याच्यावर हे पुस्तक आधारलेले आहे. त्याची कल्पना अशी आहे की, आगामी दशकामध्ये जरी खूप चढउतार होणार असले, वादळे उठणार असली, कदाचित् सर्वदूर पसरणारी हिंसाही अस्तित्वात येणार असली तरी देखील आपण स्वतःचा पूर्णपणे नाश होऊ देणार नाही, करून घेणार नाही. त्याची अशीही कल्पना आहे, की आपण जे धक्कादायक बदल सध्या अनुभवतो आहोत, ते गोंधळाचे किंवा निरुद्देश्य नाहीत, तर ते उत्तम, स्वच्छ आणि सरळ कित्ता तयार करणारे आहेत. शिवाय त्याची अशी कल्पना आहे की, हे बदल आपल्या जीवनाच्या, कामाच्या, खेळण्याच्या, विचाराच्या धाटणीत जो प्रचंड बदल होतो आहे, त्यात भर घालत आहेत; आणि त्यामुळे हवासा वाटणारा शहाणा, आणि समजदार भविष्यकाळ शक्य आहे. तेव्हा थोडक्यात, जे घडणार आहे ते या प्रस्तावानंतरच. आणि आता जे घडत आहे ते म्हणजे इतिहासातील मोठीच झेप ठरणारी जागतिक स्वरूपाची एक क्रांतीच होय.

हेच थोडे वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, हे पुस्तक या कल्पनेतून झरत गेले आहे, की आपण एका जुन्या संस्कृतीतील शेवटच्या पिढीपैकी आहोत, आणि नव्या संस्कृतीच्या पहिल्या पिढीपैकी ठरणार आहोत. आपल्याला व्यक्तिशः जो गोंधळ, ज्या यातना, परिस्थितीच्या पूर्ण जाणिवेचा जो अभाव अनुभवावा लागत आहे, त्याचे मूळ आपल्यातल्या झगड्यात आहे, आपल्या राजकीय संस्थांत आहे मरू घातलेल्या संस्कृतीच्या दुसऱ्या आणि जन्माला येत असलेल्या व धडाक्यात आपली जागा घेऊ पहाणाऱ्या तिसऱ्या संस्कृतीच्या लाटेतील संघर्षात आहे.

आणि ज्या वेळी आपल्याला हे समजेल, त्या वेळी आपल्याला एरव्ही निरर्थक वाटणाऱ्या कितीतरी घटना अनाकलनीयही वाटू लागतील. बदलाची एक विस्तृत घडण आपल्यापुढे स्पष्ट होईल. अस्तित्वासाठीची धडपड पुनः शक्य होईल, आणि अर्थपूर्ण वाटू लागेल. थोडक्यात हा क्रांतिकारी पूर्वपक्ष आपली बुद्धी आणि इच्छाशक्ती मुक्त करून टाकतो.

## आघाडीची धार

आपल्या पुढ्यात असलेले हे बदल क्रांतिकारी आहेत. एवढेच म्हणून मात्र भागणार नाही. कारण त्यांच्यावर ताबा मिळवून त्यांना दिशा दाखविण्यापूर्वी आपणास त्यांची ओळख करून घेऊन त्यांचे योग्यप्रकारे पृथःक्करण करण्यासाठी नवा दृष्टिकोण बाळगणे आवश्यक आहे. त्याच्याशिवाय आपल्याला यश येणार नाही.

अनुक्रमणिका

याचा एक परिणामकारक नवा मार्ग लाटेच्या आघाडीचे सामाजिक पृथःक्करण हा असेल. या रीतीने आपण सतत उलगडत जाणाऱ्या बदलाच्या लाटांच्या रूपाने इतिहासाकडे पाहू शकू. आणि प्रत्येक लाटेची आघाडीची धार आपल्याला कुठे नेत आहे, याचा विचार करू शकू. इतिहासातील घटनांचा क्रम महत्त्वाचाच आहे. परंतु त्याच्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे हा दृष्टिकोण घटनांच्या जुन्या क्रमातील खंडांकडे आणि नव्या उपक्रमांकडेच जास्त लक्ष देतील. त्यामुळे बदल घडवून आणू शकणाऱ्या घटना घडत असतानाच, त्यांची पुरी ओळख पटून, त्यांच्यावर प्रभुत्व मिळविणे आपल्याला शक्य होईल.

अगदी साधी सरळ कल्पना अशी, की शेतीचा उदय हा मानवाच्या सामाजिक घडणीतला पहिला, नवे वळण घेणारा असा क्षण होता, आणि औद्योगिक क्रांती हाही फळी फोडण्याचाच प्रकार होता. यातली कोणतीही घटना ही एकदमच घडलेली, दूरवर परिणाम करणारी घटना नव्हती, तर एका विपक्षित वेगाने येणारी बदलाची एकेक लाट होती, अशा तऱ्हेने त्यांचा विचार होईल.

बदलाच्या पहिल्या लाटेपूर्वी माणसे छोटे छोटे गट करून रहात होती. हे गट स्थानान्तर करीत रहाणारे होते. अन्नाच्या शोधात भटकत, मच्छिमारी करत, शिकारी करत आणि गुरे राखून पोट भरणारे होते. अशा स्थितीत कोणत्यातरी वेळी, सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी शेतीची क्रांतिकारी सुरूवात झाली. गावोगाव, वस्त्यावस्त्यांत ती हळूहळू पसरत गेली. जमिनी नांगराखाली आल्या. मशागती झाल्या. जीवनाचा नवीनच मार्ग सुरू झाला.

सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत ही पहिली लाट राहिलीच होती. त्यानंतर युरोपात औद्योगिक क्रांतीचा उद्रेक झाला आणि बदलाच्या या दुसऱ्या भल्या थोरल्या लाटेने पृथ्वीवर आक्रमण केले. औद्योगिकीकरणाची ही प्रक्रिया फार मोठ्या वेगाने निरनिराळ्या दिशांमधून, खंडाखंडांमधून पसरत गेली. अशा तऱ्हेने पृथ्वीवर एकाचवेळी पण भिन्न वेगात दोन स्वतंत्र आणि वेगळ्या अशा बदलाच्या प्रक्रिया संचरत होत्या.

आज पहिली लाट पूर्णपणे निमाली आहे. फार थोड्या आदिवासी जमाती, उदा : दक्षिण आफ्रिकेतील किंवा न्यू गियानात पापुआतील, केवळ शेतीच्या आधारे जगत आहेत. पण या पहिल्या लाटेचा भर संपूर्णतया ओसरलेला आहे.

युरोप आणि उत्तर अमेरिकेतील, तसेच पृथ्वीच्या इतर काही भागात फार थोड्या शतकांच्या कालावधीत या दुसऱ्या लाटेने जीवनक्रांती घडवून आणली. अजून तिचा वेग तसाच आहे. पुष्कळ शेतीप्रधान देश पोलाद कारखाने, कापड गिरण्या, वाहन उत्पादक कारखाने, रेल्वे, अन्नावर प्रक्रिया करणारे कारखाने उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत. औद्योगिकीकरणाचा वेग अजूनही जाणवेल इतका प्रचंड आहे. या दुसऱ्या लाटेचा भर अजूनही संपलेला नाही. पुष्कळ शिल्लक आहे.

परंतु अजून ही प्रक्रिया चालू आहे तोवरच याहीपेक्षा खूप महत्त्वाची प्रक्रिया चालू झाली आहे. औद्योगिकीकरणाच्या लाटेने दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात सर्वोच्च उंची गाठलेली असतानाच न कळतच तिसरी लाट पृथ्वीभर पसरायला सुरूवात झाली असून जिला तिचा स्पर्श होईल ती प्रत्येक वस्तू बदलत चालली आहे.

अनुक्रमणिका

त्यामुळे पुष्कळ देशातून एकाच वेळी दोन, तीन सुद्धा संपूर्ण वेगळ्या लाटा वेगवेगळ्या वेगात, वेगवेगळ्या ताकदीनिशी आपले अस्तित्व जाणवून देत राहिल्या आहेत.

या पुस्तकात आपण ख्रिस्तपूर्व ८००० वर्ष या काळात पृथ्वीवर सुरू झालेल्या आणि इ. स. १६५०–१७५० पर्यंत अनिर्बंध अधिसत्ता गाजविणाऱ्या पहिल्या लाटेच्या युगाचाही जाता जाता विचार करणार आहोत. या वेळेनंतर पहिल्या लाटेची चलती कमी झाली; आणि दुसऱ्या लाटेचे अपत्य असणाऱ्या औद्योगिक संस्कृतीने पृथ्वीवर ताबा मिळविण्याच्या दृष्टीने गती घेतली; लवकरच तिने कळसही गाठला. १९५५ च्या सुमाराला सुरू झालेल्या दशकाने ऐतिहासिक महत्त्वाचा ठरणारा परिवर्तन क्षण आलेला पाहिला. या वेळी अमेरिकन संयुक्त संस्थानात पांढरपेशे व नोकरदार यांना प्रथमच श्रमिकांनी मागे टाकलेले आढळले. याच दशकात फार मोठ्या प्रमाणात गणकयंत्रे, व्यापारी जेट प्रवास, कुटुंब नियोजनाच्या गोळ्या आणि अशाच अनेक प्रभावशाली गोष्टी वापरात आल्या. आणि याच दशकात तिसऱ्या लाटेने आपली ताकद एकवटायला सुरूवात केली. त्यानंतर थोडे मागे पुढे असे करत ती इंग्लंड, फ्रान्स, स्वीडन, जर्मनी, रशिया, जपान, यासह इतरही उद्योगप्रधान देशांमध्ये येऊन पोचली. आणि सध्या तंत्रा धिष्ठित असे हे सर्व देश तिसऱ्या लाटेच्या आणि दुसऱ्या लाटेच्या कालबाह्य अशा कठीण पण सुस्थित अर्थव्यवस्थेच्या संघर्षांत भरडून निघत आहेत.

आणि आपल्या भोवताली जे राजकीय आणि सामाजिक संघर्ष उठत राहिलेले आपण बघतो आहोत, त्याचे खरे मूळ हेच आहे.

## आगामी लाटा

ज्यावेळी एखादी लाट एखाद्या समाजावर प्रभुत्व गाजवताना आढळते त्यावेळी त्या समाजाच्या भविष्यकालीन घडणीच्या धोरणाचा अंदाज करणे तसे सोपेच असते. लेखक, कलाकार, वृत्तपत्रकार आणि इतरांनाही भविष्यकालीन लाटेचा शोध लागतो. अशाच प्रकारे एकोणीसाव्या शतकातील युरोपीय विचारवंत, उद्योगातील अग्रणी, राजकारणी आणि सर्वसामान्य लोक यांना भविष्यकाळाचे मूलतः अचूक वशा चित्राचे आकलन झाले होते. त्यांना यंत्राधिष्ठित शेतीवर उद्योग निर्विवाद असा विजय मिळवणार असल्याची जाणीव झाली होती. आणि दुसरी लाट भविष्य काळात स्वतःबरोबर आणत असलेले बदलही त्यांना आधीच विलक्षण अचूकतेने उमजले होते. अधिक प्रभावी तंत्रज्ञान. अधिक मोठी शहरे, अधिक गतीची वाहतूक सामुदायिक स्वरूपाचे शिक्षण या व अशाच इतर काही गोष्टींची त्यांना चाहूल लागली होती.

आणि अतिशय स्पष्टपणे झालेल्या भविष्याच्या या दर्शनाचे राजकारणावर प्रत्यक्षच परिणाम झाले. पक्ष आणि राजकीय चळवळी आगामी घटनांची व्यवस्थित चाहूल घेतच आपले कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करू लागले. औद्योगिक क्रांतीच्या अगोदरच्या शेतीप्रधान, संस्कृतीच्या हितसंबंधींनी सर्वदूर जाळे पसरणाऱ्या 'उद्योगा' विरुद्ध, मोठ्या, उद्योगाविरूद्ध, 'संघटनांच्या दादा' विरूद्ध आणि, 'पापी शहराविरूद्ध पिछाडीकडून' हल्ला होईल अशी व्यवस्था केली. उदयोन्मुख उद्योगप्रधान समाजाच्या मुख्य कळांवर ताबा ठेवण्यासाठी मजूर व व्यवस्थापन झटत राहिले. जातीय किंवा वशीय अल्पसंख्यांक औद्योगिक जगाच्या संदर्भात बदललेल्या भूमिकेनुसार आपल्या हक्कांच्या व्याख्या करीत नोकरीतील सवलती, सामुदायिक दर्जा, शहरी निवास, सुधारित वेतन, सामुदायिक लोकशिक्षण इत्यादींबाबत अधिक संधी मागू लागले.

अनुक्रमणिका

या भविष्यकालीन औद्योगिक चित्राचे महत्त्वाचे मानसिक परिणामही आहेतच लोकांचे मतभेद होऊन त्यातून तीव्र आणि काही वेळा तर रक्तपाती संघर्ष देखील निर्माण होत राहिले. तेजी, मंदीमुळे लोकांची जीवने उध्वस्त होणेही अशक्य नव्हते. या औद्योगिक भविष्याच्या चित्रामुळे विरोधांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. प्रत्येक व्यक्तीला आपण स्वतः कोण आहो, कसे आहो आणि पुढे आपले काय होण्याची शक्यता आहे याची देखील समज त्या चित्राने दिली. त्यामुळे समाजात प्रचंड बदल घडत असतानाच व्यक्तीला काही प्रमाणात स्थैर्य आणि अस्मिता मिळत गेली.

उलट, ज्या वेळी एखादा समाज दोन किंवा अधिक अशा बदलाच्या भल्या मोठ्या लाटांच्या तडाख्यात सापडतो, आणि त्यातली कोणतीही एक त्यावेळी खास प्रभुत्वही मिळवू शकत नसते, अशा वेळी भविष्याचे चित्र भंग पावते. घडत रहाणारे बदल आणि भडकत रहाणारे संघर्ष यांचे अर्थ लावणेही अतिशय कठीण होत रहाते. ज्यावेळी दोन लाटांची टक्कर होते, तेव्हा सागरात वादळ उठते. प्रवाहांचे संघर्ष होतात, छोटे मोठे भोवरे निर्माण होऊन खळबळ माजते आणि खोलवर असलेल्या खऱ्या ऐतिहासिक महत्त्वाच्या लाटा त्यामुळे लपूनच रहातात.

इतर देशांप्रमाणेच अमेरिकेतही दुसऱ्या आणि तिसऱ्या लोटेची घडणारी टक्कर सामाजिक तणाव, भयानक संघर्ष आणि नवीन काही विचित्रच अशा राजकीय प्रणाली निर्माण करते की ती वर्ग, वंश, लिंग किंवा पक्ष यामुळे निर्मांण होणारे भेद मानीत नाही; नाहीसेच करते. ही टक्कर नेहमीच्या राजकीय शब्दसमूहात गोंधळ माजवते आणि प्रागतिक व प्रतिगामी, शत्रू व मित्र यांच्यातला भेद जाणणे अशक्य करून टाकते. सर्व जुने मतभेद, विसंगत्या आणि युत्या भंग करून टाकते; संघटना आणि नोकर यांच्यात काही मतभेद असले तरी परिस्थितीशी झुंज देण्यासाठी ते एकी करतात. कृष्णवर्णीय आणि ज्यू एकदा आपल्याला मिळणाऱ्या अन्याय्य वागणुकीविरुद्ध झगडण्यासाठी एकत्र आले आणि नंतर परस्पर विरोधीही झाले.

अनेक देशांमध्ये सर्वसाधारणपणे उत्पन्नाच्या फेरवाटणीसारख्या पुरोगामी धोरणांना पाठिंबा असे. परंतु ते आता अनेकदा स्त्रियांचे हक्क, कुटुंबविषयक नियम; देशाच्या बाहेरून येणाऱ्या स्थलांतरितांबाबतचे नियम, आयातीवरील कर, प्रादेशिकता इत्यादी बाबींचा प्रतिगामी दृष्टिकोणातून विचार करतात.

परंपरागत 'डावे' सहसा कडवे देशभक्त व केंद्रसत्तावादी असतात. आपल्या भोवतीच्या सद्यःपरिस्थितीशी त्यांना कर्तव्य असे नसते.

त्याच वेळी आपणास जिमी कार्टर किंवा जेरी ब्राऊन, व्हॅलेरी जी. ड्इस्टींग यांच्या सारखे राजकारणी लोक आढळतात. त्यांच्या आर्थिक प्रश्नाबाबतचा दृष्टिकोण अगदी 'सनातन' असतो. हेच लोक कला, लैंगिक नीतिमत्ता, स्त्रियांचे हक्क, निराळ्या समाजगटांचे ऐहिक किंवा सामाजिक, सांस्कृतिक रचनांच्या संदर्भातीले एकमेकांशी असणारे संबंध, अशा गोष्टींबाबत उदार दृष्टिकोण धारण करतात. त्यामुळेच गोंधळून जाऊन 'आपल्या' जगांचा अर्थ लावू शकत नाहीत.

अशातच निरनिराळी वृत्तमाध्यमे निरनिराळे शोध, वेगळ्या बाबतीतले विरोध, विचित्र घटना, खून, जबरदस्तीने किंवा फसवून कोणाला पळवूनच नेणे, अंतराळातील विक्रम, राजकीय उलथापालथी, गटांनी केलेले हल्ले, अफवा, अशा कित्येक असंबद्ध घटनांबद्दल आपल्याला सांगत असतात.

अनुक्रमणिका

राजकीय जीवनात स्पष्टपणे दिसून येणाऱ्या विसंगतीचे प्रतिबिंब विस्कळित किंवा खंडित व्यक्तिमत्वातून आपल्याला आढळते. मनोवैज्ञानिक आणि निरनिराळे 'गुरू' या गोष्टीचा चांगलाच फायदा उठवतात. लोक सर्व प्रकारच्या उपचार–पद्धतींकडे धाव घेत, इकडून तिकडे जात रहातात. निरनिराळे पंथ धुंडाळत रहातात किंवा गुप्तपणे निरनिराळ्या तपासण्या करून घेत रहातात. त्यांना सत्य हे हास्यास्पद, विवेकशून्य आणि निरर्थक असल्याचे कळून चुकलेले असते. परंतु यामुळे असे म्हणता येणार नाही, की सध्या घडणाऱ्या घटनांना काही पद्धत किंवा रीतच नाही. खरे पहाता, आपल्याला जर विरत चालल्या दुसऱ्या लाटेशी संबंधित असणाऱ्या बदलांहून वेगळे असे तिसऱ्या लाटेशी संबंधित असलेले बदल ओळखता येऊ लागले तर ह्या सर्व घटनांमागे लपून असलेले परंतु स्पष्टपणे अस्तित्वात असलेले सूत्र असल्याचे आपल्या ध्यानात येईल.

या दोन लाटांच्या टकरीतून निर्माण झालेल्या संघर्षाचे आकलन आपल्याला या बदलत्या स्वरूपाचे अधिक स्पष्टचित्र तर दाखवतेच, शिवाय राजकीय आणि सामाजिक शक्ती आपल्यावर करीत असलेल्या 'कार्यां'च्या देखील क्षकिरण सदृश सखोल व स्वच्छ प्रतिमा आपल्यापुढे सादर करते. शिवाय ते इतिहासात असणाऱ्या आपल्या स्वतःच्या वैयक्तिक भूमिकेबाबतच्या अंतरंगाचे यथार्थ ज्ञानही देते. कारण आपण प्रत्येक जण वरवर जरी कमी महत्त्वाचे भासलो, तरी प्रत्यक्षात इतिहासाचे जिते जागते अंश, घटक आहोत!

लाटांच्या बदलातून निर्माण झालेले अंतःप्रवाह आपल्याला आपल्या कामांमधून आपल्या, कौटुंबिक जीवनातून, आपल्या लैंगिक बाबींबद्दलच्या दृष्टिकोणांतून, आपल्या स्वतःच्या नीतिमत्तेतून प्रतिबिंबित होत असतात. आपल्या जीवन पध्दतीतून आणि राजकीय कृतींमध्ये श्रीमंत राष्ट्रातील आपल्यापैकी बहुतेकजण मरू घातलेल्या दुसऱ्या लाटेचे पाईक तरी असतात; आमूलाग्र भिन्न असणाऱ्या 'उद्याच्या' तिसऱ्या लाटेला वाहून घेणारे तरी असतात, किंवा स्वत्व नाहीसे करुन टाकणाऱ्या, या दोन्हींच्या मिश्रणाची निर्मिती तरी असतात!

## सोनेरी किडे आणि छुपे मारेकरी

दुसऱ्या आणि तिसऱ्या लाटेच्या गटांमधील संघर्ष, खरे पहाता मध्यवर्ती राजकीय तणाव आपल्या समाजाचे तुकडे करत आहेत. आजचे राजकीय पक्ष किंवा त्यांचे उमेदवार आपल्याला काहीही पढवत असले, तरी आपल्या कोसळत्या औद्योगिक प्रणालीतील जे काही शिल्लक आहे, त्याचे जास्तीत जास्त फायदे उठविण्याच्या वादाहूनही थोड्या अधिकच, त्यांच्यातील अंतर्गत झुंजी चिंतनीय आहेत. हेच दुसऱ्या तऱ्हेने म्हणावयाचे झाले तर असे म्हणता येईल, की बुडत्या टिटॅनिकच्या प्रसिध्द डेक खुर्च्या पटकावण्यासाठी ते हमरीतुमरीवर आलेले आहेत.

आपल्याला असे आढळून येईल, की औद्योगिक समाजाचे अखेरचे दिवस कोणाच्या सत्तेखाली जाणार आहेत या गोष्टीपेक्षा, रिकामी होणारी जागा घेऊ पहाणाऱ्या झपाट्याने उभरणाऱ्या नव्या संस्कृतीला कोण आकार देणार हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. आपली सारी शक्ती आणि लक्ष अल्पकालीन राजकीय चकमकींवरच खर्चून जात असतानाच, एक फार गंभीर स्वरुपाची लढाई या सर्व पृष्ठभागाखाली चालू आहे. तीत एका बाजूला औद्योगिक गतकालाचे पाठीराखे असून, दुसऱ्या बाजूला ज्यांना जगाचे तातडीने सोडवण्याजोगे प्रश्न–अन्न, ऊर्जा, शस्त्रांचे नियंत्रण, लोकसंख्या, गरीबी, भौगोलिक नैसर्गिक संपत्ती,

वर्गभेद, हवामान, वृध्दांचे प्रश्न, नागरी समाजाचे विदारण, उत्पादक व फलदायी कार्याची गरज— औद्योगिक रचनेच्या चौकटीत सोडवता येणे आता शक्य नाही हे समजते, असे लोक आहेत.

हा संघर्ष उद्याचा महान संघर्ष असणार आहे.

प्रत्येक देशाच्या राजकीय जीवनातून दुसऱ्या लाटेच्या फुसक्या हितसंबंधीयात आणि तिसऱ्या लाटेच्या अनुयायात घडणाऱ्या या टक्करीच्या लहरी एखाद्या विद्युत् प्रवाहाप्रमाणे संचारत आहेत. जगात जे देश औद्योगिक म्हणून गणले जात नाहीत त्या देशांतून या तिसऱ्या लाटेच्या आगमनानिशी पूर्वीच्या जुन्या झगड्यांचा बळेबळेच पुनर्जन्म घडलेला आहे. सहसा सरंजामशाहीशी संबंधित असलेला शेतीविषयक पुरातन लढा, 'उद्योगा'च्या बळावर श्रेष्ठ ठरलेल्या 'उच्च' लोकांविरुध्द असणारे विचारप्रवाह व ते धारण करणारे लोक—भांडवलदार किंवा समाजवादी, औद्योगिकीकरणाच्या आगामी विलयाच्या संदर्भात एक वेगळाच आकार धारण करत आहे. आता तिसऱ्या लाटेची संस्कृती अस्तित्वात येते आहे अशा वेळी झपाट्याचे औद्योगिकीकरण नववसाहतवादापासून किंवा गरीबीपासून सुटका करु शकणार आहे का? किंवा त्याच्यावर कायम अवलंबून रहाता यावे अशी हमी देऊ शकणार आहे का?

केवळ याच विस्तृत पार्श्वभूमीवर आपणास मथळ्यांचा अर्थ लागू शकणार आहे. आपल्या जीवनात घडून येणाऱ्या बदलाच्या संयोजनाबाबतची उचित धोरणे आखणे आता शक्य होणार आहे.

हे मी लिहीत आहे अशावेळी वृत्तपत्रांच्या पहिल्या पानांवर इराणमधील उद्रेक व ओलीस प्रकरण, दक्षिण कोरियातील कत्तली, सोन्याचे वेगवान सट्टे, काळे लोक व ज्यू यांच्यात अमेरिकेत उडत असलेल्या चकमकी, पश्चिम जर्मनीने संरक्षण खर्चात केलेली मोठी वाढ, लॉंग आयलंडमधील जळिते, मेक्सिकोच्या आखातातील तेलाचा प्रचंड भडका, इतिहासात सर्वात मोठा ठरणारा अण्वस्त्रविरोधी मेळावा, रेडिओलहरींच्या ताब्याविषयी श्रीमंत व गरीब राष्ट्रात चालू असलेला लढा, अशा गोष्टींचे वृत्तांत आलेले आहेत. लिबिया, सीरिया आणि अमेरिका या देशांमध्ये धार्मिक पुनरुज्जीवनाच्या लाटा धडाक्याने उठत आहेत. नवफॅसिस्ट कल्पना पॅरिसच्या राजकीय 'कत्तली' चे 'श्रेय' स्वतःकडे घेत आहेत. आणि विजेवर चालणाऱ्या स्वयंप्रेरिकांना आवश्यक असणाऱ्या तंत्रात मारलेल्या मुसंडीचा अहवाल 'जनरल मोटर्स' ने दिलेला आहेच. अशा तऱ्हेच्या तऱ्हेतऱ्हेने विसंगत असणाऱ्या बातम्यांचे तुकडे एकात्मतेसाठी आणि संयोगासाठी टाहो फोडत आहेत.

औद्योगिकीकरणाच्या रक्षणास सिध्द असलेले आणि त्याच्या जागी दुसऱ्या कशाची तरी स्थापना करण्यास उत्सुक असलेले यांच्यामध्ये भडकलेल्या तीव्र लढ्याची आपल्याला कल्पना आली म्हणजे जग जाणण्याची नवी गुरुकिल्लीच आपल्याला प्राप्त झाली, असे म्हणावे लागेल. याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण एखाद्या राष्ट्राची धोरणे आखत असू, किंवा मोठ्या संस्थांची धोरणे ठरवत असू, किंवा आपल्या स्वतःच्या जीवनाची ध्येये पक्की करत असू; आपल्याला जुने जग बदलून टाकणारे नवे साधन मिळाले आहे.

या हत्याराचा वापर करण्यासाठी, आपल्याला जुन्या औद्योगिक संस्कृतीकडे झुकणारे बदल, आणि नव्या संस्कृतीच्या आगमनाचा गौरव ठरणारे बदल यांच्यात असणारा फरक ओळखता यायला हवा. थोडक्यात, आपल्याला दोन्ही—जुनी व नवी—जिच्यात आपण जन्म घेतला ती औद्योगिक रचना असणारी दुसरी व आपण व आपली मुले जिच्यात वास करणार आहोत ती तिसरी संस्कृतीही समजायला हवी.

अनुक्रमणिका

या पुढील प्रकरणात तिसरीच्या उद्‌भवाची पूर्वतयारी म्हणून आपण बदलाच्या पहिल्या दोन लाटांचे सूक्ष्म अवलोकन करणार आहोत. आपल्याला असे आढळून येईल की, दुसरी लाट—संस्कृती ही अनेक घटकांची आपाततः घडून आलेली मिसळ नसून एकमेकांवर, एका अर्थी सूचक, परिणाम करणाऱ्या विभागांची ती एक निश्चित प्रणाली होती आणि औद्योगिक जीवनाचे मूलभूत नमुने देशादेशांतून तेच एकसारखेच होते; मग या देशांचे सांस्कृतिक वारसे कोणते का असेनात, आणि त्यातील राजकीय मतभेद कसे का असेनात. आणि आजचे 'डावे' व 'उजवे' दोन्ही प्रकारचे 'प्रतिगामी' ह्याच संस्कृतीच्या रक्षणासाठी झगडून राहिले आहेत. आणि याच वेळी सांस्कृतिक बदलाच्या इतिहासातील तिसऱ्या लाटेने हेच जग बदलून टाकण्याचा इशारा दिलेला आहे!

अनुक्रमणिका

# दुसरी लाट

अनुक्रमणिका

# दोन । संस्कृतीची बांधणी

तीनशे वर्षापूर्वी—पन्नास वर्षे आगे मागे म्हणा हवे तर—एक स्फोट झाला आणि त्याने साऱ्या भूतलावर आघात करणाऱ्या जबरदस्त धक्कादायक लाटा इतस्ततः झुगारल्या, आणि जुन्या समाजसंस्था मोडूनतोडून एक पूर्णतः नवीन संस्कृती घडवली. अर्थात हा स्फोट म्हणजे औद्योगिक क्रांती. त्याने साऱ्या जगात उठविलेल्या लाटा राक्षसी ताकदीच्या असून त्यांनी पूर्वीच्या प्रचलित असलेल्या सर्व संस्थांवर धडक मारली. ह्या 'दुसऱ्या लाटेने' लाखो लोकांचा जीवनक्रमच बदलून टाकला.

पहिल्या लाटेची संस्कृती जेव्हा अधिकारारूढ होती, त्या हजारो वर्षे व्यापणाऱ्या प्रदीर्घ कालखंडात पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या लोकांचे दोन प्रकारात विभाजन करता येत होते : अतिशय प्राचीन काळच्या मानवाच्या धाटणीतच राहिलेला मागास, आदिमानव, आदिवासी हा एक प्रकार, आणि दुसरा प्रकार म्हणजे 'सुसंस्कृत' 'नागर' मानव. तथाकथित आदिवासी छोटे गट बनवून किंवा टोळ्या तयार करून एकत्र येणे, शिकार करणे, मासेमारी करणे यातच गुंतून राहिले आणि म्हणून शेतीने केलेल्या क्रांतीने त्याला मागे टाकले.

या उलट 'सुसंस्कृत' जग म्हणजे मुख्यतः, पृथ्वीच्या ज्या भागावर लोकांनी जमिनीवर मशागत करणे स्वीकारले, तो भाग होय. कारणे जेथे शेती अस्तित्वात येऊन तिचा विकास झाला, त्या ठिकाणी संस्कृतीने मूळ धरले. चीन व भारत यांपासून बेनिन व मेक्सिको, ग्रीस व रोममध्ये संस्कृती उदयाला आल्या, आणि कोसळल्या. झगडे होत राहिले, वितळून जाऊन सांधे जुळलेही आणि असे घडत घडत वेगळेच आकर्षक मिश्रण निर्माण होत राहिले.

तथापि, त्यांच्या वैविध्यामागे, विरोधामागे मूलभूत साम्येच अस्तित्वात होती. त्या सर्वांमध्ये, अर्थव्यवस्थेचा पाया 'जमिनीवर' आधारलेला होता आणि जीवन खेड्यांभोवतीच गुंफले गेलेले होते. त्या सर्वांमध्ये कामाची, श्रमाची साधी सरळ विभागणी अस्तित्वात होती आणि काही स्पष्ट स्वरुपाच्या जाति आणि वर्ग यांचा उदय झाला. खानदान, पौरांहित्य, योध्दे, दलित, गुलाम किंवा वेठबिगार. त्या सर्वांमध्ये फक्त सामर्थ्यवानच श्रेष्ठ ठरत होता, 'अधिकारी' होत होता. त्या सर्वांमध्ये मनुष्याच्या जन्मानुसारच त्याचे समाजातील स्थान ठरत होते. त्या सर्वांमध्ये अर्थव्यवस्था विकेंद्रित होती, त्यामुळे प्रत्येक जमात आपणास आवश्यक असणाऱ्या वस्तू निर्माण करत होती.

याला काही अपवाद होतेच— इतिहासात काहीच कधी साधे, सरळ, ठोकळेबाज असू शकत नाही! काही व्यापारी संस्कृतीही अस्तित्वात होत्या. नाविक लोक व्यापारासाठी समुद्र पार करुन जात होते. काही अतिशय केंद्रीभूत अशी राज्ये होती. तेथील राज्यसत्ता प्रचंड पाणीपुरवठा योजना तयार करीत असत. परंतु असे काही फरक असूनही, या विशिष्ट वाटणाऱ्या संस्कृतीचे खास असे मूल्यमापन करुनही आपण असे म्हणू शकतो की पहिल्या लाटेने जी संस्कृती सर्वभर पसरवली ती शेती—संस्कृतीच होय

ह्या संस्कृतीचा प्रभाव असताना कधीकधी भावी घटनांच्या सूचनाही मिळत होत्या! जुन्या ग्रीस व रोममध्ये अपरिणत अवस्थेतील, मोठ्या प्रमाणात उत्पादन करणारे, काही कारखाने निर्माण झाले होते. इ. स. पूर्व ४०० या काळात एका ग्रीक बेटात तेल (जमिनीतील) उपसून काढले जात होते. ब्रह्मदेशातही इ. स. १०० या काळात हे शक्य झाले होते. बाबिलोनिया आणि इजिप्त या देशात मोठ्या प्रमाणात नोकरशाह्या

अनुक्रमणिका

फोफावल्या होत्या. आशिया आणि दक्षिण अमेरिकेत मोठी केंद्रे ठरतील अशा अनेक शहरांची निर्मितीही झाली होती. तेथे पैसे आणि चलनी स्वरुपातील विनिमयही होत होता. कॅथेपासून कॅलाइसपर्यंत व्यापाराच्या मार्गांची जाळी वाळवंटे समुद्र आणि पर्वतराजी यांतून पसरलेली होती. शिवाय बाल्यावस्थेतील नगरपालिका आणि प्राथमिक अवस्थेतील राष्ट्रेही अस्तित्वात होती. प्राचीन अलेक्झांड्रियामध्ये खरोखरच आश्चर्यकारक ठरेल अशी एक गोष्ट अस्तित्वात होती, ती म्हणजे वाफेच्या इंजिनाचे आदिस्वरुप!

तरी देखील ज्याला दूरान्वयानेही औद्योगिक संस्कृती म्हणता येईल असे काहीही तेव्हा अस्तित्वात नव्हते. ज्यांना भविष्यकाळातील चुणुका म्हणता येतील अशा वरील काही गोष्टी म्हणजे इतिहास काळातील विक्षिप्त घटनाच म्हणावयास हव्यात. त्या देखील वेगळाल्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या काळात अशा तुटकपणे विखुरल्या गेल्या असल्याचे ध्यानात येईल. त्या कधीही सुसूत्र पध्दतीत एकत्र आणल्या गेल्या नव्हत्या; त्या तशा आणता आल्याही नसत्या. म्हणून आपण इ. स. १६५०–१७५० पर्यंतच्या जगाला पहिल्या लाटेचे जग म्हणू शकतो. प्राचीनपणाच्या काही अपवादांच्या आणि औद्योगिक भविष्याच्या सूचना देणाऱ्या काही घटनांचा विचार करुनही आपण असे म्हणू शकतो, की शेती संस्कृतीनेच या काळात पृथ्वीवर प्रभुत्व होते, आणि जणू काही ते तसेच कायम रहाणार आहे असा भास तरी होत होता;

आणि अशा या जगात औद्योगिक क्रांतीचा उद्रेक झाला. आणि एक मोठी प्रचंड सांस्कृतिक लाट उसळली. आणि तिने एक विचित्र, समर्थ आणि वेड्या ताकदीची अशी प्रतिसंस्कृती निर्माण केली. हा औद्योगिकपणा म्हणजे धुराडी आणि यत्रांची जुळणी यांच्याहून खूप काही अधिक असा होता. मानवी जीवनाच्या प्रत्येक भागाला स्पर्श करुन जाणारी अशी ती एक विविधांगी समाजपध्दती होती, आणि तिने पहिल्या लाटेच्या प्रत्येक वैशिष्ट्यावर हल्लाही चढविलेला होता. तिने डेट्रॉइटच्या बाहेर प्रसिध्द विलो रन ही मोठी फॅक्टरी काढला. परंतु तिने शेतावर ट्रॅक्टरची योजनाही केली, ऑफिसमध्ये टाइपरायटर आणि स्वयंपाक घरात रेफ्रिजरेटर बसविला. तिने दैनिक वृत्तपत्रे निर्माण केली. सिनेमाला जन्म दिला, जमिनी खालून जाणाऱ्या गाड्या व डी सी–३ प्रकारची विमाने दिली, त्रिमिति दिली, बारासुरी संगीत दिले, बॉहौस इमारती दिल्या. बार्सेलोना खुर्च्या दिल्या, बैठे संप दिले, जीवनसत्वांच्या गोळ्या दिल्या, जीवनमर्यादा वाढवून दिली. मनगटी घड्याळे आणि मतपेट्यांना जागतिक पातळीवरील अस्तित्व दिले. आणि अधिक महत्त्वाची गोष्ट ही की या सर्व गोष्टींना एकमेकींशी जोडून दिले. एखाद्या यंत्राप्रमाणे त्यांचा संयोग केला. आणि त्यायोगे आजवरच्या जगातील सर्वात सामर्थ्यशाली सुसंघटित व्यापक समाजपद्धतीची रचना केली. दुसरी लाट–संस्कृतीची.

## ‘हिंसामय’ उत्तर

ही दुसरी लाट पसरत पसरत वेगवेगळ्या समाजांना जाऊन भिडत असताना जुन्या लुप्तमान शेती संस्कृतीचे रक्षणकर्ते आणि औद्योगिक भविष्याचे कैवारी यांच्यात दीर्घकाळपर्यंत रक्तरंजित लढा होत गेला. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेचे पाईक एकमेकांवर तुटून पडत.’ टकरा घेत असताना मधेच येणारे आदि संस्कृतीचे आदिवासी बाजूला सारले गेले; त्यांचा मोठ्या प्रमाणात नाश झाला.

अमेरिकेत, शेती संस्कृती स्थापून तिचा विस्तार करण्याचे धोरण ठरवून युरोपियनांनी आगमन केले. तेव्हा हे विरोध, ह्या टकरी सुरु झाल्या. एक गोरी निष्ठुर शेतीप्रधान लाट, इंडियन लोकांना नागवत,

त्यांच्याकडून ताबा मिळवत शेतांची स्थापना करत, शेतीप्रधान गावे बसवत पुढे पुढे सरकत धडाक्याने पॅसिफिककडे चालली आणि त्याला जाऊन भिडलीही!

परंतु दुसऱ्या लाटेच्या दूतांनी या सुस्थित शेतकऱ्यांची अशीच दशा उडवून दिली. न्यू इंग्लंड आणि मध्य अटलांटिक राज्यात कारखाने आणि शहरे वेगाने आपला पसारा मांडू लागली. एकोणीसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमाराला ईशान्य भागात मोठ्या वेगात औद्योगिक विभागाची वाढ होत गेली. पिस्तुले, घड्याळे, शेती औजारे कापडनिर्मिती, शिवण यंत्रे आणि इतर वस्तू निर्माण करणारे कारखाने उभे राहिले. देशाचा इतर भाग मात्र अजूनही शेतीच्या आधिपत्याखाली होता. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेच्या ताकदीमध्ये आर्थिक आणि सामाजिक तणाव तीव्रतेने वाढत गेले. इतके, की इ. स. १८६१ मध्ये दोघांत सशस्त्र भडके उडाले.

अनेकांना वाटले त्याप्रमाणे यादवी युद्ध गुलामीसारख्या नैतिक विषयावरुन किंवा जकातीसारख्या लहान आर्थिक विषयावरून लढले गेले नव्हते. ते एका फार मोठ्या प्रश्नावरुन लढले गेले होते. तो प्रश्न असा होता, की हा नवा श्रीमंत खंड कोणाच्या सत्तेखाली असावा? शेतकऱ्यांच्या का उद्योजकांच्या? पहिल्या लाटेच्या? की दुसऱ्या? त्याच प्रमाणे प्रश्नाचे स्वरुप असेही होते, की भावी अमेरिकन समाज मूलतः शेतीप्रधान असावा की उद्योगप्रधान? उत्तरेकडील सैन्याच्या विजयानंतर मग साचा निश्चित झाला आणि अमेरिकन संयुक्त संस्थानांचे औद्योगिकीकरण निश्चित झाले. मग त्या वेळे नंतर अर्थकारणात, राजकारणात, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात शेतीची पीछेहाट होत गेली आणि उद्योगांची भरभराट होत राहिली. रोरावत येणाऱ्या दुसऱ्या लाटेने पहिलीला ओहोटी दाखवली!

दोन संस्कृतीच्या अशाच चकमकी इतरत्र देखील उठल्या. जपानमध्ये इ. स. १८६८ मध्ये सुरु झालेले मेरजी रेस्टोरेशन म्हणजे जपानी ढंगात लढला गेलेला शेतीमय इतिहास आणि उद्योगमय भविष्य यांच्यातला, तोच झगडा होय. इ. स. १८७६ पर्यंत झालेला सरंजामशाहीचा निःपात, इ. स. १८७७ मध्ये झालेले सात्सुमा वंशाचे बंड, इ. स. १८८९ मध्ये स्वीकारलेली पाश्चिमात्य ढंगाची रचना, या सर्व गोष्टी म्हणजे पहिल्या आणि दुसऱ्या लाटांच्या संघर्षाची परावर्तनेच होत. जपानने प्राप्त केलेल्या औद्योगिक सत्तेतील अग्रस्थानाच्या दृष्टीने पडलेली ही पहिली पावले म्हणावी लागतील.

रशियात देखील पहिल्या आणि दुसऱ्या लाटेतील संघर्ष उद्‌भवले. इ. स. १९१७ मध्ये झालेली रशियातील क्रांती म्हणजे अमेरिकन यादवी युद्धाची पुनरावृत्ती. प्रथम वाटले त्याप्रमाणे सुरुवातीला लढा साम्यवादावरुनच झाला. परंतु नंतर मात्र तो औद्योगिकीकरणावरुनच झाला. ज्यावेळी बोल्शेविकांनी वेठबिगारी आणि सरंजामी साम्राज्याचे उरलेसुरले अवशेष निपटून काढताना शेतीला मागे सारले आणि त्याचवेळी औद्योगिकीकरणाला गती दिली ते दुसऱ्या लाटेच्या पक्षाचे झाले.

एकामागून एका देशात हाच पहिल्या आणि दुसऱ्या लाटेच्या पक्षपात्यांमधला झगडा फुटत राहिला आणि त्यामुळेच राजकीय पेच व उलथापालथी, संप, उठाव, लष्करी क्रांत्या आणि लढाया निर्माण होत राहिल्या

आज उत्तर गोलार्धात पंचविसाव्या आणि पासष्टाव्या अक्षांशांच्या दरम्यान औद्योगिक पट्ट्याने पृथ्वी वेढली आहे उत्तर अमेरिकेत सुमारे २५० दशलक्ष लोक उद्योग प्रधान जीवनपद्धती अवलंबीत आहेत.

अनुक्रमणिका

पश्चिम युरोपात, स्कँडिनेव्हिया ते दक्षिणेकडील इटलीपर्यंत, आणखी अब्जावधी लोकांनी हीच जीवनपद्धती अंगिकारली आहे. याच्या पूर्वेला युरेशियन प्रदेश म्हणजे युरोपाचा पूर्व भाग आणि रशियाचा पश्चिम भाग आहे. आणि या प्रदेशातही तेवढेच लोक उद्योगप्रधान समाजाचा भाग बनून जगत आहेत, असे आपल्याला आढळून येईल. आणि शेवटी आपण आशियाच्या औद्योगिक भागात येऊन ठेपतो. जपान, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड आणि दक्षिण कोरियाचे तसेच चीनचे काही भाग याच्या आवाक्यात येतात. येथेही अब्जावधी लोकांनी 'उद्योगा'चा आसरा घेतलेला आपल्याला आढळून येईल. एकूण, जगातील सुमारे एक चतुर्थांश लोकांना औद्योगिक संस्कृतीने अंकित केलेले आहे. (या विभागात सर्वसाधारणपणे मेक्सिकोमधील मेक्सिको सिटी भारतातील मुंबई अशा आणखीही बऱ्याच ठिकाणांचा अंतर्भाव करता येईल)

भाषा, संस्कृति, इतिहास, राजकारण यांचे तीव्र भेद असूनही—हे भेद इतके तीव्र आहेत, की त्या बाबींवरुनच युद्धे खेळली गेली आहेत. ह्या सर्व, दुसऱ्या लाटेने प्रभावित केलेल्या समाजाची काही समान अंगेही आहेत. खरेच, या सर्व प्रख्यात भेदांच्या मागे गुप्तरुपाने साम्याचे तळ ठाण मांडून आहेत.

आणि आजच्या टक्कर घेणाऱ्या बदलाच्या लाटा समजण्यासाठी आपल्याला सर्व उद्योगप्रधान देशातील समाजरचनांची ओळख पटणे आवश्यक आहे. कारण दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीचा हाच अव्यक्त सांगाडा आहे. कारण खुद्द हीच औद्योगिक चौकट आता हादरत आहे!

## सजीव विजेऱ्या

कोणत्याही संस्कृतीची पूर्वपीठिका म्हणजे उत्साह, शक्ती ही असते. मग ती संस्कृती जुनी असो, की नवी. पहिली लाट—समाज आपली शक्ती सजीव विजेऱ्यांकडून मिळवीत असत— मानवी किंवा प्राण्यांच्या स्नायु बळांपासून, किंवा सूर्य, वारा आणि पाणी यांच्या पासूनही मिळवत असत. अन्न शिजवण्यासाठी आणि उष्णता निर्माण करण्यासाठी जंगले तोडली जात, पाणचक्यांनी (यातील काही भरतीच्या लाटांमुळे चाललेल्या) गिरण्यांच्या तळ्या चालवल्या, तसेच शेतांमध्ये पवनचक्या करकरू लागल्या. प्राण्यांनी नांगर ओढले. फ्रेंच राज्यक्रांतीपर्यंतच्या काळात, युरोप आपणाला हवी असलेली शक्ती सुमारे १४ दशलक्ष घोडे व सुमारे २४ दशलक्ष बैल यांच्यापासून मिळवत होता; असे अनुमान आहे. याप्रमाणे सर्व पहिली लाट संस्कृतीच्या समाजांनी नूतनीकरण करता येण्याजोग्या शक्ति उगमांचा पुरेपूर वापर करुन घेतला. या लोकांनी तोडलेली जंगले निसर्ग पुनः उगवू शकत होता. शिडे भरणारे वारे भरून निघत होते. चाके फिरवणारे पाणी नद्यांमध्ये पुनः येत होते. फार कशाला, शक्ती पुरवणारे गुलाम—मानव आणि प्राणी या दोन्ही प्रकारचे—देखील जागा मोकळी राहू देत नव्हते!

या उलट दुसऱ्या लाटेचा अंगिकार करणाऱ्या सर्व समाजांनी आपणाला हवी असणारी ऊर्जा, कोळसा, वायु, तेल या पुनः भरून काढता न येणाऱ्या खडकजन्य इंधनाचा वापर करून मिळवायला सुरुवात केली. हा क्रांतिकारक बदल इ. स. १७१२ मध्ये न्यू कोमेन याने अति उपयुक्त वाफेच्या इंजिनाचा शोध लावल्यानंतर घडला. आणि याचा अर्थ असा झाला, की निसर्गसंपत्तीने पुरविलेल्या भांडवलावरील व्याज वापरण्याचे सोडून या संस्कृतीने खुद्द भांडवलाचाच घास घ्यायला सुरुवात केली.

अनुक्रमणिका

पण अशा तऱ्हेने पृथ्वीच्या पोटात दडलेले ऊर्जासाठे खणणे ही गोष्ट औद्योगिक संस्कृतीला मिळालेले मोठेच सहाय्य ठरले आणि त्यामुळे तिच्या आर्थिक भरभराटीचा वेग वाढला. आणि मग त्या क्षणानंतर आतापर्यंत जिथे जिथे म्हणून दुसरी लाट जाऊन पोचली तेथील देशांनी उत्तुंग तांत्रिक आणि आर्थिक इमले अशा समजुतीवर उभारले, की ही भूगर्भीय संपत्ती आपल्याला अखंड मिळतच रहाणार आहे. पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील समाजवादी, त्याचप्रमाणे भांडवलशाही समाजांकडून हेच धोरण अवलंबिले गेले— विखुरलेली किंवा केंद्रीभूत शक्ती, संपून जाणारी आणि पुनः भरुन येऊ शकणारी शक्ती, अनेक निरनिराळ्या ठिकाणांतून मिळणारी शक्ती मिळवत रहाणे, वापरत रहाणे. भूगर्भीय ऊर्जा हा दुसऱ्या लाटेच्या अंमलाखालील सर्व समाजांचा जणू पायाच ठरून गेला.

## तंत्रज्ञानाचे उदर

नव्या ऊर्जापद्धतीकडे घेतलेल्या ह्या उडीच्या जोडीनेच तंत्रज्ञानाच्या दिशेने होणारी प्रगतीही फार मोठ्या वेगात व प्रमाणात होत होती. व्हिट्र व्हिअसने सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी ज्यांना 'आवश्यक शोध' म्हटले होते, त्यांच्यावर पहिल्या लाटेतील समाजाने भर दिला होता. सुरूवातीच्या काळातील रहाट, तरफ, द्राक्षे गाळण्याची यंत्रे, बेचक्या, कप्प्या, याऱ्या, ह्या गोष्टी केवळ मानवाच्या आणि प्राण्यांच्या शक्ती अधिक वाढवण्यासाठीच मुख्यतः वापरण्यात येत होत्या.

दुसऱ्या लाटेने तंत्रज्ञान वेगळ्याच अशा नव्या पातळीवर नेऊन ठेवले. तिने विजेवर चालणाऱ्या, हलणाऱ्या, विभागाची, पट्ट्यांची, नळाची, बेअरिंग्जची, नट, बोल्ट यांची फार मोठ्या प्रमाणात वीण केली. ह्या सर्वांनी आपल्या दातेरी चाकांवर फिरत कडकडाट, गडगडाट उठवणे अव्याहत चालू ठेवले. मानवाच्या किंवा प्राण्यांच्या ताकदीला जोड देण्यापेक्षा कितीतरी अधिक कार्य या नव्या यंत्रांनी केले. ह्या औद्योगिक संस्कृतीने ज्ञानेंद्रिये तयार केली. अधिक अचूकपणे ऐकू शकणारी, पाहू शकणारी, स्पर्श करू शकणारी यंत्रे तयार केली. मनुष्यप्राण्यापेक्षा कितीतरी अचूक आणि निःसंदिग्धपणे ज्ञान प्राप्त करण्याची त्यांची कुवत मोठी आहे. ह्या संस्कृतीने तंत्रज्ञानाला एक असे उदर बहाल केले, की ज्याच्यातून नवीन यंत्रांना जन्म देण्याचा क्रम चालूच ठेवणारी अशी यंत्रे तयार झाली. उदा. यंत्रांचे सुटे भाग तयार करणे इत्यादी. यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकमेकांशी संबंधित, एकमेकांवर अवलंबित अशी एक प्रकारची साखळी तयार करणारी यंत्रे एकाच छपराखाली आणून मोठाले कारखाने या संस्कृतीने उभे केले.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीला विशिष्ट मुखवटा देणाऱ्या, तांत्रिक पायावर उभारलेल्या अशा कित्येक कारखान्यांचा उद्‌भव झाला. कोळसा उद्योग, गिरण्या, लोहमार्ग, पोलाद, स्वयंचलित यंत्रे व वाहने यांची निर्मिती, ॲल्युमिनियम, रसायने, उपकरणे यांच्या कारखान्यांची उभारणी, त्याबरोबरच मोठ्या औद्योगिक शहरांचाही जन्म झाला. उदा. गिरण्यांसाठी मँचेस्टर, मोटारीसाठी डेट्रॉइट. अशी शेकडो उदाहरणे आहेत.

आणि या औद्योगिक केंद्रातून एकसारख्या अशा लाखो उत्पादित वस्तूंचा वर्षाव सुरु झाला! उद : शर्ट, बूट, वाहने, घड्याळे, खेळणी, साबण, शांपू, कॅमेरा, मशिन गन्स व चलन यंत्रे (मोटर्स) नव्या इंधन पद्धतीचा आधार मिळालेल्या नव्या तंत्रज्ञानाने अतिशय मोठ्या प्रमाणात होणाऱ्या उत्पादनाचे द्वार खुले केले.

## व्हर्मिल्यन पॅगोडा

अनुक्रमणिका

तथापि ह्या ढीगभर उत्पादनाला जर वितरणपद्धतीत योग्यवेळी केल्या गेलेल्या योग्य त्या बदलाची साथ मिळाली नसती तर व्यर्थ ठरले असते. पहिली लाट–संस्कृती अस्तित्वात असताना वस्तु हस्तकला पद्धतीने गिऱ्हाइकांच्या आश्रयानुसार उत्पादन केली जात असे. वितरणाची पद्धतही त्यानुसारच होती.

आता ही गोष्ट खरी आहे, की पश्चिमेकडे मोठ्या आणि त्या त्या काळी आधुनिक ठरतील अशा व्यापारी संस्था, जुन्या सरंजामी व्यवस्थांमधील फटी रुंदावत, व्यापाऱ्यांनी उभारलेल्या होत्या. या संस्थांनी जगभर नवे व्यापारी मार्ग सुरु केले, जहाजांच्या काफिल्यांची रचना व व्यवस्था केली, व उंटांच्या तांड्यांचीही योजना केली. त्यांनी काचेच्या वस्तु, कागद, रेशीम, चहा, जायफळे, दारु, लोकर, नीळ, जायपत्री अशा वस्तूंचा वापर केला.

तथापि यातील बहुतेक सर्व वस्तू ग्राहकांना छोट्या दुकानातून किंवा खेडोपाडी भटकत जाणाऱ्या फिरस्त्या व्यापाऱ्याच्या पेटाऱ्यातून मिळत असत. दळणवळण अगदीच 'दरिद्री' होते; आणि दळणवळणाचे मार्ग अगदी प्राचीन व रद्दी होते. त्यामुळे वस्तूंच्या व्यपारावर खूपच मर्यादा पडल्या होत्या. हे छोटे दुकानदार आणि फिरते फेरीवाले ग्राहकांना हव्या असलेल्या वस्तूंपैकी फारच थोड्या वस्तु पुरवू शकत होते. आणि पुष्कळ वेळा असे व्हावयाचे की ही किंवा ती वस्तू ग्राहकाला हवी असताना देखील महिनोगणती, वर्षानुवर्षे देखील या विक्रेत्यांनाच उपलब्ध झालेली नसायची!

दुसऱ्या लाटेने या ओझ्याने वाकलेल्या, करकरणाऱ्या वितरणपद्धतीत एका अर्थी आमूलाग्र ठरतील असे बदल, उत्पादनात अधिक प्रसिद्ध सुधारणा होत असताना घडवून आणले. लोहमार्ग, हमरस्ते, कालवे–ज्या त्या पार्श्वभूमीनुसार–तयार करण्यात आले. 'व्यापाराचे प्रासाद' औद्योगिकीकरणासहित अस्तित्वात आले–पहिली डिपार्टमेंटल स्टोअर्स! शेअर दलाल, घाऊक व्यापारी, कमिशन एजंट, उत्पादकांचे प्रतिनिधी यांची अक्षरशः जाळी तयार झाली. इस. स. १८७१ मध्ये जॉर्ज हंटिंग्टन हर्टफोर्ड याचे असले पहिले दुकान न्यूयॉर्कमध्ये उघडले. हे दुकान व्हर्मिलन–लाल भडक रंगात रंगवलेले होते आणि याच्या रोख पैसे देण्याघेण्याचे व्यवहार करणाऱ्या कारकूनाचा–कॅशियरचा पिंजरा एखाद्या चिनी पॅगोडाच्या आकाराचा होता ह्या हर्टफोर्डने, नंतर हेन्री फोर्ड याने आपल्या कारखान्याच्या मालाच्या वितरणासाठी जे करणे शक्य होते ते सर्व केले! त्याने या दुकानाची भरभराट करून त्याला अशा स्थितीत आणले, की ते जगातील पहिले साखळी पद्धतीचे विशाल दुकान ठरले— दि ग्रेट अटलांटिक अँड पॅसिफिक टी कंपनी.

ह्या प्रकारच्या वितरणाने व्यापार देखील इतक्या मोठ्या प्रमाणात चालला आणि वाढला, की तो यंत्रांप्रमाणेच औद्योगिक समाजाचे केंद्र बनला आणि सुपरिचित होऊन राहिला.

ज्याला आपण तंत्रज्ञानाचे क्षेत्र म्हणतो, त्याच्यात संपूर्ण परिवर्तन ह्या बदलांनी घडवुन आणले. समाज मागास आदिवासी असोत की शेतीप्रधान असोत की उद्योगप्रधान असोत, ते ऊर्जा वापरतातच; वस्तूंची निर्मिती करतात आणि त्यांचे वितरणही करतात. सर्व समाजात ऊर्जा संस्था, उत्पादन संस्था आणि वितरण संस्था ह्या खुद्द त्यांच्याहून काही तरी मोठ्या अशा संकल्पनेचे, एकमेकींशी संबंधित असलेले विभाग असतात. ही त्यांच्याहून मोठी असलेली संस्था म्हणजे समाजाच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर विशिष्ट स्वरुप धारण करत रहाणारे तंत्रज्ञान क्षेत्र होय.

अनुक्रमणिका

जसजशी दुसरी लाट जगभर पसरत गेली, तसतसे शेतीविषयक तांत्रिक क्षेत्र बाजूला सरत गेले आणि त्याची जागा औद्योगिक तांत्रिक क्षेत्राने घेतली; पुन्हा भरून न येणाऱ्या प्रकारातील ऊर्जा फार मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाला थेट जोडल्या, आणि त्या जागी, अतिशय प्रगत अशा मोठ्या वितरण व्यवस्थेत वस्तूंचा जणू वर्षाव केला गेला.

## अत्याधुनिक कुटुंब

ह्या, दुसऱ्या लाटेच्या तंत्रविज्ञान क्षेत्राला सामावून घ्यावयाला तितक्या क्रांतिकारक सामाजिक क्षेत्राची आवश्यकता होती; आमूलाग्र नवीन असणाऱ्या समाज संस्थेची आवश्यकता होती.

याबाबत उदाहरण देऊन बोलावयाचे म्हटल्यास, औद्योगिक क्रांतीपूर्वी कुटुंबरचना ठिकठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीची होती. परंतु शेतीने वर्चस्व राखलेले असल्याने, लोकांचा कल मोठ्या थोरल्या, अनेक पिढ्यांना एकत्र सामावून घेणाऱ्या घरात रहाण्याचा होता. या घरात काका असायचे, काक्या असायच्या, सासू सासरे असायचे, आजी आजोबा, चुलत मालत भावंडे असायची. सगळी एका छपराखाली एकवटलेली असायची. आर्थिक उत्पादन करणाऱ्या एखाद्या गटाप्रमाणे सर्वजण एकत्र काम करीत असत— या प्रकारात हिंदुस्थानातील एकत्र कुटुंब, बाल्कन्स मधील 'जाद्रुगा' आणि पश्चिम युरोपातील 'विस्तृत कुटुंब' यांचा समावेश करता येईल. कुटुंब जणू काही जमिनीत पुरल्याप्रमाणे अचल होऊन राही.

ज्यावेळी पहिल्या लाटेला ओलांडत दुसरी लाट पुढेपुढे पसरत निघाली होती. त्यावेळी विविध समाज, कुटुंबे यांच्यावर बदलाचा ताण पडला. प्रत्येक कुटुंबात दोन लाटांच्या पाठीराख्यांचे झगडे उठत राहिले; पितृसत्ताक अधिकार रचनेवरही आघात झाले, मुले व त्यांचे मातापिता यांचे संबंध बदलले. मालमत्तेबद्दलच्या नव्या कल्पना उदयाला आल्या. जेव्हा आर्थिक उत्पादन शेतीकडून कारखान्याकडे गेले, तेव्हा कुटुंबातील सर्वांनी एकत्र, एखाद्या उतादक गटाप्रमाणे, काम करणे सोडून दिले. कामे करणाऱ्यांना कारखान्यात काम करण्यासाठी मोकळे रहाता यावे म्हणून कटुंबाची प्रमुख कामे नव्या तज्ञ संस्थांकडे सोपवण्यात आली. मुलांचे शिक्षण शाळांकडे सोपवण्यात आले. वृद्धांची काळजी घेण्याचे काम आश्रयगृहांवर किंवा शुश्रूषागृहांवर सोपविण्यात आले. या सर्वांपेक्षा विशेष गोष्ट म्हणजे नव्या समाजाला इकडून तिकडे हालण्याची आवश्यकता होती त्यासाठी जे आपल्या उद्योगानुसार एक जागा सोडून दुसरीकडे जायला तयार होतील असेच कामगार हवे होते.

वयस्कर नातेवाईकांच्या मुळे, आजाऱ्यांमुळे, अपंगांमुळे आणि पुष्कळ मोठ्या प्रमाणात मुलेबाळे असल्यामुळे व एकूण सर्व जबाबदाऱ्यांमुळे विस्तृत कुटुंबाने जागा सोडणे अशक्यच होते. म्हणून हळूहळू परंतु दुःख सावरत कुटुंबाची रचना बदलायला सुरुवात झाली. शहरांमध्ये जाऊन रहावे लागल्यामुळे, फाटाफूट होऊन, आर्थिक वादळांनी उध्वस्त होऊन, कुटुंबांनी नको असणाऱ्या नातेवाइकांना दूर करून छोटा आकार घेतला. नव्या तांत्रिक क्षेत्राला सुयोग्य ठरतील अशा तऱ्हेने त्यांची रचना झाली. आणि ती हलती रहाण्यास बदलीला अधिक सोयीची ठरली. आई, बाप आणि त्यांचीच व तीही थोडीच मुले याशिवाय इतर कोणत्याही जवळच्या वा लांबच्या नातेवाईकांचा ज्यात समावेश नाही; अशी केंद्र कुटुंबपद्धती रुढ झाली आणि समाजानेही तिला मान्यता दिली. समाजवादी असो की भांडवलशाही असो, सर्व उद्योगप्रधान समाजात आढळणारा हा कुटुंबाचा 'आधुनिक' नमुना! जेथे आपल्या पूर्वजांची पूजा होत असल्याने वडिलधाऱ्यांना अगदी अपवादात्मक ठरावी अशी महत्त्वपूर्ण भूमिका दिली जाई; मोठी, अगदी जिव्हाळ्याने

एकत्र रहाणारी, अनेक पिढ्यांचा अगत्याने समावेश होईल, अशी जपानमधील कुटुंबे देखील दुसरी लाट आल्यावर मोडून जाऊ लागली. आणि दिवसेदिवस अधिकाधिक केंद्र–कुटुंबे अस्तित्वात येऊ लागली. थोडक्यात, दुसऱ्या लाटेच्या समाजांची अशी न्युक्लिअर, एकेरी कुटुंबे, व्यवच्छेदक लक्षण बनून राहिली. त्यामुळे पहिल्या लाटेच्या समाजाहून तीही–भूगर्भ इंधने, पोलाद गिरण्या, किंवा साखळी दुकाने यांच्या प्रमाणेच तिच्या भिन्नतेमुळे वेगळी उठून दिसू लागली.

प्रच्छन्न अभ्यासक्रम

जसजशी कामाची जागा शेत व घर सोडून कारखान्यात एकवटली, तसतसे मुलांनी कारखान्यातील जीवनासाठी सज्ञ होणे आवश्यक झाले. ॲण्ड्रयू उर याने इ. स. १८३५ मध्ये म्हटल्याप्रमाणे सुरुवातीच्या खाणी, गिरण्या व कारखाने यांच्या मालकांना असे आढळून आले, की "ज्यांनी आपल्या वयाची कोवळीक ओलांडली आहे अशा माणसांना मग ती ग्रामीण जीवनातून आलेली असोत, की हस्तोद्योगाच्या व्यवसायातून आलेली असोत— कुशल कारखाना कामगार म्हणून तयार करणे जवळजवळ अशक्यच होते." तरुण वयातच औद्योगिक जीवनपद्धतीनुसार व्यक्तींची घडण घडलेली असेल, तर औद्योगिक शिस्तीचे नंतर निर्माण होणारे प्रश्न अगदी सुलभतेने सुटतील. अशा विचारांतून दुसरी लाट संस्कृतीचे दुसरे एक महत्त्वपूर्ण अंग जन्माला आले— सामुदायिक शिक्षण.

कारखान्यांच्या धर्तीवर सामुदायिक शिक्षण योजना पायाभूत वाचन, लेखन, अंकगणित, थोडा इतिहास आणि इतर विषयांचे ज्ञान देऊ लागल्या. हा उघड दिसू शकणारा अभ्यासक्रम होय. परंतु याच्याही मागे याहूनही खूपच अधिक पायाभूत असणारा प्रच्छन्न किंवा अदृश्य अभ्यासक्रम अस्तित्वात होता. पूर्वी आणि आताही बहुतेक सर्व औद्योगिक देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या या अभ्यासक्रमात तीन क्रम आवश्यकतेने अंतर्भूत असतात. एक म्हणजे वक्तशीरपणा, दुसरी गोष्ट म्हणजे आज्ञाधारकपणा आणि तिसरी गोष्ट पाठांतर किंवा एखादी गोष्ट पुनः पुन्हा करणे कारखान्यातल्या कामात कामगारांनी, विशेषतः प्रत्यक्ष यंत्रचालकांनी वेळेवर हजर होणे ही आवश्यक गोष्ट होती. आणि कामगारांनी, आपल्या वरिष्ठांकडून आज्ञा घेणे आणि कसलाही प्रश्न किंवा विचार न करता त्या अंमलात आणीत काम करीत रहाणे आवश्यक होते. कामगार पुरुष असोत की स्त्रिया, त्यांनी यंत्रांशी किंवा कचेरीत तेच तेच काम करीत रहाणे व त्यायोगे यंत्रवत् आचरण करणे ही गोष्ट अपरिहार्य अशी ठरली.

याप्रमाणे एकोणीसाव्या शतकाचे मध्यंतर उलटल्यावर, दुसरी लाट वेगाने देशोदेशी जाऊन तिने तेथील कब्जा घेतल्यानंतर, शिक्षणाचा एकप्रकारे निष्ठुर क्रम अंमलात येऊ लागला. मुले लहान लहान वयातच शाळेत जाऊ लागली. अभ्यासाची वर्षे वाढली, आणि दिवसेदिवस शिक्षणाचा कालावधी मोठा मोठा होऊ लागला.

सार्वजनिक शिक्षण ही सुसंस्कृत होण्याच्या प्रगतीतली प्रमुख पायरी ठरली. न्यूयॉर्क शहरातील तंत्रकुशल व कामगार यांच्या एका गटाने इ. स. १८२९ मध्ये असे जाहीरपणे म्हटले की, "जीवन आणि स्वातंत्र्य यांच्या खालोखाल शिक्षण हे मानवी जीवनाला मिळालेले सर्वात मोठे वरदान आहे, असे आम्ही मानतो." तरीही आपण असे म्हणू शकतो की या दुसऱ्या लाटेतील शाळांनी पिढीमागून पिढी यंत्रवत् केली आणि यंत्रतंत्र ज्ञानाला योग्य असे आणि यंत्राशी यंत्रवत् आचरण करू शकणारे असे सहज वळवता येईल असे, पण कडक शिस्त आचरणारे असे कामगार दल तयार केले.

अनुक्रमणिका

एकूण औद्योगिक समाजाला योग्य असे तरुण तयार करण्याच्या दृष्टीने जी एकसूत्री पद्धत तयार झाली, तिचे न्युक्लीअर कुटुंबे आणि कारखाना पद्धपद्धतीचे शिक्षण हे प्रमुख भाग ठरले. या बाबतीत ही दुसरी लाट—समाज, मग ते कोणत्याही देशातील असोत, एक सारखे ठरले.

अमर अस्तित्व

दुसऱ्या लाटेतील या समाजांमध्ये पहिल्या दोन्हींवर सामाजिक ताबा ठेवू शकणारी तिसरी संस्था उदयाला आली ती संस्था म्हणजे संघटित संस्था—कॉर्पोरेशन ह्या काळापर्यंत उद्योग क्षेत्रातील ही विशिष्ट योजना व्यक्ती किंवा कुटुंब किंवा भागीदार यांच्या मालकीची असायची, कॉर्पोरेशन्स होत्या, परंतु त्या क्वचित् कुठेतरी अशा होत्या.

औद्योगिक इतिहासाचे अभ्यासक ऑर्थर ज्युइंग यांच्या मते अमेरिकन क्रांतीपर्यंत कोणालाच असे वाटले नव्हते, की भागीदारी किंवा वैयक्तिक मालकी यांच्या ऐवजी प्रशासक अशी प्रमुख संघटना कधी अस्तित्वात येईल.

मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू झाल्यानंतर सर्व बदलले. दुसऱ्या लाटेतील तंत्रज्ञानाचा एखादी व्यक्ती किंवा एखादा छोटा गट पुरवू शकेल यापेक्षा कितीतरी अधिक भांडवलाची—भांडवलाच्या प्रचंड साठ्याची—आवश्यकता होती. प्रत्येक वेळी भांडवल गुंतवताना हे मालक किंवा भागीदार आपले सर्वस्व पणाला लावीत, परंतु अतिविशाल आणि अनिश्चित भविष्याच्या योजनांमध्ये पैसे गुंतवायला ते का कू करत असत. त्यांना याबाबत प्रोत्साहित करण्यासाठी लिमिटेड कंपन्यांची कल्पना पुढे आली. त्या योजनेनुसार जर संस्था कोसळली, तर ज्यांनी त्यांनी गुंतवलेली रक्कमच तेवढी बुडायची. अधिक धोका नव्हता. या नवीन संशोधित कल्पनेमुळे गुंतवणूक अक्षरशः लोंढा फुटून होऊ लागली.

शिवाय कोर्टांनी कॉर्पोरेशन हे 'अमर' किंवा चिरंतन अशा प्रकारचे अस्तित्व असल्याचे गृहीत धरल्यानेही असा स्पष्ट अर्थ झाला, की मूळ संस्थापक घटकांपैकी कोणीही गळाले, तरी मूळ संस्था चालूच रहाणार, त्यामुळे एक झाले, की अशी संघटित संस्था अधिक कालावधींच्या, मोठ्या पल्ल्याच्या योजना आखू शकत होती आणि पूर्वी कधी घेतले गेले नसतील इतके प्रचंड मोठे काम हाती घेऊ शकत होती.

कॉर्पोरेशन हा सर्व उद्योगप्रधान देशांच्या आर्थिक जीवनातील अंगभूत भाग बनून राहिला. देश समाजवादी असो की, भांडवलशाही तेथे कॉर्पोरेशन्स फार तर बाह्य स्वरुपात थोड्या फार भिन्न असतील, पण मूळ संघटन कल्पना सर्वत्र एकच होती.

दुसऱ्या लाटेचा अंगिकार करणाऱ्या समाजातील सामाजिक संस्थांत न्युक्लिअर कुटुंबे, कारखानावत् शाळा आणि प्रचंड कॉर्पोरेशन्स ह्या तीन गोष्टी प्रमुख लक्षणे ठरून गेल्या.

दुसऱ्या लाटेने व्यापलेल्या संपूर्ण जगात—जपान, स्वित्झर्लंड, ब्रिटन, पोलंड, अमेरिका, रशिया—बहुतांश देशांतील लोकांनी एका ठराविक जीवनमार्गाचा अवलंब केला. त्यांची कुटुंबे अतिकेंद्रित झाली, कारखानावत् शाळा चालवून शिक्षण प्रशिक्षण यांचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला, आणि खाजगी असोत

की, सार्वजनिक स्वरुपाच्या असोत, मोठ्या कॉर्पोरेशन्समधील नोकऱ्यांचा स्वीकार केला. आणि संपूर्ण जीवनावर दुसरी लाट जीवनपद्धतीचा पगडा बसला.

## संगीताचा कारखाना

आणि जीवनपध्दतीच्या याच गाभ्याभोवती इतर अनेक संघटना उद्‌भवल्या. सरकारी मंत्रिमंडळे, क्रीडा संघ, चर्च, व्यापारी संस्था, ट्रेड युनियन्स, व्यावसायिक संस्था, राजकीय पक्ष, वाचनालये, मनोरंजन करणारे गट, मानव वंशासंबंधीच्या संस्था अशा हजारो संस्था दुसऱ्या लाटेच्या आवेगाबरोबर अस्तित्वात आल्या. आणि यातून असे गुंतागुंतीचे रचनात्मक संबंध निर्माण झाले, की यातला प्रत्येक गट एकमेकांशी सेवेच्या, सहकार्याच्या एकमेकांच्या तोलाच्या संदर्भात एकमेकांशी संबधित बनून राहिला. परस्परावलंबन, काही अंशी तरी, निर्माण झाले.

वरवर पहाता हे विविध प्रकारचे गट किंवा या संघटना गोंधळ आणि निरूद्देश्यता प्रकट करतात. परंतु नीट पाहिले असताना आपल्याला त्यात एक धाटणी किंवा सुसूत्रता आढळून येते. दुसऱ्या लाटेखाली आलेल्या देशांत समाजसंशोधकांना कारखाने हा सर्वात प्रगत आणि कार्यक्षण प्रतिनिधी वाटला. त्यामुळे कारखान्याच्या कार्यप्रणालीत महत्त्वाची ठरणारी तत्त्वे त्यांनी जीवनातील इतर कार्यसंस्थांनाही लागू करण्याचा प्रयत्न केला. शाळा, इस्पितळे, तुरूंग, राजकीय नोकरशाह्या आणि इतर संस्थांनी त्यामुळे कारखान्याची वैशिष्ट्ये उचलली. तेथील कामाची विभागणी, तेथील ज्येष्ठताक्रम, तेथील कठोर अलिप्तता या व अशा इतर काही गोष्टी.

कलेच्या क्षेत्रात देखील आपल्याला कारखान्यातील काही तत्त्वे आढळून येतात. हजारो वर्षे शेतीप्रधान संस्कृतीत आपल्या आश्रयदात्यांसाठी काम करण्याची जी रूढी होती तिच्या ऐवजी संगीतकार, कलाकार, रचनाकार आणि लेखक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत फेकले गेले. दिवसेदिवस त्यांनी आपले 'उत्पादन' अनामिक गिऱ्हाईकांना 'पेश करण्याचा' धडाका लावला. हाच प्रकार दुसऱ्या लाटेच्या प्रभावाखालील सर्व देशांमध्ये घडल्यामुळे कलात्मक सर्जनतेची संपूर्ण धाटणीच बदलून गेली.

संगीत हे याचे ठळक उदाहरण ठरेल. दुसरी लाट आल्यानंतर लंडन, व्हिएन्ना, पॅरिस आणि इतर अनेक ठिकाणी जलशांसाठी मोठमोठे कॉन्सर्ट हॉल निर्माण झाले. त्यांच्याबरोबरच गल्ला पध्दतीचाही जन्म झाला. निर्मात्याला पैसे पुरवणारा उद्योगपतीही आला; संस्कृतीच्या ग्राहकांना तिकिटे विकणेही आले!

जो जास्त तिकिटे खपवेल त्याला सहाजिकच अधिक पैसा मिळू लागला. त्यामुळे जास्ती जास्ती खुर्च्या असलेले अधिक मोठे हॉल बांधण्यात येऊ लागले. सर्वांत मागच्या रांगेतही संगीत ऐकू जावे या हेतूने मोठा ध्वनी आवश्यक ठरला. या सर्वांचा परिणाम म्हणजे संगीत, खोलीत मर्यादित न रहाता 'सिंफोनिक्' झाले.

'हिस्ट्री ऑफ म्युझिकल इन्स्ट्ररुमेंट्स्' या पुस्तकात कर्ट साख्स (Sachs) याने म्हटले आहे, की 'अठराव्या शतकातील संगीत उमरावी संस्कृतीतून निघून लोकानुवर्ती झाल्यामुळे दिवसे दिवस अधिक मोठे हॉल जलशांसाठी तयार झाले. त्यामुळे आवाज अधिक मोठा असण्याची आवश्यकता निर्माण झाली.” त्याकाळी ही गोष्ट शक्य करण्यासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञान अवगत झालेले नव्हते. त्यामुळे आवश्यक

तितका मोठा आवाज निर्माण करण्यासाठी अधिकाधिक वाद्ये आणि वादक यांची 'भरती' वाद्यवृंदात होऊ लागली. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे आधुनिक सिंफनी ऑर्केस्ट्रा. आणि या औद्योगिक संस्थेसाठीच बीथोवेन, शूबर्ट, ब्राह्यस् इत्यादींनी अप्रतिम रचना निर्माण केल्या.

वाद्यवृंदात देखील कारखाना आणि त्याची अंतर्गत रचना प्रतिबिंबित झाली होतीच. सुरुवातीला वाद्यवृंदाला कोणी नेता असत नव्हता. कधी कधी नेतेपण वादकांमध्येच एकाकडून दुसऱ्याकडे जात असे. परंतु नंतर 'कंडक्टर'च्या हाती सर्व सूत्रे गेली. निरनिराळ्या वाद्य विभागात वादकांची विभागणी (आणि स्थापना) झाली आणि एखाद्या कारखान्यातील कामगारांनी किंवा कचेरीतील नोकरांनी कामे करावीत त्यानुसार वादक वाद्यांवर कामे करू लागले; आणि आपला कामाचा वाटा एकूण निर्मितीला, संगीताला अर्पण करु लागले! समाजग्राहकाला ही संस्था आपली निर्मिती विकू लागली; फोनोग्राफ रेकॉर्डस् विकल्या जाऊ लागल्या. आणि अशा तऱ्हेने संगीताचा कारखाना जन्माला आला.

दुसऱ्या लाटेच्या सामाजिक क्षेत्रात निर्माण झालेल्या जीवनपद्धतीचे, वाद्यवृदांचा इतिहास हे केवळ एक उदाहरण झाले. तीन प्रमुख संस्थांनी, हजारो विविध संघटनांनी सर्वांनीच औद्योगिक तांत्रिक क्षेत्राच्या पद्धतीचा अंगीकार केला; कारण ती एक प्रमुख गरज होती. परंतु संस्कृती म्हणजे केवळ तांत्रिक क्षेत्र नव्हे, किंवा त्याला अनुरुप असे सामाजिक क्षेत्रही नव्हे. सर्व संस्कृतीमध्ये उत्पादन आणि वितरणविषयक माहिती प्रस्तुत करण्यासाठी जाहिरात क्षेत्राची आवश्यकता असते. त्यात देखील दुसऱ्या लाटेने लक्षणीय असे बदल केले.

## कागदी बर्फवादळ

प्राचीन काळापासून आजपर्यंत सर्व मानवी गट प्रत्यक्ष आणि व्यक्तिगत व अशा दळणवळणावर अवलंबून रहात आलेले आहेत. तरीदेखील दूर अंतरावर संदेश पाठविण्यासाठी काही व्यवस्था निर्माण होण्याची निकडही होतीच. प्राचीन पर्शियन लोकांनी ठिकठिकाणी, स्तंभ उभारलेले होते. या 'आरोळी स्तंभा'वर मोठे आणि कर्कश्श्य आवाज असणाऱ्या लोकांना ठेवण्यात येत असे. एका स्तंभावरील माणूस पुढच्या स्तंभावरील माणसाकडे ओरडून संदेश पाठवित असे. रोमन लोकांनी विस्तृत अशी संदेशवाहक यंत्रणा कार्यान्वित केलेली होती. या यंत्रणेचे नाव होते cursus publicus. इ. स. १३०५ ते १८ व्या शतकाच्या सुरुवातीच्या भागात संपूर्ण युरोपात हाऊस ऑफ टॅक्सीजचा प्रचार होता. ह्यात तट्टूंच्या सेवेचा भाग होता. इ. स. १६२८ च्या सुमारास २०,००० माणसे संदेश वाहक म्हणून कामावर होती. हे जासूद निळे जरतारी गणवेश धारण करून या खंडातील राजपुत्र, सेनापती, व्यापारी आणि सावकार यांच्या संदेशांची ने आण करीत संचरत असत.

पहिली लाट—संस्कृती प्रभावशाली असताना या सर्व व्यवस्था फक्त श्रीमंत आणि बलशाली लोकांसाठी राखून ठेवलेल्या असत. सर्वसामान्य लोकांना इथे रिघाव नव्हता. लॉरिअन झिलिआक्स या इतिहासातज्ञाने म्हटले आहे, की "इतर मार्गांनी पत्रे पाठविण्याचे कोणी प्रयत्न केल्यास संशयाने त्याकडे पाहिले जात असे... आणि अधिकाऱ्यांकडून त्या गोष्टीला प्रतिबंध केला जात असे." थोडक्यात, समक्ष किंवा स्वतः माहितीची देवाण—घेवाण करणे हे सर्वांसाठी खुले होते. परंतु माहिती पाठविण्याचे किंवा मिळविण्याचे नवे मार्ग—कुटुंब किंवा खेडी यांच्या मर्यादेपलीकडील—तसे बंदिस्त आणि ठराविक

अनुक्रमणिका

आवाक्याचे होते. आणि त्यांचा वापर सामाजिक किंवा राजकीय हुकुमतीसाठीच होत होता. आणि पुष्कळदा श्रेष्ठ लोकांकडून त्यांचा वापर एखाद्या शस्त्राप्रमाणे होत असे.

दुसरी लाट जेव्हा देशादेशांतून पसरली, तेव्हा तिने संदेश वहनाच्या या मक्तेदारीचा चक्काचूर करून टाकला. श्रीमंत आणि बलशाली सत्ताधारी एकाएकी परहित दक्ष झाले, आणि त्यामुळे हे घडले असे मात्र नाही. झाले काय, की दुसऱ्या लाटेची तंत्राधिष्ठता आणि कारखान्यांतून होणारे प्रचंड उत्पादन या गोष्टींसाठी तितक्याच प्रचंड वेगात संदेशांची देवाण–घेवाण होणे जरुर होते. आणि या जुन्या पद्धतीनाही गरज पूर्ण करणे शक्यच नव्हते.

प्राचीन आणि पहिली लाट–संस्कृतीच्या समाजातील आर्थिक उत्पादन आणि या संदर्भातील दळणवळण तुलनेने साधे होते. आणि सहसा हाताशी असलेल्याकडून ते करून घेता येत असे. ते सहसा तोंडी किंवा हावभावांनी व्यक्त होणारे असे. या उलट दुसऱ्या लाटेच्या अर्थशास्त्राला अनेक ठिकाणी होणाऱ्या कामात अचूक सुसंवाद आवश्यकच होता. केवळ कच्चा मालच नव्हे, तर मोठ्या प्रमाणात माहिती तयार करुन तिचे काळजीपूर्वक वितरण होणे आवश्यकच होते.

ह्यासाठीच दुसरी लाट भरात येत असतानाच प्रत्येक देशाने अहमहमिकेने पोस्ट सेवा उभारली. खरोखरच पोस्ट ऑफिस हा देखील सरकी दूर करण्याच्या किंवा सूत तयार करण्याच्या यंत्राइतकाच अपूर्व शोध होता आणि आज आपण विसरलो, पण एकेकाळी त्यानेही आनंद व उल्हास निर्माण केला होता. तो मात्र मात्र आता नाहीसा झाला आहे. अमेरिकन वक्ता एडवर्ड एव्हर्ट यांनी म्हटले आहे, “मला हे मान्य करावे लागेल, की ख्रिस्ती धर्माखालोखाल, आपल्या आधुनिक संस्कृतीचा पोस्ट ऑफिस हा उजवा हात आहे.”

पोस्ट ऑफिसने औद्योगिक युगाच्या दळणवळणाला खूप मोठे क्षेत्र खुले करुन दिले. इ. स. १८३७ च्या सुमाराला ब्रिटिश पोस्ट ऑफिस केवळ श्रेष्ठींचे संदेशवहनच करत नव्हते, तर दरसाल सुमारे ८८ दशलक्ष वस्तूंची वाहतूक करीत होते. त्या काळाच्या मानाने हा वाहतुकीचा अक्षरशः भडिमारच नव्हे काय? इ. स. १९६० च्या सुमाराला, म्हणजे जेव्हा औद्योगिक युगाने कळस गाठला होता आणि तिसरी लाट उसळू लागली होती, अशा वेळी हाच आकडा १० महापद्म पर्यत जाऊन पोचला होता. याच वर्षी अमेरिकेतील पोस्ट खात्याने देशातील प्रत्येक पुरुष, स्त्री व मूल यांना सरासरी ३५५ घरगुती वस्तू पोचवल्या!

दुसऱ्या लाटेच्या संदर्भात, औद्योगिक क्रांतीसह आलेले हे पोस्ट संदेशवहनाचे उधाण, ही तेव्हा होत असलेल्या संदेशवहनाची एक चुणुक म्हणावी लागेल. मोठ्या संस्थांमध्ये यापेक्षाही कितीतरी अधिक प्रमाणात संदेश ‘मायक्रो–पोस्टल सिस्टिम्स’ द्वारा दिले–घेतले जात होते. मेमो म्हणजे सार्वजनिक दळणवळणात कधीही न जाणारी पत्रे होत. इ. स. १९५५ मध्ये, अमेरिकेत, दुसरी लाट उत्तुंग झालेली असताना, तीन मोठ्या कॉर्पोरेशन्सच्या दप्तरात हूवर कमिशन डोकावत होते तेव्हा त्याला असे आढळून आले, की या तीन कॉर्पोरेशन्समध्ये अनुक्रमे ३४,०००, ५६,०००, व ६४,००० दस्तऐवज व मेमो नोकरीवर असलेल्या प्रत्येकासाठी दप्तरबद्ध होते!

औद्योगिक समाजाच्या वाढत्या संदेशवहनविषयक गरजा लेखी स्वरूपात भागवल्या जात होत्या असे नाही. यामुळे टेलिफोन व तारांचे शोध १९ व्या शतकात वाढत्या संदेशवहन संदर्भातला आपापला भार त्यांनी उचलावा म्हणून लावण्यात आले. इ. स. १९६० च्या सुमाराला अमेरिकन माणसे दररोज २५६

दशलक्ष टेलिफोन कॉल्स करीत होती. अतिशय प्रगत अशा टेलिफोन संस्था व त्यांचे जगातले जाळे नेहमीच अतिभारित होत राहिले.

ह्या सर्व पद्धती मुख्यतः एक संदेश प्रेषक व तो घेणारा एक संदेश ग्राहक यांच्यासाठी होत्या. परंतु ज्या समाजात प्रचंड उत्पादन होत होते आणि उत्पादित वस्तु प्रचंड प्रमाणात वापरल्या जात होत्या, तिथे संदेशवहनही गठ्ठ्याने होणे आवश्यक होते. शिवाय एका संदेश प्रेषकाने दिलेला संदेश एकाच वेळी अनेक ग्राहकांना मिळणे ही गोष्टही आवश्यक झाली. औद्योगिकपूर्व समाजातील मालक त्यांच्या मोजक्याच नोकरांना व्यक्तिशः गरज पडल्यास त्यांच्या घरी जाऊनही, भेटू शकत होता. परंतु औद्योगिक मालकाला त्याच्या हजारो नोकरांच्या संदर्भात ही गोष्ट शक्यच नव्हती; तो एकेकट्याला भेटू शकत नव्हता. मोठा व्यापारी, किंवा वितरक याला एकेका ग्राहकाशी संबंध ठेवणे हे त्याहूनही अशक्य होते. आणि म्हणून दुसऱ्या लाटेने एकच संदेश एकाच वेळी अनेक लोकांना, कमी खर्चात, आणि विश्वसनीयरीत्या पोचविण्याचे प्रभावी मार्ग शोधले.

पोस्ट सेवा एकच संदेश लाखो जणापर्यन्त पोचवू शकत होती. परंतु अपेक्षित वेगाने नाही. टेलिफोन द्वारे संदेश वेगाने पोचवता येत होते. परंतु त्याद्वारे एकाच वेळी लाखो लोकांना संदेश पोचविता येत नव्हते. ही त्रुटी वृत्त माध्यमानी भरुन काढली.

अर्थात आजमितीला औद्योगिक राष्ट्रातल्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात वर्तमानपत्रे हा आवश्यक भाग होऊन गेलेला आहे. मोठ्या प्रमाणात त्यांची प्रसिध्दी आणि विक्री होत असते. परंतु राष्ट्रीय पातळीवर या प्रकाशनांची जी उन्नती झाली, त्यात अनेक नव्या औद्योगिक तंत्रांच्या एकाच दिशेने झालेल्या घडणींचे आणि समाज रचनांचे प्रतिबिंब आढळते. युरोपाच्या आकाराच्या एखाद्या संपूर्ण देशात एका दिवसात प्रकाशने पोचावीत या उद्देशाने आगगाड्यांचा उपयोग करुन घेण्यात आला. काही तासांच्या अवधीत, कोट्यवधी प्रती छापणारे रोटरी छापखाने आले. टेलिफोन आणि तारांचे जाळे उभे राहिले, शिक्षण सक्तीचे झाले आणि त्याद्वारे लोकांना साक्षर करण्यात आले. उद्योगाला आपले उत्पादन जनतेपर्यंत पोचण्याची आवश्यकता होती.

वृत्तमाध्यमातही आपल्याला पुनाः कारखाना तत्त्वाचा अनुभव येतो. वृत्तपत्रे, रेडिओ, सिनेमा, टेलिव्हिजन यांच्या पसाऱ्यातही तत्त्व तेच कारखान्याचे. लाखो मेंदूवर ह्या सर्व गोष्टी एकाच प्रकारचे संदेश ठसवत रहातात. कारखान्यात उत्पन्न झालेल्या, लाखो घरात वापरल्या जाणाऱ्या एकसारख्या वस्तूंवर नाही का शिक्के किंवा ठसे उमटवण्यात येत? प्रमाणीभूत, प्रचंड प्रमाणात निर्माण झालेल्या वस्तू ज्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे अशा काही केंद्रीभूत कारखान्यातून निर्माण होतात, आणि लाखो ग्राहकांकडे त्यांचा ओघ वहात रहातो. अशा विस्तृत, शक्तिशाली जाहिरात माध्यमाच्या मदतीखेरीज औद्योगिक संस्कृतीने आकार घेणे अगर ती विश्वसनीयरीत्या कार्यान्वित होणे शक्य नव्हते.

सर्व भांडवलशाही आणि त्याचप्रमाणे समाजवादी समाजातून यानुसार एक गुंतागुंतीचे माहिती क्षेत्र उभारले; त्याच्याद्वारां वैयक्तिक आणि सामूहिक संदेशाचे वितरण तयार वस्तूंप्रमाणे किंवा कच्च्या मालाप्रमाणे अतिशय कार्यक्षमतेने केले जात असे. हे जाहिरात क्षेत्र तांत्रिक क्षेत्राच्या आणि सामाजिक क्षेत्राच्या बरोबर जणू विणले गेले होते आणि कार्य करत होते; त्याद्वारे त्याने आर्थिक उत्पादन आणि खाजगी वर्तणूक यांच्यात एकतानता आणि एकसूत्रता आणली.

अनुक्रमणिका

या क्षेत्रांनी मोठ्या क्षेत्रात फार महत्त्वाच्या भूमिका बजावल्या. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही क्षेत्रे आपल्या एकट्याच्या बळावर इतरांशिवाय अस्तित्वात येऊच शकली नसती. तांत्रिक क्षेत्राने उत्पादन केले आणि संपत्ती तयार ठेवली; सामाजिक क्षेत्राने एकमेकांशी संबंधित अशा हजारो संस्थांसह कार्य करीत प्रत्येक व्यक्तिला विहित कार्य दिले. आणि माहिती क्षेत्राने, एकूण प्रणाली कार्यान्वित रहाण्याच्या दृष्टीने नेहमीच माहिती तयार ठेवली. एकूण, समाजाची मूलभूत बांधणी त्यांनी केली.

थोडक्यात आपल्याला असे आढळून येईल, की दुसऱ्या लाटेखालील देश मुळात कोणत्याही संस्कृतीने किंवा भौगोलिक परिस्थितीतले असले, तरी; आणि कोणत्याही मानववंशाचे, धर्माचे असले, तरी; समाजवादी असले तरी, वा भांडवलशाही असले तरी त्यांची नवीन बांधणी एकाच धर्तीवर झालेली होती.

ह्या समाज रचनांनी रशिया, हंगेरी, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, कॅनडा—किंवा दुसरा कोणताही दुसऱ्या लाटेखालील देश—या देशात विशिष्ट मर्यादा तयार केल्या, आणि त्या मर्यादा सांभाळतच त्यांच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक भिन्नता प्रकट झाल्या.

प्रत्येक ठिकाणी जुन्या लाटेच्या रक्षणाचे प्रयत्न करणाऱ्यांत आणि नव्या लाटेद्वारां जुने बिकट आणि क्लेशकारक प्रश्न सोडवले जाणार असल्याचे ओळखणाऱ्यांत राजकीय, सामाजिक, आणि आर्थिक झगडे होऊन गेल्यानंतरच त्या समाजरचना उद्‌भवल्या.

दुसऱ्या लाटेने आपल्या आगमनाबरोबर मानवी आशा विस्तारल्या. कारण यावेळीच पहिल्यांदा स्त्री पुरुषांना हे ओळखण्याचे धैर्य झाले, की दैन्य, भूक, रोगराई आणि अन्याय या उलथून टाकण्याच्या गोष्टी आहेत. आदर्शवादी कल्पनारम्य जगात रमलेल्या कित्येक लेखकांना आणि तत्त्वचिंतकांना उभरणाऱ्या औद्योगिक संस्कृतीत शांती, एकोपा, सर्वांसाठी नोकरी, संधीची समानता, जन्मानुसारच्या ज्येष्ठताक्रमाचा शेवट, आणि अक्षरशः हजारो वर्षे शेतीप्रधान संस्कृतीच्या काळात अस्तित्वात असलेल्या व कधीच बदलणार नाहीत आणि शिवाय अमरच आहेत असे दिसणाऱ्या सर्व कष्टप्रद अवस्थांचा शेवट; इतक्या गोष्टी अंतर्भूत असलेल्या दिसल्या!

आज आपल्याला औद्योगिक संस्कृती तितकीशी आदर्शभूत वाटत नाही. असे वाटते, की ती काहीशी दडपशाही वृत्तीची आहे, भयाण आहे. प्राकृतिक दृष्ट्या विभिन्न असणाऱ्या निरनिराळ्या मानवगटांच्या संबंधांबाबत धोकादायक आणि अस्थिर आहे, लढाया करण्यासाठी टपूनच बसलेली आहे, आणि मानसिक दृष्ट्या दडपलेली अशी आहे. परंतु ती तशी का आहे हे आपल्याला समजणे आवश्यक आहे. ही गोष्ट कळण्यासाठी, ह्या प्रश्नाचे उत्तर मिळवण्यासाठी आपल्याला एका प्रचंड विभाजक तत्त्वाकडे लक्ष द्यावयास हवे. या विभाजक तत्त्वाने पाचरीप्रमाणे कठोर चंचुप्रवेश करुन दुसऱ्या लाटेच्या आत्म्याचे दोन प्रतिस्पर्धी तुकडे केलेले आहेत.

अनुक्रमणिका

# तीन । अदृश्य पाचर

एखाद्या आण्विक प्रक्रियांच्या साखळीप्रमाणे स्फोटकपणे कार्य करीत दुसऱ्या लाटेने आजवर एक असलेली जीवनाची दोन अंगे फोडून बाजूला केली. असे करीत असताना तिने आपल्या अर्थकारणात, आपल्या मानसात, फार काय, आपल्या लैंगिक व्यक्तित्वातही एक फार मोठी अदृश्य पाचर ठोकून ठेवली.

औद्योगिक क्रांतीने एका अप्रतिमपणे एकसंध असलेला असा समाज आपल्या वैशिष्ट्यपूर्ण तंत्रज्ञानाद्वारां, आपल्या खास सामाजिक संस्थांद्वारां, आणि आपल्या माहिती पद्धतींद्वारां कार्य करीत निर्माण केला. परंतु दुसऱ्या पातळीवर तिने आर्थिक तणाव, सामाजिक संघर्ष आणि मानसशास्त्रीय कसकस यांनी ठासून भरलेली जीवनपद्धती निर्माण करून समाजाच्या अस्तरातील ऐक्य टरकावून बाजूला केले. आपल्याला दुसऱ्या लाटेच्या युगामध्ये या अदृश्य पाचरीने आपले जीवन कसे घडवले हे समजले की आकार येत असलेल्या तिसऱ्या लाटेच्या आघाताच्या आवेगाचे आकलन होऊ शकेल.

मानवी जीवनाचे ह्या दुसऱ्या लाटेने केलेले दोन विभाग म्हणजे उत्पादन आणि वापर, विनियोग. उदाहरणार्थ, आपल्याला नेहमी वाटत असते की आपण उत्पादक आहोत, तसेच ग्राहकही आहोत. परंतु नेहमी हे खरे असत नाही. औद्योगिक क्रांतीच्या अगोदर मानवाने निर्माण केलेले विपुल अन्नधान्य, तयार केलेल्या वस्तु आणि सेवा या गोष्टी खुद्द उत्पादक आणि त्यांच्या कुटुंबियांकडूनच वापरल्या जात होत्या. किंवा श्रेष्ठ लोकांचा वर्ग या गोष्टींचा अवशेष, स्वतःच्या वापरासाठी, बळकावत असे.

बहुतेक शेतीप्रधान समाजात लोकांचा फार मोठा वर्ग शेती करत होता. छोट्या आणि काहीशा एकाकी गटांतून रहात होता. हे लोक गरजेपुरतेच अन्न सेवन करत होते, स्वतःला जिवंत ठेवण्यात यश मिळवत होते. आपल्या जमीनदाराला खूष ठेवण्यातही यश मिळवत होते. कितीतरी काळ अन्नधान्य साठवणीच्या सुविधा त्यांच्याकडे नव्हत्या. आपले उत्पादन बाजारापर्यंत पोचवण्यासाठी त्यांच्याकडे रस्ते नव्हते. त्यांना माहीत होते की जास्त उत्पादन केले तर सरंजामदार किंवा गुलामांचे मालक ते आयते हडप करतील. त्यामुळे आपले उत्पादन तंत्र सुधारण्याच्या किंवा उत्पादन वाढवण्याच्या बाबतीत ते उदासीन होते.

अर्थात् व्यापार तेव्हाही होता. आपल्याला माहीत आहेच, की काही धाडसी व्यापारी उंट, गाडी, किंवा नौका यांच्यावर आपला माल लादून हजारो मैल तो नेत होते. ग्रामीण भागातून येणाऱ्या अन्नधान्यावर अवलंबून असलेली शहरे निर्माण होत. इ. स. १५१९ मध्ये मेक्सिकोत पोचणाऱ्या स्पेनवासियांना ल्टॅटेलोल्को मध्ये हजारो लोक रत्ने, मौल्यवान धातु, गुलाम, सॅन्डल्स, कापड, चॉकोलेट, दोर, कातडी, टर्की, भाजीपाला, ससे, कुत्री आणि हजारो प्रकारची मातीची भांडी यांची खरेदीविक्री करत असलेले पाहून आश्चर्याचा धक्का बसला. जर्मन बॅंकर्ससाठी निघालेल्या १६ व्या व १७ व्या शतकातील खाजगी वितरणातील वृत्तान्त, दि फुग्गर न्यूज लेटर, त्या काळच्या व्यापाराचे विविधरंगी स्वरुप दाखवितो. भारतातील कोचीनमधील एका पत्रात युरोपात पाठविण्यासाठी मिरी खरेदी करायला पाच जहाजे घेऊन आलेल्या एका युरोपीय व्यापाऱ्यावर चाललेल्या खटल्याची सविस्तर हकीकत आली आहे. तो म्हणतो, की "मिरीचा व्यापार हा एक उत्तम धंदा आहे, फक्त त्यासाठी उत्साह आणि चिकाटी यांची आवश्यकता आहे." हा व्यापारी लवंगा, वेलदोडे, जायफळ, जायपत्री, कणिक, काही औषधे युरोपीय बाजारात नेत असे.

अनुक्रमणिका

तरी देखील, शेती मजुरांनी ताबडतोबीच्या स्वतः करण्याच्या वापरासाठी केलेल्या उत्पादनाच्या प्रमाणात हा व्यापार म्हणजे एका तत्त्वाचे केवळ चिन्हच म्हणावे लागेल. "सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत भूमध्य सागरीय विभागात एका टोकाला स्पेन आणि फ्रान्स व दुसऱ्या टोकाला तुर्कस्तान असलेल्या प्रदेशात ६० ते ७० दशलक्ष लोक रहात होते. या लोकसंख्येच्या नव्वद टक्के लोक जमिनीतून येणाऱ्या उत्पादनावर जगत होते. व्यापारयोग्य वस्तूंचे फार थोड्या प्रमाणात उत्पादन होत होते," असे या कालखंडातील इतिहासाचे, निर्विवाद निकर्ष काढणारे, संशोधक फर्नांड ब्राउडेल यांचे म्हणणे आहे. ते आणखी म्हणतात, "भूमध्य सागरीय भागातील एकूण उत्पादनाच्या साठे किंवा सत्तर टक्के उत्पादन बाजारीय अर्थक्षेत्रात कधी आलेच नाही." या क्षेत्रातली ही स्थिती, तर उत्तर युरोपातली काय असेल? खडकाळ जमीन आणि अतिथंड दीर्घ हिवाळे, तिथल्या जमिनीतून शेतकऱ्यांना कितीसे उत्पादन काढू देत असतील? आणि तेही किती कष्टाने!

औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीच्या पहिल्या लाटेच्या आर्थिक स्थितीचे आपणाला जर नीट आकलन झाले, तर दोन वेगळे भाग धारण करणाऱ्या तिसऱ्या लाटेचे आकलन सोपे होईल. 'अ' विभागात लोक स्वतःच्या उपयोगासाठी उत्पन्न काढीत असत, तर 'ब' विभागाचे लोक उत्पादन, व्यापार किंवा वस्तूंची अदलाबदल करून करावयाच्या खरेदी विक्रीसाठी करत असत. 'अ' विभाग खूप विस्तृत होता. बहुतांश लोकांसाठी उत्पादन आणि वापर या गोष्टी एका जीवनदायी प्रक्रियेत—उत्पाग्राहकतेत—एकत्र गुंफलेल्या अवस्थेत होत्या. ही एकात्मता इतकी पक्की होती, की ग्रीक, रोमन आणि मध्ययुगीन युरोपीय दोहोतला फरक करत नव्हते. एवढेच नव्हे, तर 'ग्राहक' वाचक शब्दही त्यांच्या भाषेत नव्हता. पहिल्या लाटेच्या संपूर्ण युगात लोकसंख्येचा अगदीच लहान भाग बाजारावर अवलंबून होता. बहुतेक लोक त्याच्या 'बाहेर'च असत.

दुसऱ्या लाटेने झटक्यात ही स्थिती बदलून टाकली. अत्यंत स्वयंपूर्ण लोक किंवा समाज यांच्या जागी तिने इतिहासात पहिल्यांदाच अशी स्थिती निर्माण केली, की मोठ्या प्रमाणातील संपूर्ण, सर्व प्रकारचे अन्नधान्य, वस्तू आणि सेवा या विक्री, अदलाबदल आणि देवाण—घेवाण यांच्या कक्षेत गेल्या. खुद्द स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या वापराच्या वस्तू निर्माण करण्याची पूर्वीची कल्पानाच तिने पूर्णतः नाहीशी करून टाकली. आणि अशी एक वेगळीच संस्कृती निर्माण केली की जिच्यात कोणीही, अगदी शेतकरी देखील—इथून पुढे कधीच स्वयंपूर्ण होऊ शकणार नाही. अन्न, वस्तु, आणि सेवा यांच्या बाबतीत प्रत्येकजण पूर्णतः दुसऱ्या कोणावर तरी अवलंबून राहण्याची वेळ आली.

थोडक्यात, औद्योगिकीकरणाने उत्पादन आणि वापर यांची एकी फोडली. उत्पादकापासून ग्राहक वेगळे फोडले. पहिल्या लाटेची एकसूत्री अर्थव्यवस्था ही दुसऱ्या लाटेत भेगाळलेली अर्थव्यवस्था बनून गेली.

## बाजाराचा अर्थ

या पद्धतीचे परिणाम महत्त्वाचे ठरले. तरी आपणाला ते क्वचितच समजतात. एकेकाळी एक छोटे किंवा वर्तुळाबाहेरचे ठरेल असे बाजार हे तत्त्व म्हणजे जीवन झपाटून टाकणारे एक झंजावाती वादळ बनून राहिले आहे. अर्थकारण 'बाजारी' बनून गेले. आणि ही गोष्ट समाजवादी व भांडवलवादी दोन्ही प्रकारच्या औद्योगिक अर्थकारणाच्या बाबतीत घडली.

अनुक्रमणिका

पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांचा कल, बाजार ही जीवनाची पूर्णतः भांडवलशाही बाब आहे असे मानण्याचा आहे. त्यातूनही हा शब्द ते 'फायद्याचे अर्थशास्त्र' याचा समानार्थी म्हणून वापरतात. तरी देखील इतिहासाच्या अभ्यासाने आपल्याला हे कळते की देवाण घेवाण—म्हणजेच बाजाराची जागाही फायद्याच्या अगोदर, त्याच्याहून स्वतंत्रपणे अस्तित्वात आली होती. कारण स्पष्टच सांगावयाचे तर बाजार म्हणजे देवाण घेवाणीचे जाळे. जणू ती एक स्विचबोर्डच. त्याच्यामार्फत वस्तू वा सेवा, संदेशांप्रमाणे त्यांच्या योग्य स्थळी नेऊन पोचवतो तो काही मुळात भांडवलवाला नाही. असा स्विचबोर्ड फायद्याच्या उद्दिष्टाने प्रेरित झालेल्या औद्योगितेला जसा आवश्यक आहे, तसाच समाजवादी औद्योगिक समाजासाठीही आवश्यक आहे.

थोडक्यात, जिथे म्हणून दुसऱ्या लाटेने प्रभाव पाडला, तिथे उत्पादनाचे उद्दिष्ट वापरापेक्षा अदलाबदल हे ठरले. आणि ही अदलाबदल अमलात येण्यासाठी यंत्रणेची आवश्यकता होती. बाजाराची आवश्यकता होती. बाजार उदासीन, अक्रियाशील असून उपयोग नव्हता. अर्थशास्त्रीय इतिहासाचे अभ्यासक कार्ल पोलनयी यांनी असे दाखवून दिले आहे, की पूर्वी जो बाजार समाजांच्या सामाजिक किंवा धार्मिक, सांस्कृतिक उद्दिष्टांपुढे गौण ठरला होता, तोच नंतर औद्योगिक समाजांचे प्रमुख उद्दिष्ट ठरला. पुष्कळ लोक चलन मूल्यमापन प्रणालीत खेचले गेले. व्यापारी मूल्ये केंद्रस्थानी आली. सरकारे समाजवादी असोत, की भांडवलवादी, त्यांचे आद्य उद्दिष्ट ठरले—आर्थिक भरभराट.

कारण बाजार ही एक विस्तार पावणारी, स्वतःला मजबूत ठेवू शकणारी संस्था होती. अगदी सुरुवातीच्या श्रमविभागणीने व्यापाराला प्रोत्साहन दिले होते, त्याप्रमाणे आता, बाजाराचे केवळ अस्तित्वच उलट अधिक श्रमविभागणीला प्रोत्साहन देऊ लागले. आणि त्यायोगे उत्पादकतेत प्रचंड वाढ झाली. स्वतःच विस्तृत पावणारी एक प्रक्रिया कार्यान्वित झालेली होती.

बाजाराचा हा स्फोटक विस्तार जगाच्या ध्यानीमनी नसतील अशा रहाणीमानाच्या उंचीला वेगाने उंचावण्याला साह्यभूत ठरला.

राजकारणात मात्र उत्पादन आणि वापर यांच्या भेदातून निर्माण झालेल्या नवीनच प्रकारच्या संघर्षामुळे दुसऱ्या लाटेतील सरकारे अधिकाधिक व्यथित होत गेलेली आढळली. मार्क्सवाद्यांनी वर्गकलहावर जो भर दिला, त्यामुळे उत्पादकांच्या (कामगार व व्यवस्थापक—दोघांच्याही अधिक पगाराच्या, अधिक फायद्याच्या आणि अधिक नफ्याच्या मागण्यांमध्ये आणि ग्राहकांच्या [यात खुद्द तेच लोकही असतात]) कमी दरांच्या मागण्यांमध्ये उद्‌भवलेला अधिक मोठा, अधिक खोल संघर्ष झाकून गेला. आर्थिक धोरणाचा सी सॉ तरफेच्या या टेकूवरच झुलत राहिला.

अमेरिकन संयुक्त संस्थानात झालेली ग्राहक चळवळीची वाढ, नुकत्याच सरकारने कमी केलेल्या किंमतींच्या वाढीविरुद्ध पोलंडमध्ये झालेले उठाव, ब्रिटनमध्ये अखंड चालू असलेले दरांबाबतचे आणि मिळकतीबाबतचे वादंग, ग्राहकोपयोगी वस्तूंना, की अवजड उद्योगांना प्राधान्यक्रम याविषयी वादाच्या पायाभूत कल्पनांना धरून रशियात चाललेले भीषण झगडे. ह्या सर्व गोष्टी म्हणजे, भांडवलशाही असो की समाजवादी असो. प्रत्येक समाजात उत्पादन आणि वापर यांच्यातल्या फुटीमुळे उत्पन्न झालेल्या मूळ संघर्षाची अंगे आहेत.

अनुक्रमणिका

केवळ राजकारणातच नाही, तर सांस्कृतिक क्षेत्रातही फरक पडला. ह्या फाटाफुटीमुळे इतिहासात पहिल्यांदाच पैशांचाच विचार करणारी, लोभी, व्यापारीभूत आणि हिशोबी संस्कृती निर्माण झाली. दि कम्युनिस्ट मॅनिफेस्टोने नव्या समाजावर केलेल्या आरोपांशी सहमत होण्याला एखादा माणूस मार्क्सवादीच असावा लागतो असे नाही.— "माणसामाणसांत दुवा उरला आहे तो निर्लज्ज स्वार्थीपणाचा, निब्बर 'रोख फेडणुकीचा" व्यक्तिगत संबंध, कौटुंबिक बंध, प्रेम, मैत्री, शेजाऱ्यांचे किंवा सामाजिक बंध या सर्व गोष्टी बाजारु स्वार्थात विरघळून गेल्या आहेत; या गोष्टी बाजारू स्वार्थाने भ्रष्ट केल्या आहेत.

मार्क्सने माणसांच्या ऋणानुबंधात निर्माण झालेला हा अमानुषपणा अचूक ओळखला. पण त्याला त्याने भांडवलशाहीच्या माथी मारले हे मात्र चूक होते. अर्थात त्याने हे जेव्हा लिहिले, तेव्हा त्याकाळी त्याला औद्योगिक समाज भांडवलवाल्या स्वरुपातच दिसला असला पाहिजे.

आता, अर्धशतकाहून अधिक काळ समाजवादावर आधारलेल्या औद्योगिक समाजाचा अनुभव घेतल्यानंतर आपल्याला हे समजून चुकले आहे, की वाढत हावरटपणा, व्यापारातील भ्रष्टाचार, आणि माणसामाणसांतील ऋणानुबंधातील घट या गोष्टींचा शुद्ध आर्थिक तत्त्वांवर विचार करता त्या काही केवळ फायदा—संस्थेच्या मक्त्यातील नव्हेत.

पैसा, वस्तु, पदार्थ यांच्यात असलेला व्यापक विचार पहाता त्यांच्यात भांडवलशाही किंवा समाजवाद यांच्यापेक्षा औद्योगिकीकरणाचेच प्रतिबिंब पडलेले आढळून येईल. सर्व समाजांमध्ये बाजाराकडे आलेली मध्यवर्ती भूमिका, जिच्यात उत्पादनाची वापराशी फारकत झालेली आहे, जिच्यात प्रत्येक जण आपल्यात असलेल्या जीवनोपयोगी वस्तूंच्या उत्पादन कौशल्यापेक्षा बाजारावरच अवलंबून आहे, तिचे हे प्रतिबिंब आहे.

राजकीय रचना कोणतीही असो, अशा समाजात केवळ वस्तूच आणल्या, विकल्या किंवा बदलल्या जात नाहीत, तर श्रम, कल्पनाशक्ती, कला आणि फार काय, आत्म्यांचाही व्यापार होत असतो! बेकायदेशीर कमिशन खिशात टाकणारा पाश्चात्य एजंट, साहित्य पसंत केल्याबद्दल लेखकाकडूनच उलट काही स्वीकारणारा रशियन संपादक, किंवा अगोदरच कामाचा मोबदला असूनही व्होडकाच्या बाटलीची (जादा) मागणी करणारा प्लंबर हे सगळे एकाच माळेचे मणी. केवळ पैशांसाठी लिहिणाऱ्या फ्रेंच किंवा अमेरिकन किंवा ब्रिटिश कलाकरांहून, पोलीश, झेक, किंवा रशियन कादंबरीकार, चित्रकार किंवा नाटककार वेगळे नाहीत. कारण तेही बोनस, किंवा नव्या गाडीच्या प्राप्तीसाठी प्राधान्य, किंवा इतर अप्राप्य गोष्टी अशा जादा आर्थिक लाभासाठी आपली कला विकत असतात.

उत्पादन आणि वापर यांच्यातील विसंवादात, फारकतीतच असा भ्रष्टाचार अनुस्यूत असतो. उत्पादित माल उत्पादकापासून ग्राहकांपर्यंत पोचण्यासाठी बाजाराची आवश्यकता निर्माण झाली, यातच मागे आपण पाहिलेल्या स्विचबोर्डची आणि तो चालविणाऱ्याची म्हणजेच बेसुमार अधिकार धारण करणाऱ्या बाजाराचे संचलन करणाऱ्यांची विशिष्ट जागाही अवश्य निर्माण होणे गृहितच होते.

उत्पादन आणि वापर यांच्यातली फारकत हे दुसऱ्या लाटेचे व्यवच्छेदक लक्षण झाले. त्याने आपल्या मानसिक जीवनावर, आपल्या व्यक्तिमत्वविषयक कल्पनांवर देखील खूप परिणाम केला. वागणूक म्हणजे 'व्यवहारां'चा एक संच झाला. एखादा समाज मैत्री, नाती किंवा जमातीच्या, सरंजामी व

अनुक्रमणिका

निष्ठवर उभारला जाण्याऐवजी, दुसऱ्या लाटेच्या 'राज्या'त प्रत्यक्ष किंवा सूचित अशा करारबद्ध बंधनांवर आधारलेल्या संस्कृतीचा उदय झाला. आजचे पतिपत्नी देखील वैवाहिक कराराची गोष्ट करतात.

उत्पादक आणि ग्राहक यांच्या भूमिकांतील विसंवादामुळे दुहेरी व्यक्तिमत्व जन्माला आले. ज्या व्यक्तीला (एक उत्पादक म्हणून) कुटुंब, शाळा, आणि वरिष्ठ यांनी संतोषाकडे पाठ फिरवायला, शिस्तप्रिय व्हायला, संयमी, नियंत्रक, आज्ञाधारक, संघातील एक घटक व्हायला शिकवले, त्याच व्यक्तीला त्याच वेळी (एक ग्राहक म्हणून) ताबडतोब संतुष्ट व्हायला, हिशोबी असण्याऐवजी तृप्त व्हायला, शिस्तीचा त्याग करायला, स्वतःच्या वैयक्तिक सुखाच्या मागे लागायला म्हणजेच थोडक्यात असे की, अगदी वेगळी व्यक्ती बनायला शिकविण्यात आले! विशेषतः पाश्चात्य राष्ट्रात ग्राहकावर जाहिरातीचा जोरदार भडिमार करत राहून त्याला उसने घ्यायला, एकदम मनाने उचल घेऊन खरेदी करायला 'आता उड्डाण करा, पैसे नंतर द्या' अशा वृत्तीत पडायला, भाग पाडले गेले; आणि वर अशी मखलाशी करून दाखवण्यात आली, की असे करण्यात तुमची राष्ट्रभक्तीच दिसून येते. कारण यायोगे तुम्ही राष्ट्राची अर्थव्यवस्था (वेगाने) चालू ठेवता व राष्ट्राचे कल्याण करता.

## लैंगिक फाटाफूट

शेवटी, दुसरी लाट—समाजांमध्ये उत्पादक आणि ग्राहक यांच्यात ज्या प्रचंड पाचरीने फूट पाडली, त्याच पाचरीने आणखीही सामाजिक फाटाफूट घडवून आणली. तिच्यामुळे कौटुबिक जीवनावर, तसाच लैंगिक भूमिकांवर आणि माणसाच्या 'अंतर्गत जीवना'वरही फार मोठा परिणाम झाला.

औद्योगिक समाजात रुढ असलेल्या लैंगिक विषयाबाबतच्या अनेक ठाम समजांपैकी एक म्हणजे संबंधात पुरुष हा 'वस्तुनिष्ठ' असतो, तर स्त्री ही 'आत्मनिष्ठ' असते. ह्याच्यात जर काही तथ्थांश शोधायचा असेल, तर तो कदाचित् काही पक्क्या जीवशास्त्रीय सत्यांत आढळणार नाही, तर या अदृश्य पाचरीने केलेल्या मनोवैज्ञानिक परिणामात आढळेल.

पहिल्या लाटेखालील समाजात बहुतेक काम शेतात किंवा घरात केले जात असे. संपूर्ण कुटुंब एकत्रितपणे, एखाद्या आर्थिक गटाप्रमाणे श्रम करीत असे आणि बहुतेक उत्पन्न गावातच वापरले जात असे, किंवा जमीनदाराकडे त्यातील काही भाग धाडला जात असे. कौटुंबिक जीवन आणि 'कार्यान्वित' जीवन (Work—life) एकमेकात गुंफले गेले होते; जणू एकमेकांत विरघळून गेले होते. प्रत्येक खेडे बहुतांशी स्वयंपूर्ण असल्यामुळे दुसऱ्या खेड्यात काय घडते आहे; या गोष्टीवर ते कधीच अवलंबून नसे. एका उत्पादक गटात बहुतेक कामगार कितीतरी प्रकारची कामे हंगामानुसार किंवा कोणाचे आजारपण उद्भवल्यास किंवा आवडीनेही, करीत असत. औद्योगिक क्रांतीपूर्वी कामाची विभागणी अगदी प्राचीन स्वरुपाची होती. त्यामुळे पहिल्या लाटेच्या शेतीप्रधान समाजातील काम एकमेकांवर अवलंबून रहाण्याच्या बाबत खालच्या पातळीवरचे असे.

ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि इतर देशांमध्ये आलेल्या प्रचंड दुसऱ्या लाटेने काम, शेत व घर या ठिकाणांतून उचलून कारखान्यात नेले. आणि परस्परावलंबित्व खूपच वाढवून ठेवले. आता कामासाठी सामूहिक प्रयत्न, कामाची विभागणी, मेळ, अनेक निरनिराळ्या कौशल्यांचे एकत्रीकरण या गोष्टींची गरज निर्माण झाली. दूरदूरच्या ठिकाणांहून आलेल्या, एकमेकांना ज्यांनी पूर्वी कधी पाहिलेही नसेल, अशा

अनुक्रमणिका

हजारो लोकांच्या काळजीपूर्वक आखलेल्या सहवर्तणुकीवर त्याचे यश अवलंबून राहू लागले. एखाद्या विशिष्ट परिस्थितीमुळे एखादी मोठी पोलाद गिरणी किंवा काच कारखाना आवश्यक तेवढ्या मालाचा पुरवठा ऑटो प्लँटला करु शकला नाही, तर त्याचे दूरगामी परिणाम त्या संपूर्ण उद्योगावर आणि त्या भागाच्या अर्थकारणावर होऊ लागले.

परस्परावलंबित्वाच्या खालच्या व वरच्या पातळ्यात झालेल्या टक्करीतून भूमिका, जबाबदाऱ्या आणि मिळणारा मोबदला यांच्या संदर्भात तीव्र संघर्ष निर्माण झाला. उदाहरण द्यावयाचे झाल्यास, सुरुवातीच्या काळातील कारखानदारांच्या अशा तक्रारी होत्या, की त्यांचे कामगार कारखान्याच्या कार्यक्षमतेची पर्वाच करत नाहीत, जेव्हा त्यांची अतिशय गरज असते, तेव्हा ते मासे मारायला जातात, अश्वक्रीडेत गुंग होतात, किंवा दारु पिऊन येतात. खरे पहाता, हे सुरुवातीच्या काळातले औद्योगिक कामगार ग्रामीण विभागातील परस्परावलंबित्वाच्या खालच्या पातळीची सवय असलेले होते, त्यांना संकीर्ण उत्पादन प्रक्रियेत आपली भूमिका काय आहे, आणि आपल्या बेजबाबदार वृत्तीमुळे या प्रक्रियेत अपयश, खंड, किंवा गैरव्यवस्था कशी निर्माण होते या विषयीचे ज्ञान अगदी कमी होते, किंवा अजिबात नव्हते. त्यांच्यापैकी बहुतेकांना अगदीच केविलवाणे वेतन मिळत असल्याने त्यांना याबाबत काही काळजी किंवा विचार करण्याचे कारण नव्हते.

कामाच्या या दोन पध्दतींमधल्या झगड्यात कामाच्या नव्या पध्दतीचा जय होत गेला. अधिकाधिक काम व उत्पादन कारखाने व कचेऱ्या यांच्याकडे सोपवण्यात आले. आणि ग्रामीण भागातील लोकसंख्या कमी कमी होत गेली. लाखो कामगार उच्च परस्परावलंबी कामाच्या जाळ्याचे भाग बनून गेले. दुसऱ्या लाटेतील कामाने पहिल्या लाटेशी निगडित कामाच्या मागासलेल्या पध्दतीवर मात केली.

मात्र स्वावलंबित्वावर परस्परावलंबनाने मिळविलेला हा विजय तसा कधीच पूर्णत्वाला गेला नाही. एका ठिकाणी ही कामाची जुनी पध्दत हट्टाने जतन करण्यात आली. ते ठिकाण म्हणजे घर.

प्रत्येक घर म्हणजे जीवशास्त्रीय पुनरुत्पादन, म्हणजेच मुले जन्माला घालून ती वाढविणे आणि सांस्कृतिक प्रसारण या कामात मग्न असलेला विकेंद्रित कामगार गट होता. परंतु जर एखादे कुटुंब मुलाला जन्म देऊ शकले नाही, किंवा जन्म दिलेल्या मुलांना चांगल्या तऱ्हेने वाढवू शकले नाही, कामगार म्हणून त्या मुलांना तयार करु शकले नाही, तरी त्या अपयशाचा परिणाम शेजारच्या कुटुंबाच्या या बाबतीतल्या यशावर होत होता असे नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे घर हे खालच्या पातळीवरील परस्परावलंबी कार्यक्षेत्रच राहिले.

नेहमीप्रमाणेच गृहिणी आर्थिक कामांबाबतचीही आपली महत्त्वपूर्ण कामे करत राहिली. ती 'निर्मिती' करत राहिली. परंतु तिचे 'उत्पादन' विभाग– 'अ' गटासाठीच होते. तिच्या स्वतःच्या कुटुंबाच्या उपयोगासाठी होते. बाजारासाठी नव्हते.

नवरा, मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष आर्थिक उत्पादनाच्या कामासाठी दूर जात होता. बायको मागे, घरातच राहून अप्रत्यक्ष आर्थिक काम करत राहिली. ऐतिहासिक दृष्ट्या अधिक प्रगत ठरलेल्या कार्यपध्दतीची जबाबदारी पुरुषाने स्विकारली. स्त्री पूर्वीच्याच जुन्या, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या

अनुक्रमणिका

कार्यपद्धती सांभाळत मागे राहिली. तो जणू काही वेगाने भविष्याकडे निघाला होता, आणि ती भूतकाळातच राहिली.

ह्या विभागणीमुळे व्यक्तिमत्वात आणि अंतर्गत जीवनात फाटाफूट निर्माण झाली. कारखाना किंवा कचेरी यांच्या सार्वजनिक किंवा सामुदायिक स्वरूपाने परस्पर मेळ व ऐक्य यांची गरज निर्माण केली. तटस्थ विश्लेषणावर आणि वस्तुनिष्ठ नात्यांवर भर देण्यात येऊ लागला. लहान असल्यापासूनच मुलांची तयारी दुकान वगैरे बाहेरच्या परस्परावलंबी जगात वावरण्याच्या दृष्टीने करण्यात येऊ लागली. पुरुष म्हणून त्यांना वस्तुनिष्ठ होण्याचे प्रोत्साहन देण्यात येऊ लागले, तर जन्मापासूनच मुलींना प्रजोत्पादनाच्या, बालसंगोपनाच्या, घरकामाच्या दृष्टीने तयार करण्यात येऊन त्यांना काही प्रमाणात समाजापासून दूर ठेवण्यात येऊ लागले, त्यांना आत्मलक्षी होण्यास शिकवण्यात येऊ लागले. आणि वस्तुनिष्ठतेसह येणाऱ्या बुद्धिनिष्ठ विश्लेषणात्मक विचार करण्यास त्या असमर्थ आहेत असे समजण्यात येऊ लागले.

ज्या स्त्रियांनी या तुलनात्मक एकाकीपणाला न जुमानता, घरातच गुंतून न पडता स्वतंत्र उत्पादनात लक्ष घातले, त्यांना त्यांच्यातील स्त्रीत्व कमी झाले, त्या थंड झाल्या, कठोर झाल्या आणि तटस्थ, वस्तुनिष्ठ झाल्या असा बोल लावला गेला असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही!

त्यातही गैरसमजुतीमुळे पुरुष उत्पादक, म्हणून आणि स्त्री ग्राहक म्हणून ओळखली जाऊ लागली— वस्तुतः पुरुषही ग्राहक होते आणि स्त्रियाही उत्पादक होत्या. यातून लैंगिक मतभेद, लैंगिक विषयाच्या रुढी अधिकाधिक तीव्र होत गेल्या. दुसरी लाट पृथ्वीभर पसरण्याच्या कितीतरी पूर्वीच स्त्रिया दडपून टाकल्या जात होत्या; हे लिंगभेदावर आधारलेले आधुनिक युद्ध कामाच्या दोन पद्धतीतील युद्ध आहे. उत्पादन आणि वापर यांच्यामधील फारकतीतून ते निर्माण झालेले आहे. अशा तऱ्हेची फुटीर अर्थव्यवस्था, लैंगिक फूट अधिकच खोल करीत राहिली.

आपण हे पाहिले, की एकदा एका ठिकाणी ठोकली गेलेली ही अदृश्य पाचर उत्पादकांपासून ग्राहकांना वेगळी करून चुकली. त्यामुळे अनेक बदल घडले. या दोन्हींचा दुवा म्हणून बाजाराची रचना करण्यात आली. नवीन राजकीय व सामाजिक संघर्ष उद्‌भवले. नव्या लिंगविषयक भूमिका विचारात येऊन व्यवहारात आल्या. परंतु या फुटीने आणखी देखील कितीतरी गोष्टी सूचित केल्या. तिचा असाही अर्थ झाला, की सर्व दुसरी लाट—समाजांनी एकाच तऱ्हेने काम करावे— त्यांना त्यांच्या काही मूलभूत गरजा पूर्ण करुन मिळायला हव्यात— मग उत्पादनाचे उद्दिष्ट फायदा हे असो की नसो; उत्पादनाची साधने सार्वजनिक असोत, की खाजगी असोत; बाजार खुला असो, की नियोजनबद्ध असो; अभिव्यक्ती समाजवादी असो, भांडवलशाही, त्यात काही फरक पडणार नव्हता.

वापराऐवजी अदलाबदलीसाठी, देवाण—घेवाणीसाठीच उत्पादन केले जाईपर्यंत त्याला आर्थिक स्विचबोर्ड किंवा मार्केट कडेच जाऊन पोचणे भाग असतो, दुसऱ्या लाटेची काही तत्त्वे अनुसरणे भागच होते.

ही तत्त्वे निश्चित ओळखल्यानंतर सर्व औद्योगिक समाजातील गुप्त चलन शक्ति तत्त्वे उघड झाली. तरी आपल्याला दुसऱ्या लाटेच्या लोकांच्या विशिष्ट विचार सरणीची कल्पना करता येणे शक्य आहे. कारण

अनुक्रमणिका

मूलभूत तत्त्वांच्या जोडीला ही तत्त्वे येऊन मिळाल्यानंतर दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीची वर्तणूक संहिता तयार झाली.

अनुक्रमणिका

# चार । कायदे भंग

प्रत्येक संस्कृतीची एक अदृश्य संहिता असते; अभिप्रेत असलेले कायदे किंवा मानण्यात आलेली तत्त्वे यांचा तो संच असतो. आणि त्या संचाने आखून दिलेल्या आराखड्याप्रमाणे त्या संस्कृतीतील समाजांचे सर्व उद्योग, सर्व कृती करण्यात येत असतात. पृथ्वीवर जेव्हा औद्योगिकीकरणाने आपला पगडा बसवला, तेव्हा त्याचाही विशिष्ट, अदृश्य असा आराखडा हळूहळू स्पष्ट दिसू लागला. या आराखड्यात एकमेकांशी संबंधित असलेल्या अशा सहा तत्त्वांचा समावेश होता. या तत्त्वांनुसार लाखो लोकांच्या आचरणाचा क्रम घडत गेला. उत्पादन आणि वापर यांच्यातल्या फाटाफुटीतून उद्‌भवलेल्या या तत्त्वांचा जीवनाच्या प्रत्येक अंगावर—क्रीडा, लिंग, कार्य, युद्ध अशा विविध विषयांच्या क्षेत्रांवर—परिणाम होत गेला.

आपल्या शाळांतून, उद्योगांतून आणि सरकारात उद्‌भवलेले बहुतेक सर्व तीव्र संघर्ष या सहा तत्त्वांवरच केंद्रित झालेले आहेत. ही सहा तत्त्वे दुसऱ्या लाटेच्या लोकांनी अनुसरली आणि त्यांचा त्यांनी सतत पाठपुरावाही केला. तिसऱ्या लाटेच्या लोकांनी त्यांना आव्हान दिले आणि त्यांच्यावर हल्लाही केला.

## प्रमाणीकरण

आपल्याला सर्वात अधिक परिचित असलेले दुसऱ्या लाटेचे तत्त्व म्हणजे प्रमाणीकरण. हे सर्वांनाच माहीत आहे, की औद्योगिक समाजात अगदी एकसारख्या अशा लाखो गोष्टींचे उत्पादन होत असते. तथापि काही लोकांच्या हे ध्यानात यावयाचे थांबले आहे, की जेव्हा बाजाराचे महत्त्व वाढले तेव्हा आपण कोको कोलाच्या बाटल्या, विजेचे दिवे, स्वयंचलितांचे ट्रॅन्समिशन्स अशा गोष्टींचे प्रमाणीकरण करण्याहून अधिक काही देखील करुन ठेवले आहे. आपण तेच तत्त्व इतरही कितीतरी गोष्टींना लावले. ह्या गोष्टीच्या महत्त्वाचे आकलन पहिल्यांदा झाले, ते थिओडोर व्हेल याला त्याने शतक बदलण्याच्या सुमाराला अमेरिकन टेलिफोन आणि टेलिग्राम कंपनीची प्रचंड बांधणी केली.

इ. स. १८६० च्या सुमाराला रेल्वे पोस्टात क्लार्क म्हणून काम करणाऱ्या व्हेलच्या हे लक्षात आले, की एका ठिकाणाहून निघणारी आणि दुसऱ्या एका विशिष्ट ठिकाणी पोचणारी दोन पत्रे एकाच मार्गाने प्रवास करत नव्हती! पत्रांच्या पिशव्या पुढे मागे प्रवास करीत कधी आठवडे तर कधी महिने काटत केव्हातरी इच्छित स्थळी जाऊन पोचत होत्या. व्हेलने मार्गांच्या प्रमाणीकरणाची कल्पना पुढे मांडून पोस्ट ऑफिसमध्ये एक प्रकारची क्रांतीच केली. त्यामुळे एकाच ठिकाणी जाणारी पत्रे ठराविक मार्गानेच जाऊ लागली. त्याने जेव्हा पुढे अ. टे. टे. कंपनी तयार केली, तेव्हा प्रत्येक अमेरिकन घरात एकसारखा टेलिफोन बसविण्यास सुरुवात केली.

त्याने केवळ टेलिफोन हँडसेटचेच व त्याच्या इतर सर्व घटकांचेच प्रमाणीकरण केले नाही, तर अ. टे. टे. च्या उद्योग निर्मात्यांचे आणि प्रशासकांचेही प्रमाणीकरण केले! व्हेलला हे अचूक उमजले होते, की दुसऱ्या लाटेच्या एकूण परिस्थितीत यश मिळवायचे असेल, तर यच्चयावत् संपूर्ण प्रमाणीकरण अत्यंत आवश्यक आहे!

औद्योगिक समाजाला आकार देणाऱ्या प्रमाणीकरणाचे महत्त्व जाणणाऱ्या अनेक मोठ्या लोकांपैकी व्हेल हा केवळ एक होता. फ्रेड्रिक टेलर हा असाच दुसरा महान पुरुष. त्याचा असा ठाम विश्वास होता, की

अनुक्रमणिका

प्रत्येक कामगाराने करावयाच्या कामाच्या प्रत्येक पायरीचे—टप्प्याचे—प्रमाणीकरण केल्याशिवय काम खऱ्या अर्थाने शास्त्रशुध्द होणारच नाही. या शतकाच्या पहिल्या काही दशकात टेलरने असे दाखवून दिले, की प्रत्येक काम करण्याची एकच, उत्तम, प्रमाणीभूत पध्दत असते; त्यासाठी एकच उत्तम, प्रमाणीभूत साधन वापरण्यात येत असते, आणि काम पूर्ण होण्यासाठी एकच निर्धारित, प्रमाणीभूत कालावधी असतो.

या विशिष्ट तत्त्वप्रणालीने तो जगाचा व्यवस्थापकीय 'गुरु' झाला. पुढे याची फ्रॉईड, मार्क्स आणि फ्रँकलीन यांच्याशी तुलना होऊ लागली. यानंतर भांडवलवाले मालक आपल्या कामगारांच्या उत्पादनशक्तीचा शेवटचाही अंश पकडून घेण्यास उत्सुक राहू लागले. हाच उत्साह साम्यवाद्यांमध्येही भरुन राहिलेला होता. समाजवादी उत्पादनात टेलरच्या पध्दतींचा अंगीकार व्हावा अशी उत्कट इच्छा खुद्द लेनिनने व्यक्त केली होती. प्रथम, मुख्यतः औद्योगिकीकरणाला गती व प्रोत्साहन देणारा, आणि नंतर साम्यवादी असलेला लेनिन प्रमाणीकरणाच्या तत्त्वाचा कळकळीचा अनुयायी होता.

कार्यपध्दती आणि खुद्द कार्यही उक्ते घेणे ही गोष्ट दुसऱ्या लाटेच्या समाजात अधिकाधिक प्रमाणीभूत होत गेली. अयोग्य ठरणाऱ्याला ओळखण्याच्या आणि डच्चू देण्याच्या चाचण्या प्रमाणीभूत झाल्या. त्यांचा विशेषतः नागरी सेवेतून उपयोग करण्यात आला. सर्व उद्योगांमध्ये वेतनांचे, लाभांशाचे, जेवणांच्या वेळांचे, सुट्ट्यांचे आणि गाऱ्हाण्याबाबतच्या कार्यपध्दतींचेही प्रमाणीकरण झाले. युवकांना नोकरीच्या बाजारास योग्य म्हणून तयार करण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमाचेही शिक्षणतज्ञांनी प्रमाणीकरण केले. शाळांच्या प्रती ठरविणे, शाळांतील प्रवेश कार्यप्रणाली, आणि अधिकृत मान्यतेविषयीच्या नियमांचेही प्रमाणीकरण झाले.

इकडे वृत्तमाध्यमे स्वस्थ बसली नव्हती. डोळ्यांसमोर हुबेहूब चित्र उभे करण्याची किमयाच त्यांनी प्रमाणीभूत केली. त्यामुळे लाखो लोक त्याच जाहिराती, त्याच बातम्या, त्याच लघुकथा (त्याच प्रमाणीभूत आस्थेने) वाचू लागले. छोट्या गटांच्या वापरातील भाषा केंद्र सरकारांकडून दडपल्या जाऊ लागल्या, जनसामान्यांवर या गोष्टींचा परिणाम घडू लागला; आणि त्याचा परिणाम म्हणून स्थानिक किंवा प्रादेशिक अशा काही बोली, कधीकधी तर वेल्श किंवा अल्सेशन सारख्या संपूर्ण भाषा देखील जवळ जवळ लुप्त झाल्या. 'प्रमाणीभूत' अमेरिकन इंग्लिश, फ्रेंच, रशियन भाषांनी 'अप्रमाणीभूत' भाषांची जागा घेतली. प्रमाणीकरणाचे तत्त्व जीवनाच्या अंगोपांगात भिनून गेले.

ह्यापेक्षा वरच्या पातळीवर पहाताना दिसून येते, की औद्योगिक संस्कृतीला वजने आणि मापे यांच्या प्रमाणीकरणाची अतिशय निकड वाटली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या पहिल्या काही पावलातील एक पाऊल याच दिशेने उचलले गेले. हा काही केवळ योगायोग नव्हता. दुसऱ्या लाटेत जगाच्या बहुतेक भागात प्रमाणीभूत वजने व मापे वापरली जाऊ लागली.

सामूहिक उत्पादनासाठी प्रमाणीभूत यंत्रे, उत्पादने, प्रक्रिया यांची निकड होती. सतत विस्तार पावत जाणाऱ्या बाजाराला पैशांचे, फार काय किंमतीचेही समांतरित प्रमाणीकरण करण्याची आवश्यकता वाटली. इतिहास पहाताना आपल्याला असे आढळून येईल की, व्यक्तींनी खाजगी अखत्यारीत, राजांनी, बॅकांनी निर्माण केलेली चलने वापरात आणली. परंतु औद्योगिकीकरण करणाऱ्या देशांनी या प्रथा बंद पाडल्या. बिनसरकारी चलनांचे उच्चाटन करून चलनांमध्ये प्रमाणीभूतता आणली.

अनुक्रमणिका

एकोणविसाव्या शतकापर्यंत औद्योगिक देशातील ग्राहक व विक्रेते कैरो बाजाराप्रमाणे पूर्वापार चालत आलेली घासाघीसयुक्त किंमत करत होते. परंतु इ. स. १८२५ साली उत्तर आयर्लंडमधून आलेला एक व्यापारी ए. टी. स्टुअर्ट याने न्यूयॉर्कमध्ये सुक्या फळांचे दुकान उघडून. तिथे असलेल्या प्रत्येक वस्तूची एक निश्चित पक्की किंमत सांगून, ग्राहकांना आणि त्याचप्रमाणे प्रतिस्पर्धी व्यापाऱ्यांना धक्काच दिला. पुढे याच धोरणामुळे, किंमतीच्या प्रमाणीकरणामुळे स्टुअर्ट हा व्यापाऱ्यातला जणु राजपुत्र ठरला. त्याने सामुदायिक वितरणाच्या प्रगतीतील एक मोठा अडथळा दूर केला.

इतर कोणतेही मतभेद असोत, पुढारलेले, दुसऱ्या लाटेतले विचारवंतांचे या एका गोष्टीवर एकमत झाले, की प्रमाणीकरण अधिक कार्यक्षम आहे. दुसऱ्या लाटेने अगदी निष्ठुरपणाने हे प्रमाणीकरणाचे तत्त्व सर्वत्र लागू केले. त्यामुळे अनेक पातळ्यांवरील मतभेद कमी झाले; व समतलता आली.

## विशेषीकरण

सर्व दुसरी लाट—समाजामध्ये आढळून येणारे महत्त्वाचे दुसरे तत्त्व म्हणजे विशिष्ट व्यासंग. दुसऱ्या लाटेने भाषा, निवांतपणाचे सुख, आणि एकूण जीवनपद्धतीतले वैविध्य कमी करत आणले, आणि तिला कामाच्या क्षेत्रात मात्र वैविध्याची आवश्यकता वाटू लागली. कामाच्या विभागणीचे तत्त्व वेगाने वाढवत असताना तिने, सर्व कामे थोडी का होईना जाणून वेळ निभावून नेणाऱ्या शेतकऱ्याच्या जागी अतिशय मर्यादित क्षेत्रातच प्रवीण असणारा ओठ मिटलेला कामगार आणला. हा कामगार फक्त त्याच्या एकाच कामात प्रवीण होता, आणि ते तो पुनः पुन्हा करीत राहिला.

इ. स. १७२० मधल्या एका अहवालात—हा अहवाल 'दि ॲडव्हान्टेजेस ऑफ दि ईस्ट इंडिया ट्रेडवरील आहे. असे म्हटले आहे, की कामातील, विशेषीकरण, कमी वेळात व कमी श्रमात कामे' करून देते. ॲडम स्मिथने इ. स. १७७६ मध्ये म्हटले, की कामाची विभागणी होत असल्यामुळेच कामगारांच्या उत्पादकशक्तीत मोठी सुधारणा घडून आली.

स्मिथने पिनांच्या उत्पादनाचा दाखला दिला आहे. जुन्या काळच्या पद्धतीनुसार एकच एक कामगार सर्व कामे स्वतःच करीत राहून दिवसाला केवळ मूठभर पिनाच तयार करू शकत होता फार फार तर वीस कधी तर एक देखील नाही. उलट, स्मिथने जेव्हा पिना तयार करण्याचा कारखाना पाहिला तेव्हा त्याला आढळून आले, की पिन तयार करण्यासाठी दहा विशेषज्ञ कामगार काम करीत होते. प्रत्येकजण कामातील एक किंवा दोनच पायऱ्या पूर्ण करीत होता. परंतु ह्या सर्वांनी केलेल्या त्या कामाचा परिणाम असा, की ते दररोज ४८,००० पिना तयार करु शकत होते. म्हणजेच प्रत्येक कामगाराने ४,८०० पिना एका दिवसात केल्या असाच अर्थ झाला म्हणावे लागत नाही का?

एकोणविसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत अधिकाधिक काम कारखान्याकडे गेले, आणि अधिकाधिक मोठ्या प्रमाणात पिनेच्या कथेचीच सगळीकडे पारायणे होऊ लागली. उत्पादन बेसुमार वाढले. त्याचप्रमाणे विशिष्ट कामात पारंगत असलेली माणसे तयार करण्यासाठीचा सर्व प्रकारचा व्ययही वाढला. टीकाकारांनी असे म्हटले, की अशा तऱ्हेची विशिष्टता आल्यामुळे कामगारातील मानवत्व दिवसेदिवस कमी होऊन तो देखील यंत्राचाच एखादा भाग बनून यंत्रवत् काम करु लागला.

अनुक्रमणिका

इ. स. १९०८ मध्ये जेव्हा हेन्री फोर्डने मॉडेल T चे उत्पादन करायला सुरुवात केली, तेव्हा मॉडेल T तयार होण्यासाठी केवळ १८ प्रक्रिया नव्हेत, तर निरनिराळ्या ७,८८२ प्रक्रिया आवश्यक ठरल्या. आपल्या आत्मचरित्रात फोर्डने म्हटले आहे की ही ७,८८२ विशिष्ट कामे करण्यासाठी ९४९ "समर्थ, तगडे आणि अगदी तंदुरुस्त" अशा माणसांची आवश्यकता होती. त्यातील ३,३३८ कामे करण्यासाठी आवश्यक असणारी माणसे "सामान्य" शारीरिक ताकदीची असत. उरलेली कामे स्त्रिया किंवा मोठी मुले करु शकत होती. फोर्ड थंडपणे पुढे म्हणतो, "६७० कामे पाय नसलेले लोक करू शकतील अशी, तर २,६३७ कामे एकच पाय असणारे करु शकतील अशी, दोन कामे दोन्ही हात नसलेले करु शकतील अशी, ७१५ कामांना एका हाताची आवश्यकता होती, तर १० कामे आंधळी माणसे करु शकतील अशी होती." थोडक्यात, विशिष्ट कामाला संपूर्ण मानवाची आवश्यकता नव्हती, तर त्याच्या काही भागांची आवश्यकता होती. अतिविशिष्टीकरणाचा याहून अधिक स्पष्ट पुरावा. त्याच्या क्रूरपणाची साक्ष देण्यासाठी आपल्याला सापडणे कठीण आहे.

टीकाकारांनी ह्या पध्दतीचे श्रेय भांडवलशाहीला दिले परंतु ही पध्दत समाजवादाचेही अंगभूत वैशिष्ट्य बनून गेली होती. कारण दुसऱ्या लाटेच्या सर्व समाजात रूढ झालेल्या या अतिवैशिष्टीकरणाचे मूळ उत्पादन आणि वापर यांच्या फारकतीत आहे. रशिया, पोलंड, पूर्व जर्मनी, हंगेरी या देशांतील कारखाने विशिष्टव्यासंगी कामगारांखेरीज चालूच शकणार नाहीत. जपानमध्ये तीच परिस्थिती. अमेरिकेतही तीच. इथे इ. स. १९७७ मध्ये कामगार खात्याने २०,००० (अति) विशिष्ट सेवांची यादी प्रसिद्ध केली होती.

भांडवलशाही व समाजवादी दोन्ही प्रकारच्या राज्यात, ह्या वैशिष्टीकरणासह व्यावसायिकता, जीवनात उतरली. संधी मिळताच हे 'वैशेषिक' गट आपल्या खाजगी ज्ञानाची मक्तेदारी करु लागले. त्यांनी कटाक्षाने नवागतांना आपल्या क्षेत्राबाहेरच ठेवले. दुसरी लाट प्रगत होत असताना ज्ञानी व ग्राहक यांच्यात बाजाराने दुही निर्माण केली. दुसऱ्या लाटेच्या राज्यात आरोग्य ही गोष्ट डॉक्टरांनी पुरवठा करण्याची झाली. 'आरोग्य पुरवठ्या'चीही नोकरशाही झाली. पेशंट बुद्धिमत्तेने स्वतःची काळजी घेण्याचे केव्हाच विसरुन गेला. शिक्षण हे शिक्षकाने केलेले उत्पादन आणि विद्यार्थी हे ग्राहक झाले.

दुसऱ्या लाटेच्या समाजात आपण राजकीय चळवळींचाही धंदा म्हणूनच विचार केला. लेनिनने असे प्रतिपादन केले की सर्वसामान्य लोक धंदेवाईक राजकारण्यांची मदत मिळाल्याशिवाय क्रांतीचा उठाव करु शकत नाहीत. तो म्हणाला की, 'क्रांतिकारकांच्या संघटनां'ची आवश्यकता आहे. आणि या संघटनेत 'क्रांतिकारकाचा धंदा' करणाऱ्या लोकांनाच सदस्यत्व मिळू शकते.

जमाती, भांडवलदार, कार्यकारी, शिक्षणतज्ञ, पुरोहित, राजकारणी या सर्वांची मनोभूमिका दुसऱ्या लाटेने एकच ठेवली. आणि अशा अतिशय कामाच्या विभागणीच्या दिशेने कूच कायम ठेवली. क्रिस्टल पॅलेस प्रदर्शनात प्रिन्स अल्बर्ट याने म्हटले होते की विशेषीकरण ही 'संस्कृतीची चलन्शक्ती आहे.' हे थोर प्रमाणीकरण आणि थोर विशिष्टतावादी हातात हात घालून पुढे चालले होते.

एककालिकता : मेळ

उत्पादन आणि वापर यांच्यातल्या वाढत्या फुटीने दुसऱ्या लाटेच्या लोकांना वागण्याच्या त्यांच्या जुन्या पद्धतीत बदल घडवून आणणे भाग पाडले. बाजारावर अवलंबून असलेल्या पद्धतीत—मग तो बाजार

सुनियोजित असो, की खुला—काळाचे मूल्य पैशाच्या बरोबरीचे आहे. बहुमोल यंत्रे स्वस्थ राहू देणे परवडत नाही. ती आपल्या स्वतःच्या तालावर चाललेली असतात. यामुळे औद्योगिक संस्कृतीच्या तिसऱ्या तत्त्वाचा जन्म झाला : एककालिकता!

अगदी सुरुवातीच्या समाजांनाही, वेळेत व्हावे म्हणून कामाचे काळजीपूर्वक नियोजन करावे लागत होते. आपल्या 'शिकारी'ला घेरण्यासाठी योध्यांना नेहमी मेळ राखून काम करावे लागे. जाळी फेकताना आणि खेचताना कोळ्यांना आपले प्रयत्न एकमेकांना अनुकूल रहातील असे करावे लागत. कित्येक वर्षांपूर्वी जॉर्ज थॉम्सन याने दाखवून दिले की, कष्टप्रद कामे करताना म्हणावयाची गाणी, कामे होण्याच्या दृष्टीने आवश्यकच होती. अशा गाण्यांमध्ये त्या कामाला आवश्यक असणाऱ्या अनेक गोष्टींचे प्रतिबिंब पडलेले असते. वल्हे वल्हवणाऱ्या लोकांची ठराविक कालमर्यादा—मात्रा—साध्या दोन अक्षरी ध्वनीने अंकित केली आहे— ओ.. ओप! यातील दुसरे अक्षर मेहनतीची सीमा दाखवून देते, तर पहिले अक्षर तयारीची वेळ दाखवते. अधिक काळ होत असल्याने हा उद्‌गार अधिक लांबतो.

दुसऱ्या लाटेने यंत्रे आणून कष्टकऱ्यांची गाणी बंद पाडेपर्यंत काळमेळाचा असला बहुतेक प्रयत्न अंगभूत किंवा नैसर्गिक होता. ती निरनिराळ्या हंगामांच्या गतीनुसार व जैविक प्रक्रियांनुसार होता. पृथ्वीच्या भ्रमणानुसार होता. हृदयाच्या ठोक्यांनुसार होता. याउलट दुसऱ्या लाटेचे समाज यंत्राच्या ठोक्यानुसार हलत राहिले.

कारखान्यांचे वाढते उत्पादन, अतिशय महागडी यंत्रे, एकमेकांवर अतिशय अवलंबून असणारे कामगार यांमुळे अतिशुद्ध ताळमेळाची आवश्यकता निर्माण झाली. जर कामगारांचा एखादा गट आपले काम वेळेवर पूर्ण करु शकला नाही, तर त्यांच्या पुढच्या प्रक्रियेत विलंब होत जाणे अपरिहार्य होते. अशा तऱ्हेने वक्तशीरपणा, जो आधीच्या शेतकरी जमातींमध्ये कधीच फारसा महत्त्वाचा नव्हता, एक सामाजिक गरजेचा भाग झाला आणि लहान—मोठ्या घड्याळांची पैदास होऊ लागली. इंग्लंडमध्ये इ. स. १७९० च्या सुमारास घड्याळे ही अगदी सर्वपरिचित वस्तु होऊन गेली होती. ब्रिटिश इतिहासतज्ञ ई. पी. थॉम्प्सन याने म्हटले आहे, की औद्योगिक क्रांतीने कामाची जास्त एककालिकता व्हावी, अशी निकड निर्माण, अगदी त्याच वेळी ही गोष्ट घडली.

औद्योगिक संस्कृतीच्या मुलांना अगदी लहान वयातच वेळ ओळखायला शिकवण्यात येते. शाळेची घंटा वाजण्याच्या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी हजर असावे अशी अट घालून या संस्कृतीने वेळेवर, भोंग्याबरोबर कारखान्यात किंवा कचेरीत हजर रहाणाऱ्या कर्मचाऱ्याच्या वक्तशीर वर्तणुकीचा पायाच जणू घातला. कामे कालबद्ध झाली. कामातील काही क्रम तर सेकंदाच्या कितव्या तरी हिश्श्यात मोजण्यात येऊ लागले. 'नऊ ते पाच' ही लाखो कामगारांची ऐहिक चौकट बनून गेली.

केवळ जीवनातील असा कामाचा भागच मेळबद्ध झालेला नव्हता. दुसऱ्या लाटेच्या समाजाचा, ज्याचा फायद्याशी किंवा राजकीय विचारांशी संबंध नाही, अशा सामाजिक जीवनालाही घड्याळाच्या तालावर नाचत रहावे लागले. यंत्राच्या आवश्यकतेशी जुळवून घ्यावे लागले. काही तास विश्रांतीसाठी राखून ठेवावे लागले. ठराविक लांबीच्या मोठ्या सुट्ट्या किंवा चहाच्या कॉफीच्या सुट्ट्या, कामाच्या वेळेच्या आखणीत विखुरलेल्या राहू लागल्या.

अनुक्रमणिका

मुलांच्या शालेय वर्षाची सुरुवात एका ठराविक वेळी होऊ लागली. शेवटही ठराविक वेळी होऊ लागला. इस्पितळात पेशंटना एकावेळी न्याहरीसाठी उठवले जाऊ लागले. वहातूक प्रसारण, प्रत्येकच उद्योग त्याच्या स्वतःचे अत्युच्च कामाचे तास किंवा हंगाम त्याच्या पुरवठा करण्याच्या आणि वितरणाच्याही अत्युच्य काळाशी मेळ राखून ठेवू लागला. मेळ राखणारे खास तज्ञ निर्माण झाले. त्यांनी वेळ–मेळ हाच खास अभ्यासाचा विषय मानला.

या उलट काही लोकांनी या नवीन कालबद्ध पद्धतीला विरोध केला. इथे मग लैंगिक मतभेद पुनः उद्‌भवले. दुसऱ्या लाटेतील नवरे घड्याळाचे जणू गुलाम झालेले होते. कारण त्यांच्या घराबाहेरील कामामुळे त्यांचा आयुष्यक्रम वेळेशी पुरता जखडलेला असा राहिला. या नवऱ्यांची नेहमीची तक्रार अशी, की त्यांच्या बायका त्यांना वाट पहात तिष्ठत ठेवतात; त्यांना वेळेची किंमतच नाही. त्यांना कपडे करून तयार व्हायला वेळ लागतो. त्यामुळे त्या ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी पोचू शकत नाहीत, उशीरा पोचतात. सुरुवातीला, इतरांवर अवलंबून नसलेल्या, कामात गुंतलेल्या स्त्रिया कमी यांत्रिक गतीने काम करत असत... या अशा कारणांनीच नागरी लोक ग्रामीण लोकांकडे अधिक्षेपाने पाहू लागले; ते मंतगति आणि अविश्वसनीय, बेभरंवशाचे आहेत असे मत निर्माण झाले. 'ते कधी वेळेवर येणार नाहीत. ते कधी नेमलेल्या वेळी दिलेले कार्य सांभाळू शकतील असे वाटत नाही.' असे शेरे बसू लागले. अशा तक्रारींतून दुसऱ्या लाटेतील परावलंबित काम आणि पहिल्या लाटेतील शेते व घरे यांतील 'स्वतंत्र' काम यांच्यातील फरक ठळक व वाढता होत गेला.

दुसरी लाट प्रभावी झाल्यानंतर जीवनातील अतिशय जिव्हाळ्याचे क्रमही औद्योगिक गतीशी निगडित होऊन गेले. अमेरिका, रशिया, सिंगापूर, स्वीडन, फ्रान्स, डेन्मार्क, जर्मनी, जपान अशा सर्व ठिकाणची कुटुंबे एकाच वेळी जागी होऊ लागली. एकाच वेळी खाऊ लागली. भरपाई घेऊ लागली, एकाच वेळी कामे करु लागली, घरी परतू लागली, निजू लागली, संभोगही करु लागली. इतका संवादीपणा संपूर्ण संस्कृतीत आला. प्रमाणीकरणाला, विशिष्टीकरणाला आणखी जोड मिळाली ती एककालिकतेची.

एकाग्रता

बाजारपेठेच्या उदयाबरोबर निर्माण झालेले दुसऱ्या लाटेतील आणखी एक तत्त्व म्हणजे एकाग्रता.

पहिल्या लाटेचे समाज अत्यंत तुटपुंज्या उपलब्ध ऊर्जेवर अवलंबून जगत होते. दुसऱ्या लाटेचे समाज जवळजवळ सर्वांशाने अतिकेंद्रीभूत अशा तऱ्हेने खाणींतून मिळणाऱ्या इंधनांवर अवलंबून राहू लागले.

परंतु दुसऱ्या लाटेने ऊर्जेपेक्षा इतर गोष्टींबाबतही केंद्रीकरण घडवले. तिने ग्रामीण भाग मोकळे करीत लोकसंख्या प्रचंड शहरी केंद्रांकडे गोळा केली. तिने कामाच्या बाबतीतही असेच धोरण ठेवले. पहिल्या लाटेचे समाज, घरात, खेड्यात, समाजात काम करीत असत; तर दुसऱ्या लाटेतील पुष्कळसे काम कारखान्यातच केले जाऊ लागले. तेथे हजारो लोक एकत्र येऊन एका छताखाली काम करू लागले.

अनुक्रमणिका

ऊर्जा किंवा काम याखेरीज आणखीही काही क्षेत्रात दुसऱ्या लाटेने केंद्रीकरण आणले. यापूर्वीच्या समाजात "गरीब घरातच ठेवले जात होते; किंवा नातेवाईकांकडे सोपवले जात होते. गुन्हेगारांना दंड होई, किंवा फटके मारले जात, किंवा ते हद्दपार केले जात. वेडे घरातच ठेवले जात, किंवा ते जर गरीब असतील तर जमाती त्यांना पोसत."— असे स्टॅन कोहेन यांनी दाखवून दिले आहे. ह्या सर्व प्रकारचे लोक समाजातच विखुरलेले असत.

औद्योगिक लाटेने ह्या परिस्थितीतही क्रांती घडवून आणली. एकोणविसाव्या शतकाच्या सुरूवातीला गुन्हेगारांना पकडून एकत्र, तुरुंगात आणण्यात आले. मानसिक रूग्णांना शोधून काढून वेड्यांच्या रूग्णालयात एकत्र आणण्यात आले. मुलांना पकडून शाळांमध्ये घालण्यात आले. याच प्रकाराने कामगारांना कारखान्यात 'टाकून देण्या'त आले.

भांडवलांच्या ओघाचेही एकत्रीकरण दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीत झाले. मोठ्या कॉर्पोरेशनचा जन्म झाला. खेरीज ट्रस्ट किंवा मोनापोलींचाही जन्म झाला. विसाव्या शतकात, सहाव्या दशकाच्या मध्यावर तीन मोठ्या ऑटो कंपन्या अमेरिकन मोटार गाड्यांपैकी ९४ टक्के गाड्यांचे उत्पादन करत होत्या. जर्मनीत चार कंपन्यांनी ९१ टक्के उत्पादन उचलले होते. फ्रान्समध्ये तर १०० टक्के उत्पादन Renault, Citro'e'n Simca व Peugeot या कंपन्याच करत होत्या.

त्याचप्रमाणे ॲल्युमिनियम, बीअर, सिगारेट, आणि न्याहरीचे अन्न या प्रत्येक क्षेत्रात, चार किंवा पाच कंपन्याच उत्पादक होत्या. जर्मनीत ९२ टक्के प्लॅस्टर बोर्ड व रंग, ९८ टक्के फिल्म, ९१ टक्के औद्योगिक शिवणयंत्रे चार किंवा त्याहून कमी कंपन्यांकडूनच उत्पन्न केली जात होती. हाच प्रकार अतिकेंद्रित उद्योगांच्या बाबतीत सर्वत्र आढळतो.

समाजवादी व्यवस्थापकांना देखील उत्पन्नाचे असे केंद्रीकरण 'कार्यक्षम' असल्याचे जाणवले. लेनिनही असे म्हणाला की, "सर्व नागरिकांचे संपूर्ण राज्याच्या कामगारात व नोकरात रुपांतर करा." त्यानंतर अर्धशतक उलटल्यावर रशियन अर्थशास्त्रज्ञ एन्. लेल्युखिनाने म्हटले आहे की, "जगातील सर्वात एककेंद्रित 'उद्योग' रशियाकडे आहे."

ऊर्जा, लोकसंख्या, काम, शिक्षण, आर्थिक संघटना या सर्वात—एकूण जीवनातच दुसरी लाट—संस्कृतीचे हे एकाग्रतेचे तत्त्व खोलवर रूजले गेले.

## अवाढव्यपणा

उत्पादन आणि वापर यांमध्ये झालेल्या फारकतीने दुसऱ्या लाटेखालील सर्व समाजात मॅक्रोफिलियाची व्यापक स्थिती निर्माण केली. मॅक्रोफिलिया म्हणजे अवाढव्यपणा बाबतचा किंवा वाढीबाबतचा मोह, अतिरेकी भुरळ. एखाद्या कारखान्याने दीर्घकाळ उत्पादन करीत राहिले म्हणजे उत्पादक खर्च कमी रहातो, त्याचप्रमाणे जर आकार इत्यादिच्या प्रमाणात वाढ केली तर ती गोष्टही इतर कार्यवाही स्वस्त करुन देते. ही गोष्ट ध्यानात आल्यामुळे 'मोठे' आणि 'कार्यक्षम' या सत्ता समानार्थीच झाल्या.

अनुक्रमणिका

उंचात उंच गगनचुंबी इमारती स्वतःकडे असणे, सर्वात मोठे धरण स्वतःचे असणे, (हस्तिदंतावर कोरलेला) जगातील सर्वांत मोठा प्रतिकृतिरुप गोल्फ कोर्स आपल्याकडे असणे... अशा गोष्टी शहराच्या किंवा देशांच्या अभिमानविषय होऊन गेल्या. हा मोठेपणा, वाढीचा परिपाक होता. त्यामुळे औद्योगिक सरकारे, प्रशासने आणि इतर संघटनांनी आदर्श वर्धमानतेचा अक्षरशः वेडा पाठलाग केला.

मॅत्सुशिता इलेक्ट्रिक कंपनीचे जपानी कामगार आणि व्यवस्थापक दररोज एकत्र येऊन समूहगान करतात :

**आम्ही उत्पादन वाढवण्याची पराकाष्ठा करतो,**
**आमचा माल जगातल्या लोकांना पाठवून,**
**अखंडपणे व सततच**
**एखाद्या कारंज्याच्या उसळणाऱ्या**
**पाण्याप्रमाणे**
**वाढ, उद्योगा, वाढ, वाढ, वाढ!**
**सुंदर मिलाफ आणि प्रामाणिकपणा!**
**मॅत्सुशिता इलेक्ट्रिक!**

इ. स. १९६० मध्ये अमेरिकन संयुक्त संस्थानात रुढ औद्योगिकीकरणाचा टप्पा पूर्ण झालेला होता. आणि बदलाच्या तिसऱ्या लाटेची झुळुक तिथे नुकतीच लागलेली होती. अशा वेळी तिथे पन्नास प्रमुख औद्योगिक कॉर्पोरेशन्स प्रत्येकी सरासरी ८०,००० कामगारांना नोकरी देत होत्या! एकट्या जनरल मोटर्स मध्ये ५९५,००० नोकर होते. व्हेलच्या ए. टी. ॲण्ड टी. मध्ये ७३६,००० स्त्री–पुरुष काम करीत होते. म्हणजे २,०००,००० हून अधिक लोक ह्या कंपन्यांतील पगारावर अवलंबून होते. इ. स. १९७० मध्ये ए. टी. ॲण्ड टी. मध्ये ९५६,००० लोक काम करीत होते. केवळ एका वर्षात १३६,००० इतक्या जादा लोकांना त्यांनी नोकरी दिलेली होती!

हे मोठेपणाचे वेड अमेरिकेपुरतेच मर्यादित राहिले नाही; फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, आणि इतर अनेक देशांत आलेले होतेच. जास्तीत जास्त विस्तृत कंपन्या तयार करण्याला प्रोत्साहन मिळत होते. यायोगे अमेरिकन अतिरथींना टक्कर देता येईल अशी यात अपेक्षा होती.

हे प्रमाणाचे विशालीकरण केवळ नफ्याच्या अधिक्याचे प्रतिबिंब नव्हते. मार्क्सने औद्योगिक संस्थांच्या प्रमाणाच्या वाढीशी त्यांच्या भौतिक बळाच्या अधिक विस्तृत प्रगतीशी सहयोग गृहीत धरला. लेनिनचे म्हणणे असे होते, की मोठ्या साहसी, योजना, विश्वस्त निधी, आणि सिंडिकेटनी सामुदायिक उत्पादन तंत्राला त्याच्या प्रगतीच्या अत्युच्च पातळीवर आणून ठेवले. रशियन आर्थिक जीवन सर्वात मोठ्या संघटनांच्या सर्वात छोट्या संख्येशी एकत्रित करून ठेवण्याचा प्रयत्न होता. स्टॅलिनचे पाऊल याच्या कितीतरी पुढे पडले. एखाद्या अमेरिकन प्रकल्पाची उभारणी किती मोठी आहे याची चौकशी करून घेऊन तो त्याच्यांहून मोठी उभारणी आपल्याकडे करण्यासाठी तो आज्ञा करी.

दुसऱ्या लाटेच्या कार्यक्षमतेच्या स्वरुपाबाबतच्या कल्पनांमधूनच निव्वळ आकाराच्या प्रचंडपणाबाबतची ही श्रद्धा निर्माण झाली. पण पुढे तिचे एका प्रकारच्या वेडात रूपांतर झाले, ते

यंत्रसंचांच्या मर्यादा ओलांडून इतरत्रही दिसून येऊ लागले. संकीर्ण राष्ट्रीय उत्पन्न वाढत्या प्रमाणात रहाण्यांसाठी सर्वांचे प्रयत्न होत राहिले, या संख्याशास्त्रीय गोष्टीत अर्थशास्त्रीय परिणाम मोजलेले असते. वस्तूंचे मूल्य आणि त्यासाठी लागलेल्या सेवा यांच्या बेरजा करून आलेख काढले जातात. या तंत्रात काही त्रुटी आहेत. उदा : उत्पादन कशाचे आहे, अन्नधान्य, शिक्षणविषयक, आरोग्यविषयक किंवा अन्य प्रकारचे, याचा विचार न करता केवळ संख्या मोजत राहिल्या जात. शिवाय एखादा सेवकगट घर बांधण्यासाठी आणला, की एकादे उभे घर पाडण्यासाठी आणला याचा विचार न करता केवळ त्या गटाचे 'मोल' मोजण्यात येईल. वस्तुतः या प्रकारात नवी निर्मिती काही नसून, असलेल्या वस्तूचा नाश अंतर्भूत आहे. यात बाजारपेठेत चाललेल्या हालचालीचे गणित आहे. काम करणाऱ्या एका फार मोठ्या, आणि अतिशय महत्त्वाच्या गटाचा अर्थशास्त्रीय विचार होत नाही. उदाहरणार्थ, घरकाम, बालसंगोपन यासारखी अत्यंत महत्वाची कामे आर्थिक पोच मिळवू शकत नाहीत. पैसे न मिळवणारे हे 'उद्योग' या G N P च्या कक्षेत येतच नाहीत.

अशा काही त्रुटी असल्या, तरी जगभरातील सरकारे G N P च्या वाढीबद्दलच्या शर्यतीत वेड्या प्रमाणे सामील होऊन तसा प्रयत्न सतत करत राहिली. सामाजिक किंवा मानववंशाचे काही नुकसान होते किंवा काय याचा विचार करण्याचे त्यांना कारण नव्हतेच. हे प्रचंडपणाचे तत्त्व औद्योगिक मनोवृत्तीत इतके भिनून गेले की त्याच्या इतके संयुक्तिक काहीच वाटेनासे झाले. ते दुसऱ्या लाटेतील आणखी एक मूलभूत तत्त्व ठरले.

## केंद्रीकरण

शेवटी, सर्व औद्योगिक राष्ट्रांनी केंद्रीकरणाचा एखाद्या कलेसारखा विकास केला. चर्च, किंवा पहिल्या लाटेतील इतर सत्तांना सत्तेचे केंद्रीकरण कसे करावे हे चांगल्या तऱ्हेने माहीत होते. परंतु त्यांची वर्तणुक कमी गुंतागुंतीच्या समाजांशी निगडित होती. ते घडणीचे होते. औद्योगिक समाजातले स्त्रीपुरुष त्यांच्या मानाने जास्त गुंतागुंतीच्या रचनेत रहातात.

गुंतागुंतीच्या सर्व समाजात केंद्रीभूत आणि विकेंद्रित असलेल्या पहिल्या लाटेच्या अर्थकारणाकडून—प्रत्येक वस्ती स्वतःच्या जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन स्वतःच करीत होती. एकात्म राष्ट्रीय अर्थकारणाकडे संस्कृतीला नेणाऱ्या दुसऱ्या लाटेने सत्तेच्या केंद्रीकरणाच्या नवीनच पद्धती वापरल्या. स्वतंत्र कंपन्या, कारखाने, संपूर्ण अर्थकारण या पातळ्यांवर हे केंद्रीकरण घडले.

सुरुवातीच्या काळी लोहमार्ग बांधण्यात आले तेव्हा ते त्याकाळच्या इतर उद्योगांपुढे अक्षरशः अजस्त्र उद्योग ठरले. इ. स. १८५० मध्ये अमेरिकन संयुक्त संस्थानात ४१ कारखान्यांचे भांडवल २५०,००० डॉलर्सहून अधिक होते. तर इ. स. १८६० मध्ये न्यूयॉर्क सेंट्रल रेल्वे बोर्ड कडे ३० दशलक्ष डॉलर्सचे भांडवल होते. असा हा अवाढव्य प्रकल्प चालवायचा म्हणजे व्यवस्थापनाच्या नव्या पद्धती आवश्यक होत्या.

त्यामुळे आजच्या आपल्या अवकाश कार्यक्रमांच्या व्यवस्थापकाप्रमाणे त्या काळच्या रेल्वे मॅनेजर्सना नवीन तंत्रे शोधावी लागली. प्रमाणीभूत तंत्रज्ञान, भांडी, किंवा योजना, वेळापत्रके वापरावी लागली. हजारो मैलांच्या कार्यवाहीत एक कालीय, काळमेळाचे 'कार्यक्रम' आखावे लागले. नवीन व्यवसाय, नवी खाती यांच्यात विशिष्ट प्राविण्यता निर्माण केली. भांडवल, ऊर्जा आणि लोक यांच्या बाबतीत एकाग्रता

वापरली. आपल्या कार्याच्या जाळ्यांचा प्रचंड विस्तार व्हावा म्हणून त्यांनी झुंज दिली आणि हे सर्व साध्य व्हावे म्हणून संघटनांचे नवे प्रकार माहिती आणि सत्ता यांच्या केंद्रीकरणावर आधारलेले—त्यांनी अस्तित्वात आणले.

गाड्यांची धाव, सामान वाहतूक नुकसान, दुरुस्ती, एंजिनचा वापर इत्यादी माहितीवर दररोजचे अहवाल तयार होऊ लागले. नोकरांची विभागणी १. तंत्रज्ञ व २. व्यवस्थापक अशा स्पष्ट दोन प्रकारात करण्यात आली. सर्व माहिती अधिकाऱ्याच्या क्रमानुसार सर्वांकडे जाई. शेवटी ती जनरल सुपरिटेंडेंटपर्यंत जाई. त्या माहितीचे अध्ययन करुन तो निर्णय घेई, आणि त्यानुसार मग वरून खाली अशा क्रमाने आपल्या आज्ञा पाठवी.

राजकारणातही दुसऱ्या लाटेने केंद्रीकरणालाच उत्तेजन दिले. पहिल्या लाटेत ग्रामीण भागाला सत्तेचे राष्ट्रीय केंद्रीकरण होणे सहसा पसंत नव्हते. तर दुसऱ्या लाटेत खंबीर केंद्र सरकार आवश्यक ठरून लष्करी, परराष्ट्रीय धोरणांप्रमाणेच आर्थिक भरभराटीसाठीही त्याची आवश्यकता मोठी ठरली.

औद्योगिकीकरणाने राजकीय प्रणालीचा रोख अधिक केंद्रीकरणाकडेच राहिला आणि अधिकाधिक सत्ता आणि जबाबदारी केंद्र सरकारे स्वतःकडे घेऊ लागली. केंद्राकडेच अधिकाधिक निर्णय घेण्याचा मक्ताही आला. केवळ अमेरिकन संयुक्त संस्थानातच केंद्रीकरण झाले होते असे नव्हे, तर स्वीडन, जपान, ब्रिटन, फ्रान्स या देशांतही झालेले होते, नव्हे ते अधिक तीव्र होते! अर्थात सत्तेच्या राजकीय केंद्रीकरणाचे अतिरेकी स्वरूप आपल्याला मार्क्सवादी औद्योगिक देशात आढळते. औद्योगिकीकरणाला अधिकाधिक गती देण्यासाठी त्या देशांनी अधिक तीव्रतेने राजकीय आणि आर्थिक रचना केंद्रीभूत करत आणली आणि अगदी छोटे निर्णय देखील केंद्रीय संयोजकच घेतील अशी व्यवस्था करून टाकली!

एकेकाळी विकेंद्रित असलेल्या अर्थकारणाचे केंद्रीकरण करण्यासाठी प्रमुख मदत झाली, ती मध्यवर्ती बँकेकडून इ. स. १६९४ साली, औद्योगिक युगाच्या प्रभात काळी, विल्यम पीटरसन याने बँक ऑफ इंग्लंडची रचना केली. ही बँक नंतर दुसरी लाट ज्या सर्व देशात उदय पावलेल्या अशाच मध्यवर्ती संस्थांचा आदर्श आणि प्रमाणीभूत असा नमुना ठरली. पैसा व उधारी यांच्यावर ताबा ठेवण्यासाठी अशी यंत्रणा असल्याखेरीज कोणत्याही देशाला त्याचा दुसऱ्या लाटेचा टप्पा पुरा करता आलाच नसता.

पहिल्या आणि दुसऱ्या लाटेच्या कैवाऱ्यांच्या टक्करीतून मध्यवर्ती बँकिंगबाबतचा मोठा झगडा अमेरिकेत झाला, तरी औद्योगिक ईशान्य भागाच्या पाठिंब्यामुळे बँक ऑफ युनायटेड स्टेट्स्चे कायदेशीर अस्तित्व निर्माण करण्यात, हॅमिल्टन या दुसऱ्या लाटेच्या अतिशय बुध्दिमान समर्थकाला यश आले. सर्वत्र अशा समर्थ यंत्रणा उभारल्या गेल्या; म्हणूनच मोठ्या वेगात प्रगती होऊ शकली.

दुसऱ्या लाटेच्या समाजात प्रत्येक मार्गाने पैसा वाहू लागला. त्याचे उचित नियोजन करणारे केंद्रिय पंपिंग स्टेशन म्हणजे मध्यवर्ती बँक. मध्यवर्ती बँकिंग आणि केंद्रीभूत सरकारे हातात हात घालून वाटचाल करू लागली. केंद्रीकरण हे दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीचे सहावे प्रभावी तत्त्व ठरले.

या सहा मूलभूत मार्गदर्शक तत्त्वांच्या संचानेच, सर्व दुसरी लाटमय देशात एक 'कार्यक्रम' कार्यवाहीत आणला. ही सहा तत्त्वे समाजवादी आणि भांडवलशाही या दोन्ही प्रकारच्या औद्योगिक

देशातील समाजात सतत उपयोगात आणली जात होती; कारण उत्पादक आणि ग्राहक यांच्यातल्या मूलभूत फटीतून त्यांची वाढ होत गेली होती.

एकमेकांना बळ पुरवीत या तत्त्वांनी जगात आजपर्यंत कधी झाल्या नसतील अशा सर्वात मोठ्या, सर्वात कठोर आणि सर्वात शक्तिमान अशा नोकरशाही संघटनांना जन्म दिला. आज आपल्यावर त्या अधिसत्ता गाजवतात; दडपून टाकतात असे वाटते.

ही संहिता तयार करणाऱ्या सहा तत्त्वांनी दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीवर स्पष्ट व व्यवच्छेदक ठसा उमटवलेला आहे. आज आपल्याला आढळून येईल, की तिसऱ्या लाटेच्या वेगात या प्रत्येक मूलभूत तत्त्वावर आघात होत आहेत.

उद्योगात, बँकिंगमध्ये, कामगार संबंधात, सरकारात, शिक्षणात, प्रसारणात आजही दुसऱ्या लाटेतील श्रेष्ठी हे सर्व नियम लागू करत आहेत. कारण नव्याने उदय पावणाऱ्या संस्कृतीकडून जुन्या संस्कृतीच्या संपूर्ण अखत्यारीत असलेल्या सर्व अधिकारांना आव्हान केले गेलेले आहे.

नजिकच्या भविष्यकाळात ज्या उलथापालथी होणार आहेत, त्यामुळे सतत नियम लागू करत रहाणाऱ्या श्रेष्ठींना जड जाणार आहे; त्यामुळे ते गतेतिहासातील जमीनदारांच्या वळणावर जातील अशी शक्यता आहे. त्यातील काहींकडे दुर्लक्ष होईल. काही पदच्युत होतील. काही नामर्द होतील, तर काही ओंगळवाण्या 'नम्रतेप्रत' जातील, अतिशय बुध्दिमान, आणि जुळते घेणारे, काही थोड्याफार बदलानंतर, तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीचे पुढारी म्हणून उदयाला येतील.

उद्या कोण सूत्रसंचालन करणार आहे याचा अंदाज येण्यासाठी आपल्याला आज कोण सूत्रसंचालन करत आहे, याची अगोदर माहिती असणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

# पाच । सत्तेचे कारागीर

'हे सर्व कोण चालवते?' हा दुसऱ्या लाटेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रश्न आहे. कारण औद्योगिक क्रांतीपूर्वी हा प्रश्न विचारण्याची आवश्यकताच नव्हती. कारभार राजा करीत असो, श्रमण करीत असो, झुंजार सरकार करीत असोत, किंवा सूर्यपंथी 'देव' करीत असोत, किंवा संत करीत असोत; सामान्य लोकांनी आपल्यावर कोणाची सत्ता आहे याचा विचार करण्याची फारशी तसदी घेतली नाही. जीर्ण कपड्यातला शिणलेला शेतकरी आपल्या शेतातून वर बघत दिमाखदार राजवाडा किंवा वैभवशाली मठ पहायचा. पण त्याला सत्ताविषयक प्रश्न सोडविण्यासाठी कोणा राज्यशास्त्रज्ञाची किंवा वर्तमानपक्षीय पंडिताची आवश्यकता वाटली नाही. प्रत्येकाला सत्ताधाऱ्याचे नाव माहितीच होते.

परंतु दुसऱ्या लाटेच्या आगमनासरशी एक नवीन प्रकारची सत्ता उदयाला आली. पाल्हाळिक, आणि बिनचेहऱ्याची सत्ता! सत्ताधारी हे निनावी 'ते' झाले. हे 'ते' कोण होते?

संकलक :

औद्योगिकीकरणाने समाजाचे हजारो तुकडे पाडले. कारखाने, चर्च, शाळा, ट्रेड युनियन, तुरुंग, इस्पितळे आणि अशा अनेक ठिकाणी समाज विखुरला गेला. विशेषीकरणामुळे, तो आणखी विखरत गेला. मोठ्या कुटुंबाचेही लहान लहान तुकडे झाले. आणि असे करत असताना त्याने समाजजीवन आणि संस्कृती यांना हादरवून सोडले.

तेव्हा आता या विखुरलेपणाची नव्याने जुळणी होणे आवश्यक होते. ती करणारा संकलक आवश्यक होता. या गरजेतून अनेक व्यासंगी निर्माण झाले. कार्यकारी प्रशासक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापक, खातेप्रमुख असे अनेक... प्रत्येक उद्योगात, प्रत्येक सरकारात, समाजाच्या प्रत्येक थरावर निर्माण झाले. ते अपरिहार्य झाले; कारण ते संकलक होते.

त्यांनी लोकांनी करावयाच्या भूमिका ठरविल्या. त्यांना कामे दिली, कोणाला पारितोषिक मिळावे हे ठरविले, योजना आखल्या, निकष ठरविले, ओळखपत्रे दिली किंवा बाळगली. उत्पादन, वितरण, वाहतूक आणि दळणवळण यांची सांगड घातली. नियम तयार केले. समाजाचे तुकडे त्यांनी—वेगळ्या रीतीने का होईना—सांधले.

समाजवादाखाली असो, की भांडवलवादाखाली असो, संकलकाकडे फार प्रभावी सत्ता आली. त्यांच्या खेरीज रचनेचे तुकडे एकत्र येऊन कामाला लागलेच नसते. या जुळाऱ्यांखेरीज यंत्र चालूच शकले नसते.

संकलक यंत्र

अनुक्रमणिका

आता, या अवाढव्य संकलनकर्मात सुध्दा सहभाग हवाच होता— तिसऱ्याच एखाद्या शक्तीचा. संकलनाच्या शक्तिमान यंत्राचे काम केले— सरकारांनी या कामाचे सरकार हे जणू इंजिन बनून गेले. औद्योगिक समाज महत्त्वाच्या संकलन कार्यात सरकारांवर अवलंबून असतात.

सरकारांनी उद्योग क्षेत्रात ढवळाढवळ करू नये असा खुल्या बाजारदारांनी आक्षेप घेतला. परतु त्यांना हे समजत नव्हते, की सरकारची ही ढवळाढवळ नसून उद्योगात होणारी प्रचंड मदत आहे. सरकारांनी विकास जलद गतीने घडवून आणले. त्यासाठी त्यांनी बंदरे बांधली, रस्ते बांधले, कालवे बांधले, हमरस्ते बांधले. लोहमार्गांच्या विकासाला भरीव मदत केली. पोस्ट सेवा चालवली टेलिफोन, तारा यांच्यावर नियंत्रण ठेवले. व्यापारविषयक कायदे केले. उद्योगाला मदत करतील असे कर लावले. बाजारात प्रमाणीकरण आणले. शेतकऱ्यांना शेतीतून बाहेर काढून औद्योगिक मजूर पुरवठा केला. ऊर्जा प्रश्नात व सुधारित तंत्राला द्रव्यसहाय्य देऊन मदत केली. हजारो थरांवर कामे करुन सरकारांनी संकलन कार्य चाल ठेवण्यात प्रमुख भाग घेतला. इतरांना एवढे सर्व करता येणे शक्य नव्हते.

हे संकलन कार्य, ही एकात्मता वाढल्यानंतर सरकारांचा गाभा, व पध्दतही बदलत गेली. राष्ट्राचे अध्यक्ष किंवा पंतप्रधान यांची क्रियाशील सामाजिक व राजकीय पुढारी म्हणून असलेली भूमिका मागे पडली, आणि ते स्वतःला 'व्यवस्थापक' समजू लागले. व्यक्तिमत्त्व आणि आविर्भाव या संदर्भात ते असे बनले, की ते कोणत्याही मोठ्या कंपनीचे किंवा उद्योगसमूहाचे संचालक व्यवस्थापक म्हणून सहज खपतील. निक्सन, कार्टर, थॅचर, ब्रेझनेव, गिस्कार्ड, ओहिरा... सगळे एकाच माळेचे मणी.

सत्तेच्या या कारागीरांनी संकलनाचे मार्ग आणि साधने यांचा कब्जा घेऊन ठेवला. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक सत्तेच्या नाड्या त्यांच्या हाती आल्या व राहिल्या.

सत्ताधाऱ्यांमध्येही श्रेणी निर्माण झाल्या. अतिश्रेष्ठ, श्रेष्ठ, उपश्रेष्ठ... अशा श्रेणींनी युक्त असा एक पिरॅमिड तयार झाला... दुसऱ्या लाटेखालील प्रत्येक देशात प्रत्येक समाजात या उतरंडीला समांतर उतरंडही तयार झाली.

गेल्या तीनशे वर्षांत या ना त्या देशात क्रांतिकारकांनी, सुधारकांनी सत्तेच्या मनोऱ्यांना कोसळवून सामाजिक न्याय आणि राजकीय समता या तत्त्वावर आधारलेल्या नव्या समाजांच्या रचना करण्याचे प्रयत्न केले. स्वातंत्र्याची नवी आश्वासने मिळाल्यावर लाखो मनांचा भावनिक पाठिंबा मिळाला आणि या नव्या चळवळी काही काळ टिकल्या. या क्रांतींनी कधीकधी शासन उलथवण्यात देखील यश मिळवले. पुनः त्यांची गत नव्या क्रांतींनी तशीच करून टाकली. अशाच प्रकारचे क्रम चालू राहिले. तथापि औद्योगिक गाभ्याचे प्रभुत्व आणि लोकशाही ही मूलतत्त्वे अजय ठरली.

आजमितीला बदलाच्या तिसऱ्या लाटेने व्यवस्थापकीय सत्तेच्या किल्ल्यांवर हल्ले करायला सुरुवात केली आहे. त्यांच्यामुळे काही तडेही पडू लागलेले आहेत. सामाजिक आणि राजकीय घडणीच्या नूतनीकरणाला सुरुवात होते आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या मागण्या जोर करीत आहेत. व्यवस्थापनात, निर्णय घेण्यात सहभाग असावा यासाठी कामगार, ग्राहक, नागरी संघटना मागण्या करीत आहेत. अतिशय प्रगत उद्योगात या मागण्या पुऱ्या करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष पावले उचलायलाही सुरुवात झालेली आहे. नव्या रचना रचल्या जात आहेत. अकार्यक्षम, दडपशाही आणि कालबाह्य ठरु पहाणाऱ्या एकात्म. केंद्रीभूत

रचना बदलल्या जाण्याच्या, किंवा त्यांच्या जागी नव्याच रचना उभारल्या जाण्याच्या संधिकालाची झुळूक अनुभवाला येऊ लागलेली आहे.

अनुक्रमणिका

# सहा । उद्यम—वास्तव धर्म

दुसऱ्या लाटेने जेव्हा आपले अग्रदूत पृथ्वीवर पाठवले तेव्हा त्यांनी आपल्या वाटेत येणारी प्रत्येक गोष्ट बदलून टाकली. त्यांनी केवळ तंत्र किंवा व्यापार यांहूनही काहीतरी अधिक, आपल्याबरोबर वाहून नेले. पहिल्या लाटेच्या संस्कृतीशी टक्कर घेत पुढे जाणाऱ्या दुसऱ्या लाटेने लाखो लोकांसाठी केवळ एक नवेच सत्य तयार केले असे नव्हे, तर सत्याचा विचार करण्याची नवीच धारणाही त्याना दिली.

शेतीप्रधान संस्कृतीत अस्तित्वात असलेल्या मूल्यविषयक कल्पना, विचार, दंतकथा, नीतिकथा यांच्या हजारो मुद्यांशी झगडत दुसऱ्या लाटेने स्वतःसह नवीन व्याख्या, नवीन विचार आणले... देवाबद्दलचे... न्यायाबद्दलचे... प्रेमाबद्दलचे... सत्तेबद्दलचे... सौंदर्याबद्दलचे. नवे विचार, नवीन दृष्टीकोण, नवी साम्ये या विचार मंथनातून वर आली. काळ, अवकाश, भौतिक वस्तु, कार्यकारण भाव यांच्याबाबतची प्राचीन गृहितके उलथून टाकीत नवीन तयार केली. औद्योगिक समाजाच्या समर्थ, संयुक्तिक जागतिक दृष्टिकोणाचा उदय झाला. त्याला नाव मात्र नव्हते. त्याला 'उद्यम—वास्तव धर्म' म्हणायला हरकत नाही.

उद्यम वास्तव हा, कल्पना आणि गृहीतकांचा दूर पल्ल्याच्या कुवतीचा संच असून औद्योगिक संस्कृतीच्या मुलांना त्या धारणेतून जगाकडे बघायला शिकवण्यात आले. तो पूर्वपक्षाचा एक गठ्ठा होता असे म्हणावे लागेल. हा गठ्ठा दुसरी लाट—संस्कृतीने आपल्या शास्त्रज्ञांद्वारा, उद्योग—प्रणेत्यांद्वारा, राजकारण्यांद्वारा, तत्त्वचिंतकांद्वारा आणि प्रचारकांद्वारा वापरात आणला.

अर्थात् उद्यम—वास्तवाच्या ठाम कल्पनांना आव्हान देणाऱ्या विवादांचे अस्तित्वही मधूनमधून जाणवत राहिले. परंतु आपण विचाराच्या मुख्य विचारप्रवाहांचाच विचार करत आहोत; उपप्रवाहांचा नाही. वरवर पहाता एक मुख्य प्रवाह आहे असे काही दिसत नव्हते. कारण दोन प्रभावी पायाभूत कल्पनांचे प्रवाह झगडत होते. एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत प्रत्येक उद्योगप्रधान देशात डावा पक्ष कार्य करत होता; उजवा पक्षही कार्यरत होता. या दोन प्रणालींमधील झगड्याचे सुरुवातीला असलेले स्थानिक स्वरुप जाऊन त्याचे लोण पृथ्वीवर पसरुन एकच झगडा तयार झाला. जिथे सामोपचाराची तर्कशुध्द बोलणी थांबत, तिथे प्रश्न सोडवायला बंदुका आणि बॉंब हजर होते!

परंतु आपल्या प्रचाराच्या तावात फारच थोड्यांच्या हे ध्यानात आले, की प्रत्येक बाजू स्वतंत्र पायाभूत कल्पना हिरीरीने मांडत होती, तरी दोन्हीही बाजू मूलतः एकाच महान पायाभूत कल्पनेचा पाठपुरावा करीत होत्या! त्यांचे निष्कर्ष, त्यांच्या कार्यप्रणाली, त्यांच्या राजकीय मतप्रणाली पूर्णतः भिन्न होत्या, तरी त्यांची सुरुवातीची गृहीतके एकच होती. प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक धर्मप्रचारक बायबलबाबतच्या वेगवेगळ्या दृष्टिकोणांना धरुन रहात होते, परंतु ते मुळात ख्रिस्ताचीच शिकवण सांगत होते, तसाच हा प्रकार. मार्क्सवादी त्याचप्रमाणे मार्क्सवादीविरोधी; भांडवलवादी, त्याचप्रमाणे त्यांचे विरोधक अमेरिकन आणि रशियन सर्वांनी आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका अशा उद्योगप्रधान देशात कूच केले आणि मूलभूत पूर्वपक्षांचा तोच एक संच धारण करीत औद्योगिकतेच्या महानतेचा गौरव तिथे सांगितला. दोन्ही पक्ष उद्यम वास्तवाचेच भाविक पाईक होते.

त्यांनी ज्या दृष्टिकोणाचा फैलाव केला तो उद्यमवास्तवाच्या तीन पायाभूत कल्पनांवर, समजुतींवर आधारलेला होता. या तीन कल्पनांनीच दुसऱ्या लाटेखालच्या देशांना एकत्र बांधून ठेवले होते आणि जगाच्या इतर भागाहून वैशिष्ट्यपूर्ण केले होते.

निसर्गावर आपली सत्ता असावी, ही मानवाची कल्पना अगदी सुरुवातीपासूनचीच आहे. परंतु औद्योगिक क्रांतीपर्यंतच्या काळात या कल्पनेचा फारसा जोर नव्हता. ती गौणच राहिलेली होती.

आधीच्या संस्कृतींनी निसर्गाशी केलेल वर्तणूक सौम्य नव्हती. त्यांनी निसर्ग जणू ओरबाडला. परंतु तरी देखील नुकसान करण्याची त्यांची ताकद मर्यादित होती. आपण करीत असलेल्या नुकसानीचे समर्थन करण्याजोगी पायाभूत विचारसरणीही त्यांनी जन्माला घातली नव्हती.

परंतु दुसरी लाट–संस्कृती सुरू झाली आणि भांडवलदार उद्योग धुरीणांनी निसर्ग संपत्ती खोदून बाहेर काढली, वातावरण विषारी वायूंनी भरुन टाकले, अधिकाधिक फायद्यांची हाव धरुन जंगलांचा नाश केला— आणि हे करताना त्यांनी याचे तात्कालिक परिणाम काय होतील, दूरगामी परिणाम काय होतील, याचा थोडाफार विचार देखील केला नाही. निसर्ग हा त्याचा पुरेपूर फायदा करुन घेण्यासाठीच आहे, ही कल्पना त्यांच्या अदूरदृष्टीला आणि स्वार्थाला सोईस्कर कारण पुरवत राहिली.

मार्क्सवादी, आणि भांडवलवादी दोन्ही प्रकारच्या उद्योग समर्थकांनी निसर्गाशी जणू दावा मांडला होता, जणू शत्रुत्व धरले होते; त्याच्यावर प्रभुत्व मिळवण्याचा जणू त्यांचा हट्ट होता. ही एकूण कल्पना उद्यम वास्तव धर्माचा प्रमुख घटक बनली होती.

याच्याशी संलग्न होऊन काम करणारी दुसरी कल्पना याच्याही पुढे पाऊल टाकणारी होती. मानव केवळ निसर्गाच्या ताब्यातले नव्हते, तर ते म्हणजे दीर्घकाळ चालू असणाऱ्या उत्क्रांतीची परमावधी होती. उत्क्रांतीबद्दलच्या विचारसरणी पूर्वीही अस्तित्वात होत्या. एकोणविसाव्या शतकाच्या मध्यकालात डार्विनने सर्वात प्रगत औद्योगिक कल्पना पुढे आणली. त्याने या दृष्टीकोणावर शास्त्रीय शिक्कामोर्तब केले. त्याने निसर्गातील एका अपरिहार्य प्रक्रियेचे वर्णन 'निसर्गाची निवड' असे करून, असे प्रतिपादन केले की या प्रक्रियेत दुर्बळ आणि अकार्यक्षम जीवनाकार निर्दयपणे दूर फेकले जाऊन नाश पावतात. आणि जे प्रकार शिल्लक रहातात, ते खचित्‌च सर्वात योग्य आणि उत्तम असतात.

डार्विन मुख्यतः जीवशास्त्रीय उत्क्रांतीबद्दल विचार करीत होता. परंतु त्याच्या कल्पनांना खास सामाजिक व राजकीय उच्चरव प्राप्त झाला, तो चटकन्‌ ओळखू येण्यासारखा होता. 'सामाजिक डार्विनवादी' म्हणू लागले, की 'नैसर्गिक निवड' समाजालाही लागू पडते. सर्वात श्रीमंत आणि सर्वात समर्थ माणसेच या नियमानुसार सर्वात योग्य, पात्र ठरतात. हा सामाजिक डार्विनवाद भांडवलवादाला संयुक्तिक ठरवू लागला, आणि ह्या सांस्कृतिक औध्दत्याने साम्राज्यवादाला संयुक्तिक ठरवले. औद्योगिकीकरण वाढत होते, आणि त्याला आपला क्रम चालू ठेवण्यासाठी स्वस्तात कच्चा माल मिळवायचा होता. किमती अतिशयच पाडून खरेदी करण्यासाठीही त्यांच्याजवळ नैतिक न्यायाची तर्कावली हवी होती. सामाजिक उत्क्रांतीवादाने त्यांना बुध्दिनिष्ठ आणि नैतिक आधार मिळवून दिला; त्यामुळे उद्योगाला प्राधान्य न देणाऱ्या लोकांना त्यांनी सोयीस्करपणे गौण व कमी प्रतीचे मानले आणि ते टिकून रहाण्यात अपात्र आहेत असा निर्वाळाही दिला.

अनुक्रमणिका

दुसरी लाट संस्कृतीच्या बुध्दिवंत अग्रणींना टिकून रहाण्यास कोण पात्र आहेत याबाबत संदेह उरला नव्हता.

आणखी एक कल्पना होती ती प्रगतीच्या तत्त्वाबाबतची होती. इतिहासाचा क्रम मानवतेला उत्तरोत्तर प्रगतीकडेच नेत असल्याची ठाम कल्पना उद्यम वास्तवाने अंगीकारली होती.

दुसरी लाट युरोपभर पसरल्यावर हजारोनी या तत्त्वाचे गुणगान केले. कांट, लेसिंग जॉन स्टुअर्ट मिल, टर्गॉट, लैननिझ, हेगेल मार्क्स, डार्विन आणि इतर अगणित विचारवंतांनी विश्वव्यापी आशावादाला उचलून धरले. अर्थात् त्यांच्या विचारांमध्ये फरक होते. प्रगति अपरिहार्य आहे का, मानववंशाकडून तिला मदतीची आवश्यकता आहे का, अधिक चांगल्या जीवनाचे घटक कोणते, प्रगती अनंतपणे चालूच राहील का, असे विचारांचे फाटे व शंका सोडल्या, तर प्रगतीचे मूळ तत्त्व त्यांनी मान्यच केले होते.

नास्तिक, आस्तिक, विद्यार्थी, शिक्षक, राजकारणी, शास्त्रज्ञ या सर्वांनीच नवीन श्रध्दा बाळगली. व्यावसायिक व खाते प्रमुख यांनी प्रत्येक नवीन कारखाना, नवीन उत्पादन, नवीन गृहरचना, हमरस्ते, धरणे या गोष्टी अपरिहार्यतेने घडत असलेल्या प्रगतीचे पुरावे म्हणून सतत जाहीर केल्या. कवी, नाटककार, चित्रकार, यांनीही प्रगती गृहीतच धरली. या प्रगतीनेच निसर्गाचे अधःपतन आणि कमी पुढारलेल्या संस्कृतींवरचा विजय यांचे समर्थन केले.

संपूर्ण दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीत तीन महत्त्वाच्या कल्पनांनी—निसर्गाशी युध्द, उत्क्रांतीचे महत्त्व आणि प्रगतीचे तत्त्व—औद्योगिकीकरणाच्या प्रतिनिधींना सामुग्री पुरवण्याचे सतत काम केले. आणि त्यांच्या औद्योगिकीकरणाच्या स्पष्टीकरणाला व समर्थनाला इंधनच पुरविले.

दुसरी लाट—संस्कृती जसजशी परिपक्व होऊ लागली, तसतशी तिने काळ, भौतिक वस्तु, ध्येययाबाबतच्या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण गृहीतकांवर आधारलेली वास्तवाची नवीच प्रतिमा तयार केली. मानवाने भोवतालच्या जगाचे आकलन करण्याच्या आणि त्यांच्या दैनंदिन वर्तणुकीच्या पध्दतीत तिने मोठ्या प्रमाणात बदल केले.

## वर्तुळ ते रेषा

संस्कृती शेतीप्रधान असतानाही लोक काळाचा विचार करीत होते. परंतु कालमानाची विभागणी पक्क्या ठराविक मापनात केलेली नव्हती. सहसा तास, मिनिटे, सेकंद अशा बारकाव्यात न शिरता त्यांनी एखादी वेळ एखादे कार्य करण्याची म्हणून मानली. त्या मानण्यातही ढिलेपणाच होता. ते वेळा ओळखत तो प्रकार असा होता— 'गाईचे दूध काढण्याची वेळ', मादागास्कर मध्ये एक वेळ 'भात शिजवण्याची वेळ' म्हणून तर एक वेळ 'टोळ तळण्याची वेळ' म्हणून ओळखली जाई. निरनिराळ्या देशात वेळा अशाच कोणत्या ना कोणत्या कार्याच्या वेळा म्हणून ओळखल्या जात. परंतु कालनिर्देश ढिला आणि ठोकळेवजा होता. गाईचे दूध त्याच ठराविक मिनिटाला किंवा सेकंदाला निघाले पाहिजे असे नव्हते. थोडे मागेपुढे होणे गृहीतच होते.

अनुक्रमणिका

या लोकांचे दुसऱ्या जमातीशी किंवा दुसऱ्या गावाशी दळणवळण किंवा एकूण व्यवहार अगदीच थोडा. कारण कामाची तशी गरज नव्हती. सगळेच स्वयंपूर्ण. त्यामुळे कालाचे मापन हंगामानुसार, जागांनुसार वेगवेगळे होते.

परंतु औद्योगिक समाज असा वेळेच्या बाबतीत ढिला असून काही उपयोगच नव्हता. तास, मिनिटे, सेकंद अशा निश्चित मापनांची आवश्यकता होती. त्यांचे देखील असे प्रमाणीकरण आवश्यक होते, की हंगाम किंवा जमात किंवा कुठल्याही कारणानिरपेक्ष, ते न बदलणारे असे असायला हवे होते. तास हा न बदलणारा प्रमाणीभूत तासच रहाणार होता.

दुसरी लाट–संस्कृतीने काळाचे अधिक विचूक आणि प्रमाण ठरतील असे कालखंड तयार केले. त्या खंडांचीही सरळ अशी रेषात्मक मांडणी केली. भूतकाळ आणि भविष्यकाळही तिच्यामुळे सहज सोप्यारीतीने व न चुकता पहाता येऊ लागला. ही कल्पना दुसऱ्या लाटेच्या समाजात वाढलेल्या आपणात इतकी मुरलेली आहे, की आपल्याला दुसऱ्या पर्यायाची कल्पना देखील करता येणे कठीण आहे. तरी उद्योगपूर्व समाजात, आणि आजही पहिलीच संस्कृती जपणाऱ्या जमातीत काळ ही गोष्ट चक्रासारखीच समजली जाते; सरळ रेषेसारखी नाही. बौध्द आणि हिंदू यांच्या मायेपासून काळ ही चक्राकार गतीची, पुनरावृत्तीची गोष्ट मानली जात होती. आणि जन्मही अशा पुनरावृत्तीनेच पुनः जगले जाण्याची कल्पना होती!

हिंदूंमध्ये चार हजार दशलक्ष वर्षांच्या लांबीच्या एक अशा पुनः पुन्हा येणाऱ्या कल्पाची कल्पना होती. आणि हा काळ म्हणजे ब्रह्माचा एक दिवस. पुनः तयार होणारा, पुनः नष्ट होणारा, पुनः नव्याने तयार होणारा हा 'दिवस' होता. चक्राकार काळाची कल्पना प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्यातही आढळते. पुनः पुन्हा त्याच क्षणाचे जीवन जगले जाण्याचीही कल्पना होती. पायथॅगोरसने ती शिकवली. चीनमध्ये सरळ रेषेची कल्पना होती.

गणितज्ञ जी. जे. व्हिट्रो याने म्हटले आहे, की "संपूर्ण मध्ययुगात काळाबद्दलच्या चक्राकार आणि रेषात्मक कल्पनांचा झगडा चालूच होता. परंतु व्यापारी वर्गाने आणि चलनी अर्थशास्त्राच्या उदयाने रेषात्मक कल्पना उचलून धरली. जोपर्यंत जमिनीच्या स्वामित्वाखाली सत्ता केंद्रित होती, तोपर्यंत काळ भरपूर आहे, आणि जमिनी अंतर्गत नित्य चक्राशी तो निगडित आहे अशी कल्पना होती."

दुसऱ्या लाटेने जोर धरल्यावर हा सनातन झगडा संपुष्टात आला. रेषा–काल कल्पनेचा विजय झाला. प्रत्येक औद्योगिक समाजाचा रेषात्मक काल हा प्रभावी दृष्टीकोण ठरला. दूरच्या भूतकाळाकडून येऊन वर्तमानातून, तितक्याच दूरच्या भविष्यकाळाकडे धावणारा काळ, एखाद्या हमरस्त्याप्रमाणे दिसू लागला. काळाची ही कल्पना औद्योगिक संस्कृतीत सर्व कार्यांना पायाभूत अशी ठरली. मग ती कार्ये आर्थिक असोत, की शास्त्रीय असोत की राजकीय असोत.

काळाची ही कल्पना उद्यम–वास्तवाच्या उत्क्रांतीच्या आणि प्रगतीच्या दृष्टिकोणाची जणू एक पूर्वतयारीच होती. त्यामुळेच उत्क्रांती आणि प्रगती वाजवी ठरली. काळ जर रेषात्मक नसून चक्राकार असता, तर घटना एका दिशेने घडत गेल्या नसत्या, पुनः पुन्हा त्याच घटना घडल्या असत्या. इतिहासाची पुनरावृत्ती झाली असती. उत्क्रांती आणि प्रगती या गोष्टी केवळ भासमय झाल्या असत्या.

अनुक्रमणिका

एककालिकता, प्रमाणीकरण, रेषात्मक काल रचना यांनी संस्कृतीच्या मूलभूत गृहीतकांवर परिणाम केला आणि मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणले. सामान्य लोकांच्याही काळ हाताळणीच्या पद्धतीत मोठे बदल झाले. काळच 'बदलला'. ह्या बदलाबरोबर आणखीही एक बदल उद्यम—वास्तवासाठी आवश्यक होता. तो म्हणजे जागेची, अवकाशाची गठडी नवीन उद्यम—वास्तवाच्या दृष्टीने योग्य अशी पुनः वळवणे.

## जागेची पुनर्बांधणी

पहिल्या शेती संस्कृतीचा उदय होण्यापूर्वी मानव भटक्या अवस्थेत होता. शिकारी करत, गुरे वळत, मासे मारत, जगण्या—वाचण्याची धडपड करत सतत या जागेकडून दुसरीकडे भुकेमुळे, थंडीमुळे कधी हवेशी जमवत, तर कधी सहज आणि केवळ इच्छा म्हणून फिरत होता. भटकत होता. त्यामुळे त्याने स्वतः जवळ अक्षरशः गरजेपुरत्याच वस्तू, कमीत कमी वस्तू बाळगल्या. वस्तूंची साठवणूक किंवा मालमत्ता तयार करणे ह्या गोष्टी कधी त्याच्या मनातही आल्या नाहीत. विशेष विस्तृत भूभागात त्यांचे वास्तव्य होत होते. कधी इथे, कधी तिथे!

याउलट, पहिली लाट—संस्कृती आली. आणि तिने भटकेपणा थांबवून लोकांना स्थिरपणा दिला. अस्वस्थपणे भटकत रहाण्यापेक्षा एका जागी जमिनीच्या तुकड्यावर मेहनत करीत आपल्या कुटुंबासह एका जागी रहाणे मानवाला आवडले. काही थोडे व्यापारी, विद्याव्यासंगी, योध्दे सोडले तर बाकीचे सर्व शेतांनी वेढलेल्या झोपडीत रहात होते. कधीतरी चर्चला जाणे किंवा अगदी क्वचित् सहासात मैलावरच्या नजिकच्या खेड्यात जाणे सोडल्यास त्यांनी संपूर्ण आयुष्य शेतावर घालवले.

संस्कृतीची दुसरी मोठी लाट आली, आणि सर्वच चित्र पालटले. कार्यक्षेत्र विस्तारले. पृथ्वीबरोबरीने पसरले. वस्तु, लोक, कल्पनाही हजारो मैल प्रवास करु लागल्या आणि कामे शोधण्यासाठी लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होऊ लागले. शेतामध्ये विखरुन रहाण्याऐवजी उत्पादन शहरांमध्ये केंद्रीत झाले. खूप मोठी लोकसंख्या ठासून राहिलेल्या शहररूपी गाठोड्यात येऊन राहिली. धुराडी आणि भट्टीची आग यांनी वेढलेली औद्योगिक केंद्रे प्रमुख आकर्षण बनली.

अन्न, ऊर्जा, लोक आणि कच्चा माल शहराकडे जाऊ लागला आणि उत्पादित माल, फॅशन्स, कल्पना, आर्थिक निर्णय, उलट दिशेने—ग्रामीण भागाकडे—जाऊ लागले. या दोन प्रवाहांनी जागा आणि वेळ यांचा काळजीपूर्वक ताळमेळ राखला. दुसरी लाट—संस्कृतीत कामाची अगदी सूक्ष्म, तपशीलवार विभागणी झालेली असल्यामुळे त्यांनुसार आवश्यक अशा वैशिष्ट्यपूर्ण जागांची व्यवस्था करणे आवश्यकच होते.

ह्या कारणाने स्थापत्यविदांनी कचेऱ्या, बँका, पोलीस स्टेशन्स, कारखाने, रेल्वेस्थानके, डिपार्टमेंटल स्टोअर्स, तुरुंग, अग्निशामकांची ठाणी, उपचार केंद्रे, थिएटर्स अशी नानाविध ठिकाणे गरजेच्या मागणीनुसार उभी केली. कारखान्यांच्या जागा, घरांपासून तिथपर्यंतचे रस्ते, डॉक्स् शाळा, इस्पितळे, पाण्याचे नळ, पॉवर स्टेशन्स, गॅस लाइन्स, टेलिफोन एक्स्चेंज हे सर्व जागांचे प्रकार विशिष्ट मांडणीत उभारले गेले. काळाच्या मेळाशी, एककालिकतेशी या विशिष्ट मांडणीचे खास साम्य आहे. हा जागांचा मेळ असे म्हणण्यास हरकत नाही.

अनुक्रमणिका

अठराव्या शतकापूर्वी पुष्कळ प्रदेशात लोकवस्ती नव्हती. त्यामुळे देशादेशांमधल्या सरहद्दींची आखणी काटेकोर नव्हती. परंतु बदलाची दुसरी लाट आल्यानंतर खास काटेकोरपणे आणि निःसंदिग्धपणे सरहद्दींची ठळक आखणी झाली. देश, राज्ये, कस्टम झोन, स्थानिक व खाजगी मालमत्ता यांची काटेकोर व स्वच्छ आखणी होऊ लागली.

जागेप्रमाणेच वेळेचीही प्रतिमा स्वच्छ, रेखीव आणि काटेकोर झाली. आता सर्वच गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले होते. वेगही प्राप्त झाला होता. म्हणून वळणाच्या वाटांना चाट मिळाली. वेळ वाचविण्यासाठी, इंधन वाचविण्यासाठी, वळणे काढून टाकून सरळ रस्त्यांची आखणी करण्याला प्राधान्य आले. कोन उडवण्यावर भर आला. हवाई जमिनीवरील की समुद्री असोत, रस्ते सरळ करण्यावर भर आला.

शहरातले रस्ते, चौक सर्व रेखीव झाले. यांत्रिकीकरणांमुळे शेतांवरही रेखीवपणा आला. पूर्वी बैल जसा फिरेल तशी नांगरट उठायची. आता सर्व रेषाबध्द, सरळ झाले.

सरळ रेषा आणि ९० अंशांचा कोन यांची युती केवळ शेतात किंवा रस्त्यात आढळत नाही तर घरात, खोल्यांतही आढळते. वक्राकार भिंती आणि काटकोनेतर कोन औद्योगिक युगाच्या स्थापत्यात आढळणार नाहीत.

अशा तऱ्हेने रेषाबद्धता ही, उद्यम—वास्तवाची सांस्कृतिक दृढता बनली.

## वास्तवाचे मूळ

'हे' सर्व कशापासून तयार झाले आहे याचा मागोवा मानव फार पूर्वीपासून घेत आला आहे. काहींच्या मताने विश्व हे मूळ एका तत्त्वातून निर्माण झाले आहे. व्यक्ती हा व्यापक निसर्गाचा एक भाग आहे. आपले पूर्वज व वंशज यांच्या नात्यात तो गुरफटलेली असते. निसर्गातील प्राणी, वनस्पती, डोंगर, नद्या—नाले यांच्याशी ती सहभागी झालेली असते. परंतु काहींच्या मते व्यक्ती स्वतंत्र व स्वयंनिर्णयी असते.

काही समाजांनी मात्र एकत्व किंवा संपूर्णत्व यांपेक्षा वास्तव हे संपूर्ण एकत्व नसून त्यात विभाजन आहे; यावर भर दिला आहे. औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या दोन हजार वर्षांपूर्वी डेमॉक्रिटसने अशी कल्पना मांडली होती की, अनेक स्वतंत्र भाग एकत्र येऊन त्याची घडण झाली आहे. विश्व हे कणांपासून बनले आहे. हे कण स्वतंत्र, अक्षय, अक्षर, अदृश्य, अविभाज्य असे आहेत. हे कण म्हणजेच 'अणु'—ॲटम.

डेमॉक्रिटसनंतर लगेच चीनमध्ये अशीच कल्पना करण्यात आली. 'बिंदु'ची ही कल्पना. बिंदु म्हणजे एका रेषेचा छोट्यात छोटा तुकडा. एका रेषेचे छोटे, छोटे, सूक्ष्म, अतिसूक्ष्म तुकडे करण्यात आले; इतके सूक्ष्म की पुढे तुकडा पडणे अशक्य, असे झाल्यावर जो तुकडा समोर येईल तो बिंदु.

हिंदुस्थानातही अणुची कल्पना हजारो वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात आहे.

प्राचीन रोममध्ये कवि ल्युक्रेटिअस याने आण्विक तत्त्वज्ञान मांडले. परंतु भौतिकाची कल्पना नंतर मागेच पडत राहिली. दुर्लक्षित राहिली,

अनुक्रमणिका

दुसऱ्या लाटेच्या युगात मात्र अणुवाद ही एक प्रभावशाली कल्पना ठरली. त्या कल्पनेच्या अनेक प्रवाहांनी, संमिश्र प्रभाव पाडीत वास्तव, भौतिक या बाबतच्या आपल्या कल्पनेत क्रांती घडवून आणली. नव्याने उदयाला येणारी प्रत्येक संस्कृती अगोदर अस्तित्वात असलेल्या कित्येक कल्पनांतून वर्ग ही कल्पना निवडून घेते. आणि जगाच्या संदर्भात स्वतः बद्दलची निश्चित कल्पना येण्याच्या दृष्टीने त्यांची पुनर्रचना करते. उमलत्या औद्योगिक समाजाला स्वतंत्र अस्तित्वाच्या कणांचा संयोग पावलेल्या विश्वाची कल्पना अपरिहार्य होती. समाज नुकताच प्रगतिपथावर चालला होता स्वतंत्र घटक एकत्र आणून जुळवून बनविलेल्या यंत्रापासून मोठ्या प्रमाणात उत्पादन करायला सरसावलेल्या समाजाच्या दृष्टीने ती अगदी सहज अशी गोष्ट होती.

वास्तवाची आण्विक प्रतिमा स्वीकारण्यास राजकीय आणि सामाजिक कारणेही घडली. पहिल्या लाटेतील, पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या जुन्या संस्थांना टक्कर देताना दुसऱ्या लाटेने विस्तृत कुटुंबातून, चर्चपासूनही सुटे केले आणि साम्राज्यातूनही सुटे केले. औद्योगिक वास्तववादालाही तर्काधिष्ठित स्वतंत्र–व्यक्तिवादाची आवश्यकता होती. दुसऱ्या लाटेत व्यापारही दूरवर पसरला. शहरे मोठ्या प्रमाणात वाढली. व्यापारी वर्गाला व्यापारात स्वातंत्र्य हवेसे वाटू लागले. बाजाराची व्याप्ती वाढवावी असे वाटू लागले. या सर्वांतून स्वतंत्र व्यक्तित्वाची कल्पना निर्माण झाली. एक व्यक्ति म्हणजे एक अणु अशी कल्पना निर्माण झाली.

प्रत्येक व्यक्ती ही जातीची किंवा जमातीची किंवा वंशाची निष्क्रिय पुरवणी न रहाता तिला स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले. स्वतःची मालमत्ता बाळगण्याचा, वस्तू मिळवण्याचा, देवाणघेवाण करण्याचा, स्वतःची समृद्धी साधण्याचा, किंवा त्याच्या किंवा तिच्या क्रियाशील प्रयत्नानुरुप उपाशी रहाण्याचाही तिला अधिकार निर्माण झाला. तिला स्वतःचा धर्म कोणता असावा याबाबतचा अधिकार प्राप्त झाला. स्वतःचे सुख मिळवण्याचा अधिकार प्राप्त झाला.

उद्यमवास्तवाने अणुसदृश अशा स्वतंत्र व्यक्तीची–जी समाजाचा अक्षय, अविनाशी असा मूलभूत घटक असेल, अशा कल्पनेला जन्म दिला. दुसऱ्या लाटेने प्राचीन आणि शेतीप्रधान अशा दोन्ही संस्कृतीवर प्रभुत्व मिळवत असताना सतत चाढत्या प्रमाणात सुसंगत आणि स्वच्छ मानवतावादी राजकारण व समाजविषयक दृष्टिकोणाचा प्रसार केला.

ही तर्कशुद्ध प्रणाली पूर्ण होण्याच्या दृष्टीने अजून थोडे काही हवेच होते.

## अंतिम प्रश्नचिन्ह

जोपर्यंत एखादी संस्कृती 'हे असे का घडते आहे.' या प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही, तोपर्यंत तिची घडी बसत नाही ती लोकांच्या जीवनावर ठळक परिणाम करू शकत नाही. आपल्या संस्कृतीचे आज्ञार्थ मानणाऱ्या लोकांना अशी हमी हवी असते, की आपल्या वर्तणुकीतून काही (चांगलेच) निघेल.

दुसऱ्या लाटेने आपल्याबरोबर अशी प्रभावी उपपत्ती आणली होती की सर्व का?' ची उत्तरे तिच्या जवळ होती.

अनुक्रमणिका

दुसरी लाट—संस्कृतीला कार्यकारणभावाचे गूढ न्यूटनच्या नेत्रदीपक शोधात—वैश्विक सत्य—गुरुत्वाकर्षणाच्या नियमात—उलगडले. न्यूटनने असे मांडले होते की 'वस्तूवर बलांचे कार्य घडल्यामुळे गती निर्माण होते' बाहेरुन कार्य करणाऱ्या, मोजता येतील अशा आणि ओळखू येऊ शकतील अशा बलांवर केंद्रित झालेली ही कल्पना अतिशय प्रभावी ठरली. कारण ती अतिशय वैशिष्ट्यपूर्ण रीतीने रेषात्मक जागेचा आणि काळाचा विचार करणाऱ्या नव्या औद्योगिक कल्पनांशी जुळून गेली. पक्की सांधेजुळणी झाली. न्यूटनची किंवा यांत्रिकी कार्यकारण परंपरा औद्योगिक क्रांती बनून युरोपभर पसरली आणि तिने उद्यम—वास्तव जणू हवाबंद, मोहरबंद गठ्ठ्यात आणून ठेवले.

जे जग संमिश्र, गर्दीचे, गोंधळाचे, गूढ, अव्यवस्थित वाटत होते, ज्याचे पुढे काय होणार हे सांगता येत नव्हते; असे तेच जग नंतर व्यवस्थित आणि नीटनेटके दिसू लागले.

माणसाच्या आतल्या अणूपासून रात्रीच्या आकाशात दिसणाऱ्या, हजारो योजने दूर असणाऱ्या थंड ताऱ्यातील अणूपर्यंत प्रत्येक अणु म्हणजे गतीचे एक तत्त्व, की जे प्रत्येक कण आपल्या जवळच्या दुसऱ्या कणाला कार्यरत करुन अस्तित्वाच्या अनंत नर्तनाला गती देते. अशा विचाराने प्रत्येक घटना ओळखली जाऊ लागली. नास्तिकांना जीवनाचे असे काही स्पष्टीकरण मिळाले, की ज्याची सुरुवात करण्यासाठी गृहितपक्ष म्हणून देवाची गरजच नव्हती. धार्मिक वृत्तीच्या लोकांनी देवाला या नव्या दृष्टिकोणातही जागा ठेवली. अणुच्या बिलियर्ड बॉल्सना गती देणारा सर्वोच्च (आणि एकमेव) संचालक म्हणून त्यांनी देवाला मानले.

आणि अक्षरशः विश्वाच्या याच प्रतिमेपासून, तिच्यात अंतर्भूत असलेल्या गृहीतकांपासून आपल्यातल्या बहुशः सर्व प्रमुख खाजगी, सामाजिक आणि राजकीय वागणुकींची धाटणी तयार झाली. आणि दुसऱ्या लाटेचे मोठे विचारवंत तेच, की ज्यानी अतिशय सतर्कतेने आणि प्रभावीपणाने विश्वाची सयुक्तिकता पुढे मांडली.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीला लाभलेली ही मीमांसा, जादुमय शक्ती आणि समर्पकता लाभलेली अशी होती. काळ, स्थळ आणि वस्तु याबाबतच्या तिच्या नवीन कल्पनांची, मानववंशाची प्राचीन 'जंगली'पणापासून सुटका केली. शास्त्र, तंत्रज्ञान, मानसतरंग निर्मित विश्वचमत्कार, व्यावहारिक प्रत्यक्ष संपादन याबद्दल विजयी सिध्दी प्राप्त करणे तिच्यामुळेच शक्य झाले. मानवी मन, अधिकारशाहीला आव्हान देत, बंदिवासाच्या पगडाभूत कल्पनेपासून मुक्त केले.'

परंतु उद्यम वास्तवाने औद्योगिक मनोवृत्तीच्या स्वरुपात स्वतःचा एक नवा तुरुंग निर्माण केला. जे संख्यात्मक रुपाने मांडता येत नाही. त्याला कमी लेखणारी किंवा त्याकडे दुर्लक्ष करणारी ही मनोवृत्ती मानवाचे अतिशय साध्या, सजीव रंगहीन वस्तूत रुपांतर करणाऱ्या निर्णायक काटेकोरपणाने ती अनेकदा डोक्यावर घेते, तर हे घडवून आणणाऱ्या कल्पनाशक्तीलाच फासावर चढवते.

शिवाय नैतिकरीत्या जितके तटस्थ असल्याचा बहाणा उद्यमवास्तवाने केला होता, तितकेच ते राहिले नव्हते.

अनुक्रमणिका

मोठाल्या संघटना, मोठी शहरे, केंद्रीभूत नोकरशाह्या, सर्वव्यापक बाजार नव्या ऊर्जा पद्धती, नवीन कुटुंबपद्धती, नवीन तंत्रज्ञान, तांत्रिक पद्धती, नव्या आर्थिक राजकीय आणि मूल्यमापन पद्धती या सर्वांची मिळून दुसऱ्या लाटेची संस्कृती बनली होती.

आता ही संपूर्ण संस्कृती तिसऱ्या लाटेच्या मोहिंमेने विखुरली जाते आहे. आता या वेळी आपण औद्योगिक संस्कृतीच्या अखेरच्या अपरिहार्य आणीबाणी काळात रहात आहोत. औद्योगिक युग इतिहासजमा होते आहे; आणि नवे युग जन्माला येत आहे.

अनुक्रमणिका

# सात । भैरवी : वेगवान लोंढा

औद्योगिक युगाचा हा वंगळ म्हणजे सुसांडत येऊन गेलेला प्रचंड लोंढा. कालौघाच्या दृष्टीने तीनशे वर्षे म्हणजे कितीतरी छोटा काळ. ह्या लोंढ्यात कारणांचे अनेक प्रवाह सामील झाले होते. त्यामुळे हे छोटेच परंतु प्रचंड ताकदीचे युग का अवतरले यासाठी एकच कारण देता येणार नाही. अनेक कारणांच्या संगमाने हा जोरदार प्रवाह निर्माण केला होता. तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, वर्णकलह, नव्या कल्पना अशी अनेक कारणे. काही कारणे तर गुप्त स्वरूपाची. त्यांची तशी ओळखही करून देता यायची नाही; तरी देखील त्यांनीही कार्य केले. शिवाय एक गोष्ट अशी, की यातील एकही कारण स्वतंत्रपणे काही करू शकले नसते यांची विचित्र गुंफण होताच वेग व एकूण बळ तयार झाले व दुसरी सर्वव्यापक बदलाची लाट तयार झाली.

आपल्या पूर्वीच्या माणसांपेक्षा औद्योगिक मानव हा फार वेगळा होता. ‘ऊर्जा सेवकां’चा तो स्वामी होता, त्यामुळे त्याला प्रचंड मोठ्या प्रमाणात ताकद उपलब्ध झाली. त्याच्या जीवनातील पुष्कळ वेळ, काळ, कारखाना सदृश परिस्थितीतच गेला. यंत्रे आणि संघटना यांनी व्यक्तीला जणू खुजे करुन टाकले. पैशाशिवाय जगता येणे शक्य नाही हे त्याला बालपणापासूनच समजू लागले होते. तो अतिकेंद्रित कुटुंबात वाढला. कारखानासदृश शाळेत गेला. जगाबद्दलची मूलभूत कल्पना त्याला प्रसिध्दी माध्यमातून आली. मोठ्या प्रशासनाचा, संघटनांचा, किंवा अन्य सार्वजनिक संस्थांचा, युनिअनचा, किंवा चर्चचा एक भाग म्हणून तो जगला. तो स्वतंत्र स्वावलंबी म्हणून जगू शकला नाही. अशा तऱ्हेचे त्याचे व्यक्तिमत्व अनेक विभागात वाटले गेले होते. दैनंदिन जीवनात निसर्गाचा जणू शत्रू म्हणून तो उभा राहिला. परंतु विरोधाभास हा, की आठवडा अखेरीची सुटी साजरी करण्यासाठी तो त्याच निसर्गाकडे धाव घेऊ लागला! जीवन जगण्यासाठी, आपले राहणीमान उंचावण्यासाठी तो सतत झुंजला. आपल्या वाट्याला आलेल्या भूमिकेसाठी तो ‘योग्य’ होता. परंतु पुष्कळ वेळा त्याने आपल्या भूमिकेचा तिरस्कार केला. सरळ रेषेत जाणाऱ्या कठोर काळाने त्याला आपल्या अखंडपणाने स्मशानाकडे होत असलेल्या वाटचालीची सतत जाणीव करून दिली. त्याच्या हातावर टिकटिकणाऱ्या घड्याळाने त्याला सतत जाणीव करुन दिली, की ही पृथ्वी आणि, त्याच्या स्वतः सकट, तिच्यावर रहाणारी प्रत्येक व्यक्ती हा मोठ्या थोरल्या विश्वरुपी यंत्राचा केवळ एक भाग आहेत. नियमित हालचाली आणि निष्ठुरता हा त्या यंत्राचा स्थायीभाव आहे.

दुसऱ्या लाटेने आवाजाची दुनिया बदलली. कारखान्यांचे भोंगे, यंत्रांचे व वाहनांच्या चाकांचे कर्णकटु आणि कंटाळवाणे आवाज हे या दुनियेचे प्रमुख घटक बनले.

वास म्हणजे गॅसोलीन आणि पेट्रोल यांचे वास!

यापूर्वी कुठल्याही डोळ्याने पाहिले नसतील अशा तऱ्हेचे देखावे या युगाने दाखवले— उदा. : अंतराळातून काढलेले पृथ्वीचे फोटो.

मानवी शरीरातही बदल घडला. आपल्या पूर्वजापेक्षा, जी पूर्वी सर्वसामान्य उंची समजली जात होती ती पेक्षा, अधिक उंची नव्या पिढीला लाभली. शरीराकडे बघण्याचा दृष्टिकोणही बदलला. नग्नता ही सहज, नैसर्गिक मानणे सोडून ती निर्लज्ज कृती समजली जाऊ लागली. शय्यागृहातील वर्तणुकही रात्रीचे कपडे वापरात यायला लागल्या पासून बदलली. मृत प्राण्याला, आपल्या पोटात जाण्यासाठी तयार होऊन टेबलावर आलेले पहाताना पूर्वी आनंदाचे भरते येत असे, तर नंतर ते पाहून असे विचार येऊ लागले, की

"मांसाच्या पदार्थांचा कोणत्या तरी प्राण्याच्या हत्येशी संबंध असतो, ते खाणे टाळावे." असे विचार मनात येऊ लागले. विवाह ही आर्थिक सोयीची बाब होऊन राहिली. मुलाच्या आणि पालकांच्या नात्यात बदल झाले. मानवी नाते संबंधात बदल झाले. लाखो लोकांच्या स्वतः बद्दलच्या जाणिवेत लक्षणीय बदल झाले.

एकूण, काही दोष असले, तरी दुसऱ्या लाटेच्या आगमनानंतर मानवाचे राहाणीमान उंचावले.

मोठ्या शहरांच्या आत किंवा कडांवर उभ्या राहिलेल्या ओंगळवाण्या झोपडपट्ट्या, भेसळयुक्त अन्न, दूषित पाण्याचा पुरवठा अशा कितीतरी भयंकर गोष्टींचा आणि स्थितींचा उहापोह होत असतो. तरी देखील आपल्या मागे राहिलेल्या लोकांच्या मानने निश्चित आजच्या या लोकांनी आपल्या जीवनस्थितीत सुधारणा केली आहे. रहाणीमान उंचावले, जीवनकाल अधिक लांबला, घरांची स्थिती सुधारली. खाण्याचे प्रकार व प्रमाण यांच्यात सुधारणा झाल्या.

जो जीव घेणे रोग होते त्यांच्यावर नियंत्रण मिळू शकले, परंतु नवे रोग आले. तरी देखील आता वृद्धांप्रमाणेच तरुण व मुलेही रोगाने बळी पडण्याचे प्रमाण कमी झाले.

एकूण सुधारणा झाली. आपल्या अगोदरच्या काही पिढ्यांना अधिक सुधारित जीवन जगता आले. परंतु काही दुष्परिणामही झालेले आढळले.

या पूर्वी कुठल्याही संस्कृतीने एखादा ग्रह काय पण शहरसुद्धा उध्वस्त करण्याची साधने निर्माण केली नव्हती; संपूर्ण समुद्र विषारी होण्याची भयंकर शक्यता निर्माण केली नव्हती; मानवाच्या लोभीपणामुळे किंवा दुःसाहसामुळे सर्वनाश व्हायची वेळ आली नव्हती. ओझोनचा थर नष्ट होण्याची वेळ आली नव्हती. पृथ्वीवरच्या ग्रहाच्या वातावरणाचे उष्णतेने दूषितीकरण होण्याचा संभव नव्हता.

पण दुसरी लाट–संस्कृतीने हे ही करुन दाखविले. तिच्यातील सांस्कृतिक औधत्य, बाकीच्या जगाबाबतची लुटीची वृत्ती या गोष्टींची खरोखर शरम वाटते. माणसाचे चैतन्य आणि शक्ती, कल्पना शक्ती, नको त्या कारणांसाठी फुकट वाया जात असलेली पाहून मन उद्विग्न होते.

आता औद्योगिक खेळ संपला आहे. शक्ती संपुष्टात आल्या आहेत. जिथे जिथे दुसरी लाट संपत आली आहे, तिथे तिथे बदलाची यापुढची, तिसरी लाट येऊ लागली आहे.

दोन बदल असे घडलेले आहेत, की त्यांच्यामुळे औद्योगिक संस्कृती सामान्यपणे चालणे, चालू रहाणे यापुढे शक्य नाही.

पहिली गोष्ट म्हणजे या संस्कृतीने निसर्गाशी इतकी निर्दय लढाई केली, त्याला इतके विद्रूप करुन टाकले आहे की यापुढे औद्योगिक आक्रमण सहन करणे केवळ अशक्य आहे.

दुसरी गोष्ट अशी, की आपल्याला पुनः तयार न होऊ शकणाऱ्या अनिश्चित तऱ्हेच्या ऊर्जेवरही आता पहिल्याप्रमाणे अवलंबून रहाता येणार नाही.

अनुक्रमणिका

तंत्राधिष्ठित समाजाचा तसा शेवट आलेला नाही किंवा ऊर्जाप्रवाह सुध्दा संपला अशातली गोष्ट नाही. परंतु एवढे मात्र खरे की यापुढची प्रगती नव्या परिस्थितीच्या आवाक्यानुसारच होईल. नवीन साधनांची काही व्यवस्था होऊन त्यांनी सहकार्य करेपर्यंत उद्योगप्रधान देशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. आपल्याजवळ स्वस्तात उपलब्ध असलेल्या ऊर्जेचा शेवट जवळ आलेला आहे. आणि याचवेळी स्वस्तातला कच्चा माल कमी प्रमाणात उपलब्ध होऊ लागलेला आहे. वसाहतवादाचा आणि नव साम्राज्यशाहीचा शेवट होत असताना फार मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानावर अवलंबून असलेल्या देशांना नव्या पर्यायांसाठी आणि साधनांसाठी अंतर्मुख झाले पाहिजे. किंवा आर्थिक बंध हळूहळू ढिले करत एकमेकांकडून ती मिळवली पाहिजेत. यापैकी काहीही केले तरी किंमती कडाडणार आहेत. ऊर्जेप्रमाणे इतरही उपलब्धींचा पायाच बदलला जाणार आहे.

औद्योगिक समाजांवर बाहेरुन पडणारे हे ताण आणि अंतर्गत ताणही इतके वाढलेले आहेत, की लोकप्रणाली, संस्था देखील तटून फुटून कोलमडून पडायच्या बेतात आले आहेत. पोस्ट, शाळा, युध्द विभाग, आरोग्य सेवा संस्था, नागरी संस्था, आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था, राष्ट्रे देखील आता संकटस्थितीत आहेत समलिंगी संबंध कायदेशीर करण्याच्या मागण्या पुढेत येत आहेत, स्त्री मुक्ती चळवळ चालू आहे. लोक व्यवसायातल्या आपल्या भूमिकांशीही प्रतारणा करत आहेत. उदा : पोलीस, शिक्षक, कामगारांच्या भागीदारी विषयक व इतरही मागण्या वाढत आहेत. आपल्या भूमिकांविषयी सर्वांचेच असे विचलित होणे ही गोष्ट अतिशय क्रांतिकारक ठरते आहे. राजकीय उठाव, किंवा चाली ज्यांच्याद्वारे मथळे लिहिणारे लेखक बदल मोजतात, त्यांच्यापेक्षाही ही गोष्ट चिंतनीय आहे. कारण ज्या पायावर औद्योगिकीकरण उभारले गेले होते, तोच डळमळतो आहे.

दुसरी लाट संस्कृती अशा तऱ्हेने कोसळली. त्यामुळे व्यक्तिमत्त्वाच्या बाबतही आणीबाणी निर्माण झाली आहे. आज लाखो लोक आपल्या स्वतःच्या सावल्या शोधण्यासाठी धडपडत आहेत. वखवखलेले सिनेमा, नाटके, कादंबऱ्या, आणि स्वतःला मदत करणारी पुस्तके कितीही चमत्कारिक असली तरी ती या लोकांना आपली हरवलेली ओळख शोधायला मदत करतात.

या आणिबाणीचे बळी झालेले लोक समूह उपचार, गूढवाद आणि लैंगिक खेळ यांच्यात स्वतःला झोकून देऊ लागले आहेत. त्यांना आपले सध्याचे अस्तित्व झुगारुन द्यायचे आहे आणि नव्या जीवनाकडे झेपावयाचे आहे, नवीन काही तरी व्हावयाचे आहे. त्यांना कामात बदल हवा आहे, भूमिका बदलून हवी आहे, जबाबदाऱ्या बदलून हव्या आहेत.

फार मोठ्या प्रमाणात काही घडू लागलेले आहे. सतत बदल घडू लागले आहेत. एकमेकांशी काही ना काही संबंध असणाऱ्या या बदलाच्या लाटांच्या टकरींचा विचार करताना आपल्याला आपल्या स्वतःच्या पिढीबद्दलची महत्त्वाची बाब समजते ती ही, की औद्योगिकीकरण मरु घातले आहे. आणि खरोखरच नव्या असलेल्या बदलांची ओळख पटून आपण म्हणतो, बदलाची तिसरी लाट वेगाने यायला लागली आहे. तीच आता आपली जीवने घडवणार आहे. आपण हे स्थित्यंतर सहजपणे घ्यायला हवे आहे. आपल्याला स्वत्व राखून नव्या परिस्थितीशी जुळते घेणे जमायला हवे आहे. आपल्याला तिसरी लाट ओळखता यायला हवी आहे. मग आपणही तिची उभारणी होण्यासाठी हातभार लावू शकू.

अनुक्रमणिका

नवीन प्रगतीची, नवीन शक्तीची चिन्हे दिसून येऊ लागली आहेत. आणि आपण जर लक्षपूर्वक ऐकले तर आपल्याला रौरवत येणाऱ्या आणि आपल्यापासून फार दूर नसलेल्या तिसऱ्या लाटेची गर्जना खचितच ऐकू येईल.

अनुक्रमणिका

# तिसरी लाट

अनुक्रमणिका

# आठ । नवीन संयोग

इ. स. १९५० सालच्या जानेवारीत, विसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धांशाचा पडदा उघडला. अशावेळी रात्री अमेरिकेच्या विद्यापीठीय डिप्लोमाचा ताजा शिक्का धारण करणारा एक बावीस वर्षीय सडपातळ युवक आपल्या मैत्रिणीला बरोबर घेवून बसमध्ये चढून हिंडायला बाहेर पडला. त्यात त्याचा विशिष्ट हेतू होता! नव्या अर्धशतकांचा उदय पहायला उत्सुक झालेल्या त्या युवकाला ती पहाट कशी दिसली, तर गनमेटलची बनलेली दिसली! कारण त्यावेळी पाऊस पडत होता, आणि बसच्या खिडकीतून सतत दिसत राहिले ते कारखाने! कारखाना हेच त्या युगाचे ठळक चिन्ह होते.

निम्न मध्यम वर्गातल्या त्या मुलाचे तिथपर्यंतचे आयुष्य काहीसे सुखाचे गेले होते. त्या अगोदरची त्याची चार वर्षे टी. एस. इलियट, प्लेटो, कला, इतिहास आणि सामाजिक तत्त्वज्ञानाच्या संगतीत गेली होती. जीवनाचे चित्र त्याला या चष्म्यातून दिसलेले होते. परंतु ते चित्र नंतर पालटले!

पाच वर्षे मी कारखान्याचे जीवन जगलो. क्लार्क किंवा पर्सनल असिस्टंट म्हणून नव्हे तर यंत्रावर काम करणारा एक कामगार म्हणून. एक वेल्डर म्हणून, उभारणी कामातला एक प्रत्यक्ष सहाय्यक नोकर म्हणून, पंचप्रेस मशीन चालविणारा म्हणून पंखे ठराविक आकारात कापून काढत, फौंड्रीच्या यंत्राची जुळणी करत, आफ्रिकन खाणींसाठी धूळ नियंत्रक यंत्रे उभारत, ट्रक्सच्या धातूवरती चकाकी आणत! कारखाना कामगारांना जगण्यासाठी कमाई करायला किती झगडावे लागते याचा मी स्वतः प्रत्यक्षच अनुभव घेतलेला आहे.

मी कारखान्यातील धूळ, घाम, पचवलेला आहे, आणि तसाच फौंड्रीचा धूर ही. वाफेच्या फुस्काऱ्याने माझे कान फुटले आहेत. साखळ्यांच्या किणकिणीने कान किटले आहेत. आणि मिलच्या प्रचंड आवाजाने कानठळ्या देखील बसल्या आहेत. उष्ण धातूने फेकलेली उष्णता मला चटके देऊन गेलेली आहे. असे टिलीनच्या ठिणग्यांनी माझ्या पायांवर जळालेल्याच्या कायमच्या खुणा केलेल्या आहेत. प्रेसवरती हजारो तक्ते पलटताना मी त्याच त्याच हालचाली इतके वेळा केल्या आहेत, की माझे स्नायू आणि माझे मनही नंतर अंगचुकारपणा करु लागले. व्यवस्थापकांनी कामगारांना कसे जाग्यावर ठेवले हे मी पाहिले, तसेच पांढऱ्या कपड्यातल्या ह्या लोकांनाही त्यांच्या वरीष्ठांनी कसे वागवले हे ही पाहिले आहे. मी स्वतः पासष्ट वर्षाच्या एका महिलेला, तिच्या हाताची चार बोटे रक्तपिपासू यंत्राने तोडलेली असताना, सोडविले आहे. अजूनही तिचा आक्रोश माझ्या कानात घुमतो आहे, "जोजस आणि मेरी! मी पुनः काही काम करू शकणार नाही!"

कारखाना कारखाना झिंदाबाद! आज देखील नवनवीन कारखाने उभारले जात आहेत. परंतु ज्या संस्कृतीने कारखाने म्हणजे संस्थाने बनवली, ती मरू लागली आहे. या घडीला कुठे तरी असाच एखादा युवक आपल्या मैत्रिणीसह उभरल्या तिसऱ्या संस्कृतीतील रात्री उत्सुकतेने फिरत असेल. आणि आता इथून पुढे आपले काम असेच राहील, की त्यांच्या त्या 'उद्या' बाबतच्या उत्सुक शोधात सामील व्हायचे!

आणि त्यांच्या या प्रवासाच्या इष्ट स्थळापर्यंत आपण जर त्यांचा पाठलाग करू शकलो, तर आपण कुठे पोचू? समुद्रीभूगोल संशोधनाच्या प्रयोग शाळेत? जातीय कुटुंबात? कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संशोधकांच्या

अनुक्रमणिका

गटात? कडव्या धर्मपंथात? ते स्वयंप्रेरणेने साधे रहाताहेत, की ते सहकाराच्या शिडीने वर चढताहेत? ते दहशत वाद्यांवर बंदुका झाडताहेत? ... भविष्य कोणीकडे चालले आहे?

आपण जर अशीच एखादी मोहीम आखणार असू तर आपण आपले नकाशे कशा प्रकारे तयार करावयाचे? असे म्हणणे सोपे आहे, की वर्तमानातून भविष्य उदय पावते. पण वर्तमान कोणते? आजचे आपले वर्तमान विरोधाभासाने स्फोटक बनलेले आहे. आपली मुले अमली द्रव्ये लिंग विषय, किंवा अंतराळ उड्डाण अशा सर्व ज्ञानाबाबतीत अत्याधुनिक झालेली आहेत. आपल्या माता पित्यांपेक्षाही या पैकी काही मुलांना कॉप्युटर्सबद्दल अधिक माहिती आहे. तरी देखील त्यांच्या शैक्षणिक चाचण्या लंबका प्रमाणे अस्थिर निकाल दाखवितात. घटस्फोटांचे प्रमाण वाढत आहे. त्याच प्रमाणे पुनर्विवाहांचेही प्रमाण वाढते आहे. स्त्रियांनी आपले हक्क प्राप्त करुन घेण्याच्या सुमारालाच स्त्रीमुक्ति विरोधी गट उठाव करतात. सुखलोलुपांच्या चैनी चालू आहेत.

अनाकलनीय चलन फुगवट्याच्या पकडीत दुसऱ्या लाटेतील सर्व देश सापडलेले आहेत. एकीकडे बेकारीचा प्रश्न विक्राळ होत चालला आहे. त्याच वेळी मागणी–पुरवठ्याच्या तर्काला धुडकावत लाखोंची मागणी, केवळ नोकरीसाठीच नाही, तर सर्जनशील, मानसिक कृतार्थता देणाऱ्या किंवा सामाजिक जबाबदारीच्या कामासाठी, वाढते आहे. आर्थिक विरोधाभास अनेकांनी वाढत आहेत.

राजकारणात असे आढळून येईल, की तंत्रविद्ये सारख्या प्रमुख विषयांचे राजकारणीकरण होत आहे. अशाच वेळी राजकीय पक्षांच्या सभासदांच्या आपल्या पक्षाबाबतच्या निष्ठा नाहीशा होत आहेत.

आपल्याकडे कॉप्युर्त्सनी पुरवलेले तक्ते आहेत, ढिगाने आकृत्या आहेत, गणिती यंत्रे आहेत, तरी देखील, एवढी सर्व माहिती हातात असूनही, तिच्या आधारे भविष्यात डोकावण्याचे आपले प्रयत्न किंवा वर्तमान जगण्याचेही प्रयत्न हे कला स्वरुपच रहातात. शास्त्रीय सत्य होत नाहीत.

पध्दतशीर संशोधनाद्वारा आपण पुष्कळ काही शिकू. तरी देखील शेवटी आपल्याला विरोधाभासालाच कवटाळावे लागेल, त्याला टाळता येणार नाही. संभाव्य असा काल्पनिक, ठोकताळा निघेल, काहीसा धाडसाचा ठरेल असा संयोगही उमजून येईल.

म्हणून यानंतर आपण येणाऱ्या या पुस्तकाच्या पुढील पानात भविष्याच्या चाचपणी निमित्ताने प्रमुख कल ओळखण्यापेक्षा अधिक काही ज्ञान प्राप्त करण्याची शक्यता आहे.

पुष्कळ लोकांना 'उद्या' हा केवळ पुढे चालू राहिलेला 'आज' वाटतो. ते ही गोष्ट विसरतात, की जे कल (trends) मग ते कितीही कमी जास्त ताकदीचे असोत कार्यान्वित आहेत ते केवळ रेषात्मक रीतीने तसेच चालूच राहूच शकत नाहीत. ते एका अशा कळसाला पोचतात, की त्यांचा स्फोट होतो. आणि त्यातूनच पुनः नवीन, अपूर्व अशा तत्त्वाचा, दृश्याचा जन्म होतो. ते उलट दिशेने जाऊ लागतात. ते थांबतात, पुनः चालू होतात. आज काहीतरी घडते आहे, किंवा तीनशे वर्षे घडत आले आहे, त्याचा अर्थ कधीही असा असू शकत नाही, की ते तसेच चालू रहाणार आहे. आपण नेमके हे विरोधाभास, झगडे, उलट गतीची वळणे, संक्रमण बिंदू पहाणारा आहोत. कारण त्यांच्या द्वाराच 'भविष्य' हे आश्चर्यच असणार आहे.

अनुक्रमणिका

ज्या घटनांचा वरवर एकमेकींशी काही संबंध असलेला दिसून येत नाही, त्यांचे अदृश्य संबंध आपण शोधणार आहोत. कोणतीही गोष्ट बदलल्या शिवाय रहाणार नाही. कारण भविष्य प्रवाही आहे. गोठलले नाही. रोजचे निर्णय बदलल्यामुळे किंवा त्यांच्या जागी दुसरे आणले गेल्यामुळे भविष्य बनत असते.

दुसरी लाट. संस्कृतीने कोणत्याही प्रश्नाचे त्याच्याच घटकात विघटन करण्यावर भर दिला. पडलेले तुकडे एकत्र आणून जागच्या जागी ठेवण्याच्या आपल्या कुवतीला तिने अगदीच थोडा वाव ठेवला. सांस्कृतिक दृष्ट्या पुष्कळ लोक विश्लेषणात कुशल झालेले असतात. संश्लेषण त्यांना फारच कमी येते. त्यामुळे त्यांच्या भविष्यातील आपल्या विषयीच्या म्हणजे आपल्या भविष्यकालीन प्रतिमा चुकीच्या, खंडित, तात्कालिक, जाता जाता जास्त विचार न करता बनवलेल्या असतात. आपण विशेषज्ञा प्रमाणे विचार करण्या ऐवजी सर्वसामान्यपणेच विचार करणार आहोत.

मला असे वाटते, की आज आपण संयोगाच्या, नव्या युगाच्या काठावर उभे आहोत. बुद्धिमत्तेच्या सर्व क्षेत्रात—शास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र—अर्थशास्त्रात तर विशेषत्वाने, आपण आपल्या विशाल दृष्टिकोणाकडे, सामान्य तत्त्वांकडे, विखुरलेले तुकडे एकत्र आणून जुळविण्याकडे परत येणार आहोत. कारण आता आपल्याला हे समजून येणार आहे, की इतके दिवस आपण वाजवीहून जास्त भर, संदर्भ ध्यानी न घेता, परिमाणात्मक तपशीलावर दिला. अधिकाधिक सूक्ष्मसूक्ष्म प्रमाणामध्ये जात छोट्या छोट्या प्रश्नांकडे लक्ष पुरवण्यावर दिला. परंतु कमीत कमी गोष्टीं बाबत जास्तीत जास्त ज्ञान प्राप्त करण्याचा विक्रम आपण केला!

त्यामुळे आपले धोरण असे राहील, की आपले जीवन हालवून टाकणाऱ्या बदलाच्या नव्या प्रवाहांचा अभ्यास करायचा. त्यांच्यातले अदृश्य संबंध उघड करायचे. ते एकेक स्वतंत्रपणे महत्त्वाचे आहेत म्हणून नव्हे, तर हे प्रवाह एकत्र येऊन वहात आहेत आणि बदलाच्या वेगवान, खोल, व रुंद अशा नद्यांमध्ये त्यांचे रूपांतर होत आहे. आणि परिणामतः काही तरी अधिक मोठे असे तयार होते आहे म्हणून काही तरी म्हणजेच तिसरी लाट!

वर्तमानाचे गुह्य समजून घेण्यासाठी त्या तरुण माणसाने शतकाच्या मध्यस्थळी मोहीम काढली होती, तशी संशोधन मोहीम आपण आता भविष्याचा वेध घेण्यासाठी काढणार आहोत. तो आपल्या जीवनातला सर्वात मोठा शोध ठरणार आहे!

अनुक्रमणिका

# नऊ । प्रभुत्वाचे शिखर

८ ऑगस्ट १९६० रोजी न्यूयॉर्कच्या मॅनहटन भागातील रॉकफेलर प्लाजामधील आपल्या ऑफिसमधून एक्झॉन कॉर्पोरेशनचा चीफ एक्झिक्युटिव्ह या नात्याने मन्रो रॅश्बीन याने एक असा निर्णय घेतला आणि जाहीर केला, की भावी भविष्य वेत्ते या निर्णयाचा दुसऱ्या लाटेच्या युगाच्या अंताचे प्रतीक म्हणून निर्देश करतील.

प्रत्यक्ष त्यावेळी या निर्णयाकडे फारच थोड्या जणांचे लक्ष गेले. तेल उद्योगातल्या या मोठ्या कॉर्पोरेशनने तेल उत्पादक देशांकडे भरावयाच्या करात कपात जाहीर केली. परंतु पश्चिमी वर्तमानपत्रांनी दुर्लक्ष केलेला हा निर्णय तेल उत्पादक देशांच्या सरकारांवर वज्राघाताप्रमाणे आघात करून गेला. कारण आपला जवळ जवळ सर्वच महसूल हे देश तेल कंपन्याकडून आलेल्या पैशांतून प्राप्त करीत होते.

काही दिवसातच इतर मोठ्या तेल कंपन्यांनी एक्झॉनच्या पावलावर पाऊल ठेवले. आणि एक महिन्यानंतर, ९ सप्टेंबरला सुप्रसिध्द बगदाद शहरात, या नव्या धोरणामुळे ज्यांच्यावर कठोर आघात झालेल्या देशांचे प्रतिनिधी एकत्र जमले. संकटसमयी घेतलेल्या या सभेत त्यांनी एक कमिटी तयार केली. पेट्रोलियम उद्योगधंद्याच्या वृत्तपत्रांखेरीज बाकीच्यांनी तिकडे दुर्लक्ष केले. इ. स. १९७३ मध्ये योम किप्पूर युध्द सुरु झाले, तेव्हा पेट्रोलियम निर्यातदार देशांच्या संघटनेने (Organisation of Petrolemu ExPorting Countries) एकदम पुढे येत निर्णय घेतला आणि संपूर्ण जगाचा क्रूड ऑइलचा पुरवठा थांबवून टाकला! दुसऱ्या लाटेच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेला कोलमडवणारी अशी ही घटना ठरली.

परंतु O P E C च्या या निर्णयाने तेल महसूल गोळा होणे सोडाच, उलट दुसऱ्या लाटेच्या तंत्रक्षेत्रात खदखदत असलेल्या क्रांतीने वेग घेतला.

## सूर्य आणि त्याच्या पलिकडे

या ऊर्जा विषयक पेचप्रसंगावर तो सोडवण्याच्या दृष्टीने त्यानंतर एकच कर्णकटू आरडाओरड सुरू झाली. आराखडे, योजना, चर्चा, वाद, प्रतिचर्चा, प्रतिवाद आपल्यावर अक्षरशः फेकण्यात आले. त्यामुळे त्यातून योग्य निवड करणे कठीण झाले. अक्षरशः रस्त्यावरच्या माणसांसारखी सरकारांची गोंधळलेली स्थिती झाली!

दुसऱ्या लाटेचा ऊर्जा विषयक पाया पुन्हः नव्याने निर्माण करू न शकणाऱ्या गोष्टीत होता. अतिकेंद्रित आणि संपून जाणाऱ्या थरांतून ऊर्जा मिळत होती. अतिशय खर्चिक अतिकेंद्रित तंत्रावरती अवलंबून होती, तुलनेने फार थोड्या मार्गांनी आणि पद्धतीद्वारा ती मिळत होती. संपूर्ण औद्योगिक युगात औद्योगिक देशांनी ऊर्जा मिळवण्याच्या पायाची ही प्रमुख लक्षणे होत.

ही गोष्ट मनात ठेवूनच आपण ऊर्जा प्रश्नावर सुचविण्यात आलेल्या विविध तोडग्यांचा विचार करावयाचा आहे. या एकूण प्रश्नातला महत्वाचा विचार तेल किती दरात उपलब्ध व्हावे हा नसून औद्योगिक समाजासाठी तयार करण्यात आलेले आणि दुसऱ्या लाटेच्या तत्त्वांच्या परिघातील ऊर्जातळ टिकणार आहेत की नाही, हा आहे.

अनुक्रमणिका

गेल्या अर्धशतकात जगाचा दोन तृतियांश ऊर्जा पुरवठा तेल आणि गॅस यांनी केला आहे. अनेक सरकारांच्या तज्ञांचे असे मत आहे, की कितीही तेल साठे सापडलेले असोत, भूगर्भातून मिळणाऱ्या तेलावर अशा तऱ्हेने अनिश्चित काळापर्यंत अवलंबून रहाणे शक्य होणार नाही.

संख्यागणनात फरक असेल. वादांमध्ये हे सर्व किती काळ चालायचे यावर चर्चा होतातच याबाबत असे आढळून येते, की याबाबतीतील पूर्वीची सर्व भाकिते खुळी ठरली! तरी देखील एक गोष्ट मात्र निश्चित, की पृथ्वीत तेल आणि गॅस पुनः पुनः निर्माण करणे कोणालाहि शक्य होणार नाही.

काही दशकांच्या कालावधीत पुनः एकदा ऊर्जा विपुल प्रमाणात उपलब्ध होऊ शकेल. आश्चर्यकारक तांत्रिक संक्रमणे किंवा अर्थकारणातील हेलकावे यांचा तो परिणाम असेल. परंतु काही घडले तरी तेलासाठी आपण जमिनीच्या जितके खोल जाऊ तितक्याच प्रमाणात तेलाच्या किमती सतत वाढतच रहाणार. व्यापारी स्पर्धा वाढतच रहाणार. गेल्या काही वर्षात वेगळेच वळण लागते आहे. नवे शोध लागले असले तरी, किंमती खूप वाढलेल्या असल्या तरी एक गोष्ट खात्रीपूर्वकरित्या सिद्ध झाली आहे, की व्यापारी दृष्टीने फायद्याचे आढळणारे क्रूड ऑइलचे साठे कमीच झालेले आहेत. वाढलेले नाहीत. आणि आकडेवारी असे सांगते, की हा प्रकार गेली काही दशके चालू आहे. पेट्रोलाधिष्ठित युगाची गती आता थांबत आलेली आहे.

ऊर्जेचा उरलेल्यापैकी पुष्कळसा पुरवठा कोळशाने केलेला आहे. अखेरिला तो देखील संपुष्टात येणारच आहे, तरी देखील आता साठा भरपूर आहे. परंतु कोळशाचा वापर वाढवला, की सर्वत्र खराब हवा पसरते. जगाच्या हवेला तो जणू धोकाच होऊन बसलेला आहे. हवेत कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढते. पृथ्वीची नासधूस होते ती वेगळीच. आगामी काही दशकात उद्‌भवणाऱ्या या धोक्यांची आवश्यक म्हणून गणना केली, तरी कोळसा ही गोष्ट मोटारीमध्ये तेल किंवा गॅसचा इंधन पर्याय म्हणून बसू शकणार नाही. वायुरुप किंवा द्रवरुप कोळसा तयार करण्यासाठी यंत्रसंच उभारण्यास खूप भांडवल लागेल आणि पाणीही मोठ्या प्रमाणात लागेल. दोन्ही गोष्टी महाग व अपुऱ्या पडतील अशाच आहेत.

आण्विक तंत्र तर याहूनही भयंकर प्रश्न, त्याच्या या घडणीच्या काळात, आपल्या पुढे उभे करते. सध्याचे अणुप्रकल्प युरेनियमवर अवलंबून असतात. ही वस्तू तर अतिशय महाग, लवकरच संपू शकेल अशी आणि धोकादायक आहे.

आपल्याला हे माहीत हवे, की आपण मागे मध्ययुगाकडे परतू शकणार नाही; आणि पुढे आर्थिक प्रगती होणे अशक्य आहे. पण एक गोष्ट खरी, की आपण एका सरळ रेषेच्या सरत्या टोकापर्यंत येऊन पोहोचलो आहोत. आणि आता आपल्याला दुसरी रेषा सुरु करायला हवी आहे. दुसऱ्या लाटेचा ऊर्जा पाया आपल्याला आधार देण्याला पुरा पडणार नाही.

खेड्यात असो, की शहरात की औद्योगिक अर्थकारणात असो, ऊर्जा पाया समाजाच्या तांत्रिक पातळीला, लोक संख्येला, आणि इतरही कितीतरी विषयांना योग्य ठरेल असा असावा लागतो. दुसऱ्या लाटेतील ऊर्जा पाया समाजाच्या तांत्रिक क्षेत्रातील नव्या अवस्थेतील प्रगतीशी संलग्न होतो. ज्या भूगर्भ इंधनाने दुसऱ्या लाटेतील तांत्रिक प्रगतीला वेग दिला. त्याच इंधनाचा त्याच तंत्राने दुष्टपणे, इंधनाला हपापत, जवळ जवळ अक्षरशः निचरा करून टाकला. आज आपण ऐतिहासिक ठरु शकेल अशा नव्या

अनुक्रमणिका

तांत्रिक झेपेचा पवित्रा घेतलेला आहे. OPEC ला आपले चंबूगवाळे आवरावे लागेल. कारण आपण नवनव्या इंधन सामग्रीचा शोध घेऊ लागलो आहोत. निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळ्या स्वरुपात दिवस, रात्र, वर्ष या निरनिराळ्या काळी, पूर्वी स्वप्नातही आले नसतील अशा हेतूंच्या पूर्तीसाठी आपल्याला इंधनाची गरज आहे. आपण ती पुरी करण्याच्या प्रयत्नाला लागलो आहेत.

या बाबतच्या आपल्या शोधाला गती आलेली आहे. आपण त्यासाठी आपली कल्पनाशक्ती आणि पैसा विपुल प्रमाणात वापरु लागलो आहोत. आपण आपला ऊर्जा पाया बदलत असताना आर्थिक व इतरही बाबतीत आपल्याला बरेच चढउतार पहावे लागणार आहेत; यात शंका नाही. परंतु त्याला एक आशावादी पैलूही आहे. पूर्वी कधी मिळाल्या नसतील अशा या बाबतीतील थक्क करणाऱ्या शक्यता आता आढळू लागल्या आहेत.

आताच याबाबतीतली काटेकोर विधाने करणे आपल्याला शक्य नाही. परंतु आपण हे ठामपणे म्हणू शकतो, की आपल्याजवळ असलेली साधने आणि ऊर्जा, या नवीन, परक्या शक्यतांमुळे नक्कीच लटपटतील. तेल किंमती आणखी भडकल्या तरी त्यांची आपल्याला पर्वा वाटणार नाही.

टेक्सास इन्स्ट्रुमेंट्स्, सोलरेक्स, एनर्जी कन्व्हर्शन डिव्हाइसेस या आणि इतर अशा कितीतरी संस्था सूर्य प्रकाशापासून ऊर्जा मिळवू पहात आहेत. रशियनांची योजना अशी आहे, की पवनचक्कीचा वापर करायचा, तिच्यात फुग्यांची योजना करायची. उंची मोजणे जिथे थांबते, अशा ठिकाणी त्यांची योजना करुन वीज पृथ्वीकडे, तिच्याकडे पाठविलेल्या तारांतून परावर्तित करायची. न्यूयॉर्क शहराने एका खाजगी कंपनीकडे इंधन म्हणून कचरा जाळून देण्यासाठी करार केला आहे. फिलिपीन बेटे नारळाच्या रद्दीपासून वीज निर्मिती करण्यासाठी यंत्रसंच उभारत आहेत. इटली, आइसलंड, न्यूझीलंड खुद्द पृथ्वीच्या पोटात असलेल्या उष्णतेपासून वीज मिळवू लागले आहेत. जपानच्या होन्शू बेटानजिक उभारण्यात आलेल्या यंत्रसंचाद्वारां लाटांच्या शक्तीपासून वीज निर्मिती सुरु झाली आहे. सूर्य प्रकाशापासून शक्तीं मिळवण्यासाठी जगभरच्या कित्येक छपरांवर संच बसविण्यात आले आहेत. दक्षिण कॅलिफोर्नियात एडिसन कंपनी एक 'पॉवर टॉवर' उभारत आहे. या योजनेत कॉम्प्युटरनी चालवलेले आरसे बसविण्यात येणार असून टॉवरवरच्या स्टीम बॉयलरवर त्यांची एकाग्रता एकवटली जाणार आहे. अशा व्यापातून नियमित ग्राहकांनी कंपनी वीज पुरवणार आहे. जर्मनीतल्या डॅमलर बेन्झ कंपनीने हैड्रोजन पॉवरवर चालणारी बस तयार केली आहे. कॅलिफोर्नियाच्या लॉकहीडचे इंजिनियर हैड्रोजन पॉवरवर चालणारे विमान तयार करत आहेत. अशी कितीतरी नवी दालने खुली होत आहेत.

ऊर्जा साठविण्याच्या आणि तिचे प्रसारण करण्याच्या नवीन मार्गांचाही विचार चालू आहे. अशी कितीतरी तंत्रे सध्या प्राथमिक अवस्थेत आहेत, आणि काही अव्यवहार्यही ठरतील याबाबत शंका नाही. परंतु काही निश्चितच एक दोन दशकांच्या कालावधीत व्यापारी दृष्टीने योग्य ठरतील; याबाबतही शंका नाही. आपण सध्या संक्रमणपूर्व अवस्थेत आहोत. एकदा आपण नवीन तंत्राचा संयोग करु लागलो, की नवीन शक्तिशाली पर्याय आपोआप पुढे येतील, आणि तिसऱ्या लाटेच्या उभारणीची गती वाढेल.

दुसऱ्या लाटेच्या ऊर्जा—पायाशी अतिगाढ परिचय झालेला, त्याच्याशी व तंत्राशी रुळून गेलेले दुसऱ्या लाटेच्या ऊर्जापायाचे समर्थक अर्थातच या साऱ्या गोष्टींना विरोध करतात. दुसऱ्या लाटेच्या शक्तींचा अजूनही पगडा आहे.

अनुक्रमणिका

आणि नव्या तिसऱ्या लाटेच्या ऊर्जा पायांच्या प्रगतीच्या बाजूने असणाऱ्या शास्त्रज्ञांचा, परिस्थितीवादींचा, काही प्रमुख उद्योगांचे एन्ट्रिपेन्युअर्स, व ग्राहकांच्या गटांचा एकोपा दिसत नाही. ते विखुरलेले आहेत, त्यांच्याकडे पैसा कमी आहे, आणि ते राजकीयदृष्ट्या नेहमी हास्यास्पद स्थितीत असतात. याहूनही वाईट गोष्ट म्हणजे नवीन तिसऱ्या लाटेचे समर्थक स्वतःच काहीशा गोंधळलेल्या मनःस्थितीत आहेत.

परंतु तरीही अजून कुठे कुठे अस्तित्वात असलेले शेतीप्राधान्य, दुसऱ्या लाटेचा प्रभाव या दोन्ही गोष्टीतील धोरणे शेवटी जिंकू शकणार नाहीत. कारण यापैकी पहिल्या प्रकारातील लोक काहीसे कल्पनारम्यतेत गुंगणारे आहेत, तर दुसऱ्या प्रकारचे लोक ज्या गोष्टीत आता फारसे काही करता येणार नाही, त्या ऊर्जा–पायाला धरुन बसलेले आहेत.

सतत कठोरपणे वाढत जाणारी दुसऱ्या लाटेच्या इंधनांची मूल्ये तिच्याच हितांच्या विरोधी कार्य करत आहेत. ऊर्जा तंत्रासाठी लागणाऱ्या तंत्राच्या गगनचुंबी भांडवली खर्चामुळेही तिच्यावर विरुद्ध परिणाम होत आहेत. तुलनेत कमी किमतीची ऊर्जा प्राप्त करण्यासाठी अधिक किंमत मोजावी लागते आहे. दूषितीकरणाचा भयानक प्रश्न तिच्या विरोधाचेच कार्य करीत आहे. आण्विक जोखीम तसेच विरोधी कार्य करते आहे. औद्योगिक नसलेल्या देशांची स्वतःच्या ऊर्जेची तहान आणि तिच्या उगमांसाठी लागणाऱ्या अधिक किंमतीही विरोधी कार्य करीत आहेत.

खुद्द दुसऱ्या लाटेतच परस्परविरोधी गोष्टी तयार झालेल्या आहेत. दुसऱ्या लाटेच्या शक्ती प्रबळ असल्याचे व तिचे तिसरी लाटवादी टीकाकार दुर्बल असल्याचे भासत असेल, तरी देखील गतेतिहासाचा हवाला देत भविष्याबाबत पैजा मारणे मूर्खपणाचे ठरेल. दुसऱ्या लाटेचा ऊर्जा पाया उलटवला जाणार याबाबत शंका नाही. प्रश्न फक्त आहे तो हा, की किती लवकर हे घडणार? कारण ऊर्जेबाबतचा हा झगडा अटळपणे दुसऱ्या तितक्याच महत्त्वाच्या बाबीच्या बदलाशी निगडित झालेला आहे : दुसऱ्या लाटेच्या तंत्रज्ञानाला उलथवणे.

## उद्याची साधने

कोळसा, रेल्वे, कापड गिरण्या, पोलाद, स्वयंचलित याने, रबर, मशिन टूल उत्पादन हे दुसऱ्या लाटेचे खास उद्योग होत. साध्या विद्युत् यांत्रिक तत्त्वांवरच मुख्यतः अवलंबून असणाऱ्या या उद्योगांनी मोठ्या प्रमाणात ऊर्जा खेचली, प्रचंड प्रमाणात प्रदूषण व रद्दी निर्माण केली आणि दीर्घकाळ उत्पादन करीत रहाणे, कमी कौशल्य, गरजा, पुनरावृत्त काम, प्रमाणित वस्तु आणि अतिकेंद्रित सत्ता ह्या वैशिष्ट्यांनी ते ओळखले जात होते.

इ. स. १९५० च्या दशकमध्यात औद्योगिक देशात हे उद्योग मागासलेले वाटू लागले होते. हे देश, हे जुन्या पद्धतीचे उद्योग विकसनशील देशांकडे स्थलांतर करू लागले होते. तेथे मजूर स्वस्तात मिळत होते. तंत्र कमी प्रगत होते, त्यांचा सामाजिक प्रभावही मरु घातला होता. आणि नवीनच उद्योगांचा चैतन्यपूर्ण संच त्यांची जागा घेण्यासाठी पुढे सरसावत होता.

अनुक्रमणिका

हे नवीन उद्योग पूर्वीच्या उद्योगांहून अनेक बाबतीत भिन्न होते. ते निव्वळ विद्युत—तंत्रज्ञानावर अवलंबून राहिले नव्हते, त्याच प्रमाणे ते दुसऱ्या लाटेच्या युगाच्या शुद्ध शास्त्रावर अवलंबून राहिले नव्हते. त्यांनी मिश्रशास्त्रीय मार्ग स्वीकारला. ते त्या वेळी नुकत्याच वर येत असलेल्या, ज्या पैकी काही पंचवीस वर्षांपूर्वी पर्यंत अस्तित्वातही नव्हत्या. त्या पद्धतीद्वारा संक्रमणे करीत राहिले. क्वांटम्, इलेक्ट्रॉनिक्स माहितीवर आधारलेली पद्धत, व मोलेक्युलर बायॉलॉजी, समुद्रशास्त्र, अणुशास्त्र, अंतराळ विज्ञान अशा त्या पद्धती होत्या. या गोष्टींमुळे त्यांनी, दुसऱ्या लाटेच्या उद्योगांनी ज्या गोष्टींवर प्रभुत्व मिळविण्याची आशा बाळगली होती. अशा, स्थलकालात ठळकपणे उरू शकतील अशा, कितीतरी गोष्टींच्या पलीकडे झेप घेतली.

ही नवी शास्त्रे आणि मुळातच वाढलेल्या कौशल्यपूर्ण कुवती यांच्या द्वारे नव्या उद्योगांचा जन्म झाला.— कॉम्प्युटर्स, डेटा प्रोसेसिंग, एरोस्पेस, प्रगत पेट्रो केमिकल्स, सेमी कंडक्टर्स, प्रगत दळणवळण, आणि असेच कितीतरी उद्योग.

जिथे लोकांनी तिसऱ्या लाटेच्या तत्त्वांचा अंगीकार करून त्या तंत्राने उद्योग सुरु केलेत, त्या भागात वेगळे चित्र दिसते. या तांत्रिक हेलकाव्यांची परिणाम म्हणूनच न्यूयॉर्कमध्ये, कितीतरी काळ झाला व आर्थिक पेचप्रसंग निर्माण होऊन राहिला आहे. जुनी कामे जाऊन नवी आली, त्याचप्रमाणे तंत्र बदलले. याचा परिणाम होऊन समृद्धी आली. अमेरिकेतील कथाकथित सूर्यपट्ट्यातील संस्थानांनी मोठ्या प्रमाणात संरक्षण संबंधी करार मिळाल्यामुळे प्रगत असा तांत्रिक तळ उभारला आहे. या उलट जुन्या औद्योगिक प्रदेश ईशान्य भाग व ग्रेट लेक्सच्या आसपासचा प्रदेश एकदम शिथिल झाला. त्याला ग्लानी आली. दिवाळखोरीच्या जवळपास तो येऊन ठेपला आहे.

तिसऱ्या लाटेच्या आर्थिक तत्त्वावर उभे असलेले विभाग भरभराटीला आले आहेत. दुसऱ्या लाटेच्या उद्योगांवर अवलंबून असलेल्या विभागांना ग्लानी आलेली आहे. या बदलातून निर्माण होणाऱ्या वेदना कमी करण्यासाठी आज कितीतरी देश रचनात्मक बदल करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहेत.

आज संबंधित उद्योगांचे चार पुंज मोठ्या प्रमाणात विकसित होत आहेत. आणि तेच पुढे तिसऱ्या लाटेच्या युगाचा कणा बनून रहाणार आहेत. आपल्यासह ते आर्थिक शक्ती, सामाजिक आणि राजकीय मांडणीत मोठे बदल आणणार आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स् आणि कॉम्प्युटर्स हा असा ठळकपणे लक्षात येऊ शकणारा गट आहे. जगाच्या पाठीवर अस्तित्वात येणारा इलेक्ट्रॉनिक्स् उद्योग हा तसा नवीनच उद्योग आहे. परंतु खात्रीने हा जगातल्या मोठ्या उद्योगातील चवथा उद्योग बनणार आहे. पोलाद, स्वयंचलिते आणि रसायने यांच्यानंतर हाच उद्योग प्रमुख बनणार आहे. कॉम्प्युटर किती वेगाने सर्वत्र पसरला, ही गोष्ट सर्वांनाच माहीत आहे. स्वस्त मिनी कॉम्प्युटर आज अमेरिकेतल्या प्रत्येक घरावर आक्रमण करण्याच्या पवित्र्यात आहे!

बँका, दुकाने, सरकारी कचेऱ्या, कामे करण्याच्या अशाच इतर जगांमधून कॉम्प्युटर कार्यरत होत असल्याने धंदा, उत्पादन, वितरण यांच्याखेरीज कामाचे स्वरुप फार काय कुटुंबरचना देखील नवा आकार धारण करणार आहेत.

अनुक्रमणिका

इलेक्ट्रॉनिक्स् उद्योगाचीही भरभराट होऊ लागली आहे. कॅल्क्युलेटर, डायोड वॉचेस, टी. व्ही., स्क्रीन गेम्स आता लोकांना चांगले माहीत झालेले आहेत. पण ही तर नुसती चुणूक आहे. ही प्रगत शास्त्रे आजच्या मानाने कितीतरी प्रगत आणि सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञान देऊ शकणारी उपकरणे आपल्या सेवेस हजर करू शकणार आहेत. त्यानंतर मग हवामान, शेती, औषधोपचार, याबाबतीतील शारीर स्थितीचा अंदाज घेणारी व देणारी कपडे वगैरेत अंतर्भूत असलेली नवी उपकरणे आणि इतरही कितीही सुविधा आपल्या विविध ज्ञान संपादनाचा मार्ग वेगाने खुला करतील, आणि सुरक्षिततेचाही, कदाचित भार आपल्यावर घेत आपल्याला फार मोठा दिलासा देतील.

ऊर्जा पेचप्रसंगामुळे उद्योगांच्या प्रगतीकडील वेगात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याचीच शक्यता आहे. दुसऱ्या लाटेच्या युगाला तांब्यांच्या जणू खाणींचीच खूप मोठ्या प्रमाणात आवश्यकता होती. कारण संदेश वहनाचे फार मोठे कामा पार पाडणाऱ्या या यंत्रणेसाठी मैलोगणती तांब्याच्या तारांची आवश्यकता होती. आता आपण यात बदल करू लागलो आहोत. तांब्याच्या तारांची जागा वजनाच्या आणि केसाइतक्या पातळ असलेल्या फायबर्सना (फायबर ऑप्टिक सिस्टीम वापरून) आपण देऊ लागलो आहोत. फायबर्सची योजना फार स्वस्त आणि श्रम वाचवणारीही ठरत आहे. अमुक एक काम करण्यासाठी जेवढ्या फायबर्सची आवश्यकता आहे, तेवढेच काम करण्यासाठी लागणाऱ्या तांब्याच्या तारा तयार करण्यासाठी त्याच्या हजारपट ऊर्जा खर्च येत होता! ९० मैल तांब्याची तार करण्यासाठी लागणारा तेवढाच कोळसा ८०,००० मैल फायबर तयार करू शकतो!

इलेक्ट्रॉनिक्समुळेही खूपच बचत होते. कमीत कमी ऊर्जा वापरणाऱ्या भागांची दिवसेदिवस होणारी उत्पत्ती फायद्याचीच ठरते आहे. कमी उत्पादन खर्च शक्य करणाऱ्या तिसऱ्या लाटेच्या उद्योगांनी दुसऱ्या लाटेच्या उद्योगांची जागा वेगाने घेतली तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

इलेक्ट्रॉनिक्सच्या नवीन आणि अनपेक्षित् उपयोगांमुळे कल्पनावादाला दूर सारत सत्य पुढे येईल आणि देशाची आर्थिक घडामोड भरीवपणे बदलून जाईल, अशी शक्यता जाणकार व्यक्त करीत आहेत.

तरीही, इलेक्ट्रॉनिक्सचा हा 'उद्रेक' हे संपूर्णतया नवीन असणाऱ्या तांत्रिक क्षेत्राच्या दिशेने टाकलेले केवळ एक पाऊल असणार आहे!

अवकाश कक्षेतील यंत्रे

जुन्या दुसरी लाट—तंत्राच्या पलीकडे जाणारी आपली एक झेप फारच चकित करणारी आहे. ती म्हणजे अंतरिक्षात आणि सागरात आपण चालविलेला धाडसी उपक्रम.

अवकाश उद्योग हा नव्याने अस्तित्वात येत असलेल्या तंत्रविभागातील दुसरा प्रमुख गट आहे असे म्हणता येईल.

सध्या काही कारणांमुळे उशीर होत असला, तरी पाच स्पेस शटल्स लवकरच अंतराळात वाहतूक सुरु करतील; पृथ्वी आणि अंतराळ यांच्यात जणू आठवड्याच्या वेळापत्रकानुसार लोकांना न्यायला—आणायला—सुरुवात करतील. या गोष्टीचे महत्त्व लोकांच्या फारसे लक्षात आलेले नाही. तथापि अमेरिका

आणि युरोपातील अनेक कंपन्यांना ही “उच्च आघाडी” म्हणजे उच्च तंत्र विज्ञानातील भावी क्रांतीचे उगमस्थान वाटत आहे.

उपग्रह आणि अंतराळ फलाट यांचा ऊर्जा निर्मितीसाठी वापर करून घेण्यासाठी अभ्यास व प्रयोग चालू आहेत. “काही उद्योगांना कक्षा भ्रमणाचा अर्थ उमगू लागला आहे. सेमी कंडक्टर्स आणि औषधे यांच्या दरम्यानच्या विस्तृत विविध विभागीय उत्पादनांचे उत्पादक आणि प्राध्यापक त्याचे महत्त्व समजून आहेत... उच्च तंत्राधिष्ठित वस्तूंना नाजूक आणि समतोल हाताळणीची आवश्यकता असते; आणि तेथे गुरुत्वाकर्षण उत्पातीच ठरणार असते... अंतराळात या गुरुत्वाकर्षणाची काळजी करण्याचे कारणच असणार नाही. तीव्र प्रतिक्रिया उत्पन्न करणाऱ्या वस्तूंची किंवा विषारी द्रव्य हाताळणीची काळजी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. पोकळीचा अनंत पुरवठा तिथे होऊ शकतो. तसेच अति उच्च आणि अति नीच उष्णतामान आपल्याला मिळवता येते.”— असे ‘बिझिनेस वीक’चे म्हणणे आहे.

म्हणून ‘अंतराळीय उत्पादन’ हा शास्त्रज्ञ, स्थापत्य विशारत आणि उच्च तंत्र विशारदांमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण विषय बनून राहिला आहे. या बाबतची किती गडबड उडून राहिली आहे. पहा : फार्मास्युटिकल कंपनींना मॅक्डोनाल्ड डग्लसने एक असे उपकरण देऊ केले आहे की ज्याच्या सहाय्याने मानवी पेशींपासून विविध एन्झाइम्स अलग करणे शक्य होईल. काच उत्पादक आता लेसर आणि फायबर ऑप्टिक्ससाठी माल तयार करण्यासाठी मार्ग शोधत आहेत. युरोकिनेस हे रक्ताची गुठळी विरघणवणारे औषध अशा तऱ्हेच्या जीवघेण्या दुखण्यांनी धोक्यात आलेल्या रोग्यांसाठी जणू वरदानच आहे. या औषधाच्या एका डोसला सध्या २,५०० डॉलर्स उत्पादन खर्च पडतो. जेस्को पुटमेकर या NASA च्या अभ्यासाच्या अंतराळ औद्योगिकीकरणाच्या प्रमुखाचे म्हणणे असे आहे की हे औषध आपण अंतराळात याच्या एक पंचमांश खर्चाने निर्माण करू शकू.

आणि याहून महत्त्वाच्या अशा काही संपूर्णतया नवीन वस्तू आहेत, की ज्यांचे आपण, कितीही पैसे खर्चून, पृथ्वीवर उत्पादन करुच शकणार नाही, परंतु अंतराळात करू शकू. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या त्रासामुळे आपण पृथ्वीवर उत्पन्न करू शकत नाही अशा चारशे मिश्रणांची यादी सध्या TRW या एरोस्पेस आणि इलेक्ट्रॉनिक्स् कंपनीने केलेली आहे. आणि ही मिश्रणे आपण अंतराळात निर्माण करु शकू असा निर्वाळाही दिलेला आहे. अंतराळ व्यापारी व आर्थिक दृष्टीनेही उपयुक्त व सुसह्य व्हावे यासाठी विविध कंपन्या नुसत्या विचारच करत नाहीत, तर प्रत्यक्ष त्या प्रयत्नाला लागलेल्या आहेत.

अंतराळ नगरे उभारण्यास उत्सुक असणारे बुध्दिमान व प्रयत्नशील समर्थक डॉ. ओनील हे आहेत. चंद्र किंवा दुसऱ्या ठिकाणाहून मिळवलेल्या भौतिकापासून हळूहळू, क्रमाक्रमाने, थोडे थोडे काम करीत अंतराळनगर उभे करण्याची डॉ. ओनील यांची कल्पना आहे. त्यांचे सहकारी डॉ. ब्रायन ओलीरी अपोलो आणि ॲमोर या छोट्या ग्रहांवरील खाणकामाबद्दलची शक्यता अजमावत आहेत. चंद्र किंवा इतर ठिकाणाहून आणल्या गेलेल्या भौतिकांवर आवश्यक रासायनिक प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने आणि अंतराळ वस्तीतील ठाण्यांचे आराखडे व उभारणी करण्याच्या दृष्टीने शास्त्रज्ञ नियमित अभ्यास करुन, बैठका घेऊन विचारविनिमय करत आहेत.

अनुक्रमणिका

प्रगत इलेक्ट्रॉनिक्स आणि अंतराळ कार्यक्रम यांच्या संयोगाने पृथ्वीवरच्या उत्पादनांच्या शक्यता ओलांडून तंत्रक्षेत्राला एका नव्याच थरावर आणून ठेवले आहे. दुसऱ्या लाटेच्या समाजाच्या फार पुढे सर्व काही गेलेले आहे.

## खोल खोल समुद्रात

नवीन तांत्रिक क्षेत्रातील तिसरा उद्योगसमूह समुद्राच्या खोलीकडे घेतलेल्या उडीत सामावलेला आहे. समुद्रात खोलवर जाण्याच्या आपल्या साहसात बाह्य अंतराळात आपण घेत असलेल्या झेपेचे प्रतिबिंबच जणू पडलेले आढळेल.

आपल्या या भुकेल्या जगातील अन्नसमस्येवरचा तोडगा ठरेल अशीच भरीव मदत समुद्र करणार आहे. आपल्याला अत्यंत आवश्यक असलेल्या प्रोटीनचा अखंड पुरवठा करायला तो समर्थ आहे. मात्र या क्षेत्रातही आपल्याला योजनाबध्द 'शेती' करावी लागणार आहे. आज जपान आणि रशिया उद्योगधंद्याच्या तत्त्वावर मासेमारी करत आहेत. ती इतकी क्रूर आहे, की मत्स्य जगतातल्या काही जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. याउलट आपण जर आपल्या अक्कल हुषारीने मत्स्योत्पादन व मत्स्यपालन हाती घेतले, तर आपल्याला कसलीही चिंता करण्याचे कारण उरणार नाही. सजीव सृष्टीतल्या समतोलाला धक्काही लागणार नाही. आणि आपलेही पोषण होईल.

सध्या घाईघाईने समुद्र किनाऱ्यांलगत समुद्रतळांशी आढळलेल्या तेल क्षेत्रातून समुद्रतळाखालच्या तेल साठ्यांचा उपसा केला जातो आहे. ही घाई तशी घातकच ठरणार आहे. कारण तेल साठ्यांच्या साठवणीला त्यामुळे बाधा येण्याची शक्यता आहे. म्हणजे इथेही काही धोरण असणे हे दूरगामी परिणामांच्या दृष्टीने आवश्यक आहे.

समुद्राकडून आपल्याला इतरही कितीतरी खनिजे मिळतात. तांबे, जस्त, कथील, चांदी, सोने, प्लॅटिनम आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्यापासून जमिनीच्या शेतीसाठी खते मिळू शकतात ते फॉस्फेटयुक्त दगड आणि माती एकट्या तांबड्या समुद्राच्या तळाशी ३·४ बिलियन डॉलर्स किंमतीचे जस्त, चांदी, तांबे व सोने आहे जवळ जवळ शंभर कंपन्या बटाट्याच्या आकाराच्या मँगेनीजच्या गुठळ्या समुद्रतळावरुन काढून आणायला सज्ज होत आहेत. विशेष म्हणजे मँगेनीज ही पुनः उत्पन्न होऊ शकणारी गोष्ट आहे. जगभरच्या अशा निरनिराळ्या कंपन्यांच्या चार प्रमुख गटांनी हे खाणकाम हाती घेण्याची मोहीम आखली असून ती लवकरच हाती घेण्यात येईल.

हॉफ्मनला रोश ही औषध उत्पादक कंपनी समुद्रापासून नवी द्रव्ये हस्तगत करुन नवी औषधे, नवे बुरशी विरोधक, वेदनाशामके, निदानोपयोगे द्रव्ये व साधने, तसेच रक्तस्राव थांबवणारी औषधे तयार करण्याच्या प्रयत्नात आहे.

अशी ही तंत्रे विकसित होत असतानाच आपल्याला कदाचित् समुद्राच्या पोटात उभारल्या गेलेल्या वसाहती, आणि तरंगते कारखाने पहायला मिळण्याची शक्यता आहे. वारे, उष्णप्रवाह, लाटा अशा समुद्री शक्तींपासून स्वस्तात भरपूर ऊर्जा मिळवणे शक्य आहे.

अनुक्रमणिका

मरीन पॉलिसी ह्या तंत्रविषयक नियतकालिकाचे म्हणणे असे आहे, की समुद्रावर तरंगते फलाट बांधण्याची योजना इतकी सोपी आणि कमी खर्चाची आहे, की जगातले बहुतेक देश, फार काय खाजगी कंपन्या देखील हे काम हाती घेऊ शकतील. आता अशी शक्यता वाटते, की अतिशय गर्दीने त्रासलेल्या औद्योगिक समाजाकडून तरंगती शहरे उभारली जातील. आणि त्यांचा वापर बहुदेशीय कॉर्पोरेशन्सकडून व्यापारी हालचालींची तरंगती ठाणी म्हणून करुन घेतला जाईल. समुद्री उत्पन्नाच्या देवाणघेवाणीसाठी, वितरणांसाठी अन्नसंबंधी कंपन्या तरंगती शहरे बांधतील. अशा काही शहरांची नवीन राज्ये म्हणून सुध्दा घोषणा होणे अशक्य नाही..."

अशा तरंगत्या शहरांच्या आश्रयाने नवीन सहउद्योग निर्माण होण्याचीही शक्यता आहे. समुद्राकडे स्थलांतर करण्याची आर्थिक व व्यापारविषयक कारणे दिवसेदिवस तीव्र स्वरुप धारण करत आहेत. तेव्हा हे घडणेही फार दूरच्या काळातली गोष्ट नाही. शिवाय एक गोष्ट अशी, की हा वैभवशाली वारसा केवळ श्रीमंत राष्ट्रांपुरताच मर्यादित रहाणारा नसून, तो संपूर्ण मानवजातीचा असल्यामुळे याबाबत औद्योगिकीकरण नसलेले देशही विलक्षण हिरीरीने झगडा करत आहेत.

आपण मूलभूतपणेच नव्या ऊर्जा तळाकडे, नव्या तंत्राकडे निघालो आहोत, या गोष्टीचा हा आणखी एक प्रमुख पुरावा.

पण हे सर्व पुरावे व प्रयत्न कमी ठरतील असा अतिशय प्रमुख उद्योग समूह प्रयोग शाळांशी निगडित आहे. उद्याच्या अर्थकारणावर सर्वात जास्त परिणाम करणारी गोष्ट म्हणजे जीवशास्त्रविषयक उद्योग.

जीवोद्योग

दर दोन वर्षांत जीवोत्पत्ती विज्ञानविषयक माहिती अक्षरशः दुप्पट झालेली असते विख्यात शास्त्र प्रवक्ता रिची काल्डर यांनी म्हटले आहे, की "ज्यानुसार प्लॅस्टिक व पोलाद वस्तु आपण कौशल्याने निर्माण करतो, त्याचप्रमाणे आपण आता सजीव वस्तूंचे उत्पादन सुरु केले आहे."

मोठ्या कंपन्या, नवीन जीवशास्त्राच्या अक्षरशः मागे लागलेल्या आहेत. शास्त्रज्ञांनी खनिजाची भूक असणारे मायक्रोब्ज तयार केले आहेत. त्यांचा वापर समुद्री पाण्यात आढळून आलेल्या धातूची प्राप्ती करण्याकरता केला जाईल. नव नव्या कंपन्या अशा मायक्रोब्जच्या विशिष्ट आकार व गुणधर्म संबंधातील खास हक्क स्वतःकडे राखून ठेवण्यासाठी मागणी करत आहेत.

टीकाकार—ज्यांमध्ये अनेक शास्त्रज्ञ सामील आहेत— काळजीत पडलेले आहेत. त्यांना तेलाच्या सुरनळ्याऐवजी मायक्रोब सुरनळ्या दिसताहेत. या जिवंत नळ्या रोग पसरवायला किंवा संपूर्ण जनसंख्या मोठ्या प्रमाणात खाऊन टाकायला पुरेपूर समर्थ आहेत अशी त्यांची भीती आहे. या विषारी जिवाणूंची निर्मिती आणि त्यांचा अचानक होणारा प्रसार हे काही काळजीचे एकमेव कारण नाही.

विचारात अशा प्रकारच्या गोष्टी गोंधळ घालू लागल्या आहेत की ओले गवत आणि कडबा पचवणाऱ्या गाईंसारखी पोटे असणाऱ्या मानवाची निर्मिती करता येईल का? खालच्या दर्जाचे अन्नसेवक करून ते पचवता येण्याची पात्रता मानवात आली तर अन्नप्रश्न कितीतरी मोठ्या प्रमाणात सुटला, असेच

होईल. दुसरा विचार म्हणजे ज्या त्या कामाच्या आवश्यकतेनुसार योग्य तन्दुरुस्ती धारण करतील असे शारीरिक बदल आपल्याला कामगारांमध्ये करता येतील का?... निकृष्ट दर्जाच्या लोकांची संपूर्ण गच्छन्ती करून वरिष्ठ व उत्तम दर्जाचे लोक आपल्याला तयार करता येतील का?... आपल्या वतीने लढाई करण्यासाठी आपण सैनिकांची 'कलमे' तयार करू शकू का? जन्माअगोदरची जन्म घेणाऱ्याची अवस्था आपल्याला समजेल का? म्हणजे तसे झाल्यास जन्माला येऊ नयेत अशा स्वरुपाचे जीव जन्माला येण्याअगोदरच आपण नष्ट करुन टाकू शकू! आपल्यासाठी आपण जादा अवयवांचा साठा करून ठेवावा काय? म्हणजे एखादा अवयव उदा : किडनी, लिव्हर, फुफ्फुस इ. निकामी किंवा धोकादायक झाला, तर त्या जागी दुसऱ्या अवयवाची योजना करून टाकायची की झाले काम!

ऊर्जा समस्या सोडवणारे जीवाणु उत्पन्न करता येतील का? शास्त्रज्ञ आता सूर्यप्रकाशाचे विद्युत् रासायनिक ऊर्जेत रूपांतर करू शकतील अशा सूक्ष्म जंतूंच्या निर्मितीचा विचार करत आहेत. "बायॉलॉजिकल सोलर सेल्स्"चा विचार चालू आहे. अणुशक्ती केंद्राची जागा घेऊ शकतील अशा सजीव प्रकारांच्या उत्पत्तीचा विचार चालू आहे. म्हणजेच किरणोत्सारी प्रसारणाऐवजी आपण आता जीवोत्सारी प्रसारणाची योजना करण्याचे योजू लागलो आहोत.

आतापर्यंत ज्या रोगांवर आपण मात करू शकत नव्हतो, अशा रोगांना आपण काबूत आणू, नाहीसेही करून टाकू यात शंका नाही. परंतु दुर्लक्ष केल्यामुळे किंवा आकसामुळेही आपण पूर्वी नव्हते असे, अधिक घातकही असू शकतील असे नवे रोग निर्माण करण्यास हयगय करणार नाही असे दिसते.

उद्योगात केला जाणारा जिवाणूंचा उपयोग प्लॅस्टिक, खते, कपडे, रंग आणि इतर हजारो तऱ्हांच्या पदार्थांच्या निर्मितीत भासणारी तेलाची गरज पुष्कळच कमी करील. लाकूड, लोकर, आणि अशाच इतर 'नैसर्गिक' वस्तूंच्या निर्मितीतही लक्षणीय बदल घडून येतील. युनायटेड स्टेट्रस् स्टील, फियाट, हिताची अशा प्रसिद्ध कंपन्यांमध्ये अशा जीवशास्त्रज्ञांचे खास विभाग तयार केले जातील.

शेती क्षेत्रातही लवकरच अन्नाच्या पुरवठ्यात वाढ करण्यासाठी आपल्याला या नव्या विभागाची मदत घ्यावी लागेल. सहाव्या दशकातल्या हरितक्रांतीचा बोलबाला झाला. पण ह्या क्रांतीसाठी कृत्रिम रासायनिक खते वापरणे अगत्याचे होते. आता जैविक शेतीक्रांती होण्याची शक्यता आहे. तिच्यामुळे कृत्रिम खतांची निकड कमी होईल. वालुकामय किंवा क्षारयुक्त जमिनीतही शेती उत्पन्न काढण्याचे प्रयत्न चालू रहातील. शेती उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल. सर्वदूर पसरणाऱ्या दुष्काळाचा शेवट करणे शक्य होईल. आणि संपन्नता आली, की गरीब देश आणि श्रीमंत देश यांच्या मधली दरी निश्चितच कमी होईल.

एक गोष्ट मात्र उघड आहे, की तीनशे वर्षांच्या जुन्या, दुसऱ्या लाटेच्या विद्युत् यांत्रिक तांत्रिक चौकटीत आपण अडकून पडणे आता शक्य नाही. आणि ही गोष्ट केवळ ऐतिहासिक महत्त्वाची ठरणार आहे यात शंका नाही.

नवीन तंत्रे एकमेकांशी संलग्न होऊन काम करू लागेपर्यंत आपल्याला त्यांच्या परिणामांचे महत्त्व पटणे तसे कठीणच आहे. मात्र एकदा का हे घटक एकत्र आले, की इतिहासाने पाहिला नसेल इतका अभूतपूर्व असा नवीन शोधांचा पूरच लोटणार आहे. आपण तिसरी लाट—संस्कृतीसाठी नाट्यपूर्ण नाविन्य असलेल्या नव्या तांत्रिक क्षेत्राची उभारणी करू लागलो आहेत.

अनुक्रमणिका

तांत्रिक उठाव

तीनशे वर्षांपूर्वी जेव्हा नवीन तंत्रज्ञान पुढे आले, तेव्हा त्या बाबतीत सर्वांनी एकच प्रश्न विचारला, की त्याच्यामुळे लष्करी तडाखा अधिक प्रभावी होणार आहे का? पण आताच्या या नव्या तंत्रज्ञानाला याखेरीज आणखीही कडक प्रश्नांची उत्तरे देण्याची आवश्यकता असणार आहे. या चाचण्या असे विचारणार आहेत, की सजीवांच्या एकमेकांशी असणाऱ्या नात्यांतील संबंधांवर सामाजिक, आर्थिक किंवा धोरणात्मक विचारांवर त्यांच्यामुळे काय परिणाम घडणार आहेत?

कोणतीही गोष्ट किंवा कोणतेही तंत्र नव्याने पुढे आले, की प्रस्थापितांचे कैवारी त्या गोष्टीला किंवा तंत्राला जीव तोडून विरोध करीत रहातात. तीनशे वर्षांपूर्वी नवीन तंत्र आले तेव्हा त्यालाही विरोध झाला. यंत्रमार्गावरील फ्लाइंग शटलचा क्रांतिकारक शोध लावणाऱ्या जॉन केच्या घरावर हल्ले झाले व त्याचे प्रचंड प्रमाणात नुकसान करण्यात आले. असेच कितीतरी प्रकार झाले.

त्यापैकी अधिक प्रसिद्धी पावलेले उदाहरण म्हणजे इ. स. १८११ साली स्वतःला ल्युडिट्स् म्हणवून घेणाऱ्या मोडतोडवाद्यांनी त्यांची मागयंत्रे मोडून त्यांचा विध्वंस केला.

आता नवीन तंत्रालाही विरोध होत आहे. फरक एवढाच की हे विरोधक स्वतः सुशिक्षित आहेत, शास्त्रज्ञ आहेत, डॉक्टर आहेत, तंत्रविद् आहेत, सार्वजनिक आरोग्याबाबतचे अधिकारी आहेत. त्याच प्रमाणे लाखो सामान्य नागरिकही त्यांच्या समवेत आहेत. ल्युडिट्स् प्रमाणे ते अशिक्षित, हताश, गरीब, भुकेलेले असे नाहीत. नवीन यंत्रे आपल्या पोटावर पाय आणतील असे वाटल्यावरून ल्युडिट्स्नी केले तसे घातक हल्ले करण्याची किंवा बॉंब वगैरे टाकून उभारले जात असलेले काम जमीनदोस्त करण्याची या लोकांच्याकडून शक्यता नाही. त्यांचा विरोध तांत्रिक नियतकालिकाद्वारा करण्यात येणाऱ्या प्रचारामधून आढळून येतो. ते कायदेशीरपणे खटले उभे करतात. मोर्चे काढतात. निदर्शने करतात, निरोधन करतात. सनदशीर मार्गांनी आपले विरोधी मत नोंदवतात.

प्रतिक्रियावादी म्हणून ओळखली जाणारी ही चळवळ. हा उभारल्या जात असलेल्या तिसऱ्या लाटेचा महत्त्वाचा भाग आहे. एका बाजूला दुसऱ्या लाटेचे कैवारी, दुसऱ्या बाजूला अजूनही अस्तित्वात असलेल्या पहिल्या लाटेचे कैवारी आणि या दोहोंच्या विरोधाला तोंड देत पुढे सरसावणाऱ्या तिसऱ्या लाटेचे आधारस्तंभ, असे हे चित्र आहे. दुसऱ्या लाटेच्या बाजूचे मख्ख म्हणणे असे आहे, की “जर उपयोग होत असेल, तर उत्पादन करा. जर उत्पादनाची विक्री होत असेल, तर उत्पादन करा, आपल्याला जर सामर्थ्य प्राप्त होणार असेल, तर उभारणी करा.” कुठलाही धोका पत्करायला त्यांची तयारी नाही.

दुसऱ्या बाजूला आपल्याला एक दुबळा आवाज उठलेला आढळतो. कल्पनारम्यतेला कवटाळणारे हे अतिरेकी म्हणत आहेत, ‘बस करा, बस झाले आता. आता मागे चला परत. मध्ययुगातील तंत्रे आणि ला, हस्तोद्योग, श्रमपद्धती यांचा स्वीकार करा.’ तृप्त अशा मध्यमवर्गानेही त्याच जुन्या जगाकडे परत जाण्याची कल्पना व्यक्त केली आहे. हे जग आपल्या मनात तिटकारा उत्पन्न केल्याखेरीज रहाणार नाही.

या दोन्ही टोकांच्या मध्यंतरी प्रत्येक देशातले लोक वाढत्या प्रमाणात सामावत आहेत. ते म्हणजे तांत्रिक उठावाचा मुख्य भाग होत. नकळतच ते तिसऱ्या लाटेचे समर्थक होत आहेत. ते तंत्रज्ञानापासून

अनुक्रमणिका

सुरुवात करत नाहीत, परंतु आपल्याला भविष्य काळात कोणत्या प्रकारचा समाज हवा आहे यासंबंधी ते प्रश्न विचारतात. त्यांना हे माहीत आहे, की आपल्यापुढे इतक्या तंत्राधिष्ठित संधी उपलब्ध आहेत, की त्या सर्वांसाठी आपल्याकडे भांडवल नाही, त्या सर्वांचा आपण विकास करू शकत नाही, त्या सर्वांची योजना व वापर करणार करू शकणार नाही. त्यामुळे त्यांचे म्हणणे असे आहे, की या संधीपैकी अशा काहींची आपण काळजीपूर्वक निवड करावी, की ज्यांच्या आपल्याला सामाजिक आणि मानवी हितासंबंधी दूरगामी अशा सेवा उपलब्ध होऊ शकतील. आपल्या ध्येयांना तंत्रविज्ञानाने आकार देण्यापेक्षा सामाजिक हुकुमतीखाली तंत्रविज्ञानाच्या जोरदार मुसंडीच्या विस्तृत मार्गांनी जात असावे.

या उठाववाद्यांनी अजून आपल्यासाठी स्वच्छ, व्यापक असा कार्यक्रम तयार केलेला नाही. तथापि त्यांचे जाहीरनामे, अर्ज, तक्रारी, विधाने व अभ्यास यांवरून आपण त्यांच्यातील अनेक प्रणालींबाबत अंदाज व्यक्त करू शकतो. तंत्राकडे पहाण्याच्या नवीनच दृष्टिकोणाचे आपल्याला ज्ञान होते. त्या द्वारेच तिसऱ्या लाटेखाली येणाऱ्या भविष्याकडील संक्रमणाची ठाम योजना आकळण्यास मदत होते.

हे उठाववादीचे म्हणणे असे की, पृथ्वीवरील जीवन कमकुवत अवस्थेत आहे. आणि आपल्या नवीन तंत्रविज्ञानाचा जोर वाढेल; त्यानुसार पृथ्वीचे दुरुस्त न होण्या इतके नुकसान आपण करून घेणार आहोत. तेव्हा त्यांची प्रगती थांबवणेच इष्ट ठरणार आहे.

ह्या लोकांचे आणखी म्हणणे असे आहे, की आपण तंत्राला हुकुमतीखाली आणले काय, की तंत्राने आपला ताबा घेतला काय, आपण यापुढे नेहमीचे मूठभर उच्चवर्गीय–शास्त्रज्ञ, इंजिनियर, राजकारणी आणि उद्योगपती अशा गटातले— राहूच शकणार नाही. पश्चिम जर्मनी, फ्रान्स, स्वीडन, जपान आणि संयुक्त अमेरिकन संस्थानात अण्वस्त्रविरोधी प्रचार चालू आहे. कॉंकार्डस्च्या विरुध्द लढा चालू आहे, जैविक संशोधनाच्या नियमनाच्या मागण्या वाढत आहेत. या सर्व घटनांचा अर्थ एकच की तांत्रिक निर्णयाला लोकशाही तत्त्वांचा आधार मिळाला पाहिजे.

या खेरीज या उठाववाद्यांनी असेही म्हटले आहे, की प्रगत होण्यासाठी तंत्रज्ञान मोठे, महागडे किंवा संमिश्र असण्याची काहीही जरुरी नाही.

याप्रमाणे हे लोक योग्य, अनुकूल अशाच तंत्र–आवाक्याचा आराखडा करण्याच्या बाजूचे आहेत. या आवाक्यानुसार त्यांना लोकांना कामे पुरवायची आहेत, प्रदूषण टाळायचे आहे, परिसर शाबूत राखायचा आहे, केवळ देशासाठी किंवा जागतिक बाजारपेठेसाठी उत्पादन करण्यासाठी व स्थानिक उपयोगासाठी उत्पादन करावयाचे आहे. त्यानुसार त्यांचे निरनिराळ्या व्यवसायात जगभर हजारो प्रयोग चालूही झालेले आहेत.

यातले काही प्रयोग व्यवहार्य आहेत. काही प्रयोगात अत्याधुनिक मालाचा आणि शास्त्रीय उपकरणांचा, नव्या तऱ्हेने, जुन्याच तंत्रात वापर करुन पाहिला जात आहे. जेथे रस्तेबांधणी झालेली नाही, अशा ब्राझील, नायजेरिया सारख्या देशांच्या त्या भागात हवाई मार्ग स्वस्त आणि सुरक्षित वाहतूक करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील. काही क्षेत्रात–विशेषतः ऊर्जेच्या, काही साध्या व लघुतांत्रिक मार्गांना, संमिश्र स्वरुपाच्या मोठ्या प्रमाणातल्या तंत्रविज्ञानात 'सुधारित' करता येणे विचाराधीन आहे. मात्र यंत्र हे हेतुशी सुसंगत असायला हवे.

अनुक्रमणिका

त्यांना हे पटले आहे, की समुद्र आणि आकाश ह्याच गोष्टींवर समान वारसाहक्क सांगण्यात येऊन उपयोगाचे नाही, तर खुद्द सुधारित तंत्रज्ञानच अधिकाधिक लोकांच्या, उदा. भारतीय, अरब, प्राचीन चीन अशा देशांतील बहुसंख्यांकांच्या सहभागाखेरीज अस्तित्वात रहाणे अशक्य आहे.

एकूण असे आढळते, की हा तंत्र उठावाचा कार्यक्रम तंत्रमुसंडीला माणसाळू पहात आहे.

हे उठाववादी दिवसेदिवस वाढतच जाणार आहेत. त्यांना हे माहीत आहे की नाही कळत नाही, ते तिसऱ्या लाटेचे समर्थक आहेत, प्रचारक होत आहेत. ते नाहीसे तर होणार नाहीतच, उलट ते दिवसेदिवस वाढत जाणार आहेत. आपली शुक्रावरची मोहीम, आपले आश्चर्यकारक कॉंप्युटर्स, आपले जीवशास्त्रीय शोध, आपल्या समुद्रतळाकडील मोहिमा याच्या इतकेच तेही संस्कृतीच्या नव्या पायरीचे घटक आहेत.

पहिल्या आणि दुसऱ्या लाटेच्या कैवाऱ्यांशी चाललेल्या या लढ्यातून आपण नवीन सुजाण तंत्रापर्यंत येणार आहोत; नवीन टिकाऊ उर्जापध्दतीच्या आपण जवळपास येत चाललो आहोत. नव्या ऊर्जातळाशी नव्या तंत्राची युती झाल्यानंतर आपण आपल्या संपूर्ण संस्कृतीच्या नव्याच पातळीवर येणार आहोत. आणि तिच्या गाभ्यात आपल्याला दोन पातळ्यांवर चाललेल्या उद्योगांचा संगम आढळणार आहे. त्यातल्या वरच्या पातळीवर आपल्याला अधिक शास्त्रोक्त, सुधारित कडक पर्यावरणशास्त्राच्या व सामाजिक अधिसत्तेखालील उद्योग कार्यान्वित असलेले आढळतील; तर खालच्या थरावरही तितकेच सुधारित परंतु छोट्या प्रमाणातील, अधिक मानवी श्रेणीचे उद्योग कार्यरत असतील. परंतु ह्या दोन्हीही थरातील उद्योग दुसऱ्या लाटेच्या तंत्रक्षेत्रातील तत्त्वांपेक्षा मूलतःच दुसऱ्या तत्त्वांवर आधारलेले असतील. आणि हे दोन्ही मिळून उद्याचे ‘प्रभुत्वाचे शिखर’ तयार करतील.

अर्थात्, ‘उद्या’ च्या चित्रातील हा केवळ एक तपशील झाला.

अनुक्रमणिका

# दहा । माध्यमांचे विकेंद्रीकरण

गुप्तहेर संघटना प्रतिनिधी हे आपल्या काळाचे अतिशय प्रभावी रुपक आहे. ००७ चा गौरव करणारे शेकडो चित्रपट निघत आहेत. टेलिव्हिजन व स्वस्त पुस्तके गुप्तहेरांच्या धाडसी, रंगेल, नैतिकदृष्ट्या उदासीन, आणि प्रत्यक्षाहून अवाढव्य आकारातल्या कित्येक प्रतिमा सतत निर्माण करत आहेत. तर सरकारे गुप्तहेरांवरती अब्जावधीने खर्च करत आहेत. के जीबी सी आय ए आणि इतर कित्येक गुप्तहेर प्रतिनिधी एकमेकांना काटशट देत असतात.

मॉस्कोमध्ये पश्चिमींवर हेरगिरीचा आरोप केला जातो, तर बॉन मध्ये गुप्तहेरांच्या त्रासामुळे मंत्रिमंडळे पडतात. वॉशिंग्टनमध्ये अमेरिकन आणि कोरीयन प्रतिनिधींनी केलेली दुष्कृर्त्य उघडकीला येतात. आणि या सर्वांवर कळस म्हणजे हेरगिरी करणाऱ्या उपग्रहांनी आकाश भरून गेलेले आहे. पृथ्वीच्या इंचाइंचांची छायाचित्रे ते सतत घेत असतात.

गुप्तहेर काही इतिहासाला नवीन नाही. पण आताच त्यांच्या सर्वांच्या कल्पनेत एवढा मोठा प्रभाव का पडलेला असावा? आपण जर बारकाईने पाहिले तर कथांमधील पोलीस किंवा काउ बॉय पिस्तुले किंवा त्यांच्या नुसत्या मुठी ह्या हत्यारांवरच अवलंबून असतात. तर गुप्तहेरांकडे अत्याधुनिक सामग्री उपलब्ध असते— इलेक्ट्रॉनिक् बॅग्ज, कॉम्प्युटर्स, इन्फ्रारेड कॅमेरे, गाड्या— 'उडू' किंवा 'पोहू' शकणाऱ्या, हेलिकॉप्टर्स, एका माणसाच्या उपयोगाच्या पाणबुड्या मृत्यु किरणे आणि अशीच कितीतरी साधने.

गुप्तहेराचे महत्त्व वाढायला आणखी कारण आहे. काउ बॉइज, सैनिक, खाजगी टेहळे, साहसवीर, मोहीमवीर असे वाड़्मयातले किंवा सिनेमातले नेहमीचे नायक, स्पर्शज्ञेय प्रत्यक्षाचा पाठलाग करतात. त्यांना गुरांसाठी जमीन हवी असते, त्यांना सा हवा असतो, त्याना ठकांना पकडायचे असते. एखादी मुलगी मिळवायची असते. गुप्तेहर असे नसतात. त्यांचा मूलभूत उद्योग असतो माहिती पुरवण्याचा. आणि माहिती मिळवणे हा जगातला सर्वात वेगाने वाढणारा आणि अत्यंत महत्त्वाचा उद्योग बनला आहे. आणि गुप्तहेर हा दूरगामी बनलेल्या माहिती क्षेत्राचे जणू जिवंत प्रतीक आहे.

प्रतिमांची वखार

दुसऱ्या लाटेकडून तिसऱ्या लाटेकडे जात असताना आपल्या मानसिक जडणी घडणीत बदल होतो आहे.

प्रत्येकाच्या मेंदूत वास्तवाची एक मनःपूत प्रतिमा तयार होत असते. मेंदू म्हणजे प्रतिमांची जणू वखार असते. त्यातील काही प्रतिमा दृश्य असतात, तर काही श्राव्य असतात. काही स्पर्शाने ज्ञात होणाऱ्याही असतात. काही आपल्या वाढीच्या काळात झालेल्या परिसराच्या माहितीच्या रूपातील आकलने असतात, तर काही नाती निश्चित करणारी, संबंधदर्शी असतात. उदा : आई आणि मूल हे दोन शब्द. काही साध्या सरळ असतात, तर काही संमिश्र आणि कल्पित असतात. तर अशा अनेकविध प्रतिमांच्या एकत्र जमण्याने आपल्या जगाविषयीच्या चित्रात भर पडते. काळाच्या संदर्भात आपण निश्चित कुठे आहोत हे समजते. आपल्या भोवतीच्या वैयक्तिक नात्यांचे जाळे होऊन ते ध्यानात येते.

अनुक्रमणिका

ह्या प्रतिमा काही अचानक कुठून आलेल्या नसतात, तर आपल्याला न समजणाऱ्या मार्गांतून–खाणाखुणा, परिसरातून मिळालेली माहिती इत्यादीमधून–त्या तयार झालेल्या असतात. आपल्या भोवतीच्या स्थितीत बदल होत असताना— कामात, घरात, चर्चमध्ये, शाळांमध्ये, राजकीय व्यवस्थेमध्ये आपल्याला तिसऱ्या लाटेचा परिणाम जाणवतो. आपल्या भोवती पसरलेला माहितीचा समुद्रही बदलतो.

पहिल्या लाटेच्या संस्कृतीतील मूळ अगदी हळू बदलत जाणाऱ्या खेड्यात लहानाचे मोठे होत असताना, वास्तवाची प्रतिकृती मनात तयार करीत असे. ते अगदी मूठभर व्यक्तींच्या व ठिकाणांपासून मिळणाऱ्या प्रतिमांतूनच–शिक्षक, पुरोहित, मुख्य अधिकारी, गावप्रमुख, आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुटुंब.

दुसऱ्या लाटेत हे चित्र पालटले. वास्तवाचे चित्र मनावर उमटवण्यास मदत करणारे अनेक मार्ग तिने तयार केले. मुलाला त्याच्या डोळ्यांसमोर प्रतिमा केवळ निसर्ग किंवा लोक यांच्या द्वाराच उमटवून मिळत नव्हत्या, तर त्या त्याला वर्तमान पत्रे, मासिके, रेडिओ आणि नंतर टेलिव्हिजन यांच्याकडून तयार करून मिळत होत्या.

उदाहरण द्यावयाचे झाले तर श्राव्य प्रतिमांचे द्यावे लागेल. ह्या प्रतिमा जनमानसात इतक्या रूढ होऊन गेल्या होत्या, की त्यांना मूर्तीची योग्यता प्राप्त झाली. फडकत्या लाल झेंड्याखालील विजयी मुद्रेच्या लेनिनच्या चित्राला जणू ख्रिस्त प्रतिमेचीच प्रतिष्ठा लाभली. हातात छडी घेतलेला गबाळ्या वेषातला चँप्लीन, न्यूरेंबर्ग मध्ये थैमान घालणारा हिटलर, बुचेन्वाल्ड येथे बांधल्या गेलेल्या प्रेतांच्या मोळ्या, 'व्ही' खूण करणारा चर्चिल, लांब झग्यातील रुझवेल्ट, वाऱ्याने जिचा स्कर्ट वर उडाला आहे अशी मेरिलीन मन्रो आणि शेकडो सुप्रसिद्ध तारे, शिवाय जगभर ओळखल्या जाणाऱ्या काही वस्तूंची चिन्हे–अमेरिकेतील आयव्हरी सोप, जपानमधील मॉरिनगा कॉकलेट, फ्रान्समधील पेरियरची बाटली–या सर्व व इतरही कितीतरी गोष्टी जगाच्या प्रतिमा संग्रहातील प्रमाणीभूत भाग होऊन गेल्या होत्या.

अशा प्रकारे या सार्वजनिक प्रसारणातू, समुदायाच्या मनात नसलेल्या प्रतिमांतून औद्योगिक उत्पादन पद्धतीला आवश्यक असणारे वर्तणुकीचे प्रमाणीकरण होण्याला मदतच झाली.

आज बदलाची तिसरी लाट हे सर्व बदलून टाकत आहे. समाजातल्या बदलाचा वेग वाढला की आपल्यातील बदल वेग धारण करतात. आपल्याला नवनवीन माहिती मिळाली, की आपल्या मनात ठसलेल्या प्रतिमांच्या संग्रहाचे पुनः पुन्हा परीक्षण करणे आपल्याला भाग पडते. आपल्या मनातल्या जुन्या प्रतिमा काढून टाकून त्यांच्या जागी नव्या बसवणे महत्त्वाचे आहे. आपण असे केले नाही, भूतकाळाच्या वास्तवतच रमलो, तर सध्याच्या वास्तवाशी विसंगत अशा आपल्या कृती असतील, आणि आपण दिवसेदिवस स्पर्धेत मागे पडत जाऊ.

अशा तऱ्हेच्या प्रतिमांच्या व्यवस्थापनाचा वाढता वेग ध्यानात घेता आपल्याला असे आढळून येईल, की प्रतिमा दिवसेदिवस अधिकाधिक तात्कालिक होत चालल्या आहेत. आपल्या कल्पनांना, आपल्यातील विश्वासांना, आपल्या जाणिवांतील दृष्टिकोणांना आव्हान मिळत रहाते आणि अचानक कुठेतरी त्या गायब होऊन जातात. कितीतरी जुन्या शास्त्रीय आणि मानसशास्त्रीय उपपत्ती दररोज फेकून दिल्या जात आहेत,

अनुक्रमणिका

त्या ओलांडून विचार पुढे चालला आहे. आपले ध्येयवाद भंग पावत चालले आहेत. विसंवादी राजकीय आणि नैतिक घोषणांचा गदारोळ आपला अगदी निकाल लावून टाकतो आहे.

आपल्या प्रतिमा निर्मितीची प्रक्रिया कशी बदलते आहे हे समजणे कठीण आहे. कारण तिसरी लाट आपल्या माहितीच्या प्रवाहाचा नुसता वेग वाढवत नाही आहे, तर त्याची घडणच बदलून टाकते आहे, आणि त्यावरच आपल्या दैनंदिन कृती अवलंबून असणार आहेत.

प्रसिद्धी माहिती माध्यमांचे विघटन विकेंद्रीकरण

दुसऱ्या लाटेच्या काळात अत्यंत प्रभावी बनलेले प्रसार माध्यम आता आश्चर्यकारक रीतीने बदलले जात आहे. तिसऱ्या लाटेचा जोर वाढेल, तसतसा प्रसार माध्यमांचा एकत्रित प्रभाव विस्तार पावण्याऐवजी, तो वाटून घेणे त्यांना भाग पडते आहे. त्यांच्यावर एकाच वेळी अनेक बाजूंनी हल्ले होत असल्यामुळे माध्यमाचे विघटन होत आहे.

याचे पहिले उदाहरण वृत्तपत्रांबाबतचे घेता येईल. दुसऱ्या लाटेतील हे सर्वात जुने माध्यम आपले वाचक दिवसेदिवस गमावून बसत आहेत. इ. स. १९७३ साली अमेरिकेतील वृत्तपत्रांच्या ६३ दशलक्ष प्रती वाचल्या जात होत्या. तर इ. स. १९७८ पर्यंत ही संख्या ६२ दशलक्षांपर्यंत उतरली. वाचकांचे प्रमाण याच काळात ६९ टक्क्यांवरुन ६२ टक्क्यांपर्यंत आले आहे. न्यू यॉर्कच्या तीन प्रमुख दैनिकांचे मिळून ५५०,००० वाचक इ. स. १९७० ते ७६ च्या दरम्यान कमी झालेले आहेत. असाच प्रकार ब्रिटनमध्येही झाला. इ. स. १९६५ ते ७५ च्या दरम्यान खप ८ टक्के घटलेला आहे.

ही घट टेलिव्हिजनच्या उदयामुळे झाली असे म्हणणे बरोबर नाही. आज प्रचंड खपाच्या प्रत्येक दैनिकाला कमी खपाच्या साप्ताहिकांपासून, पाक्षिकांपासून निर्माण झालेल्या वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. ज्या त्या भागाशी निगडित मर्यादित अशी जाहिरातप्रणाली सुरु झालेली आहे. व्यापक अशा क्षेत्रासाठी जाहिराती देण्याची प्रवृत्ती कमी होत चालल्यामुळे तोही या मोठ्या खपाच्या दैनिकांपुढचा एक प्रश्नच होऊन बसला आहे.

नवीन, स्वस्तातले, जलद गतीने काम करणारे छापखाने अस्तित्वात आल्यापासून प्रत्येक संस्था, जातीय गट, राजकीय किंवा धार्मिक पंथ, उपपंथ स्वतःच्या प्रकाशनासाठी स्वतःचा छापखाना बाळगू शकत आहेत! छोटे छोटे गटही आपल्या उद्योगाची माहिती पुरवण्यासाठी नियतकालिके काढत आहेत. मोठ्या मासिकाच्या जागा आता छोट्या छोट्या मासिकांनी घेतल्या आहेत.

परंतु तिसऱ्या लाटेचा परिणाम केवळ छापील माध्यमाशी निगडित आहे असे नाही. अमेरिकेत इ. स. १९५० ते' ७० या कालखंडात लोकसंख्या वाढली फक्त ३५ टक्क्यांनी तर रेडिओ केंद्राची संख्या किती झाली पहा— २,३३६ वरुन ५,३५९ इतकी झाली! १२९ टक्क्यांनी ती वाढली! त्यामुळे एकच कार्यक्रम सर्वांनी ऐकत रहाण्यापेक्षा पुष्कळ वैविध्य आले. कार्यक्रम कोणता ऐकावा याच्या निवडीचे हक्क श्रोत्यांना प्राप्त झाले. भिन्न भिन्न श्रोत्यांना आपल्या विशिष्ट आवडी पुऱ्या करता येणे शक्य झाले. सुशिक्षित मध्यमवर्गीय प्रौढ श्रोत्यांसाठी सर्व बातम्या केंद्रे चालू असतात. तरुणांमधल्या विविध गटांची आवड हार्ड रॉक, सॉफ्ट रॉक, पक रॉक, कंट्री रॉक, फोक रॉक इत्यादि प्रकार पुरी करतात. सोल म्युझिक स्टेशन

अनुक्रमणिका

निग्रो अमेरिकनांसाठी, तर शास्त्रोक्त संगीताची सेवा उच्च प्राप्तीच्या वर्गातील प्रौढांसाठी रुजू होत असते. परदेशी भाषांतून चालणारी केंद्रे विविधवंशीय मानवांसाठी चालत असतात. उदा : जपानी ज्यू, पोर्तुगीज, हिस्पॉनिक इत्यादी.

सामुदायिक श्रोतृत्वाचे जे काही उरले सुरले असेल ते नवीन श्राव्य प्रकार उडवून टाकीत आहेत. सहाव्या दशकात स्वस्त, छोटे टेपरेकॉर्डर्स, कॅसेट प्लेअर्स तरुणांमध्ये एखाद्या वणव्याप्रमाणे पसरुन लोकप्रिय झाले... पण आज कोणाला खरे वाटणार नाही, अशी वस्तुस्थिती आहे, की आजचे विशीतले तरुण पूर्वीच्या तरुणांच्या मानाने जास्त तर सोडाच, उलट कितीतरी कमी वेळ रेडिओ किंवा इतर श्राव्य प्रकार ऐकण्यासाठी खर्च करतात. इ. स. १९६७ मध्ये या कामासाठी दिवसाकाठी ४·८ तास खर्च होत तिथे इ. स. १९७७ मध्ये २·८ तास खर्च होऊ लागले.

यानंतर आला सिटिझन बँड (C. B.) रेडिओ. प्रसारक रेडिओप्रमाणे हा रेडिओ केवळ एकतर्फी प्रसारण करत नाही. गाड्यांमध्ये बसवलेले सी बी रेडिओ गाडी चालवणाऱ्याच्या फार उपयोगी पडतात. ५ ते १५ मैल त्रिज्येच्या क्षेत्रात ते प्रक्षेपण करु शकतात. म्हणजे नुसता ऐकण्याचा भाग इथे नाही. संदेशांची देवाण–घेवाण दळणवळण होई शकते. इ. स. १९५९ ते' ७४ पर्यंत एक दशलक्ष सी बी रेडिओ सेट वापरात आले. तर इ. स. १९७७ पर्यंत हीच संख्या २५ दशलक्ष सेट्स् इतक्या प्रचंड प्रमाणात वाढली! धोक्यांच्या इशाऱ्यांपासून प्रार्थनांपर्यंत अनेक आवाजांनी आवाज लहरी भरुन गेल्या. आता हे फॅड तसे कमी झाले आहे. परंतु त्याचे परिणाम अजून तसेच आहेत. सी बी मुळे रेडिओ ब्रॉडकास्टिंगला मोठ्या प्रमाणात पीछेहाट सहन करावी लागली.

छपाई क्षेत्रातले वैविध्य रेडिओ क्षेत्रात देखील आले.

इ. स. १९७७ पर्यंत मात्र दुसऱ्या लाटेच्या माहिती माध्यमांचा खरा पराभव झालेला नव्हता. कारण तोपर्यंत अतिशय शक्तिशाली पिढीला टेलिव्हिजन हे अतिशय घनीभूत माध्यम आपलेसे हवेसे वाटत होते. परंतु इ. स. १९७७ मध्ये चित्रनलिकाही थरथरली. इतिहासात पहिल्यांदाच टेलिव्हिजन पहाणे या प्रकाराला उतार पडलेला आढळला. चकित झालेल्यांकडून उद्‌गार बाहेर पडले, की “प्रेक्षणाचा असा ऱ्हास होतील हे कोणाच्या ध्यानीमनीही नव्हते!”

याचीही कारणे देण्यात येतात. उदा. : पूर्वीच्या मानाने कार्यक्रमांचा दर्जा खालावलेला आहे. त्यात अमुकच जास्त आहे आणि तमुकच कमी पडते आहे असे म्हटले जाऊ लागले. कार्यकारी अधिकारी याबाबत डोके खाजवून उपाय शोधू पहात आहेत. आपल्याला अमक्या किंवा तमक्या नव्या प्रकारच्या कार्यक्रमाबद्दल आश्वासने दिली जात आहेत. परंतु खरे सत्य वेगळेच आहे. इथून पुढे जुने तंत्र चालणार नाही. आता प्रसारण एका केंद्रातून हवे तसे करण्याचे स्वातंत्र्य कार्यकारी अधिकाऱ्यांना किंवा त्यांच्या हाताखालच्यांना असणार नाही. टेलिव्हिजनचीही अतिशय वेगळी अवस्था होणार आहे. तुम्ही दाखवले आणि आम्ही पाहिले हा प्रकार बंद होणार. प्रेक्षक आता टी. व्ही. केंद्राकडे अमुक तमुक कार्यक्रमाची ‘प्रत्यक्ष’ मागणी करू लागणार.

केबल टेलिव्हिजन अस्तित्वात येऊ लागलेला आहे. या पद्धतीचा प्रसार वेगाने होऊ लागलेला आहे. तांब्यांच्या तारांची जागा आता फायबर ऑप्टिक सिस्टिम्स् घेऊ लागल्या आहेत. केसाइतक्या

अनुक्रमणिका

जाडीच्या स्वस्त व हलक्या फायबर्समधून प्रकाश पाठवला जाणार आहे. ज्याप्रमाणे थोडक्यात चालणाऱ्या छपाई यंत्रांद्वारे छपाई विखुरली, त्याचप्रमाणे केबलमुळे प्रेक्षक विखुरणार पुनः प्रेक्षक हा केवळ एक गठ्ठा रहाणार नसून अनेक छोटे ‘लोक’ त्यातून आकार घेणार आहेत. आता दुहेरी केबलव्यवस्था करण्यात येईल. त्यामुळे दुहेरी ‘दळणवळण’ चालू होईल. प्रेक्षक—ग्राहक थंडपणे बसून केवळ तुमचे कार्यक्रम पहात रहाणार नाहीत तर ते ‘प्रत्यक्ष’ फर्माईश करू लागतील.

आठव्या दशकात जपानमध्ये सर्व शहरे लाईट वेव्ह केबलनी जोडली जाणार असून ते वापरणारे केवळ कार्यक्रमांसाठीच नव्हे, तर स्टिल फोटो, हवी असलेली माहिती थिएटर रिझर्वेशन, वर्तमानपत्रातील मजकूर दाखवण्याविषयी, मासिकांमधील मजकुरासाठी विनंती करू शकतील. चोरटे किंवा आगी इत्यादींशी संबंधित धोक्याच्या इशाऱ्यासाठीही या पद्धतीचा वापर करता येईल.

ओसाकाचे उपनगर इकोमा इथे टी. व्ही. कार्यक्रमासाठी—ही—ओविस (Hi□ovis) च्या प्रत्यक्ष प्रयोगाखातर माझी एक मुलाखत घेण्यात आली. या पद्धतीत प्रत्येक ग्राहकाच्या टी. व्ही. सेटवरती एक मायक्रोफोन आणि एक टी. व्ही. कॅमेरा ठेवलेला असतो. त्यामुळे प्रेक्षकही—कार्यक्रम चालू असताना—प्रश्न विचारू शकतात, कार्यक्रम संचालकांकडून माझी मुलाखत चालू असताना मिसेस साकामोटो यांनी स्वतःच्या घरातून कार्यक्रम पहाता पहाता बटन दाबले, आणि आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजीत बोलायला सुरुवात केली. मी आणि कार्यक्रम पहात असलेल्या इतर प्रेक्षकांनी तिला प्रश्न विचारताना पडद्यावर पाहिले, त्याचप्रमाणे तिचा छोटा मुलगा तिथेच त्या खोलीत बागडत असलेलाही पाहिला... त्या स्त्रीने माझे इकोमात स्वागत केले होते! ही—ओविस आपल्याजवळ प्रत्येक विषयाच्या व्हिडिओ कॅसेट्स्‌चा साठा तयार ठेवते. संगीतापासून ते स्वयंपाक शिक्षणापर्यंतच्या विषयांच्या या कॅसेट्स् असतात. प्रेक्षक आपल्याला हव्या त्या वेळी कोड नंबरवर पंच करून कॉम्प्युटरला आपल्याला हवी असलेली कॅसेट चालू करण्याविषयी विनंती करू शकतात!

सध्या ही योजना थोड्याच घरांपुरती —१६० —मर्यादित आहे. परंतु ह्याही—ओविस प्रयोगाला जपानी सरकारचा पाठिंबा मिळालेला आहे. अशाच प्रकारच्या इतर कॉर्पोरेशन्सचा सहभागही मिळालेला आहे. हा अतिशय प्रगत प्रकार असून तो फायबर ऑप्टिक्स् तंत्रावर आधारलेला आहे.

ओहिओच्या वॉर्नर केबल कॉर्पोरेशनच्या क्यूब सिस्टीमला मी भेट दिली होती. क्यूब तर्फे ग्राहकाला तीस चॅनेल पुरवले जातात. अजून शाळेत न जाणाऱ्या मुलांसाठी, डॉक्टर्ससाठी, वकिलांसाठी किंवा ‘केवळ प्रौढांसाठी’ अशा अनेक प्रकारचे कार्यक्रम पहायला मिळतात. क्यूब ही जगातली सर्वात प्रगत, व्यापारी दृष्ट्या परिणामकारक अशी दुहेरी पद्धत आहे. ज्याने त्याने आपल्या हाताशी कॅल्क्युलेटरप्रमाणे टी. व्ही. वापरावा, आपल्याला हवे ते बटन दाबावे; हवा तो कार्यक्रम तुमच्या सेवेला हजार होईल!

व्हिडिओ गेम्स हाही अतिशय भरात असलेला एक प्रकार! लाखो अमेरिकनांना असे उपकरण हवे होते, की त्याच्या द्वारे टी. व्ही. च्या पडद्याचे रूपांतर पिंगपाँग टेबल, हॉकी मैदान किंवा टेनिस कोर्टमध्ये करता येईल. जुन्या मताच्या राजकीय किंवा सामाजिक अभ्यासकांना ह्या प्रकारची प्रगती विसंगत किंवा क्षुद्र वाटेल. परंतु याद्वारे यापुढे प्राप्त होत जाणाऱ्या इलेक्ट्रॉनभारित परिस्थितीची चुणुक कळून यायला हरकत नाही. व्हिडिओ गेम्समुळे प्रेक्षक आणखीच विखुरले. प्रत्येक प्रेक्षक व्यक्ती हा एक सुटा भाग झाला. परंतु या निष्पाप दिसणाऱ्या कृलप्तीद्वारे प्रेक्षक टेलिव्हिजन सेट बरोबर क्रीडा करू लागले आहेत ही गोष्ट

लहानसहान नाही. सेटनेच तुम्हाला कौशल्य दाखवावे असे नाही, तुम्हीही त्याच्याशी कौशल्याची वर्तणूक करू शकता.

माहिती सेवा : टी. व्ही. द्वारे केली जाणारी माहिती सेवा ब्रिटनमध्ये उपलब्ध आहे. प्रेक्षकाने आपल्या जवळच्या ग्रहण कुशल संचाचा वापर करून बटण चालू करायचे आणि डझनावारी वेगवेगळ्या माहिती सेवातून बातम्या, हवामान, आर्थिक, क्रीडा, आपल्याला हव्या त्या माहितीसाठी हव्या त्या सेवेची निवड करायची. मग टी. व्ही. स्क्रीनवर तुम्हाला हवी ती माहिती स्वयंचलित टेपद्वारे दृश्यमान होते. लवकरच अशी शक्यता आहे, की ही माहिती पुढे सरकून पडद्यावरुन नाहीशी होण्यापूर्वीच तिची कागदावर नक्कल मिळण्यासाठीही योजना करण्यात येईल. याही क्षेत्रात तुमच्या निवडीला पूर्वी कधीही नव्हता असा भरपूर वाव आहे.

व्हिडिओ कॅसेट प्लेअर्स आणि रेकॉर्डर्स यांचा प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. ह्यामुळे आज टेप करून ठेवलेली एखादी मॅच किंवा कोणताही आवडता कार्यक्रम पुनः ऐकण्याची पहाण्याची सोय होते ही गोष्ट खरी आहे. पण याच गोष्टीने याही गोष्टीला बाजारी महत्त्व प्राप्त करून दिले आहे. या तऱ्हेने कार्यक्रम टेप करून विकण्याचा उद्योग अनेकांनी आरंभलेला आहे. अर्थात चांगल्या गोष्टींसाठीही या गोष्टींचा उपयोग होऊ शकेल. उदा. औषधोपचाराविषयी, वैद्यकीय सूचना देऊ शकणारी, हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांना उपयुक्त होऊ शकेल अशी एखादी टेप; किंवा मोडलेले फर्निचर किंवा उपकरण कसे दुरुस्त करावयाचे याचे प्रात्यक्षिक दाखवणारी टेप. विशेष महत्त्वाची गोष्ट अशी, की या सर्वांमुळे कुठल्याही ग्राहकाला उत्पादक बनणे शक्य करणारी ही गोष्ट आहे. इथेही प्रेक्षक सुटा सुटा होतो.

अवकाशात संचार करणारे उपग्रह कित्येक कार्यक्रम ग्रहण करतात आणि त्यांचे प्रक्षेपणही करतात. हे काम सोपेही व स्वस्तही झाले आहे.

एकूण, या सर्व घटनांमुळे प्रेक्षक म्हणून एकसंध कल्पना होती, ती जाऊन तिचे तुकडे तुकडे होऊन अनेक छेदात तिचे रुपांतर झाले. आपल्या सांस्कृतिक वैविध्यातच केवळ भर पडली असे नसून एखाद्या माहितीपूर्व, कौशल्ययुक्त जाळ्याचा आपल्या कल्पनाचित्रावर पडणारा पगडा खंडित होऊन गेलेला आहे.

वरवर या ज्या बदलाच्या गोष्टी एकमेकींशी कसलाही संबंध नसलेल्या वाटतात, त्यांनी वर्तमानपत्रे, रेडिओ, मासिके, टेलिव्हिजन अशा मोठ्या पल्ल्याच्या आवाक्याच्या प्रसिध्दी माध्यमांच्या कक्षातून डौलदार भ्रमण करीत एकमेकांशी संबंध पोचतील असे बदल घडवून आणले.

अशा तऱ्हेने तिसऱ्या लाटेने खरेखुरे नवयुग सुरु केले आहे. विघटित प्रसार माध्यमांचे हे युग नव्या तांत्रिक युगाच्या बरोबरीने वर येत आहे. आणि या गोष्टीचा जीवनाच्या सर्वात महत्त्वाच्या क्षेत्रात, आपल्या मेंदूवर दूरगामी परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही. हे बदल आपल्या जवळ असलेल्या जगाच्या प्रतिमांत क्रांतिकारक बदल घडवून आणत आहेत. आणि त्यांची जाणीव होण्याच्या दृष्टीने आपल्याला समर्थ करत आहेत.

ब्लिप संस्कृती

अनुक्रमणिका

माध्यमांचे हे विकेंद्रीकरण आपल्या मनांचेही विघटन करते. दुसरी लाट भरात असताना सतत प्रमाणीभूत प्रतिमांची निर्मिती होत राहिली व त्यांचा भडिमार होत राहिला. आणि त्यातूनच ज्यांना टीकाकारांनी 'समुदाय मन' म्हटले, त्याचा जन्म झाला. आज लोकांच्या समुदायाने एक संदेश ग्रहण करण्याऐवजी लोकांचे छोटे विकेंद्रित गट आपले विचार व प्रतिमाही, दुसऱ्यांचा संदेश घेताना, देत असतात. संपूर्ण समाज तिसऱ्या लाटेच्या वैविध्याकडे निघाला असताना त्याचे प्रतिबिंब माध्यमात पडते व एकूण प्रक्रियेचा वेग वाढतो.

आज आपल्याला असे आढळून येतील, की पॉप म्युझिकपासून राजकारणापर्यंतच्या प्रत्येक गोष्टीबाबत कमी एकवाक्यता आढळून येऊ लागली आहे.

ह्या नवीन प्रकारच्या संस्कृतीत, तिच्या भंगलेल्या, क्षणभंगुर प्रतिमांसह आपणाला दुसऱ्या व तिसऱ्या लाटेतील माध्यम प्रकारांतील फट अधिक रुंद होत चाललेली स्पष्ट दिसून येते.

अर्थात् दुसऱ्या लाटेतील भूतपूर्व सुनिश्चित आदर्शांना मानणाऱ्या लोकांना आजच्या माध्यमांतून मिळणारी माहिती, ही माहिती न वाटता ते माहितीचे तुकडे वाटतात. अशा तऱ्हेच्या तुकड्यांशी ते परिचित नसतात.

लांबलचक, एकमेकांशी संबंधित असलेल्या कल्पनांची माळ, आपल्यासाठी सुसंयोजित होऊन किंवा व्यवस्थित मांडणी करून आपल्यापर्यंत येत नाही. आपल्याला छोट्या तुकड्या–तुकड्यांनी माहितीला तोंड द्यावे लागते. ब्लिप्स ऑफ इन्फर्मेशन् हे माहितीचे छोटे तुकडे जाहिराती, आज्ञा, उपपत्तो, बातमीचे धागे, गाण्यांचे तुकडे अशा प्रकारात आपल्याकडे येतात. नीट मांडणीला सरावलेल्या आपल्या मानसिक फाईलीत हे प्रकार नीटपणे बसू शकत नाहीत. ठरीव जुन्या प्रकारच्या विश्लेषणाला, विभागशः मांडणीला किंवा विषयवार रचनेला ही नवीन प्रकारची माहिती जुमानत नाही. त्यामुळे कसे तरी आकार धारण करणारे माहितीचे गठ्ठे बनतात. अशा ब्लिप संस्कृतीविरुद्ध दुसऱ्या लाटेच्या व्यवस्थितपणाला सरावलेले लोक थैमान घालतात.

परंतु या सर्व 'गोंधळात'च तिसऱ्या लाटेचे लोक समाधान पावतात. नव्वद सेकंदाचा बातम्यांचा तुकडा, तीस सेकंद व्यापारविषयक, गाण्याचा किंवा काव्याचा तुकडा, मथळा, व्यंगचित्र, एक कॉलेज, एक बातम्या सुसंगत ठेवणारा विभाग किंवा कॉम्युटरने दिलेल्या माहितीचा एखादा तुकडा अशा सर्व प्रकारांनी मधून मधून तुकडा पडत चाललेला असला, तरी त्यांना त्याचे वैषम्य वाटत नाही. यातली सुसंगति शोधायला त्यांना कष्ट वाटत नाहीत. ते काम स्वतः सहज करुन टाकतात.

वास्तवाची तयार प्रतिकृती स्वीकारण्याऐवजी आपणच प्रतिमा तयार करणे व तयार करीत रहाणे हा फार महत्त्वाचा आणि वेगळा भाग आहे. त्याच्यामुळे आपल्यावर फार मोठी जबाबदारी पडते. परंतु त्याचवेळी त्यामुळे आपल्याला स्वतंत्र व्यक्तित्व व व्यक्तिमत्त्व लाभण्याची संधी मिळते. परंतु या दबावामुळे आपल्यातील काही जण मोडून पडतात. काही औदासीन्यामुळे किंवा क्रोधामुळे बाजूला होतात. परंतु उरलेले अतिशय चांगल्या तऱ्हेने आकाराला आलेले, सतत विकास पावणारे, स्पर्धाशील स्वतंत्र व्यक्ती म्हणून, काही एक अधिक उच्च पातळीवर करण्यासाठी योग्य माणूस म्हणून पुढे येतात.

अनुक्रमणिका

माध्यमात ज्याचे प्रतिबिंब पडते, आणि त्याच्यामुळे जे तीव्र होत जाते असे सांस्कृतिक विकेंद्रीकरण स्वतः बरोबर, आपण देत घेत असलेल्या माहितीच्या आवाक्याची प्रचंड झेप आणते. आणि ह्या वाढीच्या ज्ञानामुळेच आपल्याला आपण 'माहिती समाज' का बनत चाललो आहोत याचे स्पष्टीकरण मिळते.

संस्कृतीत जितके वैविध्य असेल, तिच्या तंत्रात ऊर्जा प्रकारात आणि लोकात जितके वैविध्य असेल, तितकीच तिच्या घटकांमध्ये माहितीची अधिक प्रमाणात देवाण घेवाण होण्याची आवश्यकता आहे. एकूणच जर आपल्याला एकत्र रहायचे असेल, तर ह्या बदलाच्या ताणात या गोष्टीची निकड अधिक तीव्र होते. आपल्या भोवतीचे लोक अधिक स्वतंत्र आणि अधिक अलिप्त होत आहेत, अशा वेळी आपल्याला अधिक माहिती असणे आवश्यक आहे. दुसरा आपल्याशी कसा वागेल याचे भाकित करण्यासाठी ह्या गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे. तसे झाले नाही तर, आपल्याला एकत्र काम करणेच काय, एकत्र रहाणेही अशक्य होणार आहे.

त्यामुळे लोकांना आणि संस्थांना सतत अधिक माहिती मिळवण्याची तीव्र इच्छा झालेली असते. आणि एकूणच प्रणाली अधिक अधिक माहितीच्या प्रवाहांनी भरुन; भारुन जाते. अधिक प्रमाणात माहिती मिळत रहावी यासाठी वेगात आणि पध्दतीत बदल होणे आवश्यक होते. आणि तिसऱ्या लाटेने त्या दृष्टीनेही योग्य पावले टाकली आहेत.

अनुक्रमणिका

# अकरा । बुद्धीमान वातावरण

जगातल्या पुष्कळ लोकांचा असा विश्वास होता— काही लोकांचा अजूनही आहे— की प्रत्येक भौतिक वास्तवाच्या मागे चैतन्य उभे असते. निर्जीव वाटणाऱ्या दगड—माती अशा वस्तूतही, ज्याला माना (mana) असे म्हटले जाते, ते सजीव चैतन्य असते; जगात ह्याच गोष्टीला निरनिराळी नावे दिली गेली आहेत. परंतु तत्त्व एकच. या तत्त्वानुसार संपूर्ण परिसरच सजीव असतो.

आज, तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीसाठी नवीन माध्यमक्षेत्र तयार करीत असताना आपण या निर्जीव परिसरात जीव ओतत नसलो तरी बुद्धिमत्ता ओतत आहोत.

या क्रांतिकारक सुधारणेची गुरुकिल्ली आहे, अर्थातच, कॉम्प्युटर. इलेक्ट्रॉनिक स्मरणाचा निरनिराळ्या कार्यक्रमांशी संयोग घडवून एखाद्या यंत्राला साठवून ठेवलेल्या माहितीनुसार कसे कार्य करावयाचे ह्याची सूचना देणे ही गोष्ट इ. स. १९५० च्या सुमारास शास्त्रीय कुतूहलाचीच होती. इ. स. १९५५ ते १९६५ या दशकात मात्र अमेरिकेत तिसरी लाट उसळत असताना हळूहळू उद्योग जगतात देखील तिची झिरपणी चालू झाली होती. सुरुवातीला केवळ आर्थिक कारणांसाठी छोट्या प्रमाणातल्याच संचांत त्यांची योजना केली गेली. परंतु लवकरच प्रचंड क्षमतेने यंत्रांनी कॉर्पोरेट हेडक्वार्टर्स मधून विविध प्रकारच्या कामांसाठी विखरुन काम करायला सुरुवात केली. इ. स. १९६५ ते ७७ च्या दरम्यान मोठ्या मध्यवर्ती कॉम्प्युटर्सचा जमाना सुरु झाला, व कार्य करीत राहिला. यंत्रयुगाच्या विचाराचा मूलभूत आविष्कार होत राहिला. जमिनीखाली शेकडो फुटांवर स्थापन केलेल्या, बॉंब हल्ल्यापासून सुरक्षित निर्जंतुक परिसरात हा सुपर कॉम्प्युटर ज्या पद्धतीने काम करित असे, ती म्हणजे मानवी संपादनाची 'शर्थ'च म्हणावयास हवी.

हे केंद्रीभूत 'राक्षस' इतके काही प्रभावशाली होते, की सामाजिक दंतकथा बनण्याचा मान त्यांनी नेहमीच मिळवला. सिनेमा तयार करणाऱ्यांनी, व्यंगचित्रकारांनी शास्त्रीय कादंबऱ्या लिहिणाऱ्यांनी 'भविष्याची प्रतिमा' ह्या स्वरुपात त्यांचा वापर केला. कॉँम्प्युटरचा विचार सर्वशक्तीमान मेंदू म्हणूनच होत राहिला. अतिमानवी बुद्धिमत्तेचे हे फार मोठ्या प्रमाणात झालेले केंद्रीभवन होते.

परंतु १९७० सालाच्या पुढील दशकात कल्पिताने वास्तवात प्रवेश केला. अतिशय वेगाने सर्व बाबतीत लहानपणाकडे कल वाढत गेला. तीच गोष्ट याबाबतही घडली. छोटे कॉँम्प्युटर्स बनवले गेले. प्रत्येक विभागांत, कारखान्यांत, प्रयोग शाळेत, विक्री कचेऱ्यांत, स्थापत्य विभागांत प्रत्येकाचा स्वतःचा कॉम्प्युटर वापरण्यात येऊ लागला. कॉम्प्युटरची स्मरणशक्ती केवळ एका मुद्यावर केंद्रित होण्याऐवजी तिचे 'वाटप झाले.'

कॉँम्प्युटरच्या स्मरणाचे असे विकेंद्रीकरण होणे हे आता अधिक वेगाने घडू लागले आहे.

उद्योग आणि शासनसंस्था या क्षेत्रांबाहेर याचवेळी कॉम्प्युटरचा आणखी एक प्रकार लवकरच मोठ्या प्रमाणात अस्तित्वात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हा प्रकार म्हणजे घरगुती कॉँम्प्युटर! सुरुवातीला त्यांची संख्या नगण्य होती. परंतु आता तीच संख्या अमेरिकेत ३००,००० इतकी झालेली असून तेथील घराघरांतून बैठकीच्या खोल्या, स्वयंपाक घरे, छोट्या अभ्यासाच्या खोल्या अशा ठिकाणी त्यांची स्थापन करण्यात येऊन ते कार्य करु लागलेले आहेत. लवकरच टेलिव्हिजन सेटप्रमाणे या घरगुती

कॉम्प्युटर्सचा वावर सर्वत्र होत गेलेला आढळून येईल. ते करीत असलेल्या कामांची एक लहानशीच चुणुक पहा–ते घरगुती ऊर्जा वापरावर लक्ष ठेवतात, पदार्थ तयार करण्या विषयीच्या कृतींची फाइल तयार ठेवतात, मालकाला त्याच्या कार्यक्रमांच्या ठरलेल्या वेळांची आठवण करून देतात, स्मार्ट टाइपरायटरचे कामही करतात!

अमेरिकेत 'दि सोर्स' नावाची एक टिले कॉम्प्युटर कॉर्पोरेशन संस्था आहे. नाममात्र शुल्क घेऊन ती ग्राहकांना आपल्या यादीत स्थान देते. या ग्राहकांना ती किती प्रकारे माहिती मिळवून देते याची गणतीच नाही. शिवाय या ग्राहकांना परस्परांशी संपर्कही उपलब्ध करून देते. अनेक देश, अनेक भाषा, अनेक शास्त्रे, अनेक विषय याबाबत सोर्सने मोठ्या प्रमाणात ज्ञान साठवून ठेवले असून त्याचे वितरण होण्याबाबतची व्यवस्था करुन ठेवलेली आहे. अशा तऱ्हेने अनेक संबंधांचे जणू जाळेच तयार झालेले आहे. ज्ञानाच्या परिसराच्या बाबतीतील सुधारणेचे हे फार मोठे पाऊल आहे.

पण याच्याही पुढची पावले लवकरच पडतील. या यांत्रिक बुद्धीमार्फत तुमच्या घरात ऊर्जेचा कमीत कमी वापर होईल. वाया जाण्याला वावच असणार नाही. तुमच्या वॉशिंग मशीनमध्ये डिटर्जंट किती वापरले जावे, पाणी किती उष्णतेचे असावे याचीही व्यवस्था आपोआप होईल. तुमच्या गाडीतील इंधनव्यवस्था उत्तम स्थितीत राहील अशी काळजी घेण्यात येईल. रेडिओ–घड्याळे, टोस्टर, कॉफी करण्याचे यंत्र, शॉवर, यांची योग्य सेवा योग्य वेळी उपलब्ध करून देऊन तुमची सकाळ रम्य करण्यात येईल. तुमचे गॅरेज उबदार ठेवले जाईल, तुमच्या दारांना कुलपे लावली जातील, आणि तुमच्या अशाच अतिशय साध्या व साध्या नसलेल्याही सेवा, अतिशय तत्परतेने आणि न चुकता केली जात राहिली जाईल.

अशा 'बौद्धिक' वातावरणातील जीवन आपणास गोठवणारे काही तात्त्विक प्रश्न आपल्यापुढे नाचवते. यंत्रेच सर्व गोष्टींचा ताबा घेणार काय? ही बौद्धिक यंत्रे, विशेषतः जेव्हा ती एकमेकांशी जोडली गेलेली असतात, अशा वेळी आपल्या आकलन शक्तीवर आक्रमण करून त्यांच्यावर नियंत्रण तर करणार नाहीत?... आपण या सर्व गोष्टींवर किती प्रमाणात अवलंबून रहाणार आहोत? अशा तऱ्हेने आपण जर अधिकाधिक बुद्धी भौतिकात ओतू लागलो, तर आपल्या स्वतःच्या मनाची झीज नाही का होणार? आपल्याजवळ आपले अस्तित्व टिकवून रहावे म्हणून आवश्यक असणारी अशी मूलभूत कौशल्ये शिल्लक रहाणार आहेत का?

या प्रत्येक प्रश्नापासून अगणित उपप्रश्न निर्माण होतात. आणि हे बौध्दिक यंत्र किती मर्यादेपर्यंत सर्व गोष्टींवर हुकूमत ठेवू शकणार? याबाबतच्या शंकेच्या स्वरुपात सर्वांचे मिळून एक मोठे प्रश्न चिन्ह तुमच्या समोर नाचू लागते.

आणखी एक गोष्ट अशी की, मानवी मनाची झीज होईलच कशावरून? आपण ती होऊ द्यायची नाही! आपल्या जवळ आपण पूर्वी न वापरलेली अशी बुध्दिमत्ता आणि कल्पकता आहे. तिचा वापर आपण योग्य तऱ्हेने करायचा, आणि परिस्थिती आपल्याच काबूत राहील अशी व्यवस्था करायची, मानव जातीच्या विरूध्द सर्व काही जणू कट केल्याप्रमाणे घडणार आहे अशी कल्पना न करता, आपल्या हातात अजूनही पुष्कळ काही आहे या विश्वासाने आपण पुढची पावले टाकली पाहिजेत. बदल घडवणारे आपणच आहोत, आपल्या जवळ सामर्थ्य आहे ही गोष्ट सत्य आहे.

अनुक्रमणिका

ज्ञानाचे क्षेत्र इतक्या मोठ्या प्रमाणात बदलत चाललेले आहे, की आपली नातीही आपण बदलून टाकण्याची शक्यता आहे. साक्षरतेची आपल्या जीवनातील भूमिकाही बदलून जाईल. फार काय, आपण आपला मेंदूही रासायनिक प्रक्रियेद्वारा बदलून टाकू!

कॉम्प्युटर्स आणि इतर उपकरणे आपल्याशी 'संवाद' करू शकतील काय? तुमच्या नैसर्गिक भाषेशी ते रुळून जाण्यास वीस वर्षे लागतील का पाच वर्षातच ते शक्य होईल? आणि ही सुधारणा जेव्हा घडेल, तेव्हा आपल्या अर्थकारणावर आणि संस्कृतीवर किती प्रचंड प्रमाणात परिणाम घडतील यांची कल्पनाच केलेली बरी!

आज हजारो लोक नोकरीच्या बाजाराच्या बाहेरच ठेवले जातात, कारण ते 'अशिक्षित' असतात. अत्यंत साध्या कामासाठी सुद्धा व्यक्तीला लिहिता वाचता येणे, यंत्रांची प्राथमिक माहिती असणे, कामाबद्दल माहिती असणे या व अशाच गोष्टी येत असण्याची आवश्यकता असते. दुसऱ्या लाटेतील कचेऱ्यांसाठी वाचता येणे हे अत्यंत आवश्यक कौशल्य गणले जात होते.

परंतु साक्षर नसणे, किंवा अशिक्षित असणे म्हणू मूर्ख असणे नव्हे! आपल्याला हे माहीत आहे, की जगभरातील अशिक्षित लोकांनी शेती, बांधकाम, शिकार, संगीत अशा विविध क्षेत्रात अतिशय उच्च प्रकारचे प्राविण्य मिळवलेले असते. त्यास ते समर्थ असतात. पुष्कळ अशिक्षितांची स्मरणशक्ती विलक्षण असते, आणि ते अनेक भाषा अस्खलितपणे बोलू शकतात. ही गोष्ट कित्येक उच्चविद्याविभूषितांना साध्य होऊ शकत नाही! तथापि दुसऱ्या लाटेच्या समाजात असे लोक आर्थिकदृष्ट्या अगदी वाईट परिस्थितीतच राहिले.

अर्थात साक्षरता ही गोष्ट कामातील कौशल्याहून अधिक काही तरी आहे. कल्पनारम्य आणि सुखमय जगाकडे नेणारे ते प्रवेशद्वार आहे परंतु बुद्धिमान वातावरणात जेव्हा यंत्रे, उपकरणे आणि भिंतींनी देखील बोलावे अशी योजना केली जात असताना साक्षरता ही पूर्वी तीनशे वर्षात होती इतकी लाभदायक महत्त्वाची गोष्ट असणार नाही. विमान प्रवासाचे रिझर्वेशन क्लार्क, यंत्र चालक, कोठारावरील प्रमुख, दुरुस्ती करणारे, आपले काम आज्ञापालन वाचून करण्यापेक्षा ऐकून करू शकतील. यंत्रांनी दिलेल्या आज्ञा एकून कार्यवाही करत राहतील.

कॉम्प्युटर्स म्हणजे अतिमानुषी वस्तु नव्हे. ते मोडतात आणि मोडले म्हणजे चुका करतात. कधी कधी या चुका भयंकर असू शकतात. त्यात काहीही जादू नाही. ते काही आपल्या परिसराचे, वातावरणाचे आत्मा किंवा चैतन्य नव्हेत, तरीही कॉम्प्युटर्स ही गोष्ट मानवाने प्राप्त केलेली सर्वात आश्चर्य गोष्टीपैकी एक आहे यात शंका नाही. ज्याप्रमाणे आपल्या शारीरिक शक्तीला तंत्रज्ञानाने भरीव सहकार्य देऊन ती वृध्दींगत केली होती, त्याप्रमाणे आपल्या मनाच्या शक्तीही वृध्दिंगत केल्या जातात. आपली स्वतःचीच मने आपल्याला कुठे घेऊन जाणार आहेत ते आपल्यालाच माहीत नाही.

आपल्याला आपल्या बालपणापासूनच या बौध्दिक वातावरणाचा परिचय झालेला असतो, जसजसे आपले वय वाढेल तसे ते आपल्या अगदी सवयची होऊन जाते. ते आपल्याला केवळ वर सांगितल्याप्रमाणे बाह्य स्वरुपाचीच मदत करणार असे नसून आपल्याला आपल्या स्वतःबद्दल अगदी खोलवर विचार करायलाही मदत करतील.

अनुक्रमणिका

आज जेव्हा एखादा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा आपण त्याची कारणे शोधायला सुरुवात करतो. परंतु मानवी मनाला एकावेळी अनेकांगी विचार करण्याची सवय नसते. आपण आपले विचार दोन किंवा तीनच घटकांवर केंद्रित करतो. आणि त्यावेळी इतर घटकांकडे आपण दुर्लक्ष करतो. त्यातील बरेचसे एकेकट्याने किंवा मिळून अधिक महत्त्वाचे असतात. तज्ञांचा प्रत्येक गट वैशिष्ट्यपूर्णरीतीने 'त्याच्या स्वतः' च्या प्राथमिक कारणांवरच अधिक भर देत असतो. प्रत्येकजण मोठ्या उदारपणाने हे मांडत असतो, की हे सर्व प्रश्न या ना त्या कारणाने एकमेकांशी जोडलेले आहेत. परंतु तरी देखील कोणालाच प्रश्नाच्या संमिश्रतेचा विचार प्रश्नाची सोडवणूक करीत असताना मनात बाळगता येत नाही.

परंतु निरनिराळी कारणे लक्षात ठेवून त्यांचे एकमेकांशी असणारे संबंधही आठवून कॉम्प्युटर आपल्याला त्या प्रश्नांची हाताळणी करण्यासाठी मदत करु शकतो. ही मदत वरवरची नसून खोलवरची असते. तो बारकाव्यांच्या पध्दती शोधण्यासाठी विस्तृत प्रमाणात माहिती देऊ शकतो, आणि माहितीच्या तुकड्यांची सुसंगत मांडणीही तो अर्थपूर्ण अशी करुन दाखवू शकतो. कोणाही एका व्यक्तीपेक्षा अधिक पध्दतशीरपणे आणि पूर्णत्वाने निष्कर्षही काढू शकतो. फार काय, काही काल्पनिक सोडवणुकीही तो आपल्याला सादर करू शकतो. एखाद्या प्रश्नातील नव्या किंवा आधी लक्षात न आलेल्या गोष्टींतील किंवा माणसांतील संबंधाच्या शक्यता त्याच्या लक्षात येतात आणि तो त्या शक्यताच्या रोखाने या सोडवणुकी सुचवतो.

मानवी बुध्दिमत्ता, कल्पना, आणि स्फूर्ति या गोष्टी आगामी काही दशकात तंत्रापेक्षाही अधिक महत्त्वपूर्ण असणार आहेत. तरी देखील कॉम्प्युटर्स आपल्या जाणीवा अधिक सखोल करत रहातील. समज वाढवतील तुकड्या तुकड्यातून मिळत रहाणाऱ्या माहितीतून सुसंगति शोधून पूर्ण अर्थपूर्ण चित्रे आपल्यापुढे उभी करतीलच. ब्लिप कल्चरवरचा कॉम्प्युटर हा एक उताराच होय.

परंतु आता हा बुध्दिमान परिसर बदलू लागण्याची शक्यता आहे. प्रश्नांचे विश्लेषण करण्याची पध्दत किंवा माहिती जुळविण्याची पध्दत याहीपेक्षा आपल्या मेंदूतही बदल होण्याची शक्यता आहे. आपण परिसर अधिक संमिश्र करत आहोत, त्याला अधिक बुध्दिमान करत आहोत. आपण स्वतःही यातून अधिक बुध्दिमान होणार आहोत काय?

ह्या सर्वांतून आपल्याला नवीन माहितीक्षेत्र स्वतःबरोबर आणत असलेल्या अधिक समर्पकतेची थोडी सूचना मिळते. कारण माध्यमाचे विघटन आणि त्याचबरोबर झालेला कॉम्प्युटरचा उदय या दोन्ही गोष्टी मिळून आपली सामाजिक स्मरणशक्ती बदलत आहेत.

## सामाजिक स्मरणशक्ती

सर्व आठवणींची विभागणी आपल्याला पूर्णतः वैयक्तिक किंवा खाजगी आणि दुसऱ्या कुणाच्या बरोबरीच्या किंवा सामाजिक अशा प्रकारात करता येते. खाजगी आठवणी त्या त्या व्यक्तीबरोबरच मरून जातात. परंतु सामाजिक आठवणी टिकत असतात. अनेकांशी संबंधित असलेल्या आठवणींचा संग्रह करणे, आणि त्या शोधून परत प्राप्त करणे हे आपल्या मानवजातीच्या उत्क्रांतीच्या यशाचे गम्य आहे. हे करत असताना, आपण करतो ती उभारणी, साठवणी आणि सामाजिक आठवणीचा वापर यांच्यात अर्थपूर्ण बदल झाला म्हणजे खुद्द नियतीच्या उच्छवासावर परिणाम होतो.

अनुक्रमणिका

इतिहासात यापूर्वी मानवाने आपल्या सामाजिक स्मरणात दोनदा बदलाची क्रांती केली. आताही आपण याच प्रकारच्या बदलाच्या सुरुवातीच्या टोकाशी उभे आहोत.

सुरुवातीला मानव जिथे आपल्या खाजगी आठवणी साठवून ठेवत होता, तिथेच म्हणजे स्वतःच्या मनात सामाजिक आठवणींनाही जागात देत होता. आपल्या मनात दंतकथा, कथा, आख्यायिका अशा स्वरुपात या सामाजिक आठवणी आणि इतिहास साठवून ठेवीत माणूस तो आपल्या मुलाबाळांकडे सोपवीत असे. ही मुले याच तऱ्हेने पुढच्या पिढीपर्यंत ज्ञान पोचवत असत. परंतु या पध्दतीत एकूण आवाका फारच मर्यादित होता. साठवणूक फारच कमी प्रमाणात होत होती.

दुसऱ्या लाटेत मात्र अधिक पध्दतशीरपणे सर्व प्रकारची नोंद ठेवण्यात येऊ लागली. साक्षरतेचे प्रमाण व्यापक झाले. हजारो ग्रंथालये उभी राहिली. वस्तुसंग्रहालयांचीही उभारणी झाली. फाईल कॅबिनेटचा 'शोध' लागला. अतिशय शिस्तबध्द काम सुरु झाले. सामाजिक स्मरण केवळ कवटीतच न रहाता त्याच्या कक्षा रुंदावल्या. शोधांचा क्रम आणि सामाजिक बदलही वेग धारण करुन घडू लागले. दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीतील हे बदल घडत रहाणे, आणि संस्कृतीचा विकास होणे मानवी इतिहासात पूर्वी कधी नव्हे इतक्या वेगाने होत गेला.

आजची आपली झेप आपल्याला अगदीच नव्या अवस्थेला घेऊन जाणार आहे. आपण आपल्या कार्यक्रमांची अतिशय सूक्ष्म बारकाव्यानिशी नोंद करुन ठेवू लागलो आहोत. पावशतकापूर्वी पर्यंतही कोणाच्या ध्यानीमनी नसतील इतक्या सुव्यवस्थित माहितीचा अतिशय प्रचंड साठा आपण करुन ठेवत आहोत. कारण आता अतिशय सूक्ष्म अवलोकन व टिपण करण्यासठी वैविध्यपूर्ण सामर्थ्यशाली यंत्रणा आपल्या हाताशी आहे.

माणसाच्या मेंदूतच जेव्हा साठवण केली जात होती तेव्हा स्मरण नोंद चैतन्यपूर्ण असायची. कधी तिची झीज व्हायची, तर कधी ती ताजी व्हायची ती वरचेवर हलवली जायची. तिच्यात नवीन मार्गांनी भर पडत रहायची. यात एक प्रकारचा जिवंतपणा होता.

दुसऱ्या लाटेत ती वस्तुनिष्ठ झाली आणि कारागिरी कौशल्यात रुतून बसली. एकदा एखादे चिन्ह एखाद्या पानावर उमटले की, एकदा एखादा फोटो घेऊन झाली की, एकदा एखादी गोष्ट छापून झाली की ती तशीच रहात असे. निष्क्रियच रहात असे. नंतर जेव्हा कोणी चिन्ह, फोटो, छापील मजकूल पाहील, तेवढ्या पुरताच तिच्यात जिवंतपणा येईल आणि कुशल नवीन रचनेत तिचा आविष्कार होई. दुसऱ्या लाटेमध्ये सामाजिक स्मरणाची साठवण मोठ्या प्रमाणात झाली परंतु तिला तिने गोठवलेही.

तिसऱ्या लाटेच्या माहिती क्षेत्राचा विशेष हा, की त्याच्याद्वारे सामाजिक स्मरण विशालही झाले आणि शिवाय ते सक्रियही राहिले!

तुकड्यांची मांडणी करुन आणि संयोग करुन वास्तवाच्या प्रतिकृति उभारण्यासच कॉम्प्युटर मदत करतात असे नाही, तर शक्यतेतील आपला आवाका जितका सर्वदूर करता येईल, तितका करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. हा बदल ऐतिहासिक स्वरुपाचा आहे. ज्याचा पूर्वी विचार करता येत नव्हता, कल्पना करता येत नव्हती अशा नव्या उपपत्ती, कल्पना, ध्येयवाद, कलापूर्ण अंतर्ज्ञान, तांत्रिक सुधारणा, आर्थिक व

राजकीय सुधारणा या सर्वांची भरती त्याने शक्य केली. त्यामुळे तिसऱ्या लाटेतील सामाजिक वैविध्याकडील मुसंडीला इंधनच मिळाले आहे.

पूर्वीच्या संस्कृतीमध्ये असलेल्या माणसामाणसांतील दळणवळणाला तिसऱ्या लाटेने भरपूर व्यापकता प्राप्त करुन दिली. शिवाय, इतिहासात प्रथमच तिने यंत्रायंत्रातील ‘दळणवळणा’ला वाव देत त्याला प्रभावी सोयी प्राप्त करुन दिल्या आहेत! त्याहिपेक्षा आश्चर्यकारक गोष्ट ही की यंत्रात आणि मानवात संवाद घडणेही तिने शक्य केले! आणि त्यांचा परिसरही बुध्दिमान करुन टाकला!

नवीन संस्कृतीच्या उभारणीचे काम एकाचवेळी अनेक पातळ्यांवरुन वेगाने घडत आहे.

अनुक्रमणिका

# बारा । अवाढव्य प्रमाणातील उत्पादनाच्या पलिकडे

टी शर्ट

आतापर्यंत हे ज्ञान सर्वांपर्यंत जाऊन पोचले आहे, की 'प्रगत' देशात उत्पादन कार्यासाठी नेमल्या जाणाऱ्या सेवक वर्गात गेल्या वीस वर्षात बरीच कपात झालेली आहे. औद्योगिक जगात उत्पादन घटले आहे. त्यामुळे ठरीव पध्दतीचे उत्पादन तथाकथित विकसनशील देशात वसवण्यात आलेले आहे. उदा : अल्जीरिया, मेक्सिको, थायलंड इत्यादि वापरलेल्या गंजलेल्या गाड्या श्रीमंत देशांकडून गरीब देशांकडे पाठवण्यात येत आहेत.

धोरणात्मक आणि आर्थिक कारणांसाठी श्रीमंत देश उत्पादनाला संपूर्णतया शरण जाऊ शकत नाहीत. श्रीमंत देश अभौतिक उत्पादनावर जगत असताना इतर देश भौतिक वस्तूंच्या निर्मितीत गढलेले आहेत. हे चित्र अगदीच स्पष्ट आहे. आपल्याला असे आढळून येते की श्रीमंत देश महत्त्वाच्या वस्तूंचे उत्पादन करीतच आहेत. परंतु ते करण्यासाठी त्यांना आता कमी कामगारांची गरज पडते आहे. कारण वस्तू तयार करण्याची पध्दतच आता बदलते आहे.

दुसऱ्या लाटेतील उत्पादनाचा गाभा म्हणजे खूप काळ एकाच 'छापा' च्या प्रमाणित वस्तूंची निर्मिती करत रहाणे. उलट तिसऱ्या लाटेतील उत्पादन कमी काळ चालू रहाते. हे उत्पादन काही प्रमाणात परिचित असलेल्या किंवा संपूर्ण सवयीच्या वस्तूंचे केले जाते.

लोक उत्पादनाचा दीर्घकालीन उत्पादन म्हणूनच अजून विचार करतात. आणि आपण अजूनही प्रचंड प्रमाणातले उत्पादन करीतच असतो. अब्जावधी सिगारेट्स लाखो यार्ड कपडा, विजेचे दिवे, काड्यापेट्या अशा कितीतरी वस्तू अगणित संख्येने उत्पन्न केल्या जात आहेत. हे असेच आणखी काही काळ तरी चालू रहाणार आहे. परंतु या वस्तु प्रगत उद्योगांपेक्षा मागासलेल्या उद्योगांचीच निर्मिती आहेत. आणि ह्या वस्तू एकूण उत्पादित वस्तूंच्या फक्त पाच टक्केच आहेत.

जपान, प. जर्मनी, अमेरिकन संयुक्त संस्थाने, रशियन संघराज्य या देशात विद्युत् क्षेत्रातील उत्पादन, रसायने, अवकाश याने, इलेक्ट्रॉनिक्स, वैशिष्ट्यपूर्ण वहाने, दळणवळण इत्यादि क्षेत्रात विघटनाची प्रवृत्ती विकसित होत असलेली आढळून येते.

संरक्षण सामुग्रीच्या बाबतीत लोक अजूनही प्रचंड प्रमाणाच्या दृष्टीकोणातून विचार करतात. आपल्याला एकसारखे असे लाखोंच्या गणतीत उत्पन्न होत असलेल्या गणवेश, हेल्मेट्स्, रायफल्स इत्यादि वस्तु दिसतात. त्यांचा आपण विचार करतो. परंतु आधुनिक लष्करी संघटनांना त्यांच्या आवश्यक गोष्टींबाबतच्या विविध प्रकारच्या मोठ्या प्रमाणातील उत्पादनाची गरज नाहीच आहे. जेट फायटर्स जरी ओळीने निर्माण करावयाचे म्हटले तरी दहा ते पन्नासहून अधिक जेट फायटर्सच्या निर्मितीची गरजच असणार नाही. रचना, आकार, स्वरुप व कोणते काम साधायचे यासंबंधीची गरज या संख्येत देखील विविध प्रकार निर्माण करावे लागतील. एकसारख्या वस्तु ढिगाने उत्पन्न करण्याची बाब येथे उत्पन्न होऊ शकत नाही. मागणीच इतकी अत्यल्प संख्येची, त्यामुळे या प्रकारातील घटक छोट्या क्रमात, छोट्या प्रमाणातच उत्पन्न केले जातात.

अनुक्रमणिका

काही क्षेत्रातील सुटे भाग अजून देखील विपुल प्रमाणात तयार केले जातात. परंतु ते भाग काही काळच निर्माण होत रहाणाऱ्या विविध यंत्रप्रकारात वापरून टाकले जातात.

ॲरिझोना हमरस्त्यावरून वेगाने धावणाऱ्या विविध गाड्यांकडे ओझरती नजर टाकली तरी आपल्याला या म्हणण्यातील सत्यता पटेल. एक काळ असा होता, की ठराविकच तीन चार प्रकारच्या, एका छापाच्या अनेक आवृत्त्या असाव्यात अशा गाड्या रस्त्यावरून धावत. आता हे चित्र अगदी उलट झालेले आहे... जगातील जपान, अमेरिका, युरोप या प्रदेशात सुट्या भागांचे ढिगाने उत्पादन होते, परंतु त्यांच्या एकत्रीकरणाचे हजारो मार्ग आणि बाहेर आपल्याला दिसणाऱ्या वस्तूही हजार स्वरुपात, हजार आकार धारण करून सामोरे येतात.

आता दुसऱ्याच एका पातळीवरच्या साध्या टी शर्ट कडे पहा. टी शर्टस् प्रचंड प्रमाणात निर्माण होतात, परंतु नंतर डिझाइन्स किंवा घोषणा ज्या तऱ्हेने छापल्या जातात, त्या प्रकाराने टी शर्ट हे छोट्या गटातच निर्माण होतात असे म्हणावे लागेल!

आता आपण वेगळ्या दिशेने पाऊल उचलले आहे. प्रत्येकाला एक वस्तू वेगळ्या प्रकारे सादर करण्याचा उत्पादकांचा इरादा आहे. आपण 'व्यक्ति तितक्या प्रकृती' म्हणतो त्यानुसार प्रत्येक व्यक्तीला तिच्या मागणीनुसार वस्तू पुरवली जाणार आहे.

दुसरी लाट आली त्यानंतर एकसारखे कपडे हजारो, लाखोंच्या संख्येत निर्माण केले जाऊ लागले. या पद्धतीत एका कापडावर दुसरे अशी अनेक कापडे अंथरली जाऊन सर्वात वरती नमुना पसरला जात असे. आणि त्यानुसार विजेवर चालणाऱ्या कात्रीने सर्व कपडे एका वेळी एकसारखे बेतले जात असत.

आता कर्तन काम लेसर यंत्र करते. त्याचे काम अगदी वेगळ्या तत्त्वावर चालते. १०, ५०, १०० किंवा ५०० शर्ट काही ते एका वेळी बेतत नाही, तर एका वेळी एकच शर्ट बेतते. परंतु त्या सामुदायिक कर्तनापेक्षा हे कर्तन अधिक वेगाने होते! शिवाय नासधूसही कमी होते. यादी करण्याचीही गरज उरत नाही. पुढे पाठीमागे ठरीव प्रमाणित आकार नष्ट होण्याचीही शक्यता आहे.

एखाद्याची मापे टेलिफोनद्वारा समजू शकतील. किंवा एखाद्यावर व्हिडिओ कॅमेराच रोखून कॉम्प्युटरमध्ये माहिती जमा केली जाईल. आणि कॉम्प्युटर एक कपडा शिवण्याच्या सूचना करील. एखाद्याच्या वैयक्तिक लांबी—रुंदी—उंची नुसार कपडा तयार होईल.

अशीच उच्चतंत्राधिष्ठित प्रक्रिया प्रत्येक उत्पादनाच्या बाबतीत अंगीकारली जाईल. ज्याप्रमाणे माध्यमाचे विघटन आपण करत आहोत, त्याच प्रमाणे उत्पादनाचेही विघटन करत आहोत.

## वेगाचा गुण

इतर किती तरी असामान्य सुधारणा आपण वस्तू बनवण्यासाठी वापरत असलेल्या पद्धतीत बदल घडवून आणत आहेत. मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्याऐवजी काही कंपन्या छोट्या प्रमाणात उत्पादन करू लागल्या आहेत.

अनुक्रमणिका

आणखी एक बदल असा आहे की जो ग्राहकाला यापूर्वी कधी नव्हते इतक्या थेट संबंधात उत्पादन प्रक्रियेजवळ आणील. ग्राहक उत्पादन–प्रक्रियेशी इतका एकरुप होऊन जाईल, की आपल्याला ग्राहक कोण आणि उत्पादक कोण याबाबत संभ्रम पडेल.

दुसऱ्या लाटेतील उत्पादन असे होते की अनेक सुटे सुटे भाग आधी तयार केले जात आणि त्यांची जुळणी नंतर होऊन यंत्र तयार होत असे. तिसऱ्या लाटेतील उत्पादन संपूर्णतेकडे झुकणारे आहे. याबाबतीत एखादे उदाहरण दिले की सर्व स्पष्ट होईल. घड्याळाचे याबाबतचे उदाहरण असे, की एक घड्याळ तयार करण्यासाठी शेकडो सुटे, भाग चालू रहातील असे भाग उत्पादित करुन मग त्यांची जुळणी केली जाई. तर तिसऱ्या लाटेतील घड्याळ सॉलिड स्टेट असून त्याच्यात एकही भाग 'चालणारा' नसतो, शिवाय ही घड्याळे अतिशय विश्वसनीय अशी अचूक वेळ दाखवितात.

सूक्ष्मतेच्या पातळीवर जाण्यामुळे, कॉम्प्युटरने दिलेल्या डिझाइनची मदत घेऊन किंवा इतर सुधारित उत्पादन औजारे वापरुन आपण कमीत कमी भागांवर अधिकाधिक कार्ये सोपवतो आहोत. चित्र काढण्यासाठी कॅन्व्हासवर रंगाचे अनेक फटकारे मारीत बसण्यापेक्षा छायाचित्रकार एक बटन दाबून संपूर्ण प्रतिमा क्षणात 'तयार करतो.' आपण आता उत्पादनात वेगाचा हा गुण आणण्याचा प्रयत्न करु लागलो आहोत.

तांत्रिक क्षेत्रात आणि ज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असलेले बदल वस्तू बनविण्याचा आपला मार्ग बदलण्याच्या जवळ येऊ लागलेले आहेत. ह्या प्रयत्नांचे साध्य उघडच आहे. पूर्णतः ग्राहकनिष्ठ वस्तू, पूर्ण एक, भागीय वस्तू, ग्राहकाच्या थेट हुकुमती खाली तयार करणे.

थोडक्यात, आपण उत्पादनाची संपूर्ण रचनाच बदलून टाकतो आहोत. आणि बदलाच्या या लहरी समाजाच्या प्रत्येक थरापर्यंत नेऊन सोडतो. आहोत. अर्थात् या बदलांचे अनेकांवर परिणाम होतील. या क्रांतिकारक बदलाचे दुसऱ्या एका क्रांतीशी थेट संबंध आहेत. ही क्रांती ऑफिसमध्ये घडते आहे...

## चिटणीसाचा मृत्यू?

श्रीमंत देशात फार थोडे नोकर जड वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी प्रत्यक्ष राबत असतात. त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात सेवकांची–कल्पना निर्माण करण्याची, शास्त्रीय फॉर्म्युला, बिले, मालांच्या किंमतीसह याद्या. योजनांची पुनर्जुळणी, फायली, कायदेशीर अधिकारपत्रे, 'बाजारा' बद्दलचे संशोधन, विक्रीसाठीचे योग्य सादरीकरण, पत्रे, वर्णने, कायदेशीर टाचणे, खुलासेवार स्थापत्यविषयक नोंदी, व्यक्ती किंवा प्रकरणाबद्दलच्या माहितीचे कागदपत्र, कॉम्प्युटर कार्यक्रम आणि इतरही हजारो प्रकारची माहिती, प्रतिकात्मक निर्मिती इत्यादी प्रकारच्या पूर्ततेसाठी गरज असते. अशा प्रकारच्या तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कामकाजांसाठी पांढरपेशा वर्ग मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. आणि अनेक देशात त्यांची कामे अगदी अपरिहार्यतेने व आवश्यकतेच्या स्वरुपात सुरु राहिली.

ही जी वाढ झाली, ती म्हणजे एखाद्या नव्या पध्दतीकडे घेतलेली झेप नव्हती, तर औद्योगिकीकरणाचेच दीर्घीकरण होते. मात्र एक गोष्ट खरी, की त्यानंतर काम भरीव होण्याऐवजी पुष्कळसे पोकळच होत गेले. ज्या कचेऱ्यांमध्ये ही कामे होतात, त्यांची उभारणी तत्त्वतः एखाद्या कारखान्याप्रमाणेच

झाली असून, कामाची पध्दत पुनरावृत्तीची, कंटाळवाणी आणि पुष्कळशी यंत्रवत्‌च राहिली. आता सुध्दा कचेऱ्यांची पुनर्रचना केली जाते तेव्हा एवढेच लक्षात घेतले जाते, की त्यातील कारखानापणा कमी रहावा.

ह्या प्रति—कारखान्यातही कारखान्यांप्रमाणे दोन थरांवर कामे सुरु असतात. कारखान्यात काबाडकष्ट करणारे व काबाडकष्टाव्यतिरिक्तची कामे करणारे असे दोन प्रकारचे लोक कामे करत असतात; तर कचेऱ्यांमध्ये एक वर्ग असतो. उच्च विचारवंतांचा. त्यात शास्त्रज्ञ, इंजिनियर्स, व्यवस्थापक अशा लोकांचा समावेश असतो. या लोकांचा बराच वेळ मीटिंग्ज, कॉन्फरन्सेस, व्यवसायानिमित्त दिले जाणारे खाने किंवा मार्गदर्शन, मेमोंचे मसुदे करणे, फोनवरुन बातचीत करणे आणि माहितींची देवाणघेवाण या प्रकारच्या कामात जात असतो. तर दुसऱ्या वर्गात कमी विचारमग्नता असते. त्यातील लोकांचे काम सतत, ठरीव आणि निर्जीव स्वरुपाने चालू असते.

ऑफिसमध्येही दुसरी लाट कमी होत गेलेली असून तिसरी लाट येऊ लागलेली आहे, जुन्या पध्दतीचे हे ‘वर्ग’ नष्ट होऊ लागले आहेत. ऑफिसमध्येही बरेच रचनात्मक बदल होऊ लागलेले आहेत. या बदलाना अनेक कारणे जबाबदार आहेत. सध्या विविध प्रकारची आणि प्रचंड प्रमाणात, अप्‌टुडेट, आणि अद्ययावत माहिती तात्काळ हवी असते, की ही मागणी पूर्ण करायला दुसऱ्या लाटेत तयार झालेल्या निपुण व कष्टाळू कारकुनांचा, टायपिस्टांचा, चिटणीसांचा ताफा किंचित देखील समर्थ ठरणार नाही. शिवाय हे काम करुन घेण्यासाठी लागणारा खर्च इतक्या मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे, की त्याबाबतही गंभीरपणाने विचार करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. या खर्चाच्या वाढीबरोबरच दिवसेदिवस चिंतनीय होत चाललेली बाब म्हणजे उत्पादनातील घट.

उलट, कॉम्प्युटर्सच्या किंमतीत असामान्य घट झालेली असल्याने, शिवाय ते जितक्या प्रकारची कामे जितक्या तत्परतेने आणि व्यवस्थितपणे करु शकतात; या दृष्टीनेही पाहिल्यास कॉम्प्युटर बाळगणे हे, केव्हाही, कितीतरी स्वस्त पडते. एकीकडे खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो आहे, उत्पादन तर घसरते आहे; अशावेळी कॉम्प्युटरमध्ये असलेली कार्यशक्ती, होत असलेल्या सुधारणा या संयोगातून हादरवणारी शाब्दिक उलथापालथ ‘वर्ड क्वेक’ हाच परिणाम संभवतो.

ह्या उलथापालथीचे एक प्रतीक म्हणून एका इलेक्ट्रॉनिक उपकरणाकडे बोट दाखवता येईल. त्याचे नाव आहे— वर्ड प्रोसेसर. अमेरिकेतल्या सुमारे २५०,००० कचेऱ्यातून हे उपकरण काम करू लागलेले आहे. वर्ड प्रोसेसरचे वर्णन कधी ‘स्मार्ट टाइपरायटर’ असे, तर कधी ‘टेक्स्ट्‌एडिटर’ असे केले जाते. ऑफिसमध्ये येणाऱ्या माहितीच्या प्रवाहाला वळण लावणारे असे हे उपकरण आहे.

वॉशिंग्टन डी. सी. मधील एक फर्म ‘मायक्रोनेट’ म्हणून ओळखली जाते. तिने सतरा वेळा वेगळ्या उत्पादकांना एका ऑफिसमध्ये एकत्र आणले आहे. इथे कोणताही दस्तऐवज आला, की त्याची ताबडतोब मायक्रोफिल्म घेतली जाते आणि नंतर केल्या जाणाऱ्या कॉम्प्युटरच्या साठवणुकीसाठी जपून ठेवली जाते. अशीच विविध कामे इतर उपकरणे करतात. या कंपनीचे अध्यक्ष लॅरी स्टॉकेट म्हणतात की, “भावी कचेऱ्या अशा असतील, की जेथे चुकीच्या फायली असणार नाहीत. आपल्याला बाजारविषयक, विक्रीविषयक, जमाखर्च विषयक, संशोधनविषयक गृहित, गोष्टी व्यवस्थितपणे आणि तत्काळ मिळू शकतील. हजारो पानात विखुरलेली माहिती तुम्हाला एका पानाच्या लहानशा हिश्श्यातच मिळून जाईल... नंतर हीच माहिती छायाचित्र स्वरूपातच बद्ध केली जाईल.”

अनुक्रमणिका

अशाच प्रकारचे व इतके आणि तेही अतिशय नीटनेटकेपणाने व अजूकपणाने काम करायला नेहमीच्या, दुसऱ्या लाटेखालच्या, कचेरीत किती माणसे लागतील? अशा कचेरीत जर एखादे पत्र किंवा मेमो तयार करावयाचा असेल, तर कार्यकारी अधिकाऱ्याला सेक्रेटरी नावाच्या 'माध्यमा'ची गरज पडते. ह्या माणसाचे पहिले काम हे, की कार्यकारी अधिकाऱ्याचे शब्द प्रथम कागदावर उतरवून घेणे.

नोट बुकावर हाताने किंवा टाईप केलेल्या ड्राफ्टच्या स्वरूपात, काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करून नंतर ते स्वच्छपणे सुबकपणे टाईप केले जातात. कार्बन किंवा झेरॉक्स कॉपीज तयार केल्या जातात. नंतर चांगली, वरची कॉपी जिथे पाठवावयाची तिथे पोस्ट ऑफिसद्वारा किंवा कधी दुसऱ्या कोणत्यातरी मार्गाने पाठवली जाते. आणि उरलेली दुसरी प्रत फाइलीला लावली जाते. पहिली, संदेश जुळवणीची पायरी सोडली, तर पाच वेगवेगळ्या पण क्रमशः पायऱ्यातून हे काम केले जाते. आजची यंत्रे ह्या पाच क्रमशः पायऱ्या एकाच वेळी वापरून त्यांची 'एकच पायरी,' बनवून काम उरकतात. अनेक कामांचा वेग अशाच प्रकारे वाढतो.

मी एक कॉम्प्युटर आणला, आणि वर्ड प्रोफेसर म्हणून वापरायला सुरूवात केली. आज एखाद्या प्रकरणाचा ड्राफ्ट कागदावर टाईप करण्याऐवजी मी की बोर्डवर टाईप करतो, आणि तो इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये, ज्याला फ्लॉपी डिस्क म्हणतात. त्यात, साठवला जातो. माझे शब्द टेलिव्हिजन सारख्या पडद्यावर उमटलेले मला दिसतात. त्यात काही चूक आढळली तर पॅरेग्राफ बदलून, शब्द काढून काही शब्द घालून मी मला आवडेल तशी प्रत तयार करतो या साठी काही खटके मला दाबावे लागतात येवढेच! या प्रक्रियेद्वारा पुनः पुन्हा ड्राफ्ट टाईप करणे, झेरॉक्स काढणे, कटिंग, पेस्टिंग, इरेझिंग, स्ट्रिपिंग, खोडणे इत्यादि अनेक कामापासून माझी सुटका होते. मसुदा दुरुस्त करून झाला, की मी एक बटन दाबतो, की माझ्याच एका बाजूला असलेले 'छपाई यंत्र' क्षणार्धात माझी पक्की, अंतिम प्रत मला सादर करते.

परंतु या यंत्रावर कागदावरच्या प्रती तयार करणे हा त्याचा अतिशय मागासलेपणाने केलेला वापर होय. त्या यंत्रांचा तो अपमान ठरेल. कारण इलेक्ट्रॉनिक ऑफिसची खरी शोभा पत्रे टाइप करणे आणि ती दुरूस्त करणे याबाबतच्या पायऱ्या वाचवण्यात साठवलेली नाही. हे स्वयंचलित यंत्र ही पत्रे तबकडीवरच्या किंवा फितीवरच्या छोट्या तुकड्यात 'फाईल' करुन टाकते. नंतर ती पत्रे इलेक्ट्रॉनिक डिक्शनरीकडे पाठवली जातात. ही स्वयंचलित डिक्शनरी स्पेलिंगच्या चुका आपोआप दुरुस्त करते. ही यंत्रे एकमेकांशी जोडली गेलेली असतात, फोन लाईनशी जोडलेली असतात. सेक्रेटरी हेच पत्र तत्काळ ज्याला पोचायचे (त्याच्या प्रिंटरवर किंवा स्क्रीनवर) पाठवतो! त्यामुळे हे उपकरण मूळ प्रत तयार करणे, टाईप करणे, प्रत काढणे, पाठवणे, फाईल करणे ही कामे अक्षरशः एकाच दमात, एकाच प्रक्रियेत करुन टाकते. कामाचा वेग वाढतो खर्च कमी होतो. पाच प्रक्रिया एकीत सामावतात.

ऑफिसच्या बाहेर हे असे प्रक्रियांचे 'खच्चून भरणे' वापरले असता, त्याचे खूप दूरवर व्याप संभवतात. हेच उपकरण जर उपग्रह किंवा मायक्रोवेव्ह, किंवा टेलि–दळणवळण सोयी साधनांना जोडले गेले तर ते आजपर्यंत अतिशय दीर्घकाळ आणि अतिप्रचंड प्रमाणात काम करीत आलेल्या दुसऱ्या लाटेच्या, उच्च दर्जाच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्थेला–पोस्ट ऑफिसला रजा दिल्याखेरीज रहाणार नाही. 'ईलेक्ट्रॉनिक मेल' निर्माण झाल्यास ती पोस्टमन आणि त्याची ओझ्याने लादलेली बॅग यांची जागा घेईल.

अनुक्रमणिका

पोस्टाद्वारे व्यक्ती–व्यक्तीमधील पत्रव्यवहार, वस्तू, पैसे इत्यादि पाठवणे, मिळवणे या गोष्टी होतातच. परंतु पत्रव्यवहाराचा फार मोठा राबता संस्था–संस्थांमध्ये असतो. पोस्टावरचा ताण खूप वाढला तेव्हा दुसऱ्या लाटेतील या माध्यमाऐवजी त्याचा पर्याय अधिकाधिक कंपन्या शोधू लागल्या. नव्या, तिसऱ्या लाटेतील पद्धतींचा आश्रय त्यांनी घेतला. टेलिप्रिंटर्स, फॅसिमाईल मशिन, वर्ड प्रोसेसर उपकरण, कॉम्प्युटर टर्मिनल्स यांच्यावर आधारलेली ही इलेक्ट्रॉनिक पोस्टसेवा वेगाने लोकप्रिय होत आहे. विशेषतः प्रगत उद्योगांत आणि नव्या उपग्रह पद्धतींद्वारा ती प्रचंड जोम धरेल यात शंका नाही.

कागद इकडून तिकडे करण्याऐवजी नवी पद्धत इलेक्ट्रॉनिक स्पंदने वाहून नेते. संदेश आणि मेमो शांतपणे आणि सततपणे इकडून तिकडे, तिकडून इकडे येतात, जातात. प्रत्येक टेबलावरचे टर्मिनल माहितीचे वहन चालू असताना लुकलुकत असते. संदेश थेट एखाद्या उपग्रहाकडे फेकला जाऊन त्याच्याद्वारे दुसऱ्या हजारो मैल अंतरावरच्या स्थानात असलेल्या इच्छित स्थळी पाठवला जातो. एका कंपनीच्या फायली दुसऱ्या कंपनीच्या फायलींशी, गरज पडेल तेव्हा कॉम्प्युटर तर्फे जोडल्या जातात. न्यूयॉर्क टाइम्स इन्फर्मेशन बँक सारख्या प्रसिद्ध माहितीच्या बँकांच्या बाहेरही शेकडो बँकांतून साठवल्या गेलेल्या साठ्यातून कंपनीचा व्यवस्थापक केव्हाही आपल्याला हवी असलेली माहिती मिळवू शकतो.

या प्रकारे या दिशेने अजून काय आणि किती प्रगती घडणार आहे याची कल्पना नाही. भावी काळातल्या कचेरीची प्रतिमा अत्यंत टापटिपीच्या, अत्यंत सुरळितपणे चाललेल्या, अत्यंत अशारिरी रुपाच्या कचेरीची असल्यामुळे वास्तवात ती कधी येईल की नाही याचीच शंका येते. परंतु एक गोष्ट मात्र खरी, की आपण वेगाने त्या दिशेने जात आहोत. इलेक्ट्रॉनिक ऑफिकडे आपण आणखी थोडे जरी गेलो, तरी सामाजिक, मानसिक आणि आर्थिक परिणामांचे उद्रेक घडल्याशिवाय रहाणार नाहीत. नवीन यंत्रांपेक्षा कितीतरी अधिक अर्थ या कामकाजात्मक उलथापालथीला असणार आहे. मानवी संबंधाची आणि त्यांच्या कचेरीतील भूमिकांची पुनर्रचना होणार यात शंका नाही.

सुरुवातीलाच चिटणीसांच्या कामांपैकी पुष्कळ कामांना डच्चू मिळेल. उद्याच्या कचेरीत टंकलेखनामधील कला, प्राविण्य ह्या गोष्टींनाही काही स्थान असणार नाही. कारण नवीन तंत्रात बोली कौशल्याला जास्त प्राधान्य असणार आहे. अजून काही काळ संदेशांना पकडून ठेवण्यासाठी त्यांना वहनयोग्य स्वरुप देण्यासाठी टंकलिखित शब्दांची आवश्यकता असणार आहे. परंतु लवकरच डिक्टेशन यंत्रणा वेगवेगळे शब्दोच्चार यंत्राद्वारेच लेखी (टंकलिखित) स्वरुपात बदलले जातील. आवाजांचे अक्षरात रुपांतर झाल्यानंतर संपूर्ण टायपिंग पध्दतच नाहीशी होईल.

एक गोष्ट खरी की तिसरी लाट वेगाने पुढे सरकत असताना दुसऱ्या लाटेच्या जुन्या पध्दतींशी संघर्ष होणार. अनेक बाबतीतली काळजीही निर्माण होणार. जुन्या कार्यकारी खोडांना, ज्येष्ठता कनिष्ठता मानण्याच्या कल्पनांना, विभागीय विधिनिषेधांना या नव्या पध्दती आव्हान देतील. नवी रचना, नवी उभारणी केली जाईल. नव्या संधी, नवे जीवनमार्ग, उद्योग निर्माण होतील. पूर्वीपासून चालत आलेली लाखो जणांची कामेच नाहीशी होतील. रुक्ष आणि पुनरावृत्त कामे करत रहाण्याऐवजी चिटणीस थोडे वरच्या थराचे काम करतील. काही व्यावसायिक महत्त्वाची कामे, निर्णय घेणे या बाबींपासून इतके दिवस त्यांना दूर ठेवले जाई, आता त्यांना त्यात भाग घेता येईल. काही पांढरपेशे अधिकाधिक उच्च श्रेणी, जबाबदारीच्या जागा गाठतील तर काही खाली खाली जात रहातील. क्वचित नाहीसेही होऊन जातील.

अनुक्रमणिका

या लोकांचे काय होणार? अर्थव्यवस्थेचे काय होणार? इ. स. १९५० च्या दशकात अखेरीस आणि इ. स. १९७० च्या दशकाच्या सुरूवातीस जेव्हा स्वयंचलितपणा पुढे आला, तेव्हा अनेक देशातील ट्रेड युनियन्सनी मोठ्या प्रमाणात बेकारी वाढणार असल्याचे भाकीत केले होते. परंतु अतितंत्राधिष्ठित देशातील नोकऱ्यांची संख्या वाढलीच प्रत्यक्ष उत्पादन विभाग घटला, आणि कागदी काम फार मोठ्या प्रमाणात वाढले. परंतु अशाच तऱ्हेने उत्पादन घटत राहिले आणि त्याच वेळी ऑफिसमधील कामांची पिळवणूक झाली, तर पुढे नोकऱ्या असणार तरी कुठे?

पुढे सर्व काय होणार आहे याचे आज तरी कोणी काही उत्तर देऊ शकत नाही, सतत अभ्यास चालू आहेत, काही जोरदार ठाम विधाने केली जात आहेत, भाकिते केली जात आहेत, परंतु प्रत्यक्ष पुरावे त्या सर्वांविरुद्धच असलेले आढळून येत आहेत. स्वयंचलितासाठी किंवा यांत्रिकीकरणाबाबत करण्यात येणारी गुंतवणूक आणि उत्पादनाकडील नोकऱ्या यांचा कुठेही ताळमेळ बसू शकत नाही.

अमेरिकेत व जपानमध्ये कामे व तंत्रज्ञान दोन्ही वाढत आहेत. परंतु स्वीडन, फ्रान्स, प. जर्मनी आणि इटली यांच्या प्रत्येकाच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत.

नोकऱ्यांची पातळी हे केवळ तांत्रिक सुधारणेचे प्रतिबिंब असत नाही. तिचे उंचावणे किंवा खालावणे हे आपण स्वयंचलित किती प्रमाणात अंगीकारतो याच्यावर देखील अवलंबून असत नाही. कारण व्यवसाय स्वरुप, नोकऱ्यांची अवस्था हा अनेक धोरणांच्या एकत्र येण्याचा दृष्य परिणाम असतो.

एक मात्र निश्चित, की कचेऱ्यात आणि कारखान्यातही आगामी काही दशकात संपूर्ण बदल घडून येणार आहे. कागदी–कामाच्या क्षेत्रात आणि उत्पादनात घडून येणारी ही दुहेरी क्रांती समाजासाठी उत्पादनाची संपूर्णतया नवीन पध्दत तयार करणार असून मानववंशाचे ते एक फार मोठे पाऊल ठरेल. आणि ते केवळ व्यवसाय उद्योगपातळी किंवा उद्योगरचना यांच्यापेक्षा कितीतरी सामाजिक अंगांवर संमिश्र परिणाम करुन जाणार आहे. राजकीय सत्ता, आर्थिक सत्ता, आंतरराष्ट्रीय कामकाज विभागणी, अर्थकारणातील स्त्रियांची भूमिका, कामाचे स्वरूप, कार्यगटांचे आकार आणि उत्पादक व ग्राहक यांच्यातील फाटाफूट या व अशा अनेक गोष्टींवर परिणाम होणार आहे. वरवर अत्यंत साधी वाटणारी एक बाबही बदलून जाईल— 'कार्यस्थळ' ही ती बाब!

अनुक्रमणिका

# तेरा । इलेक्ट्रॉनिक बंगली

या नव्या उत्पादन पध्दतीच्या बाबतीत होणाऱ्या प्रगतीच्या पोटात सामाजिक बदलाचे इतक्या प्रचंड ताकदीचे व आवाक्याचे बीज आहे, की आपल्यातील फार थोडे लोक त्याला सामोरे जायला सिध्द होतील. कारण आपण आपल्या घरातही क्रांती करणार आहोत!

नवीन उत्पादन पद्धत अक्षरशः शेकडो कामे कारखाने व कचेऱ्या यांच्यातून काढून घेऊन दुसऱ्या लाटेपूर्वीच्या कार्यक्षेत्रात—घरात—घेऊन जाणार आहे! आणि हे जर खरोखरच प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात घडले तर आपल्याला माहित असलेली प्रत्येक संस्था—शाळेपासून कॉर्पोरेशनपर्यंतची—बदलून गेल्याशिवाय रहाणार नाही.

तीनशे वर्षापूर्वी जर कोणी म्हटले असते की हजारो वर्षांपूर्वीपासूनचे कार्यक्षेत्र म्हणजे शेती व ग्रामीण परिसर उजाड होणार आहे, तर त्याला सर्वांनी वेड्यात काढले असते. तो वेडा वाटेल असा विचार आज पुनः निर्माण झालेला आहे. कारखाने आणि हजारो कचेऱ्या ओस पडण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. आपल्याच जीवनकाळातही हे घडू शकेल. त्यांची संग्रहालये बनतील किंवा रहाण्याच्या जागात त्यांचे रुपांतर करण्यात येईल! नवी उत्पादन पद्धती 'कुटिरोद्योग' निर्माण करेल. घर हे समाजाचे केंद्रस्थान बनेल.

इथून पुढच्या काळात लाखो लोक आपला वेळ घरीच काम करीत घालवणार आहेत, याची नुसती कल्पना देखील कोणाला सहन होणार नाही. अनेक शंकांची, प्रश्नांची सरबत्ती सुरु होईल. त्यातील काही वानगीदाखल— 'शक्य जरी असले, तरी लोकांना घरात काम करणे आवडणार नाही. तुम्ही हे पहात नाही का, स्त्रिया आता घराच्या बाहेर पडण्याचा किती आटापिटा करत आहेत?' 'घरात मुलेबाळे आसपास वावरत असताना काम करणे शक्य होणार आहे का?' आपला वरिष्ठ आले 'अवलोकन' करण्यासाठी हजर नसताना लोकांना काम करावेसे वाटेल तरी का?' 'सामान्य घराची रचना अशा कामाला अनुकूल केलेली असत नाही.' 'कामगार संघटना ही कल्पना मारुन टाकतील...' "मुख्य म्हणजे दिवसभर नवरा बायकोंनी एकमेकांची तोंडे पहायची म्हणजे..." कार्ल मार्क्सला देखील ही कल्पना मुळीच आवडणार नाही!

होम वर्क : काम घरातच करणे

दुसऱ्या लाटेच्या उत्पादन पद्धतीत बदल होत आहे. तिसऱ्या, आगामी कालात अधिक प्रभावी होणाऱ्या, लाटेतील अधिक प्रगत उत्पादन कामगारांची संख्या कमी करण्याच्या मार्गावर आहे. उत्पादनाच्या प्रत्यक्ष कामालाही कसबी कारागीरांची आवश्यकता नाही. टेलिकम्युनिकेशन आणि इतर साधनांद्वारा काम कुठेही करता येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. ही केवळ कल्पना उरलेली नाही.

नार्दर्न इलिनॉइस फॅसिलिटीमधील दोन हजार नोकरांपैकी ६०० ते ७०० नोकर स्वतःच्या घरात काम करु लागलेले आहेत. येत्या पाच वर्षात हा आकडा आणखी किती तरी वाढेल. हे सर्व आता अस्तित्वात असलेल्या अतिशय उच्च तंत्रज्ञानाच्या मदतीने शक्य झालेले आहे.

अनुक्रमणिका

तिसऱ्या लाटेखालील उत्पादनाला कारखान्यातील कामगारांची खुद्द कारखान्यात १०० टक्के उपस्थिती असण्याची मुळीच गरज उरलेली नाही. प्रत्यक्ष उत्पादनाच्या ठिकाणच्या कामगारांबाबत ही परिस्थिती असेल, तर पांढरपेशे नोकर फार मोठ्या प्रमाणात असे कार्यस्थळ स्थलांतर करु शकतील, करतील.

अशा लोकांचे आताच कितीतरी काम घरात, म्हणजे कचेरीत वगैरे जावे न लागता, होत आहे. विक्रेते–फोनवरुन किंवा ग्राहकांना प्रत्यक्ष भेट देऊन आपले काम करतात. त्या त्यांच्या ऑफिसशी कारणपरत्वे व केव्हातरी असाच संबंध येतो. स्थापत्य शास्त्रज्ञ आणि कल्पनेचे आराखडे काढणारे, निरनिराळ्या उद्योगातील असंख्य विशेषज्ञ, उपचार तज्ञ–रोग निवारण तज्ञ आणि मानस शास्त्रज्ञ असे मानव सेवा विभागात काम करणारे, संगीत शिक्षक, भाषा निर्देशक, वकील, शैक्षणिक संशोधक, अशा शेकडो प्रकारातील काम करणारे पांढरपेशे लोक घरीच काम करतात.

आता अशा लोकांमध्ये आणखी प्रकारातील काम करणाऱ्यांची भर पडते आहे. कचेऱ्यातून कामे करणारे बहुसंख्य पांढरपेशे लोक आता घरी काम करण्यास अनुकूल होत चालले आहेत. कमी खर्चात घरातच एक 'वर्क स्टेशन' उभे करायचे!... त्यात 'स्मार्ट' टाइपरायटर–फॅसिमाइल यंत्रासह कॉम्प्युटर टेलि–कॉन्फरन्सिग यंत्रणा, अशापैकी सुविधा असल्याने घरातच काम करण्याच्या शक्यता मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक कुटिरात काम केंद्रित होत आहे. आवश्यक तेवढेच बाहेर जाऊन साधावयाचे कामकाजात्मक संबंध साधले जातात. खालच्या विचारपातळीचे काम करणारे नोकर अशी कामे करतात— उदा : माहिती गोळा करणे, टायपिंग, उरलेली माहीती पुनः मिळवून घालणे, बेरजा करणे, किंमत व इतर आकार यांसह मालाची यादी तयार करणे. अशी ही कामे प्रत्यक्ष दुसऱ्याशी लेखी किंवा बोली संबंध न येताही करता येतात. ही कामे करत असताना दुसऱ्या कोणाची मदत घ्यावी लागत नाही. त्यामुळे ती घरी, 'इलेक्ट्रॉनिक कॉटेज' मध्ये करता येणे सहज शक्य आहे. संशोधक, अर्थतज्ञ, धोरण आखणारे, संघटनात्मक आखणी करणारे, यांना प्रत्यक्ष संपर्कही मोठ्या प्रमाणात साधावा लागतो. परंतु त्यांनाही एकट्याने शांततेने काही काम करावयाचे असते. त्यानाही होमवर्कची गरज भासते.

दिवसे दिवस घरीच काम करण्याची प्रवृत्ती वाढतच आहे. अनेक कंपन्या आपल्या नोकरांना घरी काम करु देत आहेत. ज्याच्या घरी कॉम्प्युटर असला म्हणजे झाले. एकत्र येण्याची गरज नाही. 'कामाच्या ठिकाणी' १०० टक्के उपस्थितीची गरज नाही.

तरी या प्रकारात देखील काही अडचणी आहेत, तिकडे दुर्लक्ष करून उपयोग नाही. कामासाठी सर्वांना प्रवृत्त करणे, व्यवस्थापन, सामाजिक पुनर्रचना अशा बाबीतील अडचणी, व पूर्ततेसाठी लागणारा वेळ यामुळे हा बदल क्लेशकारकही होत आहे, आणि वेळही घेत आहे. शिवाय दळणवळण अशा तऱ्हेने दुसऱ्या, प्रातिनिधिक हाती करणे देखील कामकाजाच्या दृष्टीने अयोग्य ठरेल. काही कामे निर्णय घेण्याच्या दृष्टीने चाकोरी सोडून करावी लागतात, त्यांच्या व क्रियाशील व्यवहार व्यवस्थेच्या दृष्टीनेही समक्षच वाटाघाटी करणे आवश्यक ठरते यासाठी हे सर्व जरी घरीच काम करु लागले, तरी त्यांनी ही काळजी घ्यायला हवी की घरे एकमेकांपासून फार दूर असता कामा नयेत. तरच जरुर तेव्हा प्रत्यक्ष संपर्क साधता येणे शक्य होईल.

अनुक्रमणिका

जरी अडचणी असल्या तरी काही प्रभावी घटक इलेक्ट्रॉनिक कॉटेजच्या जवळ आपल्याला घेऊन चालले आहेत. त्यातील एक म्हणजे दररोज कामाच्या जागी जाण्या येण्यासाठी होणारा पैशांचा व वेळेचा खर्च आणि ही दूरसंपर्क साधने त्यांच्या तुलनेत वाचवत असलेला वेळ आणि तुलनेत कमी खर्च होणारा पैसा यांचा विचार. तंत्रदृष्ट्या अतिशय प्रगत झालेले देश वहातुक प्रश्नी पेचप्रसंगात अडकलेले आहेत— समुदायाची वाहतुक करण्याची व्यवस्था कोलमडून पडण्याच्या अवस्थेला आली आहे; रस्ते, हमरस्ते वहातुकीने गच्च भरुन जात आहेत; वाहने उभी करण्याच्या जागा कमी आहेत; प्रदूषण ही एक अतिशय गंभीर समस्या आहे; संप आहेत, एकूण शिरस्ता कोलमडून पडत आहे. आणि खर्च आकाशाला भिडू पहात आहे.

कामाच्या जागी या ये करण्याचा दिवसेदिवस वाढणारा खर्च ज्या त्या नोकराला स्वतः सोसावा लागतो. परंतु मग वेतनवाढीच्या रुपाने तो अप्रत्यक्षपणे मालकाकडे ढकलला जातो. आणि शेवटी मालाच्या किंमती वाढल्यामुळे ग्राहकाला भुर्दंड पडतो.

आता महत्त्वाचा प्रश्न असा आहे, की या कार्यान्वित दूरसंपर्क व्यवस्थेचा खर्च सध्याच्या ‘जा’ ‘ये’ खर्चांच्या खाली कधी जाणार आहे? त्या दिशेने गती आलेली आहेच. गॅसोलिन, आणि इतर वाहतूक खर्च असह्य होत चाललेला असताना दूरसंपर्क व्यवस्थेचा खर्च कमी कमी होत चाललेला आहे. कधीतरी दोन्ही वळणांचा छेद गेल्याशिवाय रहाणार नाही.

अमेरिकेतला सर्वसाधारण जा ये करणारा नागरी नोकर दररोज आपल्या प्रवासासाठी ६४·६ किलो वॅट एवढ्या ऊर्जेच्या किंमती एवढे गॅसोलीन वापरतो. आणि त्या मानाने प्रत्यक्ष कामासाठी, माहितीच्या दळणवळणसाठी, कितीतरी कमी ऊर्जा तो वापरतो.

नमुनेदार कॉम्प्युटर टर्मिनल, फक्त १०० ते १२५ वॅट्स् ऊर्जा, तो काम करीत असताना वापरतो. आणि फोन लाइन तर वापरात असताना केवळ एक वॅट किंवा त्याहून कमी ऊर्जा वापरते. एका अभ्यासात असे आढळून आले आहे, की जा ये खर्चाच्या तुलनेत दूर संपर्क व्यवस्थेचा खर्च जेव्हा खाजगी वाहन वापरले जात असते तेव्हा २९:१ आहे; जेव्हा सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असते तेव्हा ११:१ आहे आणि जेव्हा १०० टक्के सार्वजनिक वाहतूक होत असते तेव्हा २:१ असा आहे.

इ. स. १९७५ साली गोळा केलेल्या आकडेवारीनुसार १२ ते १४ टक्केच नागरी वाहतुकीची जागा दूर संपर्क माध्यमाने घेतली असताना अमेरिकेत जवळ जवळ ७५ दशलक्ष बॅरल्स गॅसोलीनची बचत झाली.

आगामी दशकांमध्ये गॅसोलीनच्या व ऊर्जा निर्मितीच्या किंमती वाढतच जाणार आहेत. तर आधुनिक दूरसंपर्क माध्यमाच्या किंमती आता कमी कमी होत जाणार आहेत. आणि काही उत्पादन मोठ्या केंद्रीय वर्कशॉपच्या बाहेर निर्माण होणे हे फायदेशीर ठरणार आहे. घरोघर कामे सुरू झाल्यानंतर मोठी केंद्रीय उत्पादनस्थळे निर्माण करण्याचा खर्चही कमी होईल. काही बाबतीत करावाही लागणार नाही. ही छोटीशी उत्पादन केंद्रे आणि कचेऱ्या अस्तित्वात आल्यावर इमारतीवर करावा लागणारा खर्च मर्यादित होईल आणि या जागा उबदार ठेवण्यासाठी, किंवा गार ठेवण्यासाठी लागणारा खर्च, किंवा एकूणच ती व्यवस्थित ठेवण्यासाठी लागणारा खर्चही कमी होईल. करांचा बोजाही कमी होईल. अनेक मार्गांनी कमी होणारा हा खर्च आपल्याला अधिकाधिक फायदा मिळवून देईल.

अनुक्रमणिका

उत्पादनाची जागाच बदलल्यामुळे आणि वहातूक कमी झाल्यामुळे प्रदूषणाला चांगला आळा बसेल, प्रदूषण नाहीसे होण्यासाठी करावा लागणारा खर्चही अगदी कमी होईल. स्वच्छ परिसरवाद्यांनी जर कारखान्यांना त्यांनी केलेले प्रदूषण नाहीसे करण्याची सक्ती केली, तर तो खर्च करीत रहाण्यापेक्षा उत्पादन केंद्रे विखुरणे व छोट्या छोट्या घरात पांगवणे त्यांना कमी खर्चाचे व कमी कष्टाचे वाटेल. परिसरवादी लोक आणि सनातनी लोक स्वयंचलितांच्या घातक परिणामांचा निषेध करतात. रस्ते आणि हमरस्ते याच्या बांधणीला विरोध करतात. काही ठराविक भागात मोटारींना प्रवेश बंद करून ठेवतात. या गोष्टींचा न कळतच कामाच्या जागा बदलण्याच्या प्रवृत्तीला पाठिंबा मिळतो. या विकेंद्रीकरणातील प्रमुख कृतीला प्रोत्साहन दिल्यामुळे ते तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीची आपल्याला निश्चितच ओढ लावतील.

काही सामाजिक घटकही इलेक्ट्रॉनिक कॉटेजकडे होत असलेल्या आपल्या व्यावसायिक स्थित्यंतराला पाठिंबा देत आहेत. कामाचे तास कमी होत आहेत आणि कामाला जा—ये करण्याचा वेळ मात्र तेवढाच रहातो. ही गोष्ट विसंगतीपूर्ण ठरते. ही विसंगती वाढेल त्या प्रमाणात ही जा ये करण्याची सक्ती विवेकशून्य, वैताग निर्माण करणारी आणि अव्यवहार्य वाटू लागते. जा—ये करण्याबाबतीतील नोकरांची नाराजी असते व ती घालविण्यासाठी मोठमोठ्या कार्यालयाना वाढती आकर्षणे निर्माण करावी लागतात. याच्या उलट जा—ये करण्याच्या वेळाच्या, खर्चाच्या आणि गैरसोयीच्या मोबदल्यात कमी पगार घेण्यास राजी होणाऱ्या नोकरांचे प्रमाण दिवसेदिवस वाढतेच आहे.

यापेक्षाही अधिक खोल अर्थ असलेले बदल सध्या घडून येत आहेत. खाजगीपणाची वाढती आवड, छोटी शहरे व ग्रामीण जीवन यांच्या आकर्षणापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकांमध्ये एक मूलभूत बदल घडून येतो आहे. तो म्हणजे लोकांना अतिकेंद्रित कुटुंबाऐवजी मोठ्या कुटुंबाबाबत उत्सुकता वाटू लागली आहे. दुसऱ्या काळात अस्तित्वात आलेले केंद्र (न्युक्लिअर) कुटुंब आता धोक्यात आले आहे. फाटाफूट झालेले कुटुंब एकत्र आणले जाण्याची लोक वाट पहात आहेत. इतिहासात कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी गोष्ट म्हणजे सर्वांनी मिळून केलेले काम.

आज देखील असे म्हटले जाते, की जर जोडप्याने एकत्र काम केले, तर घटस्फोटांचे प्रमाण किंवा त्यांचा संभव कमी असतो. जेव्हा इलेक्ट्रॉनिक घरात काम करणे सुरू होईल, तेव्हा घरोघरी स्वतःची बायको, कधी कधी मुलेही यांचा एक गट बनून काम करावयास मदतच होतील. कौटुंबिक जीवनाचे समर्थक कामाच्या ठिकाणात होणाऱ्या बदलाव्दारे याही गोष्टी घडू शकतील असा विचार करतात. त्यातूनच नव्याप्रकारे कर पद्धत, कामगारांचे हक्क अशा गोष्टींचा विचार करण्याची निकड निर्माण होते.

लवकरच अशा चळवळी निर्माण होतील, की ज्यांच्याव्दारा घरी होऊ शकेल असे प्रत्येक काम घरीच करायला मिळावे अशी मागणी केली जाईल. अनेक नोकर लोकांचा कल याच बाजूने राहील. कौटुंबिक जीवनाला मोठ्या प्रमाणात बळकटी येईल; असे लक्षात येऊन या प्रकारच्या मागण्यांना राजकारणी, धार्मिक, सांस्कृतिक कैवारी अशा सर्व प्रकारच्या लोकांचा जोरदार पाठिंबा मिळत जाईल.

इलेक्ट्रॉनिक कॉटेज साठीचा हा झगडा म्हणजे मोठ्या थोरल्या युध्दाचा भूतपूर्व दुसऱ्या व आगामी तिसऱ्या लाटेमधील—एक भाग आहे. त्यांच्या द्वारे तंत्रज्ञ आणि कॉर्पोरेशन्स एकत्र येतील, नवीन तांत्रिक शक्यता पूर्णतः आजमावल्या जातील. शिवाय परिसरवादी, कामगार सुधारक—नव्या प्रकारचे, अनेक संस्था व्यवस्थापकांची मोठी युती, सनातनी चर्चेस, स्त्रीमुक्तीवादी, राजकीय गट एकत्र येऊन कुटुंबाचे

अनुक्रमणिका

समाधानकारक भवितव्य घडवतील. इलेक्ट्रॉनिक कॉटेज हा तिसऱ्या लाटेतील महत्त्वाचा, विखुरलेले एकत्र आणणारा भाग ठरणार आहे.

## घरात केंद्रित झालेला समाज :

इलेक्ट्रॉनिक कॉटेज निर्माण होऊन बहुतांश कामे तिथेच करण्याची पद्धत सुरू झाली, की तिचे समाज जीवनावरही मोठे परिणाम होणार आहेत. नोकर आपले थोडे किंवा बहुतेक सर्व काम घरीच करु लागले म्हणजे त्यांना नोकरीसाठी इकडून तिकडे जागा बदलण्याचे कामच रहाणार नाही. बदलीचे कारणच उरणार नाही.— आजही गोष्ट पुष्कळांना करावीच लागते— एका ठिकाणी रहाणे त्यांना शक्य होईल. त्यांना समाजाच्या किंवा जमातीच्या सामुदायिक जीवनात भाग घेता येईल. आज एखाद्या ठिकाणी एखादे कुटुंब रहायला गेले म्हणजे त्याची अशी भावना असते, की 'इथे आपण किती काळ असणार आहो? आज ना उद्या हे ठिकाण सोडून आपल्याला दुसरीकडे जावे लागणार आहे.' त्यामुळे त्याला तिथल्या जीवनाशी एकरुप होताच येत नाही आता हे चित्र बदलून जाईल. समाजाच्या अखत्यारीतीच अनेक गोष्टींमध्ये माणसाला उत्सुकता वाटू लागेल. चर्च स्त्रियांचे गट, क्लब, खेळ, युवा संघटना अशा जीवनाच्या विविध अंगांचा पुनः स्वीकार केला जाईल. 'सहजीवन' सुरु होईल. समाजशास्त्रज्ञ या अशा प्रकारच्या जीवनाला विशेष महत्त्व देतात.

कामाचे असे स्थलांतर ऊर्जा केवळ कमी वापरणेच शक्य करणार आहे असे नसून ऊर्जेचे विकेंद्रीकरणही करणार आहे. अतिशय केंद्रित अशा मोठ्या उद्योगांना, संस्थांना व कचेऱ्यांना अतिशय केंद्रित ऊर्जा निर्मितीची व पुरवठ्याची गरज असते. परतु उद्योगाची केंद्रे सुटी होत पांगल्यानंतर, घरोघर गेल्यानंतर अशा एकदम मोठ्या विद्युत् पुरवठ्याची आवश्यकता असणार नाही. छोट्या प्रमाणात निर्माण होणारी, सूर्य, वारा, लाटा इत्यादि विविध उगमस्थानांपासून मिळू शकणारी ऊर्जा कितीतरी गरज भागवू शकेल. मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण करणारी इंधने कमी प्रमाणात वापरली जातील. त्यांचा वापर काही ठिकाणी अजिबात देखील थांबेल. प्रदूषित उत्सर्जनही छोट्याच प्रमाणात केले जाईल.

या पद्धतीमुळे काही व्यवसाय आखडतील, तर काहींचा विकास होईल. इलेक्ट्रॉनिक व कॉम्प्युटर दळणवळण हे उद्योग वाढतील. तर तेल कंपन्या, स्वयंचलित वाहनांचे उत्पादन इत्यादि उद्योगांवर विपरीत परिणाम होतील.

अनेक जण व्यक्तिशः, वेळप्रसंगी कर्ज काढून, स्वतःची इलेक्ट्रॉनिक टर्मिनल्स व इतर यंत्रणा उभी करतील. आणि स्वतंत्रपणे उद्योग हाताळतील. उद्योगातील स्वामित्व नोकरांना लाभू शकेल. घरी काम करणाऱ्यांचे गट निर्माण होतील. स्वतंत्रपणे वेगवेगळ्या कंपन्याही तयार होतील. नवीन प्रकारचे संबंध, नवीन प्रकारच्या संघटना तयार होतील.

आपल्या सध्याच्या समाजात मेंदूवर खूपच ताण पडतो आहे. कामे काही अध्याहृत प्रतीकांवर अवलंबून राहून केली जात आहेत. समाजात वावरताना व्यक्ती फारच तटस्थ होते आहे. व्यक्ती व इतर यांच्यात जणू विद्युत् शक्तीचा एक अदृश्य पडदा उभा राहिलेला असतो. या नंतर नव्या पध्दतीच्या योगाने हे चित्र बदलले जाईल. व्यक्ती व्यक्तीतील रुक्षपणा जाऊन जिव्हाळा निर्माण होत जाईल. कारण व्यक्तीचा घरात आणि शेजारीपाजारी परस्परांशी प्रत्यक्ष संबंध येत रहातील.

अनुक्रमणिका

काही वेळा असाही प्रकार होतील की काम घरात करायचे की कामाच्या केंद्रीय ठिकाणी अगर कचेरीत या बाबतची निवड करण्याचा व्यक्तीला अधिकार राहील. कधी इथे तर कधी तिथे कामे करून अंदाज घेऊ शकतील. थोडे काम घरात व थोडे बाहेर असेही एकाच कालखंडात करून पाहू शकतील. काय फायद्याचे हे त्यांना समजेल. काय सोपे जाते, हेही त्यांना कळून येईल.

मोठ्या फर्मकडून काम घेऊन ते करून देण्यासाठी छोट्या फर्म्स उघडल्या जातील हे स्पष्टच आहे. अशा छोट्या कंपन्या एकमेकींशी संबंध ठेवण्यासाठी धडपडतील. त्यांच्या संघटना होतील. त्या पार्ट्यांची जुळणी करतील. सामाजिक समारंभ घडवून आणतील. इतर काही उत्सव करतील. त्यामुळे एका गटाच्या सभासदांचे संबंध केवळ कामधंद्यापुरते न रहाता जिव्हाळ्याचे होतील.

ह्या लोकांची एक बाजू तयार झालेली असेल. परंतु घरी काम करण्याच इच्छा नसणारेही काहीजण असतील. त्यांचा वेगळा गट असेल. आणि या दोन प्रकारांमध्ये छोटे मोठे संघर्ष व्यावसायिक व व्यवसायाच्या व्यावहारिक बाजू विषयीही निर्माण होणे शक्य आहे. शहरांचे काय होणार? नोकरी बेकारी हे प्रश्न अस्तित्वात असणार काय? असे अनेक प्रश्न व समस्या उपस्थित झाल्याखेरीज रहाणार नाहीत.

एक गोष्ट खरी, की नवी लाट आली, म्हणजे पहिली अगदी संपूर्णतया पुसली जाते असे नाही. कारण औद्योगिक क्रांतीची लाट आली, तरी पहिली शेतीची लाट संपूर्णपणे नाहीशी होऊन जगातून अदृश्य झाली असे नव्हे. तिचे अवशेष काही ठिकाणी आजही पहायला मिळतात. तिच्यातील काही प्रश्नांची सोडवणूक झालीच नाही. तोच प्रकार आता घडणार आहे. दुसऱ्या लाटेचा, औद्योगिक क्रांतीने अंगीकारलेल्या एकूण धाटणीचा काही भाग शिल्लक रहाणारच आहे. अर्थात् तिचा कैवार घेणारे तिच्यातील न सोडवता येण्यासारख्या प्रश्नांसह– उदा. : ट्रेड युनियन्स, कामगार संघटना, कंटाळवाण्या कामातून होणारी भरडणूक, अति विशेषीकरण. वेतन प्रश्न, व्यक्तीला मिळणारी भावनाशून्य निष्ठुर वागणूक–तिलाच कवटाळून बसणार आहेत, हे प्रश्न गेल्या ३०० वर्षात सोडवता आले नाहीत त्याचा अर्थ असा, की ते उद्योगप्रधान संस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत.

इलेक्ट्रॉनिक कॉटेज पद्धत कितपत सत्यात उतरणार आहे याबद्दल आपण आज फार काही सांगू शकणार नाही. तथापि एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की आजच्या प्रमाणेच पुढील २० ते ३० वर्षातही जरी १० ते २० टक्के काम या तऱ्हेने होत राहिले, तर आपले अर्थकारण, आपली शहरे, आपली कुटुंबरचना, आपली मूल्ये, आपले राजकारण देखील ओळखू न येण्याइतके बदलून जाणार आहे.

ही एक शक्यता आहे. चिंतनीय संभाव्यता आहे. तिसऱ्या युगाचे असे एक खास सामाजिक क्षेत्र आपण निर्माण करणार आहोत.

# चौदा । उद्याची कुटुंबे

आज जगाच्या फार मोठ्या भागाला एक प्रश्न सतत भेडसावतो आहे. हा प्रश्न दिवसेंदिवस विक्राळ स्वरुप धारण करतो आहे. त्यामुळे तर तो सोडवण्याची निकड मोठ्या प्रमाणात निर्माण झाली.

तो प्रश्न आहे कुटुंबासंबंधीचा. ज्याच्या उभारणीवर आणि स्वास्थ्यावर समाजाची आणि परिणामतः संस्कृतीचीही उभारणी आणि स्वास्थ्य अवलंबून असते असा हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. कुटुंबे ही आज आमची प्रथम क्रमांकाची समस्या होऊन बसलेली आहे. कारण आज कितीतरी कुटुंबे मोठ्या प्रमाणात भंगलेली आहेत. काहींच्या ठीकऱ्या उडालेल्या आहेत. आणि मोडतोडीच्या या ढिगाऱ्याखालून कसेबसे बाहेर येणारे स्त्रीपुरुष या स्थितीमुळे खंतावत स्वतःलाच दोष देत आहेत. काही थोड्या प्रकरणी आपण जरुर म्हणू शकतो हा स्त्रीचा, किंवा पुरुषाचा किंवा दोघांचाही दोष आहे. परंतु एखाद्या देशात एकाच वेळी लाखो घरांतून घटस्फोट, ताटातूट किंवा इतर प्रकाराने घरे मोडून पडत असतील तर ती केवळ वैयक्तिक दोषांची परिणती आहे हे म्हणणे चूक आहे.

आज कुटुंबसंस्थेची जी दाणादाण उडाली आहे, ती दुसऱ्या लाटेच्या उडत असलेल्या दाणादाणीचाच एक भाग असून तिसऱ्या लाटेच्या आगमनापूर्वी तयार होत असलेली ती एक पार्श्वभूमी आहे. कुटुंबसंस्था ओळख न येईल अशा पद्धतीने बदलत चालली आहे.

आज बदलत जाणारे, किंवा मोडून पडणारे कुटुंब म्हणजे दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीतून निर्माण झालेले वैशिष्ट्यपूर्ण न्युक्लिअर किंवा अतिकेंद्रित कुटुंब. ह्या कुटुंबाचे घटक असतात— नवरा, बायको आणि मुले. जिथे म्हणून औद्योगिक क्रांती जाऊन पोचली, तिथे तिथे ह्या पध्दतीची कुटुंबे निर्माण झाली. ही कुटुंब पध्दती सर्वमान्य औद्योगिक जीवनाची अंगभूत बाब होती. आणि या जीवनाने कुटुंब जीवन आणि औद्योगिक जीवन यांच्यात फार मोठी फट निर्माण करुन ठेवली होती. आज या प्रकारच्या कुटुंबाचे तुकडे होऊ लागले असून ते सावरले जावेत यासाठी समाजशास्त्रज्ञ, अधिकारी, सत्ताधारी सतत आवाहन करीत आहेत; प्रयत्न करीत आहेत.

या कुटुंब समस्येवर सुचवले जाणारे तोडगे पोट तिडिकीचे आहेत, परंतु विचित्र आणि गोंधळलेल्या स्थितीचे निदर्शक आहेत. या समस्येच्या कारणमीमांसेतही हास्यास्पदता आलेली आहे. ही कारणमीमांसा करणारे लोक रॉक म्युझिकला दोष देतात. गर्भपातास परवानगी व लैंगिक शिक्षण या गोष्टींना दोष देतात. स्त्री मुक्ती चळवळीला दोष देतात. आणि असे सुचवतात, की आता असे अभ्यासक्रम निर्माण झाले पाहिजेत, की ज्यातून कुटुंब विषयक शिक्षण देण्यात येईल. आपला जीवनसाथी योग्य तऱ्हेने निवडता यावा यासाठी शास्त्रशुध्द मार्गदर्शन, करू शकणारा अभ्यासक्रम शिक्षणात यावा. लग्नानंतर निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी सल्ले देणारे आणि कुटुंबाला चांगले स्वरुप देण्यासाठी आवश्यक ते सार्वजनिक संबंध यांची ही गरज असल्याचे ते सांगतात. ऐतिहासिक स्वरुपाच्या बदलाच्या लाटांनी जणू आंधळे बनलेले हे लोक काहीही वेड्या सूचना करतात आणि परिणामतः लक्ष्यापासून दूरच रहातात. अशाच काही सूचनांचा थोडा नमुना पहा.

अनुक्रमणिका

१) सर्व तंत्रज्ञान पूर्वीच्या दुसऱ्या लाटेच्या स्थितीला परत आणा. कॉम्प्युटर हाच न्युक्लिअर कुटुंबाचा मोठा शत्रू. मोठ्या प्रमाणात उत्पादन होणे ही हे कुटुंब टिकविण्यासाठी आवश्यक असलेली बाब आहे. कारण त्या उत्पादन पद्धतीसाठीच ती कुटुंब धाटणी निर्माण झाली.

२) उत्पादनाला मदतीचा हात द्या. पांढरपेशा उद्योगाची वाढ थांबवा.

३) ऊर्जा समस्या अति केंद्रित प्रक्रियाद्वारेच– उदा. : अणुप्रक्रिया– सोडवा. केंद्रित कुटुंबाला अशा केंद्रित समाजाची आवश्यकता आहे.

४) माध्यमांचे विघटन थांबवा. कारण ते ही कुटुंबाची विघटन होण्यास मदत करते.

५) स्त्रियांना परत त्यांच्या जागी म्हणजे स्वयंपाक घरात कोंबा. जात नसतील तर सक्तीने कोंबा. कारण एक कोणीतरी प्रौढ सतत घरात असणे अतिशय आवश्यक आहे. पुरुष घरात राहूनही हा प्रश्न सुटेल.

६) तरुणांचे वेतन कमी करा. म्हणजे ते घरातल्यांवर अधिक काळपर्यंत विसंबून राहतील.

७) कुटुंब नियोजन व शरीर शास्त्रविषयक संशोधन थांबवा. कारण त्यांच्यामुळेच स्त्रिया 'स्वतंत्र' झाल्यात.

८) एकूणच समाजाचे राहाणीमान खाली आणा. कारण स्वतंत्रपणे एकटे रहाणारे पुरूष किंवा मिळवित्या स्त्रिया, किंवा कोणतेच पाश नसणाऱ्या व्यक्ती उच्च रहाणीचा अंगीकार करू शकतात. थोडी गरीबी आणली की लोक एकमेकांवर अवलंबून राहू लागतील.

९) विकेंद्रित होऊ पहाणारा समाज पुनः घनीभूत करा. त्यासाठी राजकारण, कला, शिक्षण, उद्योग ह्या सर्व क्षेत्रात बदल करावे लागले तरी चालतील!

यावरून नजर टाकली तरी लक्षात येईल की या प्रश्नाने किती गंभीर रूप धारण केले आहे. पण हेही खरेच की या तोडग्यांमधून घायकुतेपणाच दिसून येतो! 'कुटुंब'च सर्वथा मोडून पडले आहे असे नसून दुसऱ्या लाटेतील वैशिष्ट्यपूर्ण कुटुंब रचनेवर आघात होत चाललेले आहेत.

## इतर प्रकारची कुटुंबे व जीवन पद्धती :

ज्या प्रमाणे दुसरी लाट आल्यावर संयुक्त किंवा मोठ्या कुटुंबाची पद्धत संपूर्णपणे नाहीशी झाली नाही, त्याप्रमाणेच तिसरी लाट आली. कुटुंबाचे विविध प्रकार अस्तित्वात आले. म्हणून दुसऱ्या लाटेतील अविस्तारित व केंद्रित कुटुंबाचा संपूर्णतया नाश होणार नाही.

अनुक्रमणिका

तिसऱ्या लाटेने जगातील अनेक देशात आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली आहे. अमेरिकन संयुक्त संस्थानात तर अधिकच. येथे जुन्या पद्धतीच्या केंद्रित कुटुंबाच्या बाहेरच बहुतेक लोक आता राहू लागले आहेत.

नवरा, बायको व मुले एवढ्याचेच जरी म्हटले, तरी कुटुंब किती प्रमाणात अमेरिकेत सापडेल? अमेरिकेत फक्त ७ टक्के कुटुंबे या प्रकारचे जीवन जगत आहेत. इतर ९३ टक्के या प्रकारात बसू शकत नाहीत. इतर कुटुंब प्रकारांचे प्रमाण दिवसे दिवस वाढत आहे.

कोणत्याही प्रकारच्या कुटुंबात न रहाता 'एकटे' रहाणाऱ्या लोकांची संख्या अमेरिकेत वाढते आहे. १४ ते ३४ या वयोगटातील, एकटे रहाणाऱ्या अशा लोकांची संख्या अमेरिकेत इ. स. १९७० ते १९७८ या कळात १·५ दशलक्षवरून ४·३ दशलक्ष इतकी वाढली आहे! अमेरिकेतल्या घरापैकी एक पंचमांश घरे एकेकट्यांची आहेत. एकटेच रहात असल्यामुळे त्यांना अधिक बेडरूम्स असलेल्या घरांची गरज नसते. त्यामुळे आता छोटी छोटी घरे किंवा फ्लॅटस् मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागले आहेत! एकटे रहाण्याची या लोकांवर वेळ आली आहे किंवा त्यांच्यावर कोणी सक्ती केली आहे अशातला भाग नाही. ती त्यांची मनापासूनची आवड आहे! काही काळापुरते का होईना कोणताही पाश न ठेवता किंवा निर्माण न करता एकट्याने रहावे याची आवड लोकांना वाटते आहे.

लोकसंख्येतला अधिक वयाचा भाग जर आपण पाहिला, तर त्याच्यापैकीही बरेच जण एकटे रहातात. एक लग्न मोडले आहे, दुसरे अजून व्हायचे आहे अशा प्रकारच्या मध्यंतरकाळात हे लोक एकटे रहातात. अशा पैकीही बहुतेकांना एकटे रहाणे आवडते. एक नवीनच 'एकटेपणा'ची संस्कृती भरभराटीला येत आहे.

या शिवाय आणखी एक प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या प्रकारात लोक लग्नाशिवायच एकत्र रहातात. दिवसे दिवस अशा लोकांची संख्या प्रचंडपणे वाढत आहे. त्यामुळे अशा लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी कायदे कानू अस्तित्वात येऊ लागले आहेत. उदा. : त्यांनी 'घटस्फोट' घेतला, तर कायदेशीर तरतूद हवी. इस्टेटीचे काय करायचे हेही ठरवायला हवे! लग्नात निर्माण झालेल्या समस्या सोडवण्यासाठी असतात तसे अशा 'जोडप्यां'च्या समस्या सोडविण्यासाठीही सल्लागार निर्माण झाले आहेत. त्यांचा धंदा जोरात आहे!

अपत्य बंधनापासून सुटका :

या संदर्भातील आणखी एक लक्षणीय बदल म्हणजे अनेकांनी विचारपूर्वक अपत्यबंधनापासून सुटका करून घेतलेली आहे आता मुलेबाळे असलेली घरे आढळण्या–ऐवजी पुष्कळ ठिकाणी केवळ प्रौढांची घरे आढळतात. हे शतक सुरू होण्याच्या सुमाराला समाजात एकटे रहाणारे फारच थोडे होते. मुलाबाळांच्या घरात रहाणाऱ्या आईबापांची संख्या अधिक होती. परंतु हा कुटुंबवत्सलपणा नंतर नष्ट होत गेला. इतक्या प्रमाणात की चारपैकी एकाच घरात १८ वर्षाखालील मुलांसह मातापिता रहातात.

आता मुलांपासून मुक्त आयुष्याचे समर्थन फार मोठ्या प्रमाणात होत आहे. इ. स. १९६० च्या सुमाराला अमेरिकेत २० टक्के विवाहित अपत्यमुक्ती भोगत होते. इ. स. १९७५ पर्यंत हेच प्रमाण ३२ टक्याहून अधिक झाले. यामुळे आता मुलांच्या हक्कांच्या समर्थनात काही संघटना भाग घेत आहेत!

अशाच प्रकारच्या काही संघटना इंग्लंड, प. जर्मनी व युरोपातील अनेक देशात काम करत आहेत. मुलांच्या अस्तित्वाचे महत्त्व पटवून देण्याची वेळ आलेली आहे.

आता, मुलांसह रहाणाऱ्याकडे पाहू. कुटुंबे भंग पावू लागल्यानंतर आता आई व वडिल यांच्यापैकी एकाच्या नेतृत्वाखालील कुटुंबे मोठ्या प्रमाणात तयार होऊ लागली आहेत. आज सर्वसामान्यतः सातापैकी एक अमेरिकन मूल आपल्या दोघा जन्मदात्यांपैकी एकाच्याच छायेत वाढते आहे. नागरी भागात तर हेच प्रमाण चार मुलांपैकी एक अशा भयानक स्थितीत आहे! आणि पहाणी व अभ्यास करणाऱ्यांना असे आढळून आले आहे, की असे आयुष्य या मुलांना फार सुखाचे वाटते. इतके आईबाप सतत घरात भांडत आहेत अशा स्थितीतच्या घरात रहाणे त्यांना असह्य झाले होते!

इतर देशांतूनही हा प्रकार घडलेला आहेच. पण याहून वेगळा प्रकार म्हणजे घटस्फोट घेतल्यानंतर पुनः वैवाहिक आयुष्य स्वीकारणारे आपल्या वाटेला आलेल्या, पहिल्या लग्नापासूनच्या मुलांच्यासह नव्या संसारात प्रवेश करतात. आणि अशा तऱ्हेचे विस्तारित कुटुंब अस्तित्वात येते. सध्या तरी २५ टक्के अमेरिकन मुले आपल्या आईच्या नाही तर बापाच्या नव्या कुटुंबात रहात आहेत. हे प्रमाण आणखी वाढत रहाणार आहे. या पद्धतीतून निर्माण होणारा नवीन असा एक प्रश्न म्हणजे एखाद्या पालकांचे आपल्या जोडीदाराच्या, परंतु प्रत्यक्ष आपल्यापासून न झालेल्या अपत्याशी असलेले लैंगिक संबंध!

तांत्रिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशामध्ये आजमितीला अनेक प्रकारची कुटुंबे अस्तित्वात आहेत. उदा : समलिंगी विवाह, अनेक प्रौढांचा एकत्र रहाणारा आणि मनाला येईल त्याच्याशी किंवा तिच्याशी लैंगिक संबंध ठेवू इच्छिणाऱ्या लोकांचा गट, करार विवाह, क्रमशः होत रहाणारे विवाह, लग्न टिकलेले आहे. परंतु लग्नातील दोन भागीदार–मुलांचे आईबाप दोन शहरांतून नोकऱ्या करीत असल्याने दोन लांबच्या ठिकाणी रहात आहेत. हाही कुटुंबाचा एक प्रकारच म्हणायला हवा.

तीन उत्सुक मानसशास्त्रज्ञानी अभ्यास करून कुटुंबाच्या विविध प्रकारांचा जेव्हा आलेख काढण्याचा, आढावा घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना असे आढळून आले की शिकागो जवळील कृष्णवर्णीय वसाहतीत प्रौढांच्या ८६ वेगवेगळ्या प्रकारांनी तयार झालेल्या जोड्या आपापल्या घरात नांदत आहेत!

जे सी वर्नार्ड या समाजशास्त्रज्ञाच्या मते भावी काळातील विवाहाचे वैशिष्ट्य हे असणार आहे, की प्रत्येक व्यक्तीला आपल्याला कोणाजवळ कोणत्या नात्याने रहावयाचे याबाबत निवड करण्यासाठी भरपूर कुटुंब प्रकार हाताशी असणार आहेत!

नेहमी विचारला जाणारा एक प्रश्न असा आहे, की 'कुटुंबाचे भवितव्य काय?' आणि याचा अर्थच असा, की गेली तीनशे वर्षे प्रभावी स्थान धारण करणारी केंद्रे (न्युक्लिअर) कुटुंबे आता तितकी प्रभावी राहिलेली नाहीत. दुसरे प्रकार आता पुढे येऊ लागलेले आहेत. तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या बाबतीत एक

अनुक्रमणिका

शक्यता अशी आहे, की कुठलाही कुटुंबमिश्रण प्रकार अधिक काळ टिकाव धरू शकणार नाही, प्रभाव पाडू शकणार नाही. आणखीही कित्येक प्रकारची कुटुंबमिश्रणे आपल्याला पहायला मिळतील. ठराविक पद्धतीच्या कुटुंबरचनेत लाखो लोक रहात आहेत असे पहायला मिळणे आता कठीण आहे. कोणी कोणता प्रकार किंवा पद्धत स्विकारावी हा ज्याचा त्याचा वैयक्तिक निवडीचा भाग राहील. इथून पुढे या पूर्वीची वैशिष्ट्यपूर्ण केंद्र (न्यूक्लिअर) कुटुंबरचना समाजाने स्विकारलेल्या व पसंत केलेल्या अनेक रचनांपैकी केवळ एक असणार आहे.

ताजा व नैसर्गिक जिव्हाळा :

कुटुंब रचनांच्या विविध प्रकारांना इतका बहर आलेला आहे, की यातील कोणता भविष्यकाळात अधिक लोकप्रिय होईल हे सांगणे अवघडच आहे.

आपली मुले खूप वर्षे, काही दशकेही एकटीच रहातील का? त्यांना मुले होतील की नाही? त्यांना वृद्धाश्रमात जावे लागेल का? आणखी काही चमत्कारिक शक्यता आहे का? आता जन्माला येणाऱ्या मुलाचे लिंग निवडण्याची पद्धत सुरू होत आहे. पुष्कळशा आईबापांना मुलगेच जन्माला यायला हवे असतात. पुढे समाजात मुलगे फार प्रमाणात आणि मुली थोड्या अशी असमतोलाची स्थिती निर्माण झाली तर काय होणार? एका बायकोशी अनेक नवऱ्यांचे प्रपंच चालू होणार काय? समलिंगी जोडपी जी मुले वाढवायला घेतात, त्यांचे काय? कोर्टात हा प्रश्न चर्चेत आलेलाही आहे. शास्त्रीय पद्धतीने केलेल्या कोणा अज्ञात व्यक्तीच्या बीजारोपणापासून होणाऱ्या संततीचे काय?

प्रायोगिक तत्त्वावर केले जाणारे विवाह. संततीपासून अलिप्त रहाणारे विवाह आणि 'मुले' आहेत पण त्यांचे पालक समलिंगी आहेत... किती प्रकारचे, विचारांच्या टप्प्या पलिकडचे विवाह आहेत. परंतु इतरांना ज्या गोष्टी अनाकलनीय वाटतात त्या त्या पद्धतीने जगणाऱ्यांना अगदी नैसर्गिक वाटतात!

कुटुंबाचे कोणते प्रकार नाहीसे होणार आणि कोणते टिकणार ही गोष्ट 'कुटुंबाच्या पावित्र्या' बाबतच्या प्रवचनांपेक्षा, तंत्रज्ञानाचा अंगीकार आणि कामाच्या पद्धतीचा स्वीकार यांच्यावर अवलंबून रहाणार आहे. आगामी बदलांपैकी कोणते, कोणत्या अंगाने, कसे, कौटुंबिक जीवनावर परिणाम करणार आहेत. याबद्दल इतक्या कमी अवधीत अंदाज व्यक्त करणे कठीण असले, तरी एक गोष्ट मात्र निश्चित आणि भरपूर परिणाम करणार यात मुळीच शंका नाही. ही गोष्ट म्हणजे घरातच सुरू होत असलेले कामकाज.

असे मानू या, की आगामी २५ वर्षात १५ टक्के काम काही वेळ किंवा सर्व वेळ घरात केले जाईल. ह्या बद्दलच्या कौटुंबिक संबधांवर, प्रेमावर, जिव्हाळ्यावर काय परिणाम होईल? इलेक्ट्रॉनिक बंदल्यातील जीवन कसे असेल?

काम कोणते आणि कशाप्रकारे केले जाईल, हा प्रश्न गौण आहे. एक महत्त्वाची गोष्ट ही, की पतिपत्नी पूर्वीच्या कामाच्या पद्धतीमुळे एकमेकांजवळ ठराविक तसाच वावरु शकत असत. ते आता पुष्कळ काळ आणि अधिक सलगीने एकमेकांजवळ आणले जातील. काही जणांना ही स्थिती कंटाळवाणी, वैतागवाणी, काही बाबतीत तिरस्करणीय वाटण्याचीही शक्यता आहे. परंतु बहुसंख्य जोडप्यांमध्ये अधिक

अनुक्रमणिका

जिव्हाळा निर्माण होईल. सहअनुभवामुळे त्यांच्या नात्यात संपन्नता येईल. मोडकळीला आलेली कितीतरी लग्ने सावरली जातील.

घरातच काम करणे सुरू झाल्यावर काय परिस्थिती असेल याचा आपण अंदाज घेऊ या. बहुतेक घरांतून नोकरीचे आणि घरातील काम सहकार्याने होईल. एकमेकांच्या कामात उत्साहाने, हौसेने मदत केली जाईल. एकाच कामाने नवरा किंवा दुसऱ्या एका कामाने बायको जखडली गेली आहे असे दृश्य दिसणार नाही. दोघे एकमेकांना एकमेकांची कामे हलकी करू लागतील.

दुसराही प्रकार आढळेल. प्रत्येक जण आपले काम स्वतंत्रपणे करत राहील. कामे संपूर्णतया भिन्न स्वरुपाची असतील, तेथे हे घडेल. तरी कदाचित् निर्माण झालेला प्रश्न समजून घेऊन तो सोडवण्यास मदत करण्याचीच भावना दोघांमध्ये राहील. काही जण दुसऱ्याच्या कामाची अगोदर कल्पना नसली, तरी ते शिकून घेतील. मग कामासंबंधी विचारविनिमयही होईल. आणि अशा ठिकाणी नोकरीचे जीवन आणि खाजगी जीवन अगदी स्वतंत्र असणे अगदी कठीण आहे. अशक्यही आहे. एकाच्या क्षेत्रातून दुसरा खड्यासारखा दूर फेकला जाण्याचे दिवस आता दुर्मिळ होत जातील, नाहीसे होतील.

आणखी एक प्रकार असा होईल की त्या घरात दोन प्रकारची कामे स्वीकारली जातील; आणि दोन्ही प्रकारची कामे दोघेही करतील. पाळ्या ठरवतील आणि आलटून पालटून हे, ते काम हाती घेत रहातील. त्यामुळे कामात बदल राहील व काम करत रहाणे कंटाळवाणे न होता ते दोघांनाही अधिक आवडत राहील.

अशा घरामधून एका किंवा अनेक कामांमध्ये दोघांचा सहभाग असला की, सहाजिकच एक जण दुसऱ्याकडून काही शिकेल. त्याच्या समस्या सोडवण्यात भाग घेईल, अनेक प्रकारची देवाण घेवाण होत राहील आणि त्यामुळे जिव्हाळा अधिक दृढ होत जाईल. आणि हा जिव्हाळा एक सक्तीचे नाते न ठरता सहज निर्माण होत गेलेला व म्हणूनच अधिक हवासा वाटणारा असाच असेल. सक्तीमुळे पूर्वी सुख मिळतच होते असे नाही. आता हे चित्र पालटून अधिक सुख व समाधान कुटुंबात नांदेल यात शंका नाही.

त्यामुळे प्रेमाची, त्या संबंधीच्या अपेक्षांची व्याख्याही कदाचित् बदलावी लागेल. 'लव्ह प्लस' ह्या कल्पनेचा अंगीकार करावा लागेल.

पहिली लाट—संस्कृतीचा जोर होता तेव्हा आपली जोडीदारीण निवडताना लग्नाळू मुलगा व त्याच्या घरातले इतरही विचार करायचे, मुलगी धडधाकड आहे ना? कामसू आहे ना? मुलांच्या दृष्टीने ती चांगली 'शिक्षिका' असेल ना? सर्व जबाबदाऱ्या ती समर्थपणे पेलू शकेल ना?... शेतकरी तर तिच्या प्रत्यक्ष काबाडकष्टांच्या ताकदीचा अंदाज घ्यायचे. किरकोळ किंवा अशक्त मुलगी पसंतच पडायची नाही.

दुसऱ्या लाटेत भावनिक बाजू बळकट झाली. आपली जोडीदारीण शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या योग्य व मुख्यतः प्रेम भरपूर करणारी अशी हवी, असे पुरुष मानू लागला. प्रेमाला फार मोठे प्राधान्य आले. तिचा सामाजिक दर्जा व इतर बाबी गौण झाल्या.

अनुक्रमणिका

आता नव्या तिसऱ्या लाटेच्या जमान्यात केवळ प्रेम असून भागणार नाही. जोडीदारीण अधिक क्षमतेची हवी असणार आहे. प्रेम व अधिक बरेच काही हवे. घरात आपल्या जोडीदारणीबरोबर कामही करायचे म्हटल्यावर तिच्याजवळ सुजाणपणा असणे, जबाबदारीची जाणीव असणे, ती शिस्तप्रिय असणे या आणि इतरही काम व व्यवसायासंबंधीच्या आवश्यक अशा गुणांची अपेक्षा तिच्याबाबत केली जाणार आहे प्रेम व त्याच्या जोडीला मेंदू–अक्कलहुषारीही असायलाच हवी आहे.

या पुढील कुटुंबाच्या जबाबदाऱ्या कमी होण्याऐवजी त्या अनेक प्रकारे वाढतच जाणार आहेत. अष्टपैलूच नव्हे तर त्याहूनही अधिक पैलू असणारे आता आकर्षण ठरणार आहेत. या दृष्टीने भावी काळातली जोडपी बघण्यासारखी वैशिष्ट्यपूर्ण असणार आहेत.

## कामे करणारी मुले

इलेक्ट्रॉनिक कॉटेजमध्ये मुलेही असणारच. नव्या स्वरूपातल्या या घरातली मुले नवीनच वातावरणात वाढणार आहेत.

पहिल्या शेती संस्कृतीतील मुले आपले आईबाप काम करत असताना प्रत्यक्ष पहात होती आणि नंतर तीही त्याप्रमाणेच कामे करीत होती.

औद्योगिक संस्कृतीत गोष्ट वेगळी होती. आईबाप काय कामे करतात या बाबत या मुलांना काहीही कल्पना नसायची. आईबापांचा प्रत्यक्ष सहवासही फारच थोडा मिळायचा.

आता परिस्थितीत बदल होणार आहे. आई–बापांचा प्रत्यक्ष सहवास नेहमीच घडणार आहे. ती दोघे घरीच काम करत रहाणार असल्यामुळे मुलांना त्यांच्या कामाबद्दल चांगली माहिती असणार आहे. काही विशिष्ट वयानंतर मुलांनीही आपल्या घरातल्या कामाला हातभार लावावा अशी अपेक्षा केली जाणार आहे. पुढेतर मुले सहज करू शकतील अशा कामांचीही खास निर्मिती केली जाईल.

या अगोदरच्या काळात मुलांना, कोवळ्या तरूणांना सक्तीने अगर परिस्थितीजन्य नैष्कर्म्यता, बेकारी स्वीकारावी लागत होती. आणि समाजाची फार मोठी शक्ती वापर न झाल्याने वाया जात होती. आता अशी स्थिती रहाणार नाही. मुले नुसती, बसून रहाणार नाहीत, तीही उद्योगी बनतील. इतके दिवस मुलांनी कामे करू नयेत म्हणून प्रचार होत होता, आता मुलांनी कामे करावीत असे समर्थन आणि प्रचार सुरू होईल. कारण ती आगामी काळाची एक (आर्थिकही) गरज असू शकेल.

## इलेक्ट्रॉनिक कुटुंब विस्तार

पुढे अशी अवस्था असणार आहे, की इलेक्ट्रॉनिक बंगलीत चालणारा व्यवसाय हा एक छोटा उद्योग–सहकारी तत्त्वांना अनुसरून चालणारा आणि आवश्यक त्या कायदेशीर बंधनांना सांभाळून असणारा–असणार आहे. त्यामुळे तो केवळ घरातल्या माणसांपुरताच मर्यादित असणार नाही, रहाणार नाही. घरात काम करणारे सर्व म्हणजे कुटुंब असे म्हणावयाचे झाले, तर कुटुंब विस्तारित असे असेल. नवऱ्याच्या किंवा बायकोच्या फर्ममधील सहकारी, किंवा एखादा ग्राहक, किंवा कामांसंबंधीचा पुरवठा

करणाराही एखादा, शेजाऱ्याचे मूल—शिकाऊ स्वरुपातले कामगार—यांचाही काम करणाऱ्यात कमीअधिक प्रमाणात सहकार असू शकेल.

अशा तऱ्हेने विस्तारित झालेली कुटुंबे कोणाच्या वैयक्तिक जीवनमार्गावर आघात करणारी असणार नाहीत. किंवा त्यांचे स्वरूप दिखाऊही असणार नाही. त्यातील महत्त्वाचा भाग, व हेतु म्हणजे आर्थिक उन्नती असल्यामुळे अशा स्वरूपाची कुटुंबे टिकून रहाण्यात काही अडचण असणार नाही. अशी अनेक विस्तारित कुटुंबे व्यावसायिक उद्दिष्टाने एकमेकांशी संबंध ठेवू लागतील, व त्यांचे एकप्रकारचे जाळे तयार होईल. उद्योग, व्यवसाय, समाजसेवा, आपल्या 'कामा'साठी बाजारपेठ किंवा आपल्या पद्धतीची व्यापार संघटना तयार करून आपले प्रतिनिधित्व करण्याचे काम, इत्यादी कामात हे जाळे या सर्वांच्याच उपयोगाचे ठरेल. आता या एकत्र येण्यातून काही सामाजिक प्रश्न—विवाहबाह्य संबंध इ.—उत्पन्न होतीलही किंवा होणारही नाहीत! व्यवसायांची उन्नती होईल हे नक्की.

अशा तऱ्हेची काही कुटुंबे अमेरिकेत सध्या आहेत. दिवसेदिवस त्यांची संख्या वाढत जाण्याची शक्यता आहे.

कुटुंबाचा हा आणखी एक प्रकार म्हणून त्याचा फक्त निर्देश केला आहे.

स्थित्यंतर होते आहे. या बदलाच्या काळातील परिस्थिती गोंधळाची आहे, अडचणींनी भरलेली आहे. अनेक समस्या अगोदरच आहेत, काही नव्याने निर्माण होत आहेत. बेहि फ्रेडानने लिहिलेल्या 'दि फेमिनिन मिस्टिक' या स्फोटक पुस्तकाने फार मोठी उलथापालथ केली. स्त्रीमुक्तीची चळवळ सुरू झाली. त्यानंतर तेव्हापासून आजतागायत स्त्रियांची भूमिका कोणती, पुरुषांची कोणती या प्रश्नांचा उहापोह सतत चालू आहे.

व्यवसाय, कायदेशीर व आर्थिक हक्क, घरगुती जबाबदाऱ्या, लैंगिक संबंध यांच्या बाबतीत दोन्ही व्यक्तींच्या भूमिकात बदल झालेला आहे. फार पूर्वी पासून हक्क मानण्यात आलेल्या गृहित अपेक्षांना आणि त्या संबंधीच्या अलिखित नियमांना आव्हन दिले जात आहे. स्त्रिया असे म्हणू लागल्या आहेत की स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्याचा त्यांना पूर्ण हक्क आहे. राजकारणी, धर्मकारणी, डॉक्टर्स, खुद्द नवरे देखील त्यांच्या शरीरावर कसलाही हक्क, अधिकार सांगू शकणार नाहीत! लैंगिक क्रियाकडे देखील त्या स्वतःची इच्छा असेल तेव्हाच घेता येण्याजोग्या आनंदाच्या, उपभोगाच्या दृष्टीतून पहातात.

अशा तऱ्हेच्या अनेक गोष्टी आहेत. गेली तीनशे वर्षे अस्तित्वात असलेली न्युक्लिअर कुटुंबरचना मोडून पडत चाललेली आहे. तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीत कुटुंब रचनांचे अनेक प्रकार अस्तित्वात येऊ लागलेले आहेत. कोणाला कोणती रचना हवी, तिचा त्याने, तिने स्वीकार करावा.

सध्या अवस्था अशी आहे, की जुनी रचना पूर्ण मोडली नाही, नवी रचना स्पष्टपणे अस्तित्वात आलेली नाही. स्थित्यंतराच्या या संधिकालात लाखो लोकांना यातना होत आहेत. निवडीला वाव देणारे पुष्कळच प्रकार अस्तित्वात आलेले असल्याने वैतागून त्यातला कोणताच नको या भूमिकेवर येऊन एकटे रहाण्याचे पसंत करणारे बहुसंख्य आहेत.

अनुक्रमणिका

त्यामुळे हे वैविध्य अपायकारक ठरु नये, उपकारच ठरावे, म्हणून आपल्याला एकाच वेळी अनेक पातळ्यांवर बदल करणे आवश्यक आहे. नैतिकतेपासून, कर पद्धतीपासून, नोकरीव्यवस्थेपर्यंत अनेकांगी बदल करावयास हवेत.

लाखो लोकांमध्ये पहिली कुटुंब संस्था मोडत चालल्याबद्दल असलेली अपराधी पणाची भावना अगदी अनावश्यक आहे. माध्यमे, चर्च, कोर्ट, राजकीय प्रणाली अशा अनेक पातळ्यांवरून ही अपराधीपणाची भावना नाहीशी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे जरूर आहे.

केंद्रित कुटुंबाच्या बाहेर रहाण्याचा निर्णय सोपा व्हायला हवा. त्यासाठी सामाजिक नीतिमूल्ये वैविध्याला आणि विघटनाला अनुकूल अशी व्हायला हवीत.

जुन्या लाटेच्या पठडीत व्यक्तीला कायदे, कराराबद्दलचे नियम, सुधारणेच्या योजना, शाळांतील व्यवस्था, घराबाबतचे नियम किंवा स्थापत्यविषयक आकार—रचना याच्याबाबतीत मोठ्या विस्तारित कुटुंबाकडून मिळणारे निवडीचे, आर्थिक किंवा सामाजिक जीवनातले स्वातंत्र्य मिळू शकत नाही. या जुन्या पठडीने काम करीत असलेल्या स्त्रियांच्या गरजांकडे फारसे लक्ष दिले जात नाही; किंवा काही पुरूष घराकडे, मुलांकडे पहातात त्यांच्या किंवा अविवाहितांच्या किंवा विधवांच्या अशा अनेक प्रश्नांकडे, मागण्यांकडे, हक्कांकडे दुर्लक्ष केले.

ज्यांचे अगदी पवित्र गोडवे गायले जातात अशा, घर सभाळण्याचे काम करणाऱ्यास औद्योगिक संस्कृतीने कसलीही प्रतिष्ठा दिली नाही. घर पहाणे हे उत्पादक काम आहे, अत्यंत महत्त्वाचे आहे, ते काम आणि त्यांची संपूर्ण समाजाने मानलेली गरज यांना अर्थकारणाचा एक भाग म्हणून मान्यता मिळायला हवी. घर संभाळण्याचे काम स्त्री करो की पुरूष, त्याच्या वाढत्या प्रतिष्ठेवर शिक्कामोर्तब करण्यासाठी आपल्याला त्यांची वेतन पद्धत तयार करायला हवी. त्याला आर्थिक मूल्य प्राप्त करून दिले जाणे आवश्यक आहे.

होत असलेल्या बदलांमध्ये हाही एक अवश्य व्हावा असा बदल म्हणून त्याला भरपूर महत्त्व देऊन विचार व्हायला हवा.

काही नवी धोरणे आखायला हवीत, काही प्रयोग करायला हवेत, कारण कुटुंबात, समाजात होत असलेला बदल हा अत्यंत महत्त्वपूर्ण असा आहे. सामाजिक निर्मितीचे महत्त्व असणाऱ्या ह्या घटनेचा आपली पिढी स्वीकार करत आहे; नव्या संस्कृतीच्या उभारणीचा तो एक भाग आहे.

अनुक्रमणिका

# पंधरा । संयुक्त पेचप्रसंग

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण औद्योगिक संघटना, म्हणजे मोठी कॉर्पोरेशन. नव्या लाटेबरोबर येत असलेल्या नव्या संस्कृतीने या संघटनेवर परिणाम केलेला आहे. तिच्यात लागलीच घडून येणारा बदल व त्यायोगे तिच्यावर तत्काळ घडणाऱ्या परिणामाचे कारण म्हणजे जागतिक अर्थकारणात निर्माण झालेला पेचप्रसंग. तीनशे वर्षे संपूर्ण जगाची अशी एकात्मिक बाजारपेठ तयार करण्यासाठी दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीने काय केले. युद्ध किंवा मंदी किंवा अशाच काही संकटांनी मधून मधून हे प्रयत्न हाणून पाडले होते, मागे परतवले होते. परंतु तरीही प्रत्येक वेळी जगाचे अर्थकारण सुधारत होते, पूर्वीपेक्षाही मोठे होत होते आणि पूर्वीपेक्षाही अधिक एकात्मिक होत होते.

पण आताचा नवा पेचप्रसंग वेगळाच आहे. यापूर्वी येऊन गेलेल्या संकटाप्रमाणे तो फक्त पैशांचीच निगडित नाही, तर समाजाच्या संपूर्ण ऊर्जा आधाराशी निगडित आहे. या नव्या पेचप्रसंगाने चलन फुगवटा निर्माण केलेला आहे; आणि त्याच वेळी बेकारीही फार मोठ्या प्रमाणात निर्माण केली आहे. दोन्ही गोष्टी मागेपुढे न घडता एकाच वेळी घडलेल्या आहेत. या संकटाचा थेट संबंध मूलभूत सजीव—परिसर संबंधाशी आहे, संपूर्णतया नवीन असणाऱ्या तंत्रज्ञानाशी आहे, उत्पादन क्षेत्रातील दळणवळणाच्या नव्याच थरावस्था, आगमनाशी आहे. संपूर्ण औद्योगिक संस्कृतीत निर्माण झालेला हा पेचप्रसंग आहे.

आर्थिक क्षेत्रातील ह्या उलथापालथीमुळे कॉर्पोरेशनच्या अस्तित्वाला धोका उत्पन्न झालेला आहे. त्यात काम करणाऱ्या व्यवस्थापकांना अगदीच वेगळ्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. दुसऱ्या युद्धाच्या अखेरीपासून इ. स. १९७० पर्यंतचा काळ विकासाचा होता. डॉलर हा राजा होता. चलने पुष्कळ काळ स्थिर होती. भरभराट चढ्या क्रमाने चालूच होती. अर्थतज्ञ स्वतःच्या आर्थिक गाड्यावरच्या अधिकारांबाबत आणि भाकित करण्याच्या ताकदीबाबत इतके विश्वास बाळगून होते की त्या गाड्याच्या 'फाइन ट्यूनिंग' बद्दल ते जाता जाता बोलून जायचे.

परंतु आता परिस्थिती बदललेली आहे. आर्थिक कारणमीमांसा मोडून पडलेल्या आहेत. वाढत्या प्रमाणातल्या अनिश्चिततेला कॉर्पोरेशनमधील धोरण आखणाऱ्यांना, निर्णय घेणाऱ्यांना सतत तोंड द्यावे लागत आहे.

व्याजांचे दर खालीवर होत आहेत. चलने गिरक्या घेत आहेत. डॉलर आणि येन जणू काबुली नृत्य करीत आहेत. युरोपियन आपले नवे चलन पुढे आणत आहेत. अरब डॉलर्सच्या राशी मिळवत आहेत. सोन्याच्या किंमती पूर्वीचे उच्चांक मोडत आहेत.

हे घडत असतांनाच तंत्रज्ञान व दळणवळण, शक्य व आवश्यक असणारी काही तात्कालिक उत्पादने तयार करून जगाचा बाजार पुनः उभा करत आहेत. उपग्रह व कॉम्प्युटर यांच्या आगमनापूर्वी अशक्य असणारी गोष्ट घडते आहे. जागतिक इलेक्ट्रॉनिक बँकांचे जाळे हाँगकाँग, मनिला किंवा सिंगापूर यांचा, बहामा, केमन बेटे व न्यूयार्कशी संबंध सतत जोडून देत आहेत.

मोठ्या विस्तारात पसरून असणारे हे जाळे कोणत्याही एका सरकारच्या अधिकाराखाली न येणाऱ्या नव्याच प्रकारच्या पैशाची निर्मिती करत आहे. या चलनाला 'स्टेटलेस करन्सी' म्हणतात.

अनुक्रमणिका

‘स्टेटलेस करन्सी’चा हा पसारा फुग्याप्रमाणे गरगरीत होत वाढतो आहे. कोणाच्या डोक्यावर आपटून तो कधी फुटेल अशी दहशत निर्माण करतो आहे. या चलनात युरो डॉलर्सचा समावेश आहे. या चलनाचा अर्थ असा की, अमेरिकेच्या बाहेर अस्तित्वात आलेले हे डॉलर्स होत. युरोडॉलर्समुळे चलन फुगवट्यात मोठी भर पडलेली आहे. इ. स. १९७५ च्या सुमाराला १८० बिलियन डॉलर्स अस्तित्वात असण्याचा अंदाज व्यक्त केला गेला होता. तर इ. स. १९७८ च्या सुमारास हाच अंदाज ४०० बिलियनपर्यंत पोचला होता. युरोडॉलर्स, युरोमार्क्स, युरोफ्रँक्स, युरोमिल्डर्स, युरो येन असे अमाप पीक निर्माण झाले.

औद्योगिक संस्कृतीतील आर्थिक प्रणाली, राष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय चलने, राष्ट्रीय सरकारे यांच्यावर आधारलेली होती. राष्ट्रीय पायावरची ही उभारणी स्थित्यंतर कालातील इलेक्ट्रॉनिक ‘युरोबबल’ वर ताबा ठेवायला असमर्थ आहे. त्यामुळेच पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. दि वर्ल्ड बँक इंटरनॅशनल मॉनेटरी फंड आणि जी. ए. टी. टी. यांच्यावर आधार होत आहेत. युरोपिअन आता संपूर्णतया नवी रचना करण्याच्या प्रयत्नात आहेत. अविकसित किवा अल्पविकसित देश एका बाजूला आणि अरब व त्यांचे पेट्रो डॉलर्स दुसऱ्या बाजूला, उद्याच्या आर्थिक प्रणालीवर पगडा बसविण्यासाठी धडपडत आहेत. गोंगाट करत आहेत. IMF ला प्रतिरूप असेल अशी संख्या उभारण्याच्या गोष्टी करत आहेत. डॉलर पदच्युत झालेला आहे. आणि या गोष्टीचे हादरे व कंप जागतिक अर्थव्यवस्थेला जाणवत आहेत.

या सर्वांबरोबर ऊर्जा व नैसर्गिक संपत्ती यांची चणचण भासू लागलेली आहे. ग्राहकांच्या, कामगारांच्या आणि व्यवस्थापकाच्या दृष्टीकोणात झपाट्याने बदल होऊ लागलेले आहेत. व्यापारात असमतोल निर्माण झालेला आहे. आणि सर्वात महत्त्वाची झालेली गोष्ट म्हणजे, औद्योगिक नसलेल्या देशांचा वाढता प्रतिकार.

अशा या गोंधळाच्या परिस्थितीत कॉर्पोरेशन्स काम करण्याचा प्रयत्न करत आहेत. संघटित शक्तीचा त्याग करण्याचा विचार व्यवस्थापक करणे शक्य नाही, ते फायद्यासाठी, उत्पादनासाठी आणि वैयक्तिक उन्नतीसाठी प्रयत्न करीत रहाणारच परंतु परिस्थिती फारच अनिश्चित आहे. राजकीय दबाव वाढत आहेत, आणि आपले अतिशय बुद्धिमान व्यवस्थापक आपल्याच सघटनांच्या ध्येयांबाबत, रचनेबाबत, जबाबदारीबाबत प्रश्न विचारत आहेत. दुसऱ्या लाटेच्या काळातील पक्की चौकट निखळून पडत चाललेली आहे. अशा वेळी ते आपले अस्तित्व सिद्ध करण्याच्या, आपलीच ओळख पटविण्याच्या अपूर्व पेचात सापडलेले आहेत.

## गतिमान अर्थकारण

ज्या गतीने घटना घडत आहेत त्याने तर हा पेचप्रसंग अधिकच तीव्र होत चाललेला आहे, अपरिचित अशा एकूण परिस्थितीमुळे आधीच केविलवाण्या झालेल्या कार्यकारी प्रशासकांना बदलावी ही गती अधिकाधिक वेगाने, अधिकाधिक निर्णय घेण्याला भाग पाडत आहे.

आणि या परिस्थितीत मोठ्या कॉर्पोरेशन्सना, इच्छा असो वा नसो, वेगवेगळ्या चलनांचे देवघेव व्यवहार केवळ वार्षिकच नव्हे, ९० दिवसांच्या किंवा ७ दिवसांच्या नव्हे तर अक्षरशः एका रात्रीच्या किंवा मिनिटा मिनिटाच्या तत्त्वावर करावे लागत आहेत.

अनुक्रमणिका

बाजार व्यवस्थेत, स्थापत्य विभागात, उत्पादनात, संशोधनात, व्यापारात प्रशिक्षणात काम करण्याला, संघटनेच्या सर्वच भागात कामाला, निर्णय घेण्याला वेग आलेला आहे. कॉर्पोरेशनच्या अंगोपांगातील अशा या सर्वक्षेत्रीय गतीचे, वेगाचे परिणाम अनेकविध आहेत. त्यातील काही : वरचेवर खरेदी विक्री करत रहाणे, कामगार शिक्षणासाठी लागणारा अधिक वेळ, करारात अधिक वेळा बदल करवून घेणे, वरचेवर दर निश्चित करत रहाणे, मोठ्या प्रमाणात उलाढाल करत रहाणे, माहितीवर अधिक अवलंबून रहाणे... आणि असेच आणखी किती तरी. चलन फुगवटा भरीला आहेच... या सर्वांमुळे दबाव सतत वाढत आहेत. त्यामुळे अनेक व्यावसायिक, बँकर्स, कॉर्पोरेट, प्रशासक यांना पुष्कळ वेळा आपण काय करतो आहोत आणि का करतो आहोत हे कळत नाही. दुसऱ्या लाटेतील सुनिश्चिततेत वाढलेल्या त्यांना वेगाने येत असलेल्या बदलाच्या लाटेखाली आपल्याला माहित असलेले जग मोडून पडत चाललेले पहावे लागत आहे.

## विस्कळित समाज

औद्योगिकीकरणाच्या कल्पनेतील आणि त्यानंतर अस्तित्वात आलेली जी विशिष्ट समाजरचना होती, ती आता एकात्मीय समुदायासारखी, ठरीव छापाची अशी राहिलेली नसून, एकूण समाजरचनाच वेगळा, विकेंद्रित, सुट्या सुट्या घटकांच्या अस्तित्वाने बनलेला आकार घेऊ लागलेली असल्यामुळे परिस्थितीचे चित्र वेगळेच दिसू लागले आहे. जे आखाडे, जे ठोकताळे बांधून दुसऱ्या लाटेच्या उत्पादनाची आखणी व व्यवस्था करण्यात येत होती, ती व तिच्यानिमित्त अंगीकारण्यात येणाऱ्या एकसामयिकता केंद्रिकरण, मोठ्या प्रमाणात व मोठ्या आकारातील उत्पादन अशी वैशिष्ट्ये आता नव्या झपाट्याने बदलत जाणाऱ्या जीवनाच्या संदर्भात उपयोगी पडू शकणार नाहीत.

नवी तिसरी लाट अघात करीत असताना जुन्या गृहीतकांना आव्हान मिळते आहे. समाजच सुटा होतो आहे, त्यामुळे एका ठिकाणी धोरणाने चालणारा प्रमुख बाजार ही विकेंद्रित होऊन छोट्या छोट्या बाजारपेठा निर्माण होऊ लागल्या. उत्पादित वस्तूंच्या आकारात, प्रकारात, नमुन्यात रंगात मोठ्या प्रमाणात, पर्याय निर्माण होत आहेत. ग्राहक निष्ठताही येते आहे. आणि या प्रकारच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी बाजारालाही विविध आकार, प्रकार व विविध स्थळे यांचा अंगीकार करावा लागतो आहे.

कॉर्पोरेशन तर्फे ग्राहकावर छाप पाडण्यासाठी प्रयत्न होत आहेत. नाना प्रकारच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. नाना प्रकारच्या वस्तूंची निर्मिती होते आहे, खोट्या गरजा निर्माण करून दाखवल्या जात आहेत. या प्रकारच्या आरोपामध्ये तथ्य आहे. या पेक्षाही काही तरी गहन असे तत्त्व कार्य करत आहे. कारण वस्तु आणि सेवा यातील वैविध्यामध्ये तिसऱ्या लाटेच्या समाजात निर्माण झालेल्या गरजा, मूल्ये, जीवनमार्ग यांच्यांतल्या वैविध्याचेच प्रतिबिंब पडलले असते.

या वैविध्यालाही दुसऱ्या लाटेच्या समर्थकांचा विरोध आहे. समाजातील ज्या गटाच्या लोकांनी दुसऱ्या लाटेच्या युगात मनापासून समाजाच्या एकात्मतेसाठी किंवा एक जीव होण्यासाठी झगडा दिला ते सुटून बाजूला होण्यास आपला वेगळेपणा बाजूला काढण्यास नकार देतात. ते आपल्या खास वैशिष्ट्यांवर भर देतात.

अनुक्रमणिका

सध्या समाजात जे वैचित्र्य येऊ लागले आहे. त्याला कामकाजातील वैचित्र्य ही जबाबदार आहे. हे वैचित्र्य मोठ्या प्रमाणात निर्माण होण्याचे कारण हे, की विविध प्रकारचे नवनविन व्यवसाय फार मोठ्या संख्येने निर्माण होऊ लागले आहेत. जास्ती करून पांढरपेशा, मेंदूच्या गरजेच्या व्यवसायात ही वाढ झालेली आहे. आपल्याकडे येणाऱ्या लोकांच्या व्यवसायाची नोंद करत असताना एका मानसशास्त्रज्ञाला व्यवसायांच्या यादीत अल्पावधीतच ६८ नव्या व्यवसायांची भर पडलेली आढळून आली! या वैविध्याचेच प्रतिबिंब समाजाच्या वाढत्या विकेंद्रीततेत आढळून येते.

जगातल्या बहुतेक सर्व देशातील अल्पसंख्यांकाचे असंख्य गट आपल्या हक्कांची जाणीव करून देत आपल्या व्यवसाय व मिळकती यांच्या बाबतच्या इथके दिवस अमान्य केलेल्या अधिकारांची मागणी करत आहेत. ज्या मागास जमाती जगभर पीछेहाटीतच इतका काळ राहील्या होत्या, त्यांनी आता सर्व क्षेत्रात आपल्याला स्थान मिळावे म्हणून जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. आपले गमावलेले हक्क, त्याचप्रमाणे जमिनीही त्यांना परत पाहिजेत. अर्थकारणात व राजकारणात त्यांना स्थैर्य हवे आहे त्यानिमित्त संघर्ष होतात आणि त्या त्या गटांचा सुटेपणा अधिक उठून दिसतो. समाज विस्कळीत झालेला दिसतो. समाजाला एकसंघ करणाऱ्या शक्ती एकाएकी मागे पडल्या आहेत. राष्ट्रीयता ही नव्या उच्च तंत्रज्ञानाच्या संदर्भात प्रादेशिकता ठरते. एकीकरणाच्या रसायनाची जागा नव्या मानवतेने घेतली आहे. माध्यमे संयुक्त, एकत्रित अशी संस्कृती तयार करण्याऐवजी संस्कृतीत सुटेपणा आणत आहेत. या सर्व घटना उर्जा प्रकारातील आगामी वैविध्याला समांतर अशाच आहेत. ठोकळे बाज उत्पादनाला ओलांडून पुढे मार्गक्रमण होत आहे.

एकमेकांशी संबंधीत असलेले हे सर्व बदल एक नविनच चौकट निर्माण करत आहेत. या चौकटीच्या आतच समाजाच्या उत्पादक संघटना, मग त्यांना तुम्ही कॉर्पोरेशन म्हणा, की समाजवादी साहस योजना म्हणा, काम करत रहातील. जे कार्यकारी अधिकारी पूर्वीच्याच समाजाच्या संदर्भात विचार करत रहातात त्यांना हे नवे जग ओळखू न आल्याने धक्काच बसतो आणि ते गोंधळून जातात.

## नवी व्याख्या

कॉर्पोरेशनच्या संदर्भातील पेचप्रसंग, या अस्थिर पार्श्वभूमीवर, एका नव्याच चळवळीमुळे अधिकच तीव्र होतो आहे. ही चळवळ केवळ काही साध्या धोरणात्मक फेरफारांचीच मागणी करत नाही, तर तीच्या मूलभूत हेतूचीच नव्याने व्याख्या करून मागत आहे.

इतिहासात या पूर्वीही कॉर्पोरेशन्स वर अतिशय जहाल हल्ले होऊन गेलेले आहेत. आजचा हा तक्रारीचा गोंगाट व गजहब अतिशय वेगळा आहे. तो नव्या तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या उभरत्या मुल्यातून आणि गृहीतकांतून निर्माण झालेला आहे; मरू घातलेल्या औद्योगिक इतिहासातून नाही.

संपूर्ण औद्योगिक युगात कॉर्पोरेशन्सकडे आर्थिक यंत्रणा म्हणूनच पहाण्यात येत होते. आणि त्यांच्यावर झालेले हल्लेही आर्थिक प्रश्नांचाच वेध घेणारे होते. कामगारांना कमी वेतन देणे, ग्राहकांना अधिक खर्चात पाडणे, किंमत निश्चित करण्याचे दंडक तयार करणे, दिखाऊ (व कमकुवत) माल तयार करणे या व अशाच हजारो इतर आर्थिक उल्लंघनाना धरून हे हल्ले होते. हे हल्ले कितीही तीव्र असोत, या

अनुक्रमणिका

बहुतेक टीकाकारांनी कॉर्पोरेशनचा तत्त्वतः स्वीकार केलेला होता. मूलतः आर्थिक संस्था म्हणून त्यांनी तिला मान्यता दिली होती.

आजच्या टिकाकारांची सुरूवातच एकदम वेगळ्या भूमिकेतून होते. कृत्रिम रीतीने अर्थकारणाची राजकीय, नैतिक आणि इतर अंगाशी केलेली फाटाफूट त्यांना, मुळीच मान्य नाही. ते कॉर्पोरेशनला केवळ आर्थिक कार्यवाही बाबतच नव्हे, तर तिच्यातून उद्‌भवणारे प्रदूषण, किंवा कार्यप्रणालीतील ताण अशा दुष्परिणामा' बाबतही जबाबदार धरतात. ॲस्बेस्टॉसचा विषप्रयोग, गरीब जनतेचा, गिनीपिग प्रमाणे औषधांच्या प्रयोगासाठी केला जाणारा वापर, औद्योगिक नसलेल्या देशांची प्रगती रोखून धरणे. वंशवाद, लिंगवाद, गुप्तता, फसवणूक अशा गोष्टींना कॉर्पोरेशनलाच जबाबदार धरले जात आहे. अतिशय गलिच्छ कारकीर्द असणाऱ्यांना, किंवा राजकीय पक्षांना चिलीच्या दहशतवादी सेनानींपासून ते दक्षिण आफ्रिकेतील वंशवाद्यांपासून ते इटलीतील कम्युनिस्ट पार्टीपर्यंत सर्वांना—आधार, पाठिंबा दिल्याबद्दल त्यांची जाहीर मानखंडना केली जात आहे.

असे हे आरोप खरे, की खोटे हा इथे प्रश्न नाही— बहुतेक वेळा ते खरेच असतात. महत्त्वाचा प्रश्न असा आहे, की कॉर्पोरेशन बाबत त्यांच्या स्वतःच्या काय कल्पना आहेत? तिसऱ्या लाटेने आपल्याबरोबर एका नव्याच संघटनेसाठी, संस्थेची उभारणी व्हावी या साठी वाढती मागणी आणलेली आहे. केवळ फायदा करून देणे, किंवा वस्तूंची निर्मिती करणे ह्यांच्यापुरतेच मर्यादित असे तिचे कार्य आता असू शकत नाही, तर अतिशय गूंतागुंतीचे, जीवनाशी निगडित असलेले विविध प्रश्न सोडवण्याचा तिचा सहभाग असावा, अशी अपेक्षा आहे.

आता ही संस्था केवळ अर्थशास्त्रीय उलाढाली करणारी अशी असूच शकणार नाही, तर ती बहुउद्देशीय असेल. तशी ती होत जाणार आहे. होत चाललीही आहे.

## पंचकोनी दबाव

कॉर्पोरेशनच्या नव्या व्याख्येचा प्रश्न तसा सहजी उद्‌भवलेला नाही. उत्पादना संबंधीचे पाच क्रांतिकारक बदल हे काम घडवून आणत आहेत. भौतिक परिस्थितीतील बदल, सामाजिक शक्तींच्या क्रमातील बदल, माहीती क्षेत्राच्या भूमिकेचा बदल सरकारी यंत्रणेतील बदल आणि नीतिमत्तेतील बदल हे पाच बदल कॉर्पोरेशनवर परिणाम करत असून एक नविनच बहुमुखी, बहुउद्देशीय स्वरूप तिला देत आहेत.

एक फारच मोठा दबाव सजीव सृष्टीद्वारे कार्य करत आहे. इ. स. १९५५ च्या सुमाराला, दुसऱ्या लाटेची भरती उच्चकोटीला पोचलेली असताना जगातील लोकसंख्या २·७५ बिलियन इतकी होती. आता ती जवळ जवळ दुप्पट इतकी झालेली आहे. जगात इतक्या प्रचंड वेगाने लोकसंख्या वाढत असताना आपल्या मागण्या इतक्या विक्राळ प्रकाराने वाढत आहेत, की त्या कोणत्याही शक्तिला पुऱ्या करणे शक्य होणार नाही. शिवाय प्रदूषण, ओसाडीकरण, सागरी विषारांची शक्यता हवामानात होणारे सूक्ष्म फेरफार असे अत्यंत धोकादायक बदल आपल्याला संकटात लोटू पहात आहेत, आपण तिकडे द्यावे तितके लक्ष देत नाही, या सगळ्यांचा परिणाम हा, की गरजे इतके उत्पादन करण्याची क्षमता आपल्यात असणार नाही.

अनुक्रमणिका

कॉर्पोरेशन आर्थिक उत्पादनाच्या संयोजनाचे काम करीत असल्यामुळे परिणामांच्या निर्मितीचे क्षेत्र त्याच्याकडेच जाते. आपल्याला जर टिकून रहायचे असेल आणि आर्थिक उन्नती हवी असेल, तर उद्याच्या व्यवस्थापकांकडे कॉर्पोरेशनच्या नकारात्मक परिणामांचे लाभाच्या परिणामांत रुपांतर करण्याची जबाबदारी येते. त्यांनी ही जबाबदारी स्वतःहून घेतली नाही, तर ती त्यांच्यावर लादली जाईल इतकी ती निकडीची गोष्ट आहे.

दुसरा दबाव सामाजिक क्षेत्राकडून येतो आहे. सामाजिक परिस्थितीने एक वेगळीच पातळी गाठलेली आहे. पूर्वीप्रमाणे ती अव्यवस्थित राहिलेली नाही. सुव्यवस्थित, सुरचित अशी ही परिस्थिती कॉर्पोरेशनला अपरिचित आहे.

आज अमेरिकेत १,३७०,००० कंपन्या, जवळ जवळ ९०,००० शाळा व विद्यापीठे, ३३०,००० चर्चेस आणि १३,००० राष्ट्रीय संस्थाच्या लाखो शाखा यांच्याशी संबंध ठेवून काम करतात. आणि या सर्वांच्या संबंधात १४४,००० इतक्या कायदे विषयक फर्म्स मध्यस्ती करतात!

अशा या गर्दीच्या धुमाळीत संघटनेच्या प्रत्येक पावलाचा एकाकी किंवा असहाय्य व्यक्तीवरच नव्हे, तर काही संघटित गटांवरही दूरगामी परिणाम होत असतो. प्रत्येक निर्णयाची कसून टीका टिपण्णी होत असते.

बेकारी, जातीय फाटाफूट, सक्तीची गतिमानता, या आणि अशा तत्काळ लक्षात येणाऱ्या इतरही स्वरूपात कॉर्पोरेशनने 'सामाजिक प्रदुषण' निर्माण केलेले असते. त्यामुळे दबाव आणखीनच वाढतो. कॉर्पोरेशनवरील सामाजिक, आर्थिक आणि उत्पादन विषयक जबाबदाऱ्या अधिक वाढतात.

तिसरा दबाव बदललेल्या माध्यम क्षेत्राकडून येतो. तिसऱ्या लाटेतील उत्पादन पद्धतीमुळे कॉर्पोरेशनची, कच्चामाल म्हणून पाहिल्या जाणाऱ्या माहिती बद्दलची भूक फार मोठ्या प्रमाणात तीव्र होते. फर्म प्रचंड प्रमाणात माहिती गोळा करते त्याच्यावर प्रक्रिया करते. आणि अतिशय गुंतागुंतीच्या मार्गांनी इतरामध्ये तिचा प्रसार करते.

माहितीला नव्याने मिळालेले हे महत्व संघटित, संकलीत माहितीवरच्या अधिकारासंबंधी संघर्ष निर्माण करते. अधिक माहिती लोकांपुढे उघड व्हावी, तिची जाहीर मोजदाद व्हावी अशा प्रकारचा 'सत्यान्वेशी' दबाव निर्माण होतो. नव्या युगात 'माहितीचे आघात' ही परिस्थितीजन्य आणि सामाजिक आघात यांच्या इतकीच गंभीर गोष्ट बनते. कॉर्पोरेशनवर आर्थिक उत्पादकतेबरोबरच माहिती उत्पादकतेची जबाबदारी येऊन पडते.

चवथा दबाव राजकारण व सत्ता क्षेत्राकडून निर्माण होतो. समाजात निर्माण सझालेल्या वैविध्याचे प्रतिबिंब राजकीय व सरकारी क्षेत्रात बदलांमध्ये आढळून येते.

प्रत्येक कंपनी दिवसे–दिवस स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व क्वचित आंतरराष्ट्रीयही राजकारणाच्या जाळ्यात अडकलेली आहे. तसेच कॉर्पोरेशनचा प्रत्येक निर्णय अप्रत्यक्षरित्या राजकीय परिणाम घडवून आणतो आणि त्यासाठी त्यालाच जबाबदार धरले जाते.

अनुक्रमणिका

दुसरी लाट—संस्कृती लुप्त होत असताना तिची मूल्यांकन पद्धती हादरत आहे. आणि पाचव्या दबावाचा उद्‌भव होतो आहे. त्याचा कॉर्पोरेशनसह सर्व संस्थांवर परिणाम होतो आहे. नैतिक दबावामुळे हा परिणाम तीव्रतर होतो आहे. जी वर्तणूक सर्व सामान्य व सहज समजली जात होती, तिलाच लाच खाऊ पणा, अनैतिकता आणि अफवाबाजी असे ओळखले जाऊन बाधा निर्माण झालेली आहे! जपानमध्ये लॉकहीड लाचेच्या प्रकरणाने सरकार उलथले. गल्फ ऑइल्सच्या अध्यक्षाला अशाच कारणाने राजीनामा द्यावा लागला... सर्वत्र असे प्रकार चालू झाले आहेत. सामाजिक मूल्यांकन पद्धतीवर ह्या नव्या पवित्र्याचा प्रत्यक्ष परिणाम झालेला आहे.

अशी सर्वच परिस्थिती बदलल्यामुळे कॉर्पोरेशनचा केवळ आर्थिक वाढीची एकेरी बदलून बहुविध भूमिका पार पाडण्यासाठी तिला सज्ज व्हावे लागत आहे. त्यासाठी केवळ सार्वजनिक संबंधांच्या अंगांनीच नव्हे, तर स्वतः ची ओळख नव्याने करून घेण्याच्या व स्वतः च्या हेतूंची जाण येण्याच्या दृष्टीने कॉर्पोरेशनला सिद्ध व्हावे लागत आहे.

अर्थात् भूमिका एकेरीच रहावी, का अनेकविध असावी यासाठी प्रत्येक कॉर्पोरेशनमधील घटकांमध्ये संघर्ष उठत रहाणे अपेक्षितच आहे.

## बहुउद्देशीय कॉर्पोरेशन

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीत वाढलेल्या आपल्याला संस्थांबद्दल या तऱ्हेने विचार करणे अवघड जाणार आहे. एखाद्या हॉस्पिटलचा आरोग्य विषयक कार्य करण्याबरोबरच आर्थिक कार्य करणारी संस्था म्हणून विचार करणे किंवा एखादी शाळा शिक्षणाबरोबर राजकीय उपद्‌व्याप करते आहे अशी कल्पना करणे जसे अवघड जाईल तसेच कॉर्पोरेशनचाही आर्थिकेतर उद्योग देखील करणारी संस्था म्हणून विचार तसा अवघडच वाटतो.

फोर्ड किंवा त्यांच्यासारखे दुसऱ्या लाटेने समर्थक या नव्या स्वरुपाच्या बाबत चाचपडती व काहीशी विरोधीत भूमिका घेत आहेत. तरी देखील प्रत्यक्षात अनेक कंपन्या आपले शब्द आणि आपली धोरणे बदलत आहेत.

खऱ्या बदलाची दृश्य जागा भाषणे किंवा जनसंपर्क विषयक वक्तृत्व घेत असतात. परंतु नमुन्यादाखलच्या रूपावलीतील बदल किंवा नव कल्पनाविष्करण ज्यांच्या बाबतीत होत आहे, ती प्रत्यक्षात येत असलेली ध्येये, रचना, जबाबदाऱ्या असे दाखवत आहेत, की हे बदल वरचेवर नाहीत; तर तिसऱ्या लाटेने आणलेल्या दबावामुळे ते कॉर्पोरेशनमध्ये प्रत्यक्षातच उतरत आहेत. ह्या बदलांच्या खुणा अनेक आहेत.

कन्ट्रोल डाट कॉर्पोरेशनचा निर्देशक व एक कोठा अमेरिकन कॉम्प्युटर उत्पादक, आपल्या विलीनीकरणाचा विचार करताना केवळ आर्थिक बाबींचाच किंवा भांडवलांचाच विचार करत नाही, तर विलीनीकरणाचे सामाजिक परिणाम काय होतील. नोकरांवर काय परिणाम होतील आणि जिथे त्यांचे काम चालते, त्या भागातील लोकांवर काय परिणाम होतील इतका सर्व विचार करतात. इतर कंपन्या उपनगरांकडे धाव घेत असताना कन्ट्रोलडाटाने मुद्दामच आपली नवी कार्यस्थळे व यंत्रसंच वॉशिंग्टनच्या

सेट पॉल व मिन्नी पोलीस यांच्या अंतर्गत भागात उभारली. त्यामुळे नागरी भागातील केंद्राचे पुनरुज्जीवन होईल असे त्यांना वाटते. ह्या कॉर्पोरेशनने आपले कार्य दर्जा सुधारणे, समता, आणि लोकांच्या जीवनातील कार्यशक्ती वाढविणे हे असल्याचे मानले आहे.

अमेरिकेत स्त्रियांची आणि गौरेतरांची उन्नती हा राष्ट्रीय धोरणाचा भाग (जो फार पूर्वी व्हायला हवा होता.) झालेला आहे. पिल्सबरी येथील एक प्रमुख अन्नोत्पादक गटांनी पुढील वर्षाची केवळ विक्रिची योजना आखून समाधान मानले नाही तर स्त्रिया व अल्पसंख्यांकांना नोकरीसाठी आणणे, त्यांना प्रशिक्षण देणे, आणि त्यांना पदोन्नती देणे या गोष्टींचाही योजनेत समावेश करणे आवश्यक मानले आहे.

काही कंपन्यांनी नव्या जबाबदाऱ्याच्या प्रत्यक्ष व्याख्या करण्यासाठी कमिट्या नेमल्या आहेत.

कॉर्पोरेशनचा केवळ सामाजिक प्रतिसाद असून भागत नाही. यात शुद्ध सामाजिक कळवळा आहेच. स्वतः च्या हिताचाही भाग आहे. तरी देखील यातील एकूण बदलते आकलन लक्षात येण्याजोगे आहे. काही अंशी होत असलेल्या विरोधामुळे, काही कायदेशीर कारवायांमुळे सरकारी कार्यवाहीच्या भीतीमुळे त्याचप्रमाणे बोलून दाखवलेल्या हेतूमुळे व्यवस्थापकही आता उत्पादनाच्या नव्या स्थितीचा व अटींचा स्वीकार करू लागले आहेत. आणि कॉर्पोरेशनही बहुउद्देशिय असणार ही कल्पना मानू लागलेले आहेत.

अनेक उद्दिष्ट्ये

या प्रकारच्या बहुउद्देशीय कॉर्पोरेशनला पूर्वीपेक्षा अधिक हुषार व्यवस्थापकांची गरज असणार आहे. कॉर्पोरेशनपुढे असणाऱ्या अनेक उद्दीष्टांचे स्वरूप स्पष्ट करणारा, त्यांना जोखणारा, त्यांचे एकमेकांशी संबंध ठेवू शकणारा, एकाहून अधिक उद्दीष्टे साधू शकणारा; धोरणे आखू शकणारा, ती शोधून योजू शकणारा व्यवस्थापक ही कॉर्पोरेशन्सची गरज असणार आहे.

केवळ उद्दीष्ट्येच विविध असून भागणार नाही, तर कार्यवाही नव्या परिमाणात असणेही आवश्यक आहे. तिसऱ्या लाटेच्या कॉर्पोरेशनने मूलभूत धोरणे अनेक मानायला हवी आहेत. आर्थिक, सामाजिक, परिस्थिती विषयक, माहिती विषयक, राजकीय, मानवीय अशी अनेक धोरणे—तीही त्यांचा एकमेकांशी संबंध लक्षात मानणे आवश्यक आहे.

या नवीन वैविध्याच्या आणि गुंतागुंती आव्हानाला अनेक व्यवस्थापक घाबरलेले आहेत. जी बौद्धिक साधने त्यांना व्यवस्थापनासाठी हवी असतात, ती त्यांच्याजवळ नसतात. ज्या क्षेत्रात कधी ताळमेळाचा व हिशोबाचा संबंध आला नव्हता त्या बाबतीत ताळमेळ जोखून त्याची शब्दात मांडणी करणेही आवश्यक आहे. ह्या क्षेत्रातल्या हिशोबाची भाषा ही अजून तयार झालेली नाही; हिशोब, ताळमेळ ही गोष्टच सध्या क्रांतीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. आणि आर्थिक क्षेत्राच्या मर्यादा ओलांडण्याच्या मार्गावर आहे.

जगभर ह्या दिशेने प्रगती चालूही झालेली आहे. हॉलंडमधील ग्रॅज्यूएट स्कूल ऑफ मॅनेजमेंट, डेल्फ्ट चे डीन कॉर्नेलियस ब्रेबूर्ड यांनी कॉर्पोरेशनच्या व्यवहाराच्या बहुमितीय कसोट्यांचा एक संच तयार केलेला आहे. वेगवेगळ्या ३२ कसोट्यांची यादी त्यांनी तयार केलेली आहे. आणि त्यांच्यावरूनच एखाद्या संघटनेची कार्यक्षमता आजमावण्यात यावी अशी त्यांची इच्छा व अपेक्षा आहे, संघटनेचे ग्राहकांशी,

अनुक्रमणिका

भागधारकांशी, युनिअन्सशी असलेल्या संबंधापासून निरनिराळ्या सजीव व परिसर यांच्या संबंधीच्या विषयांशी निगडित असलेल्या संस्थांशी असलेल्या संबंधापर्यंत अनेक विषयांशी निगडित अशा या कसोट्या आहेत. पण या ३२ कसोट्याही 'केवळ काही'च ठराव्यात इतक्या विविध स्थिर मूल्यांविशी उद्याची कॉर्पोरेशन अस्तित्वात येते आहे.

एकूणच परिस्थिती इतक्या वेगाने बदलते आहे, की दुसऱ्या लाटेतील कॉर्पोरेशन लुप्त होत चालली आहे. आता जे घडत आहे, त्याचा अर्थ असा, की उत्पादनाचा आणि आतापर्यंत त्याचे सर्वांगीण व्यवस्थापन करण्याची जिच्यावर जबाबदारी होती तिचाही अर्थ संपूर्णः तया पुनः कल्पनाविष्करीत केला जात आहे. परिणामतः नव्या धर्तीची कॉर्पोरेशन अस्तित्वात येऊ लागलेली आहेत. ही नवी संस्था आर्थिक आणि आर्थिकेतर उद्दीष्टांचा संयोग करेल. तिच्यापाशी अनेकविध मूलभूत धोरणे असतील.

कॉर्पोरेशन मधील हा बदल मोठ्या प्रमाणात घडणाऱ्या संपूर्ण सामाजिक क्षेत्रात घडत असलेल्या बदलाचा एक भाग आहे. तांत्रिक क्षेत्रात, माहिती क्षेत्रात होत असलेल्या बदलांशी हाही बदल समांतर असाच घडत आहे. हे सर्व बदल मिळून ऐतिहासिक स्वरूपाचा फार मोठा बदल घडून येतो आहे.

आपण केवळ या प्रचंड मांडणीतच बदल घडवून आणत नाही आहो, तर आतापर्यंत सामान्य लोक ज्या तऱ्हेचे दैनदिन जीवन जगत होते, त्या तऱ्हांमध्येच, जीवन क्रमामध्येच बदल घडवून आणू पहात आहोत. कारण जेव्हा संस्कृतीची उभारणीच बदलली जाते, तेव्हा त्याच वेळी आपण आपल्या जीवनाबाबतच्या सर्व नीती नियमात, संहितातही बदल घडवून आणत असतो!

अनुक्रमणिका

# सोळा । नवे नियम; नवी संहिता

लाखो मध्यमवर्गीय घरांतून एका विधीवत् प्रसंगाचा नाट्यमय अविष्कार वरचेवर घडत असतो. घरातील नुकतीच पदवी प्राप्त केलेला मुलगा (किंवा मुलगी) जेवायला उशिरा येऊन गुरगुरत रहातो. 'पाहिजेत' च्या जाहिराती पुढ्यात आदळून म्हणतो की, "नऊ ते पाचची नोकरी म्हणजे एक अपमानकारक ढोंग आहे. ज्याला किंचित का होईना आत्मसन्मानाची जाण असेल, तो मानव ९ ते ५ च्या चाकोरीला कधीही शरण जाणार नाही."

या नंतर—माता पिता या प्रसंगात भाग घेतात. पिता स्वतः ९ ते ५ च्या चक्रातून दमून भागून आलेला असतो. माताही आपली कर्तव्ये पार पाडून थकून आलेली असते. याच प्रकारच्या गुरगुराटांची, वैतागाची ही कितवी तरी पुनरावृत्ती असते, आजवर मातापित्यांनी अनेक चांगले वाईट प्रसंग अनुभवलेले असतात. ते आपल्या अपत्याला सुस्थिर अशा कॉर्पोरेट संस्थेतील नोकरी स्वीकारण्यासाठी चुचकारतात, समजावत राहतात... तरी तरुण फुत्कारत रहातात. म्हणतात, "छोट्या कंपन्या अधिक चांगल्या, परंतू कोणत्याही कंपनीत काम नाकरणे हे सर्वात चांगले. कशासाठी आम्ही एवढे उच्च शिक्षण घेतले? सारे फुकट... फुकट आहे!"

माता पित्यांच्या सूचनांचा, एका मागून एकाचा निकाल लावला जातो. त्यांचा वैताग वाढतोच. आणि ते कळवळून म्हणतात, "खऱ्या जगाला सामोरे तरी कधी जाणार?"

जगाच्या अनेक भागात, अनेक देशात हा प्रकार चालू आहे. आपल्या केवळ स्वप्नाळू तरुणांची आणि आणि वास्तववादी प्रौढांची उत्तम खडाजंगीच दिसते आहे असे नसून त्यातून एक जी जाणीव मिळते आहे ती ही की जे काही पूर्वी वास्तवात होते, ते आता असणार नाही. कारण जसजशी तिसरी लाट वेगाने पुढे पुढे सरकते आहे, तसतशी सामाजिक जिवनातील व वर्तणुकीची संहिता, तिच्यातील मूलभूत नियमांसह, झपाट्याने बदलत आहे.

आपण हे पाहिलेच आहे, की दुसऱ्या लाटेने आपल्या बरोबर अनेक नियमांनी युक्त अशी संहिता आणली. आणि तिचे अतिशय काटेकोरपणाने पालन होईल याची दक्षता घेतली.

आता नव्या नियमांची प्रतिसंहिता तयार होते आहे. नव्या जीवनासाठी तयार होत असलेले नवे नियम विकेंद्रित अर्थकारण, विकेंद्रित माध्यमे. नवनविन प्रकारची कुटुंबे, नव्या रचनेतील कॉर्पोरेशन्स अशा अनेक नव्या, बदलाच्या गोष्टींवर आधारलेले आहेत. तरूण आणि वृद्ध यांच्यातले झगडे आपल्याला निरर्थक भासत असतील. सर्व क्षेत्रात दोन पिढ्यांतून संघर्ष चालू आहे. परंतु बदल अगदीच सर्वांगांनी व खोलवरचा असाच घडत आहे. वक्तशीरपणा, एकसामायिकता, प्रमाणीकरण, केंद्रीकरण आणि प्रत्येक गोष्टीत आणली जाणारी व्यावसायिकता अशा औद्योगिक संस्कृतीतल्या मूलभूत श्रद्धा स्थानांवरच नवीन संस्कृतीकडून आघात होत आहेत. अधिक मोठे ते अधिक चांगले हे मानणे योग्य होईल का? अशी विचार चालना प्रत्येक गोष्टीतच निर्माण झालेली आहे. ही नवी संहिता चुन्याला कसा विरोध करते आहे, हे समजण्यासाठी गोंधळाच्या वाटणाऱ्या निरनिराळ्या झगड्यांनी जो पिंगा आपल्या भोवती घातला आहे तो समजावयास हवा आहे. या झगड्यांनी आपली शक्ती कमी केली आहे, आपल्या व्यक्तीगत सत्तेला, प्रतिष्ठेला आणि मिळकतीला धोका निर्माण केलेला आहे.

अनुक्रमणिका

"नऊ ते पाच" चा शेवट

वैतागलेल्या जुन्या पिढीला हे कळत नाही, की नवी पिढी वेळेच्या बाबतीत इतकी उदासीन आणि बेफिकीर का आहे? तास, मिनिटे, सेकंद यांच्या तालावर जे झोपले, उठले, जेवले, कामावर गेले; सारे आयुष्य ज्यांनी या प्रकारे व्यतीथ केले त्यांना हे सर्व अगदी असह्य होते आहे... पण हळूहळू त्यांनाही आता समजून आले असेल, की हा काळाचा महिमा आहे!

तिसरी लाट जोर धरू लागली, आणि अतिशय निष्ठूर काटेकोरपणात बांधला गेलेला काळ हळूहळू ढिला पडू लागला. काळाचेही विघटन होऊ लागले त्याचे स्वरूप असे की, काळाकडे लवचिकपणा सोपवण्यात आला!

इ. स. १९७० च्या सुमारास औद्योगिक क्षेत्रात नव्यानेच अस्तित्व दाखवू लागलेला, परंतु अतिशय वेगाने लोकप्रिय झालेला एक नवा विशेष 'शोध' म्हणजे 'फ्लेक्स टाइम'.

यांत्रिक प्रकारच्या एकसामयिकतेच्या आपल्या आयुष्याला बांधून ठेवत, आयुष्यालाही यांत्रिक बनवणाऱ्या, जीवनातील या यंत्रनिर्मित गतीलाच तिसऱ्या लाटेने आव्हान दिलेले आहे. त्यातूनच 'फ्लेक्स टाइम' ची निर्मिती झाली. या योजनाप्रकारामध्ये कामगाराला काही ठराविक मर्यादा सांभाळून आपल्या स्वतःच्या कामाच्या तासांची निवड करता येते. कचेरिच्या किंवा कारखान्याच्या दाराशी प्रत्येकाने एकाचवेळी किंवा अगोदर ठरवून घेतलेल्या वेळी येण्याऐवजी या नव्या कालतत्वावर चालणारी कंपनी ठराविक महत्वपूर्ण तासांची विशिष्ट प्रकारे योजना करून त्यांमध्ये प्रत्येकाने हजर असलेच पाहिजे असे जाहीर करते, व त्या व्यतिरिक्तचे तास लवचिक मानते. या लवचिक तासांची निवड प्रत्येक कामगार आपल्या सोयीनुसार करतो! या पद्धतीमुळे कामगाराला पुष्कळच स्वातंत्र्य अनुभवायला मिळते.

अशा तऱ्हेने काळाचेही एक प्रकारचे विघटन झालेले आहे... या प्रकाराची सुरुवात इ. स. १९६५ साली क्रिस्टेल केमरर या जर्मन अर्थतज्ञ स्त्रीने मांडलेल्या एका विचारातून सुरू झालेल्या चळवळीतून झाली. तिने ह्या मार्गाने माता असलेल्या अनेक स्त्रियांना व्यवसायात प्रवेश मिळेल आणि संधी मिळेल अशी शक्यता सूचित केली होती. इ. स. १९६७ मध्ये नासरश्मिट–ब्योल्काड–ब्लोम 'डॉइच बोईंग' या कंपनीने प्रयोगाखातर आपल्या दोन हजार कामगारांना लवचिक काळाच्या तत्त्वाचा वापर करू दिला. तो अतिशय यशस्वी झाला, तेव्हा तिने दोन वर्षातच आपल्या सर्व म्हणजे १२००० कामगारांना या तत्वाच्या अधारे काम करावयास दिले.

इ. स. १९७७ पर्यंत पश्चिम जर्मनीची एक चतुर्थांश कामगार शक्ती एकूण ५,०००,००० कामगार या ना त्या प्रकारातील 'फ्लेक्स टाईम' पद्धतीत काम करू लागली. ह्या पद्धतीचा वापर २२,००० कंपन्या करू लागल्या. ब्रिटन, फ्रान्स, फिनलंड, डेन्मार्क, स्वीडन आणि इटली या देशातील या कंपन्यातील ४,०००,००० कामगार या प्रकारच्या काल पद्धतीत काम करू लागले.

इ. स. १९७७ च्या सुमारास अमेरिकेतील १३ टक्के कंपन्या या कालपद्धतीचा वापर करत होत्या. लवकरच, काही वर्षात हा आकडा १७ टक्के व यातील कामगार अंदाजे ८,०००,००० हून अधिक, या पद्धतीने काम करून काही स्वातंत्र्य व थोडी सुखावह अशी ढिलाई अनुभवतील.

अनुक्रमणिका

दुसऱ्या लाटेच्या समर्थकांनी या सर्व प्रकाराला तीव्र विरोध केला आहे. परंतु त्यांचा विरोध न जुमानता नवी पद्धती लोकप्रिय होत आहे. बहुसंख्य कामगार आता आपल्या कुटुंबाला अधिक वेळ देऊ शकतात. या गोष्टीचे आणि स्वास्थ्याचे समाधान त्यांच्या कृतीतून जाणवते. कारण आता त्यांची उत्पादकता व कार्यशक्ती वाढलेली आहे. त्यांची अनुपस्थिती कमी होऊन उपस्थिती वाढते आहे. इतर अनेक फायदेही आहेतच. एवढ्या मोठ्या प्रमाणातील एकूण प्रगतीत थोडी पीछेहाट आढळणारच. दोन टक्के कपन्यांनी हा प्रयोग करून पाहिला आणि पुनः आपल्या जुन्या रुक्ष पठडीत प्रवेश केला. परंतु अशा गोष्टी प्रमाणाने अपवादच दाखवितात.

## निद्रारहित गॉर्गन

'फ्लेक्स टाइम' ही काळासंबंधी होत असलेल्या बदलांपैकी केवळ एक बाब तिसऱ्या लाटेसरशी आणखीही बदल झालेले आहेत. आपल्याला आढळून येईल की रात्री काम करण्याकडे कल फार मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. ॲक्रॉन किंवा बाल्टिमोर अशा परंपरागत उत्पादक केंद्राची ही गोष्ट नाही. या अशा ठिकाणांमध्ये कितीतरी कामगार रात्रपाळीत काम करीत असतातच. परंतु कॉम्प्युटरवर आधारलेल्या प्रगत उद्योगात वेगाने प्रसार पावत असलेल्या सेवांच्या बाबतीतली ही गोष्ट आहे.

एक फ्रेंच वर्तमानपत्र ले मोन्दे म्हणते की 'आधुनिक शहर म्हणजे एक गॉर्गन आहे. (गॉर्गन ही ग्रीक पुराणातही एक राक्षसी आहे. हिच्या डोक्यावर केसांऐवजी सर्प होते. ही ज्या वस्तूकडे पाही तिची शिळा होऊन पडे अशी कल्पना रुढ होती.) ही कधीच झोपी जात नाही... दिवसे दिवस अधिकाधिक प्रमाणात लोक पठडी मोडून, रात्री जागून काम करत आहेत.' तंत्राधिष्ठित देशांमध्ये रात्री काम करणाऱ्या कामगाराची टक्केवारी १५ वरून २५ वर गेली आहे.

या पेक्षाही जास्त नाट्यमय प्रसार झाला आहे, तो अर्धवेळ काम करणाच्या पद्धतीचा. फार मोठ्या प्रमाणात लोकांनी या पद्धतीचा अंगीकार केलेला आहे. डेट्राइट भागातील उदाहरण पहा :— एकूण कामगार शक्तीपैकी ६५ टक्के अर्धवेळ कामात मग्न असते.

ही पद्धत इतकी लोकप्रिय झालेली आहे, की जॉर्जटाऊन विद्यापीठाच्या संशोधकांनी असा निष्कर्ष काढला आहे, की आगामी काळात जवळजवळ सर्व नोकऱ्या अर्धवेळ तत्त्वावर आधारलेल्या असतील.

अर्धवेळ कामाच्या पद्धतीच्या आगमनाचे जास्ती करून स्त्रियांकडून स्वागत करण्यात आले. त्याच प्रमाणे वयस्कर, जवळ जवळ निवृत्त झालेले लोक, त्याचप्रमाणे कितीतरी तरूणही दिल्या जाणाऱ्या कामाच्या वेळेच्या मोबदल्यात कमी पगारावर काम करायला तयार आहेत. कारण हे काम करून उरलेला वेळ त्यांना स्वतःचे छंद, क्रीडा किंवा धार्मिक कलात्मक किंवा राजकीय कारणांसाठी आपल्या आवडीनुसार खर्च करता येतो.

फ्लेक्स टाईम, अर्धवेळ व रात्रीचे काम या सर्वांच्या स्वागताचा अर्थ असा, की लोक ९ ते ५ च्या पद्धती बाहेरचे काम करू लागले आहेत. आणि संपूर्ण समाजात आता चोवीस तास काही ना काही काम केले जाणार आहे!

अनुक्रमणिका

नव्या व्यापार व ग्राहक पद्धतीही आता निर्माण होऊ लागल्या आहेत. उदा. संपूर्ण रात्रभर चालू असणाऱ्या सुपर मार्केट्स्ची वाढ बेसुमार चालू आहे. समजा पहाटे चार वाजता कोणी खरेदी करायला जात असले तर इथून पुढच्या काळात ही चकित होण्याची किंवा चेष्टा करण्याची बाब राहणार नसून नेहमीचीच गोष्ट होऊन रहाणार आहे! व्यापार नियोजन आता म्हणू लागले आहेत. की पूर्वीच्या मानाने लोक हल्ली मोठ्या प्रमाणात जागू लागले आहेत. त्यामुळे रात्री दुकाने, बाजार, उघडे ठेवणे फायद्याचे ठरते. अनेक अडचणीमुळे अनेकांना ठराविक वेळेतल्या दिवसाच्या दुकानात जाणे जमत नाही. त्यांची सर्वांची या द्वारे मोठीच सोय झाली आहे...

एके काळी घरातील सर्वांची जेवणे एकाच वेळी होत असत. आता सर्वांची जेवणे एकाच वेळी होऊच शकत नाहीत. जुनी दिवसाकाठी तीन जेवणे ही पद्धत आत मोडून पडलेली आहे. चोवीस तास जलद अन्न पुरवणारी दुकाने सुरू असतात, अब्जावधी लोकांची भूक ती उत्तम प्रकारे भागवू शकतात. टेलिव्हिजन कंपन्याही चोवीस तास अनेक प्रकारच्या लोकांसाठी अनेक प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात गुंतलेल्या असतात.

वेळेबद्दलच्या सर्व रुढ कल्पनांना सुरूंग लागलेला आहे.

या गोष्टींचे काही काही विचित्र परिणामही आढळून येत आहेत. या पद्धतीमुळे एखाद्या व्यक्तीचा एकाकीपणा वाढू शकतो. समाजातच काय, घरात देखील एकाने दुसऱ्याला प्रत्यक्ष भेटणे ही गोष्ट दुरापास्तच होईल. कोण, केव्हा, कोणाला कसा भेटणार? कारण ज्याला भेटायचे तो केव्हा, कुठे भेटेल आणि केव्हा मोकळा असेल हे कोण सांगू शकणार? कॉम्प्युटरवरच हे काम सोपवले जाणार असले तर नवल वाटण्याचे कारण नाही.

एखाद्या भागात दुसऱ्या लाटेची व्यवस्थाच चालू आहे हे ठराविक वेळा ठरविक दिशेने रस्त्यावरून भरून चाललेल्या गर्दीवरून समजू शकते. तर तिसऱ्या लाटेखालील भागातील वाहतूक सर्व काळी सर्व दिशांनी एकाच घनतेने चालू रहाते.

अधिक लवचिक व व्यक्तिगत कार्यकाल पद्धती ऊर्जेवर अचानक वाढणारा ताण आणि प्रदूषण पुष्कळ प्रमाणात कमी करते हा या बाबतीतला मोठाच फायदा म्हणायला हवा.

तिसऱ्या लाटेच्या लयीमध्ये घडणारे हे फेरफार मानस शास्त्रीय, आर्थिक, तांत्रिक क्षेत्रातील शक्तिद्वारा घडतात. एका पातळीवर ते लोकसंख्येच्या बदलत्या स्वरूपातूनही घडत असतात. आजचे लोक आपल्या मातापित्यांपेक्षा अधिक शिकलेले असतात. समृद्ध असतात. त्यांच्या समोर अनेकविध पर्यायी जीवनमार्ग असतात, त्यामुळे ते ठोकळेबाजपणाचा धिक्कार करतात व त्या पासून दूरच रहातात. कामांच्या संदर्भात वापरण्याच्या वस्तूंच्या संदर्भात आवडी, जीवनपद्धती, इत्यादींबाबत त्यांच्यात इतके वैविध्य असते, की त्यांचा समाजाने लादलेल्या चाकोरी येण्याबाबत विरोधच असतो.

कॉम्प्युटर्सनी स्थल, काल, गती, परिणाम या सर्व बाबतीत अतिशय क्रांती केलेली आहे. कॉम्प्युटर्सद्वारा विचार विनिमय करणाऱ्या परिसंवादांचेही आयोजन करता येणे शक्य झाले आहे. एका गटाची मते, त्याच्याद्वारे दुसऱ्या गटापर्यंत पोचवली जातात. अनेक देशातील सुमारे ६६० शास्त्रज्ञ,

संयोजक, शिक्षण तज्ञ, यंत्रयुगावर भिस्त ठेवून रुढीतून फुटून निघू पहाणारे असे लोक 'इलेक्ट्रॉनिक इन्फर्मेशन एक्स्चेंज सिस्टीम द्वारा, ऊर्जा, अर्थकारण विकेंद्रीकरण, उपग्रह अशा विषयावरील आपल्या विचारांची देवाण घेवाण करत असतात. त्यांच्या घरात बसवलेली टेलिप्रिंटर्स व्हिडिओ स्क्रीन अशी उपकरणे त्यांना उपयोगी पडतात. तत्काळ उत्तर हवे की वेळाने मिळाले तरी चालेल याबाबत हवा तो पर्याय त्यांना निवडता येतो. एखादा माणूस एखादे वेळी वाटले तर पहाटे तीन वाजताही एखाद्या लाईनवर काम करू शकतो. एका लाईनवर एकाच वेळी अनेक जण येऊ शकतात. एकमेकांशी विचारांचे दळणवळण करू शकतात.

कॉम्प्युटर आपल्याला नवीन शब्दसंपत्ती बहाल करतात! ऐहिक घटना स्वच्छ स्वरूपात पुढे मांडतात, त्यांना त्यांची खुण चिठ्ठी लावतात, त्यांचे नवे कल्पना विष्करणही करतात. कॉम्प्युटरच्या कामाला वेग कल्पनातीत असा आहे. कॉम्प्युटरने चालवलेले मायक्रोप्रिंटर्स एका मिनिटात १०,००० ते २०,००० ओळी 'तयार करून' सादर करतात! म्हणजे कोणाही व्यक्तीला त्या वाचण्यासाठी जेवढा वेळ लागेल, त्याच्या दोनशे पट वेगाने हे घडते. गंमत म्हणजे कॉम्प्युटरच्या कामातला हा सर्वात मदगती भाग होय! कॉम्प्युटर शास्त्रज्ञ सेकंदाच्या हजाराव्या भागाच्या विचारापासून महापद्मव्या भागाच्या विचाराच्या मोजणीच्या जवळ येऊन पोचले देखील आहेत!

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या काळात यंत्राची प्रकृती आणि यांत्रिकी एककालिकता माणसाला यांत्रिक कुवतीशी बांधून ठेवत होती; आणि ही शृंखला संपूर्ण समाज जीवनाला एकाच चौकटीत कोंडून ठेवत होती. आता ही यांत्रिक एककालिकता अधिक सूक्ष्म झाली आणि त्याचा परिणाम म्हणून माणूस अधिकच बांधून रहाण्याऐवजी उलट दिवसेदिवस मुक्त होत गेला. आणि या बदलाचेच माणसाच्या वैयक्तिक विश्वास 'वक्तशीर पणा' चा अर्थ बदलून गेला. व्यक्तिगत स्वरुपात आविष्कृत होत राहिला. 'वेळेवर' या शब्दाला अगदी निरुद्देशता प्राप्त झाली. संपूर्ण संस्कृतीचा काळा बाबतचा संबंध बदलून गेला. जुन्या एककालिकतेने जीवनातल्या अनपेक्षिततेला आणि अचानकपणाला पुसून टाकले होते. जीवनातील आनंद लुप्त करून टाकला होता... आताच्या तरुण पिढीला ९ ते ५ चे स्वामित्व स्वीकारावयाचे नाही. त्यांना आपण काळाच्या बाबत बेफिकीरीने का वागतो हे समजणार नाही. परंतु काळाने स्वतःलाच या 'प्रत्यक्ष सत्यजगात' स्वतःलाच बदलले आहे. त्या बरोबरच आपण आपल्यावर प्रभुत्व गाजवणाऱ्या मूलभूत नियमात बदल घडवून आणलेल्या आहे.

प्रमाणीकरणाच्या पलिकडे

तिसऱ्या लाटेने प्रमाणीकरणावरही हल्ले चढवले. किंमती, वजने, अंतरे, आकार, वेळ, चलने अशा जीवनाच्या विविध अंगांनी प्रमाणीकरण दुसऱ्या लाटेखालील समाजावर पसरून राहिले होते. दुसऱ्या लाटेखालील उद्योग अगदी एक सारख्या वस्तूंची निर्मिती करण्याची पराकाष्ठा करू लागले.

आज ही गोष्ट फक्त दुसऱ्या लाटेच्या समर्थकांकडूनच घडते. परंतु आजचे व्यावसायिक प्रमाणीकरणाच्या उलटा पवित्र घेत आहेत. हे आपण पाहिले आहे, की ग्राहकनिष्ठ उत्पादन कमी खर्चात होते आहे. खर्च कमी होण्यास आधुनिक तंत्र सहाय्यभूत होते. उत्पादन खर्चही कमी आणि ग्राहकही आपली व्यक्तिशः आवड निवड पुरी करू शकतात असा दुहेरी फायदा होतो आहे.

अनुक्रमणिका

नोकऱ्याकडेही नजर टाकली तरीही असाच प्रकार आढळेल. अगदी एकसारखे काम करत रहणारे कामगार आता कमी संख्येने आढळतात. खुद्द कामगार देखील एकमेकांपासून वेगळे असेच झालेले आता आढळतील. कारण ते स्वतः ग्राहकही असतात. बाजारात आपल्याला सर्व वैविध्याचे प्रतिबिंब आढळून येते.

ग्राहक जेव्हा आपली आवड निवड वापरतात, तेव्हा विशिष्ट माल मिळणे किंवा मानसिक समाधान मिळणे ह्या भागाबरोबरच वस्तूंकडून अपेक्षित असे बाह्य स्वरूप व त्यांचा अपेक्षित उपयोग पूर्ण समाधानकारक असा मिळतो.

प्रमाणीकरणापलीकडील उत्पादन स्वतःप्रमाणे प्रमाणीकरणापलीकडील वापरही अस्तित्वात आणते. ग्राहकनिष्ठ उत्पादनाचे मूल्यीकरण देखील ग्राहकनिष्ठ स्वरूपाचे असते. अनेक गठ्ठ्यांमधून कोणता गठ्ठा ग्राहकाने निवडला त्यानुसार किंमतीचा आकार केला जातो. वाहन किंवा हि—फी सेट जरी घ्यायचा म्हटला तर त्याच्यात कोणते घटक एकत्र आणले गेले आहेत या गोष्टीवर त्याची किंमत ठरते. विमाने समुद्रकाठच्या तेल विहीरी, जहाजे, कॉम्प्युटर्स आणि इतर उच्च तंत्राधिष्ठित वस्तू उत्पादने प्रत्येक नगानिशी वेगळे स्वरूप वा किंमत धारण करतात.

राजकारणात देखील आत ठोकताळेबाजी किंवा साचेबंदपणा यांचा पाड लागत नाही. अनेक देशात एकमताचा अभाव दृष्टीस पडतो. गटबाजीचा सुकाळ झालेला असून प्रत्येक गट आपल्या स्वतःच्या तत्कालीन उद्दिष्टाच्या साध्यासाठी झगडत असतो.

मते, पसंती, आवड निवड याबाबत प्रचंड प्रमाणात वैविध्य निर्माण झालेले आहे. कोलोनमध्ये ज्यांचे कौतुक होईल, त्याचा स्वीकार म्युनिकमध्ये होईलच असे नाही. आणि स्टुटगार्टमध्ये ज्याला यश प्राप्त झाले आहे, तो हॅम्बुर्गच्या लोकांवर प्रभाव पाडेलच असे नाही. विभागशः आवडी, वहित प्रभावी होत असल्याने एखाद्या देशाची म्हणून जी संस्कृती असते, तिचा अर्थ दिवसेदिवस फिका होत चालला आहे.

आपल्याला प्रमाणीकरणातील अशा मानसाचा व प्रमाणीकरणातील जनतेचा उदय होत असलेला दिसून येतो. यातून काही सामाजिक, मानसिक, तात्त्विक प्रश्न निर्माण होत असून त्यांची काही प्रमाणात जाणीवही होऊ लागली आहे.

तिसऱ्या लाटेच्या मुसंडीचा रोख वाढत्या वैविध्याकडे आहे.; प्रमाणीकरणाच्या बरोबर उलट्या बाजूला, केवळ उत्पादनातच नव्हे तर जीवनाच्या अनेक अंगात वैविध्य वैचित्र्य यांवर भर दिला जात आहे प्रमाणीकरण बाजूला सारले जात असून वैविध्य पुढे येत आहे.

## केंद्रीकरणाला विरोध

तिसऱ्या लाटेने उचललेले आणखी एक महत्वपूर्ण पाऊल म्हणजे केंद्रीकरण विरोध. दुसऱ्या लाटेतील प्रमाणीकरणवाद्यांनी हॅमिल्टन, लेनिन; रूझ्वेल्ट अशा केंद्रीकरणवाद्यांच्या हातात हात घालून औद्योगिकतेची उभारणी केली.

अनुक्रमणिका

आता केंद्रीकरणाला सर्वार्थाने प्रचंड विरोध होतो आहे. नवे राजकीय पक्ष, नवीन व्यवस्थापकीय तंत्रे, नवीन तत्त्वज्ञाने वर येत असून केंद्रीकरणाच्या वृत्तीला विरोध करत आहेत.

राजकीय, स्थापत्यविषयक, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रांमध्ये विकेंद्रीकरण मोठ्या प्रमाणात चालू आहे. एकूणच धारणा अशी झाली आहे, की शेकडो, कदाचित हजारो देखील असतील, कंपन्या सतत पुनर्व्यवस्थापन, पुनर्रचना करत आहेत. हळूहळू केंद्रीभूत अधिसत्ता, दैनंदिन कारभाराच्या बाबतीतही, कमी करत आणत आहेत.

दुसऱ्या लाटेच्या संस्थेत, एका वरिष्ठ माणसाच्या हाताखाली अनेक सहाय्यक काम करीत. ह्या पद्धतीनुसार सर्व सत्ता एके ठिकाणीच एकवटत होती. आता अंतिमतः विचार केलाच. तर एक वरिष्ठ असेल, तेथे तो केवळ व्यावहारिक कारणासाठीच असेल. काम केले जाण्यासाठी, आणि प्रशासनाच्या हेतुने असेल. एरवी, सत्ता पुष्कळ प्रमाणात विकेंद्रित झालेली असते. प्रत्येक नोकर आपल्या खात्याशी निगडित असतो. तो आपल्या वरिष्ठाकडे आपले काम सादर करतो. एखादी विशिष्ट योजना कार्यान्वित होत असताना उत्पादन, संशोधन, विक्री, स्थापत्य, भांडवल व इतर विभागातून ज्या त्या विभागाचा कार्यकारी गट काम करत असतो. ह्या गटातील सर्व सदस्य योजनेच्या नेत्याला कार्य निवेदन करतात. त्याचप्रमाणे त्यांच्या नेहमीच्या वरिष्ठालाही निवेदने करतात. या पद्धतीमुळे कामगार आपल्याकडे असलेल्या विविध कामांकडे नीट लक्ष देऊ शकतो. कामाच्या बाबतीतल्या माहितीच्या ओघाला गती देऊ शकतो. आणि केवळ आपल्या एका खात्याच्या अरुंद फटीतून समस्यांकडे पहाण्याचे टाळू शकतो. त्यामुळे संस्थेला वेगळ्या, चटक न बदलणाऱ्या परिस्थितीनुसार आपले धोरण आखता येते सत्ता एके ठिकाणी केंद्रित होण्याचे टळते. हा या योजनाक्रमाचा मोठाच गुण आहे... मॅट्रिक्स हे, प्रो. डेव्हिस यांच्या मते केवळ व्यवस्थापकीय तंत्र नसून व्यावसायिक संरचनेचा नवा आविष्कार आहे.

एक फार महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण संपूर्ण अर्थकारणाचे मूलभूत विकेंद्रीकरण करत आहोत. मूठभर परंपरागत 'मनी मार्केट' च्या प्रचंड राक्षसापुढे अमेरिकेत नव्यानेच निर्माण होत राहिलेल्या छोट्या छोट्या प्रादेशिक बँकांच्या ताकदीकडे पाहिल्यावर या म्हणण्यातील सत्यता पटेल. सर्वत्र आपल्याला असे आढळून येईल, की राष्ट्रीय अर्थकारणे वेगाने मोडून पडत असून प्रादेशिक व विभागीय अशा भागांतून ती उभी होत आहेत. उपराष्ट्रीय स्वरुपाची ही अर्थकारणे आहेत. परंतु राष्ट्रीय प्रमाणात त्यांचाही विकास झालेला आहे.

नवीन पद्धतीच्या अर्थकारणात विकेंद्रित आर्थिक व्यवस्थापनच काम करू शकणार आहे.

सर्व थरातील हे विकेंद्रीकरणवादी एक अगदीच नवा समाज उभा करत असताना जुन्या कालच्या नियमांना नष्ट करून टाकत आहे.

## मोठ्यांच्या आतले छोटे सुंदर आहे.

तिसऱ्या लाटेच्या अनेक अभिनव कल्पनांपैकी एक म्हणजे केवळ मोठ्या आकारातच सौंदर्य नाही; केवळ छोट्या, अगदी छोट्या आकारातही सौन्दर्य असेलच असे नाही. तर छोट्या मोठ्याच्या योग्य प्रमाणात, डोके चालवून केलेल्या गुंतागुंतीत सौंदर्य आहे.

अनुक्रमणिका

आपल्या कार्यसंचाच्या आकारात कपात करण्याचे धोरण अनेक संस्थांनी अंगिकारलेले आहे. नवीन तंत्रज्ञान आणि कार्यस्थलातील बदल यांच्यामुळे ज्या अनेक गोष्टी शक्य झाल्या आहेत, त्यातील ही एक गोष्ट आहे. दुसऱ्या लाटेतल्याप्रमाणे एकाच छपराखाली हजारोजण काम करत आहेत हे दृश्य आढळणे आता कठीणच आहे.

ऑस्ट्रेलियातील एका वाहननिर्मिती कारखान्याच्या व्यवस्थापकाने मला सांगितले, “मी आता यानंतर कधीच एका छपराखाली सात हजार कामगार काम करत असलेल्या कारखान्याइतक्या मोठ्या कारखान्याची उभारणी करणार नाही. मी असे पाहीन की फार तर तीनशे किंवा चारशे, फार तर, कामगार काम करू शकतील **एवढ्या आवाक्याचे छोटे** छोटे यंत्रसंच उभारीन. नव्या तंत्रज्ञानामुळे हे शक्य होईल.” असे छोटे छोटे, विभागीय संच उभे करून त्यांचे एकमेकांशी संबंध जोडणे ही गोष्ट अधिक सोयीची आणि व्यवहार्य ठरत आहे. सर्व प्रकारच्या कारखानदारांच्या भावना अशाच बनत चाललेल्या आहेत.

आपण आता दोन्ही प्रकारच्या उद्योगातील चांगल्या व फायदेशीर तत्त्वांचे एकीकरण करून नव्या प्रकारच्या संस्था उभारण्याचे प्रयोग करू लागलो आहोत. छोटे छोटे संच एकमेकांशी जोडले जाऊन एक मोठी यंत्रणा उभी करीत असल्याचे दृश्य आता अधिक प्रमाणात दिसू लागले आहे.

थोडक्यात, दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीने शिरोधार्य मानलेले अनेक नियम रद्द ठरवले जात असून, त्यांच्या जागी नव्या नियमांची योजना केली जाऊन नवीच संहिता तयार केली जात आहे.

काही तरी क्रांतिकारक घडत आहे. ते सुरळीतपणे घडावे यासाठी आपल्याला असे व्यवस्थापन हवे आहे, की त्याची उभारणी इजिप्तमधील पिरॅमिडसारखी सहजपणे तोल सांभाळणारी व डौलदार असेल. संमिश्र आणि गुंतागुंतीचे असे त्याचे घटक थोड्याच व्यवस्थापकीय दोऱ्यांनी एकत्र सावरून धरलेले असतील.

पालकांचे आपल्या मुलांशी झगडे होत आहेत यात विशेष काही नाही, हे आपण पाहिलेले आहे. कारण पालकांच्या औद्योगिक संस्कृतीतील ठाम श्रद्धांना धक्के बसत आहेत. आणि मुलांची गोष्ट अशी, की जुन्या नियमांतील वाढत्या विसंगतीची त्यांना जाणीव आहे. आणि त्यांना नव्या नियमांचीही जाण नाही असे नाही. ते सर्व आणि आपण मरू घातलेल्या दुसऱ्या लाटेच्या क्रमात आणि येऊ लागलेल्या, उद्याच्या तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या मध्ये सापडलो आहोत!

अनुक्रमणिका

# सतरा । स्वयंसिद्धता

पुष्कळवेळा मोठ्या प्रमाणात होणाऱ्या ऐतिहासिक बदलांच्या प्रतिमा दैनंदिन जीवनातल्या व्यवहारात झालेल्या सूक्ष्म बदलात उमटलेल्या आढळून येतात. फारसे कोणी महत्त्व न दिलेला असाच एक बदल या शतकातील सातव्या दशकाच्या प्रारंभीच्या काळात घडला. फ्रान्स, इंग्लंड, हॉलंड आणि इतर युरोपीय देशात एका नवीन उत्पादनाने औषधांच्या दुकानात पदार्पण केले. ही वस्तू म्हणजे 'तुम्ही स्वतःच करा' या तत्त्वावर आधारलेले एक उपकरण होते; त्याचा वापर करुन स्त्रिया गरोदरपणाची चाचणी स्वतः करून घेऊ शकतात. त्यासाठी डॉक्टरकडे किंवा प्रयोगशाळेत जाण्याची गरज उरलेली नाही. ही वस्तू पुनः अमेरिकेत जाऊन पोचली. हीच वस्तू नव्हे, तर अनेक गोष्टी अशा निर्माण झाल्या, की त्यांच्या वापराने व सहकार्याने पुष्कळ प्राथमिक उपचार व्यक्ती स्वतः वर व कुटुंबियांवरही गरज पडेल तेव्हा करू लागल्या.... सामान्य लोकही स्टेस्थॉस्कोपचा वापर करणे जाणू लागले आहेत, आणि या प्रकारात पुढचे पाऊल म्हणजे स्वतःवर अगदी साध्या स्वरूपातल्या शस्त्रक्रियाही करू लागले आहेत!

बालरोगाबाबतच्या प्राथमिक काळजीपासून अनेक गोष्टी शिकवणारी ज्ञानसत्रे शाळांमधून चालविली जाऊ लागली आहेत. अमेरिकेत १३०० विक्री केंद्रे, विमानतळ. डिपार्टमेंटल स्टोअर्स इत्यादी ठिकाणी बसविण्यात आलेल्या, नाणे टाकल्यावर वापरात येणाऱ्या यंत्रांचा वापर करून लोक आपले ब्लडप्रेशर पाहू शकत आहेत......

इ. स. १९७२ च्या सुमाराला काही वैद्यकीय उपकरणे वैद्यक व्यवसाय नसलेल्यांनाही विकली जाऊ लागली. आता घरोघर वाढत्या प्रमाणात अशी उपकरणे आणण्यात येऊ लागली आहेत. स्वतः च्या आरोग्याची जबाबदारी घेण्याच्या दृष्टीने ही उपकरणे मोठा हातभार लावू लागली आहेत. लोक आता डॉक्टरकडे किंवा हॉस्पिटलकडे कमी जाऊ लागली आहेत.

वरवर पहाणाऱ्याला ही एक टूम आहे असेच वाटेल. परंतु स्वतःच स्वतःच्या समस्या सोडविण्यासाठी केलेली ही धडपड एक नव वृत्ती दाखवते. आपल्या मुल्यमापनात, आपल्या आजारपणाबाबतच्या व्याख्येत, स्वतःच्या शरीराबद्दल व स्वतः बद्दलही होत असलेल्या महत्त्वपूर्ण अशा बदलाची ही खूण आहे. आणि ह्या स्पष्टीकरणातही न मावणारा, अधिक मोठा अर्थ या गोष्टीत लपून राहिलेला आहे. त्याचे ऐतिहासिक महत्त्व काही वेगळेच आहे.

अदृश्य अर्थकारण

पहिल्या लाटेच्या संस्कृतीत लोक स्वतःच उत्पादन करायचे व स्वतःच त्या उत्पादनाचा वापरही करायचे. ज्या अर्थाने आपण उत्पादक व ग्राहक असे शब्द वापरतो; दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीत या कल्पना पुढे आल्या आणि त्यांनी चांगले सुस्पष्ट स्वरूप धारण केले. पहिल्या लाटेत असे नव्हते. उत्पादक व ग्राहक या दोन्ही भूमिका ते स्वतःच पार पाडत होते. त्यांना आपण उत्पादग्राहक म्हणू या. भेद निर्माण झाला, तो नंतर. दुसऱ्या संस्कृतीत.

प्रथम, उत्पादन होत होते ते वापर हा हेतू बाळगून. नंतर औद्योगिक संस्कृतीत उत्पादन झाले ते अदलाबदलीसाठी. ही स्थिती गुंतागुंत निर्माण करणारी अशीच होती पण प्रमाण थोडे होते. नंतर हे प्रमाण

अनुक्रमणिका

वाढून देवाणघेवाणीला प्राधान्य आले. स्वतः वापरण्यासाठी वस्तूंची निर्मिती करणे हा भाग नंतर अगदीच थोडा उरला.

हीच गोष्ट अर्थकारणाच्या दृष्टीतून पाहिली असताना आपल्याला असे आढळून येईल, की पहिल्या संस्कृतीतल्या लोकांना वस्तूंचे उत्पादन केल्याचा प्रत्यक्ष मोबदला मिळत नव्हता. तर दुसऱ्या संस्कृतीत सर्व वस्तूंचे उत्पादन आणि सेवा या गोष्टींचा देवाणघेवाणीतून, विक्रीतून अथवा बाजारातून प्रत्यक्ष मोबदला मिळतो.

यातल्या दुसऱ्या प्रकारात बाजार इतका भरभराटीला आला, की औद्योगिक युगात पहिल्या प्रकारच्या उत्पादनाचे अस्तित्वात विसरुन गेल्यासारखे झाले होते. 'अर्थकारण' या कल्पनेची व्याख्या बाजाराच्या हेतूने निर्माण झालेल्या सर्व प्रकारच्या उत्पादनाला आणि कामालाही खड्ड्याप्रमाणे बाहेर फेकते. उत्पाग्राहक अदृश्यच होऊन गेला.

याबाबतचे आणखी एक उदाहरण ध्यानात घेतले, तर आपल्याला असे आढळून येईल, की बिनमोबदल्यात जे काम स्त्रिया घरात करतात— सर्व प्रकारचे घरकाम मुले वाढवणे, सामाजिक बांधणी इत्यादि कामे—ते 'बिन अर्थकारणाचे' म्हणून एका बाजूला सारले गेले. पहिल्या प्रकारातील उत्पादनही अदृश्य अर्थकारणाचेच गणले गेले.

परंतु साधी गोष्ट पहा, की घरात मुले जन्माला येतात, त्यांचे पालनपोषण होते. ती समाजात वावरायला योग्य अशी होतात आणि नंतर ती काम करण्याला योग्य होतात, एवढे सर्व करण्यामागे जे कष्ट आहेत. त्यांच्या मागचे कार्यान्वित अर्थकारण वजा केले तर काय शिल्लक उरणार आहे? प्रत्यक्ष उत्पादक म्हणून गणल्या जाणाऱ्या गटात जर कमी 'तयार' लोकांचा प्रवेश झाला, तर त्या गटाच्या उत्पादकतेचे काय होईल? दुसऱ्या लाटेच्या अर्थतज्ज्ञांनी जरी या बाबीकडे दुर्लक्ष केले असले, तरी एक गोष्ट निश्चित, की या दोन्ही प्रकारच्या गटांमध्ये अस्तित्वात असलेली उत्पादकता मोठ्या प्रमाणात एकमेकींवर अवलंबून आहे.

आपण जर लक्षपूर्वक पाहिले, तर आपल्या ध्यानात येईल की आता उत्पादनाच्या या दोन प्रकारांमधील संबध बदलू लागले आहेत. उत्पादक आणि ग्राहक यांना विभागणारी, एकेकाळी स्पष्ट असणारी रेषा आता अंधुक होत चालली आहे. 'उत्पाग्राहक' ही कल्पना आता अर्थपूर्ण होत चालली आहे. त्याही पलिकडे असा एक फार मोठा बदल घडू पहातो आहे. की ज्याच्याद्वारे आपल्या जीवनात असलेली आणि जगाच्याही बाबतीतली बाजाराची भूमिका बदलून जाणार आहे.

आज लाखो लोक डॉक्टरांनी करावयाच्या सेवा स्वतःकडे घेऊन बसलेले आहेत. याद्वारे असे घडते आहे, की हे लोक दुसऱ्या गटाचे उत्पादन पहिल्या गटाकडे नेत आहेत. दृश्य अर्थकारणाकडून आता अदृश्य अर्थकारणाकडे—ज्याला अर्थशास्त्रज्ञ विसरुन गेले होते— त्यांचा प्रवास चालू झाला आहे.

ते उत्पाग्राहक होऊ लागले आहेत. ध्यानात घ्या, त्यांच्या या प्रवासात ते एकाकी असणार नाहीत.

खादाड आणि विधवा

अनुक्रमणिका

कॅथेरिन फिशर नामक मँचेस्टरवासी गृहिणीने इ. स. १९७० मध्ये एक संघटना स्थापन केली. या पूर्वीची काही वर्षे ती आपल्याला आपले घर सोडावे लागेल या भीतीने पछाडली होती. तिने स्थापन केलेल्या या संघटनेच्या–भयग्रस्त संघटनेच्या–आज कितीतरी शाखा अस्तित्वात आल्या आहेत. आणखीही कितीतरी अस्तित्वात येऊ लागलेल्या आहेत.

अतिशय प्रगत व तंत्रधिष्ठित देशात अशा समदुःखितांच्या संघटना अस्तित्वात येण्याचे प्रमाण वाढलेले आहे. या संघटनांचा उपयोग असा, की आपल्याला पछाडणारा भयगंड, आपल्यावर आलेले संकट, आपल्यापुढे उभ्या राहिलेल्या समस्या, आपल्याला वाटणाऱ्या काळज्या यांविषयी कोणाजवळ तरी बोलावे, मन हलके करावे, कोणी मार्ग सुचवला तर उत्तमच, नाहीतर सहानुभूतीचा ओलावा आणि आधार तरी कमी नाही; अशा भूमिकेतून लोक एकत्र येतात आणि विचारविनिमय करतात. या गोष्टींचा त्यांना अगदी निश्चितच फायदा मिळतो.

अशा संघटनांचे प्रमाण किती वाढले आहे याचे एक उदाहरण दिले, तरी पुरेसे होईल. एकट्या अमेरिकेत आज ५००,००० इतके अशा प्रकारचे गट अस्तित्वात आलेले आहेत! लोकसंख्येच्या प्रमाणात म्हटले तर दर ४३५ माणसांमागे एक संघटना आणखीही कितीतरी उदयाला येत आहेत. एखाद दुसरी संस्था विसर्जन पावतेही. पण तिची जागा तात्काळ दुसरी एक किंवा अनेकही संस्था लगेच घेऊन टाकतात.

अशा संस्थापैकी काही परंपरागत सल्लादात्यांना धुडकावतात. लोक स्वतःला आलेल्या अनुभवातून शहाणे होण्याचा प्रयत्न करत आहेत. आयता सल्ला त्यांना नकोसा वाटतो. काही संस्था संकटग्रस्तांना आधार देतात. काही राजकारणातही भाग घेतात. कायद्यात आणि कराबाबतच्या नियमांत बदल करण्याच्या मागण्याही करतात. काही समाज' हेतुतः नुसते एकत्र येऊनच थांबत नाहीत, तर त्यांचे सभासद अक्षरशः एकत्र राहतात देखील.

अशा संस्था आता प्रादेशिकच नव्हे, तर हळूहळू आंतरराष्ट्रीय स्वरुपही धारण करु लागल्या आहेत. व्यावसायिक मानसज्ञ, सामाजिक कार्यकर्ते किंवा डॉक्टर या लोकांनी जर यात भाग घेतला, तर त्यांची भूमिका तटस्थ सर्वज्ञाची असू शकत नाही. त्यांना श्रोता, शिक्षक व मार्गदर्शक या नात्याने आपल्या 'रूग्णा' शी वागावे लागते. मूलतः फायदारहित तत्त्वावर उभारण्यात आलेल्या या संस्थांचा हेतू मदतीचाच असतो. आता स्वतःला मदत करण्याच्या या चळवळीत आपण चपखलपणे कसे बसू शकतो ह्याची खबरदारी ते घेत असतात.

स्वतःला मदत करण्याची ही चळवळ सामाजिक क्षेत्राशी निगडीत आहे. धूम्रपानी, तोतरे, आत्महत्येकडे कल असणारे लोक, जुगारी, घशाच्या विकाराने पीडित असलेले लोक, जुळ्यांचे मातापिता, खादाड, विधवा अशा प्रकारच्या लोकांच्या संघटना तयार होत आहेत. आणि त्यांच्या जाळ्यांची तिसऱ्या, आगामी कालातील कुटुंबाच्या संदर्भात आणि संघटित संस्थांमध्येही विशिष्ट भूमिका असणार आहे.

सामाजिक दृष्टीने या संस्थांचा जो काही अर्थ असेल. तो असेल, परंतु या धारणेतही उदासीन, तटस्थ आणि निष्क्रिय ग्राहक, क्रियाशील उत्पाग्राहक बनण्यामागचे मूलतत्त्व आहे. त्यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्याही अर्थ आहेच. वर उल्लेखिलेलीच प्रक्रिया या संस्था करीत आहेत. दुसऱ्या गटाकडून

अनुक्रमणिका

पहिल्या लाटेखालील संस्कृतीच्या अर्थकारणाकडे, उत्पाग्राहकतेकडे हा प्रवास आहे. आणि ही घटना कमी अर्थपूर्ण नाही. तांत्रिक असोत की आर्थिक कारणे असोत, जगातील मोठ्या आणि श्रीमंत कॉर्पोरेशन्सही उत्पाग्राहकतेच्या उदयाला पाठिंबा देऊन गती आणत आहेत.

स्वावलंबी जीवन

अलिकडे अनेक क्षेत्रांतून आपले काम आपणच करण्याची प्रवृत्ती उदयाला येते आहे. तंत्रज्ञान या प्रवृत्तीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन आणि आधार देत आहे.

तबकडी फिरवून, थेट टेलिफोन करुन दूरस्थ, दूर नगरस्थ, दूर देशस्थ व्यक्तीशी बोलायची सोय झाल्यामुळे टेलिफोन ऑपरेटरची त्याबाबतची गरजच उरलेली नाही.

मोठमोठ्या तेल कंपन्या वैभवाने ओसांडत आहेत. परंतु स्थानिक पंपावर पेट्रोल भरणारे आर्थिक अस्तित्वासाठी झगडा देत आहेत. उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीने कंपन्यांनी अशी व्यवस्था असलेले पंप उभारले की ग्राहकाला स्वतःच पेट्रोल भरुन घेता यावे. लवकर अशी व्यवस्था ही नित्याची बाब होऊन राहिली जवळजवळ ७० टक्के पंपावर ही व्यवस्था अस्तित्वात आलेली आहे.

अलिकडच्या काळात बँकांमध्ये देखील स्वयंसेवा अस्तित्वात आली आहे. इलेक्ट्रॉनिक् बँकिंगमध्ये जी कामे पूर्वी बँकांचे सेवकवर्ग करत; ती कामे यंत्रांच्या सहाय्याने स्वतः ग्राहकच करू शकत आहे.

ग्राहकाची स्वयंसेवा हा भाग आता तसा नवीन राहिलेला नाही. डिस्काउंट स्टोअर्सचा उदय हे त्यातलेच एक पाऊल ठरेल. या प्रकारात कारकून नसतात असे नाही; असतात, पण फार विरळ. ग्राहकाला स्वतःलाच थोडे फार कष्ट करावे लागतात परंतु त्यांचा आर्थिक फायदा होतो. दुकानात त्याला कमी पैसे मोजावे लागतात. वस्तू स्वस्तात पडतात.

एक आणखी नवीनच प्रकार आता अस्तित्वात येऊ लागलेला आहे. आपल्या वापरातील एखादे उपकरण, उदा : फ्रीज, नादुरुस्त झाले, तर मेकॅनिकला बोलविण्याचा प्रघाच आहे. परंतु मेकॅनिकला फुरसत असणे तो येणे आणि त्याने यंत्र दुरुस्त करणे यात वेळही जातो, पैसेही खर्च होतात. त्याऐवजी आता असा प्रघात पडतो आहे, की उत्पादकाकडेच फोन करायचा, निर्माण झालेल्या दोषाबद्दल सांगायचे, ते ऐकून उत्पादक सूचना करणार, आणि त्या सूचना ऐकून आपण एखादा स्क्रू आवळायचा किंवा इतर दुरुस्तीही करायची!... पुष्कळ दुरुस्त्या आपल्या आपल्याला करता येतात, परंतु आपण ही शक्यता डावलून मेकॅनिकचा पांगुळगाडा स्वीकारण्याची चूक केली होती. आता काही बाबतीत आपण स्वावलंबी होत चाललो आहोत. अगदीच नसेल तेव्हा मेकॅनिक आहेतच.

तेव्हा याही प्रकारात आपल्याला स्पष्ट आढळून येते ती ही गोष्ट, की आर्थिक दृष्ट्या आपण पाहिलेल्या पहिल्या गटाकडेच दुसऱ्या गटाकडून ओघ वहातो आहे. उत्पाग्राहकतेचे तत्त्व इथेही जोर धरते आहे.

अनुक्रमणिका

'तुम्ही स्वतःच करा' प्रकारातील उद्योग थोड्या प्रमाणात चालूच होते. खिडकीची फुटलेली काच बसवणे, विजेबाबतची थोडी फार दुरुस्ती इत्यादि कामे चालू होती परंतु आता जे झाले आहे ते थोडे वेगळेच आहे. व्यावसायिक बांधकामतज्ञ, वीजतज्ञ, सुतार तळ बसवणारे अशा अनेकांशी असलेले आपले सबध आता फार प्रमाणात बदलत चाललेले आहेत.

पूर्वी बांधकामाचे कंत्राट देण्याची पध्दत फार मोठ्या प्रमाणात होती. आता फरक असा झाला आहे, की बांधकाम करून घेणारा मालक स्वतःच मालाची खरेदी करतो. यात त्याचा फार मोठ्या प्रमाणात फायदा होतो. कंत्राटदाराला द्यायची दलाली वाचते. हा बदल मोठा आणि नाट्यपूर्ण गणला जातो.

स्वतःच्या हाताने, स्वतःच स्वतःची कामे करणे पूर्वी अपमानकारक वाटत होते. आता तीच गोष्ट अभिमानाची झालेली आहे. याद्वारे खर्च तर वाचतोच, शिवाय काम अधिक अचूकपणे आणि प्रभावी, उत्तम फल देणारे होते आणि म्हणूनच मग खरा अभिमान जागृत होता.

यापुढील काळात किंमती दिवसेदिवस वाढतच जाणार आहेत. किंमती भडकतील तसतसे लोक आपले काम आपणच, अधिकाधिक प्रमाणात करु लागतील आणि दुसऱ्या प्रत्यक्ष अर्थोत्पादक गटाकडील उत्पादन अधिक प्रमाणात अदृश्य अर्थकारणाच्या दुसऱ्या गटाकडे येत जाईल.

**बाहेरचे आणि आतले**

या प्रक्रियेच्या दूरगामी भवितव्याकडे पहायचे तर केवळ सेवांचा विचार करून चालणार नाही. उत्पादित वस्तूंचा देखील विचार करायला हवा. आपल्याला असे आढळून येते, की ग्राहक हा दिवसेदिवस अधिकाधिक प्रमाणात उत्पादन प्रक्रियेकडे खेचला जात आहे.

आजचे उत्सुक उत्पादक ग्राहकांना, कधी कधी पैसे देऊनही, बोलावून यांच्याकडून उत्पादनासंबंधी सूचना मिळवतात. ज्या गोष्टी प्रत्यक्ष ग्राहकांना विकल्या जातात अशा अन्न, साबण प्रसाधने इत्यादि मालाबाबतच नव्हे, तर जिथे विकेंद्रीकरण मोठ्या प्रमाणावर चालू आहे अशा अतिप्रगत तंत्रज्ञानाधिष्ठित उद्योगांच्या, उदा. इलेक्ट्रॉनिक्स बाबतही ही गोष्ट घडते आहे. ग्राहकांच्या सहयोगाचा उत्पादकांनादेखील मोठ्या प्रमाणात फायदा होतो आहे.

दिवसेदिवस प्रगत पद्धतीने उत्पादन होते आहे; विकेंद्रीकरण घडते आहे; उत्पादनात ग्राहकनिष्ठता येते आहे; आणि उत्पादन प्रक्रियत ग्राहकाने भाग घेण्याचे प्रमाणही वाढत वाढत चालले आहे.

कॉम्प्युटर–एडेड मॅन्युफॅक्चरिंग इंटरनॅशनल–(CAMI) या संस्थेचे सदस्य उत्पादन पूर्णतया स्वयंचलित कसे होईल याचा विचार करत आहेत. याही विचारात अखेर असा टप्पा येईल, की उत्पादकाच्या कॉम्प्युटरला प्रत्यक्ष ग्राहकांकडून अपेक्षित सुधारणांचे, मालाच्या अपेक्षित स्वरुपाचे सूक्ष्म माहितीच्या स्वरूपात 'खाद्य' पुरवले जाईल.

कॉम्प्युटर ग्राहकाच्या इच्छेनुसार उत्पादनाची योजना करेल, एवढेच नाही तर उत्पादन पध्दतीही ग्राहकाने सांगितलेलीच अंगीकारेल. ते यंत्रांचे उपयोजन करेल. उत्पादनाच्या ज्या त्या टप्प्यांचा योग्य तो

अनुक्रमणिका

क्रम लावेल. उदा. दळणे, भरडणे किंवा रंगवणे इत्यादि; आवश्यक तो कार्यक्रम, कार्यवाही आखून 'लिहून' देईल. वेगवेगळ्या टप्प्यांसाठी असलेला 'कंट्रोल' पुरवेल आणि आर्थिक व परिस्थितीनिष्ठ बाबींना आवश्यक असलेल्या वेगवेगळ्या प्रक्रिया प्रत्यक्षात उतरवेल.

शेवटी असे होणार आहे, की यांत्रिक सुविधा प्राप्त झाल्यामुळे ग्राहक केवळ बटन दाबून उत्पादन प्रक्रिया घडवून आणू शकेल. अर्थात ग्राहकाने चालना दिलेली अशी उत्पादन—पध्दत अस्तित्वात यायला अजून अवकाश आहे.

तरी हे निश्चित की उद्याचा आपल्या जगात अवतरणाऱ्या इलेक्ट्रॉनिक कॉटेजमध्ये आपण ज्याप्रमाणे अर्थोत्पादक कामे करणार आहोत, त्याचप्रमाणे स्वतःच्या उपयोगासाठी, वापरासाठी वस्तू आणि सेवाही निर्माण करणार आहोत, उपलब्ध करून घेणार आहोत, आणि अशा तऱ्हेने अतिप्रगत तंत्राच्या सहाय्याने का होईना, आपण पुनः पहिल्या लाटेच्या संस्कृतीत अस्तित्वात असलेल्या उत्पाग्राहकतेकडे तत्त्वतः व आचरतः आणि प्रत्यक्ष परिणामतःही जाणार आहोत.

तेव्हा अशा काही घटना घडत असताना, आपण उत्पादक आणि ग्राहक यांची अधिक जवळीक होत असलेली पहातो आहोत. पूर्वापार चालत आलेली या दोघांची व्यवच्छेदकता नाहीशी होत चालली आहे. 'बाहेरचा—बाहेर असलेला, बाहेर ठेवला गेलेला आता आतल्या गोटात येऊन 'आतला' होतो आहे.

आणि हे घटत असताना सध्या हळूहळू, आणि नंतर वेगाने, आपण आपली अत्यंत मूलभूत अशी संस्था बदलतो आहोत, बदलणार आहोत. ही संस्था आहे— बाजार.

## उत्पाग्राहक जीवनपद्धती

उत्पाग्राहकतेच्या उदयामुळे आपल्या जीवनात असलेल्या बाजाराच्या भूमिकेत बदल होऊ लागला आहे.

ही सूक्ष्मे परंतु अर्थपूर्ण मुसंडी आपल्याला कुठे नेणार आहे हे आताच सांगणे घाईचे होईल. परंतु 'बाजार पेठ' नाहीशी होत जाणार हे निश्चित. आणि हेही तितकेच निश्चित की आपण जरी उत्पाग्राहकतेचा अंगीकार केला तरी 'बाजार पूर्व' अर्थकारणाकडे पुनः माघारी जाणार नाही.

ज्याला आपण अदलाबदल विभाग म्हणतो, तो काही नाहीसा होणार नाही. अजूनही आपल्याला बराच काळ बाजारावर अवलंबून रहावे लागणार आहेच. परंतु उत्पाग्राहकता दोन गटांतील संबंधात मूलभूत बदल घडवून आणणार आहे. ही उत्पाग्राहकता काही घडामोडींच्या बाबतीत बाजाराचे जे विकेंद्रीकरण करत आहे. त्यांच्यामुळे बाजाराची समाजविषयक भूमिका बदलत चालली आहे. ती असे सूचित करते की, उद्याचे अर्थकारण हुबेहूब पहिल्या लाटेसारखे असणार नाही; दुसऱ्या लाटेसारखेही असणार नाही; तथापि दोन्ही संस्कृतीतील वैशिष्ट्य जणू रासायनिक रीतीने एकत्र करील. ही तिसरी ऐतिहासिक आर्थिक समज उभी रहाणार आहे.

अनुक्रमणिका

वाढता खर्च, वाढत्या खर्चाने उपलब्ध होणाऱ्या सेवा, दुसऱ्या लाटेतील नोकरशाहीची कोलमड तिसऱ्या लाटेतील अतिप्रगत तंत्रज्ञान, बेकारीचे प्रश्न आणि इतर अनेक, एकाच दिशेने जाणारे घटक, यांच्यामुळे उत्पाग्राहकतेचा जन्म आणि विकास होतो आहे.

भावी अर्थकारणात, मोठ्या संख्येने पूर्णवेळ काम करणारे लोक असणार नाहीत. पूर्णवेळाची पगारी कामाची व्याख्याच बदलणे भाग पडणार आहे. अलिकडे कामाचा आठवडा व कामाचे वर्ष या गोष्टी तोकड्या तोकड्याच होत चाललेल्या आहेत. आता पगारी काम करणारे लोक मोठ्या प्रमाणात आठवड्यातुन फक्त तीन ते चार दिवसच काम करत असतात.

आता असा प्रश्न निर्माण होतो, की आता मोकळा वेळ किंवा फुरसत कशी वापरली जाते किंवा इथून पुढे फुरसत वापरण्याचा अर्थ काय असणार आहे? इथून पुढच्या काळात आपल्याला असे आढळून येईल, की फुरसतीच्या काळात स्वतःच्या वापरासाठी वस्तू व सेवा उत्पादित केल्या जातील. काम आणि फुरसत याच्यामधला जुना व्यवच्छंद इथ नाहीसा होऊन जाईल.

तिसऱ्या लाटेतील जीवनपध्दती निम्मे देवाणघेवाणीसाठी उत्पादन या तत्त्वावर व निम्मे स्वतःच्या वापरासाठी उत्पादन या तत्त्वावर आधारलेल्या अशा स्वरुपात अस्तित्वात येतील. तसे पाहिले तर या स्वरुपाच्या जीवनपध्दती काही प्रमाणात औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात अस्तित्वात होत्या. शेतकरी वर्ग हळूहळू नागरी निम्नस्तरीय कामगार पेशात रुपांतरित होत होता, अशा वेळी बदलाचा जो मोठा काळ जीवने व्यापून राहिला होता, त्याने असे दृश्य पाहिले, की लोक काही काळ कारखान्यात काम करत आहेत तर उरलेला काळ शेतावर, स्वतःचे अन्नधान्य उगवण्यात घालवत आहेत. काही गरजेच्या वस्तू विकत आणत आहेत, तर उरलेल्या वस्तू स्वतःच तयार करत आहेत. जिथे तंत्रज्ञान अविकसित स्थितीत आहे, तिथे या प्रकारचा जीवनक्रम आजही आचरला जातो.

याच तऱ्हेच्या जीवनक्रमाची, परंतु जो २१ व्या शतकातल्या अन्न व वस्तू उत्पादनासंबंधी तंत्रज्ञानाच्या छायेतल्या असेल, अशाची कल्पना करा. स्वावलंबनाच्या, अनेक उपयोगिताच्या उत्पादकतेच्या पध्दती किती सुधारलेल्या असतील!.... यांत्रिकतेकडे कल असलेले लोक यंत्रे केवळ दुरुस्तच करुन थांबतील असे नाही, तर निम्म्या अधिक प्रमाणात ती स्वतः तयार देखील करतील!

ब्रॅडले ऑटोमोटिव्ह नावाची एक कंपनी 'ब्रॅडले जी टी किट' तुम्हाला पुरवते. आणि 'तुमची स्वतःची दिमाखदार स्पोर्टस् गाडी जुळविण्याची' संधी तुम्हाला देते. उत्पाग्राहक काही प्रमाणात जुळवलेली किट आणून फायबर ग्लास बॉडी वोल्क्सवॅगनच्या चेसीसवर स्वतःच पक्की बसवतो; इंजिन— वायर्स जोडता, स्टिअरिंग बसवतो, आसने बसवतो; अशीच आणखी काही कामे स्वतः करून स्वतःच्या गाडीची उभारणी करतो!

अशाच अनेक गोष्टी स्वतःच उभारुन केवळ कारखान्यातच होतील अशी कामे कारखान्यांवर सोपवून, प्रत्यक्ष अर्थोत्पादक गटांकडून कृती अप्रत्यक्ष अर्थोत्पादक गटाकडे अधिक प्रमाणात आणण्याचा तिसऱ्या संस्कृतीच्या माणसाचा प्रयत्न असेल. कृतिशीलतेच्या कर्तेपणाच्या बदलाची प्रक्रिया कोणत्या देशात किती होईल याचा ठोकताळा करणे हे अत्यंत अवघड व काहीसे अशक्य काम आहे. कारण या दोन गटांतील समतोल देशकाल परिस्थितीनुरुप वेगळा वेगळाच असणार. तेव्हा या सर्वातून कोणत्या प्रकारचा

अनुक्रमणिका

जीवनक्रम प्रत्यक्षात पुढे येणार आहे हेही सांगणे कठीण आहे. एक गोष्ट मात्र खरी की वापरासाठीचे उत्पादन आणि विक्रीसाठीचे उत्पादन यातील तोलामध्ये होणारा कोणताही अर्थपूर्ण बदल निश्चितपणे आपल्या अर्थविषयक प्रणालीवर आणि आपल्या मूल्यांकनावरही खोलवर परिणाम करेल.

## तिसऱ्या लाटेचे अर्थकारण

सर्वत्रच कष्टांना पुढावा देणाऱ्या औद्योगिक वैशिष्ट्यांचा अभाव आपल्याला दिसून येतो आहे.... जे लोक आपल्या नोकरीवर कष्टपूर्वक काम करायला अनुत्सुक असतात. तेच लोक नोकरी व्यतिरिक्तच्या कामात भरपूर कष्ट घेतात. सतरंज्या विणणे, राजकीय प्रचार करणे, बैठकींना हजर रहाणे, गोष्टी लिहिणे, भाजीपाला निर्माण करणे अशी कितीतरी कामे ते अगदी रस घेऊन, मनःपूर्वक करत असतात.

या तऱ्हेची कामाची प्रवृत्ती आर्थिक दृष्टीने अगदी चमत्कारिक ठरु शकते. अर्थतज्ज्ञांना आता संपूर्ण नवीन कल्पना विचारात आणून, केवळ प्रत्यक्ष उत्पादक गटाचाच विचार न करता दोन्ही गटांच्या एकमेकांशी असणाऱ्या संबंधांचा, अप्रत्यक्ष अर्थोत्पादक कामे करणाऱ्या गटातील घडामोडींचा विचार करायला हवा.

तिसऱ्या लाटेने जागतिक अर्थकारणाची पुनर्रचना सुरु केली आहे. तेव्हापासून अर्थशास्त्राच्या व्यवसायावर सतत टीकेचे हल्ले केले जात आहेत. काय घडत आहे हे त्याला स्पष्ट सांगता येत नाही. अतिशय आधुनिक उपकरणे. कॉम्प्युटरायझेशन इत्यादींची सुविधा असूनही अर्थकारण कसे चालू आहे हे सांगणे कठीण होत चालले आहे. खुद्द अर्थशास्त्रज्ञापैकी देखील कितीतरी जण आता असे म्हणत आहेत, की पाश्चिमात्य असो की मार्क्सवादी असो परंपरागत अर्थविचार बदलत्या वास्तवाशी झपाट्याने विसंगत ठरत आहे.

त्याचे एक कारण असे असू शकेल, की देवाणघेवाणीच्या प्रक्रियेच्या पूर्णतः बाहेरच्या कक्षेत फार मोठे अर्थपूर्ण असे बदल घडत आहेत. अर्थतज्ञांना जर वास्तवाशी सबंध ठेवावयाचा असेल. तर त्यांना नवीन वैचारिक नमुने तयार करावे लागतील; नवीन मापे तयार करावी लागतील. नवीन सूची बनवाव्या लागतील. उत्पाग्राहकाच्या उदयाच्या नव्या प्रकाशात त्यांना आपली पुष्कळ मूलभूत गृहीतके पुनः तपासून पहावी लागतील.

अजूनही ही गोष्ट कोणी मान्यच करत नाही, की प्रत्यक्ष अर्थोत्पादक नसलेल्या गटानही उत्पादनच होत असते. त्यातून निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवा हे एक वास्तव आहे, कल्पनाविश्व किंवा भास नाही.

उत्पाग्राहकाच्या उदयाचे आकलन झाल्यावर मूल्यांकनावरही प्रखर प्रकाश पडतो आणि आपल्याला हे स्पष्टपणे कळून चुकते की उत्पाग्राहकाच्या पहिल्या गटातील प्रभावीपणामुळे कंपन्या व सरकारी एजन्सीज यांना त्यांच्या अखत्यारीतील दुसऱ्या गटातील किंमती कमी कराव्या लागतात किंवा वाढवाव्यां लागतात.

प्रत्यक्ष अर्थोत्पादक गटातील कामगारांच्या नशील्या सवयी त्यांची कामावरती गैरहजेरी, त्यांचा मानसिक व बौंर्द्धिक ऱ्हास, या सर्वाचा उत्पादकाच्या व्यावसायिक खर्चावर किंवा किंमतीवर परिणाम होत

अनुक्रमणिका

असतो. स्वतःच स्वतःसाठी काम करणाऱ्यांच्या गटातील कामगारांना असा समस्या कमी त्रासदायक असतात असा अनुभव आहे. आणि त्यांचा उत्पादक खर्चही कमी प्रमाणात होतो, याप्रमाणे उत्पाग्राहतेच्या कार्यक्षमतेवर परिणामकारकता उत्पदनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम करत असते.

व्यवसात अगदी सूक्ष्म घटकही उत्पादन खर्चावर परिणाम करत असतात कामगार किती प्रमाणात सुशिक्षित किंवा कुशल आहे.? ते सर्व एकच भाषा बोलतात काय? त्यानं वेळ सांगता येते काय? ते सांस्कृतिक दृष्ट्या स्वतःच्या कामासाठी तयार झालेले आहेत काय? कौटुंबिक जीवनात माहीत झालेली सामाजिक कौशल्ये त्यांना कमी किंवा अधिक कार्यक्षम करतात काय? या सर्व स्वाभाविक धारणा, कल, दृष्टिकोण, मूल्ये, कौशल्ये आणि हेतू या गोष्टींचा उच्च उत्पादकतेच्या, दुसऱ्या गटाच्या विचारात फार मोठ्या प्रमाणात अंतर्भाव केला जातो. व्यापार किंवा देवाण घेवाण क्षेत्रांतर्गत उत्पादकतेला महत्त्वाच्या वाटणाऱ्या या गोष्टी दुसऱ्या गटातही महत्त्वाच्याच असतात, ग्राहक आणि उत्पादक यांचे उत्पाग्राहकाच्या स्वरुपात होत असलेले पुनर्मिलन आपल्याला असा संबंधांचा सक्षमतेचे विवार करायला भाग पाडील.

प्रभावी बदल आपल्याला कार्यक्षमतेच्या व्याख्येचाही पुनर्विचार करावयास लावील अर्थतज्ञ कार्यक्षमतेहा विचार करताना दोन्ही प्रकारच्या उत्पादन मार्गांची तूलना करतात, परंतु त्याचा स्पष्ट विचार ज्यांना अर्थशास्त्र माहीतच नाही, असे लाखो लोक करतात. त्यांना आता हे कळून चुकले आहे, की एकदा आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले की प्रत्यक्ष रोख पैसा जास्त मिळवण्यापेक्षा उत्पाग्राहक बनणे ही गोष्ट आर्थिक व मानसिक दृष्ट्या अधिक फायद्याचीच असेल!

आणि अशा तऱ्हेने उत्पाग्राहकता समाजात आली म्हणजे मिळकतीच्या प्रत्यक्ष आकड्यांचा अर्थ काय असणार आहे? जर एखादी व्यक्ती अर्धे काम या गटात व अर्धे काम दुसऱ्या गटात करणार असेल, तर तिने निर्माण केलेल्या कोणत्या वस्तूंची (मग त्या दृश्य असोत की अदृश्य) गणना त्याच्या किंवा तिच्या मिळकतीचा भाग म्हणून केली जाणार आहे?

कल्याण किंवा सुस्थिती यांची व्याख्या आपण नव्या पद्धतीत कशी करणार आहोत? गरीबीचा अर्थ काय असणार आहे? बेकारीच्या कल्पनेचा पुनर्विचार करण्याची वेळ येणार नाही काय? एखादा कामगार जर स्वतःच्या घराचे छप्पर घालत असेल, किंवा आपल्या गाडीची संपूर्ण तपासणी व दुरुस्ती स्वतःच करेल तर तोही केवळ दुसरीकडे त्यावेळी नोकरी करत नसल्यामुळे निवांत वसून टेलिव्हिजनवर फुटबॉल पहाणाऱ्यांप्रमाणे बेकार गणला जाणार काय? उत्पाग्राहकतेच्या उदयामुळे आपल्याला बेकारी व नाकरशाही या दोन जुळ्या प्रश्नांकडे पहाण्याचा नवाच दृष्टीकोण प्राप्त होतो.

जर उत्पादक दोन्ही विभागात होत राहिले, म्हणजेच जर लोक स्वतःच्या वापरासाठी उत्पादन करू लागले व विक्रीसाठी म्हणजेच दुसऱ्याच्या उपयोगासाठीही उत्पादन करू लागले, तर किमान मिळकतीच्या हमीच्या मुद्यावर काय परिणाम होईल? दुसऱ्या लाटेच्या समाजात मिळकत ही कल्पना अविच्छिन्नपणे अदलाबदलीच्या अर्थकारणाशीच संबंधित राहिली होती. परंतु उत्पाग्राहकसुद्धा 'काम करत' नाहीत काय? ते बाजाराशी संबंधित असले म्हणून काय झाले? एखादी स्त्री किंवा एखादा पुरुष घरी थांबून मूल वाढवतो याचा अर्थ त्याने पहिल्या गटातील प्रयत्न दुसऱ्या गटाच्या उत्पादकतेला सहाय्यभूत होतात असाच होऊ शकत नाही काय?

अनुक्रमणिका

उत्पाग्राहकतेचा उदय आपले अर्थविषयक विचार निश्चितपणे बदलून टाकणार आहे. आर्थिक झगड्यांचा पायाही बदलून टाकणार आहे. कामगार उत्पादक आणि व्यवस्थापक उत्पादक यांच्यामधील लढा चालूच राहील. परंतु आपण जसजसे तिसऱ्या लाटेच्या समाजात समाविष्ट होऊ तसतसे या लढ्याचे महत्त्व कमी होत जाईल. नवीन सामाजिक झगडे त्यांची जागा घेतील.

दुसऱ्या लाटेचे समर्थक उत्पाग्राहकांना फार पुढे येऊ देणार नाहीत. नोकऱ्या व फायदे यांच्यावरही आपली पकड ते सोडणार नाहीत शिक्षकांच्या संघटना विद्यार्थ्यांच्या पालकांना वर्गाच्या बाहेरच ठेवण्यासाठी झटत राहतील. इमारतीच्या धंद्यातील लुप्तप्राय होत असलेल्या आपल्या धंद्यातील नियमांचे होईल तेवढे रक्षण करत रहातील. पण आरोग्यविषयक समस्यांना एकटा डॉक्टर तोंड देऊ शकत नाही. त्याला त्या त्या रोग्याकडून सक्रीय सहकार्याची अपेक्षा असते, त्याप्रमाणे शैक्षणिक समस्या देखील पालकांच्या सहकार्याशिवाय सुटणे शक्य नाही. उत्पाग्राहकाचा उदय सर्व आर्थिक भूमीच बदलून टाकत आहे.

## बाजारीकरण प्रक्रियेचा अंत

मानववंश गेली जवळजवळ दहा हजार वर्षे जगभर पसरलेल्या देवाण घेणाव जाळ्याची—बाजाराची—उभारणी करत होता. गेल्या तीनशे वर्षात, दुसरी लाट आल्यानंतरच्या काळात या प्रक्रियेने फार मोठी गती घेतली होती. या लाटेखालच्या संस्कृतीने सबंध जगाचे जणू बाजारीकरण केले होते. परंतु आता जो क्रांतीकारक बदल होतो आहे, तो या प्रक्रियेचा शेवट घडवून आणील की काय अशी शंका निर्माण झालेली आहे.

पूर्वी देखील देवाणघेवाण, खरेदी—विक्री, बाजार, अस्तित्वात होताच. परंतु दुसरी लाट आली तेव्हा या गोष्टीशी फार थोड्या लोकांचा संबंध होता. उत्पादक, वितरक, ठोक विक्रेते, बँकर्स वगैरे होते, पण ते लहान प्रमाणात व अविकसित स्वरूपात होते. वस्तू व पैसा यांच्या वहनाच्या नलिका अगदी अरुंद होत्या.

गेल्या तीनशे वर्षात मात्र आपण ह्या नलिकांच्या उभारणीत, विकासात कितीतरी मोठ्या प्रमाणात ऊर्जा व शक्ती खर्च केलेली आहे. या दुसऱ्या लाटेत बाजाराचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. मोठ्या प्रमाणात लोकांचा संबंध बाजाराशी आला. एवढेच नव्हे, तर अधिक वस्तू व सुविधा यांची बाजारासाठी निर्मिती करण्यात येऊन त्या बाजारात आणण्यात आल्या. त्यामुळे 'नलिका'चे व्यास अधिकाधिक रुंद होत गेले.

समाज आणि अर्थकारण अतिशय गुंतागुंतीचे होत गेले. एका साध्या गोष्टीसाठी अनेक प्रक्रिया व टप्पे अस्तित्वात आले. उदा. एक साबण उत्पादकाने उत्पन्न केला, तो तुमच्यापर्यंत यायला, तर त्याला किती टप्पे लागणार, किती मध्यस्थ लागणार याला मर्यादाच उरली नाही. अधिकाधिक वैशिष्ट्यपूर्ण नलिकांची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे नलिकांचे जणू जाळेच तयार झाले.

आज या विकासाने पराकोटीच्या अशा मर्यादा गाठलेल्या आहेत. तरी काही दूरस्थ जमातींचा अजून बाजाराशी संबंध आलेला नाही. शिवाय गरीब देशांतील लाखोच नव्हे, तर कोट्यावधी गरीब

अनुक्रमणिका

शेतकऱ्यांचा बाजार व अर्थव्यवस्थेशी फारसा थोडा संबंध आलेला आहे. आता लोकांच्या बाबतीत जेवढा विकास होऊ शकत होता तेवढा झाला आहे. अधिक होऊ शकणार नाही.

दुसऱ्या एका बाबतीत विकासाची अजून थोडीफार शक्यता आहे. ती म्हणजे विक्रीसाठी किंवा देवाणघेवाणीसाठी वस्तूंचे आणखी काही प्रकार कल्पनेद्वारा निर्माण करणे. परंतु अशाच ठिकाणी उत्पाग्राहकाच्या उदयाला अर्थपूर्णता येते. स्वतःला मदतीचा हात देण्याच्या कल्पनेतून अनेक वस्तूंचे आणि सुविधांचे अ–बाजारीकरण होत असल्यामुळे त्यातून बाजारीकरणाच्या प्रक्रियेचाच शेवट होतो की काय याची सूचना प्राप्त होते.

आपले काम, आपली मूल्ये, आपल्या मनीधारणा यांचे काय? एखादा बाजार म्हणजे केवळ त्यात असलेल्या लोखंड, बूट, कापूस किंवा अन्न अशा निर्जीव गोष्टी नव्हेत; ते म्हणजे केवळ आर्थिक रचना नव्हे. ती लोकांच्या संघटनेची एक पद्धत आहे. विचारांची एक पद्धत आहे. सवय आहे. सामाजिक अपेक्षांचा तो एक संच आहे. बाजार ही या प्रमाणे, आर्थिक वास्तवाप्रमाणेच एक मानसिक रचना आहे.

बाजाराने अतिशय पद्धतशीरपणे अब्जावधी लोकांचा एकमेकांशी संबंध आणून एक असे जग निर्माण केले, की ज्याच्यात कोणीही एकाची स्वतःच्या अगर दुसऱ्या कोणाच्या दैवावर, किंवा व्यक्तीवर किंवा देशावर किंवा संस्कृतीवर स्वतंत्र अधिसत्ता अस्तित्वात नव्हती. त्याने अशी एक भावना निर्माण केली, की बाजारातील एकीकरण ही सुधारणेची पायरी आहे. आणि स्वयंसिद्धता हा मागासलेपणा आहे. विचारांना आणि मूल्यांना बाजारीकरणाने असा आकार दिला, की ज्याद्वारे प्रत्येक घटना हा एक करारच भासू लागला.

जगाच्या एक भागातला एखादा खरेदी प्रतिनिधी हजारो मैलांवरच्या, ज्याची पूर्वीची कसलीही माहिती नाही अशा, विक्री प्रतिनिधीशी वस्तूंच्या व्यापारविषयक किंवा इतर विनिमयासंबंधी वाटाघाटी करतो, तेव्हा ती स्थिती यावी यासाठी कितीतरी ऊर्जा, भांडवल, काळ, संस्कृती, कच्चा माल यासारख्या अनेक गोष्टींचा व्यय झालेला असतो. परंतु हे खरे, की अशाच अनेक गुंतागुंतीच्या प्रक्रियांमधून बाजाराने अब्जावधी लोकाच्याच संबंध स्थापन केला.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीचे उद्दिष्ट कार्य काय म्हणून जर कोणी विचार केला, तर एक प्रमुख उद्दिष्ट म्हणून ‘जगाचे बाजारीकरण’ या उद्दिष्टाकडे बोट दाखवता येईल.

आज हे कार्य पूर्ण झालेले आहे. बाजार उभारणीचे ऐतिहासिक युग संपुष्टात आलेले आहे. आपण आता नव्या टप्प्याशी आलो आहो. आपण त्या नलिकांच्या जाळ्याची देखभाल करायची, त्याचे नूतनीकरण करायचे किंवा ते अद्ययावत् करायचे, मूलभूत नवीन माहिती प्रवाहांसाठी आपल्याला कांही नवीन यंत्रणेची योजनाही करायला हवी. ही पद्धत अधिकाधिक प्रमाणात इलेक्ट्रॉनिक्स्, जीवशास्त्र व नव्या सामाजिक तंत्रज्ञानावर अवलंबून रहाणारी असेल. या बाबतसुद्धा साधने, कल्पना, भांडवल या गोष्टींची गरज असणार आहे. परंतु दुसऱ्या लाटेच्या बाजारीकरणाच्या दमछाकीच्या प्रयत्नापेक्षा कितीतरी कमी प्रमाणात आपल्याला वेळ, ऊर्जा, भांडवल व कल्पना यांचा खर्च करावा लागेल. बांधकामाच्या, उभारणीच्या प्रक्रियेत पूर्वी वापरले जात होते त्यापेक्षा कमी, जास्त तर नव्हेच नव्हे, लोखंड व मनुष्यबळ वापरले जाईल. अशा गोष्टी घडत गेल्यामुळे आता बाजारीकरण ही संस्कृतीची मध्यवर्ती योजना, रचना असणार नाही.

अनुक्रमणिका

तिसऱ्या लाटेमुळे इतिहासात प्रथमच अशी संस्कृती निर्माण होणार आहे, की जी बाजारापलीकडील असेल.

याचा अर्थ असा नव्हे, की बाजार किंवा देवाणघेवाण व्यवहार असणारच नाही. आपण तशी पीछेहाट करणारी नाही. 'बाजारा पलीकडील' म्हणण्याचा अर्थ असा, की बाजारावर ती अवलंबून असेलच, परंतु तिचा विकास करण्यासाठी, तिच्यावर कौशल्य ओतण्यासाठी किंवा या रचनेचे एकीकरण करण्यासाठी आता पूर्वीप्रमाणे आवश्यकता उरणार नाही. त्यात आपले तनमनधन खर्च होत रहाण्याची गरजच असणार नाही. बाजाराचे अतिशयोक्त महत्त्व कमी होऊन त्याला त्याच्या योग्य जागीच ठेवण्यात येणार आहे.

बाजारीकरणाच्या अताचे दूरगामी परिणाम काय होतील हे सांगणे फारच अवघड आहे. परंतु एक गोष्ट खरी, की आपल्या नाही, तरी आपल्या मुलांच्या जीवनावर याचे परिणाम होणार आहेत. उभारणीचे काम पुरे झालेले आहे, त्यामुळे त्यासाठी करावा लागणारा व्यय आता वाचणार आहे आणि भावी सांस्कृतिक बदलांच्या अखंड स्रोत्राला ही एकच गोष्ट प्रमुख कारण ठरू शकेल. नवे धर्म उदयाला येतील. कलापूर्ण कलाकृती कल्पनातील प्रमाणात निर्माण होतील. विलक्षण शास्त्रीय सुधारणा होतील, आणि यापेक्षा अधिक म्हणजे संपूर्णतया नव्या प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय संस्था उदयाला येतील.

उत्पाग्राहकाच्या उदयाचा गर्भितार्थ हा आहे.

अर्थकारणात होणारे खोलवरचे बदल त्याच लाटेनिशी एकमेकांशी संबंधित असलेले असे अनेक उर्जाविषयक, तंत्रविषयक, माहितीविषयक, कुटुंबविषयक, व्यवसायविषयक बदल घडवून आणणार आहेत. ऐतिहासिक महत्त्वाची उलथापालथ होणार आहे. कारण जागतिक पातळीवर उद्यमवास्तवात क्रांती होणार आहे.

अनुक्रमणिका

# अठरा । मनाचा भोवरा

यापूर्वी कधीही इतक्या देशांमधले इतके लोक बौद्धिक दृष्ट्या हताश, जणू बुडत चाललेल्या स्थितीत, नव्हते. कारण ते आता कल्पनांच्या झगड्यांच्या, गोंधळांच्या आणि विसंवादी कल्पनांच्या प्रचंड भोवऱ्यात सापडलेले आहेत. आपल्या मानस विश्वावर परस्परविरोधी दृष्टिकोणांचा अक्षरशः मारा होतो आहे.

दररोज काहीतरी नवीन टूम निघते आहे, नवीन शोध लागत आहे. धार्मिक चळवळ सुरू होते आहे, नवीन घडामोड होते आहे, किंवा कशाची तरी नवीन अभिव्यक्ती होते आहे. जाणिवांच्या पटलावर गूढवादी किंवा शास्त्रीय प्रवाह, उपप्रवाह वेगाने वहात आहेत, त्या प्रत्येकाला त्याच्या शास्त्रीय किंवा मानसिक गुरूचा, त्याच्या पुण्याईचा पाठिंबा लाभलेला आहे. कशाचा ना कशाचा, किंवा कशाचाही म्हणा, सतत शोध घेतला जातो आहे, इतकी एकूण अस्वस्थता निर्माण झालेली आहे.

या एकूण गोंधळापैकी बराचसा गोंधळ वेगाने येत असलेल्या तिसऱ्या लाटेने तीव्र करत आणलेल्या सांस्कृतिक झगड्यातून निर्माण झालेला आहे. औद्योगिक युगातल्या प्रमुख कल्पनांची अवनती होते आहे, वजावट होते आहे, अपकीर्ती होते आहे. एका तात्विक क्रांतीद्वारा त्यांची तीनशे वर्षापूर्वीची कारकीर्द उलथून टाकण्याच्या दिशेने सुरूवातीची पावले पडू लागलेली आहेत.

शास्त्र, शिक्षण, धर्म व इतर हजारो क्षेत्रात विचारवंत सुधारकांनी शेतीप्रधान संस्कृतीच्या कैवाऱ्यांशी, प्रतिगाम्यांशी लढा देत औद्योगिक संस्कृती पुढे आणली, आता त्यांच्यावरच बचावाची वेळ आणली आहे!

## निसर्गाची नवी प्रतिमा

कल्पनाविश्वात उठलेल्या वादळाचे उत्तम उदाहरण म्हणजे निसर्गाची बदलती प्रतिमा. पृथ्वीची प्रकृती धोक्यात येत चालली आहे हे पाहून गेल्या दशकापासून परिसरवाद्यांची चळवळ जगभर सुरू झालेली आहे. या चळवळीने प्रदूषण, अन्न टिकविण्यासाठी वापरण्यात येणारी रसायने, अणुभट्ट्या, महामार्ग, एरोसोल्सची दाढी, केस रंगविण्याची साधने इत्यादींना विरोध करून त्या प्रवृत्तींवर आघात करण्यापेक्षाही अधिक काही केले.

आता आपल्या निसर्गावलंबित्वाबद्दल पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. या विचारातील मूलभूत बदलामुळे निसर्गाची कत्तल करण्यात दंग रहाण्याऐवजी आपण एका ताज्या दृष्टीकोनातून पृथ्वीशी, निसर्गाशी सुसंवाद राखीत त्याच्या सर्वतोपरी बचावाला सिद्ध झालो आहोत. आपण विरोधाची भूमिका सोडून सहयोगाच्या भूमिकेकडे आलो आहोत.

निसर्गात असलेल्या पुनरावृत्त चक्रांचा, पुनर्नवता क्षमतेचा, आणि धारणा क्षमतेचा शास्त्रीय अभ्यास करून त्याचा आपण आपल्या स्वतःच्या जीवनासाठीही आणि समाजाच्या पुनर्आखणीसाठीही उपयोग करून घेऊ लागलो आहोत. या गोष्टीचे प्रतिबिंब आपल्या निसर्गाबाबतच्या दृष्टीकोणात पडलेले आढळून येते. आपल्या बहुतेक कृतीतून आणि कलांतून निसर्गाविषयी आपणाला पुनः वाटू लागलेला आदरच प्रकट होतो.

अनुक्रमणिका

लाखो शहरवासीयांना ग्रामीण परिसराची ओढ वाटू लागलेली आहे. ग्रामीण परिसरातील वस्तीत होत असलेली वाढ लक्षणीय आहे. नैसर्गिक अन्न, नैसर्गिक प्रसूति, स्तनपान, जैविक लय, शरीराची काळजी या गोष्टींचे महत्व समजून येऊन त्याच्या महत्त्वाचे मनापासून समर्थनही होऊ लागलेले आहे. निसर्गाचे संरक्षण झालेच पाहिजे, त्याच्यावर अत्याचार होऊ नयेत यासाठी प्रचार चालू झालेला आहे. तंत्रज्ञानाचे निसर्गावर होणारे विपरीत परिणाम टाळायला हवेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष होता कामा नये असा विचार बळ धरू लागला आहे.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीत कोणी कल्पनाही केली नसेल इतकी निसर्गसंपत्तीची नासधूस झालेली आहे. पृथ्वी दुबळी होत चालली आहे. दिवसेदिवस विकास पावणाऱ्या आणि गुंतागुंतीच्या होत जाणाऱ्या विश्वाच्या पसाऱ्यात तिचा ठिपका लहान होत होत नाहीसा होईल की काय अशी भीति निर्माण झालेली आहे.

सुमारे २५ वर्षापूर्वी तिसरी लाट सुरू झाल्यापासून शास्त्रज्ञांनी, नव्या उपकरणांचा संपूर्ण संच, निसर्गाच्या दूरदूरच्या आवाक्याची कल्पना येण्यासाठी, तयार केलेला आहे. लेसर रॉकेट प्लाझ्मा, छायाचित्रणाच्या क्षेत्रात लावलेले विलक्षण शोध, कॉम्प्युटर्स, किरणयुक्त साधणे या सर्वांनी आजवरच्या आपल्या समजुतींचा भोळा आवाका कमकुवत ठरवला आहे.

आपण मोठ्यात मोठ्या आणि छोट्यात छोट्या घटनांकडे आता पाहू शकतो. आणि त्या पहाण्यातील गतीही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. दुसऱ्या लाटेच्या मानाने आपली कुवत फार वाढली आहे. शोध घेण्यासाठी खुणावणाऱ्या विश्वाचा पसारा कमीत कमी १००, ०००, ०००, ०००, ०००, ०००, ०००, ००० इतक्या मैलांइतका आहे, त्याच्यातील १।१, ०००, ०००, ०००, ०००, ००० व्या सेंटिमीटर क्षेत्रातील घडामोडींची आपण अचूक नोंद घेऊ शकतो. आपण सेकंदाच्या १ । १०, ०००, ०००, ०००, ०००, ०००, ०००, ००० व्या भागात घडणाऱ्या घटनेचा अभ्यास करू शकतो; या तुलनेत पहा— आपले खगोलशास्त्री आपल्याला सांगतात, की विश्वाचे वय सुमारे २०, ०००, ०००, ००० वर्षांचे आहे!

आणि गरगरायला लावणाऱ्या या विस्तारात, आपल्याला सांगण्यात येते की, जीवसृष्टी अस्तित्वात असलेले पृथ्वी हे एकच ठिकाण नाही. दूरच्या ताऱ्यांजवळ असणारे ग्रह, उपग्रह, त्यांच्या उष्णतेबाबतचा अंदाज, त्यांच्यातील ओलाव्याचा अंदाज असे अनेक अभ्यास करून सांगण्यात येते, की इतरत्र ही जीवसृष्टी असण्याचा संभव आहे.

आणि या कल्पनेद्वारा, दुसरीकडेही जीवसृष्टी असण्याच्या शक्यतेद्वारा, आपले निसर्गविषयक आकलन आणखीनच बदलते. इ. स. १९६० पासून शास्त्रज्ञ दूरदूरच्या अज्ञानातून आपल्याला काही संदेश मिळतील अशी अपेक्षा बाळगून बसले आहेत. आता या यानांच्या रूपाने आपले आधुनिक यंत्रांनी आणि साधनांनी नटलेले दूत दूर अज्ञाताचा वेध घेण्यासाठी वेगाने झेपावू लागलेले आहेत.

तिसऱ्या लाटेच्या उदयानिशी आपला स्वतःचाच ग्रह आपल्याला खूप लहान व क्षुद्र वाटू लागला आहे. विश्वाच्या पसाऱ्यात आपले स्थान काही फारसे आदरणीय नाही याची जाणीव होते आहे, आणि आपण एकटे नसून आणखी कोणी तरी, कुठे तरी अस्तित्वात आहे ही कल्पना काळजाचा ठोकाच चुकवते.

अनुक्रमणिका

निसर्गाबद्दल झालेली आपली कल्पना पूर्वीसारखी राहिलेली नाही.

उत्क्रान्तीची योजना

उत्क्रांतीबद्दलच्या तर कल्पनेतच काय, खुद्द उत्क्रांतीतही बदल घडू लागला आहे!

जीवशास्त्रज्ञ, पुरातत्त्वज्ञ, मानववंशतज्ज्ञ उत्क्रांतीबाबतची रहस्ये शोधून काढण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचेवेळी त्यांना असे आढळून येते आहे, की पूर्वी आपण कल्पना केलेल्या जगापेक्षा हे जग कितीतरी मोठे आणि गुंतागुंतीचे आहे. एके काळी जे नियम वैश्विकता व त्रिकालाबाधितता पावले होते, ते म्हणजे काही विशिष्ट बाबीबद्दलचे, घटनांबद्दलचे निष्कर्ष होते. त्यांचा आवाका फारच छोटा होता.

"डार्विनने उत्क्रांतीचा सिद्धान्त मांडल्यानंतर जीवशास्त्रज्ञांनी उत्क्रांतीच्या यांत्रिकतेचा एक आराखडाच तयार केला. आणि त्याच्या आधारे त्यांनी सर्वच उत्क्रांतीचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला— वैश्विक, रासायनिक, सांस्कृतिक, सामजिक कल्पनांच्या उत्पत्तिशास्त्रविषयक सर्वांची एकच यांत्रिकतेने उत्क्रांती झाली अशी त्यांनी कल्पना करून घेतली. परंतु या सर्व ज्ञानाचा शेवट होईल असे, प्रत्येक पातळीवर, नियम बदलत गेले." असे प्रसिद्ध अनुवंशिकता शास्त्रज्ञ नोबेल पारितोषिक विजेता, फ्रँकोइस जेकब यांनी म्हटले आहे.

पूर्वापार मानण्यात आलेली अनेक गृहीतके हादरून गेली आहेत. उत्क्रांती ही सुरळित प्रक्रिया न रहाता अचानक घडून येणाऱ्या घटनांतून उत्पन्न होणारी असल्यामुळेच इतिहासात घडलेल्या 'खंडा'ची आणि 'झेपां'ची उपपत्ती लावता येणे शक्य होते; असे शास्त्रज्ञ म्हणतात. अचानक घडणाऱ्या रचनात्मक बदलांचा काही जण अभ्यास करतात.

या ज्ञानशाखेतील अनेक परस्परविरोधी घटना खुज्या ठराव्यात अशी गोष्ट इ. स. १९५३ मध्ये घडली. या आश्चर्यकारक घटनेने जणू या शाखेतील ज्ञानाला ऐतिहासिक वळण दिले. इंग्लंडमधील केंब्रिज येथील एका शास्त्रज्ञाने, फ्रॅन्सिस क्रिक याने, दावा केला की, आम्हाला जीवनाचे रहस्य सापडले आहे. DNA ची रचना क्रिक व त्या शास्त्रज्ञ मिग जॉन वॅटसन याने स्पष्ट केली.

यानंतर होत गेलेल्या अभ्यासातून आणि संशोधनातून इतकी प्रगती झाली की, आज जगातील प्रयोगशाळांतून काम करणाऱ्या अनुवांशिकता शास्त्रज्ञांनी, आपण उत्क्रांतीवादाचा शेवट केला आहे असा दावा केला. कारण संपूर्णतया नवे जैविक आकार ते आता तयार करू शकतात. त्यांनी पेशींतील अनुवंशिकता बदलण्यात यश मिळविले आहे. तिसऱ्या लाटेतील विचारवंतांनी ह्या गोष्टीला तोंड दिले पाहिजे की आपण उत्क्रांतीची योजना करू शकतो. आराखडा तयार करून त्यानुसार कार्यवाही करू शकतो. उत्क्रांती आता कधीच पूर्वीसारखी असणार नाही. उत्क्रांती या प्रक्रियेचेही पुनर्कल्पनाविष्करण झाले आहे.

प्रगती

अनुक्रमणिका

प्रगती विषयीच्या आपल्या कल्पनांचेही पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आलेली आहे. दुसऱ्या लाटेच्या युगात लागणारा प्रत्येक शास्त्रीय शोध व सुधारित उत्पादन हे मानवाच्या पूर्णतेकडे पडणारे प्रगतीचे आणखी एक पाऊल समजले जात होते.

परंतु नंतर हे चित्र पालटले, आशावादाची जागा निराशेने आणि हताशपणाने घेतली.

चित्रपट, नाटके, कादंबऱ्या, कला यांच्यातून हा निराशावाद प्रकट होऊ लागला. तंत्रज्ञानाचे चित्रण प्रगतीचे इंजिन असे होण्याऐवजी मानवाचे स्वातंत्र्य आणि त्याची परिस्थिती, परिसर नष्ट करून टाकणारी एक विध्वंसक शक्ती म्हणून होऊ लागले. परिसरवाद्यांच्या दृष्टीने 'प्रगती' ही एक शिवीच होऊन बसली.

प्रगतीच्या सरळसोट मार्गाची अपरिहार्यता, जी उद्यमवास्तवाचा एक आधार स्तंभ होती, तिचे फार थोडे कैवारी, औद्योगिक युगाचा शेवट येऊन ठेपल्यावर, उरले.

आता जगभर असे मानले जाऊ लागले आहे, की आता प्रगती केवळ तंत्रज्ञान किंवा ऐहिक जीवनमानाच्या स्तरानुसार गणली जाणार नाही; तर जो समाज नैतिक दृष्ट्या, सौंदर्याभिरुची दृष्ट्या, राजकीय दृष्ट्या किंवा परिस्थिती दृष्ट्या जर खालावलेला असेल तर त्याला केव्हाही सुधारलेला म्हणता येणार नाही; मग तो कितीही श्रीमतं असो, किंवा आधुनिक बनलेला असो. प्रगतीच्या बाबतची कल्पना आता अधिक बहुव्याप्त झालेली आहे. समाज अनेक मार्गांनी बहुव्याप्त विकास करून घ्यायला समर्थ झालेला असला पाहिजे.

गेल्या काही दशकांकडे पाहिल्यावर आपल्याला असे आढळून येईल की निसर्ग, उत्क्रांती व प्रगतीबाबतच्या कल्पनांचा आपल्याला पुनः विचार करणे भाग पडले. या कल्पना काळ, स्थळ, भौतिक वस्तु, कार्यकारणभाव याबाबतच्या गृहीतकांवर आधारलेल्या होत्या. तिसरी लाट ही पूर्वीची गृहीतके विरघळून टाकत आहे. दुसऱ्या लाटेने धारण केलेली बौद्धिक झळाळीच नाहीशी करून टाकत आहे.

भवितव्य काळाचे

नव्याने उदय पावत असलेली प्रत्येक संस्कृती दैनंदिन जीवनात लोकांनी काळाची हाताळणी करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणतेच, शिवाय काळाबद्दलच्या मानसिक नकाशातही बदल घडवून आणते. तिसरी लाट देखील असे कालनिर्देशक नकाशे पुनः एकवार नव्याने तयार करत आहे.

दुसऱ्या लाटेच्या अगोदर काळाची कल्पना चक्राकार होती. नंतर, विशेषतः न्यूटन नंतरच्या काळात काळ एका सरळ रेषेत गती घेणारा ठरला. आणि जगाच्या सर्व भागात आणि सर्व काळात तो एकसारखाच असून त्याचा प्रत्येक तुकडा मागील पुढील भागासारखाच हुबेहूब असणार याची खात्री वाटत होती.

शतकबदलाच्या सुमाराला ऑइन्स्टाइन याने कालसापेक्षतेचा सिद्धांत मांडला. 'पूर्वी' आणि 'नंतर' या गोष्टीला प्रत्येकाच्या दृष्टीतून वेगळा अर्थ आहे.

अनुक्रमणिका

आजचे पदार्थविज्ञान बाहेरून विकसित होणारे असेच आतूनही विकसित होणारे आहे, समावेशकही आहे. सिद्धान्ताला प्रतिसिद्धान्त हजर असतो. एक उदाहरण देण्यासारखे आहे : कृष्ण विवराबाबत आता पुष्कळांना माहिती झालेली आहे. ते आपल्या आतील केंद्राकडे, आपल्या आवाक्यात येणारी–प्रकाशासह–प्रत्येक वस्तु खेचून घेत असते.... रॉजर पेनरोज नावाच्या पदार्थविज्ञानाच्या प्रसिद्ध अभ्यासकाने आता श्वेत विवराची कल्पना मांडलेली आहे.... कृष्ण विवरातील एक क्षण म्हणजे पृथ्वीवरची लाखो वर्षे असू शकेल!

ज्यावेळी विश्वाच्या अनंतत्वाकडून आपण सूक्ष्माकडे जातो, तेव्हाही कोड्यात टाकणाऱ्या घटना घडत असल्याचे आपल्याला आढळून येते. कोलंबिया विद्यापीठातील डॉ. जेराल्ड फेनबर्ग यांनी टॅच्यॉन्स (Tachyons) नावाचे कण भारित केलेले आहेत. ह्या कणांची गती प्रकाशापेक्षाही अधिक आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते त्यांच्यासाठी काळाची गती उलट होते!

एक पदार्थशास्त्रज्ञ एफ्. काप्रा म्हणतो, की 'विश्वाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या गतीने कालक्रमणा होत असते.' आपण काळाबद्दल एकवचन वापरणे योग्य होणार नाही. काळ अनेकविध असल्याने त्यांचा निर्देशही अनेकवचनी व्हावयास हवा.

काळाच्या सामाजिक वापरातही आता मूलभूत स्वरूपाची पुनर्रचना होते आहे हे आपण पाहिले आहेच. उदा. फ्लेक्स् टाइम कल्पनेचे आगमन इ.

काळाबद्दल सैद्धान्तिक शोध लागत आहेत. त्यांचा व्यवहारात काय उपयोग? अणु विस्फोटाबाबतचा सिद्धान्त देखील एकेकाळी अव्यवहार्य वाटत होता!

काळाबाबतच्या कल्पनेतील या बदलांमुळे आपल्या स्थळविषयक कल्पनांना भगदाडे पडू लागली आहेत. कारण या दोन्ही गोष्टींचा एकमेकींशी अनेकविध संबंध आहे. परंतु काळापेक्षाही स्थळाबाबतच्या कल्पनांतील बदल लवकर घडत जाणारा असा आहे.

आपण रहातो त्या, काम करतो त्या, खेळतो त्या जागा आपण बदलतो आहोत. आपण कामाच्या जागी कसे, किती दूर, किती वेळा जातो या गोष्टीचा आपल्या स्थळविषयक अनुभवांवर परिणाम होतो. हे सर्व बदलले जात आहेत. तिसऱ्या लाटेने स्थळ कल्पनेशी असलेल्या मानवाच्या संबंधात बदल घडवून नवीन टप्पाच सुरु केला आहे.

तिसऱ्या लाटेने दुसऱ्या लाटेच्या युगात एकत्र गठ्ठा बनलेली लोकसंख्या विखरून टाकीत आपला अनुभव बदललेला आहे. जगाच्या ज्या भागात अजून औद्योगिकरण चालू आहे, तिथे लाखो लोक आजही एकवटत आहेत. परंतु तंत्रज्ञानात अतिशय पुढच्या टप्प्याची प्रगती करणाऱ्या देशात परिस्थिती याच्या उलट आहे. टोकिओ, लंडन, झुरिच, ग्लासगो आणि अशाच काही प्रचंड शहरातील लोकसंख्या हळूहळू कमी होते आहे. आणि या उलट मध्यम आकारांच्या शहरांची सख्या वाढत चालली आहे.

अमेरिकन कौन्सिल ऑफ् लाइफ इन्शुअरन्सच्या मते 'अमेरिकेतील मोठे शहर ही आता भूतकालीन गोष्ट झाली आहे.'

अनुक्रमणिका

हे विखुरणे आणि लोखसंख्येचे विकेंद्रीकरण यांच्या योगाने आपल्या जगाविषयीच्या गृहित कल्पना आणि अपेक्षा बदलत जाणार आहेत. वैयक्तिक वापराच्या व मालकीच्या या कल्पना, स्वीकृत अंतरे, घरांची दाटी, आणि इतर बाबतीत, बदलून जाणार आहेत.

अशा बदलाप्रमाणेच तिसऱ्या लाटेने असा विवक्षित दृष्टिकोण निर्माण केला आहे, की ज्याद्वारे माणूस आपल्या स्वतःचा, आपल्या जमातीचा, आपल्या शेजारपाजारचा, म्हणजेच स्थानिक विचार करत राहील. आणि तोच माणूस त्याचवेळी वैश्विक विचार करील. पृथ्वीवर आपल्यापासून हजारो मैलांवर घडत असणाऱ्या घटनांबाबत व निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत त्याला विचार पडेल, काळजीही वाटेल.

दळणवळण अतिशय मोठ्या प्रमाणात, प्रगत अवस्थेत उपलब्ध आहे. आपण आता परत आपल्या घरीच, इलेक्ट्रॉनिक कॉटेजमध्ये, काम करण्यास सुरुवात करत आहोत. अशावेळी आपण अशा दुहेरी विचारकेंद्राना प्रोत्साहन द्यायला हवे. लोक घराच्या व कुटुंबाच्या निकट राहतील आणि त्याच वेळी त्यांची मने दूरदूरच्या ग्रहांवर व त्यांच्याहून दूर अनंत विश्वात भ्रमण करून येऊ शकतील. तिसऱ्या लाटेत अशाप्रकारे जवळपणा आणि दूरपणा एकवटलेला असेल.

आपल्या स्थलविषयक कल्पना अधिक स्पष्ट करणाऱ्या अधिक प्रभावी आणि सापेक्ष अशा प्रतिमा देऊ शकणारे प्रगत विज्ञान आज आपल्या सोबत आहे.

माझ्या ऑफिसमध्ये न्यूयॉर्क आणि त्याचा परिसर चित्रित करणारी खूप मोठी छायाचित्रे लावलेली आहेत. उपग्रह आणि यु–२ यांनी घेतलेली ही छायाचित्रे इतकी सुस्पष्ट आहेत, की त्यात मेट्रोपोलिटन म्युझिअम आणि ला गार्डिया विमानतळावर उभे केलेले एकूण एक विमाने देखील अगदी स्पष्ट दिसतात. या विमानांच्या स्पष्ट दिसण्याचा उल्लेख करून मी नासाच्या एका अधिकाऱ्याला विचारले, 'फोटो आणखी मोठे केले तर या विमानांच्या पंखांवर रंगविलेले पट्टे आणि चिन्हे दिसताल का?' तो अधिकारी या प्रश्नाशी देखील खूप सहनशीलतेने वागून, किंचित हसून माझ्या बोलण्यात दुरुस्ती करत म्हणाला, "रिबीट देखील."

आपण काही केवळ स्थिरचित्रणाबाबतच्या प्रभुत्वावरच थांबणार नाही, तर यापुढे कदाचित् चलत् नकाशेही तयार होण्याला वेळ लागणार नाही. दशकाभरातच आपल्याला सजीव नकाशे–एखाद्या शहराचे किंवा देशाचे पहायला मिळतील, ज्याद्वारे तेथे होत असलेल्या घडामोडी आपल्याला सजीवपणे पहायला मिळतील! एखाद्या दशकाचाच अवकाश! असे घडल्यावर नकाशे हे स्थिरचित्र असणार नाही, तर चलच्चित्र असेल. त्यामुळे पृथ्वीचा पृष्ठभाग, आपल्याला तेथे चाललेल्या घडामोडींसह, स्थरशःही दिसेल. एखाद्या पातळीच्या खालील उंचीवर किंवा वरील उंचीवर काय चालले आहे हेही समजू शकेल इतकी प्रगती तंत्र करेल.

दुसऱ्या लाटेच्या युगात सर्वत्र प्रचलित असलेल्या परंपरागत मर्केटर नकाशाविरुद्ध नकाशा निर्मात्यांनी आवाज उठवलेला आहे. मर्केटरच्या पद्धतीतील अनेक त्रुटी त्यांनी दाखवल्या आहेत आणि आपल्या प्रतिपाद्य पद्धतीत त्या त्रुटी रहाणार नाहीत याची देखील काळजी घेतलेली आहे. पूर्वीच्या नकाशात स्कॅंडिनेव्हिया हिंदुस्थानापेक्षाही मोठा दिसतो. वास्तविक हिंदुस्थानच स्कॅंडिनेव्हियापेक्षा तिप्पट मोठा आहे! आता अशा चुका होणार नाहीत याची कसून काळजी घेतली जाते आहे.

अनुक्रमणिका

आर्नो पीटर्स याचा नकाशा दिसायला विचित्र असतो, कारण तो नेहमीच्या पठडीतला नाही. त्यातील युरोप आक्रसलेला वाटतो, तर अलास्का पसरलेला व चपटा वाटतो, कॅनडा व रशिया यांचीही तीच गत. द. अमेरिका, आफ्रिका, अरेबिया व भारत लांबलचक दिसतात! तरी त्याच्यातील काही अचूकपणामुळे त्याच्या साठ हजाराहून अधिक प्रतीचे ‘अविकसित’ अनौद्योगिक देशांत वितरणही झाले आहे.

ह्या विरोधाभासातून हेच स्पष्ट होते, की कुठलाही एक नकाशा ‘बरोबर’ नाही. स्थलविषयक भिन्न प्रतिमा भिन्न उपयोगितेच्या आहेत. शब्दशःच, असे म्हणजे खरे ठरेल, की तिसऱ्या लाटेने जगाकडे पहाण्याचा एक नवाच दृष्टिकोण दिलेला आहे.

## पूर्णत्व आणि अर्धवटपणा

दुसऱ्या लाटेने कोणत्याही बाबीचा स्वतंत्रपणे विचार करण्यावर भर दिला होता, तर तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीत संदर्भ, संबंध आणि पूर्णत्वाच्या विचारावर भर दिला जातो.

इ. स. १९५० नंतर अभ्यासाला व संशोधनाला वेगळीत चालना मिळाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ‘संशोधन मोहिमा’ हातात घेतल्या गेल्या. परंतु त्याच्यापुढे नंतर फार प्रगती झाली. स्वयंचलिताच्या क्रांतीला सुरूवात झाली आणि तिसऱ्या लाटेतील कारखाने व कचेऱ्या यांच्यातील कामासाठी एका नवीनच मूलभूतप्रणालीचा, तत्राच्या नव्याच प्रकाराचा जन्म झाला. विचाराची नवी पद्धत सुरू झाली. या पद्धतीला ‘सिंस्टीम्स् ॲप्रोच’ म्हणण्यात येते. या पद्धतीचा भर समस्येकडे पहाताना तिच्यातील छोट्या छोट्या विभागाला महत्त्व देण्याऐवजी संपूर्ण, सर्वांगीण अवलोकनाला महत्त्व देण्यावर असतो. घटकांचे एकमेकांतील संबंध, त्यांच्यातून निर्माण झालेल्या संपूर्णाशी असलेले त्यांचे संबंध, फीडबॅक संबंध, यांचा अभ्यास या पद्धतीत केला जातो. तिची भाषा आणि तिच्यातील विचार समाजशास्त्री व मानसशास्त्री, तत्त्वज्ञ आणि परराष्ट्र व्यवहार विश्लेषक, तार्किक व भाषातज्ज्ञ, स्थापत्य विशारद आणि प्रशासक यांच्याद्वारे वापरण्यात व योजण्यात येतात.

सिस्टिम थिअरीवादी आणि इतरही प्रणालींच्या पुरस्कर्त्यांनी समस्यांकड पहाण्याच्या अधिक एकात्मिक पद्धतीबाबतची आच प्रकट केली आहे. अव्यापक दृष्टीकोण दाखवणाऱ्या अतिविशिष्टीकरणाविरूद्धच्या उठावाला परिसरवाद्यांकडून मोठा पाठिंबा मिळाला. त्यांची भूमिका एकाच छोट्या बाबीची सोडवणूक करण्याची नसते, तर संपूर्णातील तोल राखण्याची असते. मानव आणि निसर्ग यांच्यातील विचार करणाऱ्यांचा आणि सिस्टीमवाद्यांचा प्रश्नाकडे पहाण्याचा दृष्टीकोण सारखाच आहे. ज्ञानाचे संमीलन आणि एकात्मता.

बोद्धिक जीवनातील हे बदल संस्कृतीच्या इतर अंगातही प्रतिबिंबीत झालेले आहेत. पूर्वी, पूर्वेकडील धर्मांबद्दल फार थोड्या प्रमाणात आस्था दाखवली जात होता. आता, दुसऱ्या लाटेचा भर ओसरू लागल्यावर पाश्चिमात्य तरुण लोक हिंदू स्वामींचे भक्त बनलेले आढळतात. एका सोळा वर्षाच्या गुरूचे प्रवचन ऐकायला, रागदारी ऐकायला, हिंदू पद्धतीच्या शाकाहारी रेस्टॉरंटचे उद्घाटन करायला आणि फिफ्थ ॲव्हेन्यूवरून नाचत, गात जायला त्यांची एकच गर्दी उसळलेली दिसते. ते गातात. त्यांच्याबरोबर जगही गाते. पूर्णत्वाचे पोवाडे. एकत्वाने गान.

मानसारोग्याच्या प्रांतात मानसोपचारतज्ज्ञांनी ‘संपूर्ण मानवा’ला बरे करण्याचे मार्ग शोधून काढले. गेस्टाल्ट उपचार पद्धतीचा अवलंब त्यासाठी केला. लवकरच या पद्धतीचा अवलंब सर्वत्र करण्यात येऊ लागला. या पद्धतीनुसार व्यक्तीच्या जाणीवेतील जागरूकता, आकलन व बाह्य जगताशी असलेल्या संबंधाबाबतच्या मानवी कार्यशक्तीची वृद्धी, एकात्मितेच्या प्रक्रियेचा अवलंब करून केली जाते.

औषधांच्या प्रांतात ‘होलिस्टिक हेल्थ’ नावाची चळवळ सुरू झालेली आहे. ती या कल्पनेवर आधारलेली आहे, की माणसाचे स्वास्थ्य शारीर, आत्मिक आणि मानसिक मेळावर अवलंबून असते.

‘सायन्स’ने म्हटले आहे, की “काही वर्षांपूर्वी एखाद्या लोकशाही सरकारने श्रद्धा उपचार, इरिडॉलॉजी, ॲक्युप्रेशर, बुद्धमार्गीय ध्यान आणि इलेक्ट्रो मेडिसिन अशा विषयांनी युक्त अशा आरोग्य परिषदांना आश्रय देणे ही गोष्ट अकल्पनीयच होती.’ परंतु अशा पर्यायी उपचारपद्धतीबद्दल अतिशय मोठ्या प्रमाणात उत्सुकता आणि आस्था निर्माण झाली आहे. आणि या सगळ्यांचे नामकरण होलिस्टिक हेल्थ असे करण्यात आले आहे.

या प्रकारची प्रत्येक चळवळ, चूस आणि सांस्कृतिक धारा वेगवेगळी, स्वतंत्र अशी आहे. परंतु तिच्या मागचे तत्त्व एकच असल्याचे स्पष्ट दिसून येते. सुट्या भागांचा अभ्यास केल्याने मूळ संपूर्ण समजते, या गृहीतकावरचा हल्ला त्यातून प्रतीत होतो.

भागाशः किंवा विश्लेषणात्मक विचारावरचा हल्ला इतका तीव्र झालेला आहे, की अखंड वस्तूच्या विचारांच्या फार मागे लागल्यामुळे तिच्यात काही भाग असतात याचाही विसर पडत चालला आहे. त्यामुळे अखंडत्वाचा, संपूर्णत्वाचा विचारहीं खंडशः होऊन त्याला अर्धवटपणाची झाक प्राप्त झालेली आहे!

पंरतु अधिक विचारवंत असलेले लोक दुसऱ्या विश्लेषणात्मक कौशल्याचा, संश्लेषणात्मक अभ्यासाला महत्त्व देत त्याच्याशी, तोल साधू पहात आहेत.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या बौद्धिक परिसरावरचा हा हल्ला कार्यकरणभावा बाबतचा एका नव्या दृष्टिकोणाला जन्म देत आहे.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीने आपल्याला घटना का घडतात हे आपल्याला समजू शकते असा एक सुखद विश्वास दिला होता. तिने आपल्याला असे सांगितले होते, की प्रत्येक घटनेला विशिष्ट, सुनिश्चित असे स्थलकालनिबद्ध ठिकाण ठरलेले असते. तिने आपल्याला असे सांगितले की ठराविक गोष्टींचे नेहमी ठराविकच परिणाम होतात. तिने आपल्याला असे सांगितले, की विश्वास सर्वत्र कार्यकारणभाव, कारण व परिणाम यांच्या विशिष्ट संयोगाची दाटी झालेली आहे.

कार्यकारणभावाबद्दलचा हा का काहीसा यांत्रिक दृष्टिकोण अत्यंत उपयुक्त ठरला व अजूनही ठरत आहे. त्याची आपल्याला रोग निवारणात, गगनचुंबी इमारती उभारण्यात, विलक्षण कल्पक यंत्रांचे आराखडे करताना, मोठ्या रचनांची जुळणी करताना मदत होते. परंतु साधे यांत्रिक स्पष्टीकरण करण्यात तो जरी समर्थ असला, तरी वाढ, क्षय, अचानक होणारी कोलमड, यापासून ते गुंतागुंतीच्या नव्या पातळ्या,

अनुक्रमणिका

अचानक फुसके ठरणारे मोठे बदल, किंवा आधी क्षुद्र भासणाऱ्या परंतु एकदम मोठ्या, स्फोटक शक्तीत रूपांतर पावणाऱ्या घटना अशा गोष्टींचे समाधानकारक स्पष्टीकरण करण्याची त्यांची कुवत नाही.

आज वैश्विक क्रीडांगणाच्या एका कोपऱ्यात न्यूटनचे कोष्टक सोडवले जात आहे. यांत्रिक कार्यकारणभाव व ह्या गोष्टीकडे काही घटनांचे स्पष्टीकरण म्हणून पहाण्यात येते. परंतु एकूण एक घटनांना ती लागू पडू शकत नाही. निसर्ग, उत्क्रांती, प्रगती, काळ, स्थळ आणि भौतिक यांच्याबद्दलच्या आपल्या बदलत्या दृष्टिकोणांमुळे कार्यकारणभाव व अचानकता यांच्याबद्दल नवा दृष्टीकोण जुळवण्याची धडपड जगभरचे शास्त्रज्ञ व विचारवंत करत आहेत.

अनेक शास्त्रज्ञ यांत्रिकपणे न घडणाऱ्या जगणे, मरणे, वाढणे, उत्क्रान्त, क्रांत होणे अशा गोष्टींच्या कार्यकारणभावाच्या स्पष्टीकरणार्थ नव्या मार्गदर्शक तत्त्वांचा पुरवठा करीत आहेत. बेल्जिअन, नोबेल पुरस्कार प्राप्त, इलया प्रिगोजाइन यांनी क्रम व गाधळ, यदृच्छा व आवश्यकता अशा गोष्टींचे धक्कादायक संश्लेषण पुढे करून त्यांचा कार्यकारणभावाशी असणारा संबंध सांगितला आहे.

काही प्रमाणात, तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीतील कार्यकारणभाव सिस्टिम थिअरीच्या कल्पनेवर आधारलेला आहे. फीडबॅकची कल्पना याचे उत्तम उदाहरण म्हणजे घरात बसवलेला थर्मोस्टॅट– याच्याद्वारे घरातील, खोलीतील तपमानाची पातळी एक सारखी राखली जाते. थर्मोस्टॅटने भट्टी सुरू केली की तपमान वाढू लागते. खोली पुरेशी उबदार झाली की ते भट्टी बंद करते. आणि ज्यावेळी तपमान खाली येते त्यावेळी हा बदल त्याला समजतो आणि ते भट्टी पुनः सुरू करते! इथे फीडबॅक पद्धत वापरलेली आहे. तिच्यामुळे समतोल राखला जातो. बदलावर मात केली जाते. कारण इच्छित ठराविक पातळीला तेव्हा धोका निर्माण झालेला असतो. नकारात्मक फीडबॅक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पद्धतीचे काम स्थैर्य राखण्यापुरते मर्यादित असते. इ. स. १९४० या दशकाच्या अखेरीस व इ. स. १९५० च्या सुरूवातीच्या भागात या तत्त्वाची निश्चित कल्पना केली गेली आणि त्याची कसून तपासणी केली गेली. हे काम करणाऱ्या माहिती सैद्धान्तिकांनी व रचनाविचारवंतांनी–सिस्टिम थिंकर्स–या तत्त्वाच्या उदाहरणांचा व साम्यस्थळांचा शोध घेतला, तेव्हा त्यांना प्रत्येक क्षेत्रात भौतिक, शारीर, राजकीय इ. स्थैर्यकारी प्रणाली आढळून आल्या. ही निगेटिव्ह फीडबॅक पद्धत आपल्या भोवती सर्वत्रच चालू आहे.

इ. स. १९६० नंतर प्रो. मारुयाना यांनी असा विचार मांडला, की स्थैर्याचाच जास्त विचार करणे किंवा त्याच्यावर लक्ष केंद्रित करणे ही गोष्ट बदलासाठी पुरेशी नाही. त्यांनी म्हटले, की पॉसिटिव्ह फीडबॅकवर संशोधन होण्याची आता गरज आहे. या विधायक पद्धतीने होत असलेला बदल दबण्याऐवजी वाढवला जाईल. स्थैर्य टिकवून धरण्याऐवजी त्याला आव्हान दिले जाईल, ते चिरडून टाकले जाईल. या विधायकत्वामुळे किंचित मार्गच्युती होऊन ती एकूण रचनेत खूप मोठा आकार धारण करू शकेल.

फीडबॅकच्या पहिल्या पद्धतीत बदल कमी केला जात होता, तर दुसऱ्या पद्धतीत तो मोठा केला जातो. त्यामुळे या दोन्ही पद्धतींचा काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. पूर्वी ज्या कोड्यात टाकणाऱ्या प्रक्रिया होत्या व ज्यांच्यातील कार्यकारणभाव आकलत नव्हते, त्यांच्यावर विधायक फीडबॅकने प्रकाश पडू शकतो. दुष्ट आणि सुष्ट चक्रांवर त्यांच्याद्वारे प्रकाश पडू शकतो.

अनुक्रमणिका

विधायक फीडबॅक पद्धतीने स्वतः खळबळयुक्त असलेल्या कोणत्याही प्रक्रियेचे स्पष्टीकरण होते. उदा. शस्त्रस्पर्धा. दरवेळी रशियाने नवे एखादे शस्त्र तयार केले, की अमेरिका त्याच्याहून मोठे तयार करते. त्यानंतर पुनः रशियाला त्याच्याहून मोठे शस्त्र तयार करण्याची स्फूर्ति येते!... जागतिक वेडेपणाचा जणू कळस गाठला जातो!

आपण जेव्हा या दोन्ही प्रकारच्या फीडबॅक पद्धतींचा एकत्रित अभ्यास करतो, तेव्हा या दोन्ही पद्धती मानवी मेंदूपासून अर्थकारणापर्यंतच्या गुंतागुंतीच्या रचनांमध्ये किती प्रभावीपणे कार्यान्वित असतात, हे समजून येते आणि त्यातून आश्चर्यकारक जाणीवा प्रकट होतात. खरोखर गुंतागुंतीच्या असलेल्या रचना किंवा संस्थांमध्ये बदल दडपणांची व बदलांना उत्तेजन देणाऱ्या अशा प्रणाली कळत नकळत कार्य करत असतात; एकमेकींवर परिणाम करत असतात हे आपल्याला समजून चुकल्यानंतर आपण ज्या जगात रहातो आहोत, त्याच्यातल्या गुंतागुंतीच्या एका वेगळ्याच पातळीचे आपल्याला दर्शन होते. कार्यकारणभावाबद्दलची आपली समज प्रगत झालेली आहे.

आपल्या आकलनात आणखीही भर टाकणारी गोष्ट म्हणजे बदल थांबवणारे किंवा कमी करणारे, तसेच ते वेगाने वाढते ठेवणारे घटक मुळात असतातच असे नाही. जीवशास्त्रीय किंवा सामाजिक संस्थात नंतरही ते प्रकट होऊन वाढीला लागू शकतात. ह्या गोष्टीची जाणीव होते. त्यामुळे अचानक घडणाऱ्या बदलांच्या विलक्षण घटनांची संगती लावणे आपल्याला शक्य होते. काही बदलांचा मागोवा घेणे कठीण का असते हेही समजते. सरळ धीम्या गतीने चालणाऱ्या प्रक्रियेत अचानक होणारा आश्चर्यजनक बदल किंवा विलक्षण वेगाने अचानक धारण केली गेलेली शांतता का घडू शकते याबद्दल उलगडा होण्यास मदत होते. सुरुवातीला सारख्याच असणाऱ्या अवस्थांमधून घडणारे परिणाम एकदम वेगवेगळे असण्यबाबतचे स्पष्टीकरण होते.

तिसऱ्या लाटेतील कार्याकारणभावाला हळूहळू आकार येत चालला आहे. आणि त्याद्वारे या जगात गुंतागुंतीच्या असलेल्या एकमेकांवर परिणाम करणाऱ्या शक्तींचे जगात घडणाऱ्या आश्चर्यांचे, विश्वाच्या टेबलावरती चाललेल्या घटनांच्या बिलियर्ड बॉल्सच्या नर्तनाचे आणि इतर कितीतरी गोष्टींचे स्पष्टीकृत दर्शन घडते दुसऱ्या लाटेच्या कल्पनेतल्या साध्या यांत्रिक जगापेक्षा हे जग कितीतरी विलक्षण आहे.

तिसऱ्या लाटेतील कार्यकारणभाव जुन्या अचानकपणा अवश्यभाव अशा प्रकारच्या विरोधाभासाबद्दल काही नवीन खळबळजनक गोष्टी सांगून जातो. आणि याद्वारेच तात्विक संक्रमण घडू शकते.

नवा धडा

फ्री युनिव्हर्सिटी ऑफ ब्रुसेल्स आणि युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सास, ऑस्टिन येथे काम करणाऱ्या डॉ. इलया प्रिगोजाइन व त्यांच्या सहकाऱ्यांनी दुसऱ्या लाटेच्या काही गृहीतकांवर जेव्हा रासायनिक किंवा इतर रचना वैविध्याकडे व गुंतागुंतीकडे अधिक झेप घेतात तेव्हा ते योगायोग व आवश्यकता यांच्या मिश्र परिणामामुळे होते असे दाखवून देऊन हल्ला केला.

अनुक्रमणिका

अंतर्गत चलबिचल किंवा बाह्यशक्तींचा, किंवा दोन्हीचाही परिणाम होऊन जुना तोल ढळतो, आणि त्याचा परिणाम म्हणून नेहमीच गोंधळ माजतो किंवा कोलमड निर्माण होते असे नाही, तर पुष्कळदा एका अतिशय उच्च पातळीला पोचणारी संपूर्णतया नवी रचना उभारली जाते. ही नवी रचना जुन्या रचनेहून अधिक भिन्न असते, तिच्यातही अंतर्गत क्रिया–प्रतिक्रिया चालू असतात आणि ती गुंतागुंतीही असते. त्यामुळे तिला स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी अधिक ऊर्जा व माहिती व इतर साधनमय आधाराची आवश्यकता निर्माण होत असते.

प्रिगोजाइन म्हणतात की खुद्द उत्क्रांती ही गोष्ट अधिकाधिक गुंतागुंतीची व वैविध्यपूर्ण होत जाणारी जीवशास्त्रीय किंवा सामाजिक प्रक्रिया म्हणून ओळखली जावी. या प्रक्रियेचे फलित म्हणून नवीनच उच्च प्रतीची रचना घडते. म्हणजेच प्रिगोजाइनच्या कल्पनेप्रमाणे–राजकीय, तात्त्विक व शास्त्रीय दृष्टीकोणातून–आपण चंचलतेतून शिस्त निर्माण करत असतो. म्हणजेच गोंधळातून सुव्यवस्था निर्माण करत असतो.

परंतु एक गोष्ट खरी, की आपण उत्क्रांतीला साचेबंद चौकटीत जखडून टाकू शकत नाही. प्रिगोजाइनच्या अभ्यासात यदृच्छा व आवश्यकता यांची केवळ युतीच सुचवली गेली नसून त्यांचे एकमेकांशी असणारे संबंध अत्यावश्यक बाब म्हणून दर्शवण्यात आले आहेत.

प्रिगोजाइनने असा निष्कर्ष काढला आहे, की कार्यकारणभावाचे कडक नियम आजच्या संदर्भात आपल्या विशिष्ट अवस्थांमध्ये बद्ध करणारे असेच आहेत. केवळ विशिष्ट परिस्थितीमधील विशिष्ट बाबींनाच ते लागू पडतात. बदलाच्या वर्णनांची ते जणू चेष्टाच करतात... गुंतागुंतीचे शास्त्र एका नव्याच दृष्टीकोणाप्रत आपल्याला घेऊन जाते.... शिवाय नेहमीच कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या अस्थैर्याची शक्यता असते. आणि तिच्यातूनच नवीन यांत्रिकतेचा जन्म होतो. खरे म्हणजे सारे विश्व आपल्यापुढे खुले ठाकलेले आहे. (आपल्या जिज्ञासेला भरपूर आव्हान आहे.)

जे उद्यमवास्तव एकेकाळी अतिशय प्रभावी, परिपूर्ण, सर्वसमावेशक आणि विश्व व त्याचे घटक कशा प्रकारे एकत्र 'जुळवले गेलेले आहेत' याचे स्पष्टीकरण करणारे असे वाटत होते, ते खरोखरच अतिशय उपयुक्त ठरले. परंतु वैश्विकतेबाबतचे त्याचे ठाम विचार हाता हादरून जात आहेत.

उद्या आपण मागे वळून पाहू लागलो तर दुसऱ्या लाटेचा उच्च आदर्शवाद हा केवळ दुसऱ्या लाटेच्याच संपूर्ण पात्रतेचा होता असे आढळून येईल.

दुसरी लाट मरत चालल्यामूळे आज लाखो लोकांची अवस्था गोंधळल्यासारखी झालेली आहे. हातातून निसटून चाललेले काही ना काही पकडून ठेवण्याची त्यांची केविलवाणी धडपड चालू आहे. नव्या जगासाठी नवीनच सुयोग्य अशी संस्कृती उभारण्याऐवजी, या बदलत्या परिस्थितीत जुन्याच कल्पना आणून रोवण्याची, मुलतः अगदी वेगळ्या परिस्थितीत आयुष्य जगलेल्या पूर्वजांच्या, जुन्या खुळचट कल्पनांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी त्यांचा आटापिटा चालू असतो!

दुसऱ्या लाटेचा उच्च आदर्शवाद कोसळत चालला आहे. ह्या आदर्शवादाचे प्रतिबिंब औद्योगिकीकरणाने ज्या रीतीने जगाची रचना मानली व मांडली त्या रीतीत पडलेले आढळते. निसर्गाची

अनुक्रमणिका

उभारणी सुट्या, वैशिष्ट्यपूर्ण कणांतून झाली असल्याबाबतची प्रतिमा, कल्पना सुट्या स्वयंपूर्ण देशांतून प्रकट होणाऱ्या याबाबतच्या कल्पनांतून झालेली आढळून येते असे. आता निसर्ग व भौतिक याबाबतची आपली प्रतिमा बदलून गेली आहे. देशाबाबतच्या कल्पनेतही बदल होत चालला आहे. घडत असलेला हा बदल हे तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीकडे टाकलेले आणखी एक अर्थपूर्ण पाऊल ठरत असल्यास नवल नाही!

# एकोणीस । राष्ट्रभंग

जगामध्ये आज राष्ट्रीयत्वाच्या भावना प्रचंड प्रमाणात उफाळून येत आहेत— इथिओपिया, फिलिपीन्स आपले देश स्वतंत्र करण्याच्या दृष्टीने जोरदार चळवळी करत आहेत. याच वेळी कॅरेबिन समुद्रातील छोटे बेट डॉमिनिका किंवा दक्षिण पॅसिफिकमधील फिजी आपले राष्ट्रीयत्व जाहीर करत आपले दूत संयुक्त राष्ट्रसंघात आपले प्रतिनिधित्व करायला पाठवत आहेत. अशा वेळी उच्च तंत्राधिष्ठित व अतिप्रगत भागात एक विलक्षण आणि विचित्र घटना घडत आहे. ती म्हणजे जिथे नव्या देशांनी आकार घेण्याच्या घटना घडण्याऐवजी येथे जुनेच देश भंग पावण्याच्या संकटात पडलेले आहेत!

तिसरी लाट जगभर धडाका उडवून देत असताना, जुन्या दुसऱ्या लाटेच्या राजकारणात प्रमुख भूमिका बजावणाऱ्या, राष्ट्रीय भावनेचा सर्व बाजूंनी येणाऱ्या दबावांमुळे चोळामोळा होत आहे.

शक्तींचा एक गट राजकीय सत्तेला खालच्या दिशेला खेचत असून देश, उपविभागात्मक प्रांतात किंवा गटात रूपांतरित व्हावेत म्हणून त्यांचा प्रयत्न आहे. तर दुसरा गट सत्तेला वरच्या दिशेकडे खेचत आहे. देशाच्या संकुचित भावनेतून बाहेर पडून आंतरराष्ट्रीय प्रातिनिधिक संस्थांकडे सत्तेने जावे असा त्यांचा प्रयत्न आहे. आणि हे परस्परविरोधी कार्य देश या एकाच संस्थेवर होत असल्यामुळे ह्या उच्च तंत्राधिष्ठित राष्ट्रांचे तुकडे पडून ते अधिक छोट्या आणि कमी शक्तिमान अशा स्वयंपूर्ण गटांमध्ये रूपांतरित होत आहेत असे दृश्य, आपण जगावर सहज नजर टाकली, तरी चटकन दिसून येते...

जगाच्या विविध भागातील विविध देशात चाललेल्या उठाव, हिंसाचार व उलथापालथी कशाचे द्योतक आहेत? तर यासाठी अगदी उघड दिसणाऱ्या एका गोष्टीकडे आपल्याला अचूकपणे बोट दाखवता येईल. ती गोष्ट म्हणजे औद्योगिक क्रांतीने देशादेशांतून पेरून ठेवलेली अंतर्गत तणावांची स्फोटक बीजे!

यापैकी काही तणाव ऊर्जाविषयक पेचप्रसंगातून निर्माण झालेले असून दुसऱ्या लाटेतील रूढ पायांकडून तिसऱ्या लाटेला अभिप्रेत असलेल्या ऊर्जातळाकडे स्थलांतर होण्याची जी गरज वाढते आहे, त्यातून निर्माण झालेले आहे औद्योगिक क्षेत्रातही दुसऱ्या लाटेकडून तिसऱ्या लाटेच्या उद्योगपायाकडे होणाऱ्या स्थित्यतराने तणाव निर्माण केलेले आहेत. कित्येक ठिकाणी उपदेशीय किंवा प्रांतीय तत्त्वावर होत असलेली अर्थकारणाची वाढ एका पिढीपूर्वी रूढ असलेल्या राष्ट्रीय अर्थकारणाहून मोठी, गुंतागुंतीची आणि अंतर्यामी भिन्न असलेली अशीच आहे. आणि या तऱ्हेची अर्थकारणे सुटे अस्तित्व इच्छिणाऱ्या स्वातंत्र्यवादी चळवळींसाठी किंवा फुटीरतेच्या दिशेने होणाऱ्या मोहिमांसाठी उड्डाण तळ ठरू पहात आहेत.

स्वरूप संघटनेतून अंग काढून घेण्याचे असो, प्रादेशिकतेचे असो, भाषावादाचे असो, विकेंद्रीकरणाचे असो किंवा स्थानिक लोकसत्तेचे असो, ह्या केंद्रापसारी शक्तींना पाठिंबा मिळतो. कारण राष्ट्रीय सरकारे वेगाने समाजात होत असलेल्या विघटनाला योग्य त्या लवचिकपणाने स्वतःत बदल घडवून आणून तोंड देऊन शकत नाहीत. औद्योगिक समाजातील हे विघटन चालू असताना तिसऱ्या लाटेच्या प्रभावामुळे प्रादेशिक, स्थानिक, मानववंश संबंधीचे, सामाजिक व धार्मिक विचारवंतांच्या गटांचा सारखेपणा कमीकमी प्रमाणात आढळून येऊ लागला आहे. परिस्थिती व गरजा भिन्न असतात. व्यक्तीदेखील स्वतःतील भिन्नता जाणून असतात किंवा त्यांना भिन्नतांचा शोध लागलेला असतो.

अनुक्रमणिका

कॉर्पोरेशन्स व बाजार ग्राहकनिष्ठ होत असतात परंतु राष्ट्रीय सरकारांना आपल्या धोरणांच्या बाबतीत ही व्यक्तिनिष्ठता अमलात आणणे शक्य नसते. दुसऱ्या लाटेतील राजकीय आणि नोकरशाहीच्या चौकटीत अडकून पडल्यामुळे त्यांना प्रत्येक प्रदेश किंवा शहर, प्रत्येक वंशीय, धार्मिक, सामाजिक, लैंगिक, मानववंशीय गट स्वतंत्रपणे विचारात घेता येत नाहीत. प्रत्येकाचे काही एक स्वतंत्रपणे करता येत नाही. मग प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र व्यक्ती म्हणून वागणूक देता येणे ही गोष्ट कल्पनेत देखील अशक्य असल्यास नवल नाही. राष्ट्रीय स्तरावर निर्णय घेत असणाऱ्यांना परिस्थितीत वाढती भिन्नता असल्याने वेगात बदलत जाणाऱ्या स्थानिक गरजांचे ज्ञान असू शकत नाही. त्यांनी असा प्रयत्न करण्याचे जरी ठरवले तरी अतिशयोक्त सूक्ष्म माहितीच्या, पुराच्या वेढ्यात ते अडकून पडतात! त्यांना त्या दिशेने काम करणे शक्यच होऊ शकत नाही.

त्यामुळे वॉशिंग्टन, लंडन, पॅरिस, किंवा मॉस्को इत्यादि ठिकाणची राष्ट्रीय सरकारे पूर्वीपासून प्रमाणीभूत ठरलेल्या प्रचड समाजाला एकत्रितपणे लागू पडू शकणाऱ्या धोरणांचा छोट्या छोट्या गटात किंवा तुकड्यात विभागून असणाऱ्या लोकांसाठी वापर करायचे चालूच ठेवतात. स्थानिक किंवा वैयक्तिक गरजा सोयिस्करपणे विसरल्या जाऊन त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. विघटन अधिक प्रमाणात होऊ लागल्यानंतर विभाजनवादी व केंद्रापसारी शक्ती नाट्यपूर्णरीतीने अधिक तीव्र होऊन देशाच्या एकतेला, एकदेशीय कल्पनेला धोका निर्माण होण्याची शक्यता आपण विचारात घ्यायला हवी.

तिसऱ्या लाटेकडून अशा तऱ्हेचे दबाव खालील दिशेने तीव्र होऊ लागले असून देशीयतेला धोका उत्पन्न झालेला आहे.

वरुन चेंगरणूक

याच वेळी, तिसऱ्या लाटेने नवीन समस्या निर्माण केल्यामुळे, दळणवळणाचा नवीन साचा तयार केल्यामुळे, जगाच्या रंगभूमीवर नवेच अभिनयपटु आणले गेल्यामुळे वरच्या बाजूनेही दबाव निर्माण होऊन एकेकट्या देशाची सत्ता आकसून जाते आहे.

पुष्कळ समस्या अतिशय लहान प्रमाणातल्या किंवा अतिशय स्थानिक स्वरूपाच्या असल्यामुळे राष्ट्रीय सरकारे हाताळू शकत नाहीत; याच्या उलट काही समस्या इतक्या अवाढव्य असतात, की कोणतेही राष्ट्रीय सरकार एकट्याने त्यांचा मुकाबला करू शकत नाही. मग ते सरकार स्वतःला कितीही समर्थ समजत असू दे; मोठ्या समस्येपुढे ते छोटे ठरतेच.

देशांदेशातील आर्थिक संबंध अतिशय तणावपूर्ण असे असल्यामुळे आजचे कोणतेही एक राष्ट्रीय सरकार स्वतःचे अर्थकारण स्वतंत्रपणे योजू शकत नाही किंवा ते चलन फुगवट्याला आळाही घालू शकत नाही. उदा : पूर्वी दाखवून दिलेली युरो डॉलर्सची 'सूज' कुठल्याहीं एका देशाच्या आवाक्याबाहेरची आहे. शिवाय कोणत्याही एका देशात निर्माण झालेला कोणताही आर्थिक दोष देशाच्या सीमा पार करून दुसऱ्या देशात जातो, ही एक वेगळीच गोष्ट आहे. 'देशा'चे आर्थिक कवच आता 'सच्छिद्र' झाले आहे!

देशाच्या सीमा आर्थिक प्रवाह थांबवू शकत नाहीत, त्याचप्रमाणे परिस्थितीजन्य शक्तींनाही थोपवू शकत नाहीत. स्वित्झर्लंडमधील एखाद्या कारखान्याचे उत्सर्जित पाणी ऱ्हाईनमध्ये मिसळले जाऊन

जर्मनी, हॉलंड यांच्यात प्रदूषण निर्माण करत करत उत्तर सागरात जाऊन पोचते. यात हॉलंड किंवा जर्मनी काहीच करू वा बोलू शकत नाहीत, कारण त्यांच्या स्वतः तर्फे उत्सर्ज ऱ्हाईनमध्ये मिसळून प्रदूषण वाढवणार नाहीत याची त्यांच्यापैकी कोणीही हमी देऊ शकत नाहीत! तेलटँकर ओसंडणे, हवाप्रदुषण, वातावरणात घडवून आणलेला बदल, जंगलतोड आणि अशा इतर घटनांचे परिणाम नेहमीच सीमा ओलांडून दुसऱ्या देशात प्रवेश करतात. देशांच्या सीमाही आता सच्छिद्र झाल्या आहेत!

जगात चालू झालेली नवीन दळणवळण व्यवस्था प्रत्येक देशात बाहेरून होणाऱ्या प्रभावाला प्रवेश करू देते. उदा : सीमेपलीकडे चालू असलेली रेडिओ किंवा टी. व्ही. केंद्रे, अलिकडील श्रोते व प्रेक्षक आरामात ऐकू व पाहू शकतात. पण हे झिरपणे दुसऱ्या लाटेतील अगदी क्षुद्र दळणवळणाचे म्हणावे लागेल कारण तिसऱ्या लाटेतील दळणवळणे उपग्रह, कॉम्प्युटर, टेलिप्रिंटर इत्यादींवर आधारलेली असतात.

एक प्रश्न विचारात घेण्याजोगा आहे, तो म्हणजे देशाच्या सीमा किती परिणामकारकतेने सुरक्षित राखता येणे शक्य आहे... आणि ते देखील किती काळापर्यंत? तिसऱ्या लाटेच्या औद्योगिक तळाचा बदल अतिशय सूक्ष्मविभागांनी, संवेदनाक्षम, खुल्या तटस्थ अशा 'जाळ्याने' युक्त अशा माहितीसंस्थेने युक्त अशा विकासाची अपेक्षा करतो आहे. एखाद्या देशाने माहितीच्या प्रवाहांची साठवणूक करणे ही गोष्ट त्याच्याच आर्थिक विकासाचा वेग वाढवण्याऐवजी त्यात अडथळे निर्माण करणारीही ठरू शकेल. फार कशाला, प्रत्येक तांत्रिक संक्रमण देशाच्या बाह्य कवचाला अधिक छिद्रे पाडण्याचा आणखी एक मार्ग ठरू शकते.

अशा नव्या घटना, नव्या आर्थिक समस्या, नवीन परिस्थितीजन्य समस्या, नवीन दळणवळण यंत्रे तंत्रे, जागतिक चौकटीतील एखाद्या राष्ट्राचा स्थानाला जणू सुरुंगच लावीत आहेत, आणि तो जवळपास अशाच क्षणी एकत्र येतात की जेव्हा जगाच्या रंगभूमीवर येणाऱ्या नव्या अभिनेत्यांनी राष्ट्रीय सत्तेला आव्हान केलेले असते!

अलिकडे अस्तित्वात आलेल्या नवीन प्रभावी शक्तींपैकी सर्वांत जास्त प्रसिद्धी पावलेली शक्ती म्हणजे आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेशन.

गेल्या पंचवीस वर्षात उत्पादनाचे जागतिकीकरण झाले आहे ते केवळ कच्च्या मालाच्या किंवा तयार उत्पादनाच्या देशादेशांतून होणाऱ्या आयात निर्यातीद्वारा झाले असे नसून देशांदेशांतून पसरलेल्या उत्पादनाच्या संस्थात्मक रचनेद्वारा झाले आहे.

दी ट्रॅन्स नेशनल कॉर्पोरेशन—टी एन सी—संशोधन एका देशात करेल, घटकांचे उत्पादन दुसऱ्या देशात करेल, घटकांची जुळणी तिसऱ्या देशात करेल, उत्पादित मालाची विक्री चौथ्या देशात करेल तर गरज भागल्यानंतर उरलेले शिल्लक भांडवल पाचव्याच देशात जमा करून टाकेल! या संस्थेचे कार्यकारी सदस्य डझनावारी देशांतून विखुरलेले आहेत. आज उच्च तंत्राधिष्ठित परंतु कम्युनिस्टेतर देशांतील कमीत कमी दहा हजार कंपन्यांनी स्वतःच्या देशाबाहेर शाखा उघडलेल्या आहेत.

एक बिलियन डॉलर्सहून अधिक विक्री ज्या प्रमुख ३८२ औद्योगिक कंपन्यांपैकी २४२ कंपन्यातील माल विक्री, निर्यात, कमाई, जिंदगी, नोकऱ्या इत्यादींच्या रूपाने परदेशीच असतो. या कॉर्पोरेशन्सच्या व्याख्या कशा करायच्या व त्यांचे मूल्यमापन कसे. करायचे याबाबत अर्थतज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. तरी एक

अनुक्रमणिका

गोष्ट खरी, की जगाच्या रचनेतील एक नवा महत्‌त्वपूर्ण घटक त्यांच्या रूपाने आढळून येतो. देशीय राज्याला तेही एक आव्हानच आहे.

या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेशन्स केवळ श्रीमंत देशांमध्येच आहेत असे नाही. लॅटिन अमेरिकन आर्थिक व्यवस्थेखालील २५ देशांनी स्वतःच्या शेती—उद्योग, स्वस्त घरे, महत्‌त्वाच्या वस्तु इत्यादी उद्योगांच्या क्षेत्रात स्वतःच्या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेशन्सची उभारणी केली आहे. फिलिपीन्समध्ये निर्माण झालेल्या कंपन्यांनी पार्शियन गल्फमध्ये खोल समुद्रातील बंदरांची उभारणी चालू केली आहे. इंडियन ट्रॅन्सनॅशनल्स युगोस्लाव्हियात इलेक्ट्रॉनिक फँटस उभारत आहेत, लिबियात पोलाद गिरण्या आणि अल्जोरियात मशिन टूल्स उद्योग उभारत आहेत. टी एन् सी चा उद्योग देशाचे जगातील स्थानच बदलून टाकत आहे.

ट्रॅन्सनॅशनल्स इतक्या मोठ्या होत आहेत, की स्वतःच्या देशाच्या काही महत्त्वाच्या अंगांवर त्यांचा परिणाम होतो आहे. कधी कधी स्वतःच्या देशाशी त्यांचा सहकार असतो, कधी कधी नको तेवढा फायदा घेतला जातो. कधी देशाच्या धोरणांचा अवलंब होतो, तर कधी आपल्या स्वतःच्या धोरणांचा केला जातो. परंतु टी एन सी अगदीच चांगल्या ठरत नाहीत की अगदीच वाईटही ठरत नाहीत. परंतु देशाच्या हद्दीपलिकडे तत्काळ बिलियन चलन पाठवणे किंवा तिकडून आणणे याबाबतची त्यांची क्षमता तंत्रज्ञान सुव्यवस्थित होण्याच्या दृष्टीने योग्य तऱ्हेने मांडण्याची ताकद, अधिक जलद हालचाली करण्याची पात्रता या सर्वांमुळे टी एन् सी ने पुष्कळदा राष्ट्रीय सरकारांना वेढले आहे आणि आघाडी जवळजवळ काबीजही केली आहे.

जागतिक शक्तीरचनेच्या संदर्भात या मोठ्या टी एन् सी नी देशाची भूमिका प्रबळ करण्याऐवजी दुबळीच करून टाकली आहे. आणि त्याचवेळी दुसऱ्या दिशेने केंद्रापसारी दबाव कार्य करीत असून सर्व शिवणी उसवून टाकण्याची व देशाला उध्वस्त करून टाकण्याची धमकीही ते देत आहेत.

### टी—नेटचा उदय

जगामध्ये काम करणाऱ्या टी एन् सी प्रमाणे इतरही शक्ती अस्तित्वात आल्या आहेत. टी एन् सी ची जणू प्रतिकृतीच ठरावी अशी आणखी एक शक्ती म्हणजे ट्रॅन्सनॅशनल ट्रेंड युनियनचे गट, धार्मिक, सांस्कृतिक, मानववंशीय चळवळीही एकमेकींशी संबंध ठेवीत देशभर पसरत आहेत. ट्रॅन्स नॅशनल पोलिटिकल पार्टी गटसुद्धा उदयाला येत असलेले आपल्याला आढळून येतात.

आणि या घटनांशी समांतर असलेल्या अशासकीय आंतरराष्ट्रीय संघटनांचेही उदंड पीक आलेले आहे. असे गट शिक्षण क्षेत्रापासून सागरी मोहिमांपर्यंत, तसेच खेळापासून शास्त्रापर्यंत, फळबाग शास्त्रापासून संकटनिवारणापर्यंत अनेक उपक्रम हाती घेऊन, त्यात बरेच काही वरून दाखवत असतात. इंटरनॅशनल रेडक्रॉस, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ स्मॉल अँड मिडियम साइज्ड कमर्शियल एन्टरप्रायझेस, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ विमेन लॉयर्स ही त्यापैकी काही उदाहरणे, ह्या छत्रीवत्‌ संस्थांचे लाखो लोक सभासद असतात; हजारो शाखा अनेक देशामध्ये पसरलेल्या असतात या संस्थांमध्ये एक तर राजकारणाबाबत आस्था असते, नाहीतर नसते— या दोन टोकांच्या अधले मधले टप्पेही असतात.

अनुक्रमणिका

इ. स. १९६३ मध्ये अशा सुमारे १३०० संस्था निरनिराळ्या देशांतून काम करीत होत्या. अशा संस्थांची सख्या वाढत वाढत इ. स. १९८५ पर्यंत ४५०० पर्यंत सहज जाईल असा अंदाज आहे.

अशा संस्था एकमेकांशी स्थानिक, प्रादेशिक, देशीय अशा उभ्या श्रेणीत संबंधित असतातच, शिवाय आडव्या पातळीवर त्या भागीदारीच्या, कार्यान्वित गटांच्या, आंतर संस्थांत्मक कमिट्या व इतर शक्तीद्वारा एकमेकींशी संबंधित असतात. हे आंतरराष्ट्रीय संबंध इतके दाट असतात, की युनियन ऑफ इंटरनॅशनल असोसिएशनच्या अभ्यासानुसार त्यांच्यात ५२,०७५ प्रकारचे, व्याख्या न करता येण्याजोगे, एकमेकात गुंतणारे संबंध असल्याचे इ. स. १९७७ साली लक्षात आले. अक्षरशः हजारो आंतरराष्ट्रीय बैठका, परिसंवाद, मेळावे या वेगवेगळ्या गटांमधील सभासदांना एकत्र आणून त्यांच्यात संबंध प्रस्थापित करून देते.

हे आंतरराष्ट्रीय जाळे ट्रॅन्सनॅशनल नेटवर्क—टी नेट—अद्याप जरी कमी कमी प्रमाणात विकसित झालेले आहे तरी त्याने उभरत्या तिसऱ्या लाटेच्या जगाला आणखी एक मिती प्राप्त करून दिली आहे.

टी एन सी च्या उदयापासून ते आंतर सरकारी संस्थांपर्यंत आपल्याला घटनांचा एक प्रकारचा गट एकाच दिशेने निघालेला आढळून येतो. देशांना दिवसेदिवस स्वतंत्र पाऊल उचलणे कमीकमी प्रमाणात शक्य होत चालले आहे. ते आपले सार्वभौमत्त्व गमावत चालले आहेत.

आपण आता एक नवाच बहुस्तरीय राजकीय खेळ तयार करत असून त्याच्यात केवळ राष्ट्रेच नव्हेत, तर कॉर्पोरेशन्स, ट्रेड युनियन्स, राजकीय, सांस्कृतिक गट, आंतर राष्ट्रीय संघटना, देशनिरपेक्ष एजन्सीज हे सर्व खेळाडू भाग घेत असतील. देशांवर अगोदरच खालच्या श्रेणीकडून दबाव आलेले आहेत, त्यांचे कार्यस्वातंत्र्य आकसून गेलेले आहे, त्यांच्या शक्ती कमी झाल्या आहेत किंवा त्यांच्याकडून त्या काढून घेतल्या गेल्या आहेत, अशा स्थितीत एक मूलतः नवी जागतिक रचना मांडली जात आहे, आकार घेत आहे.

## जागतिक जाणीवा

तिसऱ्या लाटेच्या उदयापासून संकोच पावत जात असलेल्या देशांमध्ये एका नवीन पद्धतीचे जागतिक अर्थकारण अस्तित्वात येत असल्याचे जाणवते आहे. देशाचे पूर्वीचे अर्थकारण देशापुरतेच मर्यादित असायचे. आता या साठवणीत गळती निर्माण झालेली आहे. त्यांना मिळालेल्या यशांमुळेच नाहीसे होण्याची वेळ त्यांच्यावर आलेली आहे. पहिली गोष्ट अशी, की प्रादेशिक अर्थकारणांच्या वाढीनेच राष्ट्रीय अर्थकारणाला असलेली श्रेणी प्राप्त झाली होती. दुसरी गोष्ट अशी, की जागतिक अर्थकारणाला त्यांनी जन्म दिला होता, त्याचा आवाका फारच मोठ्या प्रमाणात वाढला असून त्याने विलक्षण असे नवे आकार धारण केले आहेत.

ह्या नव्या जागतिक अर्थकारणावर टीएन्सी चा मोठा प्रभाव आहे. बँकांच्या अनेक शाखा, व इलेक्ट्रॉनिक वेगाने कार्यान्वित असलेले अर्थशील उद्योग हे तिला अतिशय मोठ्या प्रमाणात मदत करत असतात. अर्थोत्पादक व जमा रक्कम इतक्या मोठ्या प्रमाणात होत असते की तिच्यावर नियंत्रण ठेवणे कोणत्याही राष्ट्राला शक्य नसते. तिची गती अनेक विश्वचलनांतून होत असते. हे अर्थकारण संमिश्र

स्वरूपाचे आहे. खाजगी स्वरूपातले भांडवलदार व सहकारी योजना मिळून संयुक्त धाडसे हाती घेऊन बरोबरीने काम करीत असतात.

दुसऱ्या लाटेने लोकसंख्येचा एक भाग अशा प्रकारे तयार केले होता, की त्यांचे हितसंबंध केवळ स्थानिक स्वरूपाचे उरले नसून त्यांना राष्ट्रीय आदर्शवादाच्या आदर्शाचे स्वरूप प्राप्त झाले होते. तिसरी लाट आता असे गट तयार करत आहे, की ज्यांच्या आस्था देशांच्या हितापेक्षाही मोठ्या स्वरूपाच्या असतात. उदयाला येत असलेल्या जागतिक आदर्शवादाचाच पाया त्यांच्यात असलेला आढळतो. ही जागतिक जाणीव अनेक देशातील प्रशासक, लांब केसवाले परिसरवादी, बुद्धिवत कवी आणि चित्रकार या सर्वांमध्ये आढळते. हे लोक, पूर्वीचे देशभक्त ज्याप्रमाणे संपूर्ण देशाच्यावतीने बोलायचे, त्याप्रमाणे संपूर्ण पृथ्वीच्या, जगाच्या वतीने बोलतात, ही जागतिकता उत्क्रांतीच्या दृष्टीने अतिशय आवश्यक अशी बाब ठरलेला असून 'वैश्विकजागृती'च्या जवळपास नेऊन सोडणारा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

कोणत्याही थरावर पहा, अर्थशास्त्र असो, की राजकारण, संघटना किंवा आदर्शवादी कल्पना असोत, आपल्याला दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या आधारस्तंभावर—राष्ट्रीयत्वावर आतूनही व बाहेरूनही आघात होत असलेले आढळतात.

सध्याच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या क्षणी पुष्कळ गरीब व विकसनशील, उद्योगप्रवण देश राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा जागर घडवून आणत आहेत. त्याच वेळी पूर्वी ज्यांनी हा प्रकार केला होता, त्या औद्योगिक देशांकडून राष्ट्रीयत्वाची भूमिका नाहीशी केली जात आहे, स्थानभ्रष्ट केली जात आहे. देशाच्या, राष्ट्राच्या कल्पनांचे तुकडे पडत आहेत.

आगामी काही दशके नव्या जागतिक संस्थांच्या उभारणीबाबत राष्ट्रीयत्वाच्या अगोदरच्या व नंतरच्या जगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांमध्ये सुरू असणाऱ्या लढ्यात भरडून निघालेली आपणाला आढळतील.

## कल्पित कथा आणि शोध

नवीन जागतिक रचना कोणत्या प्रकारे आकार घेईल हे आज व्हाइट हाऊस किंवा क्रेमलीन इथे असणाऱ्या तज्ज्ञांपासून रस्त्यावरच्या साध्या माणसांपर्यंतचे कोणीही निश्चितपणे सांगू शकत नाही. कोणत्या नव्या प्रकारच्या संस्था नव्या जगात अस्तित्वात येणार आहेत, ह्याचा कोणाला अंदाज येऊ शकत नाही. सध्याच्या अनेक लोकप्रिय दंतकथा पांगवणे व नाहीशा करणे ही मात्र शक्यतेतील गोष्ट आहे.

अशा कल्पित कथातील एकीचा 'रोलर बॉल' व 'नेट वर्क' अशा बोलपटांतून प्रसार होतो. यात एक निष्ठुर, पोलादी नजरेचा खलनायक असे जाहीर करतो. की, जगाचे आता भाग पडणार आहेत. आणि हे भाग टी एन् सी च्या गटाकडून चालवले जाणार आहेत. एक जागतिक ऊर्जा संस्था, एक पुनरुत्पादन संस्था, एक अन्न संस्था, एक गृह निर्माण संस्था, अशा अनेक गोष्टींची अशा तऱ्हेच्या बोलपटात कल्पना केली जाते. पर्याय म्हणून एका प्रचंड कार्पोरेशनचे एकेक विभाग, शाखा म्हणून या एकेका कल्पनेचा विचार केला जातो.

अनुक्रमणिका

अशा तऱ्हेची साधी, सरळ कल्पना दुसऱ्या लाटेतील काही,—विशेषीकरण, विशालीकरण, केंद्रीकरण अशा—विचारकलांवर आधारलेली असते. परंतु या तऱ्हेचा दृष्टीकोण प्रत्यक्ष जीवनातील अपूर्व अशा वैविध्यपूर्ण अवस्थांची, सांस्कृतिक, धार्मिक व परंपरामधील कलहांची, बदलाच्या वेगाची, नव्यानेच सर्व उच्च तंत्राधिष्ठित देशांतून आढळून येणाऱ्या विरलीकरणाच्या ऐतिहासिक मुसंडीची दखल घेण्याला अगदी असमर्थ ठरतो, अशी सोयीस्कर समजूत करून घेतो, की ऊर्जा, घरबांधणी, अन्न अशा गरजांचे व्यवस्थित विभाग पाडता येतील; संपूर्ण रचनेतच क्रांती घडवून आणणाऱ्या मूलभूत बदलांकडे दुर्लक्ष करतो; कॉर्पोरेशनच्या अस्तित्व हेतूकडेही दुर्लक्ष करतो. लुप्तप्राय दुसऱ्या लाटेच्या कॉर्पोरेशन विषयक प्रतिमांवरच आधारलेला असतो.

दुसरी याच्या जवळपास येणारी कपोलकल्पना म्हणजे एकाच जागतिक सरकारकडून जगाचा कारभार चालविला जाण्याची कल्पना. 'युनायटेड स्टेट्स ऑफ द् वर्ल्ड', 'प्लॅनेटरी प्रॉलेटेरिअन स्टेट' अशा सध्याच अस्तित्वात असलेल्या काही संस्थांमागे असणाऱ्या विचारांची ही सुधारून वाढवलेली आवृत्ती होय. यामागचे विचार दुसऱ्या लाटेतील तत्त्वांवर आधारलेले असेच आहेत.

यातून कॉर्पोरेशनाधिष्ठित भविष्य किंवा जागतिक सरकार यापैकी काहीही अस्तित्वात येत नसून अतिशय गुंतागुंतीची रचना निर्माण होत असल्याचे दिसून येते. समान हितसंबंध असलेल्या अनेक संस्थांचे जाळे आपण विणत आहोत. एका रचनेचा ठोकळा उभा करत नाही आहोत.

पुढच्या दशकामध्ये, प्रदेशांतून, शहरांतून, कॉर्पोरेशन्समधून, परिसरवाद्यांच्या संस्थांमधून, शास्त्रीय गटांमधून सागर विषयात आस्था असणाऱ्या गटांमधून अस्तित्वात असणाऱ्या निरनिराळ्या संस्थांचे जाळे उभे राहिलेले आपणास आढळून येईल. अंतराळविषयक आणि अशा कितीतरी संस्थांशी संलग्न अशा संस्था त्या त्या मुशींतून निर्माण झालेल्या आढळतात.

थोडक्यात, जगाची रचना आता नोकरशाहीतल्या खात्यांप्रमाणे असणार नसून एकमेकांशी अतिशय तीव्रतेने संबंधित असलेल्या मेंदूमधील मज्जापेशींप्रमाणे असणार आहे.

देशांच्या अशा ठिकऱ्या होऊन पुनः सांधेजुळणी होत असताना, टी एन सी व इतर नवीन घटक जगाच्या रंगभूमीवर वावरत असताना, अस्थिरता कळसाला पोचलेली असताना, युद्धांच्या धमक्या उठत असताना, जगात सध्याच्या राष्ट्रीय सरकारांद्वारे अत्यंत अंदाधुंदी निर्माण केली जात आहे. अशा वेळी आपल्याला नव्याच राजकीय आकारांची रचना करण्याची आवश्यकता वाटू लागणार आहे. त्यातूनच जगाची सुव्यवस्था निर्माण होणार आहे.

अनुक्रमणिका

# वीस । गांधी, उपग्रहांसह!

जगामधील वाढता गोंधळ आणि अंदाधुंदी रोज अशा घटनांमध्ये भर घालते आहे, की त्यांना योग्य मथळे देऊन योग्य स्वरूपात सादर करण्यासाठी पत्रकारांना आपली डोकी खाजवावी लागत आहेत. इराणमधील मुस्लिम उठाव त्यांना थक्क करत आहेत. चीनमध्ये अचानक झालेली माओच्या धोरणांची पीछेहाट, डॉलरचे अवमूल्यन, गरीब देशातून नव्यानेच उद्‌भवलेली बंडखोरवृत्ती, एल् साल्व्हेडोर किंवा अफगाणिस्थान येथील क्रांती या व अशा इतर सर्व गोष्टी चकित करणाऱ्या निरूद्देश्य असून त्यांच्या त्यांच्यात एकमेकीत कसलाही संबंध नाही. जग सावळ्यागोंधळाकडे चाललेले आहे.

तरीदेखील या सर्व घटना वाटतात तितक्या गोंधळाच्या नाहीत. पृथ्वीवर कोणतीही नवी संस्कृती अवतरत असताना जुन्या गोष्टींशी संघर्ष, उलथापालथ, अर्थकारणाची कोलमड अशा गोष्टी घडत असतातच. ज्याला आपण गोंधळ समजतो, त्याच्याद्वारेच नव्या संस्कृतीला भरपूर जागा करून दिली जात आहे.

वर्तमानाकडे आपण जेव्हा दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीचा अस्तकाळ म्हणून पहातो, तेव्हा आपल्याला विषाद वाटल्यावाचून रहात नाही. आपल्या अखेरच्या काळात जे जग औद्योगिक संस्कृतीने उभारून ठेवले आहे, त्यातील एक चतुर्थांश लोक वैभवात रहात आहेत. तीन चतुर्थांश लोक त्यांच्या मानाने थोडे गरीब आहेत. वर्ल्ड बँक ज्याला निखळ गरीबी म्हणून संबोधते, अशा वास्तवात ८००, ०००, ००० लोक आज रहात आहेत. जवळ जवळ ७००, ०००, ००० लोक अर्धपोटी असून शिवाय ५५०, ०००, ००० इतके लोक निरक्षर आहेत. जवळ जवळ १, २००, ०००, ००० लोक सार्वजनिक आरोग्य सोयींना वंचित झालेले आहेत, औद्योगिक युगाच्या समाप्तीच्या काळात साधे पिण्यायोग्य पाणी देखील त्यांना उपलब्ध होऊ शकले नव्हते.

या जगातील वीस ते तीस औद्योगिक देश स्वस्तात मिळणाऱ्या 'अदृश्य' ऊर्जेकडे आणि स्वस्त कच्च्या मालाकडे, आपल्या आर्थिक यशाच्या इच्छेने वळलेले आहेत.

तिसरी लाट वेगाने येत असताना तो दुसऱ्या लाटेच्या सार्वभौम सत्तेचाच अंत करत आहे असे नाही, तर तिच्याद्वारे व्यक्त होणाऱ्या जगातील गरीबी नष्ट करण्याबाबतच्या पारंपारिक कल्पना चूक आहेत हे सिद्ध करते आहे.

## दुसऱ्या लाटेचे धोरण

जगातील श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी करण्याचे प्रयत्न इ. स. १९४० सालापासून एका धोरणाने करण्यात येत होते. त्या धोरणाला मी दुसऱ्या लाटेचे डावपेच असे नाव देतो.

या मार्गाची सुरूवात ह्या विचाराने होते, की दुसऱ्या लाटेखालील समाजांनी उत्क्रांतीचे शिखर गाठले आहे. इतर समाजांनीही आपल्या समस्या सोडवण्यासाठी औद्योगिक क्रांतीचेच कार्यक्रम आचरणात आणले पाहिजेत. लाखो लोकांनी शेतीकडून उत्पादनाकडे गेल्याशिवाय प्रगती होणार नाही. दुसऱ्या लाटेच्या यशस्वी नमुन्याचे प्रामाणिक अनुकरण करण्यानेच विकास साधेल.

अनुक्रमणिका

डझनावारी देशांनी या दिशेने जाऊन प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. परंतु दक्षिण कोरिया किंवा तैवान यांच्यासारखे फार थोडे त्यात यशस्वी झाले. बाकीच्यांचे प्रयत्न विफल ठरले. या अपयशांची कारणे नववसाहतवाद, वाईट आखणी, भ्रष्टाचार, मागास विचाराचे धर्म, जमातीवाद, टी एन् सी इत्यादी होत. शिवाय वाजवीपेक्षा गती घेणे किंवा अजिबातच गती न घेणे हेही प्रकार घडले. कारणे काही असली, तरी दुसऱ्या लाटेच्या आदर्शाने यशापेक्षा अपयशच अधिक प्रमाणात पाहिले, ही गोष्ट खरी.

हा मुद्दा इराणच्या उदाहरणावरून अधिक स्पष्ट होईल. इ. स. १९७५ पर्यत इराणचा हुकूमशहा शहा दुसऱ्या लाटेच्या धोरणानुसार वेगाने जात वल्गना करत होता, की मध्यपूर्वेकडील सर्वात प्रगत औद्योगिक देश इराणच होणार आहे. शहाच्या या योजनांना आकार देणाऱ्यांनी गिरण्या, धरणे, रेल्वे, हमरस्ते आणि इतर सर्व औद्योगिक क्रांतीच्या आवश्यक सजावटीचा मांड घातला. इ. स. १९७८ पर्यंत आंतरराष्ट्रीय बँकर्स आपला पैसा कमी व्याजाने तिथे ओतायला उत्सुक होते. इराण या सर्व उभारणीद्वारे 'आधुनिक' देश बनत होता, अशा वेळी तेहरानमध्ये भ्रष्टाचाराने थैमान घातले होते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी अधिक रुंदावत होती. दुःखाच्या, संकटाच्या समुद्रातील एका बेटावर जणू नागरी मध्यमवर्ग कसाबसा टिकून रहाण्याचा प्रयत्न करत होता. तेलाखेरीज इतर जवळ जवळ दोन तृतियांश उत्पादन बाजारपेठेसाठीच तयार होत होते, त्याचा फडशा तेहरानमधील लोकांकडून पडत होता. आणि जिथे शहराच्या जेमतेम एक पंचमांश उत्पन्न मिळत होते अशा ग्रामीण भागातील लोक अत्यंत अस्थिर व दडपलेल्या स्थितीत जगत होते.

तेहरान सरकारची कल्पना अशी होती, की विकास मुलतः आर्थिक प्रक्रियेवर अवलंबून असतो; धर्म, संस्कृति, कौटुंबिक जीवन या गोष्टींसाठीही पैसाच हवा. त्याला संपूर्ण जग प्रमाणीभूत होत असलेले दिसत होते. हार्वर्ड, बर्कले व इतर युरोपीय विद्यापीठांतून शिकलेल्यांना पाश्चिमात्य कल्पनांना विरोध करणे मागासलेपणाचे वाटत होते.

तेल आणि इस्लाम यांचे ज्वालाग्राही मिश्रण व अशाच काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी सोडल्या, तर जे इराणमध्ये घडत होते, तेच दुसऱ्या लाटेच्या धोरणांचा अवलंब करणाऱ्या इतर देशातही घडत होते.

शहाच्या राजवटीता अंत तेहरानमध्ये घडला, पण त्याचे पडसाद मेक्सिकोपासून मनिलापर्यंत अनेक राजधान्यांतून उमटले. या अपयशाचे व कोलमडीचे कारण काय असेल? वाजवीपेक्षा वाढलेली गती असेल? भविष्यातील धक्क्याचा परिणाम असेल? तेलावरील अबकारी कर मिळूनही क्रांतिकारी उलथापालथ घडू नये या दृष्टीने मोठ्या प्रमाणात मध्यमवर्ग निर्माण करणे सरकारला जमले नाही? इराणमध्ये घडलेली शहा शोकांतिका आणि त्यानंतर तिथे आलेली तितकीच दडपशाही राजवट दुसऱ्या लाटेच्या धोरणाच्या मूलभूत पूर्वपक्षाविषयी शंका निर्माण करते.

## यशस्वी आदर्शाची मोडकळ

जोपर्यंत दुसऱ्या लाटेचे देश यश प्राप्त करत होते, स्थैर्य प्राप्त करत होते, श्रीमंत अधिक श्रीमंत होत होते, तोपर्यंत त्यांचेच आदर्श जगातल्या इतर देशांपुढे होते. इ. स. १९६० च्या सुमारास औद्योगिकीकरणापुढील पेचप्रसंग उद्भवला.

अनुक्रमणिका

संप, अंधारमय काळ, कोलमडी, गुन्हे, व मानसिक हताशपणा या गोष्टी दुसऱ्या लाटेखालील जगात सर्वत्र पसरल्या. कशाचाच काही उपयोग का होत नाही? इतके हताशपणाने भारलेले प्रश्न विचारले जाऊ लागले.... प्रदूषण, भ्रष्टाचार, चलन फुगवटा, एकाकीपणा, वंशवाद, नोकरशाही, घटस्फोट, फारकती अशा सर्व गोष्टींवर प्रखर हल्ले करण्यात येऊ लागले. संपूर्ण आर्थिक रचनेच्या संपूर्ण कोलमडीची शक्यता अर्थतज्ज्ञांकडून वर्तवण्यात येऊ लागल्या. शिवाय असे दाखवून देण्यात आले, की आश्चर्यकारकपणे जर गरीब देशात दुसऱ्या लाटेच्या धोरणाला यश आले, तर संपूर्ण जगाचेच एका प्रचंड कारखान्यात रूपांतर होऊन जाईल. सर्व चराचरांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण होईल.

औद्योगिक पेचप्रसंग गाढा होत गेल्यावर श्रीमंत देशांवर औदासीन्याचे सावट आले. 'जर दुसऱ्या लाटेचे धोरण उपयोगी पडत नसेल, तर इतक्या मोठ्या प्रमाणातल्या विकेंद्रीकरणाच्या वेदनेने तळमळणाऱ्या या संस्कृतीशी स्पर्धा करण्याची कोणाला कशाला इच्छा होईल?' असा प्रश्न लाखो लोक विचारू लागले.

दुसऱ्या लाटेची धोरणे अवलंबणे हाच एक प्रगतीचा मार्ग आहे. अशी जी ठाम समजूत होती, तिला धक्का देणारी आणखी एक घटना घडली. पहिल्यांदा तुम्ही 'विकास पावा व नंतर श्रीमंत व्हा' असे जे धोरणात्मक गृहीतक होते, त्याचा गाभा असा होता, की भरमसाठ हा कष्टाचा, काटकसरीचा, बंडखोर नीतीचा आणि आर्थिक व सामाजिक बदलांच्या दीर्घ प्रक्रियांचा परिपाक होता.

पैसा विकासातून निर्माण होणे यापेक्षा विकासासाठी पैसा ओतणे हाच क्रम अनेक विकसनशील देशांमधून अनुभवण्यात आला. याच वेळी श्रीमंत देशातील स्पर्धा तीव्र होत चालली होती. "दक्षिण कोरियातील पोलाद कॅलिफोर्नियातील बांधकामात उपयोगात आणले जाऊ लागले. तैवानचे टेलिव्हिजन सेट युरोपात खरेदी केले जाऊ लागले. भारतीय ट्रॅक्टर मध्यपूर्वेत खूप लागले.... चीनचा एक महत्त्वपूर्ण औद्योगिक शक्ती म्हणून अचानकच नाट्यपूर्ण उदय झाला. काळजी अशी निर्माण झाली, की हे विकसनशील अर्थकारण जपान, अमेरिका, युरोप अशा प्रगतांशी कितपत स्पर्धा करेल? का त्यांना मागे देखील टाकेल?"— असे दि न्यूयार्क टाइम्सच्या टोकियोतील प्रतिनिधीचे विचार आहेत.

दुसऱ्या लाटेखालील जुन्या औद्योगिक देशांपैकी अनेक देशांनी, उद्योजकांनी आणि त्यांच्या राजकीय सहकाऱ्यांनी 'नोकऱ्यांच्या निर्याती' वर आणि गरीब देशांतील औद्योगिकीकरणाच्या प्रसारामागील राजकारणावर कडाडून हल्ले करायला सुरूवात केली.

परंतु सगळीकडून अशीच शंका निर्माण होत गेली, की फार गाजावाजा झालेली. दुसऱ्या लाटेची धोरणे टिकून रहातील का? मुळात ती बदलत्या परिस्थितीत उपयोगी तरी ठरतील का?

## पहिल्या लाटेची धोरणे पुनः?

दुसऱ्या लाटेच्या धोरणांची अपयशे गरीब देशांतून क्षोभ निर्माण करू लागली, जागतिक अर्थकारणाची संपूर्ण निखळणी व पुनः जोडणी, दुरुस्ती यांची मागणी ते करू लागले आणि त्यामुळे व स्वतःच्या देखील भवितव्याच्या चिंतेने त्रस्त होऊन श्रीमंत देशांनी इ. स. १९७० नंतर गरीब देशांबद्दलच्या आपल्या धोरणात बदल केला.

अनुक्रमणिका

हा बदल जणू एका रात्रीत आणि अनेक सरकारे व विकास प्रतिनिधी—वर्ल्ड बँक, दि एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट, आणि ओव्हरसीज डेव्हलपमेंट कौन्सिल यांनी रूळ बदलून पुनः पहिल्या लाटेची शोभतील अशा धोरणांची वाट पकडली.

ग्रामीण विकासावर नव्याने भर देण्यात येऊ लागला. शेतकऱ्यांनी गावे सोडून दाटीने वाढलेल्या शहरांकडे जावे हा आग्रह सोडून देण्यात आला. अन्नधान्य स्वयंपूर्णतेवर भर देण्यात येऊन नगदी पिकांच्या निर्यातीसाठीचा आग्रह नाहीसा होऊ लागला. मूलभूत मानवी गरजा पुऱ्या करण्याचे प्रयत्न होऊ लागले.

मजूर कमी लागावेत अशा तऱ्हेच्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्याऐवजी अनेकांना काम मिळेल—तेही कमी भांडवल, कमी ऊर्जा व कमी कौशल्यात असे प्रयत्न होऊ लागले. मोठे पोलाद कारखाने उभारण्याकडील कल कमी होऊन लघुउद्योगाकडे मोठ्या प्रमाणात लक्ष देण्यात येऊ लागले.

पहिल्या लाटेचे समर्थक हे पटवून देऊ लागले, की अनेक गरीब देशात औद्योगिक तंत्रज्ञान अनर्थक ठरले आहे. यंत्रे मोडली, तर ती दुरूस्त न करता तशीच पडून रहातात कच्चा मालही आयात करावा लागतो. एकूणच खर्च गरीब देशांना परवडत नाही. प्रशिक्षित कामगार कमी पडतात. तेव्हा तोड अशी निघू लागली, की सर्वार्थाने योग्य व सोयीस्कर पडतील अशाच तंत्रज्ञानांचा अवलंब करावा, सुवर्णमध्य गाठावा. लवकरच, मधल्या दर्जाचे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी अमेरिकेत व इतस्त्र केंद्रे निघाली. शिवाय खुद्द विकसनशील देशांतही अशी केंद्रे निघाली. आणि निम्नस्तरीय तांत्रिक शोध मोठ्या प्रमाणात लागण्यास सुरूवात झाली.

नांगरणी, पेरणी, खते पसरणी इत्यादी करण्यास दोन ओळीच्या लागवडींमध्ये उपयोगी पडतील अशी बैल किंवा गाढव यांनी ओढली जाणारी नवी उपकरणे, भुईमूग उपटणे, दाणे काढणे अशा प्रकारच्या कामासाठी वेगळीच उपकरणे तयार झाली. पाय मारून चालविण्याचे भातमळणी यंत्र, केळीच्या सालीपासून पाणी काढणारे यंत्र अशी अनेक यंत्रे तयार होऊ लागली. घाना, झांबिया यांसारखे देश देखील संशोधनात मागे नाहीत.

अधिक विशाल पायावरही पहिल्या लाटेच्या धोरणांचा अवलंब करण्यात येऊ लागला. इ. स. १९७८ साली अधिकारावर आलेले नवे भारतीय सरकार तेलाच्या व खतांच्या वाढत्या किंमतीमुळे गोंधळून गेले. दुसऱ्या लाटेच्या धोरणांच्या अंगीकाराने त्यांना विरस केला होता. नेहरु व इंदिरा गांधी यांनी कापड गिरण्यांच्या आणखी वाढीला प्रतिबंध केला. त्याऐवजी, यांत्रिक मार्गाऐवजीही, हातमागावरच्या कापडनिर्मितीच्या वाढीला प्रोत्साहन दिले. यामागे काम पुरवण्याचाच केवळ हेतू नव्हता तर ग्रामीण भागातील कुटिरोद्योगाला प्रोत्साहन मिळवून देऊन नागरीकरणाला माघार घ्यायला लावण्याचा हेतू होता.

या नव्या धोरणात खूप चांगला अर्थ भरलेला होता. लोकांच्या शहराकडे लागलेल्या प्रचंड ओघाची गती कमी होण्याची गरज यातून ध्यानात येते. ज्या 'गावां' मध्ये जागतले बहुसंख्य गरीब रहातात, त्यांची अवस्था सुधारून त्यांना रहाण्यायोग्य करणे ह्या गोष्टीचाही रोख आहे. स्थानिक स्वस्त मालाच्या उपयोगाचे महत्त्व पटवून देऊन भारी आयात मालाचा मोह टाळण्याकडे त्याचा कल आहे. कार्यक्षमतेच्या परंपरागत क्षुद्र कल्पनांना आव्हान आहे. कमी तांत्रिक दृष्टीकोण व स्थानिक रिवाज व संस्कृतीचा विचार या गोष्टी

अनुक्रमणिका

विकासाला योग्य गती देऊ शकतात हे ज्ञान आहे. भांडवल श्रीमंतांच्या हाती सोपवून त्यातले थोडेफार गरीबांच्या हाती पडेल अशी व्यर्थ आशा करण्यापेक्षा खुद्द गरीबांची स्थिती प्रत्यक्ष सुधारण्यावर भर आहे.

पहिल्या लाटेची परिस्थिती बदलण्यापेक्षा तिच्यातील वाईट तेवढे काढून टाकणे असा धोरणाचा रोख दिसतो. म्हणजे खरा आजार बरा करण्याऐवजी केवळ मलमपट्टी करून भागवण्यासारखा हा प्रकार जगातील सरकारे आहेत.

पहिल्या लाटेच्या स्थितीखाली जोपर्यंत गरीब देश रहातील, तोपर्यंत जगाच्या अतिभारित बाजारपेठेत त्यांच्याकडून कमी स्पर्धाशील वस्तूच येत रहातील. ते जितके दिवस शेतातच रहातील, तितके दिवस गॅस, तेल व इतर दुर्मिळ नैसर्गिक संपत्ती ते कमी प्रमाणात वापरतील आणि राजकीय दृष्ट्याही दुबळे व कमी त्रासदायक असेच रहातील!

पहिल्या लाटेतील एक चमत्कारिक गृहीतक असे सांगते की इतर उत्पादक घटकांचे आर्थिक मूल्यमापन केले जात असताना मजुराच्या वेळाचे व शक्तीचे मूल्यमापन—जोवर शेतांवरील श्रमाची कामे दुसरेच कोणीतरी करत असते तोपर्यंत आर्थिक भाषेत करण्याची आवश्यकता नाही.

ज्याला आपण ‘प्रगत शास्त्र’ म्हणतो ते शास्त्रज्ञांनी श्रीमंत राष्ट्रांच्या समस्या सोडवण्यासाठी विकसित केले. फार थोडे संशोधन जगातल्या गरीबांच्या दैनंदिन समस्या सोडवण्याच्या दृष्टीने करण्यात आलेले आहे. मूळ विकास धोरणच प्रगत शास्त्राच्या व तंत्रज्ञानाच्या ताकदीने दिपून गेलेले असल्यामुळे लाखो हताश, भुकेलेले व कष्टकरी शेतकरी दिवसेदिवस दुर्लक्षिले जात असून त्यांची आर्थिक अधोगतीच होत आहे.

काही ठिकाणी, काही वेळा, पहिल्या लाटेच्या धोरणाचा अवलंब बऱ्याच लोकांच्या जीवनात सुधारणा घडवून आणतोही. परंतु एखाद्या मोठ्या देशाने कधी यांत्रिकीकरणाअगोदरच्या पहिल्या लाटेच्या पद्धती वापरून चांगला बदल, तोही मोठ्या प्रमाणात घडवून आणला आहे असे दृश्य कुठे दिसत नाही. त्यामुळे वरील अपवादात्मक पुरावा नियमाला बळकटी आणणाराच ठरतो.

मात्र माओच्या चीनमध्ये पहिल्या लाटेतील मूलभूत तत्त्वांचा अवलंब करून संपूर्णतया नसला तरी पुष्कळ मोठ्या प्रमाणात दुष्काळ टाळला गेला ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. खरोखरच हा फार मोठा पराक्रम होता. परंतु इ. न. १९६० नंतर ग्रामीण विकासावरचा, मागास उद्योगावरचा माओवाद्यांचा भर त्याच्या संपूर्ण कुवतीच्या आवाक्याचा टप्पा गाठून थांबला. त्याबाबतची चीनची प्रगती तिथेच थांबली.

पहिल्या लाटेचा साचा हा प्रवाहीकरणाचा एक उपाय आहे. सर्वच गरीब देशांना तो आता लागू पडेल हे कसे शक्य आहे?

वैविध्याने ओतप्रोत असलेल्या या जगात आपल्याला कित्येक नवीन धोरणांचा शोध लावायला हवा. औद्योगिक वर्तमानातील किंवा त्यापूर्वीच्या भूतकाळातील आदर्शांकडे पहाणे आता सोडून दिले पाहिजे. आता आपल्याला उदयोन्मुख भविष्याकडेच पहायला हवे.

अनुक्रमणिका

तिसऱ्या लाटेची बाब

आपण दोन लुप्तप्राय कल्पनात जखडून रहावयाचे काय? या दोन पर्यायी धोरणातील विरोध प्रकर्षाने समजावा म्हणून मी त्यांचे चित्र रेखाटले. प्रत्यक्षात फार थोडी सरकारे घुसर अमूर्त सिद्धान्त प्रत्यक्षात उतरवू शकतात. आपल्याला असे आढळून येईल की या दोन्ही धोरणातील महत्त्वाची तत्त्वे एकत्र आणण्याचे कितीतरी प्रयत्न चाललेले दिसून येतात. तरी देखील तिसऱ्या लाटेचा उदय आपल्याला हे स्पष्टपणे सुचवतो, की या दोन सूत्रांच्या मध्ये एखाद्या पिंगपाँगच्या चेंडूप्रमाणे नाचत रहाण्याची आता आपल्याला आवश्यकता उरणार नाही.

तिसऱ्या लाटेचे आगमन फार मोठ्या प्रमाणात सर्व काही बदलून टाकत आहे. दुसऱ्या लाटेच्या तंत्रज्ञानाखालील कोणताच सिद्धान्त 'विकसनशील जगा'चे प्रश्न सोडवू शकत नाही. अस्तित्वात असलेले नमुने पूर्णतः बदलता येत नाहीत. अशा वेळी पहिल्या लाटेखालील समाज व वेगाने आकार घेत असलेली तिसऱ्या लाटेची संस्कृती यांच्यात एक नवीनच विलक्षण संबंध निर्माण होऊ लागला आहे.

दुसऱ्या लाटेचे उत्पादन, माध्यम शिक्षण या बाबतची 'कारखाना' पद्धत पहिल्या लाटेखालील देशावर लादून विकास साधण्याचे प्रयत्न झाले आहेत, पण त्या प्रयत्नात संपूर्ण संस्कृतीची पाळेमुळे उखडून जाण्याचा प्रसंग प्राप्त झाला.

या उलट, आपणाला असे आढळून येईल, की तिसऱ्या लाटेची अनेक वैशिष्ट्ये—उत्पन्नाचे विकेंद्रीकरण, घरातच काम, स्वयंसिद्धता इत्यादी आपण पाहिलेली अनेक—पहिल्या लाटेच्या समाजातील वैशिष्ट्यांशी मिळतीजुळती आहेत. काहीतरी प्रतिध्वनी स्वरूप प्रतिरूप स्वरूप, आपण पहात आहोत!

त्यामुळेच आजचे काही आश्चर्यकारक शोध आपल्याठायी पूर्वीच्या काही आठवणी जाग्या करतात. थक्क करणारी गोष्ट अशी आहे, की पहिल्या व तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीत समान गोष्टी कितीतरी आहेत. दुसऱ्या लाटेतील कोणतीच गोष्ट ह्या दोन्ही संस्कृतीमधील गोष्टींशी समान नाही!

पहिल्या व तिसऱ्या लाटेतील हा मिळताजुळतापणा पहिल्या लाटेखालील आजच्या पुष्कळ देशांना तिसऱ्या लाटेतील वैशिष्ट्ये स्वीकारण्यास मदत करू शकेल. त्यासाठी दुसऱ्या लाटेखालून जाण्याचे दिव्य करण्याची आवश्यकता त्यांना पडणार नाही काय? काही देशांना तिसऱ्या लाटेची उभारणी स्वीकारणे औद्योगिकीकरण करण्यापेक्षा सोपे जाईल काय?

पूर्वी शक्य नसलेली गोष्ट म्हणजे आता बाजाराच्या हेतूने उत्पादन न करताही लोकांना आपले रहाणीमान वाढवता येईल काय? तिसऱ्या लाटेने अनेक पर्याय सादर केलेले असताना लोक बालमृत्यूचे प्रमाण कमी करू शकणार नाहीत काय? जीवनकाल वाढवू शकणार नाहीत काय? साक्षरता, पोषकता आणि जीवनाचा एकूण स्तर उच्च करणे साधू शकणार नाहीत काय? हे सर्व दुसऱ्या लाटेतील यांत्रिकता टाळून करता येणे शक्य होणार नाही काय?

अनुक्रमणिका

उद्याची विकसाची धोरणे वॉशिंग्टन, मॉस्को, पॅरिस किंवा जिनेव्हाकडून न येता आफ्रिका, आशिया किंवा लॅटिन अमेरिकेकडून पुढे येऊ लागतील. ही धोरणे ज्या त्या ठिकाणची असून प्रत्यक्ष स्थानिक गरजांशी सुसंगत असतील. कुठलाही बाहेरचा कित्ता गिरवण्याच्या भानगडीत तो पडणार नाही.

तिसऱ्या लाटेच्या चढावामुळे आपल्या सर्व प्रयत्नांना एक नवीनच यथार्थता लाभणार आहे. जगातील अत्यंत गरीब देशांना, त्याचप्रमाणे श्रीमंत देशांनाही तिच्याकडून नवनवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

पहिल्या व तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या मूलभूत उभारणीतील अनेक वैशिष्ट्यात असलेल्या मिळतेजुळतेपणामुळे आगामी काही दशकांना भूतकाळातील व भविष्यकाळातील मूलांश एकत्र आणून अधिक चांगल्या वर्तमानाचा आविष्कार करणे शक्य होईल.

ऊर्जा विषयक घ्या. तिसऱ्या लाटेत प्रवेश करण्याऱ्या देशांपुढे ऊर्जाविषयक पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. त्याचप्रमाणे पहिल्या लाटेखालील देशांनाही हा प्रश्न भेडसावत आहे. अगदी खालच्या पातळीवर म्हणाल तर कुठल्या प्रकारची ऊर्जा मिळवायची हाच प्रश्न आहे!

श्री. अमूल्यकुमार एन्. रेड्डी या भारतीय शास्त्रज्ञाने असे दाखवून दिले आहे की, शहरातील विशाल, केंद्रित पुरवठ्यांपेक्षाही ग्रामीण भागात विकेंद्रित ऊर्जेची आवश्यकता फार मोठ्या प्रमाणात आहे.

भूमिहीन शेतकऱ्यांच्या कुटुंबाला दिवसातील जवळजवळ सहा तास स्वयंपाक व ऊब यांच्यासाठी जळण गोळा करण्यासाठी घालवावे लागतात. आणखी चार ते सहा तास विहीर किंवा पाण्याच्या दुसऱ्या एखाद्या ठिकाणाहून पाणी आणण्यासाठी खर्च करावे लागतात. एवढाच वेळ त्यांना गुरे, बकऱ्या, शेळ्या चारण्याच्या कामात घालवावा लागतो. श्री. रेड्डी म्हणतात, की "अशा कुटुंबांना पैसे देऊन मजूर मिळवणे शक्य होत नसल्याने कमीत कमी तीन मुले असावीत (जास्त असली, तर उत्तमच!) असा त्यांचा साधा सरळ हिशोब असतो... ग्रामीण ऊर्जा समस्या सुटली, तर तिथला कुटुंब नियोजनाचा प्रश्नही हलका व्हायला मदत होईल."

श्री. रेड्डींनी ग्रामीण ऊर्जा आवश्यकतेचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे, की छोटा व स्वस्त बायो गॅस प्लँट मानवी व प्राणिज उत्सर्जनाचा वापर करून त्यापासून ऊर्जा इतक्या प्रमाणात निर्माण करू शकेल की तिथे ऊर्जा विपुल प्रमाणात उपलब्ध होऊ शकेल. अशा तऱ्हेचे कित्येक हजार संच आर्थिक, सामाजिक वगैरे सर्व दृष्टींनी, मोठ्या वीजनिर्मिती संचांच्या निर्मितीपेक्षा, स्वस्त व उपयुक्त ठरतील.

भारतात सध्या बायोगॅसचे १२,००० संच उपयोगात आणले जात असून सध्याचे लक्ष आहे १००,००० हे संचांचे बांगला देशातही या दृष्टीचे प्रयत्न चालू आहेत. चीनमध्ये २००,००० संचांची योजना अंमलात आणली जात आहे, तर कोरियात सध्या २९,४५० संच उपयोगात आणले गेलेले आहेत. येथील इ. स. १९८५ पर्यंतचे, लक्ष्य आहे ५५,००० संचांचे!

दिल्ली लगतच श्री. जगदीश कपूर या लेखकाने व उद्योगपतीने, दहा एकर ओसाड माळजमिनीत जगप्रसिद्ध 'सूर्यशक्ती शेत' तयार केले असून त्यात बायोगॅस प्लँटही उभारला आहे. ह्या शेतात भरपूर

धान्य, फळे आणि भाजीपाला तयार होत असून त्याच्या कुटुंबाच्या व नोकरांच्या याबाबतच्या गरजा पूर्ण होऊन यातील टनावारी बाजाराला नफ्याच्या विक्रीला उपलब्ध होऊ शकते!

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने दहा किलोवॅट क्षमतेच्या सूर्यऊर्जा प्लँटचा आराखडा तयार केला असून, एका खेड्याच्या घरातील दिवे, पाण्याचे पंप, आणि सार्वजनिक टी. व्ही. सेट व रेडिओ सेट यांची ऊर्जागरज हा संच भागवू शकेल. मद्रासमध्ये सूर्यशक्तीवर चालणारा क्षार उत्सर्जक संच तयार करण्यात आला आहे. आणि दिल्लीजवळील सेंट्रल इलेक्ट्रॉनिक्स्ने घरातील वापरासाठी वीज तयार करण्यासाठी फोटोव्हाल्टिक सोलर सेल्सची योजना प्रत्यक्षात आणून दाखवली आहे.

इस्त्राइलचे जीवनशास्त्रज्ञ हमीम अबीब यांनी अशी एक इजिप्त–इस्त्राइल संयुक्त योजना मांडली आहे की सिनाईत इजिप्तचे पाणी आणि इस्त्राइलचे प्रगत पाणी पुरवठा तंत्रज्ञान वापरून ज्याचा साबुदाणा तयार करतात त्या टापिऑका किंवा ऊस याचे उत्पादन करावयाचे. नंतर त्याचे इथिनॉल किंवा मोटर इंधनात रूपांतर करावयाचे. या शिवाय उसाच्या चिपाडांचा गुरे व बकऱ्या खाद्यासाठी, तसेच वनस्पती मूलद्रव्यांचा कागद उत्पादनासाठी वापर करण्याची योजना आहे. अशाच प्रकारच्या योजना आफ्रिका, दक्षिणपूर्व आशिया, व लॅटिन अमेरिका या भागातही अमलात आणता येणे शक्य असल्याचे अदोब यांनी सुचविले आहे.

दुसऱ्या लाटेच्या कोलमडीचा एक भाग असलेल्या ऊर्जापेचप्रसंगामुळे अशा नवीन कल्पनांचा– केंद्रित आणि विकेंद्रित छोट्या मोठ्या प्रमाणातील ऊर्जा उत्पादनासाठी जन्म होतो आहे. पहिल्या किंवा तिसऱ्या लाटेखालील कोणताही समाज दुसऱ्या लाटेच्या युगासाठी आखलेल्या ऊर्जा पद्धतींचा आश्रय घेणे शक्य नाही.

शेतीचे काय? या क्षेत्रातही तिसरी लाट परंपरेहून वेगळ्या दिशेने आपल्याला नेते आहे. ॲरिझोनामधील ट्युस्कॉन येथील एन व्हायरोन्मेंटल रिसर्च लॅबमध्ये लांबलचक थाळ्यांमधून कोळंबीची पैदास करण्यात येत आहे. त्यांच्या शेजारीच काकड्या व लेटिस यांची लागवड आहे. कोळंबीच्या उत्सर्जनाचा खतासारखा वापर करून घेऊन भाजीचे उत्तम उत्पादन करण्याचा येथे प्रयत्न होतो. व्हर्माँट येथेही अशाच प्रकारचे परंतु थोडे वेगळे प्रयत्न चालू आहेत. येथे माशांच्या टाकीत दिवसा सूर्याची उष्णता साठवली जाते व रात्री थंडी कमी करून उबदारपणा वाढवण्यासाठी ती बाहेर फेकली जाते. इथे माशांच्या उत्सर्जनाचा भाजीपाल्यासाठी खत म्हणून वापर करण्यात येतो. मॅसेच्युसेटस् येथे न्यू अल्केमी इन्स्टिट्यूमध्ये माशांच्या टाक्यांच्या जाळीदार छपरावर कोंबड्यांची पिले वाढविण्यात येतात. कोंबड्यांच्या पिलांच्या उत्सर्जनापासून अल्गी नामक समुद्री वनस्पती पोसल्या जाऊन त्या ते मासे खातात. अन्न उत्पादनाच्या व अन्न प्रक्रियेच्या बाबतीतल्या प्रयोगांची व संशोधनाची ही केवळ काही उदाहरणे. यातील पुष्कळ गोष्टींचे पहिल्या लाटेखालील समाजांच्या तत्त्वाशी खास संबंध पोचतात.

यापुढील २० वर्षांसाठी अन्नपुरवठाविषयक भाकीत युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाच्या सेंटर फॉर फ्युचर्स रिसर्चने असे केले आहे, की यापुढील काळातील अनेक घडामोडी कृत्रिम खताची गरज वाढविण्याऐवजी कमीच करतील. इ. स. १९९६ पर्यंत ९० टक्के अशी शक्यता आहे, की स्वस्त व नियंत्रित स्वरूपात खते पुरवली जातील. नैट्रोजनयुक्त खतांची गरज १५ टक्क्यांनी तरी कमी होईल. नैट्रोजनची गरज पडणार नाही, अशा बियाणांची निर्मितीही केली जाईल नवीन प्रकारच्या अधिक निपज करणाऱ्या

अनुक्रमणिका

बियाणांची निर्मीती हमखास केली जाईल. २५ ते ५० टक्के वाढ उत्पादनात होईल. पवन चक्क्यांचा वापर आणखीही नवनवीन योजनांचा वापर पाणी पुरवठ्यासाठी केला जाईल. अनेक मार्गांनी उत्पन्न वाढते रहाण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

या पुढील काळात वनस्पती व पिके ऊर्जानिर्मितीची साधने म्हणूनही उत्पन्न केली जातील. हवामान हवे तसे ठेवणे, कॉम्प्युटर सॅटेलाइटचे नियंत्रण आणि प्राण्याची निपज अशा अनेक मार्गांनी जगाचा अन्नपुरवठा क्रांतिकारक रीतीने सुधारला जाण्याची शक्यता आहे. पण या शक्यता आजच्या भुकेल्या शेतकऱ्यांची पोटे भरू शकणार नाही. त्यासाठी शेतीचे नियोजन आणि संशोधन व त्यासाठी नवीन शास्त्रीय संशोधनाचा सहकारही घेऊन पुढे पावले टाकायला हवीत. कागदावरून प्रत्यक्षात योजना यायला हव्यात.

तिसऱ्या लाटेकडे आपण जात असताना ज्या नव्या तंत्रज्ञानांचा आपल्याला लाभ होणार आहे, त्यांच्याद्वारे येणाऱ्या नवीन शक्यता, नव्या क्षितिजांच्या शक्यता नाकारता येणार नाही. त्यात सागरशेतीपासून किटक व इतर जीवांचे इतर उत्पादनासाठी साधन म्हणून करण्यात येणाऱ्या वापरापर्यंत अनेक गोष्टी आहेत. युफोर्बियासारख्या वनस्पतींचे सल्फरविरहित इंधनात रूपांतर व मायक्रो ऑरगॅनिझमच्या सहाय्याने वनस्पती मूलद्रव्यांचे मांसात रूपांतर—अशा अनेक गोष्टी. आजपर्यंत ज्यांची अजिबात माहिती नव्हती अशा व ज्यांचा फारच थोडा वापर केला गेला अशा वनस्पतीचा औषध निर्मितीसाठी उपयोग करून घेतला, तर पहिल्या लाटेखालील अनेक देशांना ते वरदानच ठरेल.

इतर क्षेत्रांतही परंपरेचा कितपत अंगीकार केला जाईल याची शंका आहे. परंपरा सोडूनच प्रगतीकडे झेप घेतली जाईल. बेकार व कमी नोकऱ्या हा मोठा ज्वलंत प्रश्न पहिल्या लाटेखालील देशांना भेडसावतो आहे. लघुउद्योग, विकेंद्रित उद्योग, ग्रामीण भागाकडे परतणे असे याबाबतचे अनेक उपाय यापूर्वी आपण पाहिले आहेतच. नव्या तंत्रज्ञानावर आधारलेले उत्पादन व उत्पादन पद्धती उपकारक ठरणार आहे.

तिसऱ्या लाटेखालील दळणवळण आपल्याला नवीन सांदर्भिक यथार्थाची आवश्यकता पटवून देत राहील. औद्योगिक क्रांतीच्या काळात रस्ते सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासांच्या संदर्भात अस्तित्व राखून होते. आता इलेक्ट्रॉनिक् दळणवळण व्यवस्था आवश्यक आहे. नव्या प्रकारचे दळणवळण सुरूवातीला निर्मिती खर्चात जास्त महाग वाटेल, तरी नंतर प्रत्यक्षात, वापरात ते अधिक स्वस्त, ऊर्जेत काटकसर करणारे आणि अधिक योग्य ठरणार आहे. ग्रामीण भागाकडे उत्पादन विखुरले गेले म्हणजे तो शहरी भागाशी, इतर जगाशी निखळलेला न रहाता संबंधित राहील. शिवाय वाहतूक खर्चातही भरपूर प्रमाणात कपात होईल.

इलेक्ट्रॉनिक् टेलिकम्युनिकेशन दुसऱ्या लाटेखालील जागतिक सत्तांना लवकर परिचित झालेले असल्यामुळे त्याच्या विविध लहरींवर रशिया, अमेरिका अशा प्रगत देशांनी ताबा मिळविलेला आहे. उपलब्धापैकी २५ टक्के प्रसारणपटाचा त्यांच्याकडेच ताबा आहे. परंतु आता पहिल्या लाटेखालील व बराच काळ अविकसित असलेल्या देशांना त्याचे महत्त्व कळून चुकलेले असल्यामुळे त्यांचेही या दळणवळणाचा फायदा घेण्याच्या दृष्टीने जोरदार प्रयत्न चालू आहेत. पुनः वितरण करून हा प्रश्न सोडवला जावा असे त्यांचे म्हणणे आहे. अमेरिका व रशिया यांची याबाबतची चालढकल पाहून नवीन जागतिक माहिती प्रसारण व्यवस्थेसाठी त्यांनी आवाज उठवला आहे. परंतु यापेक्षा देखील टेलिकम्युनिकेशन व वहातूक या प्रश्नांची

अनुक्रमणिका

दुसरी बाजू सोडवणे त्यांना अतिशय अवघड होऊन बसले आहे. आपल्याला उपलब्ध झालेल्या मर्यादित साधनांचे अंतर्गत व्यवहारासाठी वाटप कसे करायचे हा प्रश्न पडला आहे. अर्थात हा प्रश्न प्रगत देशांनाही पडलेला असतो.

ऊर्जा, शेती, तंत्रज्ञान, दळणवळण या क्षेत्रातील घडामोडी व विकास या गोष्टील पेक्षाही महत्त्वाचे असे काही सुचवितात. भूतकालीन, भविष्यकालीन, पहिल्या लाटेच्या व दुसऱ्या लाटेच्या समाजाचा संगम घडून एक नवाच समाज अस्तित्वात येतो आहे. कमी भांडवलातले, खेड्यात निर्माण झालेले ग्रामोद्योग व उच्च तंत्रावर आधारलेले, काळजीपूर्वक निवडलेले काही उद्योग या दोघांचेही रक्षण व विकास करणारे अर्थकारण या सर्वांना प्रत्यक्षात आणणारे धोरण समाजात अवतरलेले दिसेल.

श्री. जगदीश कपूर यांनी म्हटले आहे की, "मानवाने प्राप्त केलेले प्रगत शास्त्र व तंत्रज्ञान आणि गांधीवादाच्या स्वप्नातील हराभरा ग्रामीण परिसर, साधीच परंतु आकर्षक ग्रामराज्ये या दोहोतला समतोल आता साधायला हवा आहे. या व्यवहार्य युतीसाठी समाजाच्या स्वरूपात, त्याच्या प्रतीकात, मूल्यात, शिक्षणपद्धती, त्याच्या प्रेरणांत ऊर्जा साधनांत आणि इतरही अनेक संस्थांत आमूलाग्र बदल व्हावयास हवा आहे."

आता वाढत्या संख्येने दूरदृष्टीचे विचारवंत, समाज विश्लेषक, विद्वान, शास्त्रज्ञ असे म्हणू लागले आहेत, की या प्रकारचा बदल आता घडूही लागलेला आहे. एक नवीनच परतु मूलभूत स्वरूपाचा संयोग आता अस्तित्वात येतो आहे : गांधी : उपग्रहांसह!

■ ■ ■

मूळचे उत्पाग्राहक

तिसऱ्या लाटेने अर्थक्षेत्राशी निगडित नसणाऱ्या व तांत्रिकतेशीही संबंध नसणाऱ्या प्रश्नांना प्राधान्य दिलेले आहे. तिसऱ्या लाटेने या प्रश्नांकडे पहाण्यासाठी आपल्याला ताजा दृष्टिकोण दिलेला आहे. शिक्षणाचाच प्रश्न घ्या. विकासाच्या केंद्रभागी शिक्षणाचे स्थान आहे ही गोष्ट सर्वजण मान्य करतात. पण कोणत्या प्रकारचे शिक्षण?

ज्यावेळी वसाहतवादी सत्तांनी आफ्रिका, भारत व इतर भागात औपचारिक शिक्षण सुरू केले, तेव्हा त्यांनी कारखाना तत्त्वाखाली शाळा उघडल्या. स्वतःच्या अत्युच्च थरातींल शाळांचा निकृष्ट अनुकरणाचे प्रदर्शन केले. आज या सर्व ठिकाणी दुसऱ्या लाटेखालील शिक्षण पद्धतींना आव्हान दिले जात आहे. शिक्षण ही वर्गात घेण्याची बाब आहे या समजुतीलाच तिसऱ्या लाटेने आव्हान केले आहे. आज शिक्षणाची प्रत्यक्ष कामाशी सांगड घालण्याची वेळ आलेली आहे. समाजसेवा, राजकीय लढे, यांच्याशी सुद्धा त्याचा कुठेतरी संबंध येत जावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गरीबच काय, श्रीमंत राष्ट्रांतूनही आपल्या शिक्षणविषयक परंपरागत गृहीतकांची पुनर्परीक्षा होणे आवश्यक झालेले आहे.

साक्षरता म्हणजे काय? तिचा हेतु काय? केवळ लिहायला आणि वाचायला येणे?— ज्ञानासाठी या गोष्टीची खरोखर आवश्यकता आहे काय? आता नव्या बदलत्या परिस्थितीत नवी साधने प्राप्त झाल्यामुळे

अनुक्रमणिका

निरक्षर शेतकरी देखील रेडिओ इत्यादिवरून मिळणाऱ्या सूचना व ज्ञानाचा अवलंब करून शहाणा होईल व अधिक उत्पादन करू शकेल अशी शक्यता नाही का?

दुसऱ्या लाटेचे लोक नेहमी म्हणतात, की भारतातील खेडूत किंवा कोलंबियन शेतकरी हे अकार्यक्षम किंवा काही न करणारे, थंड व देहशून्य आहेत. कमी पोषक आहार, परावलंबित्व, हवामान, दडपशाही, राजकीय सत्ता अशा काही गोष्टींचा परिणाम म्हणून माणूस अकर्तृत्ववान किंवा ध्येयशून्य होणे अशक्य आहे का? भरपूर पोषणानेच, अशी शक्यता आहे का की, लाखो मूलांतील बौद्धिक पातळी वाढेल, स्पर्धा करून पुढे जाण्याची इच्छा त्यांच्यामध्ये निर्माण होईल; कार्यक्षमता वाढेल, त्यांच्यात ध्येयवादही निर्माण होईल!

तिसरी लाट स्वतः बरोबर, केवळ ऊर्जा किंवा तंत्रज्ञान, शेती किंवा अर्थशास्त्र यांबाबतच नाही, तर व्यक्ती–व्यक्तींच्या प्रत्यक्ष मेंदूत आणि वर्तणुकीत होणाऱ्या क्रांतिकारक बदलाची बीजे आणत आहे.

■ ■ ■

तिसऱ्या लाटेची संस्कृतीची अजून पुरती जडणघडण झाली नाही. तरी गरीब व श्रीमंत दोघांनाही ती नवीन, स्वातंत्र्यदायक अशा शक्यतांची क्षेत्रे उघडून देत आहे. पहिल्या लाटेखालच्या जगाच्या दुबळेपणाकडे, गरीबीकडे किंवा दुःखाकडे तिने लक्ष दिलेले नाही, तर त्याच्या असलेल्या सुप्त सामर्थ्याच्या जागृतीवर लक्ष केंद्रित केलेले आहे! या पहिल्या संस्कृतीचे जे प्रमुख घटक औद्योगिक संस्कृतीच्या दृष्टीने मागासलेपणाचे ठरत होते, तेच उभरत्या तिसऱ्या संस्कृतीच्या नमुन्याच्या आदर्शांच्या आकृतींच्या संदर्भात अतिशय उपयुक्तच ठरणार आहेत.

या दोन संस्कृतींचा संगम येत्या काही वर्षात गरीब व श्रीमंत यांच्यातील संबंधात बदल घडवून आणेल. समीर अमीन या अर्थतज्ज्ञाने म्हटले आहे, की "जो भासमान पेचप्रसंग उभा करण्यात आला तो म्हणजे आजच्या पाश्चिमात्य तंत्रज्ञानाची नक्कल करावी की शतकापूर्वीच्या पाश्चिमात्य जगातील स्थितीला लागू पडणाऱ्या जुन्या तंत्राचा अवलंब करावा हा होय. त्याचा नाश करण्याची अत्यंत गरज आहे." तिसरी लाट हीच गोष्ट शक्य करून दाखवणार आहे.

भावी काळात होणाऱ्या अत्यंत विलक्षण शर्यतीत भाग घेण्यासाठी आज जगातले गरीब व श्रीमंत सज्ज झालेले आहेत!

अनुक्रमणिका

# एकवीस । भरतवाक्य : महान संगम

केवळ एका दशकापूर्वी आपण घडणाऱ्या बदलांची संगती लागत नसल्याने गोंधळलेल्या अवस्थेत होतो. आज या बदलांच्या गोंधळामागची संगती आपल्याला चांगल्या तऱ्हेने लागू लागलेली आहे. सुसंगत, उत्कृष्ट नमुना तयार होऊ लागलेला आहे. भविष्य आकार घेऊ लागले आहे.

अत्यंत महत्त्वपूर्ण असे ऐतिहासिक संगम घडवत बदलांच्या वेगवान नद्या एकमेकींशी मिसळून जात तासातासाला अधिक वेग घेणाऱ्या बदलाच्या तिसऱ्या लाटेच्या विशाल 'सागराची' उभारणी करत आहेत.

बदलाची ही तिसरी ऐतिहासिक लाट औद्योगिक समाजाच्या सरळ रेषेचीच वाढ नसून दिशेचाच मूलभूत बदल असणार आहे. पूर्वी जे अस्तित्वात होते, त्याचा सरळ व स्पष्ट नकार आकार घेणार आहे. आपल्या डोळ्यांदेखत, ३०० वर्षांपूर्वी जशी औद्योगिक क्रांती घडवून आणली गेली, तशीच, क्रांती घडणार आहे. केवळ तांत्रिक क्रांती घडत नसून खऱ्याखुऱ्या अर्थाने पूर्णतः नवी संस्कृती अवतरत आहे. अनेक पातळ्यांवर एकाच वेळी व समांतरपणे बदल घडत आहेत.

प्रत्येक संस्कृती विशिष्ट परिस्थितीत आकार घेत असते, परिस्थितीला आकार देखील देत असते. लोकसंख्या व साधने यांची मिश्रणे घडवत असते, मिश्रणे बदलत असते आणि त्यांच्यातून प्रतिबिंबित होत असते. प्रत्येक संस्कृतीचे असे एक विशिष्ट तंत्रज्ञान क्षेत्र असते. विशिष्ट ऊर्जा पद्धत विशिष्ट उत्पादन पद्धतीशी निगडित असते. तिची एक विशिष्ट वितरणपद्धत देखील असते. एकमेकांशी संबंधित असलेल्या अशा सामाजिक संस्थांनी बनलेले विशिष्ट सामाजिक क्षेत्र प्रत्येक संस्कृतीला लाभलेले असते. प्रत्येक संस्कृतीचे माहितीक्षेत्र, दळणवळणाचे स्रोत—ज्याच्याद्वारे माहितीचे वहन होत असते— हेही विशिष्ट स्वरूपाचे असते. प्रत्येक संस्कृतीच्या शक्तीचे एक विशिष्ट क्षेत्र असते. शिवाय, प्रत्येक संस्कृतीचे बाह्य जगाशी असलेल्या संबंधांचे वैशिष्ट्यपूर्ण उदा : शांततामय, स्फोटक, वा प्रतिकात्मक असे संच असतात. प्रभावी सांस्कृतिक गृहीतकांचे हे संच संस्कृतीच्या वास्तवाबाबतच्या दृष्टिकोणांची उभारणी करतात आणि तिच्यातर्फे घटनांना न्याय देतात.

तिसऱ्या लाटेतर्फे जुन्याची केवळ विस्कट होणार नाही, तर नव्याची पायाभरणी होणार आहे. सध्या होत असलेल्या क्रांतिकारक व स्वयंशक्तिमान बदलांतून हे निष्पन्न होणार आहे.... आपल्याला आता प्रथमच यापैकी काही प्रमुख घटकांची ओळख पटणार असून, त्यांच्यात एकमेकांत असलेले संबंधही काही प्रमाणात उमगणार आहेत... आपल्या सध्याच्या संस्कृतीपेक्षा येऊ लागलेली तिसरी संस्कृती अधिक सभ्य, चांगली व लोकशाही तत्त्वांनी युक्त अशी असणार आहे ही गोष्ट उत्साह वाढवणारी आहे.

तथापि स्थित्यंतराच्या काळात सामाजिक फाटाफूट, विक्राळ आर्थिक चढउतार, विभागीय चकमकी, मोकळ्या होणाऱ्या जागा पटकावण्यासाठीच्या धडपडी, तंत्रविषयक उलथापालथी व विनाश, राजकीय खळबळी, हिंसाचार, लढाया, लढायांच्या धमक्या, या सर्वांनी परिस्थिती भरलेली व भारलेली असेल. संस्थांचे किंवा मूल्यांचे विक्रेंद्रिकरण होत असून सत्ताप्राप्तीच्या चळवळींचेही वातावरण आहे. दोन संस्कृतींमध्ये होणाऱ्या चकमकी धोकासूचक आहेत.

अनुक्रमणिका

तरीदेखील शेवटी सर्वनाश होणार नसून, टिकावच धरला जाणार आहे. आणि बदलाची प्रमुख मुसंडी आपल्याला कुठे नेत आहे, हे जाणणे फार महत्त्वाचे आहे. आगामी अल्पकालीन व भयप्रद जोखिमा टाळत टाळत जमेल तर आपण कोणत्या प्रकारच्या जगात प्रवेश करणार आहोत? कोणत्या प्रकारचा समाज आकाराला येत आहे?

■ ■ ■

उद्याचे आधार

तिसऱ्या लाटेची संस्कृती विविध मार्गांनी ऊर्जा प्राप्त करेल. हैड्रोजनपासून सौर, पृथ्वीच्या पोटातील उष्णतेपासून, लाटांपासून, जैविक ऊर्जेपासून अशा अनेक मार्गांनी केवळ एकाच प्रकार व अधिक भर व भार देणे प्रकार आता घडणार नाही. या नव्या मार्गांच्या अनुसरणाने स्वयंसिद्धता येईल त्याचप्रमाणे साठा संपून जाण्याची भीति न राहता तो पुनः ताजा व नवा होणार असल्यामुळे अतिशय निर्धास्तपणा येईल.

तांत्रिक क्षेत्रातही तिसरी लाट वैविध्य आणणार असून त्याचा आधार जैविक, इलेक्ट्रॉनिक्सचा, भौतिक शास्त्रांचा त्याचप्रमाणे बाह्य अंतराळातून व समुद्रतळातून चालणाऱ्या प्रयोगातून मिळणाऱ्या ज्ञानापासून तयार होणार आहे. हे सर्व तंत्रज्ञान काही अपवाद सोडले तर, कमी प्रमाणात ऊर्जेचा वापर करणार आहे. शिवाय परिसराला, मानवी व प्राणीजीवनाला घातक ठरणारा भाग त्यात कमी प्रमाणात असणार आहे. आणि विशेष गोष्ट ही, की एका प्रकारच्या उत्पादनानंतर उरलेला वाया जाणारा भाग दुसऱ्या प्रकारच्या उत्पादनासाठी कच्चा माल ठरणार आहे. वेगळेच चक्र तयार होणार आहे.

कल्पकता, माहिती व ज्ञान यांच्याद्वारा आज नाश पावत चाललेल्या नैसर्गिक संपत्तीला पर्याय मिळणार आहेत. अर्थात् हे सर्व होत असताना अर्थकारणाला वरचेवर झोके बसणार आहेत. ते भयंकर झोकांड्या खाणार आहे.

माहिती व ज्ञान यांना फार मोठे महत्त्व प्राप्त होणार असल्यामुळे शिक्षणाची पुनर्बांधणी करणे नव्या संस्कृतीला आवश्यक वाटेल. शास्त्रीय संशोधनाची व्याख्या नव्याने करावी लागेल. आजच्या माध्यमांचा विचार करताना असे आढळून येंते, की छापलेल्या स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक् पद्धतीने ज्या प्रमाणात दळणवळणाचा बोजा उचलणे आवश्यक आहे, त्याला या दोन्हींचा आवाका कमी पडेल. तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीला त्यासाठी एकमेकावर कार्य करणाऱ्या, विकेंद्रित माध्यमावर समाजाच्या मनाच्या काल्पनिक व्यक्तिमत्वावर अवलंबून असणाऱ्या वैविध्यपूर्ण माध्यमावर अवलंबून रहावे लागेल.

पुढील काळात ग्राहकनिष्ठा उत्पादनाप्रमाणेच प्रेक्षकनिष्ठ कार्यक्रम प्रसारणाची शक्यता आहे. मेंदूमेंदूतही थेट दळणवळण शक्य होईल. इलेक्ट्रोरासायनिक दळणवळणही शक्य होईल. त्यामुळे नवीनच राजकीय व नैतिक प्रश्न निर्माण होतील. हे प्रश्न थक्क करणारे असले, तरी सोडवता येण्याजोगे असतील.

इलेक्ट्रॉनिक् परिसर आपल्याशी अक्षरशः संवाद करू लागेल!

अनुक्रमणिका

समाजाचे मोठ्या प्रमाणात होणारे कॉम्प्युटरीकरण मानवाच्या एकमेकांशी असणाऱ्या संबंधावर काय परिणाम करेल? लोक अजूनही दुखावत रहातील, हसतील, रडतील, एकमेकांमध्ये सुख शोधतील, खेळतील... परंतु संदर्भात खूपच फरक पडलेले असतील!

तिसऱ्या लाटेखालील कारखाने इतर संस्थांसाठी आदर्शभूत नमुने ठरणार नाहीत. उत्पादनहेतु व पद्धतीही बललेल्या असतील. ऊर्जा वापराचे प्रमाण कमी झालेले असेल. कच्चा माल वाया जाण्याचे प्रमाण कमी झालेले असेल. घटक कमी असतील. योजना करताना कितीतरी अधिक बुद्धिमत्ता अपेक्षिलेली असेल. विशेष म्हणजे त्यातील कितीतरी यंत्रे खुद्द ग्राहकांकडूनच कार्यान्वित झालेली असतील! या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे निष्ठुर यांत्रिकीकरण होण्याचा धोका नाही. यांत्रिक पट्टा त्यांना गती देणार नाही. आवाज खालच्या पट्टीवर येत राहील. कामगार आपल्या सोयीचे कामाचे तास निवडू शकतील. प्रत्यक्षात काम करण्याची जागा कितीतरी अधिक प्रमाणात 'माणसातली' असेल. सर्वत्र यंत्रांऐवजी आता परिसर फुलांनी बहरलेला, हिरवागार असेल. वैयक्तिक निवडीनुसार पगार व फायद्याचे गठ्ठे तयार केले जातील.

कारखान्यांप्रमाणे तिसऱ्या लाटेतील कचेऱ्या आजच्या कचेऱ्यांहून कितीतरी भिन्न असतील. आपण पाहिले आहेत, की कागदाची जागा दुसऱ्या वस्तू घेतील. उदा : मायक्रोफिल्म्स् ध्वनिफिती इ. इलेक्ट्रॉनिक्समुळे जुनी परंपरागत सेक्रेटरीची कामे कमी झालेली असून नव्या कामांची क्षितिजे खुली होतील.

नव्या प्रकारचे कारखाने व कचेऱ्या चालविण्यासाठी नव्या पद्धतीला योग्य अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांची आवश्यकता निर्माण होईल. असे नोकर तयार करण्यासाठी शिक्षणपद्धतीत बदल करायला हवा. कारण शिक्षणपद्धती अजूनही दुसऱ्या लाटेचे बोट धरूनच चालते आहे...

तिसऱ्या लाटेने केलेला सर्वात लक्षणीय बदल म्हणजे कामाच्या जागेत केलेला बदल असेल. कारखाना व कचेऱ्या यांच्याऐवजी घर हीच, जास्ती करून, कर्मभूमी ठरणार ही गोष्ट दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर अभूतपूर्वच ठरणार.

आपल्याला या सर्वावरून तिसऱ्या लाटेच्या संस्थात्मक रचनेची कल्पना येऊ शकेल. उद्याच्या जगात कारखान्याऐवजी विद्यापीठ ही केंद्रीभूत संस्था असेल. कारण माहिती व ज्ञान यांना फार महत्त्व प्राप्त झालेले असेल.

'माहिती व्यवस्थापक' हा उद्याचा नवा उद्योग त्यांच्या कॉम्प्युटररूमला नव्या संस्कृतीचे केंद्र बनवेल. शास्त्रज्ञांचे लक्ष औद्योगिक संशोधन प्रयोगशाळेत केंद्रित झालेले असेल. काही हिप्पी शेतीची जवळीक पुनः केंद्रस्थानी आणू पहातील. माझे स्वतःचे मत असे आहे, की नव्या तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीत घराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले असेल. उत्पाग्राहकाचा उदय, इलेक्ट्रॉनिक कॉटेजचा प्रसार, नव्या औद्योगिक उभारणींचा शोध, स्वयंचालन, उत्पादनाचे विकेंद्रीकरण या सर्व गोष्टींचा समाजातील केंद्रीय घटक संचाचे स्वरूप उद्या पुनः प्राप्त करणाऱ्या घराकडेच रोख असणार आहे. तेथील आर्थिक, वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक कार्ये वृद्धिंगत झालेली असतील.

अनुक्रमणिका

परंतु जे तीव्र केंद्रीभवन चर्च किंवा कारखाना यांच्याबाबत झाले होते, ते होण्याची शक्यता, कुठल्याच संस्थेबाबत–घराबाबत देखील–असण्याची शक्यता नाही. कारण उद्याच्या समाजात उच्चता क्रमांकित अधिकारपरंपरा असणार नाही, तर ते पसरणारे जाळे असेल.

कार्पोरेशनचे आणि समाजवादी उत्पादक संघटनांचे इतर संस्थांवर प्रभुत्व असणार नाही. तिसऱ्या लाटेखालील समाजात कार्पोरेशन ही गुंतागुंतीची रचना ठरणार असून तिच्या ध्येये अनेकविध असतील. केवळ फायदा हे एकच ध्येय असणे शक्य नाही.

तिसऱ्या लाटेच्या समाजात विशाल प्रमाणाचे किंवा 'मोठे तेवढे चांगले' या तत्त्वाचे, दुसऱ्या लाटेतल्या प्रमाणे, महत्त्व असणार नाही. तर 'योग्य प्रमाण' आदर्श मानले जाईल.

तीनशे वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या बाजारीकरणाच्या प्रवृत्तीला नाट्यपूर्ण कलाटणी मिळाल्यामुळे, विक्रीसाठी वस्तू तयार करण्याऐवजी वापरासाठी वस्तू तयार करण्याचे धोरण प्रमुख बनत गेल्यामुळे, आपल्या आर्थिक समस्यांवर नव्या विचारांचा प्रकाश पडणार असून बेकारी, सुधारणा व स्वास्थ्य फुरसत व कामाबद्दलची भूमिका या सर्वांबाबतच्या विचारांनी वेगळे वळण घेतलेले असेल. आपण हेही पाहिले आहे, की घरकामाबाबतच्या दृष्टीकोणातही बदल झालेला असेल.

नव्या संस्कृतीतील लोक निसर्ग, प्रगती, उत्क्रांति, काळ, स्थळ, भौतिक, कार्यकारणभाव या सर्वांबाबत नवीन गृहीतकांचा स्वीकार करतील.

नवे धर्म, शास्त्रविषयक नव्या कल्पना, मानवी स्वभावाबाबतच्या नव्या कल्पना कलेचे नवे विविध प्रकार विपुलतेने उदयाला येतील.

तिसऱ्या लाटेत सत्ताही विकेंद्रित झालेली असेल. बाजारही विकेंद्रित झालेला असेल.

नवे सबध, समान संस्कृती, धर्म किंवा आर्थिक हितसंबंध अशा गोष्टीतून निर्माण होण्याऐवजी भौगोलिक जवळिकीवर अवलंबून राहिलेले असतील.

श्रीमंत जगाबाहेरच्या देशांतून गरीबीशी लढा देण्यासाठी नवी साधने हाताळली जातील. दुसऱ्या लाटेच्या समाजाचे अनुकरण केले जाणार नाही आणि पहिल्या लाटेच्या स्थितीत समाधानही मानले जाणार नाही. मूलभूत नवी विकास धोरणे हाती घेतली जातील.

औद्योगिक ब्रिटन, जर्मनी, अमेरिका किंवा रशिया यांची प्रतिकृती करण्याच्या भरात स्वतःच्या धार्मिक परंपरा, कुटुंबरचना, सामाजिक जीवन उध्वस्त करीत रहाण्याऐवजी अनेक देश स्वतःच्याच भूतकाळावर भविष्य उभारताना पहिल्या व तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टींचा संगम तयार करतील.

जीवनाच्या या नवीन मार्गांचा व्यक्तींवरच नव्हे, तर संपूर्ण पृथ्वीवरच परिणाम होणार आहे. ज्या नव्या संस्कृतीचे आपण रेखाटन केले, ती युटोपिया–थॉमस मूरने वर्णन केलेल्या आदर्श बेटाप्रमाणे–

खचित्च नाही. सर्वसुखस्थान असे तिचे स्वरूप असणार नाही. काही गंभीर समस्या निर्माण होणार आहेत. राजकीय, न्यायविषयक, समानताविषयक, नीतिविषयक, अनेक बाबीतील समस्या उद्भवत आहेत, उद्भवणार आहेत... अर्थात् तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीचा काल्पनिक रामराज्याला विरोध असणार नाही.

तिसऱ्या लाटेने स्वतःबरोबर काही गंभीर आव्हाने आणली आहेत. आण्विक दहशतवादापासून इलेक्ट्रॉनिक् हुकूमशाहीपर्यंत! तरीदेखील औद्योगिकीकरणाचे थेट रेषेतील दुःस्वप्न रूप तिच्यात असणार नाही.

आपण आता एका वेगळ्याच कल्पनेवर विचार करणार आहोत. युटोपिया ऐवजी प्रॅक्टोपिया या काल्पनिक अवस्थेचा आपण विचार करणार आहोत. युटोपियाप्रमाण प्रॅक्टोपिया आजार, राजकीय असभ्यता, किंवा दुराचार यांच्यापासून मुक्त असणार नाही, किंवा भूतकाळातील काल्पनिक आदर्शानुरूप तिचा आराखडा तयार झालेला असणार नाही.

प्रॅक्टोपिया आपल्याला एक ठाम, व क्रांतिकारक देखील, पर्याय देत आहे. वास्तविक प्राप्तीच्यादृष्टीने तो आपल्या आवाक्यातीलच आहे.

तिसऱ्या लाटेची संस्कृती आपल्याला प्रॅक्टोपिअन भविष्यकाल सादर करते आहे. या संस्कृतीत व्यक्तीला स्वातंत्र्य असणार आहे. वंशीय, प्रादेशिक, धार्मिक व उपसांस्कृतिक वैविध्य पुरवणार आहे. मोठ्या प्रमाणात तिची उभारणी घराभोवतीच होणार आहे. ही संस्कृती गोठलेली असणार नाही. नवनवीन उपक्रमांनी ती चैतन्य पावलेली असेल, तरी ज्यांना काहीसे स्थैर्य हवे आहे, त्यांना स्थैर्याचा बंदिस्तपणाही मिळवून देण्यात हयगय करणार नाही. या संस्कृतीला आपल्याकडील शक्तींचे सर्वस्व बाजारीकरणासाठी ओतण्याची गरज पडणार नाही. ही संस्कृती कलेकडे तीव्र भावनांचा रोख वळवणारी असेल. ह्या संस्कृतीला अनेक गुंतागुंतीच्या विषयांना तोंड द्यावे लागेल. ही संस्कृती लोकशाही व मानवीय तत्त्वांनी भारलेली असेल. तिचा तोल आपल्या भोवतीच्या सजीव परिसराशी अधिक चांगला मिळतजुळत असेल. एकूण कार्य कठीणच आहे, पण ते साधणे अगदी अशक्य नाही.

एकमेकांशी सुरेख संगम साधत आजचे बदल या तऱ्हेने अधिक व्यवहार्य उपसंस्कृतीच्या रोखाने चाललेले आहेत. दिवसेदिवस लुप्तप्राय व अकार्यक्षम होत चाललेल्या औद्योगिक संस्कृतीला पर्याय निर्माण करत आहेत.

■ ■ ■

हे काय घडते आहे? जुनी दुसरी लाट एकाएकी अकार्यक्षम का बनली? नवीन सांस्कृतिक लाट जुन्या संस्कृतीशी का टक्कर घेते आहे?

कोणालाच माहीत नाही. आजही, तीनशे वर्षे उलटून गेल्यानंतरही इतिहासज्ञ औद्योगिक क्रांतीचे निश्चित कारण दाखवू शकत नाहीत. वेगवेगळे अभ्यासक वेगवेगळी कारणे दाखवतात. निश्चित कुणालाच काही माहीत नाही.

अनुक्रमणिका

आजही हेच घडते आहे. चित्र पालटले आहे. स्पष्ट आहे, परंतुकारणमीमांसा निश्चित काही सांगू शकत नाही. एकमेकांशी संबंधित अशा अनेक बदलांचा सगम कारणीभूत ठरत आहे. ह्या उलथापालथीच्या काळात आपल्याला एवढे समजते आहे, की ही प्रचंड झेप गुंतागुंतीच्या व वैविध्याच्या नव्या पातळीला अचानक भेदून टाकत आहे.

या म्हणण्याचा अर्थ असा, की एकच खास असे स्वतत्रपणे कार्य करणारे, साखळी खेचणारे असे कारण आपल्याला सापडत नाही. फार कशाला, या प्रकारे एक कारण कोणते हे विचारणेच चूक आहे. प्रश्नाची मांडणी चूक आहे. कारण या प्रश्नाच्यां कारणांच्या गुंतागुंतीचा आवाका समजत नाही.

ही अलिकडची ऐतिहासिक बदलाची लाट कोणीही थांबवू शकत नाही. गरज आणि यदृच्छा दोन्ही कार्यान्वित झालेल्या आहेत. परंतु लाटेच्या रोखावर आपण काहीच परिणाम करू शकत नाही. अशी अवस्था नाही. या प्रणालीला किंचित् धक्का देण्याचा अवकाश, मोठ्या प्रमाणात बदल घडू शकतील.

आज आपण व्यक्तिशः, गटांनी, किंवा सरकारद्वारे जे निर्णय घेणार आहोत, त्यांच्यामुळे बदलाच्या ओघांना वेगळे वळण मिळणे, त्यांची दिशा बदलणे किंवा त्यांना पन्हाळी प्राप्त होणे शक्य आहे. या नव्याने उठलेल्या लाटेबरोबरच्या आव्हानांची प्रतिक्रिया प्रत्येक गट वेगळ्या प्रकारे व्यक्त करेल. रशियन, अमेरिकन, जपानी, जर्मन, फ्रेंच किंवा नॉर्वेजिअन म्हणा प्रत्येकाची प्रतिक्रिया वेगळी, वेगळ्या स्वरूपाची, वेगळ्या मार्गाची असेल. एकसारखी असणार नाही.

पुढे घडणारे बदल हे सहजगत्या घडून आलेले बदल असणार नाहीत; ते संघर्षाचे परिणाम असणार आहेत. औद्योगिकदृष्ट्या प्रगत झालेल्या देशात दुसऱ्या लाटेखालील कारखाने व त्यांच्यातून निर्माण झालेल्या नोकऱ्या यांच्या रक्षणाचे प्रयत्न चालू आहेत. तिसऱ्या लाटेखाली ज्यांनी अतिप्रगत तंत्राचा अंगीकार केला आहे, व प्रत्यक्ष कार्यवाहीही सुरू केली आहे, त्यांच्याबरोबर वरील रक्षक आघाडीचा संघर्ष उठणार आहे, उठतही आहे. या संघर्षाचे परिणाम समाज भंग पावण्यात दिसतातच, शिवाय परिणामकारक राजकीय व सामाजिक घटनांसाठी, त्याद्वारे, अनेक संधी निर्माण होतात.

या दोन संस्कृतींच्या कैवाऱ्यांमधील महान् संघर्षामुळे इतर संघर्षांचे महत्त्व कमी होते आहे असे मुळीत नाही. वर्गकलह, वंशकलह, दोन पिढ्यांमधील संघर्ष, भिन्न विभागातील, भिन्न लिंगातील, भिन्न धर्मांतील सर्व प्रकारचे कलह चालूच रहाणार आहेत. यातील काही तीव्रही होतील. त्यातल्या बऱ्याच कलहांना महान् संघर्षाद्वारे आकार मिळेल, त्यांना गौणत्वही येईल.

तिसऱ्या लाटेच्या आगमनाचा रोरावता ध्वनी मोठा होत असतानाच त्यातूनही दोन गोष्टी प्रकट होतातच. पहिली गोष्ट म्हणजे समाजातील उच्च प्रकारच्या वैविध्याकडील स्थलांतर, दुसरी गोष्ट म्हणजे वेग. या ऐतिहासिक बदलांनी फार मोठी गती आता धारण केलेली आहे. आणि या दोन्हींचा प्रचंड ताण व्यक्तींवर व संस्थांवरही पडत असून त्यांना तो सहन करावा लागत आहे. त्यांना कमी वैविध्य व कमी गतीची सवय झालेली आहे. त्यामुळे या विपुल वैविध्याला आणि गतिमान बदलाला तोंड द्यायला प्रयासच पडत आहेत. या दबावामुळे त्याच्या निर्णयात्मक कार्यक्षमतेवर अतिप्रचंड प्रमाणात ओझे लादले जात आहे. त्यामुळे त्याची परिणती भावी धक्क्यात होणार आहे.

अनुक्रमणिका

आपल्याला एकच पर्याय उपलब्ध आहे. आपण स्वेच्छेने स्वतःला आणि आपल्या संस्थांना, नवीन वास्तवाला सामोरे जाण्यासाठी, नवा आकार दिला पाहिजे कारण उपलब्ध होणाऱ्या व्यवहार्य आणि सभ्य मानवीय भविष्याची एवढी किंमत आपल्याला मोजायलाच हवी. आवश्यक ते बदल करताना आपल्याला दोन ज्वलंन्त प्रश्नांबाबत एकदम नवा, ताजा आणि कल्पक दृष्टिकोण अंगीकारावयास हवा. हे दोन्ही प्रश्न आपल्या टिकावाच्या दृष्टीने अत्यंत महत्‌त्वाचे आहेत. तरीही त्यांच्याबाबत फारशी चर्चा झालेली नाही. व्यक्तिमत्‌त्वाचे भवितव्य आणि उद्याचे राजकारण...

तिकडेच आपण आता वळणार आहोत!

अनुक्रमणिका

# उपसंहार

# बावीस । नवे मानसक्षेत्र

आता एक नवी संस्कृती आकार घेत आहे. पण तिच्यात आपण चपखलपणे बसतो आहोत का? आजचे तांत्रिक बदल आणि सामाजिक उलथापालथी म्हणजे मैत्री, प्रेम, बांधिलकी आणि अगत्य या सर्वांचा अंत तर नव्हे? उद्याचे इलेक्ट्रॉनिक्स चमत्कार आजच्यापेक्षाही अधिक प्रमाणात, मानवी संबंध पोकळ आणि कसेबसे टिकवलेले असे करणार आहे काय?

हे प्रश्न अगदी योग्य व न्याय्य असे आहेत. वाटत असलेले या प्रकारचे भय फुसके नसून अर्थपूर्ण आहे. आपण आपल्या अवतीभोवती पाहिले तर आपल्याला मानसिक थकव्याची आणि बिघाडाची भरपूर उदाहरणे पहायला मिळतील. आपले मानस क्षेत्र उध्वस्त होऊन गेलेले आहे. दुसऱ्या लाटेतील ही आणखी एक मोडतोड.

आत्महत्येच्या प्रमाणात झालेली वाढ, अमली पदार्थांच्या सेवनाची जीवघेणी चटक; सर्वत्र आढळणारे मानसिक औदासीन्य, विध्वंसक वृत्ती, गुन्हेगारी या गोष्टी आता नित्याच्याच झाल्या आहेत. अनेक प्रकारच्या मानसिक आजारांसाठी तातडीच्या सेवा उपलब्ध करून देणाऱ्या जागा तुडूंब भरून जातात.

समाजकार्य, आणि मानसिक आरोग्य यांच्याशी संबंधित उद्योग सर्वत्र भरभराटीला आले आहेत. वॉशिंग्टनमध्ये प्रेसिडेंट्स् कमिशन ऑन मेंटल हेल्थने असे प्रतिपादन केले आहे, की अमेरिकेच्या लोकसंख्येपैकी एक चतुर्थांश लोक तीव्र मानसिक तणावाने पछाडलेले असतात आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ मधील मानसशास्त्रास अक्षरशः एकही घर असे नसेल, की जेथे कोणी ना कोणी कोणत्या ना कोणत्या मानसिक विकाराने पछाडलेले नसेल असे म्हणत आहे.

याचा अर्थ असा नव्हे, की पूर्वीच्या समाजात मानसिक विकार कधी अस्तित्वातच नव्हते. परंतु आता जे काही घडलेले आहे. ते खरोखर भयानक आहे. काहीतरी फार मोठ्या प्रमाणात चुकलेले आहे.

आजच्या जीवनात लोक इतके वैतागलेले आहेत, की त्यांना कशाचीच पर्वा वाटेनाशी झाली आहे. जिवाची देखील नाही! स्वतःच्याही वा दुसऱ्याच्याही!! लाखो लोकांची अवस्था तात्कालिक का होईना वैताग आणि हताशपणा यांनी भरलेली असते.

विक्रमी खपाच्या पुस्तकांनी वेडेपणात गूढ असल्याचे जाहीर केलेले आहे. बर्कलेहून निघणारे एक नियतकालीक "वेडेपणा, प्रतिभा आणि संतपणा या सर्व गोष्टी एकाच प्रांतातल्या असून त्यांना समान दर्जा व नाव मिळाले पाहिजे"; या कल्पनेला वाहिलेले आहे!

ख्रिश्चन इव्हान जेलिकल चळवळ महत्त्वपूर्ण आहे. गरीब व कमी शिकलेल्या लोकांना ही चळवळ रेडिओ व टेलिव्हिजन माध्यमातून आवाहन करीत असते. "पुनर्जन्म चळवळ" ही मोठा आकार धारण करू लागली आहे. निकृष्टतेला पोचलेल्या समाजाचा उद्धार करून त्याला मोक्षाप्रत नेण्याचे कार्य करण्यासाठी धार्मिकसंस्था आपले दूत पाठवत आहे. व आलेल्या संधीचा फायदा उठवत आहे.

अनुक्रमणिका

मानस क्षेत्रातील उत्पाताचे प्रमाण सर्वत्र सारखे आहे असे नाही. सर्वात अधिक प्रमाण अमेरिकेत आणि त्यातच विशेष करून कॅलिफोर्नियात आहे. याचा अर्थ असा आहे, की इतर ठिकाणांपेक्षा या ठिकाणी तिसरी लाट काहीशी अगोदरच येऊन पोचली.

रोम आणि ट्यूरिन येथे दहशतवाद्यांनी रस्त्यांचे कब्जे घेतलेले आहेत. पॅरिस आणि एकेकाळी शांतताप्रेमी असलेल्या लंडनमध्येही लुटारूपणा आणि विध्वंसक वृत्ती वाढत आहे. शिकागोत वयस्क लोकही अंधार पडल्यावर रस्त्यातून जायला घाबरू लागलेले आहेत. न्यूयॉर्कमध्ये शाळांतून आणि आडरस्त्यांतून हिंसाचार घडत आहेत. कॅलिफोर्नियातील एक मासिक स्वसंरक्षणाच्या विविध प्रकारांचे मार्गदर्शन पुरवते आहे.

सध्या हवेत जो उबगवाणा दुर्गंध पसरलेला आहे; तो मरू घातलेल्या दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीचा आहे!

## एकाकीपणावर हल्ला

उद्या येत असलेल्या संस्कृतीसाठी योग्य परिपूर्ति, भावनिक जीवन व शहाणेसुरते मानस क्षेत्र तयार करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला आवश्यक असणाऱ्या तीन मूलभूत गरजांची जाणीव आपल्याला व्हावयास हवी : समाज, रचना आणि सार्थकता.

कोणत्याही सभ्य समाजाने व्यक्तीमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. त्यामुळे एकाकीपणाची पोकळी भरून येते. आपण कशाचे तरी घटक आहोत ही आत्मविश्वास निर्माण करणारी भावना निर्माण होते. आज ज्यांच्यावर समाज अवलंबून आहे, अशा संस्था, तंत्राधिष्ठित प्रगत देशात, कोलमडत असल्याने एकाकीपणाचा रोग दिवसेदिवस अधिकाधिक पसरत आहे.

लॉस एंजेलीसपासून लेनिनग्राडपर्यंत दुःखी विवाहित जोडपी, एकटे रहाणारे माता किंवा पिता, सामान्य नोकरदार व कामगार, वयस्कर लोक या सर्वांची सामाजिक अलगपणाबाबत तक्रार आहे. मातापिता तक्रार करतात की त्यांच्या मुलांना त्यांना भेटायला किंवा फोन करायला देखील सवड नसते. एकांड्यांचे क्लब निघाले आहेत. तेथे मग लोक आपली सोय पाहून घेतात.

आर्थिक क्षेत्रातही एकटेपणाकडे दुर्लक्षच केले जात आहे. उपनगरातील आपल्या वैभवशाली घरात रहाणाऱ्या किती स्त्रियांनी आपल्याला खायला उठणारा वेळ नोकरीत किंवा इतर कार्यात घालवून आपले मानसिक आरोग्य टिकवण्याचा प्रयत्न केला आहे? घरातला रिकामेपणा घालवण्यासाठी, मोडून काढण्यासाठी किती पाळीव प्राणी, त्यांच्या गाडाभर खाण्यापिण्यासह, आणि इतर सोयींसह, घरात आणले जात आहेत? या एकाकीपणाचाच हातभार आपल्या प्रवास उद्योगाला आणि करमणुकीला लागत आहे. औषधे वापरण्याकडील कल वाढलेला आहे. मानसिक दडपण वाढत चाललेले आहे. उत्पादकता खालावत चाललेली आहे.

एकटेपणाची खंत तशी नवी नाही. परतु ही गोष्ट आता इतक्या प्रमाणात वाढलेली आहे, की अनेकांना त्या अनुभवातून जावे लागत आहे.

अनुक्रमणिका

परंतु समाज समाधानकारक मानसिक संबंधांची अपेक्षा व्यक्तींकडून करत असतो. व्यक्तीव्यक्तीमध्ये व त्यांच्या संस्थांतून खंबीर निष्ठांच्या बंधनांची त्याला आवश्यकता वाटते केवळ व्यक्तींच्या सहवासाची तहान भागत नाही असे नाही तर ज्या संस्थांचे ते घटक आहेत, त्यांच्याबद्दल आदर, प्रेम व निष्ठा याबाबतची त्यांची भूकही भागत नाही.

आपल्याहून मोठ्या असणाऱ्या कशाचे तरी आपण क्रियाशील भागीदार आहोत ही जाणीव व्यक्तींमध्ये आगळीच ऊब निर्माण करते. ही जाणीव वेळोवेळी निर्माण होणाऱ्या तणावांच्या वेळी, पेचप्रसंगाच्या वेळी, संकटाच्या वेळी, सामुदायिक उठावाच्या वेळी अचानक निर्माण होऊन तीव्रही बनते. सध्या या प्रकाराची सामाजिक जाणीव अण्वस्त्रविरोधी निदर्शनांनी निर्माण केलेली आहे.

एकाकीपणाच्या या भयंकर रोगाला वाढत्या प्रमाणातील सामाजिक विकेंद्रीकरण आणि वैविध्यही कारणीभूत आहे. दुसऱ्या लाटेखाली केवळ स्वतःपुरते बघण्याची सवय लागली आणि सामाजिक संपर्क नकोसा वाटू लागला.

जर तिसऱ्या लाटेखाली निर्माण होऊ घातलेल्या समाजात थंड निर्जिवता आणि हृदयशून्यता येऊ द्यावयाची नसेल, तर त्या समाजाने या समस्येवर जोरदार हल्ला चढवायला हवा. पुनः एकदा एकत्रित्वाची, एकात्मतेची म्हणजेच समुदाय भावनेची जाणिव निर्माण करायला हवी.

आपण हे सर्व कशाप्रकारे करू शकणार आहोत?

एकाकीपणा ही केवळ वैयक्तिक बाब राहिलेली नाही, तर तो एक सामाजिक प्रश्न झालेला आहे. तो देखील सामाजिक विकेंद्रीकरणामुळे निर्माण झालेला आहे; हे ओळखल्यानंतर आपण याबाबतीत काहीतरी करू शकू. समाज जिथे सुरू होतो, तिथेच आपण सुरुवात करावयाची—घरात! कुटुंबात! आपण त्याची संकुचित झालेली कार्यक्षेत्रे मोठी करावयाची.

औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात कुटुंबावर पडणारी मोठ्या, वयस्क लोकांची जबाबदारी हळूहळू कमी होऊ लागली. त्या पूर्वीच्या काळातल्याप्रमाणे ही जबाबदारी सर्वथा कुटुंबाने घ्यावी; हे म्हणणे सद्यःस्थितीत अव्यवहार्य ठरेल. या ऐवजी आपण एक गोष्ट करू शकतो. जी कुटुंबे या लोकांचे ओझे सामाजिक संस्थांवर न टाकता ती जबाबदारी स्वतः उचलू पहात आहेत, त्यांना त्यानिमित्त आर्थिक किंवा इतर प्रकारचे सहाय्य करावयाचे. यायोगे जे कौटुंबिक जिव्हाळ्याचे बंध दृढ करू पहात आहेत, त्यांना खात्रीने प्रोत्साहन मिळू शकेल.

कुटुंबांना बालांच्या, तरुणांच्या शिक्षणात व्यापक भूमिका बजावता यावी यासाठी ही प्रोत्साहनाची गरज आहे. जे पालक आपल्या मुलांना घरीच शिक्षण देऊ इच्छितात, त्यांच्याकडे अधिक्षेपाने न पहाता त्यांना शाळांनी मदत द्यावी. शाळांवरती पालकांचा अधिक प्रभाव पडायला हवा.

खुद्द शाळांनाही काही करता येण्यासारखे आहे. आपण आपल्याहून मोठ्या समुदायाचे घटक आहोत ही भावना त्यांनी मुलांत निर्माण करायला हवी. आपली एकमेकांबाबत किंवा इतरांबद्दल काही

जबाबदारी असू शकते ही महत्त्वाची भावना बालपणीच रूजली जाणे महत्त्वाचे आहे. या तऱ्हेची सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने कल्पक शिक्षणतज्ञांनी योजना तयार करणे आवश्यक आहे.

प्रचंड कॉर्पोरेशन्स छोट्या छोट्या स्वयंपूर्ण संचात कामे करू लागतील, तेव्हा मानवीय संबंध ताजे होतील, आणि समाजउभारणीच्या दृष्टीने या गोष्टीचा उपयोग होईल.

दुसरा एक समाजउभारणीचा उपाय म्हणजे निवृत्त लोकांचा आणि तरुणांचा एकमेकांशी ताजा संबंध जुळवून आणणे. प्रत्येक समाजात वयस्कर लोकांची मार्गदर्शक म्हणून नेमणूक व्हावयास हवी. त्यांच्याजवळ असलेल्या अनुभवांचा आणि ज्ञानाचा इतरांना उपयोग करून घेता यायला हवा उदा : निवृत्त फोटोग्राफर्सनी तरुणांना फोटोग्राफी—त्यातील स्वतःजवळ असणाऱ्या खुब्यांसह—शिकवावी... असे अनेक क्षेत्रांत करता येणे शक्य आहे. आणि असे करता करता निर्देशन न करताही यातील गुरूशिष्यात जिव्हाळ्याचे, निरोगी बंध तयार होतील.

वेगाने विस्कळित होत चाललेल्या समाजात एकटे असणे हे पापही नाही, किंवा ती गोष्ट कमीपणा आणणारीही नाही. तरी देखील तिच्यावर उपाय होणे आवश्यक आहे. ज्यांना एकटेपणाचा त्रास होतो आहे, त्यांनी मात्र आपल्या व्यथा कसलाही संकोच न बाळगता पुढे मांडल्या पाहिजेत. सामाजिक जीवन आणि मानवी संबंध हवे असतील, तर ते तसे खुल्या मनाने उघडपणे मान्य करावे.

आपल्याला कित्येक सेवांची—परंपरागत आणि नव्याने निर्माण झालेल्या—एकाकी लोकांना सभ्य व उन्नत मार्गांने एकत्र आणण्यासाठी, गरज पडणार आहे. लवकरच केबल टेलिव्हिजन सेवांतून 'प्रत्यक्ष' भेट होण्यापूर्वीच पडद्यावर पाहून एकमेकांची भेट ठरवता येणे शक्य होईल. (डेटिंग). केवळ तरुणांनाच याचा उपयोग, प्रेमिक किवा भावी जीवनसाथी मिळवण्यासाठी होणार नाही, तर इतरही अनेकांना साध्या भेटी किंवा मैत्रीसाठी करून घेता येईल. समाजाला आता अशा अनेक गोष्टींची गरज आहे. ज्या सेवा प्रामाणिक आणि सभ्य अशा आहेत, आणि ज्यांना वापर करून घ्यायला कसलाही संकोच वाटत नाही, त्यांचा त्याच्यासाठी जरूर वापर केला जावा.

■ ■ ■

ज्याना समाज टिकवायची खरी इच्छा आहे, त्यांनी समाजाचे तुकडे करणाऱ्या, नोकरीसाठी कराव्या लागणाऱ्या रोजच्या जा—ये कडे आणि मोठ्या प्रमाणात चाललेल्या धावपळीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रत्यक्ष प्रवासाला पर्याय म्हणून इतर प्रकारच्या दळणवळणाची योजना करायला हवी.

सर्वत्र असा समाज आहे, की कॉम्प्युटर्स व टेलिकम्युनिकेशनमुळे आपले प्रत्यक्ष संबंध कमी येतील, आणि मानवी जिव्हाळा अगदीच मामूली होऊन त्यात औपचारिकपणा येईल. परंतु प्रत्यक्षात याच्या उलटच काहीतरी घडलेले असेल. या नव्या तंत्रज्ञानामुळे कारखान्यांतील, नोकरांतील, एकमेकांतील संबंध काही प्रमाणात दुरावतील. परंतु घरांतील आणि समाजातील जिव्हाळ्याचे संबंध चांगले बळकट होतील. या तऱ्हेनेही समाजाच्या घडणीला मदतच होईल. कौटुंबिक जवळीक अधिक निर्माण होईल व उत्तम विणीचा समाज तयार होईल. इलेक्ट्रॉनिक् कॉटेज म्हणजे आई—बाबांचा व्यवसाय होईल. आई—बाबा व त्यांची मुले, वेळप्रसंगी स्नेही व त्यांची मुले यांचा समर्थ कार्यकारी संच तयार होईल.

अनुक्रमणिका

ज्या लाजाळू किंवा असमर्थ लोकांना घराबाहेर पडून काही काम करणे किंवा लोकांत मिसळणे अवघड वाटते, त्यांना देखील नवीन प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक् प्रणीत दळणवळणाने आपल्या एकटेपणाचे दुःख दूर करणे शक्य होणार असून आत्मविश्वास वाढेल तो वेगळाच.

थोडक्यात, तिसऱ्या लाटेखालील संस्कृतीची उभारणी करताना आपण अशा अनेक गोष्टी करू शकू, की ज्यांच्या योगे समाजाचा नाश होण्याचे टळून तो टिकाव धरेल आणि समृद्धही होईल.

## हेरॉइनची गुलामी

समाजाची पुनर्बांधणी हा एका मोठ्या प्रक्रियेचा छोटा भाग आहे.

व्यक्तीला केवळ समाजाची गरज आहे असे नव्हे, तर सुव्यवस्थित बांधणीची, रचनेची, मांडणीचीही गरज असते. बहुव्यापी रचनेचा अभाव असल्याने जीवन म्हणजे एक हेतुशून्य विनाश होऊन राहिले आहे हेतुशून्यतेमुळे झालेल्या मोडकळीतून जी पोकळी निर्माण झाली आहे, तिच्यातूनच मादक, अंमली पदार्थांच्या अक्षरशः जीवघेण्या व्यसनांचाउदय झालेला आहे. आजचे कितीतरी तरुण हेरॉइनच्या सवयीच्या आहारी गेलेले आहेत.

हे अपयश व्यक्तिगत स्तरावरचे राहिलेले नसून ते सामाजिक अपयश आहे, समाजात माजलेल्या अंहाधुंदीचा, शिस्तीच्या अभावाचा तो परिणाम आहे.

शिस्तीच्या जोडीला अर्थही लुप्त झालेला आहे. ज्यावेळी व्यक्तीचे कुटुंबाशी, समाजाशी, धार्मिक संस्थांशी किंवा राजकीय चळवळींशी निकोप संबंध असतील तेव्हाच व्यक्तीच्या जीवनाला काहीतरी अर्थ असतो. व्यक्तीने कुठल्यातरी मोठ्या अस्तित्वाचा, विश्वाचा देखील, घटक असणे या जाणिवेमुळेच आपण काहीतरी करण्यासाठी प्रवृत्त होतो.

सध्या जगात चालू असलेली मोडकळ व्यक्तीच्या मनावर परिणाम करून तिला सामर्थ्यहीन आणि हेतुरहीत, ध्येयरहीत करत आहे.

औद्योगिक संस्कृतीचा ऱ्हास, व्यक्तीला सोसावा लागणारा एकाकीपणा, शिस्तीचा, रचनेचा अभाव आणि हेतुशून्यता या गोष्टी ध्यानात घेतल्या म्हणजे सध्या घडणाऱ्या कितीतरी सामाजिक घटनांच्या कोड्यांवर प्रकाश पडतो. त्यातीलच एक घटना म्हणजे विविध पंथांचा उगम.

## पंथांचे रहस्य

बुद्धिमान भासणारे, जीवनात यशस्वी झाले आहेत असे दिसणारे हजारो लोक दुसऱ्या लाटेच्या प्रणालीला पडलेल्या फटीतून उगवलेल्या निरनिराळ्या असंख्य पंथांकडे का आकर्षित होतात? एक जिम जोन्स आपल्या अनुयायांच्या जीवनावर संपूर्ण अधिसत्ता कशी गाजवू शकतो?

अनुक्रमणिका

आज ढोबळ मानाने सुमारे ३,०००,००० अमेरिकन लोक जवळजवळ १,००० धार्मिक पंथांचे अनुयायी झालेले आहेत. युनिफिकेशन चर्च, डिव्हाइन लाइट मिशन, हरेकृष्ण ही त्यातल्या काही मोठ्या पंथांची नाही. या पंथांची मंदिरे आहेत. बहुतेक मोठ्या शहरांतून त्यांच्या शाखा पसरलेल्या आहेत. सन म्युंगम्यून युनिफिकेशन चर्च हा एवढा बडा पंथ आहे, की त्याचे ६० त ८० हजार सभासद असून स्वतःचे दैनिक न्यूयॉर्कहून प्रकाशित होत असते. ह्या सर्व पंथाचे निधी फार मोठ्या प्रमाणातील आहेत.

एकाकी लोकांसाठी पंथ हे सुरुवातीला भेदाभेदापलिकडची मैत्री सादर करतात. “जर कोणी एकाकी असेल, तर त्याच्याशी आम्ही बोलतो. इथे पुष्कळ लोक इकडेतिकडे वावरताना दिसतात” असे युनिफिकेशन चर्चचा एक अधिकारी म्हणतो. एकाकी माणसाशी मैत्री जोडायला कितीतरी लोक पुढे येतात.

पंथांकडून केवळ सामाजिक जवळिकीची भूकच भागवली जाते असे नाही व्यक्तीला अत्यंत आवश्यक वाटणारी सुसूत्रताही त्यांच्याकडून पुरवली जाते. व्यक्तीच्या वर्तणुकीवर पंथांकडून अनेक कडक बंधने घातली जातात, त्यांच्याकडून शिस्तीची अपेक्षा केली जाते, शिस्त निर्माण केली जाते. कधी शिस्त निर्माण करण्याचा उपक्रम निष्ठुरतेचे टोक गाठतो. मारहाण, सक्तीचे श्रम, त्यांना अभिप्रेत असलेल्या प्रकारचा बदिवासही वापरात आणला जातो. जीन्सटाऊन येथील सामुदायिक आत्महत्येचे विश्लेषण करताना मानसशास्त्रज्ञ सुखेडो म्हणतात, “आपल्या समाजात इतके स्वातंत्र्य आहे, की निवड करायला लोकांपुढे अनेक पर्याय हजर असतात. परंतु त्यांना योग्य निर्णय घेता येत नाहीत. इतरांनी निर्णय घ्यावा आणि आपण तो अंमलात आणावा असे त्यांना वाटते.”

या पंथांनी विक्रीला काढलेली आणखी एक गोष्ट म्हणजे जीवनाचा अर्थ पंथांचे म्हणणे असे, की आम्हाला सत्य समजलेले आहे. पंथांच्या बाहेर रहाणाऱ्या इतरांना सत्याची किंमत समजत नाही. पंथाचा संदेश नव्याने सभासद होणाऱ्याच्या कानी कपाळी रात्रंदिवस ‘ढोल बडवून’ सांगितला जातो. अखंडपणे शिकवला जातो. पढवला जातो. शेवटी हा नवागत तीच भाषा बोलू लागतो; तोच तर्कसंगित वापरू लागतो. तीच रूपके सांगू लागतो. बाहेरच्या माणसाला पंथाने सांगितलेला ‘अर्थ’ चुकीचाही वाटेल. पण बरोबर की चूक हा प्रश्नच कुठे निर्माण होतो? अर्थ आहे ना?.... बस्स!

पथाच्या सभासदाला सत्य अर्थपूर्ण असल्याची जाणीव करून देऊन वरवर विसंगत दिसणाऱ्या जगाला संगती आणि हेतु आहे हे दाखवून देण्याचे काम पंथ करतात.

पंथ समाज, रचना आणि अर्थ अतिशय महाग किंमतीला विकतात. परंतु ज्यांची मने मेलेली आहेत, ते त्यांना शरण जातात. काही जणांना त्यांच्या वैयक्तिक तेजोभंगामुळे हा एकच पर्याय उपलब्ध असतो. परंतु इतरांना हा मार्ग खचित्‌च अत्यंत महाग पडतो.

केवळ नवीन ऊर्जा पुरवठा किंवा नवीन तंत्राचा अंगीकार एवढेच करून तिसऱ्या लाटेची संस्कृती शहाणीही होणार नाही, लोकशाही तत्त्वाचीही होणार नाही. केवळ समाजउभारणी करूनही भागणार नाही. शिस्तबद्ध रचना आणि अर्थपूर्णताही हवी. सुरूवात आपण अगदी साध्या गोष्टी करून करू शकतो.

■ ■ ■

अत्यंत साध्या आणि तातडीने करण्याच्या पातळीवर व्यावसायिक व अर्धव्यावसायिक 'जीवन संघटक' तयार का करू नयेत? आपल्या दैनंदिन जीवनाची व्यवस्थित रचना व्हावी अशी इच्छा अनेकांकडून व्यक्त केली जाते.

आजच्या सामाजिक आणि तांत्रिक क्षोभाच्या परिस्थितीत एखाद्याने आपले जीवन घडवणे ही अत्यंत कठीण गोष्ट होऊन बसली आहे. काही मानसशास्त्रज्ञ या दृष्टीने मात करतात. व्यावहारिक बाबी— उदा : मैत्रीण किंवा मित्र मिळवून देणे, नोकरी मिळवून देणे, पैशाची गरज (ही) पडल्यास मदत करणे, आहारविषयक, आरोग्य विषयक सल्ला देणे, मदत करणे अशा गोष्टीत ते मदत करतात. केवळ भाषणबाजी किंवा कागदी सल्ला देत नाहीत. या तऱ्हेच्या कामाची कितीतरी अधिक प्रमाणात आपल्याला गरज असणार आहे. आणि त्यांना अशा सेवा हव्या आहेत त्यांना त्या घेण्यात आशाळवाणे वाटण्याचे काहीच कारण नाही.

शिक्षणात ज्या गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करत आलो, त्यांच्याकडे लक्ष देणे आवश्यक झालेले आहे. सरकारची रचना किंवा अमीबाची रचना शिकवण्यासाठी तासन्तास खर्च पडतात. परंतु दैनंदिन जीवनाच्या दृष्टीने उपयोगी पडेल असे शिक्षण देण्यासाठी किती प्रयत्न केले जातात? आपण उगीचच हे गृहीत धरतो की तरुणांना या गोष्टींची अगोदरच माहिती झाली आहे. प्रत्यक्ष अनुभव असा आहे की यापैकी बहुतेकांना कामाच्या जगाची किंवा व्यावसायिक जगाच्या रचनेची अत्यंत अंधुक अशीच कल्पना असते. पुष्कळांना आपण रहात असलेल्या शहराच्या अर्थकारणाच्या घडणीची कल्पना असत नाही. ज्या तऱ्हेने नोकरशाही चाललेली असते त्याबाबतचीही काही माहिती असत नाही. ज्यांना स्वतःच्या शाळेची रचना पुरेशी माहीत नसते त्यांना तिसऱ्या लाटेच्या प्रभावाने घडणाऱ्या बदलांची काय कल्पना असणार?

पंथासह, रचना पुरवणाऱ्या संस्थांकडे आपण नव्या दृष्टीने पहावयास हवे आहे. आपल्याला अतिशय कडक अशा रचनेच्या संस्थाही हव्या आहेत. आणि लवचिक नियमांच्या संस्थाही हव्या आहेत. आपल्याला परंपरागत शाळाही हव्या आहेत आणि खुले वर्गही हवे आहेत.

आज पथांनी निर्माण केलेल्या रचना व एकूण रचनाविहीनता यांच्यातील दरी मोठीच आहे. परंतु ही फट भरून काढण्यासाठी काही उपाय योजने शक्यही होणार आहे. आपण उपपंथांची निर्मिती करू शकतो. रचनाविहीनता आणि अत्यंत कडक रचना यांच्या दरम्यान त्यांची धारणा असणार आहे. धार्मिक संघटना, शाकाहारी लोकांची संघटना, इतर पंथ आणि गट यांना खरे म्हणजे प्रोत्साहन द्यायला हवे. त्यांना ज्या तऱ्हेने जगावयाचे आहे, त्या तऱ्हेने जगू द्यावे. फक्त मर्यादित व सौम्य स्वरूपाची शिस्त त्यांना पाळायला लावली पाहिजे. ती ही, की त्यांनी शारीरिक किंवा मानसिक दृष्टीने अत्याचार करणार नाही किंवा शाक्तपंथीय अतिरेक करणार नाही अशी हमी देऊन समाजात विश्वास निर्माण केला पाहिजे.

उपपंथीयांकडून मर्यादित काळासाठी लोकांना त्यांचे सभासद होता यावे; अशीही सवलत उपलब्ध व्हायला हवी. पुनः त्याच्या बाहेरील सामाजिक जीवन जगून, वाटले तर पुनः पंथात येता यावे....

या उपपंथांवरून समाजास अशा निधर्मी संघटनांचीही गरज असलेली ध्यानात येते, की ज्यांच्यामध्ये नागरी जीवनातील स्वातंत्र्य व लष्करी शिस्त या दोन्हींचा योग्य तो संगम घडवून आणलेला असेल. नागरी सेवांसाठी असलेल्या या सैन्याची व्यवस्था शहरे करतील, शाळा करतील किंवा कंपन्याही करतील. आणि त्यांच्याकडून समाजाला उपयुक्त अशा सेवा मिळत जातील. विविध सेवा आणि जीवन

अनुक्रमणिका

संघटन पुरवणाऱ्या यासारख्या संघटना लोकांना जीवनात खराखुरा अर्थ प्राप्त करून देतील. समाजाची ही खरी आदर्श सेवा असेल.

जीवनाच्या, व्यक्तीला उमगणाऱ्या अर्थांचा मेळ जागतिक दृष्टिकोणांनी युक्त असेल. जे लोक एकवेळ अशिक्षित असतील त्यांनाही आपले मोठ्या योजनातील स्थान समजणे ही गोष्ट मोठी आहे. आपल्याला नव्या संस्कृतीचे स्वागत करण्यासाठी नव्या एकसांधिक दृष्टिकोणाची आवश्यकता आहे.

अर्थ, रचना आणि समाज या एकमेकांशी सबधित असलेल्या गोष्टी म्हणजेच जगण्यायोग्य भविष्यकाळाच्या पूर्वपीठिका आहेत.

अशा तऱ्हेने विचार केल्यास आपल्याला समाजाच्या सध्याच्या दुःखाची, तटस्थतेची, आकारहीनतेची आणि निरर्थकतेची काहीशी संगती लागू शकेल. आणि लोकांच्या मानसिक पडझडीचीही त्यातून संगती लागू शकेल. हा त्रास म्हणजे भविष्यकाळाची आगाऊ चाहूल नाही, तर भूतकाळातील पडझडीचा परिणाम आहे.

अनुक्रमणिका

# तेवीस । भविष्यकालीन व्यक्तिमत्व

आपल्या दैनंदिन जीवनातील निर्णय आणि कृतींद्वारा आपण तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीला आकार देतो आहोत. आणि उलट, त्यांचे प्रत्युत्तर म्हणून तिसरी संस्कृती आपल्याला आकार देणार आहे. एक नवीन मानसक्षेत्र उभारते आहे. आणि ते आपले स्वाभाविक व्यक्तिमत्त्व मूलतः बदलून टाकणार आहोत— उद्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे!

आपल्या दैनंदिन जीवनात एका नव्याच संस्कृतीचा उद्भव होत असताना आपल्याला अशी शंका येते, की आपण स्वतःदेखील लुप्त होत चाललो आहोत की काय? आपल्या सवयी, आपली मूल्ये, आपले आचारक्रम, समस्यांबाबतचे आपले प्रतिसाद, यांच्याकडे पहाता आपण भूतकालात जमा झालो आहोत काय अशी शंका येते. आपण म्हणजे दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीचे अवशेष, आहोत काय अशी शंका येते. आपण म्हणजे दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीचे अवशेष, आहोत असे वाटु लागते. आपल्यामध्ये काही लोक असे आहेत का, की ज्यांना उद्याच्या तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीचे भावी नागरिक म्हणून संबोधता येईल? आपल्याला उद्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या रूपरेखेमध्ये 'नवीन माणूस' कुठे आढळतो का?

'नवीन माणसां'च्या काल्पनिक दर्शनाने अनेकांना वरचेवर पछाडले आहे असे इतिहासातील नोंदी पहाताना आपल्याला आढळून येते. त्यापैकी एक पहा— हिटलर एकदा म्हणाला होता, की "मी नवा माणूस पाहिला आहे... तो निर्भय आहे आणि क्रूरही आहे. त्याच्यापुढे मी भयग्रस्त होऊन उभा होतो."

कम्युनिस्टांच्या मते, आगामी मानव 'समाजवादी' असेल. परंतु ट्रॉस्ट्कीने मोठ्या उत्साहाने भविष्यकालीन मानवाचे चमकदार वर्णन केले आहे. "माणूस इतका सामर्थ्यवान होईल, इतका शहाणा होईल, आणि त्याची आकलनशक्ती इतकी वाढलेली असेल, की या सर्वांना तुलनाच असणार नाही. त्याच्या शरीरात अधिक सुसंवादीपणा आलेला असेल. त्याच्या हालचाली अधिक लयबद्ध झालेल्या असतील, त्याचा आवाज अधिक मंजुळ झालेला असेल. जीवनाचाराचे त्याचे मार्ग प्रभावीपणाने नाट्यपूर्ण झालेले असतील. अगदी सर्वसामान्य माणूसही ॲरिस्टॉटल, गटे, मार्क्स यांच्या पातळीला जाऊन भिडेल"

अशा अनेक कल्पना पहाताना एक गोष्ट जाणवल्याशिवाय रहात नाही, ती ही की, 'नवा माणूस' हा, अत्यंत वैविध्यपूर्ण अशा मानवी समाजात एका साच्याचा असणार नाही. मग तो साचा किती का आदर्श असेना. या 'नाविन्या तही वैविध्य असणार हे निश्चित!

संपूर्ण परिस्थितीत अनेक अंगांनी बदल घडत असताना त्याचा माणसावर काहीही परिणाम घडणार नाही; असे मानणे चूक होईल. समाजाची एकूण रचना बदलत असताना आपण हे पहातो आहोत, की लोकांमध्येही बदल घडत आहेत सर्व सामान्य कल्पना अशी आहे, की माणसांच्या स्वभावात व स्वरूपात, काही झाले तरी काही बाबतीत अजिबात बदल घडणार नाहीत. परंतु या मताशी मी मुळीच सहमत नाही. समाज व्यक्तीला काही वैशिष्ट्यपूर्ण गुण बहाल करत असतो, तर काही काढून टाकत असतो. याद्वारेच लोकांमध्ये गुणांचा प्रसार होत असतो, आणि लोकांमध्ये काही उत्क्रान्त बदल घडत असतात.

लोकांमध्ये काही गुण इतके समान असत, की त्यांच्याद्वारे समाजाच्या स्वभाव धर्मांची घडण होत असते. असेही म्हणता येईल, की सामाजिक वृत्ती देखील लोकांच्या स्वभाव धर्माला आकार देत असते.

तेव्हा असे म्हणता येईल, की तिसरी लाट कोणता एक आदर्श महापुरुष तयार करत नाही, आपल्यामध्ये काही वीरत्वाचे गुण पेरत नाही, तर समाजात असणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांमध्ये नाट्यपूर्ण बदल घडवून आणत आहे. नवा माणूस नव्हे, तर नव समाजधर्म तयार करत आहे. त्यामुळे आदर्श व्यक्तींच्या शोधात न राहता आपल्याला उद्याच्या संस्कृतीत ज्याना महत्त्व येण्याचा संभव आहे. अशा व्यक्तीवैशिष्ट्यांना शोध घ्यावयास हवा.

समाजात आढळून येणारे हे गुणविशेष लोकांवरच्या बाह्य दबावातून निर्माण होत नाहीत की ते त्यांचे प्रतिरूप दाखवत नाहीत. तर व्यक्तीव्यक्तींमध्ये अस्तित्वात असणाऱ्या अंतर्गत प्रेरणा किंवा इच्छांमध्ये असणाऱ्या ताणांमधून उगम पावतात परंतु एकदा, ह्या समान गुणधर्मांनी आकार घेतला, की त्यांचा समाजाच्या आर्थिक किंवा सामाजिक घडणीवर व विकासावर प्रभाव पडल्याशिवाय रहात नाही.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीनेही अशा अनेक गुणधर्मात बदल घडवून आणले होते. त्यावेळी वेगाने बदलत जाणाऱ्या परिस्थितीशी जुळते घेताना लोकांना आपल्या प्रेरणा व सवयी आणि इच्छांनाही वळण देणे भाग पडले होते. लोकांच्या सामाजिक जीवनावरही या प्रकारच्या बदलांचा परिणाम घडून येतो. नवा सामाजिक गुणधर्म, स्वभावधर्म आकार घेत प्रकट होत जातो.

आता देखील त्या प्रकारच्या मानस—सांस्कृतिक उलथापालथीच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत.

आपण दुसऱ्या लाटेतल्या, वैशिष्ट्यपूर्ण साचेबंद एकसारखेपणापासून दूर जात आहोत. अशावेळी भावी मानसक्षेत्राविषयी सरसकट सर्वसामान्य विधाने करणे अगदी अवघड आहे इतर काही बाबींपेक्षा भविष्यकाळाविषयी बोलताना आपण केवळ तर्कच बांधू शकतो.

तरी देखील तिसऱ्या लाटेच्या समाजाच्या मानसिक घडामोडीवर परिणाम करू शकतील अशा प्रभावी बदलांकडे आपण निर्देश करू शकतो. काहीही अनुमान तर आपण काढू शकत नाही, तरी काही आकर्षक समस्यांपर्यंत आपण जाऊन पोचू शकतो. कारण हे बदल बालसंगोपन, शिक्षण, काम याशिवाय आपण आपल्या ज्या प्रतिमा तयार करतो, त्या पद्धतीवरही परिणाम करत आहेत. आणि भविष्यकालीन सामाजिक स्वभावधर्मांवर या सर्व बदलांचा खोल परिणाम होणे, हे स्वाभाविकच आहे.

## वेगळ्या रीतीची वाढ

प्रथम उद्याच्या समाजात वाढणाऱ्या मुलांकडे आपण पाहू या. कारण उद्याच्या समाजात आजच्याहूनही कमी प्रमाणात मुलांवर लक्ष केंद्रित केले जाण्याची शक्यता आहे.

वृद्धत्वाकडे किंवा वृद्ध लोकांकडे सर्व उच्च तंत्रज्ञानाधिष्ठित देशांतून अधिक लक्ष पुरवले जाईल. त्या मानाने तरुण किवा लहान वयाच्या जनतेकडे कमी लक्ष दिले जाईल. शिवाय स्त्रिया अर्थार्जन करणाऱ्या व्यवसायाकडे वळू लागल्यानंतर त्यांच्या सर्व शक्तींचा ओघ मातृत्वाकडे वळणे कमी झाले आहे.

दुसऱ्या लाटेच्या काळामध्ये लाखो लोकांनी आपली स्वतःची स्वप्ने आपल्या मुलांच्या बाबतीत पूर्ण होण्याच्या आकांक्षा बाळगल्या. कारण त्यांना असे वाटत होते, की सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या आपल्याहून आपल्या मुलांचे जीवन अधिक चांगले असेल. अशी उन्नतीची अपेक्षा बाळगल्यामुळे त्यांनी आपल्या मानसशक्ती आपल्या मुलांवर मोठ्या प्रमाणात केंद्रित केल्या. परंतु आज असे आढळून येईल की, अनेक मध्यमवर्गीय मातापित्याचा भ्रमनिरास झालेला असून आपल्या मुलांना अधिक अवघड जगात जगावे लागण्याची शक्यता आहे, हे त्यांना कळून चुकले आहे. उन्नतीऐवजी अधोगती होत चालली आहे. अपेक्षांची पूर्ती होणे ही गोष्ट शक्यतेतील नाही.

या कारणांमुळे उद्या जन्माला येणारे बाळ अशा एका समाजात प्रवेश करणार आहे, की जो मुलांच्या गरजा, मागण्या, मानसिक विकास आणि तत्काळ मिळणारी कृतज्ञता या बाबतीत उत्सुकही असणार नाही, किंवा या बाबींनी तो व्यापलेलाही असणार नाही. त्यामुळे उद्या अधिक चाकोरीतील आणि कष्टप्रद अशा बालपणाची निकड भासणार आहे. पालक लोक मात्र संकुचित वृत्तीचे असतील.

भविष्यकाळात यौवनप्राप्तीपर्यंतचा किशोरावस्थेचा काळ आजच्या इतका क्लेशकारक आणि दीर्घ असणार नाही, अशी शंका येते. आजच्या जगात लाखो मुले, आई किंवा बाप यांच्या आधाराने मोठी होत आहेत. त्यांना आई नोकरीवर जात असल्यामुळे तिचा सहवासही कमीच मिळतो. सुखही कमीच मिळते.

इलेक्ट्रॉनिक् कॉटेज मधील कुटुंबातील मुले कुटुंबाच्या व्यवसायात थेट खेचली जाणार आहेत. आणि त्यांना लाहन वयातच वाढती जबाबदारी जाणवायला सुरुवात होणार आहे. या गोष्टींमुळे असे वाटते की, बालपणाचा व किशोरवयाचा काळ छोटा असणार आहे. अधिक जबाबदार व उत्पादक व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे बघितले जाणार आहे. त्याच बरोबर आणखी एक गोष्ट होणार आहे, ती ही की मुले पालकांच्या बरोबरीने काम करणारी असल्यामुळे त्यांना फारसा दडपून टाकणारा धाक सोसावा लागणार नाही. उद्या त्यांची 'मिळकत' दांडगी असणार आहे. परंतु या मुलांव्यतिरिक्त इतर मुलांची परिस्थिती इथून पुढे तशीच क्लेशकारक असणार आहे. लवकर जबाबदारी पेलत मोठी होणारी मुले आणि यथाक्रम मोठी होणारी मुले यांच्यात जाणवण्याएवढी मोठी तफावत असेल.

पुढील काळातील शिक्षणात फरक पडणार आहे. शिक्षण वर्गात किंवा चार भिंतीत होण्याऐवजी बाहेरच अधिक होईल. शिक्षण कामाशी अधिक गुंफले जाणार असून त्याचे आयुष्याचा काळ जास्त प्रमाणात व्यापलेला असणार आहे. मागील एक दोन पिढ्यांच्या मानाने मुलांच्या बाबतीत प्रत्यक्ष कामाची सुरूवातही खूप लहान वयात झालेली असेल.

अशा अनेक कारणांमुळे, तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीतील तरुणांमध्ये वेगळेच गुणधर्म व कल निर्माण झालेले असतील. या मुलांची वाढ वेगळ्या तऱ्हेने झालेली असेल. आणि नंतर तयार होणारी व्यक्तिमत्त्वेही वेगळीच असतील.

अनुक्रमणिका

## नवा कामगार

ज्यावेळी मुलगा, किंवा मुलगी किशोर वयात येतात आणि व्यवसायात पडतात त्यावेळी त्यांच्या किंवा तिच्या व्यक्तिमत्त्वावर अनेक नवीन बाह्यशक्ती कार्य करीत असतात. त्या त्यांना काही गुण बहाल करतात, तर काही शिक्षा करतात किंवा वसुली करतात.

दुसऱ्या लाटेच्या युगात मालकांना आज्ञाधारक, वक्तशीर आणि कंटाळवाणी पुनरावृत्त कामे उत्साहाने करत रहाणारे नोकर हवे असत. आणि शाळांमधून, कॉर्पोरेशन्समधून, कारखान्यांच्या आणि कचेऱ्यांच्या तत्त्वांचाच अवलंब केला जात असे.

तिसरी लाट समाजात प्रवेश करीत असताना काम कमी पुनरावृत्त झालेले आहे. व्यक्तिनिष्ठही झालेले आहे. पूर्वीचे काम एककालिकतेची अपेक्षा करीत असे. सतत होणाऱ्या कामातील बदलांशी जुळवून घेतले जाण्याची अपेक्षा करीत असे. सतत होणाऱ्या कामातील बदलांशी जुळवून घेतले जाण्याची अपेक्षा करीत असे. कामगार कामावरून बदल्या, उत्पादित मालातील बदल, कामाची पुनर्रचना आणि मान्यता प्राप्ती यांच्या चक्रात आंधळ्याप्रमाणे अडकून जात असत.

तिसऱ्या लाटेतील मालकांच्या आपल्या कामगारांबाबत अशा अपेक्षा आहेत की—काम करणाऱ्या स्त्रीपुरुषांनी जबाबदारी स्वीकारली पाहिजे. त्यांना आपल्या कामातील खाचा व खोबणी, इतरांच्या कामातील खाचा व खोबणींसह माहिती असायला पाहिजेत. त्यांना बदलणाऱ्या परिस्थितीशी चटकन जुळवून घेता आले पाहिजे. आजूबाजूच्या लोकांशी त्यांचा संवेदनात्मक मेळ जुळला पाहिजे. हे लोक अतिशय चपळ असायला हवेत.

असे लोक साधे सरळ नसतात. व्यक्तित्ववादी असतात. ज्यायोगे ते इतर लोकांच्या मानाने वेगळे ठरतात; त्या बाबींचा त्यांना अभिमान वाटत असतो.

दिवसेदिवस लोकांचा कल नवीन प्रकारच्या कामाकडे वाढत आहे. जुन्या प्रकारच्या पठडीत काम करणाऱ्या व त्या पठडीत आनंद व कौतुक वाटणाऱ्या कामगारांची व नोकरांची संख्या अमेरिकेत सध्या फक्त ५६ टक्के आहे... १७ टक्के लोकांनी तिसऱ्या लाटेतील मूल्यांचा अंगीकार केलेला आहे. परंतु पूर्णत्वाने तिकडे जाण्यासाठी मध्यमवर्गीय तरुणांचा ओढा दिवसेदिवस अधिक तीव्र होत चाललेला आहे. आज ते “अधिक जबाबदारीचे भुकेले आहेत. आणि त्यांच्या प्रतिभेच्या व कौशल्याच्या संपूर्ण लायकीच्या योग्य अशा पात्रतेच्या, अत्यंत महत्त्वपूर्ण कामाची त्यांची आकांक्षा आहे.” त्यांना आर्थिक मोबदल्यापेक्षा अधिक म्हणजे ‘अर्थपूर्णते’ची इच्छा असते.

अशा नोकरांच्या भरतीसाठी मालकही अतिशय उत्सुक असतात. त्यांना अनेकविध सवलती द्यायलाही ते मागेपुढे पहात नाहीत.

या नव्या प्रकारच्या लोकांना पैसा नको असतो असे नाही. त्यांना पैसा हवाच असतो. परंतु ठराविक मर्यादेपर्यंत पैसा मिळाल्यानतर त्यांच्या अपेक्षा असतात, त्या विविध स्वरूपाच्या असतात.

अनुक्रमणिका

जे कामगार प्रतिउत्तर करतात (ठराविक मर्यादेपर्यंतच) त्यांना, जे ‘अर्थ’ शोधतात, जे अधिकाराला आव्हान देतात, जे सारासार विवेकाचा वापर करू इच्छितात, जे असे म्हणतात की त्यांचे कार्य सामाजिक जबाबदारीचे असले पाहिजे, असे लोक दुसऱ्या लाटेखालील उद्योगांना अत्यंत त्रासदायक वाटतात. परंतु तिसऱ्या लाटेखालील उद्योग अशा लोकांशिवाय चालूच शकत नाहीत, अशी परिस्थिती आहे.

त्यामुळे आपल्याला एक सूक्ष्म पण सखोल स्वरूपाचा बदल व्यक्तिमत्त्वातील वैशिष्ट्यात पडत चाललेला आढळतो. ह्या बदलाला नवीन अर्थकारणही जबाबदार असते. ह्या बदलाने उभरत्या सामाजिक स्वभावधर्माच्या घडणीवर परिणाम होतो.

■ ■ ■

लहानाचे मोठे होणे, शिक्षण व काम यांचाच तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीतील व्यक्तिमत्त्वाच्या घडणीवर परिणाम होणार आहे असे नाही. उद्याच्या मानसक्षेत्रावर याहूनही तीव्र परिणामकारक शक्ती कार्य करणार आहेत. नोकऱ्या व पगार याहून अधिक काहीतरी विचार करण्याजोगे आहे.

अर्थकारणाचे दोन विभाग आहेत. त्यातील एकात वस्तूंचे बदलाच्या, विक्रीच्या हेतूने उत्पादन होत असते; आणि दुसऱ्यात आपण स्वतःसाठी काही करत असतो. एक विभाग उत्पादकांचा आहे, तर दुसरा विभाग उत्पाग्राहकांचा आहे. यातील प्रत्येकाचे आपल्या मानसावर परिणाम होत असतात. कारण यापैकी प्रत्येक गट स्वतःच्या नीतीचे, मूल्यांचे, यशाबद्दलच्या व्याख्येचे समर्थन करत असतो.

दुसऱ्या लाटेच्या काळात वैयक्तिक यशाबाबतची संकुचित आर्थिक व्याख्या तयार झाली होती.

तिसऱ्या लाटेच्या आगमनानिशी स्वावलंबन, ‘स्वतःच करा’ ची चळवळ, उत्पाग्राहकता या गोष्टीही आल्या. यात केवळ छंदापेक्षा अधिक म्हणजे वापरासाठीच्या उत्पादनामुळे अधिक आर्थिक समर्पकता आली. या प्रकारामुळे वेळ व शक्ती थोडी अधिक खर्च होत असली, तरी त्यामुळे जीवनाला आकार प्राप्त होतो आणि सामाजिक स्वभावधर्माची देखील मूस बनते.

लोकांच्याकडे काय आहे यावर बाजारी नीती लोकांचे क्रम लावत असते; तर उत्पाग्राहक नीती ते जे काही करतात त्याला फार किंमत देते. पैसा भरपूर असणे ही आजही प्रतिष्ठेची बाब समजली जाते. परंतु इतर गुणांनाही आता भरपूर किंमत आली आहे. यापैकी आत्मविश्वास, जुळते घेण्याची क्षमता, प्रतिकूल परिस्थितीतही टिकाव धरणे आणि स्वतःच्या हाताने काही करण्याची कुवत असणे या काही गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

उत्पादक किंवा बाजारनीति एकांडेपणाचे कौतुक करते, तर उत्पाग्राहक नीति सर्वांगीणतेला उचलून धरते. सर्वगुणसंपन्नतेला चांगले दिवस आले आहेत. अर्थकारणात या दोन्ही प्रकारच्या उत्पादनांचा चांगला समतोल तिसऱ्या लाटेने घडवून आणला आहे. आणि आपल्याला याचवेळी समतोल जीवन–पद्धतीचा गोडवा गाणारे सूर चढत चढत गेलेले ऐकू येऊ लागले आहेत.

■ ■ ■

अनुक्रमणिका

उत्पादक विभागाकडून उत्पाग्राहक गटाकडे सक्षम कार्याचा ओघ अधिकाधिक मोठ्या प्रमाणात लागत असल्याने एका वेगळ्याच समतोलाने लोकांच्या जीवनात प्रवेश केला असल्याची जाणीव झाल्याशिवाय रहात नाही. पूर्वी केवळ बाजारासाठी उत्पादन करत रहाणाऱ्या लोकांना आता कल्पनाविश्वात रमून जाण्याची संधी प्राप्त होते. तेव्हा शब्द, आकडे, नमुने अशा प्रकारच्या डोक्याच्या कामात त्यांना अतिशय समाधान मिळते, व त्यापासुन त्यांचा फायदाही होतो. परंतु पुष्कळांना ह्या तऱ्हेच्या कामामुळे जमिनीवरचे पाय सुटत असल्याची जाणीव होऊन त्यामुळे काहीशी खंत वाटते.

उत्पाग्राहकतेत आपण सतत भरीव आणि नजीकच्या वास्तवाशी संबंध ठेवून असतो. घटना व लोक यांच्याशी प्रत्यक्षच संबंध येत रहातो. जे लोक आपला वेळ काही प्रमाणात कामगार म्हणून व काही प्रमाणात उत्पाग्राहक म्हणून खर्च करतात, त्यांना सत्य व कल्पित या दोन्हींचाही आनंद घेता येतो. कष्ट आणि विचार, हाताचे काम व डोक्याचे काम या दोन्हीकडून चांगले सुख मिळत रहाते.

तिसऱ्या लाटेचा अंमल सुरू झाल्यावर बहुतांश लोक अर्धवेळ मोठ्या कंपन्यांतून काम करून अर्धवेळ स्वतःसाठी व कुटुंबासाठी, उत्पाग्राहक गटाप्रमाणे काम करू लागले म्हणजे वस्तुनिष्ठता आणि आत्मनिष्ठता या दोन्हींचा नवाच समतोल त्यांच्या ठिकाणी मिर्माण झालेला आढळून येईल.

ज्या लोकांना या दोन्ही प्रकारे जग पहाण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले असेल, त्याच लोकांना नवीन पद्धतीत भरपूर मोबदला मिळेल.

आपल्या डोळ्यांदेखत नवीन सामाजिक स्वभावधर्म तयार होत आहे. उत्पादकता व उत्पाग्राहकता यांमधील निरनिराळ्या मूलभूत बदलांचा संयुक्त परिणाम, बालसंगोपन, शिक्षण यात होणार ठळक व खोल बदल, ३०० वर्षांपूर्वी जसा नाट्यपूर्ण बदल समाज—मानसात झाला होता, तसाच आताही घडवून आणत आहेत.

यांपैकी आपण केलेली काही भाकिते चुकली, बदल पुढे नेण्याऐवजी मागे परत नेत आहेत असे कोणाला वाटले, तरी शेवटी मानसक्षेत्रात एक प्रकारचा उद्रेक घडवेल असे एक कारण आहेच. दोन शब्दात या कारणाचे वर्णन करता येईल.— ‘दळणवळणातील क्रांती.’

## आकार घेत असलेला ‘मी’

दळणवळण व स्वभावधर्म यातील दुवा गुंतागुंतातीचा असला, तरी अतूट आहे. माध्यमात घडून येणारो क्रांती ही मानसातील क्रांती ठरणे अपरिहार्य आहे.

दुसऱ्या लाटेच्या काळात व्यक्तींना सतत कोणत्या ना कोणत्या आदर्शाशी स्वतःची तुलना करीत रहाण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असे. काही थोड्याच मान्य शक्यतांच्या आवाक्यातच त्यांना आपल्या जीवनपद्धतीचे मूल्यांकन करावे लागत असे. समाजमान्य व्यक्तिमत्त्व पद्धतींचा पल्ला अगदीच छोटा होता.

आजच्या माध्यम विकेंद्रीकरणातून जीवनपद्धतींच्या आणि भूमिकांच्या वैविध्याचे दर्शन होते. एक तयार साचेबंद आदर्श मूर्ती तुमच्यापुढे ठेवण्याऐवजी तुकड्या तुकड्यातून आदर्शत्वाच्या कल्पना तुम्हाला

सुचवल्या जातात. त्या तुम्ही तुमच्या कल्पनेतल्या आदर्शानुरूप जोडायच्या. आपला आदर्श आपणच तयार करायचा. परंतु हे स्पष्ट आहे, की ही गोष्ट अतिशय अवघड आहे. त्यामुळेच लाखो लोक आपल्याच पूर्णादर्शाच्या शोधाच्या प्रयत्नात जणू हताश होऊन गेलेले आहेत...

त्यामुळे आज आपल्या स्वतःच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाबाबत आपल्यात विलक्षण जागरूकता आलेली आहे. आपली स्वतःचीच प्रतिमा त्यामुळे स्वरूप बदलत आहे. आपल्याला स्वतंत्रपणे ओळखले जावे, आपल्याला स्वतंत्र वागणूक मिळावी अशी मागणी आपण, ज्यावेळी नवीन उत्पादन पद्धती स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या कामगारांची मागणी करत आहेत, अगदी त्याच वेळी, करत आहात.

या प्रकारे तिसऱ्या लाटेची माध्यमे आपल्यात जे आहे, ते व्यक्त करायला मदत करत आहेत. आपल्या स्वतःच्या कल्पनाविश्वाचे आपण उत्पादक बनवले जात आहोत.

दळणवळणाच्या नव्या साधनांतील सध्याचे क्रांतीकारक लक्षण असे आहे, की याबाबत व्यक्तीची भूमिका केवळ ग्रहण करण्याची रहात नाही, तर नवीन काही सुचविण्याची, करण्याची व्यक्तीला संधी मिळते. आणि व्यक्तिनिष्ठ भूमिकेतूनच सर्व व्यवहार होण्याची येथे भरपूर शक्यता असते. दळणवळणात झालेल्या क्रांतीमुळे आपल्याला प्रत्येकाला अधिक गुंतागुंतीची अशी स्वतःची प्रतिमा मिळू लागली आहे. एकामागून एक अशा अनेक प्रतिमा आपल्याला प्राप्त होत रहातात. त्यातील प्रत्येकीचा अनुभव घेण्याच्या व निवड करण्याच्या प्रक्रियेला वेग आलेला आहे. इलेक्ट्रॉनिक प्रक्रियेद्वारे आपली प्रतिमा जगापुढे मांडण्याची शक्यताही आपल्यापुढे असणार आहे. यापूर्वीच्या कोणत्याही संस्कृतीजवळ इतकी शक्तिमान साधने नव्हती. आपल्याजवळची तंत्रज्ञानविषयक जाण वाढतेच आहे.

आपण आपल्या अनुभवांच्या भूतकाळापासून वेगाने दूर जात आहोत. यापूर्वीच्या आपल्या सर्व मानसशास्त्रीय सिद्धांन्ताना हादरे बसत आहेत. अतिशय सामर्थ्यशाली शक्ती समाजाचे स्वरूप बदलून टाकण्यासाठी एकत्र येत आहेत.

दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीपासून दूर जात असताना आपण जे बदल करत आहोत, ते केवळ बाह्य स्वरूपाचे नाहीत, तर आपल्या अंतरावकाशातही बदल घडत चालले आहेत. या दृष्टीने, दुसऱ्या लाटेच्या संदर्भात तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीतील लोकांचे चित्रण करणे चूक असणार आहे.

आपल्या कल्पना काही अंशांनी जरी बरोबर असल्या, तरी आपण खात्रीने म्हणू शकतो, की आजच्या मानाने उद्याच्या व्यक्तींमध्ये भरपूर वैविध्य असणार आहे. उद्याचे बरेच लोक लवकर वाढणार आहेत, लहान वयातच जबाबदारी दाखवणार आहेत, अधिक हुषार आणि बाकबगार असणार आहेत, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे असणार आहेत. त्यांना पैसा हवा असेल, परंतु काही मर्यादेनंतर केवळ पैशांसाठीच काम करीत रहायला ते तयार असणार नाहीत.

त्यांच्या जीवनात समतोल साधलेला असेल काम आणि खेळ, उत्पादन आणि उत्पाग्राहकता, हाताचे काम आणि डोक्याचे काम, काल्पनिक आणि प्रत्यक्ष, वस्तुनिष्ठता आणि आत्मनिष्ठता या सर्व बाबतीत ते मेळ आणि तोल राखून असतील.

अनुक्रमणिका

तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीत परिपक्व कल्पनाविश्वातील स्त्री किंवा पुरुष निर्माण झालेले असणार नाहीत, किंवा महापुरुषही अवतरणार नाहीत. तथापि एक एक वंश किंवा संस्कृती अशा प्रकारे निर्माण झालेली असेल, की जिचे वर्णन आपण अभिमानाने अगदी खऱ्या अर्थाने 'मानवी' असे करू शकू.

अर्थात् जोपर्यंत आपण राजकीय बदल घडवून आणत नाही, तोपर्यंत यांपैकी काहीही घडण्याची शक्यता नाहीं. उद्याचे व्यक्तिमत्त्व आणि उद्याचे राजकारण यांच्यामध्ये मेळ व समर्पकता असणे अत्यंत आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

# चोवीस । राजकीय कबर!

जगामध्ये ऊर्जेबाबत, तंत्रज्ञानाबाबत, कौटुंबिक जीवनाबाबत, लैंगिक भूमिकांबाबत आणि दळणवळणाबाबत क्रांती घडत असताना सुप्तपणे अत्यंत स्फोटक असलेल्या राजकीय क्षेत्रातील आज नाही तर उद्या होणाऱ्या क्रांतीशिवाय संपूर्ण संकल्पना पुरी होणे शक्यच नाही.

संपूर्ण औद्योगिक जगातील सर्व राजकीय पक्ष, सर्व कायदेमंडळे, आपली अध्यक्षपदे आणि पंतप्रधानपदे, आपली न्यायासने आपल्या प्रशासन यंत्रणा आणि सरकारी नोकरशाह्यांचे एकांवर एक असलेले थर थोडक्यात म्हणजे सामुदायिक निर्णय तयार करून ते जनतेवर लादणारी सर्व माध्यमे आता कालबाह्य ठरत असून त्यांच्यातही बदल होणे अपरिहार्य झालेले आहे. दुसऱ्या लाटेच्या राजकीय आराखड्यानुसार तिसऱ्या लाटेची संस्कृती चालूच शकणार नाही.

ज्याप्रमाणे औद्योगिक युग निर्माण करणाऱ्या क्रांतिकारकांना सरंजामशाहीच्या अवशेषांच्या आधारे कारभार करणे अगदी अशक्य झाले व त्यांनी नवीन धोरणे आखून रचना बनवून त्यांच्या आधारे आपली वाटचाल केली; त्याचप्रमाणे आता नवीन राजकीय साधने शोधण्याची पुनः एकदा गरज निर्माण झालेली आहे.

कृष्णविपर,

आज या किंवा त्या सरकारच्याच नव्हे, तर संपूर्ण प्रातिनिधिक लोकशाहीच्याच पुढे फार मोठा पेचप्रसंग आणि संकटकाळ उभा राहिलेला आहे. त्यांची तीव्रता मात्र अजून ध्यानात आलेली नाही. एकामागून एका देशात दुसऱ्या लाटेचे राजकीय तंत्र थरारू लागले आहे, करकरू लागले आहे, आणि भयानकपणे वाईट कारभार करू लागलेले आहे.

अमेरिकेत निर्णयक्षमतेला जणू पक्षाघात झालेला आहे. कोणत्याही क्षेत्रात बहुव्याप्त, समजदार धोरण अस्तित्वात नाही. असेलच, तर ते यशस्वी करण्याची धमक कोणत्यात सरकारात उरलेली नाही... नवे नियम हजारोंच्या संख्यांनी तयार केले जात आहेत. परंतु ते काहीच साधू शकत नाहीत. दिवसेंदिवस आपला रोख व धोरण बदलणाऱ्या राजकीय प्रणाली आपल्या मूलभूत सामाजिक संस्थांच्या, स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी चाललेल्या धडपडीत व झगड्यात भर घालून गुंतागुंत वाढवतच आहेत.

ही निर्णयक्षमतेची मोडकळ केवळ अमेरिकेतच नाही, तर फ्रान्स, जर्मनी, जपान, ब्रिटन, इटली व कम्युनिस्ट राष्ट्रे या सर्वांच्या सरकारांमध्ये घडत चाललेली आहे. एका जपानी पंतप्रधानांनी म्हटले आहे, "सर्व जगभरच्या लोकशाहीवरील संकटाबद्दल आम्ही अधिकाधिक प्रमाणात ऐकू लागलो आहोत. लोकशाहीच्या समस्या सोडवण्याच्या क्षमतेला किंवा तथाकथित प्रशासकतेला आव्हान मिळत आहे. जपानमध्येही संसदीय लोकशाहीची सत्त्वपरीक्षाच होते आहे."

इंग्लंडमधील एक विधायक म्हणतो, "आम्ही कायदेविषयक प्रत्येक प्रश्न सोडवला आहे. आम्ही चलनफुगवट्याविरुद्ध सात कायदे मंजूर केलेले आहेत, असंख्य वेळा अन्याय दूर केलेला आहे. पर्यावरण

विषयक समस्या सोडवल्या आहेत. प्रत्येक प्रश्न कायदेमंडळाने असंख्य वेळा सोडवून दिला आहे. परंतु प्रश्न शिल्लक राहतातच. एखादे मंडळ पुरेसे पडत नाही. त्याचा काही उपयोग नाही."

अशाच प्रकारे उच्चपदस्थांनाही दुर्बलता जाणवू लागलेली आहे. आपल्याला काहीही सत्ता नाही असे त्यांना वाटू लागलेले आहे. एक अमेरिकन सिनेटर खाजगी सवादात माझ्याजवळ स्वतःच्या हताशपणाबद्दल बोलला आणि उपयोगाचे असे काहीही आपण प्राप्त करू शकत नसल्याचे त्याने बोलून दाखवले. त्याच्या कौटुंबिक जीवनाच्या नाशाबद्दल तो बोलतो. स्वतःच्या अस्तित्वाच्या समर्पकतेबद्दल त्याला शंका वाटते. मरमर काम करण्याचा अर्थ त्याला समजत नाही. पायाला चाके लावल्याप्रमाणे अखंड चालणारा प्रवास त्याला कोड्यात टाकतो. अखंड चालणारे परिसंवाद व चर्चा आणि भासत रहाणारे चिरस्थायी दबाव यांच्याबाबत तो बालतो. "हे सर्व घडते त्यांच्या लायकीचे आहे का? या सर्वाचा अर्थ काय? अर्थात् त्याला पडणारे असे हे प्रश्न जगातल्या अनेक राजकारण्यांना पडलेले आहेत. व्हाइट हाऊसमधला एक उच्च अधिकारी अशी तक्रार करतो, की जगातला सर्वात सर्वसत्ताधीश मानला गेलेला मनुष्य म्हणजे अध्यक्ष हा देखील स्वतः निःसत्व, निर्बल असल्याचे अप्रत्यक्ष रीतीने मान्य करतो, "अध्यक्षाला असे वाटते, की जणू आपण टेलिफोन मध्ये ओरडत आहोत. दुसऱ्या बाजूला कोणीच नसतानाही!"

वेळेवर आणि सुयोग्य निर्णय घ्यायला लागणारी क्षमता भंगून गेलेली आहे, त्यामुळे समाजातील गहन सत्तासंबंधात बदल घडलेले आहेत. सर्वसाधारण स्थितीत समाजातील उच्चस्तरीय लोक राजकीय प्रणालीचा उपयोग स्वतःचे नियम बळकट करण्यासाठी व ईप्सित साध्य करण्यासाठी करून घेतात. काही बदल घडवण्याच्या क्षमतेवरून त्यांची ताकद अजमावली जाते. काही घटनांचे भाकीत करणे आणि त्यांवर हुकूमत चालवणे या गोष्टी त्यांच्याबाबत गृहीतच धरल्या जातात.

आज या उच्चस्तरीयांना खुद्द स्वतःच्या कृतींचे परिणाम काय होतील हे देखील सांगणे जमत नाही. ज्यांच्या आधारे ते कारभार करतात, त्या राजकीय प्रणाली इतक्या भंगलेल्या, जुनाट आणि घटनांहून इतक्या मागे पडणाऱ्या अशा आहेत, की स्वतःच्या फायद्यासाठी या उच्चस्तरीयांनी कितीही हुकूमत ठेवण्याचा प्रयत्न केला, तरी परिणाम सहसा स्फोटकच होतात.

मात्र याचा अर्थ असा होत नाही, की जी सत्ता या उच्चस्तरीयांनी गमावली, ती समाजातल्या उरलेल्या भागाकडे गेली आहे. सत्तांतर झालेले नाही, तर सत्ता हेतुशून्य झाली आहे. त्यामुळे कोण कशाला जबाबदार आहे, खरी सत्ता कोणाकडे आहे, तो अधिकार कितीकाळ टिकेल याबाबत अमुकवेळी निश्चित कोणीच काहीच सांगू शकत नाही, जाणूच शकत नाही. या जवळजवळ अंदाधुंदीत सामान्य लोक मात्र कडवट बनले आहेत. त्यांना केवळ आपल्या 'प्रतिनिधी'चा तिरस्कार वाटू लागला नसून आपले कोणी (खरे) खरे प्रतिनिधित्व करेल ही गोष्ट अशक्यप्राय वाटू लागलेली आहे.

मतदानाची प्रक्रिया आता आपले महत्त्व गमावू लागली आहे कितीतरी मतदार मतदान न करता घरीच बसून राहू लागलेले आहेत!

त्याचप्रमाणे राजकीय पक्ष आपले आकर्षण गमावून बसू लागले आहेत त्यांच्या सभासदांच्या आणि पाठीराख्यांच्या संख्या अतिशय मोठ्या प्रमाणात आकसू लागलेल्या आहेत.

अनुक्रमणिका

नागरीकांना आता राग येण्याऐवजी राजकीय पुढाऱ्यांबद्दल व सरकारी अधिकाऱ्यांबद्दल तिरस्कार वाटू लागला आहे. त्यांच्याबद्दल प्रतिकूल मत निर्माण झालेले आहे. त्यांना आता असे वाटू लागले आहे, की राजकीय प्रणालींनी गोंधळलेल्या समाजासाठी सुकाणूची किंवा स्थैर्यकारकाची भूमिका घ्यायला हवी, त्या ऐवजी त्या स्वतःच मोडलेल्या आहेत, भेलकांडलेल्या आहेत, आणि नियंत्रणापलीकडे गेलेल्या आहेत.

राज्यशास्त्राच्या संशोधकांनी अमेरिकेच्या राजधानीत कारभार कोण चालवतो हे जेव्हा जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा एक साधेच परंतु भयंकर उत्तर आले, 'कोणी नाही. इथे कोणाकडेच ताबा देण्यात आलेला नाही. फक्त अमेरिकेतच नव्हे, तर दुसऱ्या लाटेखालील अनेक देशात बदलाच्या तिसऱ्या लाटेमुळे पोकळीच निर्माण होत चाललेली आहे— समाजातील एक 'कृष्ण विवर.'

## खाजगी सैन्यदळे

सत्तांमध्ये निर्माण झालेल्या पोकळीत केवढा धोका भरून राहिलेला आहे, ते इ. स. १९७५ च्या दरम्यानच्या घटनांकडे पहाताना ध्यानात येते. ऊर्जा समस्या, चलन फुगवटा, बेकरी, डॉलरची घसरण, आणि आशिया, आफ्रिका व द. अमेरिका यांनी नव्या अर्थकारणाची मागणी केली. त्यानंतर ज्या उलथापालथी झाल्या, त्यातून देशादेशांतून अनेक ठिकाणी खाजगी सैन्ये उभारली गेली! नंतरच अर्थकारणाचा तोल काहीसा सावरला गेला. आणि हा उत्पातीपणा थोडा आवरला गेला. काही जणांनी असे मानले, की अरिष्ट टळले. आणि आशावाद फुलला.

परंतु पुनः असा प्रकार घडणार नाही ही हमी कोण देणार? आंतरराष्ट्रीय अर्थकारणाच्या भयंकर झोक्यांना सरकारे कशी तोंड देणार? चलनांवर नियंत्रण क्वचित्च राहू शकते. युरोचलन भेडसावीत आहेच. या व इतर अनेक बाबी अशा आहेत, की आगामी काही वर्षात स्थैर्य घडेल अशी हमी कोण देऊ शकेल? भयानक चलन फुगवटा व बेकारी, कर्जबाजारीपणा, आणि इतरही आर्थिक संकटे सांगत आहेत की खाजगी सैन्याचा धोका अजूनही आहेच!

आणि जर हजारोंच्या संख्येने भरभराटीला आलेले पंथ राजकीय धोरणाने काही संघटना बांधू लागले, तर काय घडेल?.... काही प्रमुख पंथांनी आपल्या पुरोहितांना प्रमुख मानून 'मंत्रिमंडळे' ही तयार केलेली आहेत. काहींना तर राजकारणातल्या लोकांचाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पाठिंबा आहे! स्मिथ, शुल्टझ्, सॅन्टिनी म्हणजे देखील प्रच्छन्नपणे अयातुल्लाच नव्हेत काय?

आता या सर्व कल्पना काहीशा अतिरंजित आहेत हे मी मान्य करतो. परंतु समजा, असे काही खरोखरच घडले, तर केवढे संकट ओढवेल? मागच्यापेक्षा देखील ते अधिक भयंकर असणार नाही काय? आणि दुसऱ्या लाटेच्या पठडीत तयार झालेल्या आजच्या पुढाऱ्यांची अशा प्रसंगांना समर्थपणे तोंड देण्याची पात्रता मुळीच नाही, ही गोष्ट आपण मान्य करायला हवी. शिवाय भरीत भर म्हणजे आपली दुसऱ्या लाटेची राजकीय यंत्रणा इ. स. १९७० पेक्षाही अधिक विदीर्ण झालेली आहे. इ. स. १९८० किंवा १९९० मध्ये उद्भवणाऱ्या प्रसंगांना तोंड देणे त्यांच्या कल्पनेच्याही आवाक्यापलीकडील ठरणार आहे.

त्यामुळे आपल्याला संपूर्ण रचनेचे आमूलाग्र निरीक्षण परीक्षण करणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

मसीहा गंड

मसीहा गंड हा असा भ्रम आहे, की "सर्वसत्ताधीशाला बदलून आपण आपला बचाव करू शकू." असे वाटते.

तिसऱ्या लाटेच्या आगमनासरशी ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांचा मुकाबला करताना दुसऱ्या लाटेच्या राजकारण्यांना जे अपयश आले आणि त्यांची जी बोबडी वळाली ती पहाता लाखो लोक अशा एका साध्या स्पष्टीकरणात्मक निर्णयाशी आले आहेत, की 'हे अपयश आपल्या नेत्याचे आहे.' कोणीतरी मसीहाच प्रत्यक्ष अवतरून या परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणू शकेल.

मोठमोठ्या बुद्धिमंताना आणि उच्चभ्रू लोकांनाही सर्व सांभाळून नेणारा कोणी तरी प्रभावी आणि सुयोग्य नेता निर्माण व्हावा असे वाटते आहे. कारण आपल्याला परिचित असलेले जग डळमळीत होत असलेले त्यांना दिसते आहे. एकूण परिस्थितीचे पुढे काय होणार आहे हे सांगता येणे कठीण आणि अशक्य झालेले आहे. आणि या सर्वांना हव्या असणाऱ्या शिस्त, रचना व ठाम भक्तिव्याची भूक त्यामुळे तीव्र होत जात आहे.

अमेरिकन संयुक्त संस्थानात अध्यक्षाचा, त्याच्यातल्या नेतेपणाच्या गुणांच्या अभावाबाबत अधिक्षेप होतो आहे तर निदान आपण एक 'पोलादी खंबीर स्त्री' असल्याचा भास निर्माण करण्यात यशस्वी झाल्यामुळे मार्गारेट थॅचर पुनः निवडून येऊ शकते आहे. कम्युनिस्ट औद्योगिक देशात नेतेपणात भित्रेपणा असल्यामुळे अधिक शक्तिशाली नेतेपणासाठी दबाव वाढत वाढत चालला आहे. रशियात एक आश्चर्य घडत आहे. ज्याचा अधिक्षेप काही काळ होत होता, त्या स्टॅलीनचा त्याच्या आवश्यक ते राजकीय निर्णय घेण्याच्या क्षमतेसाठी गौरव होत आहे. स्टॅलीनची 'पुनर्स्थापना' होते आहे!

आगामी दशक तसे धोक्याचेच असणार आहे. त्याची सुरुवात होत असतानाच आजची नेतेपणाबाबतची मागणी जोर करत आहे आणि नेमक्या याचवेळी पूर्वी विसरून गेलेल्या काही दुष्ट शक्ती पुनः, नव्याने आपल्या आठवणी चाळवू लागलेल्या आहेत!

घडत असलेल्या घडामोडी चमत्कारिकपणेच घडत आहेत. नुकताच मी माझ्या पत्नीसह जपानला गेलो होतो, तेव्हा आम्ही ४५ मिनिटे खोळंबलेल्या वहातुकीत अडकलो होतो. अशावेळी आम्हाला एका मिरवणुकीचे दर्शन झाले. मंदगतीने जाणाऱ्या मालमोटारीत गणवेशधारी राजकीय रासवट लोक घोषणा देत होते. आणि कोणत्या तरी सरकारी धोरणाचा निषेध करण्यासाठी त्वेषाने, आपल्या मुठी आकाशात नाचवत होते! आमच्या जपानी मित्रांनी आम्हाला सांगितले, की ह्या सर्व मोर्चेवाल्यांचा माफिया सदृश याकुझा टोळ्यांशी संबंध असून त्यांना अशा प्रमुख राजकीय व्यक्तींनी पैसा पुरवला आहे, की ज्यांना सत्ता पुनः मिळवण्याची तीव्र लालसा निर्माण झालेली आहे.

हेच 'दृश्य' इतर अनेक ठिकाणी पहायला मिळत नाही काय? अशा प्रत्येक घटनेत 'डावी' बाजू असते. समाजवादी लोकशाहीच्या घोषणा देणाऱ्या या दहशतवादी टोळ्या आपल्या स्वतःच्या शिक्क्याचा एकाधिकार कलाश्निकोव्ह व प्लॅस्टिक बॉंब यांच्या आधारे समाजावर टाकायच्या पावित्र्यात असतातच.

अनुक्रमणिका

तशातच निर्लज्ज वंशवादाने पुनः डोके वर काढले आहे!

खंबीर नेतृत्वाची मागणी उठत असतानाच प्रातिनिधिक सरकारांच्या कोलमडींचा फायदा उठवू पहाणाऱ्या, अतिशय मोठ्या प्रमाणात अधिकार गाजवणाऱ्या गटांच्या औधत्याला बहर आलेला आहे.

नेतेपणाच्या या तीव्र मागणीचा आक्रोश तीन गैरसमजुतीवर आधारलेला आहे. त्यातील पहिली ही, की अधिकारशाहीच्या कार्यक्षमतेभोवती दंतकथेसम निर्माण झालेले वलय आपल्या विचाराला मोहून टाकते. हुकूमशहाच 'गाड्या वेळेवर सोडत' असल्याच्या ठाम 'विश्वासा' सारखीच ही गोष्ट. गाड्या वेळेवर सुटण्याला खंबर नेतृत्त्वाखेरीज आणखी कितीतरी गोष्टी कारणीभूत झालेल्या असतात ही वस्तुस्थिती आहे.

दुसरी गोष्ट अशी, की अशी ठाम (गैर) समजूत होऊन गेली आहे, की पूर्वी ज्या प्रकारचे नेतेपण यशस्वी झाले, त्याच प्रकारचे आता किंवा भविष्यकाळातही यश प्राप्त करेल. ज्यावेळी आपण नेतृत्वाचा विचार करतो, त्यावेळी आपल्यासमोर असतात. रूझवेल्ट, चर्चिल आणि द गॉल. वस्तुस्थिती अशी आहे, की वेगवेगळ्या गुणधर्मांचे नेतृत्व यशस्वी होते. जे गुण एका संदर्भात प्रबळ ठरतील, तेच दुसऱ्या संदर्भात भयानक घातक ठरतील, दुबळे ठरतील!

पहिल्या लाटेच्या संस्कृतीत नेतेपण जन्मानेच मिळत होते. प्राप्त करता येत नव्हते... जो आपल्या पाठीराख्याचे संघटन करू शकत होता, तो समर्थ नेता ठरत होता, आणि मनाला येईल तसा कारभार करत होता. तर दुसऱ्या लाटेतील नेता स्वतः नेतपण प्राप्त करत होता, तटस्थ आणि अध्याहृत कल्पित सत्तेच्या संबंधात येत होता. त्याला कितीतरी वैविध्यपूर्ण बाबींवर अनेक निर्णय घ्यावे लागत होते आणि त्याचे ते निर्णय त्याच्या हाताखालच्या संघटनाद्वारे अमलात आणले जात होते. पहिल्या लाटेत समर्थ ठरलेला दुसऱ्या लाटेत कुचकामी ठरला असता.

आज आपण नव्या संस्कृतीत प्रवेश करत आहोत. आजच्या संदर्भात पूर्वी प्रबळ ठरलेले रुझवेल्ट, चर्चिल, द गॉल, स्टॅलीन देखील कुठेच बसत नाहीत! वेडा राजा लुडविगला व्हाइट हाऊसमध्ये नेऊन बसविण्याइतकी तो हास्यापद कल्पना आहे... आजच्या पुढाऱ्यांमध्ये आढळून येणारा दुबळेपणा कमी प्रमाणात व्यक्तिगत आहे. तो जास्ती करुन ज्यांवर त्यांची सत्ता अवलंबून आहे, त्या संस्थांच्या कोलमडीचा परिणाम आहे.

शिवाय आणखी एक गोष्ट अशी, की हा जो दुबळेपणा त्याच्या ठिकाणी दिसून येतो, तो वस्तुतः त्यांच्याकडे वाजवीपेक्षा जास्त प्रमाणात आलेल्या सत्तेचा परिणाम आहे. तिसऱ्या लाटेद्वारा समाजात बदल घडत असताना, त्याच्यात वैविध्य व गुंतागुंत वाढत असताना, सर्व नेते निर्णय घेताना, त्यांची अंमलबजावणी करताना लोकांच्या पाठिंब्यावर व मदतीवरच अवलंबून राहू लागलेले आहेत. नेत्याकडे जितकी अधिक शक्तिमान अस्त्रे व आयुधे आहेत— उदा. सुपरसॉनिक, फायटर्स, अण्वस्त्रे, कॉम्प्युटर्स टेलिकम्युनिकेशन्स इ. तितका तो परावलंबी होत चालला आहे.

हा संबंध तसा अतूटच आहे. मुख्यतः जिच्यावर आज सत्ता अवलंबून आहे, ती वाढती गुंतागुंतच यातून प्रकट होते. त्यामुळेच आज अमेरिकन अध्यक्षाला आण्विक पुशबटनजवळ बसून संपूर्ण पृथ्वीच्या

ठिकऱ्या उडवून टाकण्याची ताकदही मिळालेली आहे आणि त्याचवेळी टेलिफोनच्या दुसऱ्या बाजूला कोणीच नसल्याची भयाण जाणीव होऊन तो विकलताही अनुभवत आहे.

या सर्व कारणांमुळे तिसऱ्या लाटेसाठी संपूर्णतया नव्या स्वरूपाच्या नेतृत्वाची ज आहे. तथापि हे नवीन स्वरूप व अपेक्षित गुण यांचे स्वरूप अजून स्पष्ट झालेले नाही. आपल्याला एवढे खचित्‌च समजले आहे, की यापुढे नेत्याची ताकद अरेरावी, किंवा 'मी म्हणेन ती पूर्व' या प्रकारच्या धोरणात असणार नाही, तर दुसऱ्यांचेही ऐकून घेण्याच्या धोरणात असणार आहे. सक्तीपेक्षा कल्पकतेत असणार आहे. नव्या संस्कृतीत नेतेपणाला असणाऱ्या मर्यादांच्या जाणिवेत असणार आहे.

उद्याच्या नेत्यांना आजच्या पेक्षाही अधिक विकेंद्रित आणि वैविध्यपूर्ण समाजाशी व्यवहार करावयाचा आहे. यापुढे सर्व लोकांची परिस्थिती पूर्वीप्रमाणे एकसारखीच असणार नाही. सर्व धारणा एकच व्यक्ती हाताळू शकेल ही शक्यता फार कमी आहे. उद्याचे नेतृत्व अधिक तत्कालीन, सांघिक व सर्वसंमत असणार आहे.

राजकीय मसीहा अवतरावा या कल्पनेमागे नेतृत्वाची कल्पना तशी व्यक्तीरूप आहे. परंतु ते काही खरे नाही. आपण सर्व ताबा संत, प्रतिभावंत किंवा नायकांकडे दिला तरी देखील आपल्याला प्रतिनिधिक सरकाराच्या बाबतचा हद्दीचा पेचप्रसंग अनुभवावा लागलाच असता!

## जागतिक जाळे

केवळ उत्तम नेता निवडून भागत असते, तर दुसऱ्या लाटेच्या चौकटीतच आपला प्रश्न सुटला असता. परंतु प्रश्न त्यापेक्षाही खोल व गंभीर आहे.

आज असे दाट जाळे तयार झालेले आहे की, एका देशाने घेतलेला निर्णय दुसऱ्या देशात समस्या निर्माण करतो! प्रत्येक सरकार स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकते असे म्हणणे ही एक फसवणूक आहे. राष्ट्रीय पुढाऱ्यांनी आजच्या स्थितीत आपली कितीतरी कार्यक्षमता गमावली आहे. त्यांचे निर्णय महाग ठरतात, नकोसे वाटणारे असतात, भयंकर प्रतिक्रिया निर्माण करणारे असतात. सरकार व निर्णय घेण्याचे अधिकार यांच्यामधील प्रमाण आजच्या जगात अगदीच चुकीचे आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या राजकीय प्रणाली कालबाह्य ठरत आहेत.

## प्रश्नांची गुंफण

आपल्या राजकीय संस्थांमधून ज्ञानाचे देखील कालबाह्य असे संघटन प्रकट होत असते. प्रत्येक सरकारात निरनिराळ्या कार्यविभागासाठी निरनिराळी खाती निर्माण केलेली असतात. उदा. अर्थ, परराष्ट्र व्यवहार, संरक्षण, शेती, व्यापार, टपाल, दळणवळण इ. दुसऱ्या लाटेच्या नमुन्याचे अतिशय केंद्रीभूत किंवा अधिकारप्राप्त सरकार देखील एकत्र गुंफलेले गेलेले प्रश्न सोडवू शकत नाही. या सर्व संचांमधला कारभार एकात्म कसा करता येईल, आणि त्याद्वारे शिस्तयुक्त संपूर्णत्वाचा कार्यभाव कसा अंमलात आणता येईल? स्वतःला गोत्यात आणणाऱ्या विरोधाभासाचा सगळा सावळागोंधळ कसा टाळता येईल?

अनुक्रमणिका

गेल्या काही दशकांच्या अनुभवातून एक गोष्ट समजून यायला हवी होती, की सर्व सामाजिक व राजकीय प्रश्न एकात एक गुंफले गेलेल असतात. ऊर्जासमस्या अर्थकारणावर परिणाम करते, त्याचा पुनः आरोग्यावर परिणाम होतो, नंतर त्याचा शिक्षण, काम, कौटुंबिक जीवन आणि इतर हजारो गोष्टींवर परिणाम होतो. प्रत्येक प्रश्नाची स्वतंत्रपणे व्याख्या करून त्याबाबत सोडवणुकीचा प्रयत्न केला गेल्यास गोंधळ आणि अनर्थ मात्र अधिक प्रमाणात होतात.

ह्या प्रकारच्या रचनेमुळे सतत चालत रहाणारे कायदेशीर हुकुमतीबाबतचे सत्तावाद, झगडे उद्भवतात. दुसऱ्याच्या खर्चाने आपले प्रश्न सोडवले जाण्याची प्रवृत्ती जन्माला येते व वाढत रहाते आणि इतरही दुष्परिणाम होत रहातात. यामुळे एखादी समस्या सोडवण्यासाठी सरकारने केलेले प्रयत्न मूळ समस्येपेक्षाही वाईट व भयंकर अशा नवनव्या समस्या निर्माण करतात. शिवाय सरकारच्या विशिष्ट प्रयत्नांमुळे प्रश्नांची गुंतागुंत सुटण्याऐवजी केंद्रीकरणच अधिक प्रमाणात वाढते. आणि सत्तेच्या केंद्रीकरणाचा आता काहीच पाडाव नाही. B आपली सध्याची सरकारे आणि राजकीय प्रणाली दुसऱ्या लाटेच्या चष्म्यातूनच सगळीकडे पहात असल्यामुळे, आता कालबाह्य होत चालल्या आहेत. यामुळे दुसराच एक प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

## निर्णयाचा वेग

पूर्वीच्या रचनेत निर्णय अगदी संथ गतीने घेतले जात व प्रसारित केले जात. एखादा संदेश बोस्टनहून न्यूयॉर्कला किवा फिलाडेल्फियाला पोचण्याचा काळ एखादा आठवडा अगदी सहज असणारच अशी समजूत व असा रिवाज होता. या उलट आता जर एखाद्या अयातुल्लाने तेहरानमध्ये लोक पकडून ठेवले किंवा क्वोअमध्ये जर त्याला खोकला आला तर वॉशिंग्टन, मॉस्को, पॅरिस किंवा लंडनमधले अधिकारी काही निर्णय घेऊन, त्याबाबतचा आपला प्रतिसाद प्रकट करतात! बदलाला हा जो विलक्षण वेग आलेला आहे, त्यामुळे सरकारे व राजकारणी लोक गोंधळून गेलेले आहेत. आणि त्यांचा गोंधळ व असहाय्यता यांच्यात भरच पडत आहे.

सामाजिक बदलांनीही वेग धारण केलेला असून त्यामुळे राजकीय निर्णायकांवर जादाच दबाव पडत आहे.

खुद्द राजकारण्यांच्या कारकीर्दीचाही वेग इतका वाढलेला आहे; की ते स्वतःच चकित झालेले आहेत. इ. स. १९७० मध्ये जी मार्गरेट थॅचर म्हणाली होती, की इंग्लंडमध्ये एखादी स्त्री पंतप्रधान होणे निदान माझ्या आयुर्मयादेपर्यंत तरी शक्य नाही, ती स्वतःच इ. स. १९७९ त पंतप्रधान झाली! तर अमेरिकेतील प्रकार कसा घडतो ते पहा— काही महिन्यांच्या अवधीतच ‘कोण जिमी?’ असा प्रश्न पडतो. फार कशाला, नवा अध्यक्ष निवडून आल्यानंतर त्याला तत्काळ प्रभारी अध्यक्ष बनावे लागले, कारण नवा अध्यक्ष रेगन, नंतर, जानेवारीत अधिकारारूढ होणार होता. कार्टरवर मध्यपूर्वेतील घडामोडीबाबत, ऊर्जा समस्येबाबत, इतरही प्रश्नांबाबत मतमोजणीपूर्वी, खुलासा मागणाऱ्या प्रश्नांचा भडिमार करण्यात आला. फोर्ड तर मुळीसुद्धा खिसगणतीत राहिला नाही.

अनुक्रमणिका

राजकीय जीवनाने घेतलेल्या वेगात एकूणच बदलांनी घेतलेल्या वेगाचे प्रतिबिंब पडते. त्याच्यामुळे सरकारांच्या व एकूण राजकारणांच्या बिघाडात भर पडते. गरजेइतक्या वेगाने आपले नेते निर्णय घेऊ शकत नाहीत. निर्णय उशिरा तरी घेतले जातात किंवा निश्चय करण्याला विलंब तरी लावण्यात येतो.

बदलाच्या वेगाने आपल्या संस्थांच्या निर्णयक्षमतेवर मात केलेली आहे. आजची राजकीय संरचना कालबाह्य ठरवली आहे. येथे पक्षाचे तत्त्व किंवा त्याचे नेते यांच्या बाबत प्रश्न उठत नाही. या संस्थांची या वेगाशी मुकाबला करण्याची कुवतच नाही... आणि एवढ्याने काय झाले आहे?

एकमताची कोलमड

दुसऱ्या लाटेने सर्व समाजाला एक करून टाकले, तर तिसरी लाट सुटे सुटे करत आहे. वैविध्य आणि गुंतागुंत याबाबत समाजाने फार मोठी पातळी गाठली आहे. आणि या क्रांतिकारक प्रक्रियेमुळेच आज सर्वत्र एकमताचा अभाव आढळून येतो आहे.

केवळ मतदार संघातच फाटाफूट होऊन त्याचे तुकडे झालेले नाहीत, तर त्याच्याही पुढे, हे फुटीर गटही दिवसेदिवस बदलताहेत, क्षणभंगुर होत चालले आहेत; नाश पावत आहेत, पुनः उद्भवताहेत! आणि त्यामुळे त्यांच्यातून अनाकलनीय अशी फसफसणारी भरती उसळत आहे.

वेग आणि वैचित्र्य यांची युती होऊन त्यातून नवीनच राजकारण आकार घेत आहे.

या घटनांमुळेच आपल्या राजकीय युतींबाबतच्या, मैत्रीबाबतच्या व संयुक्त आघाड्यांबाबतच्या कल्पना विसरल्या जात आहेत. आज, या शेकडो हजारो छोट्या छोट्या अल्पजीवी विशिष्ट आकर्षणाने प्रेरित झालेल्या गटांचे एकत्र येणे आवश्यक झालेले आहे. परंतु खुद्द ही युतीही अल्पकालीन युतीच ठरेल यात शंका नाही. हे गट केवळ एखाद्या अध्यक्षाच्या निवडणुकीपुरते एकत्र येऊन निवडणुकीच्या दुसऱ्याच दिवशी पुनः वेगवेगळे होतील. आणि त्यावेळी आपल्या कार्यवाहीसाठी आवश्यक असा पायाभूत पाठिंबाही त्याला त्यांनी ठेवलेला असणार नाही.

राजकीय जीवनात आलेल्या या विस्कळितपणामुळे राजकीय नेत्यांची महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता उध्वस्त होऊन गेली आहे. थोड्याच प्रमाणातील स्वच्छ मांडणीच्या आणि उत्तम तऱ्हेने जमवलेल्या, संघटनाप्राप्त मतदार संघांबरोबर हातचलाखी करण्याची सवय असलेले हे नेते अचानक जणू वेढले जातात!

असंख्य नवे मतदारसंघ, अत्यंत तात्कालिक स्वरूपाच्या उभारणीनिशी, प्रकट होतात आणि सर्व बाजूंनी अनेक, छोट्या व अपरिचित गरजांबाबतच्या, प्रश्नांकडे एकाच वेळी लक्ष दिले पाहिजे अशी मागणी करत रहातात!

मागण्या इतक्या प्रचंड संख्येत असतात, की त्यांच्याकड फार लक्ष पुरवण अशक्य होते. शिवाय, समाज सतत आणि वेगाने बदलत असल्याने अजिबात निर्णय न देण्यापेक्षा उशीरा निर्णय देणे अधिक प्रमाणात वाईट व चुकीचे ठरते, प्रत्येकाला तात्काळ प्रतिसाद हवा असतो.

अनुक्रमणिका

देशादेशातील परिस्थिती वेगवेगळी असते. एकच गोष्ट समान असते ती म्हणजे कालबाह्य ठरत असलेल्या दुसऱ्या लाटेच्या–आजच्या वेगाबरोबर राहू न शकणाऱ्या, मंदगती संस्थांना–तिसऱ्या भरवेगाच्या लाटेने दिलेले आव्हान! ह्या आव्हानाला केवळ नियम दुरुस्त केल्यासारखे दाखवून तोंड देता येणार नाही. कारण आव्हानाचा रोख आहे प्रतिनिधिकतेच्या कल्पनेवर.

त्यामुळे बहुमताच्या तत्त्वावर आधारलेल्या आपल्या राजकीय संस्था वैविध्याच्या काळात कसा टिकाव धरू शकणार? महत्त्वाच्या प्रश्नांवर बहुमत होणेही अशक्य झाले आहे. एकमताचा हा अभाव एक गोष्ट दाखवून देतो, की अधिकाधिक सरकारे अल्पमतातील असून सतत बदलत रहाणाऱ्या अनिश्चित युतींवर ती अवलंबून असतात.

मूलभूत प्रश्न निर्माण होतो तो असा, की एखाद्या वैचित्र्यपूर्ण मतदारसंघाचे प्रतिनिधित्व खरोखरच केले जाणार आहे का? ही गोष्ट शक्य आहे का? आपल्या मतदारांचे एकमत, एक इच्छा, एक आकांक्षा पुढे मांडणे प्रतिनिधीला शक्य होत नाही, कारण ह्या कल्पनाच आता अस्तित्वात राहिलेल्या नाहीत. या प्रश्नाचा आणखी विचार करताना हे ध्यानात येते. प्रतिनिधित्व होऊ शकत नसेल, तर प्रतिनिधिक लोकशाहीच्या कल्पनेला काहीच अर्थ उरत नाही.

अनेक बाबतीत असमर्थ ठरणारी, ओझ्यांनी वाकलेली दुसऱ्या लाटेतील वैशिष्ट्यपूर्ण राज्यसंस्था आपल्या डोळ्यादेखत मोडून पडत चाललेली आहे.

■ ■ ■

नेतेपणाचा अभाव नव्हे तर फार मोठ्या संख्येने घ्यावयाचे निर्णय अनेक विचित्र आणि अपरिचित प्रश्नांबाबतचे, तेही अतिशय वेगाने–हीच गोष्ट आजच्या राजकीय व सरकारी निर्णयांच्या बाबतच्या अकार्यक्षमतेचे स्पष्टीकरण होऊ शकेल.

अमेरिका हा एकच देश गोंधळून गेलेला व थंडावलेला नाही, तर रशियाकडे पहा.... इंग्लंड, फ्रान्स, इटली, स्वीडन सर्व देशांमधून हीच परिस्थिती आहे.

एखाद्या राजकीय पक्षाने निर्णय घेऊन ते दुसऱ्यांवर लादण्यापेक्षा त्यांची कार्यवाही योग्यतऱ्हेने करायला हवी. निराशाजनक हताश धोरणांना त्याने एकात्म करायला हवे. योग्य गतीने निर्णय घ्यायला हवेत. त्याने समाजाच्या वैविध्यांना योग्य प्रतिसाद द्यायला हवा व त्याच्यात त्यांचे प्रतिबिंबही पडायला हवे. यापैकी कोणत्याही बाबतीत तो कमी पडला, तर त्याने जणू विनाशालाच आमंत्रण दिले असे समजावे.

खरी आश्चर्यकारक गोष्ट ही ठरेल, की या स्थितीतही आपली सरकारे, कसे का होईना, काम चालू ठेवू शकत आहेत! कोणत्याही कॉर्पोरेशनचा अध्यक्ष एखादी मोठी कंपनी अठराव्या शतकातल्या कोणत्या तरी पूर्वजाने आखून दिलेल्या संरचनात्मक आराखड्यानुसार चालविण्याचे धाडस करणार नाही. ब्लेरिओट किंवा लिंडबर्गला प्राप्त असणाऱ्या जुनाट नेविगेशन व कंट्रोल साधनांनिशी कोणताही शहाणा पायलट सुपरसॉनिक जेटने उड्डाण करण्याचा प्रयत्न देखील करणार नाही. आणि आजच्या राजकीय क्षेत्रात हेच करण्याचा प्रयत्न आपण करून राहिलो आहोत.

अनुक्रमणिका

दुसऱ्या लाटेच्या आपल्या राजकीय प्रणाली, अण्वस्त्रांनी राठ व क्रूर भासणाऱ्या आणि आर्थिक व इकॉलॉजिकल पाडावाच्या कडांवर उभे असणाऱ्या या जगातील संपूर्ण समाजाला, संपूर्ण जगालाच, फार मोठा धोका निर्माण करत आहेत. आपल्या पुढे लागलीच उभा ठाकणारा धोका, ज्यांच्याजवळ शक्तींचा साठा आहे त्यांच्याकडून होणाऱ्या शक्तीच्या परिमित वापरात नसून राजकीय–नोकरशाही–पद्धतीच्या निर्णयांतून उद्‌भवणाऱ्या अपरिमित (गौण) परिणामांमध्ये आहे. कारण एकूण यंत्रणाच इतकी अप्रचलित व धोकादायक झालेली आहे, की अगदी चांगल्या हेतूने काही करू पाहिले, तरी त्यातून घातपाती फलितेच प्राप्त होण्याची शक्यता आहे.

ज्या राजकीय प्रणालींना आपण ‘समकालीन’ म्हणतो त्या कारखाना पद्धतीची सुरूवात होण्याअगोदर तयार करण्यात आलेल्या नमुन्यांवरून नकललेल्या आहेत. डबाबंद अन्न, शीतकरण, गॅसलाईट, छायाचित्रण, यांच्याअगोदर, ‘बेसमर फर्नेस किंवा टाइप रायटरच्या प्रचाराच्या अगोदर, टेलिफोनच्या शोधापूर्वी, राईट बंधूंनी केलेल्या उड्डाणापूर्वी, मोटारी व विमानांनी अंतरसंक्षेप करण्यापूर्वी, रेडिओ आणि टेलिव्हिजन यांनी आपल्या मनांवर जादू करण्यापूर्वी, आऊश विट्‌स्‌ने मृत्यूचे औद्योगिकीकरण करण्यापूर्वी, अण्वस्त्रे तयार होण्यापूर्वी, कॉम्प्युटर, नक्कल करणारी यंत्रे, कुटुंब नियोजनाच्या गोळ्या, ट्रॅन्झिस्टर्स, आणि लेसर्स या सर्वांच्या पूर्वी तयार झालेल्या या पद्धती आहेत. ज्या जगात व ज्या जगासाठी त्या तयार झाल्या, ते जग बुद्धिमत्तेत मार्क्सपूर्वीचे, डार्विनपूर्वीचे, फ्रॉइड किंवा आइन्स्टाईन यांच्या पूर्वीचे जग होते.

आपल्या पुढचा सर्वात महत्त्वाचा राजकीय प्रश्न म्हणजे सर्वांत पायाभूत अशा राजकीय आणि सरकारीं संस्थांच्याच लुप्त होण्याचा प्रश्न आहे!

# पंचवीस । एकविसाव्या शतकातील लोकशाही

संस्थापक पितरांना :

"तुम्ही स्वर्गस्थ क्रांतिकारक आहात. तुम्ही ते स्त्रीपुरुष, ते शेतकरी, ते व्यापारी, कारागीर, कायदेपंडित, मुद्रक, प्रचारपुस्तिका जनक, दुकानदार आणि सैनिक आहात, की ज्यांना सर्वांनी एकत्र येऊन दूर अमेरिकेच्या किनाऱ्यावर एक नवाच देश निर्माण केला... तुम्ही ज्या भविष्याचा शोध लावलात, तो आमचा वर्तमानकाळ आहे.

इतरांप्रमाणे मलाही स्वतःला प्रश्न विचारणे भाग पडते आहे, की तुम्हा सर्वांना हे सर्व कसे जमेल? कडवट व उग्र सामाजिक आणि आर्थिक क्षोभात, निकटच्याच मोठ्या दबावाखाली, उभारत्या भविष्याबद्दलच्या इतक्या मोठ्या जाणकारीची नोंद करून ठेवणे तुम्हाला साधले तरी कसे? दुरून येणारे 'उद्या'चे ध्वनी ऐकून तुम्हाला ही जाणीव झाली, की एक (चालू) संस्कृती मरत आहे, आणि तिच्या जागी दुसरी नवी संस्कृती जन्म घेते आहे.

मला असे वाटते, की असे करण्यास तुम्हाला भाग पडले असावे. घटनांच्या लाटेच्या जोराबरोबर तुम्हाला जावे लागले. परिणामशून्य सरकाराच्या, अयोग्य तत्त्वांमुळे आणि कालबाह्य रचनांमुळे शून्य, सुन्न झाल्यामुळे होणाऱ्या नाशाच्या भीतीने तुम्हाला सर्व करावे लागेल.

अगदी भिन्न प्रवृत्तींच्या, बुद्धिमान, परस्परविरोधी अहंकारी माणसांनी एकत्र येऊन क्वचित्‌च इतकी ऐश्वर्यशाली करामत केली असेल.

भिन्न भिन्न प्रादेशिक आणि आर्थिक हितसंबंधाशी निगडित असलेली ही माणसे सद्यःस्थितीतील सरकारांच्या अकर्तृत्वामुळे इतकी बेचैन झाली होती, की त्यामुळेच ती एकत्र आली. आणि त्यांनी थक्क करणाऱ्या नव्या तत्त्वांवर आधारलेले नाविन्य असलेले सरकार पुढे केले.

जगातल्या लाखो लोकांना हेलावून टाकणारी ही तत्त्वे देखील मला हेलावून सोडतात.. क्रांतिकारकांनो, मला आपले आभार मानावेसे वाटतात, कारण तुम्ही मला जीवनाचे एक अर्धशतक कायद्याच्या, माणसांच्या नव्हे, सरकाराखालील एक अमेरिकन नागरीक म्हणून जगायची संधी दिलीत, विशेषतः हक्कांच्या त्या सनदेसाठी ज्यायोगे मला विचार करता येणे शक्य झाले. अप्रिय असलेले दृष्टिकोण व विचारही मी व्यक्त करू लागलो— मग ते कितीही मूर्खपणाचे व चुकीचे असोत, आणि दडपणाच्या कुठल्याही भीतीचा विचारही मनात न येता लिहूही शकलो.

मी जे लिहिलेले असेल त्याबाबत माझ्या समकालीनांमध्ये गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. काहींना ते राज्यद्रोह करणारेही वाटेल. तरीदेखील माझी खात्री आहे, की तुम्हाला ते चटकन् आकळले असेल! कारण तुम्ही ज्या प्रकारच्या सरकाराची, त्यातील तत्त्वांसह, आखणी केलीत, तो प्रकार आता कालबाह्य व म्हणून लुप्तप्राय झालेला आहे; त्यामुळेच आमच्या कल्याणाला, भरभराटीला, विकासाला दडपून टाकणारा आणि धोकादायक झालेला आहे. तो मुळापासूनच बदलायला हवा. सरकारची नवीन प्रणाली तयार करायला हवी—एकविसाव्या शतकासाठी असलेली लोकशाही!

अनुक्रमणिका

आमच्यापेक्षाही तुम्हालाच अधिक चांगल्याप्रमाणे हे समजले असेल, की कोणतेही सरकार, कोणतीही राजकीय प्रणाली, कोणतीही घटना संहिता चिरस्थायी असत नाही आणि पूर्वी केव्हातरी घेतलेले निर्णय भविष्यकाळाला नेहमीसाठी बांधून ठेवू शकत नाहीत. एका संस्कृतीसाठी योग्य ठरलेले सरकार तिच्या नंतरच्या संस्कृतीसाठी योग्य असेलच असे नाही.

आपलीही घटना आता बदलायला हवी. उद्याच्या घटनेचा आराखडा माझ्याजवळ नाही.जे लोक म्हणतात, की आमच्याजवळ उत्तरे आहेत, त्यांच्यावर माझा विश्वास बसत नाही. कारण अजून प्रश्नच नीट तयार झालेले नाहीत, तर त्यांची उत्तरे कुठून असणार? परंतु संपूर्णतया नवीन असलेल्या पर्यायांची कल्पना करण्याची वेळ आलेली आहे. उद्याच्या लोकशाहीच्या बांधणीबाबत तिसऱ्या पायापासून कळसापर्यंत विचारपूर्वक चर्चा व्हायला हवी, मतभेद स्पष्ट व्हायला हवेत, वाद व्हायला हवेत!

तुमच्या ध्यानात ही गरज यायला हवी होती. कारण तुमच्याच पिढीतील एक परिपक्व विचारवंत जेफरसन म्हणतो की, काही लोक राज्यघटनांकडे पावित्र्ययुक्त आदराने पहातात. त्यांना कराराच्या पेटीसारखे मानतात. त्याला हात लावला, तरी सुद्धा त्याचे पावित्र्य डागाळेल असे त्यांना वाटते. आपल्या अगोदरच्या लोकांना मानवी आवाक्यापलिकडचा शहाणपणा ते बहाल करतात. आणि असा विचार करतात, की त्यांनी जे केले आहे, ते सुधारणेपलिकडचे आहे— म्हणजे त्यात सुधारणा करावीच लागणार नाही— मी काही कायद्यात ब घटनेत सतत आणि अविश्रांत बदल व्हावेत या मताचा समर्थक नाही... परंतु मला हेही निश्चितच माहीत आहे, की मानवी मनाच्या प्रगतीसाठी कायदा व संस्था यांनी हातात हात घालूनच जायला हवे... नवीन शोध लावले जात आहेत. नवीन सत्ये उघड होत आहेत, परिस्थितीत बदल झाल्यावर रीती आणि मते बदलत आहेत, अशा वेळी संस्थांचीही प्रगति झाली पाहिजे, आणि काळाबरोबरची गती त्यांनी सांभाळली पाहिजे.

या शहाणपणाबद्दल मी सर्वांपेक्षाही अधिक जेफरसनला धन्यवाद दिले पाहिजेत. कारण त्याने अशी प्रणाली केली की तिच्या इतक्या प्रदीर्घकाळापर्यंत आपल्याला उपयोग झाला. परंतु आता तिनेदेखील मरायला हवे. तिची आता स्वतः बाजूला होऊन दुसरीला जागा करून देण्याची वेळ आलेली आहे."

आल्विन टॉफ्लर,
वॉशिंग्टन, कनेक्टिकट

हे एक काल्पनिक पत्र... जर संधी मिळाली तर अनेक देशांतून इतरही अनेक जण याच प्रकारे भावना व्यक्त करतील. कारण आजच्या सरकारांच्या कालबाह्यतेचे रहस्य केवळ मलाच उमजले असे नव्हे. हा काही केवळ अमेरिकेलाच झालेला रोग नव्हे.

जुन्या मोडकळीवर नवीन संस्कृतीची उभारणी करण्यासाठी नवीन अधिक समर्पक राजकीय रचना अनेक देशांतून एकाच वेळी बनवल्या जायला हव्या आहेत. हा प्रकल्प मनांना लटपटवणारा आहे. क्लेशदायक असला तरी अतिशय आवश्यक असा आह. आणि तो पुरा होण्यासाठी काही दशकांचा अवधी निश्चितच लागणार आहे.

अनुक्रमणिका

सर्व रचना मुळापासूनच बदलाव्या लागणार आहेत, कारण त्या मूलतः बदललेल्या जगाच्या आवश्यकतांना पुरेशा पडणार नाहीत.

ह्या कामासाठी लाखो, कोट्यवधी लोकांचा सहभाग लागणार आहे. आणि जर कोठे बदलाला विरोध झाला, तर त्या ठिकाणी स्वरूपातदेखील होईल. ही प्रक्रिया किती प्रमाणात शांततामय होईल, हे अनेक गोष्टींवर अवलंबून असेल— सध्याचे उच्चस्तरीय किती प्रमाणात लवचिक राहू शकतात, यावर बदलाला आर्थिक कोसळणुकीने गती मिळते की नाही, बाह्य धोके उद्‌भवतात, की नाही, लष्करी हस्तक्षेप होतात की नाही... अशा गोष्टी अवलंबून असतील. हे उघडच आहे, की धोका फार मोठ्या प्रमाणात आहे.

तरी देखील आपल्या राजकीय संस्थांची पुनर्जुळणी न करण्यातील धोका याहूनही मोठ्या प्रमाणातला आहे! या कामाला आपण जितक्या लवकर लागू, तितके अधिक सुरक्षित आपण सर्व राहू शकू.

नवीन कार्यक्षम सरकारे उभारताना आपल्याला काही महत्त्वाच्या तत्त्वांच्या दृष्टीने राजकीय जीवनाचा विचार करायला हवा आहे. निश्चितपणेच, उद्या अस्तित्वात येणाऱ्या तिसऱ्या लाटेच्या सरकारांचीही मूलतत्त्वे ठरणार आहेत.

## अल्पमतातील ताकद

पहिले तत्त्व असे राहील, की दुसऱ्या लाटेच्या युगात अतिशय प्राधान्य मिळवणाऱ्या बहुमताचे महत्त्व इथून पुढे कमी असणार आहे. अल्पमताच्या गटांचे महत्त्व वाढणार आहे.

आज, औद्योगिकीकरण मागे पडत चालले आहे. समाज विकेंद्रित होत चालला आहे. त्यामुळे दिवसेदिवस शासन तयार करण्यासाठीच्या युती किंवा बहुमत तयार करणे वाढत्या प्रमाणात कठीण होत चाललेले आहे. इटलीत सहा महिने आणि नेदरलँड्‌समध्ये पाच महिने सरकारेच अस्तित्वात नव्हती ही गोष्ट वरील गोष्ट सिद्ध करण्यास पुरेशी आहेत.

उत्तम स्तरशः तयार झालेल्या, ज्याच्यात काही ठळक विभाग एकमेकांशी हातमिळवणी करून बहुमत तयार करतात, अशा समाजाऐवजी आपल्याजवळ आता केंद्रापसारी समाज आहे. त्याच्यात हजारो अल्पसंख्यांकांक गट—त्यातीलही पुष्कळसे तात्कालिक, फिरते असतात— एक क्षणिक आणि एकदम नवा असा संघटना प्रकार अस्तित्वात आणतात. आणि क्वचित्‌च महत्त्वाच्या प्रश्नांबाबत ५१ टक्के मत तयार करू शकतात. तिसऱ्या लाटेखालील संस्कृती याप्रकारे सध्याच्या सरकारांचा कायदेशीरपणाच दुबळा करून टाकतो, बहुमताच्या अधिपत्याशी असलेल्या संबंधाबाबतच्या आपल्या सर्व परंपरागत समजुतींना तिसरी लाट आव्हान देते आहे. दुसऱ्या लाटेच्या युगात असे मानले जाते, की दुसऱ्या लाटेमुळे प्राप्त झालेले आधिपत्य हे माणुसकीचे आणि स्वातंत्र्यदायी आहे. औद्योगिकीकरणाच्या प्रभावाखाली असलेल्या देशांमधून उदा. द. आफ्रिका—अजूनही तसेच मानले जाते. बहुमताच्या जोरावर अशा ठिकाणी गरीबांना संधी मिळत असे कारण गरीब हे खरोखरच संख्याधिक्य असलेले होते.

परंतु आज तिसऱ्या लाटेने खळबळ माजवलेल्या देशांतून याविरुद्ध स्थिती निर्माण झाली आहे. कारण तेथे गरीब हळूहळू अल्पसंख्यांक होत आहेत! अनेक देशांत आर्थिक पोकळी तयार झालेली असूनही

अनुक्रमणिका

इतर अनेक गटांप्रमाणे गरीबांचा गटही अल्पसंख्य ठरलेला आहे. त्यामुळे एक कायदेशीर तत्त्व म्हणून बहुमत आता पुरेसे ठरणार नाही. तिसऱ्या लाटेत शिरणाऱ्या समाजांसाठी आता बहुमताधिष्ठित आधिपत्य खऱ्या अर्थाने लोकशाही व माणूसकीचे ठरणार नाही.

अल्पसंख्यांकांची वाढत्या प्रमाणातील क्रियाशीलताही, कोणत्याही अर्थाने, स्वार्थीपणाने अचानक घडलेली गोष्ट नाही, तर इतर अनेक बाबींप्रमाणेच उत्पादनाच्या नव्या पद्धतीचे—जिच्यात, स्वतःच्या अस्तित्वासाठी अतिशय मोठ्या प्रमाणात वैविध्यपूर्ण 'विविधरंगी, खुल्या आणि भिन्न समाजाची आवश्यकता असते— प्रतिबिंब आहे.

या सत्यस्थितीतील धन्यर्थ प्रचंड आहेत. यापूर्वीच्या धोरणांतून आर्थिक किंवा सांस्कृतिक मंदपणा निष्पन्न होत होता. तर नंतर अस्तित्वात येत असलेल्या धोरणाद्वारे सामाजिक उन्नतीकडे, उत्क्रान्तीकडे बाटचाल होते आहे. आणि अल्पमतांवर आधारलेल्या एकविसाव्या शतकातील लोकशाहीकडे आपण जाऊ लागलो आहोत.

तिसऱ्या लाटेच्या संदर्भात लोकशाहीची पुनर्घटना करताना आपल्या एका गृहीतकाचे ओझे फेकून द्यायला हवे. ते गृहीतक म्हणजे एक खोटी भीति. हिच्या द्वारे आपली खात्री झालेली असते, की वाढत्या वैविध्यातून समाजातील तणाव व संघर्ष वाढतील. खरे पहाता, सत्य याच्या अगदी उलट आहे. काही विशिष्ट मर्यादेपर्यंत समाजातील झगडे नुसते आवश्यकच नाहीत, तर हवेही आहेत... जर सुयोग्य सामाजिक व्यवस्था झाल्या, तर वैविध्य एका सुस्थिर आणि सुरक्षित संस्कृतीची निर्मिती करू शकेल.

सुयोग्य राजकीय संस्थेच्या अभावी तसे काही कारण नसताना अल्पसंख्यांकातील झगडे तीव्र होतात, आणि रक्तपाती स्वरूप धारण करतात. अल्पसंख्यांक तडजोडविरोधी असतात. अल्पसंख्यांकांवर स्वार्थीपणाचा आरोप करून भागणार नाही, तर वैविध्यासाठी जागा व्हावी, व त्याला कायदेशीर स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून नव्या व्यवस्था कल्पिल्या जायला हव्यात ही ज्या बदलत्या व वाढत्या अल्पसंख्यांकांचा, वेगाने बदलत जाणाऱ्या गरजांबाबत संवेदनाक्षम असतील.

आजच्या या जगात आपल्याला संपूर्ण सत्ता कोणा एकाकडे सोपवण्याचा किंवा एखाद्या लोकप्रिय किंवा दुर्बळ—बहुमताधिष्ठित पद्धतीखालील गटाला शरण जाण्याचा धोका पत्करता येणार नाही.

एखाद्या छोट्या गटाला मोठे निर्णय घेऊन इतर छोट्या गटांना दहशत निर्माण करण्याची संधी देता येणार नाही. आपल्याला अशी पद्धत हवी आहे, की जी खोट्या सत्ताधिक्याचा भास निर्माण करून, प्रश्नांना सभ्य स्वरुपाची चौकट बहाल करून, किंवा रूक्ष निवडणूक प्रक्रियाद्वारे भेद झाकून टाकण्याचा प्रयत्न न करता भेद खुले करण्यात यश मिळवेल. संपूर्ण प्रणालीचेच आधुनिकीकरण करायला हवे आहे, अशा तऱ्हेचे, की ज्याद्वारे विविध अल्पसंख्यांकांना आपली भूमिका तर पार पाडता येईल आणि शिवाय त्यांना बहुमतातही येता येईल.

असे करण्यासाठी आपल्याला आपल्या अनेक राजकीय रचनांत मूलभूत फरक करावयास हवे आहेत. सुरुवातीलाच बदल करावयास हवा, तो लोकशाहीच्या प्रतीकातच—मतपेटीत!

अनुक्रमणिका

दुसऱ्या लाटेच्या युगात लोकांच्या इच्छा किंवा मते निश्चितपणे दाखवणारी गोष्ट म्हणून मतदानाला फार महत्त्व प्राप्त झाले होते. एखादी गोष्ट पसंत असेल किंवा नसेल, तरी त्या बाजूची मते ५० टक्के करून लोक आपला आग्रह पुढे करून त्यानुसार आपल्याला हवा तो बदल घडवून आणू शकत असत, किंवा पसंत असलेल्या गोष्टीवर पुनः शिक्कामोर्तब करत असत, उच्चस्तरीय पक्ष बदलत असत, धोरणे बदलत असत. काहीतरी परीसस्पर्शी प्रकाराने जुळवून घेत असत. कालपर्यंत हे ५१ टक्क्यांचे तत्त्व अगदी सामर्थ्यपूर्ण होते. पण हे तत्त्व संख्यात्मक, आकारात्मक होते. गुणात्मक नव्हते!

बहुमत अजमावण्याच्या प्रक्रियेत लोकांच्या दृष्टिकोणाचे गुणधर्म विशेष प्रकट होत नाहीत. केवळ 'क्ष' आम्हाला हवा आहे, हे स्पष्ट होत होते, किती प्रमाणात व का हवा आहे, हे स्पष्ट होत नव्हते.

वस्तुतः ज्यावेळी अल्पसंख्यांकांना अतिशय मोठा धोका जाणवतो किंवा एखाद्या प्रश्नाला जीवनमरणाचे महत्त्व दिले जाते, त्यावेळी त्यांच्या दृष्टिकोणाला असामान्य वजन प्राप्त व्हायला हवे. पण जुन्या पद्धतीत हे शक्य नाही.

पूर्वी बहुमताधिष्ठित सत्तेचे सर्वांना परिचित असलेले दोष खपवून घेतले जात असत. कारण बहुतेक अल्पसंख्यांकांजवळ प्रणालीचे तुकडे करण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक ताकदीचा अभाव असायचा. पण आजच्या सजीव समाजात ज्यात आपण सर्वच कोणत्या ना कोणत्या अल्पगटाचे सदस्य आहोत, ही गोष्ट फार काळ चालणार नाही.

आपल्याला मतदानाचा अगदीच वेगळा मार्ग हाताळायला हवा. पूर्वीप्रमाणे होकार किंवा नकार देणाऱ्या साध्यासरळ मतप्रदर्शनाऐवजी आपल्याला अशा काही प्रश्नांचे उत्तर देता येणे व दिलेल्या उत्तराला महत्त्व प्राप्त करून देणे अधिक जरूरीचे वाटते, की ज्या मतांना देवाणघेवाणीचे स्वरूप व महत्त्व मिळालेले असेल. उदा. "मी जर गर्भपातविषयक प्रश्नाबाबतची माझी भूमिका सोडली, तर तुम्ही संरक्षणविषयक खर्च किंवा अण्वस्त्रविषयक भूमिकेत बदल कराल काय?" किंवा "मी जर माझ्या मिळतीवरील कर अधिक प्रमाणात देण्याचे मान्य केले, तर तुम्ही त्याच्या बदलात काय देऊ कराल?"

आजच्या जगात आपण अतिशय समृद्ध दळणवळणतंत्र प्राप्त केले आहे, अशा वेळी पुष्कळ लोकांना आपली मते मतदान कक्षात न जाता देखील नोंदवता येतील!

आपल्याला राजदूतांची आवश्यकता केवळ बाहेरच्या देशांशी मताचे आदान–प्रदान करण्यासाठी वापरण्याऐवजी देशातही निरनिराळ्या गटांत मध्यस्थी करण्यासाठीही भासू लागली आहे. आपण जर काही संस्था–अर्धराजकीय अशा स्वरूपाच्या–निर्माण करून विविध अल्पसंख्यांकांना मदत देऊ केली, तर ते फायद्याचे होईल. विविध प्रकारच्या युत्या व फाटाफुटी अधिक वेगाने व सहज गतीने घडून जातील.

भेद खुले होतील आणि राजकीय देवाणघेवाणीसाठी पाया सापडेल. या प्रकारे सर्व झगडे समाप्त होतील असे मात्र नाही— तसे ते होऊही नयेत— परंतु अधिक बुद्धीप्रधान आणि भरीव पातळीला पोचण्यासाठी चाललेला सामाजिक व राजकीय लढा अधिक उंची प्राप्त करेल.

अनुक्रमणिका

अनेक विषयात आज असलेले वैविध्यच देवाणघेवाणीसाठी विविध मुद्दे पुरवते आहे. तरी देखील आपली राजकीय रचना या गोष्टीचा फायदा उठवण्याजोगी नाही!

आपण अल्पसंख्यांकांना त्यांच्या स्वतःच्या बाबीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक तेवढे अधिकार देणे आवश्यक आहे. आपण विशिष्ट शेजारातील उपसंस्कृतीच्या लोकांना अशी मदत करायला हवी, की जिच्या आधारे ते आपले प्रश्न सोडवू शकतील. उदा : राज्याच्या निरीक्षणाखाली त्यांच्यातील तरुण न्यायालये चालवतील. सरकारावर याबाबत अवलंबून रहाण्याऐवजी यायोगे ते स्वतःच तरुणांना शिस्त लावू शकतील. अशा संस्था समाजउभारणी करतील, ठळक अस्तित्व निर्माण करतील आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करतील. सरकारी संस्थांवर पडलेल्या अनावश्यक कामांचे ओझे कमी करतील.

पण अशा सुधारक प्रयत्नांहून कितीतरी पुढे आपल्याला जायला हवे आहे. विकेंद्रित समाजासाठी बनवण्यात आलेल्या राजकीय प्रणालीतील अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधित्व सुधारण्यासाठी, बळकट करण्यासाठी, आपल्याला काही अधिकारी तरी अतिशय जुन्या पद्धतीने चिठ्ठ्या टाकून, आपण ज्या रीतीने सध्या ज्युरीचे सभासद निवडतो, त्याच पद्धतीने कायदेमंडळातील सभासद म्हणून निवडले जावेत अशी सूचना काही लोकांनी पुरेशा गांभीर्याने पुढे मांडली आहे.

प्रातिनिधीकत्वाचा विचार करताना एक गोष्ट ध्यानात येते, ती अशी, की अमेरिकन गौरेतर लोकांचे प्रमाण सुमारे २० टक्के असताना प्रतिनिधीगृहात त्यांचे फक्त ४ टक्के लोकच असतात, आणि सिनेटमध्ये फक्त एकच टक्का! स्त्रियांच्याबाबत अशी परिस्थिती आहे, की लोकसंख्येत त्या ५० टक्के हून अधिक आहेत, आणि त्यांदेखील फक्त चार टक्केच आढळतात; सिनेटमध्ये तर एकही स्त्री नाही! गरीब लोक, तरुण लोक, निरक्षर परंतु चुणचुणीत असलेले लोक आणि असे इतर कितीतरी गट या प्रकारे फायदा उठवण्यापासून वंचित झालेले आहेत. ही परिस्थिती केवळ अमेरिकेतच नाही, तर इतर अनेक देशांत असलेली आढळून येते.

आपण जर अधिक विचार केला तर आपल्याला असे आढळून येईल, की आपल्याला इतरही कितीतरी आश्चर्यकारक पर्याय उपलब्ध आहेत. ज्यूरी नेमण्याच्या पद्धतीपेक्षा कितीतरी परिणामकारक आणि खरेखुरे प्रतिनिधी नेमण्यासाठी आवश्यक असलेली तत्रे आपल्याला उपलब्ध आहेत. आपल्याला कसल्याही उपद्रवापासून अलिप्त राहू शकेल असे खरेखुरे प्रतिनिधीगृह उभारता येणे शक्य आहे.

आपण अशी योजना करू शकतो, की निवडून दिलेल्या प्रतिनिधीचे कोणत्याही प्रश्नावरचे मत ५० टक्केच असावे आणि उरलेली ५० टक्के मते जनतेच्या सहज निवडलेल्या काही नमुन्यांनी दिलेली असावीत!

कॉम्प्युटर्स, प्रगत टेलिकम्युनिकेशन आणि मतदानप्रक्रिया याच्या मदतीने लोकांमधून सहज नमुने प्रातिनिधिक म्हणून निवडणे सोपे झालेले आहे. शिवाय त्याद्वारे त्या क्षणापर्यंतची ताजी माहिती मिळत राहणे शक्य झालेले आहे. जेव्हा कायद्याची बाब आवश्यक झालेली असेल, तेव्हा आपण नेहमीप्रमाणे निवडून दिलेले प्रतिनिधी संसदभवनात हजर असतीलच. एखादा निर्णय घेताना हे लोक फक्त पन्नास टक्के मतेच देऊ शकतील. आणि उरलेले पन्नास टक्के सहजगत प्रतिनिधी राजधानीत नसले तरी

भौगोलिकदृष्ट्या विखुरलेले असले तरी ते, घरात किंवा कचेरीत कुठे असतील तिथून, इलेक्ट्रॉनिक्स्च्या सहाय्याने मतदान करू शकतील या पूर्वीच्या प्रातिनिधिकतेपेक्षा हे प्रातिनिधिकत्व अधिक सच्चे असू शकते.

या पूर्वीच्या प्रणाली सद्यःस्थितीला अनुरूप नाहीत, असे आढळल्यावर आपण इतर पर्याय शोधू लागलो. आणि मग आपल्याला असे आढळून येते, की पूर्वी कधीही नव्हते असे पर्याय आपल्याला उपलब्ध झालेले आहेत.

या विशिष्ट सूचनांपेक्षाही महत्त्वाचा आहे, तो आपल्याला एकूण भावी वाटचालीसाठी आपण निवडणार असलेला मार्ग!

तिसऱ्या लाटेचा जम आणखी चांगला बसला, म्हणजे निवडीचे काम आपल्याकडे असणार नाही. तीच आपल्याला तिची स्वतःची निवड स्विकारायला भाग पाडेल, असे मला वाटते. पहिल्या लाटेने बहुमताच्या माहात्म्यापूर्वीची राजसत्ता पाहिली. दुसऱ्या लाटेत बहुमताचे माहात्म्य प्रभावी ठरेल. आता अशी शक्यता आहे, की बहुमत–अल्पमत अशा दोन्ही प्रकारांनी आपण उद्याचा काळ साकार करू. बहुमताची सत्ता आणि अल्पमताची शक्ती या दोन्हींचे सुयोग्य व अपूर्ण मिश्रण आपण तिसऱ्या लाटेसाठी साधलेले असेल.

## अर्धप्रत्यक्ष लोकशाही

उद्याच्या राजकीय प्रणालीचा काही भाग 'अर्धप्रत्यक्ष लोकशाही' साकारणारा असावयास हवा. या ठिकाणीही एक मिश्रणच साधावयाचे आहे. आपले प्रतिनिधीही काम करतील, आणि आपण स्वतःही आपले स्वतःचे प्रतिनिधित्व साकार करू शकू.

आपण एकमताच्या अभावाचे निरीक्षण केलेले आहे. या गोष्टीमुळे प्रतिनिधिकत्वाची कल्पनाच बदलून जाते. प्रतिनिधीच्यामागे जर त्याच्या मतदारांचा पाठिंबा राहिलेला नसेल, तर तो कोणाचे प्रतिनिधित्व करणार?

आज परिस्थिती इतकी चमत्कारिक झालेली आहे, की प्रतिनिधींना नेमलेल्या लोकांच्या संचाने पुरवलेल्या माहितीवर व बाहेरील तज्ज्ञांच्या सल्ल्यावर अधिकाधिक प्रमाणात अवलंबून रहावे लागू लागले आहे. आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींना, ज्याच्या आधारे निर्णय घ्यावयाचा, त्या अपरिमित परिमाणांवद्दल फार कमी माहिती असते, त्यामुळे त्यांना इतरांनी काढलेल्या निष्कर्षांवर अधिकाधिक प्रमाणात अवलंबून रहावे लागते. हे प्रतिनिधी खुद्द स्वतःचे प्रतिनिधित्व करण्याच्याही पात्रतेचे उरलले नाहीत!... ते ज्या असंख्य गटांचे नाममात्र प्रतिनिधित्व करतात, त्यांच्याबाबतही त्यांना माहिती असत नाही, मग त्यांच्यासाठी त्यांनी कशाचीतरी तरतूद करणे किंवा त्यांची तरफदारी करणे दूरच!

प्रातिनिधिक संस्थांना झालेला हा एक प्रकारचा पक्षाघात असे सुचवतो, की काही थोड्या प्रतिनिधींनी घेतलेले निर्णय त्यांच्या मतदारांकडे सोपवणे इष्ट! आपण निवडून दिलेले लोक जर आपली तरफदारी करू शकत नसतील, तर आपणच आपले भले साधायला हवे. त्यांनी केलेले कायदे जर आपल्या गरजांपासून दूर रहात असतील, आणि या गरजांशी कसलाही प्रतिसाद ठेवत नसतील, तर

अनुक्रमणिका

कायदेदेखील आपण स्वतःच करायला हवेत. मात्र त्यासाठी आपल्याला नव्या संस्था व नव्या तंत्रज्ञानाची आवश्यकता भासेल.

दुसऱ्या लाटेतील क्रांतिकारकांना प्रातिनिधिक लोकशाहीच्या विरोधातील प्रत्यक्ष लोकशाहीची कल्पना होती. इ. स. १७९३ साली तयार झालेल्या फ्रेंच क्रांतिकारक घटनेमध्ये याबाबतचे काही धागे आहेत. मार्क्स व त्याच्या अनुयायांनी पॅरीस कम्यूनचा, वरचेवर, नागरिकांनी कायद्याच्या अंमलबजावणीत घ्यावयाच्या सहभागाचा आदर्श अशा स्वरूपात उल्लेख केलेला आहे. परंतु या पद्धतीतील दोष आणि तिला असणाऱ्या मर्यादा सर्वांनाच माहीत होत्या आणि त्यामुळेच एकूण वळण उलट दिशेला लागले.

इ. स. १९६५ च्या सुमाराला क्षुब्ध अमेरिकन लोकांनी 'हॅनोईवर बाँब टाकावा की नाही?' या प्रश्नावर प्रत्यक्ष मतदान केले होते. प. जर्मनीतील प्रक्षुब्ध लोकांनीही 'सिंपसायझर्स'साठी नळ उभारण्याच्या प्रश्नाबाबत निर्णय घेण्यात प्रत्यक्ष भाग घेतला होता... निवडून दिलेले प्रतिनिधी लोकांहून कमी भावनाप्रवण आणि अधिक सावध समजले जातात.

लोकांच्या अतिभावनाप्रवणतेची समस्या अनेक मार्गांनी सोडवता येईल. एक म्हणजे त्यांच्या प्रक्षुब्ध भावना थंड होण्यासाठी जरूर तेवढा कालव्यय करणे, आणि दुसरे म्हणजे पुनः एकदा विचार करण्याची संधी देऊन दुसरे अनुमोदक (किंवा विरूद्धही) मत घेणे व नंतरच त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण विषयांवरच्या निर्णयांची अंमलबजावणी करणे...

इ. स. १९७५ च्या सुमारास स्वीडनने लोकांना देशाच्या ऊर्जा धोरणाच्या घडणीत प्रत्यक्ष भाग घेण्याची संधी दिली होती. तसे करताना, लोकांना या विषयाची तांत्रिक माहिती फार कमी आहे हे जाणून त्याने त्यांच्यासाठी दहा तासांचा एक अभ्यासवर्गही योजला होता. आणि त्याचा किंवा तत्सम वर्गाचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सरकारला सूचना देण्यासाठी आमंत्रित केले होते... अंदाज असा होता, की १०,००० पर्यंत नागरिक भाग घेतील, परंतु आश्चर्याची गोष्ट ही, की ७०,००० ते ८०,००० लोकांनी या बाबतीत मनापासून लक्ष घातले. एका राष्ट्रीय समस्येच्या सोडवणुकीसाठी (अमेरिकन प्रमाणात) जवळजवळ २,०००,००० लोक एकत्र आले होते! आणि या प्रश्नात भावनाप्रवणतेचा संबंध कुठेही येत नव्हता!!

अनेक आक्षेपांना तोंड देता येणे शक्य आहे. नागरीकाचे राजकीय निर्णय घेण्याबाबत प्रत्यक्ष सहभाग घ्यायला प्रत्यवाय असण्याचे कारण नाही.

उद्याच्या प्रत्यक्ष लोकशाहीची चुणुक दाखवणारे असे आणखी काही प्रयोग झालेले आहेत. कॉम्प्युटर्स, उपग्रह, टेलिफोन, तारा, मतदान प्रक्रिया, आणि इतर अनेक प्रगतमार्गानी सुशिक्षित नागरीक इतिहासात प्रथमच, स्वतःशी संबंधित निर्णय घ्यायला सुरूवात करू शकेल.

प्रश्न प्रत्यक्ष लोकशाही का अप्रत्यक्ष लोकशाही हा नसून प्रतिनिधत्व स्वतः करायचे की दुसऱ्या कोणीतरी हा आहे. दोन्ही प्रकार उपयुक्त आहेत. त्यांच्यात क्रियाशीलता आहे. या दोन्हीची सुयोग्य युती घडवून अर्धप्रत्यक्ष लोकशाहीची प्रणाली निर्माण करण्याचा प्रयत्न फार कमी झालेला आहे, तो अधिक

अनुक्रमणिका

प्रमाणात होणे अत्यंत आवश्यक आहे. ही युती किंवा हे मिश्रण करण्याचे अनेक मार्ग उपलब्ध होऊ शकतील.

निवडून दिलेले प्रतिनिधी काही विषयांसाठी समित्या नेमतात. प्रतिनिधिंना कोणत्याही दुर्लक्षित किंवा वादग्रस्त विषयासाठी समिती तयार करायला भाग पाडण्याचा कोणताही मार्ग लोकांना उपलब्ध नसतो. लोकांना अतिशय महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयासाठी प्रतिनिधींना समित्या तयार करायला लावण्याचा काहीतरी अधिकार त्यांच्याजवळ का उपलब्ध असू नये?

या सर्व प्रयोगांना मी अतिशय अनुकूल आहे, म्हणून ते पुढे मांडतो आहे, असे नव्हे, तर एक गोष्ट मला सांगायची, सुचवायची आहे. ती ही, की जी प्रणाली मोडकळीला आलेली आहे, ती खुली करण्यासाठी मार्ग आहेत. दुसऱ्या लाटेतील भूतपूर्व संस्थांच्या नमुन्यांवर किंवा अवशिष्ट सांगाड्यांवर अवलंबून राहून समस्या सुटणार नाहीत.

अर्थात् सुचविण्यात आलेल्या या नवीन योजनांचा प्रयोग प्रथम स्थानिक तत्त्वावरच करण्यात यावा आणि नंतरच मोठ्या प्रमाणात त्या लागू केल्या जाव्यात, या किंवा त्या सूचनेबद्दल आपले काहीही मत असो, एक गोष्ट खरी की, प्रत्यक्ष लोकशाही बाबत पूर्वी घेतले जाणारे आक्षेप दिवसेदिवस क्षीण होत चाललेले आहेत, आणि नेमके याचवेळी प्रातिनिधिक लोकशाहीबाबतचे आक्षेप वाढत्या प्रमाणात तीव्र होऊ लागले आहेत. काही जणांना धोकादायक किंवा काही प्रमाणात विचित्र वाटली तरी ही अर्धप्रत्यक्ष लोकशाही पद्धतच आपल्याला आपल्या भविष्यकालीन संस्थांच्या कार्यवाहीमध्ये मदत करणार आहे.

## निर्णयांची विभागणी

अल्पसंख्यांकांना वाढती सत्ता देणे, आणि नागरीकांना राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेऊ देणे या गोष्टी अत्यंत आवश्यक असल्या तरी, आणखीही काही आवश्यकता आहेत.

काही प्रश्न स्थानिक पातळीवर सोडवता येत नाहीत, तर काही प्रश्न राष्ट्रीय पातळीवर सोडवणे शक्य होत नाहीत. काही प्रश्नांसाठी अनेक पातळ्यांवर एकाच वेळी कृती घडणे आवश्यक असते. परंतु एक गोष्ट खरी, की प्रश्न सोडवण्याची जागा प्रश्नसापेक्ष असते, ती वेळोवेळी बदलत असते. अमुक एका जागी सर्व प्रश्न सुटण्याची शक्यता नसते.

संस्थांवर पडणाऱ्या कामाच्या बोज्यामुळे निर्णय तुंबतात. यातून मोकळे होण्यासाठी आपण निर्णयांची विभागणी करून पुनजुळणी करणे आवश्यक आहे. प्रश्नांची मागणी असेल त्यानुसारची जागा ते सोडवण्यासाठी नेमस्त केल्या जाणे आवश्यक आहे.

आजच्या राजकीय व्यवस्था या तत्त्वाचा भंग करत आहेत. समस्या दुसरीकडे मांडल्या गेल्या आहेत. परंतु त्यांच्या निर्णयाबाबतच्या अधिकाराचे स्थित्यंतर झालेले नाही. पुष्कळ निर्णय त्यामुळे लागूच शकलेले नाहीत. राष्ट्रीय पातळीवरची संस्थात्मक रचना गुंतागुंतीची पण काळजीपूर्वक केलेली आहे. उलट, काही निर्णय तात्कालिक असे घेणे जरूर असूनही ते घेता येत नाहीत, कारण त्यासाठी आवश्यक

असलेल्या रचनांनी अजून पुरेसा आकार घेतलेला नाही. शिवाय फार थोडे निर्णय उपराष्ट्रीय पातळीकडे घेण्यासाठी दिले जातात— प्रदेश, राज्ये, प्रांत, किंवा अभौगोलिक, सामाजिक गट इ. कडे.

राष्ट्रीय सरकारे हाताळत असलेले प्रश्न त्यांच्या कुवतीपलिकडचे असतात. त्यामुळे काही नव्या संस्थांची (अस्थायी तत्त्वावर) उभारणी करून त्यांच्याकडे निर्णय, निकाल देण्याचे काम सोपवण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

उदाहरणार्थ, अन्नाच्या साठवणुकीच्या व वितरणाच्या संस्था हव्यात, त्याचप्रमाणे धान्योत्पादन अपेक्षेहून कमी येणार असेल, तर त्याबाबत आगाऊ सूचना देणाऱ्या संस्थाही हव्यात, त्यायोगे साठवणुकीच्या, पुरवठ्याच्या किंमती जास्त वाढणार नाहीत, अशी काळजी घेता येणे शक्य होईल.

विविध जागतिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी आपल्याला अनेक गैरसरकारी सघटनांची अत्यंत गरज आहे. आपल्याला IMF, वर्ल्ड बँक व इतर अशा अनेक संस्थांसाठीही सुयोग्य पर्याय हवे आहेत. सागराची व बाह्य अंतराळाची व्यवस्था योग्य तऱ्हेने ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांची आपल्याला जरूर भासणार आहे.

निर्णयांची विभागणी होणे आवश्वक आहे. त्यासाठी पूर्वी आपण पाहिल्याप्रमाणे काही समस्या निर्णयासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांकडे सोपवून केंद्राचे ओझे हलके करण्यासही हरकत नाही. ‘वर’ प्रमाणेच ‘खाली’ ही काही समस्या सोपवल्या, तर एकूण पुष्कळच प्रश्न सुटल्याप्रमाणे होईल.

राजकीय विकेंद्रीकरण झाले म्हणजे लोकशाही प्रत्यक्षात उतरेल याची खात्री देता येत नाही. कितीतरी ठिकाणी स्थानिक दहशतवाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय राजकारणापेक्षाही कितीतरी अधिक प्रमाणात स्थानिक राजकारणात भ्रष्टाचार माजलेला आहे.

काही स्वप्नवेडे अराजकवादी ‘ग्राम–लोकशाही’ पहातात म्हणून किंवा करदात्यांना आपण आता गरीबांच्या कल्याण योजनांना आश्रय द्यावा वाटतो, म्हणून नव्हे, तर कोणतीही राजकीय प्रणाली इतक्या मोठ्या प्रमाणातील माहिती हाताळू शकत नाही, आणि संख्यात्मक किंवा गुणात्मक दृष्टीने भरपूर निर्णय घेऊ शकत नाही. निर्णयात्मक सरकारी कुवतीचा आतल्या आत जणू स्फोट होऊन ठिकऱ्या उडून गेलेल्या आहेत.

थोडक्यात, आपल्याला असे आढळून येईल की, निर्णयांच्या विभागणीने राजकीय प्रणालीतील गोठलेपणा हळूहळू नाहीसा होऊन ती अधिक क्रियाशील होईल. याप्रमाणे राष्ट्रीय सरकारावरील निर्णयांचा बोजा कमी होईलच, शिवाय ती आगामी संस्कृतीच्या गरजांनुसार श्रेष्ठींची किंवा उच्चवर्गाची रचनाही बदलून टाकेल आणि त्यांच्या खात्रीलायकपणाला बळकटी आणेल.

## श्रेष्ठ लोकांच्या वर्गात विस्तार

प्रत्येक समाजाची निर्णय घेण्याबाबतची स्वतःची अशी खास वैशिष्ट्यपूर्ण प्रणाली असते. ती चालवण्यासाठी लागणारे निर्णय जितके जास्त, वैविध्यपूर्ण, वरचेवर घ्यावे लागणारे आणि गुंतागुंतीचे

अनुक्रमणिका

असतील तितके राजकीय प्रणालीवरचे निर्णयांचे ओझे अधिक. आणि हे ओझे ज्या प्रकाराने वाटून घेतले जाते, त्या प्रकाराचे त्या समाजातील लोकशाहीवर मूलभूत परिणाम होत असतात.

औद्योगिकपूर्व समाजातील कामाची विभागणी अविकसित स्वरूपाची होती. बदल अगदी मंद गतीने होत होते. गाडा चालू ठेवण्यासाठी घेण्यात आलेले राजकीय किंवा प्रशासकीय निर्णय अगदीच कमी होते. निर्णय घेण्याचे ओझे छोटे होते. एक छोटा, अर्धशिक्षित, विशिष्टत्व नसलेला श्रेष्ठींचा वर्ग सर्व बोजा स्वतः बाळगून गाडा सहज चालू ठेवू शकत होता.

परंतु ज्यावेळी हा बोजा अचानक आवाक्यापलिकडे मोठा झाला, तेव्हा आज ज्याला आपण लोकशाही म्हणतो, त्या प्रकाराचा उद्रेक झाला. नवे श्रेष्ठी, उपश्रेष्ठी मिळून बोजा वाटून घेऊ लागले. नवीन क्रांतिकारक राजकीय संस्थांची या कामासाठी योजना करावी लागली. जो जो औद्योगिक समाज विकसित होत गेला, तो तो अधिकाधिक गुंतागुंत वाढत गेली. आशि या समाजातील 'सत्तेचे कारागीर' अपुरे पडू लागले. मदतीसाठी सतत अधिकाधिक लोकांची भरती करणे आवश्यक होऊ लागले आणि या अदृश्य परंतु अविच्छिन्न प्रक्रियेद्वारे मध्यमवर्ग राजकीय क्षेत्रात अधिकाधिक प्रमाणात येऊ लागला. श्रेष्ठी वर्गात गणला जाऊ लागला. ही भरती किती प्रमाणात व्हावी; यालाही काही मर्यादा होती. निर्णयाच्या कामाच्या बोज्यानुसारच ही मर्यादा ठरत होती. ज्यावेळी समाजाने गुंतागुंतीची एक नवीन पातळी गाठलेली असेल, अशावेळी बोजा जास्त वाढत असे. आणि त्यामुळे निर्माण झालेल्या नवीन संधी साधण्यासाठी अनेक गट समाज हक्काची मागणी तीव्र करू लागत. त्यामुळे श्रेष्ठी दरवाजे थोडे अधिक उघडत आणि लोकशाहीकरण झाल्याचा सत्यरूप भास अधिक प्रमाणात होत असे!

जोपर्यंत सामाजिक रचनेतील निर्णयात्मक कामाचे ओझे वाढत रहाते, तोपर्यंत लोकशाही ही ऐच्छिक निवडीची बाब रहात नसून ती उन्नतीची एक गरज असते. तिच्या खेरीज समाज चालू राहूच शकत नाही.

या सर्वातून असे सूचित होते, की आपण एक आणखी मोठ्या लोकशाहीय झेपेच्या पवित्र्यात आहोत, कारण सध्याची निर्णयक्षमतेची उडालेली रेवडी पहाताना राजकीय सहभागित्वाच्या मूलगामी विस्तारीकरणाचे फार मोठे संभव खुले होत आहेत.

## भावी महान् संघर्ष

नव्या राजकीय संस्थांची गरज ज्याप्रमाणे निर्माण झाली, त्याप्रमाणेच नवीन कुटुंबरचना, शैक्षणिक आणि सहकारी संस्थांचीही गरज निर्माण झालेली आहे, ही गरज आपल्या नव्या तंत्रज्ञानाशी, नव्या उद्योगांशी अनेकप्रकारे निगडित झालेली आहे. दळणवळणातील उलथापालथ, बिगर औद्योगिक जगाशी असलेल्या संबंधांची पुनर्रचना करण्याची गरज त्यांच्यात प्रतिबिंबित होते.

हे सर्व संबंध पाहिल्याखेरीज आपल्या भोवतीच्या मथळ्यांचा अर्थ लावणे आपल्याला शक्य होणार नाही. आजचा झगडा गरीब, श्रीमंत किंवा भांडवलदार–समाजवादी यांच्यातील नाही तर ज्यांना औद्योगिक समाजाचे रक्षण करावयाचे आहे, त्यांचा, ज्यांना त्याच्या पलीकडे प्रगती करावयाची, त्यांच्याशी असलेला झगडा आहे. हाच उद्याचा महान संघर्ष आहे!

अनुक्रमणिका

इतर परंपरागत वंशीय आणि तात्त्विक झगडे नाहीसे होणार नाहीत. कदाचित् ते, आर्थिक उत्पातातून जावे लागल्याने, अधिक तीव्र होण्याची देखील शक्यता आहे. परंतु हे सर्व झगडे त्या महान संघर्षांत अंतर्भूत झालेले असतील. कारण त्याच्या आवाक्यात प्रत्येक मानवी कृतीचा समावेश झालेला असेल.

आपल्या काळातील सर्वात मोठी राजकीय घटना म्हणजे आपल्यात दोन मूलभूत छावण्या तयार झालेल्या आहेत. यातील एक, दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीला वाहिलेली असून दुसरी तिसऱ्या लाटेच्या कैवाऱ्यांची आहे. पहिली औद्योगिक संस्कृती, तिच्या सर्व वैशिष्ट्यांसह रक्षण करू पहात आहे, तर दुसरी आजच्या अत्यंत निकडीच्या समस्या जाणत आहे. आणि ह्या समस्या दुसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या चौकटीत सोडवल्या जाणार नाहीत, हे निश्चित आहे हे आपण पाहिले आहेच.

या दोन छावण्यातील विभाजकरेषा अद्याप स्पष्ट झालेल्या नाहीत. कारण आपल्यातील कितीतरी व्यक्तींचे दोन पाय या दोन छावण्यात अडकलेले आहेत! शिवाय या प्रत्येक छावणीत समाविष्ट असलेले अनेक गट आपले भले करून घेण्याच्या नादाला लागलेले आहेत. यातील कोणत्याही एका बाजूचा नैतिक गुणावर एकाधिकार नाही. दोन्ही बाजूंमध्ये चांगले सभ्य लोक समाविष्ट झालेले आहेत. तरी देखील या दोन्हीतील राजकीय प्रणालीतून दिसून येणारे फरक प्रचंडच आहेत.

दुसऱ्या लाटेचे समर्थक जुनाच परंपरागत राजकीय खेळ खेळत आहेत, तर तिसऱ्या लाटेच्या लोकांना सर्व राजकीय उमेदवार व पक्ष (नवीन असले तरी) यांच्याबद्दल संशय असतो; आणि असे वाटते, की सध्या अस्तित्वात असलेल्या राजकीय चौकटीत आपल्या टिकावासाठी आवश्यक असणारे निर्णय घेतले जाणारच नाहीत!

दुसऱ्या लाटेच्या तळात समाजातील नामधारी सत्ताधारी अजूनही आहेत— राजाकरणी, उद्योगपती, युनियन पुढारी, शिक्षणतज्ज्ञ, निरनिराळे पुढारी—हे सर्व मात्र दुसऱ्या लाटेच्या जगाच्या अपुरेपणाच्या जाणीवेने अस्वस्थ झालेले आहेत— संख्यात्मक दृष्टीने पहाता या छावणीत सर्वसामान्य नागरीकांचेही अधिक बळ प्राप्त झालेले आहे.

तिसऱ्या लाटेचे समर्थक अजून स्पष्टपणे ओळखू येत नाहीत. त्यातील काही मोठ्या कॉर्पोरेशनमधील प्रमुख असतील तर काही कॉर्पोरेशन विरोधातील ग्राहकवादी असतील. काही चिंतातुर परिसरवादी असतील, तर काहींना लैंगिक भूमिका, कौटुंबिक जीवन, आणि वैयक्तिक वाढीची काळजी पडलेली असते. काहीचे लक्ष पर्यायी ऊर्जा प्रकारांवर केंद्रित झालेले असते, तर काहींना दळणवळणातल्या क्रांतीमुळे निर्माण झालेल्या नवीन लोकशाही हमीमुळे उत्तेजना वाटत असते. त्यातील काही दुसऱ्या लाटेखालील 'डावे' असतात, तर काही दुसऱ्या लाटेखालील 'उजवे', काही दीर्घकाळपर्यंत शांतता चळवळीत भाग घेणारे असतात. काहींनी आयुष्यात कधीच कुठल्या निदर्शनात, मोर्चात किंवा मिरवणुकीत भाग घेतलेला नसतो. काही भाविक आस्तिक असतात आणि काही चक्क नास्तिक असतात. तिसऱ्या लाटेच्या गटातील पुष्कळ लोक महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले मध्यमवर्गीय लोक असतात. काही जण उत्पादनाशी थेट संबंधित असतात, किंवा नोकरीत असतात. स्त्रिया, मानसिकरित्या दडपलेले, असे अनेक छोटे छोटे गट—अनेक थरातले, अनेक व्यवसायातले—तिसऱ्या लाटेच्या चळवळीतील शक्तीचे मूलस्रोत्र ठरतात.

अनुक्रमणिका

चळवळ हा शब्द या संदर्भात थोडा भ्रम निर्माण करतो. कारण त्याच्याद्वारे अधिक सामुदायिक जाणीव प्रतीत होते. वस्तुतः ती इतक्या प्रमाणात नसते. कारण तिसऱ्या लाटेचे लोक पूर्वीच्या सर्व सामुदायिक चळवळींबद्दल अविश्वास बाळगून आहेत.

परंतु त्याला चळवळ म्हणा, किंवा व्यक्तिगट सुट्या प्रयत्नांतून साधलेले प्रयत्न म्हणा, त्यात या सर्वांच्या झालेल्या जुन्या संस्थांबाबतच्या भ्रमनिरासाचेच ते प्रतिबिंब आहे. जुन्या प्रणालीची मोडतोड, दुरूस्तीच्या आवाक्याबाहेरची असल्याची जाणीव आहे.

तीव्र बनत चाललेला हा महान् लढा उद्याच्या राजकारणावर नक्कीच परिणाम करून जाईल. या लढ्यात भाग घेणारा एक म्हणून आपलीही प्रत्येकाची त्यात भूमिका आहेच. ही भूमिका नाशकारक तरी असेल, नाही तर सर्जनशील तरी असेल.

## दैवाची घडण

काही पिढ्या संस्कृती उभारण्यासाठी जन्माला आलेल्या असतात, तर काही तिचे रक्षण करण्यासाठी. ज्यांनी दुसरी ऐतिहासिक बदलाची लाट उभारली, त्यांना परिस्थितीने कारक ठरवले. आजही आपण ज्यांना आदर्श मानतो, त्या राजकीय रचना मिल मेडिसन वगैरेंनी तेव्हा तयार केल्या, दोन संस्कृतींच्या मध्यंतरात सापडल्यामुळे त्यांच्या दैवात कर्तृत्व लिहिलेले होते.

आज आपल्या सामाजिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्यालाही नव्या; तिसऱ्या लाटेचे आकार घडवावयाचे आहेत. अनेक देशातील लाखो लोकांनी हे काम सुरूही केलेले आहे. आपल्या राजकीय क्षेत्रातच कालबाह्यता फार मोठ्या प्रमाणात आढळते, आणि अधिक धोका दिसून येतो आहे. आणि या व्यतिरिक्तच्या कोणत्याही क्षेत्रात आपल्याला इतक्या कमी प्रमाणातली प्रतिभा, कमी प्रयोगशीलता, मूलभूत बदलाबाबतची कमी इच्छा आढळून येत नाही.

जे लोक आपल्या कामात धाडसाने काही नवे करत आहेत, बदल घडवून आणत आहोत, तेच घटनेतील किंवा राजकीय रचनेतील कालबाह्यतेच्या किंवा मूलभूत पुनर्जुळणीच्या सूचनेनीशी गोठून जातात. राजकीय क्षेत्रातील संपूर्ण सखोल बदलाचा प्रस्ताव त्याच्यात असलेल्या धोक्यामुळे इतका भयंकर वाटतो की, किती का अवास्तव कवा दडपशाहीची असेना, सध्याचीच रचना एकदम सर्व जगात सर्वश्रेष्ठ वाटू लागते.

पुष्कळ लोक असे आहेत, की ज्यांना जुने तेच सोने वाटले. आणि त्यामुळे आज आपण नव्या ऐतिहासिक जगात व युगात प्रवेश करू लागलेलो असूनही त्यांना जुन्या राजकीय ग्रंथांच्या ऐतिहासिक पिवळ्या पानातच अधिक क्रांतिकारकता आणि रस वाटू लागतो.

हा महान लढा तीव्र होत असताना आपल्या नजीकच्या भविष्यात पूर्वी घडलेल्या नाट्याचा पुनः लावलेला खेळ असणार नाही, सैनिक तुकड्यांनी लोकांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या पाठिंब्याने सत्तेवरच्या उच्चभ्रूंना उलथून टाकण्याचा प्रकार असणार नाही, दहशतीने प्रेरित केलेला तात्कालिक सामुदायिक उठाव असणार नाही. तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीसाठी झालेली नव्या राजकीय रचनेची निर्मिती एक

अनुक्रमणिका

तात्कालिक परिस्थितीतील उलथापालथ असणार नाही, तर काही दशकात झालेला, अनेक ठिकाणच्या अनेक थरातील हजारो नव्या नव्या बदलांचा आणि युत्यांचा तो परिपाक असणार आहे.

याचा अर्थ असा नव्हे की या उद्याच्या मार्गक्रमणात कधीच हिंसा घडणार नाही. पहिल्या लाटेतून दुसऱ्या लाटेत येताना एक रक्तरंजित नाट्य घडले. लढायांचे, उठावांचे, दुष्काळांचे, सक्तीच्या देशोधडीचे, आशि संकटांचे. आजच्या शक्यता याहूनही कितीतरी अधिक प्रमाणातल्या आहेत. घडण्याला लागणारा काळ थोडा असणार आहे, वेग अधिक असणार आहे, आणि धोकेही फारच मोठे असणार आहे.

आजच्या श्रेष्ठींच्या बुद्धिमत्तेवर आणि लवचिकपणावर बरेच काही अवलंबून आहे. हे गट जर दूर दृष्टीचे नसतील, कल्पक नसतील, आणि भ्यालेले असतील तर ते तिसऱ्या लाटेपासून अलिप्त राहतील, आणि त्याद्वारे हिंसाचाराला आणि स्वतःच्या घाताला आमंत्रण करतील परंतु या उलट जर ते तिसऱ्या लाटेबरोबर जात राहिले, त्यांनी विशाल दृष्टिकोणाच्या लोकशाहीची निकड जाणली, तर त्यांना तिसऱ्या लाटेच्या संस्कृतीच्या घडणीत भाग घेता येईल.

आपल्यापैकी बहुतेकांना आपण ज्या जगात रहातो, ते जग किती धोकादायक आहे, याची कल्पना आहे. सार्वजनिक अस्थैर्य व राजकीय अनिश्चितता कितीतरी शक्तीचा निचरा करून टाकतील हे आपल्याला माहित आहे. युद्ध म्हणजे काय, आर्थिक भूकंप म्हणजे काय, हे आपल्याला माहीत आहे. एक पक्षीय शासन पद्धतीचा उगम उदात्त हेतूंनी व सामाजिक कोलमडीतून झाला. लोक एका गोष्टीकडे मात्र जाणून बुजून—वर्तमानकाळ व भूतकाळ यातील फरकाकडे दुर्लक्ष करत आहेत.

देशादेशातील परिस्थितीत फरक असतो. परंतु इतिहासात आजपर्यंत कधीही इतक्या प्रमाणात लोक सुशिक्षित झालेले नव्हते. इतक्या अचाट पल्ल्याचे ज्ञान त्यांना कधी प्राप्त झालेले नव्हते. इतक्या उच्च प्रकारच्या भरभराटीचा उपभोग इतक्या लोकांनी यापूर्वी घेतलेला नव्हता. इतक्या लोकांना कधीच इतक्या प्रमाणात प्रवास किंवा आदान प्रदानाची संधी मिळालेली नव्हती. इतर संस्कृतीतून इतक्या प्रमाणात यापूर्वीही काही शिकता आले नव्हते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यापूर्वी लोकांना इतका विश्वास कधी वाटला नव्हता, की बदल शांततापूर्ण मार्गानेही करता येतात!

जितक्या लवकर आपण आपल्या पर्यायी राजकीय संस्थांची उभारणी करू, तितक्या पुढील बदलांच्या शांततापूर्णतेच्या शक्यता अधिक असतील. या तऱ्हेच्या बदलापेक्षा बदलांना थोपवण्याचे प्रयत्न अधिक धोकादायक असतील. कालबाह्य स्थितीचे समर्थन करण्याच्या प्रयत्नातून रक्तपातच संभवतो. हिंसात्मक उलथापालथ टाळण्यासाठी आपल्याला आताच जगभरातील कालबाह्य राजकीय प्रणालीकडे लक्ष द्यायला हवे. हा प्रश्न आपल्याला केवळ तज्ज्ञांकडे, घटनाकारांकडे, वकीलांकडे, राजकारण्यांकडे सोपवून चालणार नाही. ट्रेड युनियन्सकडे किंवा नागरी सघटनांकडे, वंशीय अल्पसंख्यांकांकडे, शास्त्रज्ञांकडे, उद्योगपतींकडे आणि गृहिणींकडे म्हणजे खुद्द जनतेकडे, खुद्द स्वतःकडे सोपवायला हवा.

परिसंवाद, सभा, टेलिव्हिजन कार्यक्रम, स्पर्धा, प्रतिक स्वरूप घटनात्मक सभा, यासर्वांद्वारे आपल्याला सर्वत्र राजकीय पुनर्रचनेचा प्रस्ताव मांडायला हवा. आपण आपल्याला प्राप्त झालेल्या सर्व आधुनिक साधनांचा वापर करावयाला हवा.

अनुक्रमणिका

भविष्यात काय आहे, आणि तिसऱ्या लाटेच्या समाजासाठी सर्वात चांगले काय असणार आहे, हे कोणाला माहित नाही. त्यामुळे आपल्याला, वरून लादल्या जाणाऱ्या एका स्फोटक बदलाचा विचार करता येणार नाही. हजारो जाणीवपूर्वक व विकेंद्रित प्रयोग करायला हवेत आणि त्याद्वारे राजकीय पर्यायांची स्थानिक स्वरूपात चाचणी करता यायला हवी. म्हणजे नंतर राष्ट्रीय स्तरावर त्यांचा अवलंब करता येईल.

भावी काळातील घडामोडीसाठी आपल्याला लाखो लोकांची मानसिक तयारी करायला हवी. बदलांना गती देण्यासाठी आपण राजकीय प्रणालीवर धोरणात्मक दबाव आणायला हवा. खालून मिळणाऱ्या या जबरदस्त दबावाशिवाय आपल्याला आपल्या सध्याच्या पुढाऱ्यांकडून अशी अपेक्षा करता येणार नाही, की ज्यांच्या अस्तित्वामुळे त्यांना प्रतिष्ठा, पैसा आणि सत्तेचा आभास प्राप्त झाला, त्या राजकीय संस्थांना त्या कितीही कालबाह्य झालेल्या असल्या तरी त्यांनी आव्हान द्यावे. काही दूर दृष्टीचे असामान्य राजकारणी व अधिकारी राजकीय बदलाच्या लढ्याला आपला पाठिंबा लवकर देतील. परंतु इतर अगदीच इलाज चालेनासा होईपर्यंत ताणून धरतील.

त्यामुळे बदलाची जबाबदारी आपल्यावर आहे. आपण स्वतःपासूनच सुरुवात करायला हवी. नाविन्याकडे, आश्चर्याकडे आणि मूलभूत दिसणाऱ्या गोष्टींकडे आपल्या मनाला, अपरिपक्वतेने, मिटवून टाकू नये, अशी आपण स्वतःला शिकवण दिली पाहिजे. कल्पना मारून टाकणाऱ्या विरूद्ध लढा द्यायचा. अभिव्यक्तिज्या स्वातंत्र्यासाठी लढा द्यायचा. अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य, कल्पनांना शाब्दिक रूप देण्याचे स्वातंत्र्य जनतेला भोगता आले पाहिजे.

सर्वात म्हणजे, याचा अर्थ असा, की पुनर्रचनेची प्रक्रिया आताच सुरू करायची. सध्याची राजकीय प्रणाली अधिक विस्कळीत होण्यापूर्वी आणि दहशतीचे थैमान सर्वत्र सुरू होण्याआधी, एकविसाव्या शतकातील लोकशाहीकडे शांततामय संक्रमण अशक्य होण्याआधीच, म्हणजेच, आताच, आपण सुरुवात केली पाहिजे.

आपण जर आताच सुरुवात केली, तर आपण आणि आपली मुले केवळ कालबाह्य राजकीय रचनांच्याच नव्हे, तर खुद्द संस्कृतीच्या पुनर्घटनेतही भाग घेऊ शकू.

स्वर्गस्थ क्रांतिकारकांच्या पिढीप्रमाणेच आपल्याला विधिलिखीत तयार करावयाचे आहे!

अनुक्रमणिका